# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे वाङ्मयीन कार्य

कला आणि ललितकला अभ्यास मंडळ पीएच.डी.
(विद्यावाचस्पती) पदवीकरिता सादर केलेला शोधप्रबंध
विषय : मराठी


: संशोधक :
वैशाली सुनिल झगडे

: मार्गदर्शक :
डॉ. पांडुरंग भोसले

: संशोधन केंद्र :
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


डिसेंबर २०१५

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे वाङ्मयीन कार्य

कला आणि ललितकला अभ्यास मंडळ पीएच.डी.
(विद्यावाचस्पती) पदवीकरिता सादर केलेला शोधप्रबंध
विषय : मराठी


: संशोधक :
वैशाली सुनिल झगडे

: मार्गदर्शक :
डॉ. पांडुरंग भोसले

: संशोधन केंद्र :
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


डिसेंबर २०१५

# प्रतिज्ञापत्र

मी वैशाली सुनिल झगडे या प्रतिज्ञापत्राद्वारे घोषित करते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व ललितकला अभ्यास मंडळांतर्गंत मराठी या विषयात पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी **''क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे वाङ्मयीन कार्य''** या विषयावर माझा शोधप्रबंध सादर करीत आहे.

सदर शोधप्रबंध मी डॉ. पांडुरंग भोसले (भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध, पुणे – ७) यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला असून असे घोषित करते की, सदरच्या शोधप्रबंधात नमूद असलेली माहिती सत्य असून ती आजवर मी कोठेही प्रकाशित केलेली नाही. तसेच कोणत्याही विद्यापीठाला कोणत्याही पदवीसाठी सादर केलेली नाही.

संशोधक

**वैशाली सुनिल झगडे**

चंद्रसरु अपार्टमेंट, 'नीलराणी',
रो हाऊस नं. ४, ३४/१३ सी,
दत्तनगर रोड, आंबेगाव बु., पुणे ४६.

ठिकाण : पुणे

दिनांक :

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व ललितकला अभ्यास मंडळांतर्गत मराठी या विषयात पीएच.डी (विद्यावाचस्पती) या पदवीसाठी वैशाली सुनिल झगडे यांनी **''क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे वाङ्मयीन कार्य''** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पूर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधाचे काम पूर्णपणे वस्तुस्थितीवर आधारित असून या विषयातील त्यांचे हे संशोधन स्वतंत्र आणि नवे असून आवश्यक तेथे संदर्भनिर्देश केले आहेत. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठात अन्य पदवीसाठी सादर केलेला नाही.

मार्गदर्शक

**डॉ. पांडुरंग भोसले**

(एम.ए.,एम.फिल, पीएच.डी., नेट, डी.जे.एम.सी.)

मराठी विभाग

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर

महाविद्यालय, औंध, पुणे ४११००७

.

ठिकाण : पुणे

दिनाकं :

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी ''क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे वाङ्मयीन कार्य'' हा प्रबंध पूर्ण करण्यासाठी उत्साही, व्यासंगी मार्गदर्शक डॉ. पांडुरंग भोसले यांचे वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन प्राप्त झाले. त्यांनी दिलेल्या प्रोत्साहन व प्रेरणेमुळेच ह्या प्रबंधाची पूर्तता करणे शक्य झाले.

याचबरोबर माझ्या संशोधन कार्यासाठी ज्यांनी मला सहकार्य केले, प्रेरणा दिली त्यांचे ऋण मानणे हे माझे कर्तव्य आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील डॉ. श्रीपाद भट यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना, मार्गदर्शन संशोधनाची दिशा स्पष्ट करण्यास सहाय्यभूत ठरल्या, तसेच डॉ. कल्याण काळे आणि डॉ. द. दि. पुंडे यांनीही मार्गदर्शन केले. संशोधनासाठी लागणारे साहित्य, ग्रंथ, पुस्तके, संदर्भ ग्रंथ हे सर्व जमा करताना अनेक मान्यवर व्यक्तींचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. संशोधनाची सुरुवात करताना प्रा. डॉ. संजय शिंदे (राजगुरुनगर), प्रा. डॉ. दिलीप कसबे (चाकण) आणि मा. श्री. शांतारामबापू घुमटकर (माजी सरपंच, राजगुरुनगर) यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले. विविध लेखक, व्यासंगी अभ्यासक, मान्यवरांमध्ये प्रा. हरी नरके, डॉ. सुभाष सावरकर आणि डॉ. सीताराम रायकर यांचे मोलाचे सहाय्य झाले. प्रा. हरी नरके यांनी त्यांच्या व्यस्त दिनचर्येतून संशोधन कार्यासाठी उपयुक्त माहिती दिली, मुलाखत व चर्चेतून मार्गदर्शन केले. एक अनमोल वाङ्मयीन ठेवा म्हणजे सावित्रीबाई फुले यांच्या काव्याच्या हस्तलिखिताच्या मूळ प्रती पाहावयास देऊन डॉ. मा. गो. माळी यांनीही संशोधनकार्यास शुभेच्छा दिल्या. मा. श्री. संजय नहार (संस्थापक, सरहद कॉलेज, पुणे), मा. ॲड. राम कांडगे, श्री. राजेश कांडगे (उद्योगपती, चाकण) यांनाही मी मनापासून धन्यवाद देते.

सदर संशोधनासाठी संदर्भ ग्रंथ पुरविणारे पुणे मराठी ग्रंथालय, महाराष्ट्र साहित्य परिषद ग्रंथालय, पुणे शासकीय ग्रंथालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय, पुणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, हुतात्मा राजगुरु महाविद्यालय ग्रंथालय, राजगुरुनगर,

आबासाहेब गरवारे महाविद्यालय ग्रंथालय, पुणे या ग्रंथालयातील ग्रंथपालांनी ग्रंथरुपी सेवा देऊन मला संशोधनासाठी सहकार्य केल्याबद्दल त्यांचे मी मनापासून आभार व्यक्त करते.

क्रांती शिक्षण संस्थेचे (चाकण) संस्थापक कै. मा. श्री. बाबुभाई शहा यांचेही यामध्ये प्रोत्साहन लाभले. त्याचप्रमाणे क्रांती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. प्रविणभाई शहा, सहसचिव मा. श्री. दिलीप इंगवले यांचेही मी आभार मानते. कन्या विद्यालयाच्या (चाकण) मुख्याध्यापिका सौ. घाटपांडे पी.आर. आणि माझ्या सहकारी शिक्षकवृंदाचेही मी आभार मानते. तसेच माझ्या मैत्रिणींमध्ये सौ. सीमा घुमटकर आणि सौ. नूतन नेवसे यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा.

एखाद्या कार्यात कुटुंबियांचेही मोठे योगदान असते. माझ्या संशोधन कार्याकडे कौतुकाने पाहणारी माझी आई सौ. विजयालक्ष्मी गिरमे, वडील श्री. जनार्दन गिरमे आणि मावशी सौ. जयश्री गिऱ्हे यांनी मला सतत प्रोत्साहन दिले. तसेच माझी बहीण सौ. अनुराधा बोरावके, भाऊ श्री. प्रशांत गिरमे, माझी कन्या डॉ. स्नेहल, मुलगा चि. ओंकार यांचेही सहकार्य लाभले. याशिवाय ज्यांच्या सहकार्य, प्रेरणेविना या संशोधन कार्याची पूर्तता होऊ शकली नसती ते माझे साथीदार आणि चांगला मित्र असलेले पती डॉ. सुनिल यांच्या ऋणातच राहणे मला आवडेल.

**वैशाली सुनिल झगडे**

चंद्रसरु अपार्टमेंट, 'नीलराणी'

रो होऊस नं.४, ३४/१३ सी, दत्तनगर रोड,
आंबेगाव बु., पुणे – ४६.

मो. नं. ९९२२६०८६६५

# अर्पणपत्रिका

ज्यांनी माझ्या तनाबरोबर

मनाचेही पोषण केले,

ज्यांनी माझ्या भावनांना जपताना

व्यावहारिक जगात खंबीरपणे

वागण्याचे धडे दिले...

वात्सल्याबरोबर विद्याग्रहण

प्रामाणिकपणाचा

वसा दिला...

त्या आई-वडिलांस,

सौ. विजयालक्ष्मी आणि

श्री. जनार्दन गिरमे यांना

नम्रतापूर्वक अर्पण !

# प्रकरण पहिले

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेः व्यक्ती आणि वाङ्मय

१.१ जन्म आणि बालपण

१.२ सावित्रीबाईंचा विवाह

१.३ सावित्रीबाई फुलेंच्या काळातील स्त्रियांची व समाजाची स्थिती

१.४ सावित्रीबाई फुले यांची शैक्षणिक जडणघडण

१.५ सावित्रीबाई फुले यांची सामाजिक जडणघडण

१.६ वाङ्मयीन जडणघडण

समारोप

# प्रकरण पहिले

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेः व्यक्ती आणि वाङ्मय

## १.१ जन्म आणि बालपण :

सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा या ठिकाणी झाला. माता लक्ष्मीबाई आणि वडील खंडोजी नेवसे पाटील यांची सावित्रीबाई ही पहिली कन्या होय.

फुलवंताबाई झोडगे म्हणतात, ''नायगाववासी नेवसेंचा इतिहास पाहता सातारा जिल्ह्यातील शेतकरी पैठण येथे काही दिवस राहून सातारा जिल्ह्यात पांगले असा मिळतो. नायगावला ऐतिहासिक महत्त्व आहे. रायरेश्वरला शिवाजी महाराजांचा शपथविधी झाल्यानंतर त्यांनी शिरवळ, नायगाव, पळशी, काळुबाईंचा डोंगर वगैरे भाग आदिलशाही फौजांशी झगडून अतिशय शर्थीचा पराक्रम गाजवून आपल्या ताब्यात घेतला. नायगावने शिवशाही अनुभवली तशीच पेशवाईही अनुभवली. तरीदेखील नायगाव हे एक स्वावलंबी छोटे गाव होते. कुंभार, तेली, सुतार आणि लोहार अशा बलुतेदारांना फार महत्त्व होते. तसेच शेतकरीही कष्टाळू होते. त्यामुळे तेथील गावकरी खाऊनपिऊन सुखी असत. गावात सणावारी शिंग, वाजंत्री, चौघडा व नौबती ही वाद्ये वाजविली जात गावच्या गरजा गावातच भागवायच्या.''[१] नायगावची पाटीलकी नेवसे घराण्याकडे होती. सावित्रीबाईंचे आजोबा सिदूजी यांचा मोठे कुशल शेतकरी म्हणून नावलौकिक होताच पण त्याचबरोबर ते गावप्रिय पाटीलही होते. या सिदूजी पाटलांचा मुलगाही परंपरेने आलेली पाटीलकी मोठया जबाबदारीने सांभाळत होता. हा मुलगा म्हणजे खंडोजी नेवसे पाटील.

सावित्रीबाई यांचे वडील खंडोजी नेवसे पाटील हाडाचे शेतकरी होते. शिवाय गावच्या इनामदारकीचा व पाटीलकीचा मानदेखील खंडोजीराव पाटलांकडे होता. तो कष्टाळू आणि मेहनती असल्यामुळे त्यांच्याकडे धनधान्याची कमतरता नव्हती. नायगाव परिसरात जर कोणाला कोणत्या समस्या निर्माण झाल्या तर नेवसे पाटील त्यावर मार्ग काढीत, लोकांना मदत करीत. त्यामुळे नेवसे पाटलांचे समाजात महत्त्व वाढत चालले होते. खंडोजीराव नेवसे पाटलांना चार अपत्ये झाली. त्यांना सिदुजी, सखाराम व श्रीपती ही तीन मुले होती, तर सावित्री ही सर्व

अपत्यात थोरली मुलगी होती. सावित्री सुंदर आणि तेजस्वी कन्या होती. लोभस, गोंडस सावित्रीबाईंच्या जन्मामुळे खंडोजी नेवसे यांना आनंद होतो.

फुलवंताबाई झोडगे या प्रसंगाचे वर्णन करताना म्हणतात, ''जन्मत:च तिच्या तोंडून कोऽहँ हा रोदनस्वर बाहेर पडला. बापाच्या धिप्पाडपणाचे आणि आईच्या सुंदर वर्णाचे ऋण घेऊन ही शुक्राची चांदणी पृथ्वीतलावर अवतरली. आपल्या पाटलांस मुलगी झाली. त्या मुलीस पाहण्यास सारे गांव पाटलांच्या घरी लोटले. सगळीकडे आनंदिआनंद पसरला. खंडोजी पाटलांनी साऱ्यांना साखर वाटली. त्यावेळी मुलगी पाहण्यास आलेल्या मंडळींनाच काय, खुद्द त्या मुलीच्या आईबापासही कल्पना नसेल की, अंधारात चाचपडत चालणाऱ्या पांथस्थास शुक्राच्या चांदणीचा प्रकाश जास्त उपयोगी पडतो. त्याचप्रमाणे ही मुलगी भविष्यकाळात पद–दलितांना व स्त्रियांना मार्गदर्शक होऊन उपयोगी पडणार आहे. त्याची जाणीव कोणाला येणे शक्य नव्हते. ही बालिका चंद्रकोरीप्रमाणे वाढू लागली.''[२]

निसर्गाच्या सान्निध्यात आणि प्रेमळ आईवडिलांच्या छायेत सावित्री लहानाची मोठी झाली. आपल्या बाललीलांनी आणि मोहकतेने सर्वांची मने जिंकू लागली. बालसुलभ उत्सुकतेने स्वयंपाकघराबरोबर गाई–गुरांना निरखू लागली होती. धीटाईने वडिलांबरोबर रानभर फिरून निसर्गाची नवलाई पाहू लागली होती. म्हणजेच बालपणापासून नेवसे कुटुंबात सावित्रीबाईंचे खूप लाड झाले. सावित्री जसजशी मोठी होऊ लागली तसतशी आईवडिलांना शेतात घरात मदत करू लागली. वडिलांचा धीटपणा, काम करण्यायचे कसब सावित्रीमध्ये उतरले.

सावित्रीबाईंचा स्वभाव खेळकर पण तितकाच धीट होता. लहानपणीच सावित्रीबाई गावातील मुलामुलींना बोलवायची व त्यांच्याबरोबर हितगुज करायची. सावित्रीबाईंचे हेच संघटनकौशल्य महात्मा फुलेंच्या नंतर सावित्रीबाईंना उपयुक्त ठरले. ही सर्व कार्ये करताना कधी कोणाचा अपमान होईल, कोणास राग येईल असे वर्तन सावित्रीबाई फुलेंकडून घडले नाही. खोटे बोलणाऱ्याची सावित्रीबाईंना प्रचंड चिड येत असे. एखाद्या दुबळया व्यक्तीची कोणी खोडी काढली तर ते सुद्धा सावित्रीबाईंना खपत नसे.

फुलवंताबाई झोडगे म्हणतात, ''एकदा भैरोबाच्या देवळात एक लहान मुलगा बसला होता. त्याच्या हातात एक गुलाबाचे फुल होते. ते एका दांडगट मुलाने त्याच्या हातून हिसकावून घेतले. सावित्री व तिच्या मैत्रिणी त्या मुलाचा आडदांडपणा पाहत होत्या. तो लहान मुलगा शरीर

प्रकृतीनी दुबळा होता. आपले फूल तो त्या दांडगट मुलाकडून घेऊ शकत नव्हता त्यामुळे तो रडू लागला. सावित्री पुढे झाली तिने त्या दांडगट मुलास विचारले मतु त्याचे फूल का घेतलेस?' तो मुलगा सावित्रीपेक्षा मोठा होता तो गुरगुरत म्हणाला, 'तू कोण शहाणी मला विचारणारी? तु का त्याची बहीण आहेस होय?' 'होय, मी त्याची बहीण आहे दे त्याचे फूल परत.' असे म्हणून तिने त्याच्या हातातील फूल काढून घेऊन त्या लहान मुलास दिले. दांडगट मुलास तेथून हाकलून लावले. तेव्हापासून अशक्त मुले तिच्यावर अधिक प्रेम करू लागली. ही आपली बाजू घेणारी मोठी ताई असे त्यांना वाटू लागले.''[३]

यावरून सावित्रीबाई फुलेंचा खोडकर आणि दांडगट मुलांवर कसा वचक होता हे निदर्शनास येते. सावित्रीबाईंच्या या स्वभावामुळे त्यांची वेगळी प्रतिमा लहान मुलांमध्ये तयार झाली.

बालवयापासूनच आईवडिलांच्या चांगल्या संस्कारात वाढल्यामुळे सावित्रीबाई फुले नेहमी कामात गर्क असत. शेजाऱ्याने काम सांगितले तरीदेखील सावित्रीबाई त्या अत्यंत उत्साहाने करत असायच्या. कधीही त्यांच्या बोलण्यात, वागण्यात नकार नसायचा. खेडेगावात मुलीला जी कामे करावी लागतात ती गुरेढोरे सांभाळणे, गाई म्हशींच्या धारा काढणे, आईला स्वयंपाकात मदत करणे अशी सर्वच कामे त्या करत असत.

उपरोक्त कामाशिवाय सावित्रीबाईंनी स्वतःचे वैयक्तिक छंदही जपले होते. उदा. विहिरीत पोहणे, सावित्रीबाईंना विहिरीत चांगले पोहता येत होते. विहिरीच्या कठड्यावर उभे राहून त्या विहिरीत झेप घेत. गोफणीत खडा घालून गोफन फिरवित. नेमबाजीतही त्यांचा हातखंडा होता. रानावनात फिरुन त्या चिंचा व कैऱ्या दगड फेकून झाडावरुन पाडत असत. एकूणच बालपणी त्यांचा धीटपणा आणि तितकाच अवखळपणा हा नजरेत भरेल असाच होता. सावित्रीबाईंचे बालपण हे अत्यंत सुखासमाधानात आणि आनंदात गेल्याचे स्पष्ट होते.

## १.२ सावित्रीबाईंचा विवाह :

सिदुजी, सखाराम आणि श्रीपती या लहान भावंडांबरोबर सावित्रीचे बालपंण आनंदात चालले होते. पण त्याकाळच्या प्रथेनुसार या बालसावित्रीचे आता लग्नाचे वय झाले होते.

आताच्या काळात मुलीचे लग्नाचे वय अठरा वर्षे आणि मुलाचे वय एकवीस वर्षे आहे. परंतु त्याकाळी पाच वर्षानंतर कधीही लग्ने लावली जात असत.

कृष्णा मालकर म्हणतात, ''सावित्रीबाई फुले यांच्या मनाचा बौद्धिक विकास तर होत चाललेला होता परंतु आरोग्यसंपन्न निरोगी व गुणी मातापित्याच्या पोटी जन्म झाल्यामुळे त्यांच्या शरीराची वाढही झपाट्याने होऊ लागली होती. सावित्रीबाई फुले सात वर्षाच्या होतात आणि त्यांच्या आईच्या मनात सावित्रीबाईंच्या लग्नाचे विचारचक्र सुरू होते. त्यांना वाटते सावित्री मोठी झाली पाटलांनी आता तिच्या लग्नासाठी प्रयत्न करावेत.''[४]

असा विचार लक्ष्मीबाई व्यक्त करू लागल्या कारण त्या काळात मुलीचे लग्न ६ वर्षे पूर्ण होण्याअगोदर झाले पाहिजे असा समज रूढ होता. वधुपरिक्षणाच्या काळात मुलीचे रंग, रूप, गुण, घरकाम, शेतीकाम यावरून तिचे गुणमापन ठरत असे. त्या काळात वराच्या बापाकडून वधूच्या बापाला पैसे देण्याची पद्धत अस्तित्वात होती. तत्कालीन पद्धतीस 'द्याज' असे म्हणत असत. मुलीला घरकाम, शेतीकाम, किती चांगल्या पद्धतीने येते त्यावर तिची पसंती अवलंबून असायची. घरात येणारी सून घरकामात, शेतीकामात तरबेज असेल तर शेतकरी कुटुंबात तिला आगळे वेगळे महत्त्व असायचे, कारण शेतकऱ्याला आपल्या शेतीच्या कामात अशाच व्यक्तीची नितांत आवश्यकता भासत असे. वधुमुलगी म्हणून मुलींकडे जे आवश्यक गुण असतात ते सर्वच गुण सावित्रीबाईंमध्ये ओतप्रोत भरलेले होते आणि म्हणूनच वरसंशोधनाच्या बाबतीत नेवसे पाटलांना जास्त खटाटोप करावा लागला नाही.

ज्या पद्धतीने आई लक्ष्मीचे सावित्रीच्या लग्नाचे विचारचक्र चालू होते त्याच त्या पद्धतीने पुण्यात गोविंदरावांचेही ज्योतिरावांसाठी वधुसंशोधन चालू होते. ज्योतिराव फुले आठ–नऊ महिन्याचे असतानाच त्यांची आई चिमणाबाई २५ डिसेंबर, १८२७ रोजी निधन पावल्या होत्या. पत्नीच्या निधनाने गोविंदरावही दुःखी झाले होते. विशेष म्हणजे गोविंदरावांनी दुसरे लग्न न करता आपली मुले राजाराम व ज्योतिराव यांचे चांगले संगोपन केले. चिमणाबाईंच्या पश्चात राजाराम आणि ज्योतिराव यांचा सांभाळ करण्याची जबाबदारी आपल्या मावसबहिणीवर सगुणाबाई क्षीरसागर यांच्यावर टाकली. सगुणाबाई या नात्याने ज्योतीरावांच्या मावसआत्या होत्या. नायगाव जवळच धनकवडी गावात त्या राहत असत. नेवसे पाटील त्याचे नातेसंबंधातील असल्यामुळे सगुणाबाईंचे नेहमी जाणे येणे चालू होते. त्याचा परिणाम असा झाला की, त्यांना

गुणी सावित्रीबाई तेव्हापासूनच आवडू लागलेली होती. स्वतः सगुणाबाईंनी ज्योतिरावांसाठी अनेक वधू पाहिलेल्या होत्या, परंतु अनुरूप अशी वधू त्यांना सापडत नव्हती. वास्तविक सगुणाबाईंना सावित्रीचे स्थळ माहितच होते म्हणून शेवटी सगुणाबाई गोविंदरावांना सांगून सावित्रीबाईस पाहण्याचे ठरविते. भारतीय संस्कृती आणि रीतीरिवाजाप्रमाणे सगुणाबाई गोविंदराव आणि राजाराम हे तिघेही मुलगी पाहण्यास नायगावास गेले. सावित्री गोविंदरावांना सून म्हणून पसंत पडेल याची सगुणाबाईंना पुरेपूर कल्पना होती. कारण ज्योतिराव आणि सावित्रीबाई हे दोघेही गुणसंपन्न आणि निरोगी होते. मुलगी पाहण्याचा कार्यक्रम पार पडतो. सर्वांनाच सावित्रीबाई आवडतात. आधी वरपक्षाकडून होकार कळविला जातो. शिवाय खंडोजी नेवसे पाटील यांनी पूर्वी अनेकदा ज्योतिरावांना पाहिले होते. एवढेच नव्हे तर सगुणाबाईसारखी नात्यातली व्यक्ती मध्यस्थ असल्याकारणाने चिंता करण्याचा प्रश्नच येत नव्हता.

कृष्णा मालकर या लग्नसमारंभाबद्दल म्हणतात, ''सावित्रीबाईंना महात्मा ज्योतिबा फुलेंच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल सगुणाबाई व आईकडून माहिती मिळाली की, सावित्रीचा होणारा नवरा खूप हुशार आहे. सत्यनीतीचा भोक्ता आहे. रीतीरिवाजाप्रमाणे सावित्रीबाई आणि ज्योतिराव यांच्या लग्नाची सुपारी फुटली. या दरम्यान ज्योतिरावांचे वय होते १३ वर्षे व सावित्रीबाईंचे वय होते ९ वर्षे. लग्नसमारंभाला आजुबाजूच्या खेडेगावातून अनेक गावकरी हजर होते व आलेल्या सर्व पाहुण्यांचे आगत स्वागत खंडोजीरावांनी आनंदाने व उत्साहाने केले. अशा पद्धतीने फाल्गुन वद्य ५ शके १७६८ रोजी म्हणजेच इ.स. १८४० साली नायगावात हा विवाह समारंभ यथोचितपणे, आनंदात पार पडला. माहेरच्या प्रेमळ शिकवणुकीची शिदोरी बरोबर घेऊन सावित्रीने ज्योतिरावाच्या संसारात पहिले पाऊल टाकले सावित्री नुसती अर्धांगिणी नव्हती तर ज्योतिरावांच्या सर्वस्वाची स्वामिनी म्हणून तिने प्रगतीच्या दिशेने पहिले पाऊल उचलले.''[५]

लग्न झाल्यावर सावित्रीबाई ज्योतिरावांबरोबर सासरी आल्या. पहिलेच सासरला कोणीच बाईमाणूस नव्हते. घरात फक्त गोविंदराव आणि ज्योतिराव हे दोघेच राहत असायचे. गोविंदराव स्वतःच आपल्या हाताने स्वयंपाक करित असत. सावित्रीच्या लग्नाच्या अगोदर जेवणाच्या बाबत एकंदर तारांबळच होती. कधी कधी ज्योतिबा सगुणाबाईकडे जेवायला जात

असत. ज्योतिबाची आई चिमणाबाई व सगुणाबाईंची आई धोंडाबाई या दोघी बहिणी बहिणी होत्या. धोंडाबाईंचे सासर हडपसर होते.

सगुणाबाई मोठी झाल्यावर तिचे लग्न होते परंतु दुर्दैवाने तिच्या नवऱ्याचे निधन होते. माहेरचे कोणीच राहत नाही. सगुणाबाईंच्या पोटपाण्याचे प्रश्न निर्माण होतात. पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सगुणाबाई जॉन नावाच्या मिशनऱ्याच्या मुलांचे संगोपन करण्याचे काम करीत असत. सगुणाबाईला लिहिता वाचता येत नव्हते. परंतु इंग्रजीत मात्र बोलता येत होते. ती स्वभावाने शांत, प्रेमळ आणि दयाळू होती.

ज्योतिबाकडे तिचे कटाक्षाने लक्ष होते. आईच्या मायेने तिने ज्योतिबाला सांभाळले. तिच्या प्रेमाच्या सावलीत ज्योती लहानाचा मोठा झाला. शिक्षण घेऊ लागला आणि समाजसेवा करू लागला. जसे सगुणाबाईंनी ज्योतिरावांना घडविण्यात महत्त्वाचा हातभार लावला तसाच हातभार सावित्रीबाईंच्या शैक्षणिक जडणघडणीसही लावला.

## १.३ सावित्रीबाई फुलेंच्या काळातील स्त्रियांची व समाजाची स्थिती :

एकेकाळी स्त्रियांना वेदाध्ययनाचाही अधिकार होता याची मैत्रेयी, गार्गी यासारखी उदाहरणे आहेत. ऋग्वेदात पत्नीला पतीचे अर्धांग मानले आहे. तैत्तिरीय ब्राह्मणामध्ये **'अर्धो वा एष आत्मनो यत् पत्नी'** म्हणजे पत्नी हे पतीच्या आत्म्याचे अर्ध आहे असे म्हटले आहे. पतिपत्नींच्या समानतेविषयीचे असे अनेक उल्लेख वैदिक वाङ्मयात आढळतात. महाभारतात शकुंतला दुष्यंतला भार्येचे महत्त्व सांगत असताना म्हणते '**अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा'** पत्नी हे पतीचे अर्धांग आणि पत्नी हा पतीचा श्रेष्ठतम मित्र आहे.

आज भारतामध्ये सर्व पौढ स्त्री–पुरूषांना मतदानाचा हक्क आहे, परंतु विसाव्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत संपूर्ण अमेरिका आणि युरोपसहित जवळ–जवळ जगभर स्त्रियांना मतदानाचा अधिकार नाकारलेला होता. पुरूषप्रधान व्यवस्थेतील स्त्री–पुरूष विषमतेचे हे एक जळजळीत उदाहरण होते.

''एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीस इंग्रजांच्या आगमनामुळे महाराष्ट्रातील समाज प्रबोधन चळवळीचा उद्‌गम आणि विकास घडून आला. ब्रिटिशांची सत्ता महाराष्ट्रात येण्यापुर्वी पेशव्यांची राजवट होती. १९ व्या शतकाच्या प्रारंभी ब्रिटीशांनी पेशवाईचा पाडाव केला.

पेशवाईत धर्मसंस्था आणि राज्यसंस्था एकत्र आल्याने धर्माच्या नावाखाली शूद्रातिशुद्रांचे शोषण सुरू होते. समाजाचे नेतृत्व करताना राजा म्हणून आपले काही कर्तव्य आहे हेच मुळी पेशवे विसरले होते. प्रजेचे सुख, सुरक्षितता, सुव्यवस्था, सैन्य, खजिना, न्याय, कायदा, शिक्षण इत्यादी बाबींचा विचार राज्यव्यवस्थेतून हद्दपार झाला होता. याबाबतीत बाजीराव पेशवा सर्व आघाड्यांवर अपयशी ठरला होता. राज्याच्या खजिन्याचा उपयोग पेशव्यांचे पूजाविधी, दानदक्षिणेचे वेड, विलासप्रियता आणि भोगलोलुपता यासाठी केला जात होता. शेतकरी वर्गाची दुर्दशा होती. बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने निसर्गाने अवकृपा केली तर शेतकऱ्यांचे खूप नुकसान होई. परिणामी शेतकऱ्यांना वारंवार सावकारांकडून कर्ज घ्यावे लागे. कर्जाच्या पैशावर वाढणारे व्याज चुकविण्यासाठी पुन्हा कर्ज अशा दुष्टचक्राच्या विळख्यात शेतकरी अडकला होता. त्यातच धर्मभोळेपणा आणि अज्ञान याची भर असल्यामुळे अक्षरशून्य शेतकरी लुटला जात होता. आर्थिकदृष्ट्या अधिकाधिक दुर्बल होत होता आणि दुसऱ्या बाजूला पेशव्यांचे सरदार मात्र चैनीचे व भपकेबाज जीवन जगत होते. प्रजेच्या सुख–दुःखांची त्यांना चिंता नव्हती. पेशव्यांभोवती त्यांचे कुटुंबीय, पाहुणे, पुजारी, आश्रित, भिक्षुक, दासदासी, अंगरक्षक व हुजरे यांचीच मोठ्या प्रमाणात गर्दी होती. परिणामी ही सर्व परिस्थिती पेशवाईच्या अस्ताला कारणीभूत झाली. पेशवाईच्या शेवटच्या काळातील घटनांनी तर धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनाचार अनागोंदी कारभार शिगेला पोहोचला होता. ‘पेशव्यांच्या राज्यात ब्राह्मणांचे प्रस्थ माजले, त्यांचे अमर्याद जातीवर्चस्व वाढले. इतकेच नव्हे तर त्यांनी आपला राज्यकारभार न्यायाने, दक्षतेने पार पाडला नाही. त्यामुळेच स्वराज्याचा नाश झाला व ब्राह्मणांनी देश बुडविला’’[६] असे म्हणून लोकहितवादींनी पेशवाई बुडविल्याबद्दल फक्त ब्राह्मणांना दोष दिला आहे. स्त्रियांची स्थिती तर फारच बिकट होती. स्त्रियांवर जेवढे जास्त निर्बंध तेवढी त्यांची कुटुंबाची जास्त प्रतिष्ठा आणि खानदानीपणा मानला जात होता. केशवपन, सती, बालविवाह या समस्यांनी उग्र रूप धारण केले होते. मुलींचे बालपणी विवाह होत असत तसेच जरठकुमारी विवाहाचे प्रमाणही खूप होते. त्याकाळी विवाह कशा पद्धतीने होत व स्त्रीला दासीचे दुय्यम स्थान देणे हा हेतू त्यामागे कसा होता हे दाखविणारी पुढील उदाहरणे पुरेशी आहेत. ‘‘नानासाहेब पेशवे–विवाहाच्या काळी वय ४० वर्षे, वधूचे वय ९ वर्षे, गोपाळराव पटवर्धन विवाहाच्या काळी वय ३५ वर्षे, वधूचे वय ९ वर्षे, महादजी शिंदे–विवाहाच्या काळी

६५ वर्षे, वधूचे वय १२ वर्षे, न्यायमूर्ती रानडे–विवाहाच्या वेळी वय ३५ वर्षे, वधूचे वय ९ वर्षे.''[७]

उपरोक्त उदाहरणातील वर–वधू पाहिल्यास चक्क बाप–लेकीचे नाते असावे एवढे अंतर त्यांच्या वयात दिसते. पण त्यावेळी मात्र हे एवढे सहजतेने होई की त्यात काही वावगे आहे असे समाजाला वाटत नसे. वयातील एवढी तफावत पुढील अनर्थांची नांदी ठरायची. मुलगी शारीरिक, मानसिक दृष्टीने खरोखर लहान असायची. ही चिमुकली यौवनात पदार्पण करायची आणि निसर्गनियमानुसार वार्धक्याने, वयाने खूपच मोठ्या असलेल्या तिच्या नवऱ्याचा मृत्यू व्हायचा. एवढे कमी म्हणून की काय आधीच पतिरूपी परमेश्वराच्या मृत्यूने हादरा बसलेली तरूणी आरशात पहायला गेली की, स्वतःचे विद्रूप रूप तिला दिसे. कारण पतिनिधनानंतर सर्व सौभाग्य अलंकार, म्हणजे मंगळसूत्र. बांगड्या व जोडवे व इतर दागिने तसेच सौभाग्यचिन्ह कपाळावरील लालभडक कूंकू या सर्व गोष्टींपासून जबरदस्तीने तिला दूर ठेवले जाई.

बालविवाहामुळे अर्थातच पती निवडण्याचा अधिकार तिला नसे आणि जरठकुमारी विवाहात बहुतेक वेळा मुलीला अकाली वैधव्य येत असे. त्यामुळे अनेक कर्मठ कुटूंबात तिला सती जाणे भाग पडे. ''सती जाण्याचा प्रकार भयानक होता. एखाद्या विधवा मुलीने सती जायला नकार दिला तर तिला जबरदस्तीने चितेवर ढकलले जायचे. तिच्या ओरडण्याचा आवाज कोणाला ऐकू येऊ नये म्हणून ढोलताशे जोरजोरात वाजवले जाई. तिला जिवंत स्वर्गात पाठविल्यावर तिचे लग्नाचे दागिने व कपडे ब्राह्मण स्त्रिला दान केले नाही तर सती जाणाऱ्या स्त्रिला स्वर्ग नशीब होत नसे.''[८] अशी पारंपरिक मानसिकता होती. ब्राह्मणी धर्माला फायदेशीर अशा या प्रथा होत्या.

पुढच्या काळात सतिबंदीचा कायदा झाल्यावर विधवा स्त्रियांची केशवपनाची प्रथा मात्र कायम राहिली. केशवपन करून विधवा स्त्रीला कायम घरात बंदिस्त ठेवले जायचे. तारूण्यसुलभ भावनांमुळे एखाद्या विधवेकडून चूक होऊन विधवेला दिवस गेले तर आत्महत्येला पर्याय नव्हता. एकत्र कुटुंबपद्धतीमुळे बऱ्याच वेळा घरातीलच कुणीतरी तिच्या असहाय्यतेचा फायदा घेत.

पेशवाईत तर स्त्रियांचा बाजार भरत होता. मुलांप्रमाणे दासदासी विकण्याची, विकत घेण्याची प्रथा होती. सरदार, सावकार, जहागीरदार इत्यादी लोक दासी विकत घेत आणि नंतर

पेशवे व इतर सरदार, नातेवाईकांना भेट देत. पुण्यात बहुतेक श्रीमंत गृहस्थांच्या घरी कुणबिणी व गुलाम असत. ''विकत घेतलेल्या कुणबिणी परस्परांकडे पाठविण्या संदर्भातला पत्रव्यवहारही पेशवे दप्तरात उपलब्ध आहे.''[९] अशा पेशवाईच्या अनागोंदी कारभाराला जनता कंटाळली होती आणि म्हणूनच पेशव्यांकडून सत्ता हस्तगत केल्यावर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांचा पुण्यात मानपत्र देऊन जो सत्कार करण्यात आला. त्यामध्ये स्पष्ट लिहिले होते की, ''तुम्ही राज्य घेतले ते बरे जाहले.''[१०] आणि पेशवाईच्या अस्तानंतर, ''बाजीरावाचे आता पुण्यास राज्य नाही, बरे झाले. चांगले मेल्याचे तळपट झाले. मोठा चांडाल होता तो''[११] अशीच पुण्यातील बहुजन लोकांची भावना होती.

एकंदरीत त्या काळी स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. देवाच्या आणि धर्माच्या नावाखाली तिचे जगणे केविलवाणे झाले होते. केशवपन, सती या जाचक प्रथा आणि बालविवाह, जरठकुमारी विवाह या परंपरा तसेच स्वयंप्रतिमेची ओळख आणि आत्मभान नष्ट करणारे, अंधःकाररूपी अज्ञान यांनी त्या काळच्या स्त्रियांना माजघराबाहेरचा प्रकाश पाहायची संधीच नाकारली होती.

## १.४ सावित्रीबाई फुले यांची शैक्षणिक जडणघडण :

आजच्या काळात माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात माहितीचा विस्फोट झाला आहे. विविध विषयांच्या विविध ज्ञानशाखा सर्वांसाठी मुक्तपणे खुल्या आहेत. परंतु त्या काळी उच्चवर्णियांनी काय शिकावे, क्षत्रिय, वैश्यांनी काय शिकावे हे अलिखीतपणे ठरलेले असे. शूद्रांना तर शिक्षणाचा अधिकारच नव्हता. स्त्रियांसाठी धर्म, स्वातंत्र्य, शास्त्र, मर्यादा, विवाह याविषयी एवढ्या खुळचट कल्पना मांडल्या होत्या की, त्यांना अमानवी म्हणावे की भयंकर असा प्रश्न पडावा. अर्थातच तेव्हाचे शिक्षणही फक्त ब्राह्मणांसाठीच होते. मंत्र, पाठांतर, पूजाविधी, सोवळे, या बाबींचा शिक्षणात समावेश होता. तिथी सांगणे, पंचांग पाहणे, पोथी वाचणे, मंत्रपठण करणे या धार्मिक कार्यासाठीच शिक्षण होते. सनातनी हिंदू धर्मच नव्हे तर बौद्ध–जैनादि संप्रदाय स्थापन झाले, वाढले. पण त्यामध्येसुद्धा स्त्रीच्या समानतेला कुठे स्थान मिळाले नाही. यहुदी, ख्रिस्ती, इस्लाम धर्मांतही स्त्रीच्या समानतेचा प्रश्नसुद्धा कधी उपस्थित झालेला दिसत नाही.

या सर्व धर्मांत स्त्रियांचा संबंध पापाशी सतत जोडलेला आढळतो. स्त्री ही पापाची मुळ, मोहाचे मूलस्थान अशीच स्त्रियांकडे बघण्याची दृष्टी सर्वच धर्मात कमीअधिक प्रमाणात आढळते.

हिंदू समाजसंस्था तर धर्मग्रंथांवर उभारली गेली होती. त्या धर्मग्रंथांचे प्रणेते दिव्य दृष्टीचे लोक किंवा वेद हे अपौरूषेय किंवा ईश्वरोक्त आहेत ही श्रद्धा प्रबळ असल्याने समाजातील काही गट वर्षानुवर्षे 'जैसे थे' स्थितीतच राहिले. लोकहितवादींनी आपल्या शतपत्र क्र. ६४ मध्ये सद्यःकालीन समाजप्रगतीला खिळ घालणाऱ्या गोष्टींवर शरसंधान केले. चिकित्सक दृष्टीने बंडखोर विचार मांडले आहेत आणि पारंपारिकता झुगारली आहे ते म्हणतात, ''एकटया ऋषींनी आपल्या अकलेने लिहिलेल्या शास्त्रापेक्षा चार मते पाहून जे शास्त्र आपण तयार करू ते सर्वांपेक्षा उत्तम होईल यात संशय नाही. परंपरागत धर्माचे वेड माजून आम्हा भारतीयांचा अधःपात झाला आहे. आम्ही आर्यावर्तातील लोक पूर्वी फार प्रगत झालो होते. परंतु कालांतराने निद्रावश झालो. धर्मसमजुतीला विकृत वळण लागले. लोकभ्रमांवर आधारलेले क्रियाकांड वाढत गेले.''[१२]

भारतासारख्या देशात एवढी संपन्नता, सुजलाम्, सुफलाम् भूमी असतांना लौकिकदृष्टया भारतीय वेगाने मागे का पडले याची मीमांसा करतांना श्रीमती नलिनी पंडित धर्माच्या मर्यादेकडे लक्ष वेधतात आणि म्हणतात, ''युरोपीय आणि भारतीय या दोन्ही संस्कृतींना तीन हजार वर्षांहून अधिक दीर्घ परंपरा आहे. परंतु युरोपातील देशात रानटी अवस्थेत जीवन कंठणाऱ्या आदिवासी जमाती आता दिसून येत नाहीत. त्या–त्या संस्कृतीच्या प्रवाहात त्या मिसळून गेल्या आहेत. भारतात मात्र अडीच कोटी लोक अद्याप रानटी अवस्थेत आहेत. किडे, उंदिर खाऊन ते आपले पोट भरतात. अर्धनग्नावस्थेत कसेतरी जीवन कंठतात. त्यांच्या जोडीला गुन्हेगार जमातींचे लोक जवळजवळ ४५ लाख आहेत. शिवाय हिंदू समाजात पाच कोटी लोक अस्पृश्य आहेत. त्यांची वस्ती अदर्शनीय आहे. शेकडो वर्षांच्या सांस्कृतिक प्रगतीनंतर देशातील कोट्यावधी लोक अशा अवस्थेत राहावेत हे हिंदूमधील स्वयंतुष्टता, इतरांच्या बाबतीतील उदासीनता व बंधुभावाचा अभाव यांचेच द्योतक आहे. हिंदू धर्माने शुद्राला व्यवसाय स्वातंत्र्य दिलेले नाही. संपत्तीचा संचय करण्याचा त्याला हक्क नाही. त्याला वेदाध्ययनाचा नव्हे तर वेदांचे श्रवण करण्याचा अधिकारही मनूने नाकारला आहे. आपल्याच धर्मातील ग्रंथाचे श्रवण केल्याबद्दल शिक्षा देणारा हिंदू हा जगातील एकमेव धर्म आहे.''[१३]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''ब्राह्मणांच्या हातात आम्ही शास्त्र दिले, क्षत्रियांच्या हातात शस्त्र दिले, वैश्यांच्या हातात तराजू दिले या तिन्ही वर्णांना महत्त्वपूर्ण साधन देऊन त्यांना बलवान केले. तर शूद्रांच्या हाती आम्ही काय दिले? आम्ही स्त्रियांच्या हातातही केवळ झाडू दिला आणि त्यांना सेवक बनविले म्हणून वर्णनिरपेक्ष सर्व भारतीय स्त्रिया शूद्रच आहेत.''[१४]

हिंदू शास्त्राच्या मते शूद्रांना विद्येचा अधिकार नव्हता आणि त्याहून अधिक तीव्रपणे स्त्रियांनाही हा अधिकार मूळीच नव्हता. स्त्री ही विश्वासास अपात्र, त्याचप्रमाणे दुष्ट, चंचल, अविचारी आणि स्त्रैण मानण्यात येई. तिने शिक्षण घेणे म्हणजे समाजाच्या दृष्टीने भ्रष्टाचार करणे होते. मुलीने शिक्षण घेतले तर तिला अकाली वैधव्य येते अशी समजूत होती. स्त्रियांनी पायात जोडे किंवा वहाणा घालणे ही अपवित्र गोष्ट समजत. तिने छत्री वापरली तर पुरूषाचा उपमर्द होई. वडिलधाऱ्या मंडळींच्या देखत नवऱ्याशी बोलणे हे असभ्य वर्तन मानीत. स्त्रीने स्वतःच्या नवऱ्याच्या पंगतीस जेवणे ही अपमानकारक गोष्ट समजत. स्त्री ही अबला, गुलामांची गुलाम, शुद्राहून शूद्र मग तिला ज्ञान देणे, शिक्षण देणे ही फार–फार दूरची गोष्ट होती.

जेथे ब्राह्मणांची दाट वस्ती असे त्या ठिकाणी काही तात्या–पंतोजी खाजगी संस्कृत पाठशाळा चालवत. या पाठशाळेत मुख्यतः संस्कृत, व्याकरण, ज्योतिषी आणि धर्मशास्त्र हे विषय शिकवले जात. शाळा चालविणाऱ्या शिक्षकांना पंतोजी म्हणत कोकणात तर त्यांना शेणवी म्हणत. कारण तेथील शिक्षक शेणवी जातीचे असत. काही ठिकाणी व्यापारी श्रीमंतांच्या शेठ–सावकारांच्या मुलांना प्राथमिक आकडेमोडीचे ज्ञान यावे एवढ्यापुरतेच शिक्षण दिले जाई. कारण धर्मशास्त्रानुसार संस्कृत भाषा बोलणे, लिहिणे अथवा वाचणे ब्राह्मणांशिवाय कोणालाही अधिकारच नव्हता. त्यांची अशी समजूत होती की, ब्राह्मणांनीच काय ती विद्या करावी, अन्य वर्णियांना तो अधिकारच नाही. त्यामुळे असेल कदाचित एक म्हण प्रचलित होती. 'महाराचं गाणं, कुणब्याच दाणं अन् बामणाघरी लिव्हणं.'

सर्व ज्ञान काय ते संस्कृत ग्रंथात साठविलेले आहे अशी त्यांची धारणा होती. जुन्याचा मग ते चांगले असो की वाईट, उपयोगी असो की निरूपयोगी त्याचा स्वीकार करणे आणि नवीन गोष्टी, सुधारणेचा धिक्कार करणे आणि हे करताना सारासार विवेकबुद्धीला मात्र अडगळीत टाकणे हे त्याकाळी उच्चवर्णीय म्हणविल्या जाणाऱ्या समाजाकडून घडत होते. एकीकडे इंग्रज

आपल्या आधुनिक ज्ञान–विचाराची दारे किलकिले करून भारतात साम्राज्याच्या सत्तेचे बीजारोपण करीत होते तर त्याचवेळी आज आपल्याला अत्यंत खुळचट आणि तर्कहीन वाटणाऱ्या मानवतेच्या मूल्यांची धुळधाण करणारी वर्गसंस्था रूढीनिष्ठतेच्या दलदलीत खोलवर अधःपतनाकडे वेगाने चालली होती. धनंजय कीर  या संदर्भात म्हणतात, ''श्रीमंतांनी गादीवर लोळावे, त्यांना श्रम करण्याची शिक्षण घेण्याची गरज नाही असे मानले जाई. वरिष्ठ वर्गाचे लक्ष नवशिक्षणाकडे अद्याप वेधले गेले नव्हते. शिक्षणाविषयी त्यांना अजून आदर वाटत नव्हता. तेही आपल्या संकुचित सामाजिक परिस्थितीच्या चाकोरीतून बाहेर पडले नव्हते. सामाजिक आणि धार्मिक आज्ञा हाडीमासी खिळल्यामुळे शिक्षण घेणे हीन दर्जाचे लक्षण आहे, असे ते मानीत. धर्मोपदेशकाने काढलेल्या शाळेत शिक्षण घेणे तर त्यांना अगदीच कमीपणाचे वाटे. बाटाबाटीची त्यांना भिती वाटे.''[१५]

त्या काळी पुस्तकाच्या मलपृष्ठावरील चामडयास स्पर्श झाला तर विटाळ होतो असे मानीत असत. छापील कागदास शिवणे हे अपवित्र नि धर्मबाह्य वर्तन आहे, अशी लोकांची समजूत होती. शाईचासुद्धा विटाळ मानण्यात येई, धनंजय कीर  पुढे म्हणतात, ''घरी मुले आपली दप्तरे एका कोनाड्यात ठेवीत. 'घुबड' शब्दासारखे अमंगल शब्द घरात उच्चारण्याने विटाळ होई व इतर जातीच्या विद्यार्थ्यांच्या स्पर्शामुळे शिवाशिव होते असा समज असे. ही शिवाशिव काढण्यासाठी शाळकरी मुले घरी येताच सचैल स्नान करीत आणि शुद्ध होत. इंग्रजी भाषेच्या पठणाने माणूस अपवित्र होतो. एवढेच नव्हे तर त्याचे ब्राह्मणत्वही जाते असे सनातनी ब्राह्मण मानीत असत. जोतीचे (ज्योतिबा फुलेंचे) समकालीन गोपाळराव देशमुख यांना विद्यार्थीदशेत आपले दप्तर घरात नेता येत नसे. शिवाशिव होऊ नये म्हणून ते आपली पुस्तके विहीरीतल्या एका कानोड्यात ठेवीत असत.''[१६] अशा या जगावेगळया अतार्किक बाटाबाटीच्या कल्पनेने समाजमनात एवढे घर केले होते की आत यापुढे काय होईल. ह्याबद्दल जनमानसांची चिंता ऑक्टोबर १८५४ च्या ज्ञानप्रकाशामध्ये एका कवीने व्यक्त केली आहे. तो म्हणतो,

'' गत तरी आता काय करावी । अवरूनी पोरे कैशी धरावी ।।
जाऊ देता त्यांच्या शाळे । बाटून येतील तुमची बाळे ।।
सर्व कुळाला लागले काळे । खातरी ऐशी पक्की धरावी ।।''[१७]

उच्चवर्णीय समजल्या जाणाऱ्या मुलांनाच शिक्षणासाठी जाण्यास एवढा मज्जाव तर त्या काळच्या मुलींच्या शिक्षणाचा विचार म्हणजे महापापच होते. रूढींच्या परिघात फिरता–फिरता उच्चनीचतेच्या कल्पनांचे, सोवळयाओवळयांचे आणि अज्ञानाचे जू समाजमनात एवढे भिनले होते की त्यामुळे आपण राज्य, स्वातंत्र्य सारंसारं गमावत चाललो आहोत याची पुसटशीही जाणीव व्हायला तयार नव्हती. आपल्यासारख्याच रक्तामांसाच्या दुसऱ्या देहाला वेदना देताना माणुसकी मृतवत झाली होती. आणि याच वेळी ब्रिटीशांनी भारतात पाय रोवायला सुरूवात केली होती. त्यांनी सुरू केलेल्या शाळेत आपल्याव्यतिरिक्त सभोवताली काय घडत आहे याची जाणीव नवसाक्षरांना होऊ लागली होती. या सुशिक्षितांमध्ये आत्मभान येऊ लागलेला प्रगल्भ विचारांचा नवोदय होऊ लागला. तर्काच्या कसोटीवर परंपरा–रुढी तावून–सुलाखून विचारात घेतल्या जाऊ लागल्या. यात समाजप्रबोधनाचा विचार करण्यात अग्रेसर होते ज्योतिराव फुले. वाचनाची दांडगी हौस आणि वैचारिक भूमिकेमागची तात्त्विक बैठक यामुळे विशिष्ट अधःपतनाकडे जाणाऱ्या शूद्र आणि स्त्रिया यांना शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे त्यांनी जाणले म्हणूनच विद्येचे महत्त्व सांगताना ते म्हणतात,

'' विद्येविना मति गेली, मतिविना नीती गेली,
नितिविना गति गेली, गतिविना वित्त गेले,
वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.''[१८]

याची जाणीव होऊन स्त्रियांच्या मुक्तिपर्वाच्या आरंभाला आपल्या घरापासूनच सुरूवात केली. पण एखादी गोष्ट कितीही चांगली असली तरी घेणाराही त्यासाठी पात्र असावा लागतो, त्याच्या अंगी नवीन गोष्ट संपादण्याची इच्छा, क्षमता असावी लागते आणि ही क्षमता सावित्रीबाईंच्या अंगी होती, म्हणूनच बिनभिंतीच्या खुल्या निसर्गाच्या सान्निध्यात अगदी अक्षरशुन्य असलेल्या सावित्रीबाईंचे अनौपचारिक शिक्षण सुरू झाले. कारण विवाहापूर्वी तर त्या निरक्षरच होत्या. विवाहापूर्वी शाळा म्हणजे काय? तेथे काय, कसं आणि का शिकायचं याचा गंध नसणारी सावित्री अवघ्या स्त्री–शिक्षणाची पायाभरणीची सुरुवात करून जुनी चाकोरी मोडत नव्या वाटांचा शोध घेऊ लागली.

ज्योतिरावांचे सामाजिक आणि शैक्षणिक कार्य झपाटून चालले होते. आपल्या कार्यात सावित्रीबाईंचाही सहभाग असावा असे त्यांना मनोमन वाटत होते शिवाय ज्योतिरावांनी

शिक्षणाचे महत्त्व जाणले होते म्हणून त्यांनी अंतःकरणापासून आपल्या पत्नीला शिकवायचे ठरवले. त्यासाठी त्यांनी शेतातील मातीची पाटी केली. त्या पाटीवर फांदीच्या काटकीने अक्षरे गिरविण्यास प्रारंभ केला. हळूहळू अक्षरे काढता येऊ लागली. सावित्रीबाईंनार शिक्षणाची जिद्द होती त्यासाठी कष्ट करण्याची तयारी होती. त्यांना शिक्षणाची गोडी लागली. त्या शेतातील पिकांची नावे लिहू लागल्या. फुलझाडांची नावे लिहिता येऊ लागली. रोजच्या परिचयातील वस्तुंची नावे लिहीता वाचता येवू लागली. त्यांची हुशारी पाहून ज्योतिरावांना शिकविण्यास आनंद निर्माण होवू लागला. स्त्री शिक्षणाचे महत्व ओळखून त्यांनी सावित्रीबाईंना शिकविल त्याकाळी बायकांनी शिकणे महापाप समजले जाई. समाजाचा स्त्री शिक्षणाला कडाडून विरोध होता तरी सावित्रीबाई शिकल्या कारण त्या जिद्दी व करारी होत्या.''[१९]

सावित्रीचे शिक्षण चालू असताना सगुणाआत्यादेखील शिक्षण घेत होत्या. हळूहळू पाढे, व्याकरण व सामान्यज्ञान यातही त्यांची प्रगती झाली. सगुणाबाई व सावित्रीबाई पुढे स्वतंत्रपणे वाळवेकरांनी दिलेली पुस्तके वाचू लागल्या. ज्योतिरावांना मोठे समाधान वाटले. आपले कार्य योग्य दिशेने सुरू झाल्याने व सावित्रीबाईंनी त्यांना सकारात्मक प्रतिसाद दिल्याने त्यांचा उत्साह वाढला. सावित्रीबाईंनादेखील शिक्षणात रस वाटू लागला. शिक्षणाचे महत्त्व सांगणाऱ्या ज्योतिरावांनी स्त्री शिक्षणाचा प्रारंभ आपल्या घरातूनच केला याची प्रचिती यातून येते.

शिक्षणाचे महत्त्व ओळखणाऱ्या ज्योतिबांनी सगुणाबाई व सावित्रीबाई यांना पुण्यातील 'नॉर्मल स्कुलच्या' प्रमुख मिसेस मिचेल बाई यांच्याकडे पाठविले. मिसेस मिचेल मॅडमने या दोन्हीही विद्यार्थिनींची कसून तयारी करून घेतली आणि त्यांना नॉर्मल स्कुलच्या दुसऱ्या वर्गात प्रवेश दिला. मिसेस मिचेल यांनी हे नॉर्मल स्कुल १८४० साली छबिलदासांच्या वाड्यात स्थापन केले होते. ख्रिश्चन मिशनरी रेव्हरंड मिस्टर जेम्स मिचेल यांच्या त्या पत्नी होत्या. त्यांना स्त्री शिक्षणाची विशेष आवड होती. म्हणूनच त्यांनी सावित्रीबाई व सगुणाबाई यांना उत्तम शिक्षण दिले. १८४७ सालापर्यंत सावित्रीबाई व ज्योतिबांचे शिक्षण पूर्ण झाले होते. शिक्षणाची महती सांगताना 'काव्यफुले' या आपल्या काव्यसंग्रहात 'श्रेष्ठ धन' या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

''विद्या हेच धन आहे रे । श्रेष्ठ साऱ्या जगाहून ।
तिचा साठा जयापाशी । ज्ञानी तो मानती जन ।

(''काव्यफुले'' संग्रहातील 'श्रेष्ठ धन' ही कविता पृ. २०)

शुद्रांना सांगण्याजोगा । आहे शिक्षण मार्ग हा।

शिक्षणाने मनुष्यत्व । पशुत्व हाटते पहा ।।''

('काव्यफुले' संग्रहालयातील 'शुद्रांचे दुखणे' ही कविता पृ. १७, सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, संपादक डॉ. मा. गो. माळी)

पवार ना.ग. सावित्रीबाई फुले यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी म्हणतात, ''शिक्षणाचे महत्त्व ओळखून व आपले तन, मन, धन, शिक्षणासाठी अर्पण करून शिक्षणाचा महामंत्र देणाऱ्या सावित्रीबाई फुले एका विलोभनीय, त्यागी व प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे मूर्त रूप होत. ज्या बाणेदारपणाने लोकमान्य टिळकांनी स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे व तो मी मिळविणारच... असे ठासून सांगितले तीच सावित्रीबाईंची शिक्षणाविषयीची निष्ठा होती.''[२०]

म्हणूनच सावित्रीबाई फुले यांना स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या म्हणतात. सावित्रीबाईंचे तर शिक्षण पूर्ण झालेले होते परंतु ज्योतिरावांचेदेखील इंग्रजी शिक्षण पूर्ण झाल्याने गोविंदरावांना अत्यानंद झाला. आपल्या मुलाने मोठी मानाची नोकरी पत्करावी असे त्यांना मनोमन वाटू लागले तर सगुणाबाईंना असे वाटत होते की, ज्योतिरावांनी ख्रिस्ती फादरसारखे मोठे व्हावे व गोरगरीब जनतेची सेवा करावी. मात्र महात्मा फुलेंना मिस फेरार बाईच्या उपदेशानुसार सामाजिक कार्य करावे असे वाटत होते. साता समुद्रापलिकडून ब्रिटिश स्त्रिया येतात व येथील शूद्रातिशुद्रांची सेवा करतात आणि आपण मात्र त्याची गंमत पहात केवळ व्यक्तिगत स्वार्थासाठी नोकरी करावी हे महात्मा फुलेंसारख्या सर्जनशील व संवेदनशील माणसाला पटले नाही म्हणून त्यांनी शूद्रांनी शूद्रांना व समस्त स्त्रियांना शिक्षित करण्याचा निर्णय घेतला. सावित्रीबाईंनी देखील महात्मा फुले यांच्या सेवा कार्यात नुसती सहमतीच नव्हे तर सक्रिय सहभाग घेतला. म्हणूनच जाणिवांच्या पातळीवर सजग राहून पतीसोबत स्वयंस्फूर्तीने प्रवाहाच्या विरूद्ध स्वतःला लोकहितास्तव झोकून दिले.

## १.५ **सावित्रीबाई यांची सामाजिक जडणघडण :**

सावित्रीबाई फुले यांचा स्वभाव बालपणापासून जिद्दी, चिकाटी, महत्त्वाकांक्षी आणि प्रयत्नांची पराकाष्टा करणारा असल्यामुळे त्यांनी ज्योतिरावांच्या कार्यात सहभागी होऊन

शेतकरी, शेतमजूर, दीनदुबळ्यांची मुले, स्त्री, शूद्र आणि अतिशुद्र समाज यांच्या सेवेचे कार्य हाती घेतले. केशवपन, बालविवाह प्रतिबंध, विधवा विवाह, सतीची चाल, बालहत्या प्रतिबंध या सर्वच कार्यात सावित्रीबाई मोठ्या जिद्दीने आणि उत्साहाने उतरल्या. कोणत्याही कार्यात सावित्रीबाई मागे हटल्या नाहीत. अशा प्रकारच्या सावित्रीबाई या भारताच्या इतिहासातील पहिल्या क्रांतिकारक समाजसुधारक कार्यकर्त्या ठरतात. सावित्रीबाईंच्या रूपाने स्त्री शिक्षणाचा प्रारंभ होतो. देशाच्या इतिहासात सावित्रीबाईंनी यशस्वी सर्वसमावेशक सेवा करून एक थोर क्रांतिकारी समाजसुधारणेचे पाऊल टाकले.

महात्मा ज्योतिराव फुले आणि सगुणाबाईंच्या प्रभावातच सावित्रीबाईंची सामाजिक जडणघडण झालेली आहे. महात्मा फुलेंनी प्रस्थापित केलेली समता सावित्रीच्या रोमारोमामध्ये भिनलेली दिसते. जात धर्म यांच्या पलिकडे जाऊन सावित्रीबाई विचार करायला लागतात.

मालकर कृष्णा सावित्रीबाईंविषयी म्हणतात, ''त्यांनी जात–पात, धर्म, लिंग यावर आधारलेल्या भेदाभेदाच्या तथाकथित संस्कृतीला छेद दिला आणि समतेच्या आधारावर नवा समाज अशी नवी विचारधारा प्रत्येक कृतीतून समाजाला दिली. हे त्यांचे थोरपण आजच्या बेगडी दुनियेत अधिकच मोलाचे ठरले आहे. सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांच्या प्रत्येक कार्याला आधुनिकता आणि सामाजिक न्यायाचे विशालत्व प्राप्त झाले होते. उत्थापनाच्या कार्यात आधुनिकता आणि सामाजिक न्यायाचे विशालत्व प्राप्त झाले होते. उत्थापनाच्या कार्यात सहभागी होणाऱ्या माणसाबद्दलचा कृतज्ञता भाव आणि वंचितांच्या उत्थापनाचे भान, उत्थापनाच्या चळवळीतील अडसर ठरणाऱ्या प्रवृत्ती आणि शोषकांच्या किडलेल्या मनोवृत्ती याचे वास्तव ज्ञान सावित्रीबाई ज्योतिराव फुले यांना होते. ज्योतिराव गोविंदराव फुले यांची प्रेरणा आणि साथ होती. आर्थिक अस्थैर्य असताना, सारा समाज विरोधी आणि शोषितांची हतबल स्थिती असताना हे कार्य चालले होते म्हणून हे कार्य महत्वाचे मोलाचे असल्याने कार्याला विशालत्व प्राप्त झाले.''[२१]

सामाजिक स्वातंत्र्यासाठी केलेल्या ५० वर्षाच्या प्रवासात सावित्रीबाई फुलेंना फार छळ सहन करावा लागला त्यांनी हे आघात पचवूनच समाजाला सम्यक परिवर्तनाच्या प्रशस्त मार्गावर उभे केले. सावित्रीबाईंच्या सामाजिक जडणघडणीच्या मुशीतूनच आजही वंचित, शोषित या मार्गावर प्रस्थापितांचे गतिरोधक असताना मार्गस्थ झाले आहेत. हे सारे सावित्री ज्योतिबा

फुले यांच्या कार्याचे, विचाराचे फलित आहे. त्यात सावित्रीबाई आणि फुले यांचे भले झाले किंवा नाही पण आजच्या बहुजन समाताचे कल्याण मात्र सावित्रीबाईंच्या सामाजिक जडणघडणीचेच फलित आहे. सारा रूढीपरंपराग्रस्त कर्मकांड मांडणारा समाज विरोधी असताना समतेसाठी शोषित समाजाचा उद्धार करण्यासाठी सावित्रीबाईंनी अहोरात्र कष्ट केले. माणसामधली माणुसकी जागविण्याचे क्रांतिकारक कार्य केले. समाजात सुधारणा घडवून आणायच्या असतील तर आधी लोकांना शिक्षण दिले पाहिजे. त्यांना शिकवून शहाणे बनविले पाहिजे. समाजाची गुलामगिरी नष्ट केली पाहिजे. हजारो वर्षे अन्याय, अत्याचार सहन करणाऱ्या माणसाला आणि विद्येपासून दूर ठेवलेल्या माणसांना सामाजिक समता प्राप्त करून दिली पाहिजे. सर्वसामान्य लोकांना ज्ञान दिले पाहिजे. अतिशूद्रांच्या व स्त्रियांच्या शिक्षणाची सोय केली पाहिजे हे जाणून कार्य एकटया दुकटयाने नाही तर आपली धर्मपत्नी सावित्रीला बरोबर घेऊन हे सामाजिक कार्य फुल्यांनी सुरू केले. घरातील स्त्री शिकली की कुटूंबात शिक्षणाचा प्रसार होईल. ती शहाणी झाली की सर्व कुटुंब शहाणे होईल असा विचार करून ज्योतिराव फुले यांनी इ.स. १८४८ साली मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. पुण्यात बुधवार पेठेत भिडे वाड्यात पहिली मुलींसाठी शाळा सुरू झाली. हजारो वर्षांपासून समाजात चालत आलेल्या दुष्ट रूढींवर ज्योतिरावांनी आघात केले. ज्योतिरावांनी मुलींसाठी शाळा काढली. परंतु फारच थोड्या मुली शाळेत येऊ लागल्या कारण स्त्री शिकली तर ती विधवा होते, तिला मरणानंतर चांगली गती मिळत नाही हे विचार त्या काळातल्या समाजात खोलवर रूजले होते. या बुरसटलेल्या विचारांमुळे मुलींना शाळेत पाठविण्याचे धैर्य लोकांमध्ये होत नव्हते. मुलींना शिकविणे म्हणजे अधर्म असे त्यांना वाटत होते. सुरूवातीच्या काळात ज्योतिरावांनी स्वतःच मुलींना शिकवायला सुरूवात केली. मुलींना शाळेत येण्याचा कंटाळा येऊ नये म्हणून ज्योतिराव त्यांना गमतीचे खेळ शिकवीत. त्यांना गोडगोड खाऊ देत. मुली आनंदाने शिक्षण घेत. परंतु शाळेतील कामे एकट्याने करणे ज्योतिरावांना कठीण जाऊ लागले. दुसरा शिक्षक मिळत नव्हता. कोणी तयारी दाखविलीच तर समाजातील प्रस्थापित लोक त्यांना धमकी देत. मारण्याचे भय दाखवित त्यामुळे ज्योतिरावाच्या शाळेत कोणी काम करण्यात धजत नसे.

ज्योतिराव फुले हे मोठे धीरोदत्त पुरूष होते. त्यांनी ठरविले की आपली पत्नी सावित्री हिला शिकवायचे. ''एके दिवशी शाळेतून थकून आल्यानंतर ज्योतिबा सावित्रीबाईस म्हणाले, हे

बघा आता शाळेतील मुलींची संख्या फार वाढलेली आहे. सुरूवातीला विरोध करणारेही आता आपल्या मुलींना शाळेत पाठवू लागले आहेत.''[२२] त्यासाठी ज्योतिरावांनी सावित्रीबाईंनी मुलींना शिकवावे हा मानस बोलून दाखविला आणि  या शाळेत शिक्षक म्हणून ज्योतिरांवानी सावित्रीची नेमणूक करण्याचे ठरविले. शिक्षण नसतानादेखील सावित्रीबाई आधी स्वतः शिक्षण घेतात आणि इतरांना शिकवितात. पतीला आवडणाऱ्या सामाजिक कामात आपल्याला सहभागी होता यावे या कल्पनेने त्यांना धन्यता वाटू लागते.

मुळातच सावित्रीबाई बुद्धीवान असल्याकारणाने त्यांना शिक्षण घेताना कोणतीच अडचण आली नाही. आणि विशेष म्हणजे महात्मा फुले यांनाही असा विश्वास होता की, शिक्षण देण्याचे कार्य पुरूषांपेक्षा स्त्रियाच अधिक चांगल्या रीतीने करू शकतील म्हणून त्यांनी सावित्रीला शिकवून त्यांच्यामार्फत मुलींच्या शिक्षणाचे मौलिक कार्य सुरू केले.

मिचेल बाईंच्या नॉर्मल स्कुलमध्ये १८४८ साली शिक्षिकेचा कोर्स पूर्ण केला. अशा प्रकारे प्रशिक्षित शिक्षिका म्हणून सावित्रीबाई महाराष्ट्रातीलच नव्हेत भारतातील पहिल्या प्रशिक्षित शिक्षिका ठरतात. वयाच्या १७ व्या वर्षी महात्मा फुलेंनी पुण्याच्या भिडे वाड्यात सुरू केलेल्या मुलींच्या शाळेत त्यांची मुख्याध्यापिका म्हणून नेमणूक होते. त्या जशा पहिल्या प्रशिक्षित शिक्षिका ठरतात, तशाच सावित्रीबाई फक्त पुस्तकी ज्ञान देणाऱ्या शिक्षिका नव्हत्या तर समाजाची नस ओळखणाऱ्या पहिल्या मुख्याध्यापिका आणि समाजसेविका देखील होत्या हेच स्पष्ट होते.

शाळेत अध्यापनाचे कार्य करीत असताना सावित्रीबाई फुले यांना 'टॉमस क्लार्कसन' यांचे चरित्र वाचायला मिळाले. हे चरित्र वाचून सावित्रीबाईंना शूद्रातिशूद्रांच्या गुलामगिरीची प्रखरतेने जाणीव झाली. ही गुलामगिरी नष्ट केली पाहिजे आणि म्हणूनच शुद्रातिशुद्र यांना देखील ज्ञानाच्या मुख्य प्रवाहात आणले पाहिजे असे त्यांना वाटले. म्हणूनच त्यांनी ज्योतिरावांनी सुरू केलेल्या शिक्षण कार्यात स्वतःला झोकून दिले. याचाच अर्थ असा होतो, समाजातील तळागाळातील लोकांची उन्नती झाली पाहिजे, त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले पाहिजे, त्यांचा सामाजिक स्तर उंचावला पाहिजे हा विचार १५० वर्षापूर्वी सावित्रीबाई फुले यांनी मांडून एकप्रकारची सामाजिक क्रांतीच केली असे म्हणता येईल.

## १.६ वाङ्मयीन जडणघडणः

सावित्रीबाई फुले ज्याप्रमाणे आद्य समाजसेविका ठरतात. त्याचप्रमाणे आदर्श शिक्षिका देखील ठरतात आणि एक उत्कृष्ट लेखिकादेखील. सावित्रीबाई फुलेंची वाङ्‌मयीन जडणघडण कशी झाली हे शोधताना आपणाला महात्मा ज्योतिराव फुले यांना दुर्लक्षुन चालणार नाही कारण फक्त आणि फक्त महात्मा ज्योतिराव फुले हेच त्यांच्या वाङ्‌मयीन जडणघडणीचे प्रेरणास्थान ठरतात. कारण महात्मा ज्योतीराव फुलेंनी आपल्या लेखणीतून शूद्र, अतिशूद्र, शेतकरी, स्त्री या सर्वांचेच प्रश्न ऐरणीवर आणले होते. शिवाय आपल्या लेखणीद्वारे शिक्षणाचे महत्त्वही स्पष्ट केले होते. याचेच प्रतिबिंब सावित्रीबाई फुले यांच्या लेखनात उमटलेले दिसते. सावित्रीबाई एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या कर्तृत्ववान आणि कृतिशील लेखिका ठरतात. एकूणच आधुनिक कवितेचा विचार करता आपणाला सावित्रीबाई फुलेंच्या कवितालेखनाचा विचार केल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. आणि म्हणूनच आधुनिक कवितेच्या जनकत्वाचा मानदेखील सावित्रीबाई फुले यांना देणे जास्त उचित ठरेल.

मा. गो. माळींच्या मते, ''एकोणिसाव्या शतकातील प्रबोधनकाळ, तत्कालीन रूढीप्रिय समाज, गुलामगिरीत जगत असलेला संपूर्ण शुद्रातिशुद्र समाज आणि सर्व स्त्रिया यांच्या स्वातंत्र्याचा व मानवमुक्तीचा विचार करून कार्य करणाऱ्या या वैशिष्टयपूर्ण स्त्री व्यक्तिमत्त्वाचा शोध त्यांच्या काव्यलेखनात घेता येतो.''[२३]

सावित्रीबाई फुलेंची वाङ्‌मयीन जडणघडण महात्मा फुले आणि सत्यशोधक समाजाच्या चळवळीबरोबरच झाली. त्यांच्या कार्याचे वर्णन करताना मा. गो. माळींनी सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा यथोचित गौरव करीत म्हटले आहे, ''शाळा काढणे, बालहत्या प्रतिबंधकगृह काढणे, शेतकरी व शेतमजूर स्त्री पुरूषांसाठी रात्रशाळा काढणे, महात्मा फुले यांच्या भाषणाची पुस्तके प्रसिद्ध करणे. अनाथ बालकाश्रम चालविणे, दुष्काळग्रस्तांसाठी चालविलेल्या अन्नछत्रात अग्रभागी राहून कार्य करणे, दत्तकपुत्र यशवंतराव यांचा आंतरजातीय विवाह घडवून आणणे, महात्मा फुले यांच्या निधनानंतर त्यांच्या भाऊबंदांनी वाद उपस्थित केला तेव्हा धर्मशास्त्राच्या विरोधात जाऊन टिटवे धरणे आणि महात्मा फुले यांच्यानंतरही सत्यशोधक समाजाच्या कार्यात अखंड सहभागी होणे या सर्व घटनांमधून सावित्रीबाई फुलेंच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा अनुभव

येतो. या सर्व कार्यात त्या आपल्या पतिबरोबर अनिश्चितेने फरफटत जात आहेत, असे कोठेही दिसत नाही.''[२४]

म्हणूनच महात्मा फुले हेच त्यांच्या लेखनाचे प्रेरणास्थान मानता येते. परंतु तरीदेखील महात्मा फुलेंची नक्कल न करता स्वतःची ओळख अबाधित ठेऊन सावित्रीबाईंनी कार्य केले आहे. सावित्रीबाईंच्या लेखनाबद्दल रा. ना. चव्हाण म्हणतात, ''महात्मा फुले जाती वर्चस्ववादी आणि स्त्रिदास्य समर्थक ब्राह्मणांविरूद्ध आक्रमक पवित्रा घेतात. त्या काळात ती काळाची गरज होती.''[२५] त्या तुलनेत सावित्रीबाई फुले यांच्या लेखनात एक वेगळेपणा प्रकर्षाने जाणवतो तो म्हणजे सावित्रीबाई फुले यांच्या लेखनात तेवढा प्रखर आक्रमकपणा नाही. विद्रोहमात्र प्रखर आहे. विद्रोहाने पेटलेल्या स्त्रिया पराभवाची तमा करीत नाहीत म्हणूनच सावित्रीबाईंचा लढा युगप्रवर्तक ठरला आहे.

शिक्षणामुळे माणूस विचारप्रवण होतो. विचारातून हितकरी–अहितकारी गोष्टींचा त्याला बोध होतो. तसेच विचारांच्या सुस्पष्टतेमुळे आपले विचार लेखनात मांडण्यास उत्सुक बनतो. महात्मा फुलेंना शूद्रातिशूद्रांना खरे ज्ञान देण्यासाठी स्वतःच्या नियतकालिकाचे महत्त्वही पटले होते. त्यावेळी उच्चवर्णियांच्या मालकीची व संपादकांची नियतकालिके होती. ''सत्यशोधकी विचारांवर संपादकीय कात्री न फिरता ते जसेच्या तसे प्रसिद्ध होऊन, शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया यांच्यापर्यंत जावेत म्हणून त्यांनी महात्मा फुले यांचे बालमित्र आणि सधन हितचिंतक मोरो विठ्ठल वाळवेकर या गृहस्थांना 'गृहिणी' नावाने मासिक काढण्याचा आग्रह केला. या मासिकातून सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षण आणि स्त्रियांचा सामाजिक दर्जा या विषयावर लेख लिहिले.''[२६] अशी आठवण गोविंद गणपत काळे यांनी लिहून ठेवली आहे.

शिक्षणाच्या परिसस्पर्शाने आणि अत्यंत मानवतावादामुळे सावित्रीबाईंच्या सहृदयतेला कृतीशीलतेची जोड मिळाली आणि फक्त कृतीशील शिक्षिकाच नव्हे तर अंतःकरणातील उमाळ्याने समाजाला, अज्ञ बांधवांना बोध देण्यासाठी समर्थ लेखिका प्रगट झाली.

सावित्रीबाई फुले या कृतिशील शिक्षिका आणि लेखिका आहेत. ''सत्यशोधक चळवळीची स्वतंत्रपणे जबाबदारी सांभाळणे, स्वतः भाषणे करून जागृती करणे, लेखन करणे, गुंड आणि निंदकांचा धाडसाने मुकाबला करणे या सर्व घटना आजही अशक्य वाटतात. कारण स्त्रियांच्या स्वतंत्र कर्तृत्वावर पुरूषप्रधान मानसिकतेचा विश्वास बसत नाही. एक स्त्री आणि ते

देखील ब्राह्मणोत्तर शिक्षणाची परंपरा नसलेली, माळीजातीत जन्मलेली एवढे कर्तृत्व दाखवू शकते का उच्च वर्णियाच्या वर्चस्ववादी दबलेल्या मानसिकतेतून हा अविश्वास निर्माण होऊ शकतो.''[२७]

सावित्रीबाईंनी नियतकालिकात लेखन केले परंतु त्याचबरोबर काव्यलेखनही केलेले आहे. आपल्या लेखनात सावित्रीबाईंनी जे भोगले जे अनुभवले, ज्योतिरावांच्या सहवासात ज्या घटना प्रसंगाना सामोरे जावे लागले, इंग्रजी सत्तेने समाजात जे परिवर्तन होऊ लागले पेशवाईमधील सामाजिक जीवन, सांस्कृतिक जीवन अशा विविध विषयांवर सावित्रीबाईंनी काव्यलेखन केले. 'काव्यफुले' (१८५४) या पहिल्या कवितासंग्रहात शिक्षण, जातीभेद, सुंदर फुले, बळीस्त्रोत आदि समकालीन विषयांना धरूनच कविता केलेल्या दिसतात. त्याचबरोबर काही आत्मकथनपर लेखनामध्ये 'माझी जन्मभूमी', 'आमची आऊ' , 'ज्योतिबांना नमस्कार', 'संसाराची वाट', 'ज्योतिबांचा बोध' व 'सावित्री ज्योतिबा संवाद' या रचनांचा समावेश आहे.

सावित्रीबाईंनी प्रबोधनात्मक चिंतनात्मक काव्यरचनाही केलेल्या आहेत. त्यात स्त्री शूद्रांना शिक्षण घेण्यासाठी आवाहनही केलेले आहे. तर चिंतनात्मक काव्यामध्ये 'शिकण्यासाठी जागे व्हा', 'श्रेष्ठ धन', 'गुलाबाचे फुल', 'नवस', बाळास उपदेश अशा कवितांचा समावेश आहे. तर 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर', हे खंडकाव्य त्यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर लिहिले आहे. फुलेंच्या निधनानंतर लिहायला घेतलेले हे खंडकाव्य त्यांनी कमीतकमी वेळेत पूर्ण करून प्रकाशित केलेले आहे. या काव्यसंग्रहात बावन्न कडव्यांची दीर्घरचना असून सहा भागामध्ये हे खंडकाव्य विभागलेले आहे. ते भाग पुढीलप्रमाणे (१) उपोद्घात (२) सिद्धता (३) पेशवाई (४) आंग्लाई (५) ज्योतिबा (६) उपसंहार.

उपरोक्त विभागामधून ज्ञानज्योती सावित्रीबाईंना सामाजिक कार्याची प्रेरणा ज्योतिरावांपासून कशी प्राप्त होते हे नमूद केले आहे. शिवाय हे सर्व करताना महात्मा फुलेंना कोणत्या दिव्यातून जावे लागते तेही यात नमूद केलेले आहे. दोन कविता संग्रहांव्यतिरिक्त 'ज्योतिरावांची भाषणे' २५ डिसेंबर, १८५६ रोजी संपादित केलेली आहेत. या पुस्तकात ज्योतिरावांची चार भाषणे आहेत. ज्योतिरावांना लिहिलेली पत्रेदेखील आहेत. ही एकूण तीन पत्रे आहेत ती नायगाव व ओतूरवरून महात्मा ज्योतीराव फुलेंना लिहिलेली आहेत.

'मातोश्री सावित्रीबाईंची भाषणे' या पुस्तकात 'उद्योग', 'विद्यावान', 'सदाचरण', 'व्यसने', 'कर्ज' या विषयावरील त्यांची भाषणे शास्त्री नारो बाबाजी महाघट, पाटील यांनी संपादित करून १८९२ साली वत्सल प्रेस बडोदा येथून प्रसिद्ध केलेली आहेत. शिवाय सावित्रीबाईंच्या इतर रचनांमध्ये तत्कालीन परंपरागत धार्मिक विषयांना धरून काही कविता केलेल्या आहेत.

सावित्रीबाईंचा पहिला काव्यसंग्रह 'काव्यफुले' १८५४ मध्ये प्रसिद्ध झाला तर दुसरा काव्यसंग्रह ''बावन्नकशी सुबोध रत्नाकर'' हा ज्योतिबांच्या महानिर्वाणानंतर म्हणजे १८९१ साली प्रसिद्ध झाला. याशिवाय सावित्रीबाईंनी पुष्कळ असे स्फुट लेखनही केले आहे. मा.गो. माळी म्हणतात, ''सावित्रीबाईंचा 'काव्यफुले' हा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला त्यावेळी आधुनिक काव्याचे जनक म्हणून साहित्य समीक्षकांनी ज्यांचा गौरव केला त्या कृष्णाजी केशव दामले ऊर्फ केशवसुत यांचा जन्मही झाला नव्हता हे या ठिकाणी जाणिवपूर्वक नमूद करावेसे वाटते. केशवसुतांचा जन्म इ.स. १८६६ मध्ये झाला. परंतु साहित्याचा इतिहास लिहिणाऱ्या इतिहासकारांनी समीक्षकांनी, अभ्यासकांनी सावित्रीबाईंच्या या दोन्ही काव्यसंग्रहांचा कुठेही उल्लेख केलेला नाही. वास्तविक पाहता सावित्रीबाईंचा 'काव्यफुले' हा पहिला काव्यसंग्रह केशवसुतांच्या जन्माअगोदर एका तपापूर्वी प्रसिद्ध झाला.''[२८] याचाच अर्थ सावित्रीबाईंनी केशवसुतांच्या खूप वर्षे अगोदर काव्यरचना केली आहे हे मान्यच करावे लागेल. यावरून असे स्पष्ट होते की, केशवसुतांच्या ऐवजी सावित्रीबाई फुले याच खऱ्या अर्थाने आधुनिक मराठी कवितेच्या जनक ठरतात.

## समारोप :

सावित्रीबाई फुले यांनी लेखनातून सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक प्रबोधन केले. माणसाला माणूस म्हणून जगावयास शिकविले, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मानवतावादी, दृष्टिकोनातून त्यांनी आत्मप्रेरणेने लेखन केले.

सावित्रीबाई फुले यांच्या लेखनाला सुरूवात त्यांचे अध्यापन प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर, लग्नानंतर म्हणजे इ.स. १८४७ नंतर झाली आहे. परंतु त्यापूर्वीचे माहेरकडचे वातावरणही सुसंस्कारी होते. सावित्रीबाईंचे आई-वडील दोघे कष्टाळू, उदार अंतःकरणाचे असल्याने

गोरगरिबांना ते मदत करायचे. गरिबांचे ते आशास्थान होते. कुटुंबातील संस्कारी वातावरणाचा त्यांच्या जडणघडणीत मोठा वाटा आहे. लग्नानंतर सुसंस्काराला शिक्षणाची जोड मिळून सावित्रीबाईंवर मोठा प्रभाव पडला तो त्यांच्या विचारशील, सामाजिक क्रांतीची सुरूवात करणाऱ्या ज्योतिरावांचा. सावित्रीबाईंच्या वाङ्मयनिर्मितीमागे 'महात्मा ज्योतिराव फुले' आणि 'सगुणाबाई क्षीरसागर' ऊर्फ 'आऊ' यांची प्रेरणा होती.

प्रत्येक लेखकाचा स्वतःचा जीवनाविषयक विशिष्ट असा दृष्टिकोन असतो. त्याचे सूक्ष्म अतिसूक्ष्म प्रतिबिंब त्याच्या साहित्यात पडलेले असते. परंतु काही प्रसंगी लेखकाचा जीवनविषयक दृष्टिकोन आणि वाङ्मयीन दृष्टिकोन भिन्न असतो. मात्र सावित्रीबाईंचे लेखन, व्यक्तिमत्त्व आणि जीवनविषयक दृष्टिकोन एकच असल्याचे दिसते. आपल्या आजूबाजूला असणाऱ्या अज्ञानी, दुःखी जनसामान्यांना डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी आपल्या कविता केल्या आहेत. आपण अंगिकारलेल्या समाजसुधारणेच्या कार्यात पारंपरीक मानसिकतेमुळे अडथळे येणारच हे सावित्रीबाई जाणून होत्या. पण त्यामुळे घाबरून हाती घेतलेले कार्य सोडून न देता ते अधिक खंबीरपणे तडीस नेण्याचा त्यांचा निश्चय जीवनातील अनेकविध प्रसंगातून दिसतो. परोपकारासाठी त्यांनी आपले सारे आयुष्य वेचले. त्यांच्या स्वीकृत कार्यात अनेक विघ्ने अडचणी येऊनसुद्धा सावित्रीबाईंच्या स्वभावातील मृदुता कायम राहिली. मानवतेच्या मूल्यांवरील निष्ठांमुळे लहान–थोरांशी सावित्रीबाईंचे नाते जिव्हाळ्याचे राहिले. सावित्रीबाईच्या स्वभावात मृदुता, धाडसीपणा, नम्रता, करारीपण यांचे अपूर्व मिश्रण आढळते. शिक्षणामुळे आधीच असलेल्या गुणांचा विकास होऊन आचारा–विचारात पारदर्शकता, निर्भिडता आली होती. बुद्धीप्रामाण्यवाद, मानवतावाद या मूल्यांवर त्यांची निष्ठा होती. या निष्ठांचा प्रभाव त्यांच्या सामाजिक आणि वाङ्मयीन जडणघडणीवर पडलेला दिसतो. सावित्रीबाई फुले यांचा मूळ पिंड शिक्षकाचा, समाजसुधारकाचा असून त्या प्रतिभासंपन्न कवयित्री, उत्तम लेखिका आणि उत्कृष्ट संपादिकादेखील असल्याचे प्रत्ययास येते. याचबरोबर स्त्री, शुद्रातिशूद्र यांच्यावर कोणत्याही भेदाभेदाशिवाय मनःपूर्वक प्रेम करणे, दीन–दुःखितांची सेवा करणे हा वात्सल्यभाव, सेवाभाव ही सावित्रीबाईंना मिळालेली निसर्गदत्त देणगीच म्हणावी लागेल. समाजप्रबोधनाची कार्यनिष्ठा, निखळ नितिमत्ता यामुळे त्यांचे व्यक्तिगत जीवन आजही आदर्श असेच आहे..

## संदर्भ सूचीः


१) झोडगे फुलवंताबाई, ''साध्वी सावित्रीबाई फुले'', चिनार पब्लिशर्स, धनकवडी, पुणे, दु.आ.मे. २०१३, पृ. १९.

२) तत्रैव, पृ. २१.

३) उके इंदिरा, ''सावित्रीबाई फुले : जीवन कार्य'', सुगत प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २००४, पृ. ७–८.

४) मालकर कृष्णा, ''क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले : जीवन व कार्य'', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, मे. २०११, पृ. १७.

५) तत्रैव, पृ. १८.

६) सहस्त्रबुद्धे पु.ग. (संपा.), ''लोकहितवादींची शतपत्रे'', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे सातवी आवृत्ती २००४, पृ. २१८.

७) सुर्यवंशी राजाराम, ''युगस्त्री सावित्रीबाई फुले,'' मावळाई प्रकाशन, शिरूर, ति.आ. २०१०, पृ. १७.

८) गुंदेकर श्रीराम, ''महात्मा ज्योतिबा फुले : विचार आणि वाङ्मय'', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९२, पृ. २३.

९) जगताप मुरलीधर, ''युगपुरूष महात्मा फुले चरित्र'', साधना प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९९३, पृ. १०.

१०) कीर धनंजय, ''महात्मा ज्योतीराव फुले'', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पाचवी आवृत्ती २००८, पृ. ८.

११) तत्रैव, पृ. ९.

१२) तत्रैव, पृ. १५.

१३) पवार दया, प्रा. मेश्राम केशव व इतर (संपा.) ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ'', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ. डिसेंबर १९९३, पृ. २३३.

१४) तत्रैव, पृ. २३७.

१५) कीर धनंजय, ''महात्मा ज्योतीराव फुले : आमच्या समाजक्रांतीचे जनक'', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९६८, पृ. १२.

१६) तत्रैव, पृ.३१.

१७) तत्रैव, पृ.३४.

१८) नरके हरी (संपा.) ''महात्मा फुले : साहित्य आणि चळवळ'', उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्र. आ २००६, पृ. २४४.

१९) उनि., मालकर कृष्णा पृ. १९.

२०) पवार ना.ग., ''सावित्रीबाई फुले : अष्टपैलू व्यक्तिमत्त्व'' पद्मगंधा प्रकाशन, पुणे द्वि.आ. २०१०, पृ. १९.

२१) उनि., मालकर कृष्णा, पृ. ३

२२) तत्रैव, पृ. १९.

२३) माळी (डॉ.) मा. गो., श्रीमती उपाध्ये नीला व इतर (संपा.), ''क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले : काल आणि कर्तृत्व'', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ. मार्च १९९८, पृ. ११८.

२४) तत्रैव, पृ. १०९.

२५) चव्हाण रा.ना., ठोके मो.ना (संपा.), ''कर्मवीर भाऊराव पाटील : शोध आणि बोध'', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ. १९८७, पृ. १०३.

२६) माळी (डॉ.) मा. गो. (संपा.), ''सावित्रीबाई फुले : समग्र वाङ्मय'', महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, च.आ. ऑक्टो. २००६, पृ. २०,२१.

२७) तत्रैव, पृ. १२१.

२८) तत्रैव, पृ. १३२.

* * *

## प्रकरण दुसरे

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या लेखनामागील प्रेरणा आणि प्रभाव

प्रस्तावना

२.१ तत्कालीन सामाजिक स्थिती

२.२ शैक्षणिक स्थिती

२.३ सावित्रीबाईंच्या लेखनामागील प्रेरणा

- २.३.१ आद्य प्रेरक ज्योतिराव
- २.३.२ सगुणाबाई क्षीरसागर ऊर्फ आऊ
- २.३.३ स्वयंप्रेरणा, अंतःप्रेरणा
- २.३.४ शोषणविरहीत समाजाची निर्मिती ही प्रेरणा

२.४ सावित्रीबाईंच्या लेखनावरील प्रभाव

- २.४.१ संत साहित्याचा प्रभाव
- २.४.२ लोकदैवत व ऐतिहासिक व्यक्तींचा प्रभाव
- २.४.३ ख्रिस्ती मिशनरींचा प्रभाव
- २.४.४ सत्यशोधक विचारांचा प्रभाव

समारोप

# प्रकरण दुसरे

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या लेखनामागील प्रेरणा आणि प्रभाव

**प्रस्तावना :**

इंग्रजांच्या आगमनामुळे महाराष्ट्रातील समाज प्रबोधन चळवळीचा उद्‌गम आणि विकास घडून आला इ.स. १८१८ ला ईस्ट इंडिया कंपनीची राजवट महाराष्ट्रात चांगली स्थिरावू लागली. त्यामुळे कंपनी सरकारने राज्यकारभाराबरोबर सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रात बदल घडवून आणण्यास सुरूवात केली. परंतु ब्रिटीशांची सत्ता महाराष्ट्रात येण्यापूर्वी पेशव्यांची राजवट होती.

## २.१ तत्कालीन सामाजिक स्थिती :

पेशवे हे उच्चवर्णीय असल्याने धर्म आणि राजसत्तेवर त्यांचे पूर्ण वर्चस्व होते. समाजाचे नेतृत्व करताना कर्तव्यांपेक्षा हक्कांना अधिक महत्त्व दिले जायचे. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात पेशवे, वतनदार यांना अनिर्बंध अधिकार दिले गेले होते. राज्यसंस्था प्रबल असून वतनदार बहुजन समाजाचे शोषण करीत होते. उच्चवर्णीय वतनदार शूद्रातिशूद्रांकडून हवा तेवढा कर मनमानी करून गोळा करत असत आणि आर्थिक शोषणाबरोबर धार्मिक शोषणही करत असत. या सर्व अन्यायाची दाद मागण्याची हिंमत त्या समाजात नव्हती कारण पेशवे आणि वतनदार यांचे हितसंबंध एकमेकांत गुंतले होते. जातिव्यवस्था एवढी भक्कम की उच्चनिचतेच्या भावनेमुळे अन्याय करणारा व अन्याय सहन करणारा या दोहोंना त्याबद्दल ना खंत वाटत असे ना खेद वाटत असे. जातिव्यवस्थेच्या उतरंडीत शूद्रातिशूद्र सर्वात खाली असल्याने त्यांची स्थिती पशूपेक्षाही हीन झाली होती. प्रत्येक जातीच्या वेगवेगळया देव–देवता होता. तसेच प्रत्येक जातीला पूजा, विधी, जातपंचायत, न्यायदान या संदर्भात मर्यादित अधिकारही होते. कर्मावरून व्यक्तीची ओळख ठरण्याऐवजी एखाद्या जातीतील जन्मावरून त्याची उच्चनीचता ठरत असे. जातीप्रमाणे व्यवसाय वाटलेले असल्यामुळे व्यवसायाच्या दर्जानुसार जातीचा दर्जा ठरत होता. गावा–गावांमध्ये बारा बलुतेदारी पद्धती असल्याने सर्वांनाच आपल्या उदरनिर्वाहासाठी स्वजातीचाच व्यवसाय करावा लागत असे. ही जातिव्यवस्थेची पकड घट्ट रोवून ठेवण्यासाठी वेगवेगळया ग्रंथांचा, पोथ्यांचा आधार दिला जात असे. तथाकथित

स्वयंघोषित धर्मगुरू मनमानी काम करत होते. त्यांच्यामार्फत असणारे नियम आणि मान्यता अंतिम होती. जाती–जातीत वेगवेगळे नियम होते. त्याची अंमलबजावणीही अत्यंत काटेकोर होती. प्रस्थापित समाजव्यवस्थेला विरोध केला तर जातीतून बहिष्कृत होण्याची भिती सर्वांनाच वाटत होती. जातीव्यवस्थेला धर्माचे संरक्षण असल्याने स्वजातीबद्दलचे प्रेम एका बाजूला वाढत गेले तर इतर जाती–धर्माबद्दलची आपुलकी कमी होत गेली. लोकांच्या दृष्टीने स्वतःची जात व कुळ श्रेष्ठ होते, म्हणजेच सर्व समाज एक संकुचितत विचारात गुंतून निष्प्रभ झाला होता.

## २.२ शैक्षणिक स्थिती :

ब्रिटीशपूर्व काळात शिक्षणाची मक्तेदारी फक्त उच्चवर्णियांकडे होती. त्यांचा भरही संस्कृत पोथ्यांच्या पाठांतरावर होता. या पोथ्यांमध्ये कर्मकांड व्रतवैकल्ये, दानमहिमा, ब्राह्मणभोजने, प्रायश्चित्त इत्यादी विषयासंदर्भात माहिती असे. विशेष म्हणजे ही कर्मकांडे फक्त उच्चवर्णियांकडूनच नव्हे तर समाजाच्या सर्व वर्गातील लोकांकडून केली जात होती. त्यामुळे आधुनिक शिक्षणाची सुरूवातदेखील झाली नव्हती. ब्रिटीश राजवटीत शिक्षण देण्याचे प्रयत्न झाले पण त्याचा लाभदेखील फक्त उच्चवर्णियांना झाला. शूद्रातिशूद्रांनी शिक्षण घेणे धर्मबाह्य मानले जाई. स्त्रियांनी शिकणे म्हणजे तर धर्म बुडविणेच होते. एकंदरीत शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया यांच्या शिक्षणासाठी अतिशय प्रतिकूल परिस्थिती होती. परंतु इंग्रजी अमदानीबरोबर नव्या सामाजिक कल्पना व जाणीवा जन्म घेत होत्या. समाजधुरीणांना या नवयुगाच्या उषःकालात प्रगतीची रम्य स्वप्ने पडत होती. पण रूढीप्रिय समाजाला जुन्या कल्पनांनी जखडून ठेवले होते. अशा काळात ज्योतिरावांनी सामाजिक सुधारणेचे रणशिंग फुंकले आणि आपल्या कार्याला स्वगृहापासूनच प्रारंभ केला. सावित्रीबाईंना शिक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय ज्योतिरावांनी घेतला.

## २.३ सावित्रीबाईंच्या लेखनामागील प्रेरणा :

लग्नापूर्वी सावित्रीबाई चारचौघींप्रमाणेच नम्र, शांत तरीही करारी होत्या माहेरकडील परिस्थिती सधन असली तरी कुटुंब मात्र परंपरांना मान देणारे असल्याने त्यांच्या शिक्षणाचा प्रश्नच उद्भवला नाही. म्हणजेच लग्नापूर्वी निरक्षर असलेल्या पत्नीला सावित्रीबाईंना

ज्योतिरावांनी साक्षर करायचे ठरविले. सावित्रीबाईनी जुन्या कल्पना अगोदर आत्मसात केल्या असल्या तरीही पतीच्या सहवासाने नव्या कल्पनांचे स्वागत करण्याइतकी संवेदनक्षमता त्यांच्या ठिकाणी होती. ज्या क्षणी सावित्रीबाईंनी शिक्षणारंभ केला तो क्षण स्त्रीशिक्षणाच्या इतिहासातील मोठा भाग्याचा क्षण मानला पाहिजे. कारण त्या काळी शिकलेल्या स्त्रिया पुढारलेल्या वर्गातही दिसत नव्हत्या. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी चालविलेल्या शाळेत जाण्याचे धैर्य स्त्री–पुरूष दोहोंमध्ये नव्हते. आर्थिक व सामाजिक परिस्थिती शिक्षणासाठी अनुकूल नव्हती आणि पुन्हा मिशनऱ्यांची शाळा म्हटली की धर्मांतराची लोकांना भिती वाटे. शाळेत जाणारी मुलगी हा एक कुचेष्टेचा विषय होता. शाळेत जाणारी मुलगी पाहण्यासाठी लोक खिडकीतून डोकावत असत. स्त्रियांनी पायात जोडा घालणे हेसुद्धा आविनयाचे लक्षण समजले जाई. स्त्रियांच्या बाबतीत धर्माचरणाची बंधने अगदी काटेकोर आणि तिच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच करणारी होती.

अशा काळात धर्माची बंधने, सामाजिक परंपरा स्त्रियांना शिक्षणाला कठोर विरोध करीत असताना ज्योतिरावांनी शब्दांचे जादुई जग सार्थपणे पत्नीसाठी प्रथम खुले केले. सावित्रीबाईंनी हे जग फक्त स्वत:पुरते मर्यादित न ठेवता हे अक्षरधन अवघ्या स्त्रीजातीसाठी खुले केले. शिक्षणामुळे विचारातील ठामपणा, तर्कशुद्धता, एखाद्या गोष्टीची सत्यासत्यता, कार्यकरणभाव या सर्व गोष्टींबरोबर महत्वाचे म्हणजे आत्मभान त्यांना येऊ लागले. स्त्री ही माणूस आहे आणि तिला माणुसकीचे हक्क मिळालेच पाहिजेत. स्त्रियांना गुलामी, अज्ञान व अंधश्रध्दा यातून मुक्त करण्यासाठी शिक्षणाशिवाय श्रेयस्कर मार्गच नाही हे ज्योतीरावांबरोबर सावित्रीबाईंनीही जाणले. स्वानुभवाने त्यांना हे पटलेही होते. म्हणून तर सनातन्यांचे शेण–गोटे सहन करूनही, विनावेतन निर्लोभीपणे त्यांनी हे कार्य केले. या त्रासाबद्दल तक्रार न करता विरोधाचा शब्द न उच्चारता संयमाने ठरविलेल्या ध्येयाकडे वाटचाल केली. या सर्व वाटचालीत सावित्रीबाईंना प्रेरणा देणाऱ्या त्यांच्या पतीचा सिंहाचा वाटा होता.

## २.३.१ आद्य प्रेरक ज्योतिराव :

अर्थातच ज्योतिराव हे सावित्रीबाईंची प्रथम प्रेरणा होती. ज्योतीरावोविषयी व्यक्त होणारा आदर त्यांच्या लेखनातून दिसून येतो. त्यांचा उल्लेख पत्र लिहिताना त्या 'सत्यरूप ज्योतीबास्वामी' असा करतात. आपल्या पतीच्या कार्याचे वेगळेपण आणि दिव्यत्व, बोले तैसा

चाले हा बाणा आणि सत्याबद्दल असणारी निष्ठा यांचा त्यानी डोळसपणे अंगिकार केला होता. त्यामुळेच त्यांच्या कार्यात सहभागी होण्याची संधी मिळणे म्हणजे भाग्याची गोष्ट होती. माहेराहून पाठविलेल्या एका पत्रात ज्योतिरावांच्या कार्याबद्दल भावास सांगताना त्या सावित्रीबाई म्हणतात, ''माझा नवरा तुझ्यासारखा वारकऱ्याप्रमाणे नुसते हरिनाम घेत वाऱ्या करीत नसून प्रत्यक्ष हरीचे काम करीत आहे. त्यास मी मदत करते हे काम इतके आल्हाददायक होते की, त्यायोगे मला परमानंद होतोच होतो''[१]. स्त्रियांच्या सामाजिक उन्नतीसाठी मानसिक गुलामगिरीतुन सूटका होण्यासाठी ज्योतिरावांनी केलेल्या कार्याचा आरंभ स्वतःच्या घरापासून केला होता. शैक्षणिक क्षेत्रातील दालन उच्चवर्णियांपासून शूद्रातिशूद्रांपर्यंत स्त्रियांसाठी खुले करताना पहिल्या अक्षरधारेचा स्पर्श सावित्रीबाईंना फक्त ज्योतिरावांमुळेच झाला होता. याबद्दल कृतज्ञता आपल्या कवितेतून व्यक्त करताना त्या म्हणतात,

''ज्योतिबांना नमस्कार । मनोभावे करीतसे

ज्ञानामृत आम्हा देई । अशा जीवन देतेस ।''[२]

प्रारब्धवादी, परमार्थवादी व ग्रंथप्रामाण्य, शब्द प्रामाण्यावर विश्वास ठेवणाऱ्या समाजात कर्मकांडाचे अवंडबर माजले होते. समाजातील जातीय व वर्गीय विषमतेमुळे माणसा–माणसात मोठी दरी निर्माण झाली होती. शिक्षणामुळे या परिस्थितीत बदल होईल अशी कोणी कल्पनाही करू शकत नव्हते अशा वेळी शिक्षणाविषयी तरणोपाय नाही हे ठणकावून सांगणारे आणि त्याची सुरूवात आपल्या घरापासून करणारे ज्योतिराव हे त्या काळातील एकमेव उदाहरण होते. अर्थातच सावित्रीबाईंनी ज्योतिरावांची कार्यनिष्ठा, तळमळ, आचरण हे सारे खूपच जवळून अनुभवले होते. आजूबाजूच्या घडामोडींचेही ज्ञान त्यांना होतेच. लोकमान्य टिळक, आगरकर, न्या. रानडे ह्या मतभिन्नता असलेल्या समकालीनांसोबत ज्योतिरावांचा विचार वेगळा होताच पण प्रत्यक्ष कृतीने तो क्रांतिकारकही होता. त्यामुळे ज्योतिराव हीच सावित्रीबाईंची प्रथम प्रेरणा होती.

जागृतीसाठी ज्योतिराव जे बोलत होते ते त्या ऐकत होत्या आणि संपादित करून लिहीतही होत्या. 'अतिप्राचीन काळी', 'इतिहास', 'सुधारणूक', 'गुलामगिरी' या ज्योतिबांच्या भाषणांचे संपादन सावित्रीबाईंनी केले होते.

### २.३.२ सगुणाबाई क्षीरसागर ऊर्फ आऊ :

सावित्रीबाईंच्या लग्नानंतर माहेरची ऊब खऱ्या अर्थाने दिली सगुणाबाईंनी. ज्योतिराव व सावित्रीबाई या दांपत्यावर मायेची पाखर घालणारी ती सावली होती.

सगुणाबाई क्षीरसागर ज्योतिरावांच्या वडिलांची बहीण होती. हडपसर येथील या बाईंना सासरी किंवा माहेरी कोणी नव्हते. वाटयाला आलेले वैधव्य घेऊन त्या धीराने पावले टाकीत होत्या. वैधव्याची आच लागली तरी मनातील मायेचे पाझर आटले नव्हते. त्यांचे वात्सल्य टिकून होते. निर्वाहासाठी जॉन नावाच्या एका गोऱ्या मिशनऱ्याची मुले सांभाळण्याचे काम त्यांनी पत्करले होते. जॉन हा तत्त्वनिष्ठ मिशनरी होता. त्यांच्या घरी काम केल्यामुळे सगुणाबाईंना इंग्लिश बोलणाऱ्या मुलांचा सहवास लाभला. यामुळे त्या मोडके तोडके आणि कामचलाऊ इंग्लिश बोलू शकत. ज्योतिरावांनी खूप शिकावे, मोठा माणूस बनावे असे त्यांना वाटत असे. सावित्रीबाईंच्या शिक्षणाला प्रोत्साहन देऊन स्वतःही मराठीचे धडे त्यांनी गिरविले होते. अशा या प्रेमळ पण कर्तव्यकठोर सगुणाबाईबद्दल ज्योतिरावांना आदर व प्रेम असले तर नवल नाही. पण सावित्रीबाईंनाही या आऊबद्दल किती प्रेम आदर होता, हे सावित्रीबाईंच्या कवितेतून दिसून येते. ‘आमची आऊ’ या कवितेत त्या म्हणतात,

''आऊ आमच्या । घरी आली
टाक होऊन । पहा बैसली
मूर्तिमंत जणू । विद्यादेवी
हृदयी आम्ही । तिला साठवी ।।[३]

सावित्रीबाईंच्या हातून स्त्रियांच्या शिक्षणाचे आणि समाजजागृतीचे महान कार्य झाले, जे त्यांच्या वाङ्मयातूनदेखील प्रगटले त्या मागची मुख्य शक्ती सगुणाबाई क्षीरसागर होत्या असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

### २.३.३ स्वयंप्रेरणा, अंतःप्रेरणा :

सावित्रीबाईंची वैशिष्टयपूर्णता ही आहे की, मध्य युगातील पुरूषप्रधान सांस्कृतिक मूल्यव्यवस्थेचा यांच्यापर्यंत आलेला प्रवाह त्या अव्हेरतात. त्याला ओलांडून त्या शिक्षिका म्हणून, एक समाजपरिवर्तक कार्यकर्ती म्हणून उभ्या राहतात, त्याचबरोबर स्वतःतील वाङ्मय

प्रेरणेलाही मुक्त करतात. पारंपरिकतेच्या शृंखला फोडण्यासाठी फक्त बाह्य प्रेरणा किंवा सहकार्य असून चालत नाही तर व्यक्तिगत स्तरावर परिवर्तनाची प्रेरणा आणि अन्यायकारी धर्मसंस्कृतीची व्यवस्था बदलण्यासाठी मोठ्या धैर्याची आवश्यकता असते. यासाठी अंतःप्रेरणा, अंतःस्फूर्ती असावी लागते. ती सावित्रीबाईंकडे ओतप्रोत भरली होती.

अविद्येचा नाश आणि विद्येचा ध्यास हा त्यांचा स्वभाव बनला. त्यातूनच पुढे वाङ्मयनिर्मिती घडली. मानवसेवा हीच ईश्वरसेवा मानून आपले अवघे आयुष्य त्यांनी जनसेवेला अर्पिले होते. म्हणूनच त्यांच्या अधिक कविता सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या आहेत.

काव्यनिर्मितीसाठी प्रतिभा ही एक आवश्यक बाब आहे. प्रतिभेला फुलायला एखादे निमित्त पुरेसे होते. एखादा प्रसंग या हृदयीचे त्या हृदयी अनुभूती घेतो आणि शब्दवैभवी प्रगट होतो. वाल्याला पूर्वकृत्याचा पश्चात्ताप होऊन त्याचे वाल्मिकी ऋषीत परिवर्तन झाल्यावर वाल्मिकींच्या हृदयातून काव्य प्रगटीकरणासाठी एका प्रसंगाचे निमित्त घडले. एके दिवशी महर्षी वाल्मिकी गंगेवर स्नानास जाताना परम आनंदात विहार करीत असलेली क्रौंच पक्ष्याची जोडी पाहिली पण दुसऱ्याच क्षणी ते आनंददृश्य शोकदृश्यात परिणत झाले. एका व्याधाचा बाण सूं सू करीत निघाला आणि नरक्रौचाला वेधून त्याचा प्राण घेतला. कौचपक्षी बाणाने घायाळ होऊन रक्तबंबाळ होऊन भूमीवर पडलेला पाहून क्रौचपक्षीण शोकविव्हल होऊन त्याच्या मृतदेहाभोवती करूण स्वर काढीत फिरू लागली. हे शोकमय दृश्य पाहून दुःखावेगाने हृदयातील करूणा श्लोकाच्या रूपाने त्यांच्या मुखातून बाहेर पडली,

मा निषाद प्रतिष्ठां त्वम् अगमः शाश्वतीः समाः।
यत् क्रौंचमिथुनादेकम् अवधीः काममोहितम् ।।[४]

उपरोक्त शापवाणी श्लोकरूपाने महर्षी वाल्मीकी यांच्या तोंडून बाहेर पडल्यावर चमकून जाऊन त्यांनी आपल्याशीच विचार केला, हे मी काय म्हणालो असेन ? त्याच वेळी त्यांना आज त्यांच्या मुखातून निघाले त्याचे नाव 'कविता' अशी वाणी ऐकू आली. अशाप्रकारे महर्षी वाल्मिकींच्या हृदयातील शोक त्यांच्या मुखावाटे श्लोकरूपाने बाहेर पडून विश्वातील आदिम कविता 'रामायण' या महाकाव्याची निर्मिती झाली असे मानले जाते.

संतकवितेच्या केंद्रस्थानी 'विठ्ठल' आहे. सगळया संतांनी विठ्ठलाविषयी उत्कट आस व्यक्त केलेली दिसून येते. विश्व हे दृष्ट आहे. विश्वात्मक देव अदृष्ट आहे. पण दृष्ट विश्वातच अदृष्ट देव आहे. विठ्ठल देवाची मूर्ती पंढरपुरात आहे म्हणून संतांना पंढरपूरची आस लागते कारण 'अदृष्ट' विठ्ठलाचे 'दृष्ट' रूप पंढरपूर येथे आहे. परंतु त्याचा विठ्ठल फक्त मूर्तीत मर्यादित राहिलेला नाही. 'काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल' इथपर्यंत हा कल्पनेचा विस्तार झाला आहे. इथे मूर्त आणि अमूर्त हे दोन पैलू नसून ते एकात्म झाले आहेत मूर्तात अमूर्तत्व आहेच आणि अमूर्तात मूर्ताची जाणीव आहे. या मूर्त आणि अमूर्त परस्परसंबंधातून वाचकाला कविता साहित्य जाणवत असते. पंढरीचा विठोबा हा मूर्त शब्दरूप आहे असे मानले तर त्याच्या पलिकडे अमूर्त अर्थरूप असे काही 'परमतत्व' आहे. हा अनुभव जसाच्या तसा शब्दांत मांडता येईल असेही नाही. पण कवितेत मात्र मूर्त शब्दरूप आहे असे मानले तर त्याच्या पलिकडे अमूर्त अर्थरुप असे काही 'परमतत्व' आहे. हा अनुभव जसाच्या तसा शब्दांत मांडता येईल असेही नाही. पण कवितेत मात्र मूर्त शब्दरुपाकडून अमूर्त अर्थरूपाकडे वाचक जातो. मग या शब्दचैतन्याचा आविष्कार कसा घडतो ? हे अभंगातून सांगताना संत तुकाराम अमूर्त मनाला पडलेल्या स्वप्नाचा दाखला देतात, ते म्हणतात.

''नामदेवे केले स्वप्नामाजी जागे । सवे पांडूरंगे येऊनिया ।
सांगितले काम करावे कवित्व । वाऊगे निमित्य बोलो नये ।।''[५]

तरीही संत तुकाराम त्यांच्या काव्यगंगेचा उगम मूलस्त्रोत वेगळाच असल्याचे सांगतात. ईश्वरी स्फूर्ती हाच आपल्या ज्ञानाचा आणि वाणीचा उगम असल्याचे ते मानतात. म्हणूनच ते म्हणतात,

''तुका म्हणे मज बोलविती देव ।
अर्थ गुह्य भाव तोचि जाणे''।।[६]

म्हणजेच प्रतिभा ही ईश्वरी प्रसादाचे फळ आहे, अशी संतांची धारणा होती. मराठी रसिकांना जगण्याच्या तत्त्वज्ञानाचे सार रसाळ सोपेपणामुळे सांगणाऱ्या बहिणाबाई चौधरी लौकिकार्थाने निरक्षर होत्या पण जगण्याच्या साध्या कल्पनांना अलौकिक उंचीवर नेऊन ठेवणारी प्रतिमा कुठून आली या प्रश्नाला कवयित्री बहिणाबाईंनीच उत्तर दिले आहे त्या म्हणतात,

''माझी माय सरसोती
माले शिकविते बोली ।
लेक बहिणाच्या मनी,
किती गुपीतं पेरली''।।[७]

याचबरोबर जात्यातून जसे अलगद पीठ पडते तसे आपले गाणे पोटातून ओठात येते म्हणजेच स्वयंप्रेरणेने घडते असेही त्या एका रचनेत सांगतात.

प्रतिभेला फुलायला एखादे निमित्त पुरेसे होते परंतु काही वेळा असे काही ठोस निमित्त न घडतासुध्दा आपोआप काव्यप्रतिभा प्रगट होते कारण प्रत्येक माणसाच्या अंगी एक प्रकारचे दिव्यत्व नांदत असते. बीजात वृक्ष असावा, काडीत अग्नी असावा तद्‌वत माणसात विविध गुण सुप्तावस्थेत असतात त्या गुणांच्या प्रगटीकरणानंतरच त्याचा साक्षात्कार घडतो.

आयुष्यातील कडू–गोड प्रसंगातही सावित्रीबाईंची काव्यसरिता नवकल्पना घेऊन स्वयंस्फूर्तीने प्रगट झाली. त्यांच्या माहेरचे वातावरण संस्कारी होते. त्यांचे आई–वडील दोघेही कष्टाळू, उदार अंतःकरणाचे होते.त्यामुळे माहेरी त्यांच्यावर सुसंस्कार घडले मात्र कुटुंबात कधी काव्यशास्त्रावर चर्चा घडली नाही. लग्नानंतर ज्योतिरावांसारखा विचारी, सामाजिक क्रांती घडविणारा सहचर आणि सगुणाबाईंच्या मातृतुल्य मायेने त्यांचे विचार प्रगल्भ बनत गेले. त्यामुळेच शिक्षणाच्या क्षेत्राबरोबर वाङ्‌मयाचे कार्य हाती घेऊन त्या प्रतिभासंपन्न कवयित्री बनल्या. सर्व गाव, समाज त्यांना सुशिक्षित, सुसंस्कृत करण्यासाठी तसेच स्त्री शूद्र, बहुजनांना माणूस म्हणून समानतेची वागणूक मिळण्यासाठी आयुष्यभर त्यांनी आपले कार्य सुरू ठेवले.

आजूबाजूच्या समाजाला आर्त भूक, तहान व अज्ञान यांनी ग्रासले अशावेळी अविद्येचा नाश आणि विद्येचा ध्यास हा सावित्रीबाईंचा स्वभाव बनला. याच वेळी निसर्गाने या कृषीकन्येला दिलेल्या एखाद्या मोहक दर्शनाने मधुर बासरीप्रमाणे काव्यसूर उमटणे म्हणजे अंतःकरणातील सूरांना शब्दरूप देणे होते. निःस्वार्थ वृत्तीने, सेवापरायण बुद्धिने काम करताना मानवतावादी प्रेरणेतून त्यांचे लेखन घडले. म्हणूनच त्यांच्या अधिक कविता सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या आहेत.

कवित्वाची स्फूर्ती वारसाहक्काने मिळत नाही की शब्दांची रास पानावर ओतली तरी शब्दसंग्रहातून भावप्रगटन होत नाही. म्हणूनच कवितेची निर्मिती हे प्रतिभावंतांचे लेणे मानले

जाते. जे सर्वांनाच प्राप्त होऊ शकत नाही. एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध आणि विसाव्या शतकाचा पूर्वार्ध या काळातले मराठी भाषेचे लेणे सावित्रीबाईंच्या काव्याच्या रूपाने नुकतेचे फुलायला सुरूवात झाली होती. परंतु कोणताही लेखक लेखनाच्या एखाद्या परंपरेत लिहीत असतो तशी कोणतीही परंपरा त्यांना नव्हती. त्या कालखंडातील बहुतेक कविता ही भाषांतरवजा अथवा अनुकरणवजा होती. अशावेळी स्वतःचे काव्य स्वतःच्या भाषेतून अभिव्यक्त करणाऱ्या सावित्रीबाई या एकमेव कवयित्री होत्या. एवढेच नव्हे तर मराठी काव्यलेखनाला त्यांच्या काव्यलेखनापूर्वी काहीएक परंपरा होती असे म्हणता येत नाही. स्वतःची कविता त्यांनी स्वतःच घडविली आणि कविता या वाङ्मयप्रकाराची जी जाण त्यांच्या लेखनातून दिसते ती मराठीत प्रथमच नव्या रूपात व्यक्त झाली होती असे म्हणावयास हरकत नाही. त्यांच्या काव्याच्या प्रेरणा त्यांच्या जीवनाबरोबर विशिष्ट सामाजिक स्थितीतही शोधता येतात. प्रबोधनाच्या चळवळी, शिक्षणाने येणारे आत्मभान, दुःखाचा शोध आणि मानवाविषयी वाटणारी आत्मीयता अशा वेगवेगळ्या विषयाच्या अनुषंगाने त्यांची काव्यनिर्मिती घडत गेली. तरीही अनुभवातील आत्माविष्कार ही त्यांची महत्वाची लेखनप्रेरणा होती असे दिसून येते.

सामाजिक जाण आणि कवित्वाचे भान यातच त्यांच्या कवितेच्या उगमाचे मर्म दडले आहे. एका प्रसन्न प्रभाती सूर्याचा गुलाबी गोल अवघ्या दिशा प्रकाशमान होताना बघून, सद्यःस्थितीची सहजगत्या जाणीव होऊन शूद्रातिशूद्रांच्या उत्थानाची आणि मानवप्राणी व निसर्गसृष्टी एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचा विलक्षण वास्तवतेचा साक्षात्कार, मनुष्यत्व इंद्रपदी मानवताकेंद्राकडे जाणे ही अभिनव कल्पना, त्यांचा जो संवेदनस्वभाव आहे यातून स्वयंप्रेरणेने आत्माविष्कारीत झाली आहे.

सावित्रीबाई स्वतःच्या काव्यसरितेबद्दल व कवीबद्दल स्वतःच स्वतःशी संवाद कवितेतूनच साधतात. हे काव्य माझ्याकडून कसे गायले गेले ? या प्रश्नावर त्या द्रष्टा कवी या कवितेत म्हणतात,

''ओघ काव्याचे वाहतात तोंडी
तया द्रष्टा वर देई नव–चंडी ।
देवी जिव्हेवर बसुनि काव्य गाई

धवल गंगाजल शंभु जटा धारा
काव्य वाचेतून वाहती मधुरा ।।''[८]

एका सात्त्विक, मंगल, तेजस्वी व पवित्र दैवी शक्तीच्या वरदानाने हे घडत असून साक्षात देवी त्यांच्या मुखाद्वारे काव्य वदवून घेत आहे अशी त्यांची धारणा होती. मनाच्या अदृश्य, अतार्किक, आध्यात्मिक आणि अनोख्या गुढ पारलौकिक जगात कवयित्रीच्या अंतःप्रेरणा कशा कार्य करतात? याबद्दल म्हणजेच कवी या काव्याबद्दल 'खुळे काव्य व खुळा कवी' या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

''कल्पित रचतो कवी काव्य
सुख दुःखे तो कधी भव्य
अनुभव घेतो स्वर्गाचा
भोग-भोगतो नरकाचा
क्षणात रडतो
रडत नाचतो
देव आळवितो
अघटित रचतो खुळे काव्य
सुरात गातो कवी दिव्य''[९]

अर्थातच हा अनुभव एवढा वैयक्तिक आणि अंर्तयामी घडणारा आहे की लौकिकार्थाने जगाच्या दृष्टीने कदाचित मनाचे वेडे विभ्रम एवढेच त्याचे पृथक्करण होईल. म्हणूनच कदाचित सावित्रीबाईंनी या आंतरिक मनाशी मनाच्या होणाऱ्या संवादानुभवाला जगरहाटीच्या कल्पनेनुसार खुळे काव्य म्हटले आहे. अतिशय वेगळया विषयांवरच्या, वेगळ्याच कल्पनाविश्वात नेणाऱ्या या कविता कवयित्रीच्या अंतःप्रेरणेतूनच निर्माण झाल्या असे म्हणावयास हरकत नाही कारण त्या काळातील पूर्वसूरींकडूनच नव्हे तर समकालीनांकडून देखील अशा विषयावरची अव्यक्तातून काही व्यक्त होणारी कविता निर्माण झाली नव्हती.

### २.३.४ शोषणविरहीत समाजाची निर्मिती करणे ही प्रेरणा :

शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया यांचे प्रबोधन व्हावे या उद्देशाने सावित्रीबाईंनी लेखन केले. धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक शोषणाचे मूळ शोधणे आणि त्यापासून मुक्तता करणे ही त्यांच्या लेखनामागील सर्वश्रेष्ठ प्रेरणा होती. अज्ञान, दुष्काळ, साथीचे रोग इत्यादीमुळे व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच, दुय्यम वागणूक याची भर होती. या सर्वांतून सुटण्याचा आपल्या सर्व बंधु–भगिनींना सोडविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे 'शिक्षण' आणि हे सर्वांना मिळावे, त्याचे सर्वांना महत्व कळावे या हेतूने विद्येच्या पुरस्कार व अविद्येचा तिरस्कार करणाऱ्या कवितांचे लेखन त्यांनी केले. माणसाने माणूस म्हणून वागावे यासाठी दास्यमुक्तीची प्रेरणा देणाऱ्या कवितांची निर्मिती सावित्रीबाईंनी केली. कधी दिव्य पूर्वजांच्या गोष्टी सांगून, कधी वर्तमानातील स्थितीबद्दल सांगून आत्मसन्मान जागविणे व शोषणविरहीत समाजाची निर्मिती करणे ही त्यांची प्रेरणा होती.

सावित्रीबाईंच्या वाङ्मय लेखनाची आद्य प्रेरणा त्यांच्या कुटुंबात दिसून येते. विवाहानंतर पती ज्योतीराव ही फार मोठी प्रेरणा होती सावित्रीबाईंच्या अनेक कवितांमध्ये त्यांचा आदराने उल्लेखही आला आहे. याचबरोबर सगुणाबाई क्षीरसागर ज्यांनी फुले दांपत्यावर मातृवत प्रेमाचा वर्षाव केला त्यांचीही प्रेरणा अत्यंत मोलाची आहे असे दिसून येते. याशिवाय स्वयंप्रेरणा, प्रतिभेची देणगी आणि अंतःप्रेरणेमुळे सावित्रीबाईंचे लेखन झालेले दिसते. दीनदरिद्री बहुजनसमाजाबद्दलची संवेदनशीलता आणि त्यातून शोषणाविरहित समाजाची आत्मभान असलेल्या जीवन पिढीची निर्मिती करणे ही सर्वश्रेष्ठ प्रेरणाही त्यांच्या वाङ्मयामध्ये दिसून येते.

## २.४ सावित्रीबाईंच्या लेखनावरील प्रभाव :

लेखकाच्या साहित्याला जशा काही प्रेरणा असतात तसाच वाङ्मयाचा प्रभावही असतो. बरेचसे लेखक ही प्रेरणा आणि प्रभाव मान्य करतात. अशा लेखकांपैकी एक असलेल्या सावित्रीबाई फुले या आपल्या वाङ्मयीन जडणघडणीत ज्योतिरावांची आणि सगुणाबाईंची प्रेरणा मान्य करून स्वीकारतात. त्यांच्या कविता वेगवेगळ्या प्रकारच्या असल्या तरी एकंदरीत वाङ्मयनिर्मितीवर संत वाङ्मय आणि पौराणिक ग्रंथ यांचा प्रभाव दिसून येतो.

### २.४.१ संत साहित्याचा प्रभाव :

सावित्रीबाईंनी संत वाङ्मय वाचल्याचे आढळून येते. त्यांच्या काही कवितांतून हे प्रकर्षाने जाणवते. त्याचबरोबर संस्कृत श्लोकाचा उल्लेख भाषणांमधून केलेला आढळतो. कवितेत त्या स्वतःचे नाव गुंफताना दिसून येते. संत तुकारामांच्या धर्तीवर 'तुका म्हणे' याप्रमाणे 'सावित्री वदते' अशीही रचना त्या करतात. ज्योतिरावांनी त्यांच्या कवितांना 'अभंग' हा शब्द न वापरता 'अखंड' असा उल्लेख केला आहे. या अखंडामध्ये त्यांनी 'ज्योती', 'ज्योतिबा', 'जोतिराम' अशा तीन मुद्रा 'तुका', 'तुकोबा', 'तुकाराम' यांच्याशी समांतर वापरल्या आहेत. सावित्रीबाई आपल्या काव्यात 'सावित्री', 'ज्योतिभार्या', 'ज्योतिकांता' अशा तीन मुद्रा वापरतात.

'काव्यफुले' या कवितासंग्रहातील 'तेच संत' या कवितेत त्या 'सावित्री वदते तेच संत' आणि 'गुलाबाचे फुल' या कवितेत 'सावित्रीची वाणी ध्यानी आणा' अशी रचना त्या करतात. 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या दिर्घकाव्यातील 'ज्योतिबा' या भागात 'जोतिकांता' आणि 'उपसंहार' या भागात 'जोति भार्या' अशा मुद्रा सावित्रीबाईंनी स्वतःसाठी वापरल्या आहेत. संत तुकारामांच्या रचनेतील काही विषय जातीभेद, अन्याय, संतपण त्यांच्याही कवितेत आढळतात. म्हणजेच त्यांच्या रचनांवर संत तुकारामांचा प्रभाव दिसून येतो असे म्हणता येईल.

सावित्रीबाईंच्या वेगवेगळ्या विषयांवरील कविता आहेत. पण त्यांना प्रामुख्याने आपल्या काव्याचा उपयोग लोकशिक्षणासाठी करावयाचा होता. त्यामुळेच लोकांना बोध आणि मनासाठी श्लोक रचणाऱ्या संताचाही त्यांच्या वाङ्मयावर काही प्रमाणात प्रभाव होताच. सुरेंद्र बारलिंगे म्हणतात, ''रामदासांचा सावित्रीबाईंवर मोठा प्रभाव होता असे दिसते. तसेच त्यांनी रामदासांना उत्तरही देण्याचा प्रयत्न केला.''[१०] यासाठी संत रामदासांची एक रचना पाहिल्यास याची सत्यता पडताळता येते. या रचनेत ते म्हणतात,

> ''जगी सर्व सूखी असा कोण आहे ।
> विचारें मना तूंचि शोधूनि पाहे ।
> मना त्वाचि रे पूर्वसंचित केले ।
> तयासारखे भोगणे प्राप्त झाले ।।''[११]

उपरोक्त मूळ रचना संत रामदासांची आहे पण या रचनेत पहिल्या, तिसऱ्या व चौथ्या ओळीत एक शब्द बदलवून ही रचना पुढीलप्रमाणे करताना सावित्रीबाई म्हणतात,

''जगी सर्व सुखी असा **एक** आहे ।
विचारी मना तूचि शोधूनि पाहे ।।
मना त्वाचि रे **ज्ञान** संचित केले ।
तयासारखे **सौख्य** प्राप्त झाले ।।''[१२]

या रचनेत शब्द बदलल्यामुळे नुसता अर्थच बदलत नाही तर त्या रचनेला समांतर रचना केल्यामुळे उत्तर दिल्याप्रमाणे ही रचना घडली आहे. मानवी जीवनाचा, जीवनातील सुख–सौख्याचा या जन्मी घेतलेल्या ज्ञानाशी संबंध खुबीने जोडून ज्ञानसंपादनेचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच तयास मानव म्हणावे का? (काव्यफुले पृ. २७) या कवितेत रोखठोक शैलीत प्रश्नदेखील विचारलेले दिसून येतात. म्हणजेच सावित्रीबाईंच्या साहित्यावर संतसाहित्याचा प्रभाव दिसून येतो असे म्हणण्यास हरकत नाही.

## २.४.२ लोकदैवते व ऐतिहासिक व्यक्तींचा प्रभाव :

सावित्रीबाईंच्या 'काव्यफुले' या काव्यसंग्रहात प्रारंभी शिवपार्वतीचे चित्र आहे. त्यांच्या या काव्यसंग्रहात शंकरावर 'शिव पार्थना' आणि 'शिवस्तोत्र' ('काव्यफुले', पृ. ४) ह्या दोन कविताही आहेत. शंकर हे प्राचीन भारतातील आद्यदैवत असल्याने तसेच अज्ञानास ज्ञान देणारा ज्ञानदाता असा स्वयंभू मानला गेल्याने त्याच्याविषयी भक्ती असणे, प्रभाव असणे शक्य आहे. कारण त्याला वर मागताना सावित्रीबाई म्हणतात,

''नमस्कार तुज शिवप्रभो । आदि निर्मिक स्वयंभुविगे ।।
अज्ञान नष्ट कारी, वर सर्वा लाभो । प्रार्थना ही सावित्रीची ।।''[१३]

शिवपार्वती या दैवताबरोबरच दैत्यकुळातील राजा बळीराजाविषयी 'बळीचे स्तोत्र' ('काव्यफुले', पृ. २३) ही बळीराजाच्या राज्याविषयी कविता आहे. दानशूर आणि प्रजेला सुखी ठेवणाऱ्या बळीराजाची महती सावित्रीबाईंनी गायिली आहे. कारण त्या म्हणतात, आपण त्याचे वंशज आहोत. बळीराजाप्रमाणेच छत्रपती शिवाजी राजांविषयी सावित्रीबाईना आदर होता. या सर्वांहून अधिक प्रभाव होता कोल्हापूरच्या राणी छत्रपती ताराबाईंचा. त्यामुळे तिच्या अचाट

साहसाचे पराक्रमाचे वर्णन करून सावित्रीबाई राणीला 'ताराबाई माझी मर्दीनी' ('काव्यफुले',पृ.१०) असे म्हणतात.

अशाप्रकारे त्यांच्या वाङ्मयनिर्मितीवर संत वाङ्मय, देवता, पौराणिक व ऐतिहासिक व्यक्तिंचाही प्रभाव दिसून येतो.

## २.४.३ ख्रिस्ती मिशनरी प्रभाव :

ख्रिस्ती मिशनरींनी प्रबोधनाच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका पार पाडली. इ.स. १८१५ च्या सुमारास मिशनरी ख्रिस्ती धर्माच्या प्रचारासाठी महाराष्ट्रात आले. स्थानिक समाजजीवनाचा सर्वांगीण अभ्यास केल्यावर त्यांनी कामाची दिशा निश्चित केली. प्रथम त्यांनी स्थानिक लोकांत मिसळून त्यांची सहानुभूती मिळविली. स्थानिकांची भाषा शिकून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यांच्या प्रथा, परंपरा, चालीरीती, लोकपरंपरांचा अभ्यास केल्यावर लोकांच्या नेमक्या गरजा ओळखल्या. कंपनी सरकारच्या शैक्षणिक धोरणाचा फायदा मूठभर उच्चवर्णियांना होत होता. मिशनरींच्या हे लक्षात आल्यावर त्यांनी आपले लक्ष समाजातील शूद्रातिशूद्र वर्गाच्या उद्धारासाठी केंद्रित केले.

त्याचबरोबर धर्मप्रसार हादेखील हेतू होता. मात्र धर्म हा विषय माणसाच्या जिव्हाळ्याचा असतो. मिशनरींना धर्मप्रसाराचे कार्य करताना स्थानिक लोकांकडून खूप त्रास झाला. ना.वि.जोशी म्हणतात, ''पुण्यातील मिचेल आदी उपदेशास बाहेर निघाले म्हणजे लोक त्यांचे फार हाल करीत, शिव्या देत, त्यांची टोपी उडवीत, हुर्यो हुर्यो करीत, त्यांच्या पाठीस लागत, कोणी थापड्या मारीत, तरी ते इतके सहनशील होते की, कोणाला चकार शब्दही न बोलता उलटे त्यास चांगल्या गोष्टी सांगत, त्यावर वाटेल इतकी दया करत, त्याचे बरे इच्छित, त्यांना आपल्या घरी बोलवीत त्यांस शास्त्रातील काही पुस्तके वाचनासाठी देत.''[१४] अशा प्रकारे प्रसंगी त्रास सहन करूनही मिशनरी आपल्या कर्तव्यापासून तसूभरही बाजूला झाले नाहीत. लोकांशी वागताना त्यांनी नेहमी अत्यंत सहनशीलता दाखविली. चांगल्या गोष्टींचे कौतुक करणे आणि सेवाभावी वृत्तीने काम करणे हा त्यांचा मोठा गुण होता. धर्माचा प्रसार करण्यासाठी ते मराठी शिकले आणि गाणी गात त्याचे महत्त्व लोकांच्या गळी उतरण्याचा प्रयत्न केला.

अर्थातच या सेवाभावी वृत्तीचा त्यांच्या धर्मप्रसारासाठी वापरायच्या पद्धतीचा एतद्देशीय सुधारकांपुढे जसा आदर्श होता तसाच सावित्रीबाईंवरही प्रभाव होता. कारण यांचाही निकट सहवास त्यांना लाभलेला होता. मिसेस मिचेल यांचे त्यांच्या घरी येणे जाणे होते. एवढेच नव्हे तर 'ज्योतिबांची भाषणे' त्यांच्याच आग्रहास्तव सावित्रीबाईंनी संपादित केली होती. या भाषणाच्या पुस्तकात, ''हे पुस्तक मिसेस मिचेल व रेव्ह. मिचेल यांच्या प्रोत्साहनामुळे सौभाग्यवती सावित्रीबाई फुले इने तयार करून पुणे येथे प्रसिद्ध केले.''[१५] असा स्पष्ट उल्लेख आहेत.अर्थातच मिशनरींची कार्यपद्धती, सेवाभावीवृत्ती आणि ख्रिस्ती धर्मविचार यांचा विचार केला तर त्यांचे कार्य प्रभावित होण्याजोगेच होते. त्यामुळे सावित्रीबाई ख्रिस्ती मिशनरींच्या कार्याने प्रभावित होत्या असे म्हणण्यास हरकत नाही.

## २.४.४ सत्यशोधक विचारांचा प्रभाव :

ख्रिस्ती मिशनरी हे दुसऱ्या देशातून येऊन येथील गरीब लोकांच्या उद्धारासाठी कार्य करतात. मग आपण का करू नये? अशा प्रकारचे आत्मचिंतन सुरू झाले. हिंदू धर्मापेक्षा ख्रिस्ती धर्मात दिसणारा साधेपणा, समता, सहिष्णुता, कर्मकांडाचा अभाव ह्या बाबींकडे नवशिक्षितांचे लक्ष तुलनेने अधिक वेधले जाऊ लागले. हिंदु धर्मातील जुनाट चालीरीती, रूढ आचार किती दोषग्रस्त आहे, याची नवशिक्षितांना जाणीव झाली. आपण आपली गौरवशाली परंपरा विसरलो आहोत, याची पुनःस्थापना करण्याचा विचार एका वर्गाकडून व्यक्त होऊ लागला. जुन्या–नव्या मूल्यांचा पुनर्विचार व फेरमांडणी होऊ लागली. पारंपरिक भारतीय मूल्यांशी नव्या पाश्चात्य मुल्यांची सांगड घातली जाऊ लागली. त्यातून विविध समाजप्रबोधक आणि समाजसुधारणाविषयक संस्थांची निर्मिती झाली.

हिंदू धर्मावर मिशनरींकडून चौफेर हल्ले होत होते. तरूण पिढीला जर परधर्मात जाण्यापासून किंवा नास्तिक मतापासून रोखायचे असेल तर हिंदू धर्माचे शुद्ध स्वरूप त्यांच्यापुढे ठेवणे आवश्यक होते. दादोबा तर्खडकर यांनी मुंबईत परमहंस सभेची स्थापना केली. त्यापूर्वी बंगालप्रांतात राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना केली होती. तसेच गुजरातमध्ये दुर्गाराम मंछाराम यांनी 'मानवधर्म सभेची' स्थापना केली होती. पण परमहंस सभेचा उद्देश हिंदू धर्माची सुधारणा हा असला तरी ह्या सुधारणा उघडपणे कृतीत उतरविण्याचे

धैर्य नसल्यामुळे या सभेला लवकरच गाशा गुंडाळावा लागला. पण परमहंस सभेच्या निष्ठावान सभासदांनी 'प्रार्थना समाजाची' स्थापना केली. जुन्या-नव्याचा मेळ असणाऱ्या ह्या सभेत न्या. महादेव गोविंद रानडे यांनी काम करायला सुरूवात केली. तरीही त्यांचे कार्य उच्चवर्णीय प्रतिष्ठितांपुरतेच मर्यादित राहिले. सर्वांना वेदाध्ययनाचा अधिकार मान्य करून जातिभेदात विरोध करणारी 'आर्य समाजाची' स्थापना स्वामी दयानंद सरस्वती यांनी केली.

या सर्व पार्श्वभूमीवर समकालीन सुधारक व त्यांच्या संस्थांकडून समाजपरिवर्तनाचे अपेक्षित कार्य होत नव्हते. त्यामुळे ज्योतिरावांना ध्येयसिद्धीसाठी वेगळ्या चळवळीची गरज वाटू लागली. यातूनच शूद्रातिशूद्र यांना सदुपदेश आणि अविद्येपासून मुक्त करण्यासाठी, त्यांची धार्मिक, सामाजिक तसेच आर्थिक गुलामगिरीतून मुक्तता करण्याच्या उद्देशाने सत्यशोधक समाजाची स्थापना ज्योतिराव फुले यांनी केली.

शूद्रातिशुद्र आणि स्त्रिया यांच्या उन्नतीसाठी अविद्येपासून मुक्ती हा एकमेव पर्याय ज्योतिरावांनी सुचविला होता. अर्थातच यासाठी शिक्षणाचे महत्त्व बहुजन समाजाला पटवून देण्यासाठी नाटक, निबंध, अखंड अशा विविधप्रकारचे लेखन आणि शेकडो भाषणांमधून जनजागृतीचे कार्य त्यांनी केले. विचारांना बोलण्याची, बोलण्याला लेखनाची, लेखनाला कृतीची आणि कृतीला मानवाच्या कल्याणाची ओढ होती. स्त्री-दास्याचा निषेध, बालविवाह, केशवपन, पुनर्विवाहबंदी या प्रथांना विरोध करून त्यांनी त्याविरूध्द चळवळ उभारली, विचारांना कृतीची समर्थपणे जोड देताना शिक्षणाचा प्रसार, धर्मातील कर्मकांडाना विरोध, अनाथालये, बालहत्या प्रतिबंधगृह स्थापना, दुष्काळातील अन्नछत्र इत्यादी अनेक समाजोपयोगी कार्ये केली. पण ही कार्ये सिद्धीस नेण्यासाठी ज्योतिरावांना भक्कमपणे पाठिंबा आणि अजोड सहकार्य मिळाले ते सावित्रीबाईंकडून किंबहूना त्यांच्या सक्रिय सहकार्याविना ही कार्ये सिद्धीस गेली नसती असे म्हटल्यास अतिशोयोक्ती होऊ नये.

स्त्री-शिक्षणाचे कार्य असो, बालहत्या प्रतिबंधगृह असो किंवा पुरोहिताविना विवाहाचा समारंभ असो, या प्रत्येक कार्यात सावित्रीबाईंचा सिंहाचा वाटा होता. या सर्व कार्यात एक कार्यकर्ती म्हणून नव्हे तर सजग, समर्थ सहकारी म्हणूनही त्यांनी अत्यंत महत्वाची भूमिका बजावली. ज्योतिरावांच्या मृत्यूनंतर सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा खांदयावर घेऊन स्वतःला या कार्यात तना-मनाने झोकून दिले. सासवड येथे झालेल्या

सत्यशोधक सभेचे अध्यक्षस्थान भुषविले. आपल्या प्रभावी भाषणातून सत्यशोधकांचे कार्य पुढे चालू राहील असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये निर्माण केला.

यावरून सत्यशोधक समाजाचा सावित्रीबाईंच्या वाङ्मयावर प्रभाव होता हे दिसून येते. कारण बहुजन समाजाचे कल्याण, शिक्षणाचा प्रसार, प्रचार आणि समाजप्रबोधन हे त्यांच्या लेखनात चिंतनाचे विषय बनले.

## समारोप :

सावित्रीबाई यांच्या लेखनाची मुख्य आणि आद्यप्रेरणा महात्मा ज्योतिराव फुले ही होती. शूद्रातिशूद्र समाज आणि स्त्रिया यांची दांभिक धर्मशोषणातून मुक्तता करण्यासाठी सावित्रीबाईंनी लेखनातून सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक प्रबोधन केले. त्यामुळे त्यांचे लेखन रोखठोक आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे बनले. अनुभवातील आत्माविष्कार ही त्यांची महत्वाची लेखनप्रेरणा होती.

त्यांच्या लेखनात विषयांचे वैविध्य दिसून येते. त्यांच्या लेखनाच्या शैलीवर त्यांचे व्यक्तिमत्त्व जीवनमूल्ये, तत्कालीन परिस्थिती, प्रदेश, वाचक, श्रोते यांच्या वाङ्मयीन जाणिवा या घटकांचा प्रभाव पडलेला दिसतो. प्रत्येक लेखक किंवा कवी यांच्या वाङ्मयनिर्मितीवर जसा पूर्वसूरींचा प्रभाव दिसून येतो, तसाच त्यांच्या वाङ्मयावर संत वाङ्मय, पौराणिक ग्रंथ व ऐतिहासिक व्यक्ती यांचा प्रभाव दिसून येतो. शोषित घटकांची सर्वार्थाने मुक्तता करण्यासाठी म्हणजेच समता प्रस्थापित करण्याच्या जाणीवेपोटी सत्यशोधक विचारांच्या प्रभावाने त्यांचे लेखन घडले. त्यांचे लेखन प्रसिद्धी, पैसा, अशुभनिवारण यांतून झाले नाही. तर अनुभवाच्या आत्माविष्कारातून झाले माणसाला माणूस म्हणून जगावयाला शिकविणे, स्वातंत्र्य, समता, बंधुता या उच्च मानवतावादी प्रेरणेतून सावित्रीबाईंचे लेखन झाले.

## संदर्भ सूचीः


१) माळी. (डॉ.) मा. गो. (संपा.), ''सावित्रीबाई फुले : समग्र वाङ्मय'', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, च.आ. ऑक्टो. २००६, पृ. ७४.

२) तत्रैव, पृ. ६.

३) तत्रैव, पृ. ९

४) स्वामी शिवतत्वानंद, स्वामी व्योमस्वरूपानंद (संपा.) ''स्वामी विवेकानंद ग्रंथावलीः ग्रंथ पहिला'', धंतोली, नागपूर, द्वि.आ. १९७२, पृ. २९७.

५) बेणारे गोपाळराव गोविंद (संपा.), ''सार्थ श्री तुकाराम गाथा'' शारदा साहित्य, पुणे, प. आ. १९९५, पृ. २०.

६) तत्रैव, पृ. १२८.

७) पाटणकर महेश ''शोध कवितेचा'', पुणे, प्र. आ. २०१२, पृ. १६.

८) उनि., माळी मा.गो (संपा.), पृ. १८.

९) तत्रैव, पृ. १९.

१०) तत्रैव, पृ. ७.

११) नांदुरकर मो.द. (संपा), ''श्री मनाचे श्लोक आणि करूणाष्टके'', अनमोल प्रकाशन, पुणे, प.आ. २००५, पृ.६.

१२) उनि., माळी मा.गो. (संपा.), पृ.७.

१३) तत्रैव, पृ. ४.

१४) महाजन शां.ग., ''पुणे शहराचे वर्णन'', (मूळ लेखक जोशी ना.वि.), मानसन्मान प्रकाशन, पुणे, प.आ. एप्रिल २००२, पृ. ८९-९०.

१५) उनि, माळी मा.गो. (संपा.), पृ. ३५.


* * *

## प्रकरण तिसरे

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे वाङ्मयीन कार्य

प्रस्तावना

३.१ सावित्रीबाई फुलेंचे साहित्य

३.२ सावित्रीबाई फुलेकालीन काव्यनिर्मिती पार्श्वभूमी

३.३ सावित्रीबाईंच्या काव्याचे स्वरूप

३.४ ''काव्यफुले''

- ३.४.१ प्रार्थनापर कविता आणि स्तोत्रे
- ३.४.२ काव्यविषयक कविता
- ३.४.३ निसर्गचिंतनपर कविता
- ३.४.४ बोधपर कविता
- ३.४.५ आत्मपर कविता
- ३.४.६ सामाजिक कविता
- ३.४.७ इतिहासविषयक कविता
- ३.४.८ स्फुट कविता

३.५ ''बावन्नकशी सुबोध रत्नाकर''

- ३.५.१ उपोद्घात
- ३.५.२ सिद्धता
- ३.५.३ पेशवाई
- ३.५.४ आंग्लाई
- ३.५.५ ज्योतिबा
- ३.५.६ उपसंहार

३.६ सावित्रीबाईंची भाषणे

- ३.६.१ उद्योग
- ३.६.२ विद्यादान

३.६.३ सदाचरण

३.६.४ व्यसने

३.६.५ कर्ज

३.७ सावित्रीबाईंची पत्रे

३.८ ज्योतिबांची भाषणे

३.९ शिवमहिमास्तोत्र

३.१० सावित्रीबाईंच्या काव्यातील प्रतिमा, प्रतिके, अलंकार व भाषाशैली

३.१०.१ काव्यलेखनातील प्रतिमा

३.१०.२ काव्यलेखनातील प्रतिके

३.१०.३ काव्यलेखनातील अलंकार

३.१०.४ काव्यलेखनाची भाषाशैली

३.११ सावित्रीबाईंच्या काव्याविषयी भूमिका, आक्षेप

३.११.१ सावित्रीबाईंच्या काव्याविषयी घेतलेल्या भूमिका

३.११.२ सावित्रीबाईंच्या व्यक्तित्व व वाङ्मयावर घेतलेले आक्षेप

समारोप

## प्रकरण तिसरे

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे वाङ्मयीन कार्य

प्रस्तावना :

स्त्री समाजसुधारकांमध्ये सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक आणि वाङ्मयीन कार्य महत्त्वपूर्ण आहे. समाजसेविका म्हणून त्यांचे कार्य मर्यादित राहिलेले नसून त्यांनी वाङ्मयामध्येही स्वतःचा असा वेगळा ठसा उमटविला आहे. कृतिशील आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेल्या सावित्रीबाईंनी शैक्षणिक क्षेत्रात आत्मविश्वासपूर्ण पाऊल टाकले, सामाजिक क्षेत्रात, नवीन पायवाट तयार केली तर वाङ्मयीन क्षेत्रातही उल्लेखनिय कामगिरी केली आहे. तत्कालिन समाजव्यवस्थेत स्त्रीला कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. एकोणिसाव्या शतकात पुण्यात सनातनी प्रवृत्तींचा जोर असताना नुसते स्वतः शिकायचे आणि मुलींना शिकवायचे हे मोठे धाडसाचेच काम होते. कारण या सनातन्यांकडून आलेले शेणगोळे सावित्रीबाईंच्या कार्याला असणारा तीव्र विरोध दाहकतेने व्यक्त करतात. शिक्षणाने विचारात आलेली आधुनिकता नीर–क्षीरविवेकबुद्धी आणि आजूबाजूला दिसणारी समाजस्थिती यातून त्यांची वैचारिक जडणघडण होत होती. समजून–उमजूनच आपल्या पतिकार्यात सहभागी होणारी, स्वतंत्र्य विचार करण्याची धडपड करणारी आणि आपल्या प्रतिभेला प्रगट करणाऱ्या कवितेची निर्मिती सावित्रीबाई करतात. त्यातूनच त्यांनी 'काव्यफुले' (इ.स.१८५४) आणि 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' (इ.स.१८९१) ह्या दोन काव्यसंग्रहांचे लेखन केले. या कवितांमध्ये सामाजिक आशय, निसर्गविषयक प्रेम आणि ज्योतिरावांविषयी भक्तिभावही आहे. पण याचबरोबर आधुनिक कवियित्रींमध्ये सावित्रीबाईंनाच अग्रस्थान द्यावे लागेल. किंबहुना आधुनिक कवयित्रींचा काळ सावित्रीबाईंपासूनच विचारात घ्यावा लागतो. सावित्रीबाईंच्या काव्यसंपदेविषयी, त्यांनी ज्या काळात कविता केली तो काळ लक्षात घेऊन एक ऐतिहासिक सत्य सांगताना मा.गो. माळी म्हणतात, ''उपेक्षितांच्या जागरणांचा व समाजसुधारणेचा विषय समाविष्ट असलेली काव्यरचना या कालात केल्याचे उदाहरण महाराष्ट्र सारस्वतात सापडत नाही. त्या काळात समकालीन अशी एकही कवयित्री झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सावित्रीबाईंची काव्यरचना म्हणजे सामाजिक आणि साहित्य क्षेत्रातील क्रांतीच होय, हे मान्य करावे लागेल''[१]. धाडसी, कर्तृत्ववान,

तळमळीने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्या, कृतीशील संवेदनशील कवयित्री म्हणून सावित्रीबाईंचा उल्लेख करता येतो. सावित्रीबाईंबरोबर महात्मा ज्योतिराव फुले यांची एक मोठी प्रेरणा म्हणून ठसा आहेच. पण ज्याप्रमाणे ज्योतिरावांना वगळून सावित्रीबाईंचा विचार करता येत नाही. त्याप्रमाणे सावित्रीबाईंना वगळून फक्त ज्योतिरावांचा कार्यालेख पूर्णत्वास जात नाही. ज्योतिराव या लोकोत्तर व्यक्तिचं महात्म्यपण आणि सावित्रीबाईंचं असाधारण अलौकिकत्व यांचा सृजन संगम त्यांच्या दांपत्यजीवनात दिसतो.

## ३.१ सावित्रीबाईं फुलेंचे साहित्यः

सावित्रीबाईंचे काव्य हे त्या जे जीवन जगल्या, जे जीवन त्यांनी अनुभवले त्या जगण्यातून, अनुभवविश्वातून साकार झालेले आहे. अर्थातच त्यांच्या काव्यात सामाजिक, बोधपर, निसर्ग व आत्मपर कविता आहेत. सावित्रीबाईंच्या समकालिनांनी जी कविता केली, त्याहून ही कविता वेगळी आहे. हे वेगळेपण काय आहे, यासाठी त्या काळाचा थोडा आढावा घ्यावा लागेल. सावित्रीबाईंचा पहिला 'काव्यसंग्रह' काव्यफुले सन १८५४ मध्ये प्रकाशित झाला. मशिनरी छापखान्यात याची छपाई झाल्याचे नमूद आहे. या संग्रहालयातील बारा कवितांचे सावित्रीबाईंनी मोडी लिपीत केलेले कच्चे टाचण उपलब्ध झालेले आहे.

सावित्रीबाईंचे दुसरे काव्यपुस्तक 'सावित्री ज्योतिबा विरचित अथ बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या नावाचे आहे. महात्मा फुल्यांचे अधिकृत असे हे पहिलेच काव्यमय चरित्र होय. याचीही मराठी हस्तलिखित मूळ प्रत उपलब्ध झाली आहे. सावित्रीबाईंचा हा दुसरा काव्यसंग्रह महात्मा ज्योतीराव फुले यांच्या मृत्यूनंतर म्हणजेच इ.स. १८९१ साली प्रसिद्ध झालेला आहे. म्हणजेच स्थूलमानाने इ.स. १८५० ते १८९५ हा त्यांच्या काव्यलेखनाचा काळ म्हणता येईल.

### सावित्रीबाईंचे उपलब्ध साहित्य पुढीलप्रमाणे आहे :

१) ''काव्यफुले'' कवितासंग्रह इ.स. १८५४ (महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई)

२) ''ज्योतिबांची भाषणे'', संपादन– सावित्रीबाई फुले, २५ डिसेंबर १८५६ (महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई)

३) सावित्रीबाईंची ज्योतीबांस पत्रे (इ.स. १८५६, इ.स.१८६८, इ.स. १८७७) (महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई)

४) ''मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे'' इ.स. १८९२ (महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई)

५) ''बावन्नकशी सुबोध रत्नाकर'' इ.स. १८९२ (महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई)

उपरोक्त सर्व वाङ्मय 'सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय' या ग्रंथात एकत्रित करण्यात आलेले आहे. संपादन मा. गो. माळी यांनी केले आहे.

'काव्यफुले' हा काव्यसंग्रह इ.स १८५४ साली प्रकाशित झालेला असून त्यात एकूण एक्केचाळीस कविता आहेत. यामध्ये प्रार्थनापर, काव्यविषयक, निसर्गवर्णनपर, आत्मपर, समाजचिंतनपर. बोधपर आणि ऐतिहासिक अशा विविधप्रकारच्या कविता आहेत.

ज्योतिबांची भाषणे हे पुस्तक सावित्रीबाईंनी संपादित केलेले असून त्याचे शब्दांकन चार्लस जोशी यांनी केलेले आहे. हे पुस्तक २५ डिसेंबर १८५६ रोजी प्रसिद्ध करण्यात आले असून त्यात ज्योतिरावांची चार भाषणे आहेत.

सावित्रीबाईनी ज्योतिरावांना लिहिलेली तीन पत्रे असून ती नायगाव व ओतूरहून लिहिलेली आहेत.

'मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे' या पुस्तकात उद्योग, विद्यादान, सदाचरण, व्यसने, कर्ज या विषयांवरील त्यांची भाषणे शास्त्री नारो बाबाजी महाघट पानसरे पाटील यांनी संपादित करून १८९२ साली वत्सल प्रेम, बडोदा येथून प्रकाशित केलेली आहेत.

'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या कवितासंग्रहात देशाचा इतिहास काव्यरूपाने सांगितला असून ज्योतिरावांच्या कार्याचेही चित्रण त्यात केले आहे. यात बावन्न कडवी असून हे काव्य ज्योतिरावांच्या मृत्यूनंतर १८९१ साली रचले असून पुस्तकरूपाने ते १८९२ साली प्रकाशित झाले.

## ३.२ सावित्रीबाई फुलेकालीन काव्यनिर्मिती पार्श्वभूमी :

इंग्रजी राजवट येऊन तीस वर्षे उलटली होती. शाहिरी परंपरा जुन्या मराठी राजवटीच्या अंताबरोबर अस्ताला गेली होती. त्या सुमारास भक्तिपरंपरेतील काव्यरचनाही चालू होती. पण तिचा प्रवाहही क्षीण झालेला होता. तर्खडकर, पाठारे, पाळंदे, किर्तीकर हे पदनिर्मिती करणारे महत्त्वाचे कवी त्या काळात होऊन गेले. प्रारंभीचा काळ हा संक्रमणकाळ होता. या काळात जे वैचारिक भक्तिग्रंथ निर्माण झाले, ते कालौघात विस्मृत झाले. इंग्रजी राज्य दृढमूल झाल्यावर त्याचा परिणाम फक्त राजकरणापुरताच मर्यादित राहिला नाही, तो धर्म, समाज, व्यापार, शिक्षण या साऱ्यांना व्यापून राहिला. नवीन बौद्धिक जागृती निर्माण झाली. देशात सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक फेरबदल घडून आले आणि या प्रचंड उलथापालथीत पुढील पन्नास पंच्याहत्तर वर्षाच्या काळात मराठी काव्याचा घाट बदलत गेला, इतका की काव्याला प्राचीन आणि अर्वाचीन अशी भिन्नतादर्शक दोन विशेषणे प्राप्त झाली.

सरकारी प्रेरणेने आणि पारितोषिकांच्या प्रलोभनाने प्रारंभीच्या काळात वाङ्मयनिर्मिती झाली. कवींनी काव्यरचना करायची पण ती 'दक्षिणा प्रैज कमिटीने' विषय सुचविल्यावरून आणि सुचविलेल्या विषयावर लिहावे असे बंधन असे. हे कवी पद्यासाठी संस्कृत ग्रंथ आणि गद्यासाठी इंग्रजी ग्रंथ निवडत. कारण मराठी पद्याला प्राचीन परंपरा एकदम बदलता येणे शक्य नव्हते. कारण वाचकांनाही ती रूजली नसती. प्राचीन काळाप्रमाणे रामायण, महाभारत किंवा भागवत यातील कथांवर काव्यरचना न होता, आता संस्कृत कवींच्या ललितवाङ्मयाची ओळख मराठी रसिकांना झाली. तत्कालीन शिक्षणात नीतिशिक्षणाला महत्त्व असल्याने या कवींनी नीतिशिक्षणावर आणि शिक्षक कवींनी शालोपयोगी कविता लिहिली होती. रा.श्री.जोग म्हणतात, ''या युगात निर्माण झालेली बोधकविता सत्य व शिव आहे. मात्र तिचा आविष्कार सुंदर नाही. कारण तत्कालीन कवींना सौंदर्यान्वेषक नवीन दृष्टी नव्हती. शिवाय आपण शिक्षक आहोत व मुलांना प्रत्येक गोष्ट शिक्षकाच्या भूमिकेवरून शिकविणे हा आपला जन्मसिद्ध अधिकार आहे, ही सुंदर काव्याविष्काराच्या आड येणारी चुकीची जाणीव त्यांना फार मोठया प्रमाणात होती''[२]. म्हणूनच जरी या कविता विद्यार्थ्यांना उपयोगी असल्या तरी त्यात स्वयंप्रज्ञा आणि प्रतिभेचा अभाव जाणवत असे. कारण सर्व वाङ्मय अनुवादित, भाषांतरित किंवा रूपांतरीत होते.

इंग्रजी राज्याची सुरूवात झाल्यानंतर सुमारे पन्नास वर्षांनी नवशिक्षित कवींनी इंग्रजी कवितासंग्रहातील छोटया–छोटया कवितांवर मराठी साज चढवायला सुरूवात केली. त्यापूर्वी अशी रचना मराठीत नव्हती. अध्यात्म, वेदांत, पुराणकथा हेच विषय मराठी काव्यातून येत असत. परंतु ही भाषांतरे सांगण्यावरून निर्माण झाल्याने त्यात स्वयंस्फूर्तीचा अभाव असे. 'दैवसेनी' हे इंग्रजी वळणाचे पहिले खंडकाव्य बजाबा रामचंद्र प्रधान यांनी सन १८६७ मध्ये रचले. म्हणजेच एकंदरीत, नवशिक्षितांनी इंग्रजी वळणाची खंडकाव्य, ऐतिहासिक काव्ये लिहिली. तसेच नवशिक्षित कवींनी इंग्रजी कवितांची भाषांतरे किंवा अनुकरणे करून कवितेत विविधता वेगळेपणा आणला.

पंडित कवींनी संस्कृत काव्यातील कल्पनाशक्तीच्या बळावर चमत्कृतिजनक शब्दालंकारांनी कवितेला रमणीयता आणली. याशिवाय समाजसेवकाची भूमिका घेत लोककवींनी आपल्या देशातील देशबांधवांचे दुःख, दैन्य, गुलामी, दारिद्र्य पाहून वेदना होत होत्या आणि त्या वेदनेचा, व्याकुळतेचा लोकाभिमूख वाङ्मय हा शाब्दिक आविष्कार होता.

## ३.३ सावित्रीबाईंच्या काव्याचे स्वरूप :

या सर्व पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुलेंच्या कविता भिन्न आविष्कार प्रगट करणाऱ्या होत्या. यावेळची समाजस्थिती पाहिली की, प्रबोधनकाळ, रूढीप्रिय समाजव्यवस्था या सर्वच रेट्यात गुलामगिरीत जीवन जगत असलेला शोषित, वंचित, उपेक्षित शूद्रातिशूद्र समाज आणि स्त्रिया यांच्या स्वातंत्र्यासाठी फुले दांपत्याने केलेले कार्य महत्त्वाचे आहे. हे कार्य करीत असताना वर्षानुवर्षे मुक आणि निद्रिस्त असलेल्या समाजाला जागे करणे हे सोपे काम नव्हते, धर्ममार्तंडाच्या विरोधात जाऊन काय सत्य नि काय असत्य, हे सप्रमाण सिद्ध करताना प्रसंगी स्वकियांना प्रखर विरोध आणि रूढीप्रिय उच्चवर्णीयांचाही रोष या दोन्ही संघर्षाला त्यांना सामोरे जावे लागले. जीवन संघर्ष आणि काव्य यांचे वर्णन करताना कृ.पं.देशपांडे म्हणतात, ''सावित्रीबाईंनी प्रखर विरोधाला धैर्याने तोंड देत, आयुष्यभर शैक्षणिक, सामाजिक कार्य केले. विरोधाच्या या प्रखर अग्नीत होरपळत असतानाही त्यांनी काव्याचा कोवळा कोंभ जपून ठेवला.''[3] म्हणूनच काळाच्या दृष्टीने क्रांतिकारक आणि जुन्या रूढींना बाजूला सारा हे विचारही

दाहक असल्याने सावित्रीबाई फुले यांच्या काव्याचे स्वरूप विशद करणारा आणि समीक्षा करणारा अशा लघुग्रंथाचे नाव डॉ. कृ. प. देशपांडे यांनी 'अग्निफुले' से अन्वर्थक नाव दिले.

मानवमुक्तीचा विचार करून त्यांच्यासाठी एका चांगल्या जीवनपद्धतीचा मार्ग दाखविणारे आणि बोलण्याप्रमाणे कृती करणाऱ्या दांपत्याच्या हातून नवीन युगप्रवर्तक विचारांची मांडणी झाली. सावित्रीबाई फुले यांनी वाङ्मयनिर्मिती केली. त्यातून त्यांच्या काव्याचा बावन्नकशीपणा सिद्ध केला आहे. त्यांच्या साहित्यात जे चांगले आहे, जे समाजोपयोगी आहे ते टिकून राहणारे आहे. अर्थातच जे निखे आणि विशुद्ध आहे ते टिकून राहते.

सावित्रीबाईंनी केलेली काव्यनिर्मिती ही मर्यादित असली तरी वाङ्मयीन दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. त्यांचे स्वतंत्र काव्य 'काव्यफुले' आणि 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या दोन काव्यसंग्रहांमध्ये संग्रहीत आहे. १८५० सालापासून त्यांना कविता सुचण्यास प्रारंभ झाला असावा. अत्यंत बिकट परिस्थितीत, म्हणजे त्यावेळच्या रूढी परंपरांना तोडण्याची, स्त्रीने शिकणे आणि पुन्हा स्त्रियांना शिकविणे या घोर मानलेल्या अपराधासाठी आणि आपल्या घरातील लोकांना बहिष्कृत करू नये म्हणून वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षी गृहत्याग करावा लागला. पतीच्या कार्यात सहजपणे तन–मनाने सहभागी होताना, संवेदनशील मन ह्या घडामोडी टिपत होते. 'काव्यफुले' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला, त्यावेळी सावित्रीबाई अवघ्या तेवीस वर्षाच्या होत्या. त्यांच्या काव्याबद्दल सुनिता बिडवे म्हणतात, ''१८५० सालापासून त्यांनी कविता सृजनास प्रारंभ केला असावा. अशा या कोवळ्या वयात अतिशय बिकट प्रसंगी ज्योतिरावांबरोबर त्या गृहत्याग करतात. उस्मान शेख यांच्याकडे राहून पतीच्या सर्व कार्यात सहभागी होतात आणि संसाराची घडी विस्कटली असतानाही ही कन्या काव्यसृजनात उजवी ठरते. ज्योतिरावांचा काव्यसंसार उमलण्यापूर्वी सावित्रीबाईंचा काव्यसंसार पूर्णपणे फुलला होता. तळागाळाच्या समाजातून पुढे येऊन, शिक्षण घेऊन त्यांनी आपली काव्यरचना लिहून ठेवली. एवढेच नव्हे तर इ.स.१८५४ मध्ये त्यांच्या काव्यसंग्रहाला प्रकाशित होण्याचा मान लाभला, हे काळाच्या दृष्टीने खचितच महत्त्वाचे आहे. सावित्रीबाईंना समकालिनांमध्ये कोणी कवयित्री असल्याचे दिसत नाही. निदान आज तरी त्यांचे काव्य उपलब्ध नाही. त्या दृष्टीने त्यांच्या काव्याचे महत्त्व निश्चितच आहे.''[४] सावित्रीबाई यांच्या समकालीन स्त्री कवयित्रींमध्ये कोणीही

काव्यलेखन केलेले आढळत नाही. म्हणूनच आधुनिक कवयित्रींमध्ये प्रथम काव्य लिहिण्याचा मान सावित्रीबाईंना जातो.

प्रथम प्रकाशित झालेल्या काव्यसंग्रहामध्ये सावित्रीबाईंनी ज्या कविता लिहिल्या आहेत त्या संस्कृत किंवा इंग्रजीचे भाषांतर नव्हे तर त्यामध्ये प्रामुख्याने शिक्षण,आत्मपर, निसर्गवर्णनपर, सामाजिक आणि बोधपर अशा वेगवेगळया विषयांवर कविता आहेत. काव्याचे वर्गीकरण अगदी काटेकोरपणे करता येत नाही कारण त्यांच्या काही निसर्गकाव्यात सामाजिक विचार तर काही कवितांमधून बोध डोकावतो, सावित्रीबाईंच्या 'काव्यफुले' या संग्रहातील कविता आणि इतर कविता अशा मिळून बेचाळीस कविता उपलब्ध झालेल्या आहेत. शिळा प्रेसवर हा काव्यसंग्रह छापलेला असून मुखपृष्ठावर शंकरपार्वतीचे चित्र आहे. शंकर हे भारतातील आद्यदैवत. हे आद्यदैवत अनार्यांचे आहे. म्हणूनच अनार्यांचे दैवत म्हणूनही सावित्रीबाईंना या दैवताविषयी आदर वाटणे शक्य आहे. 'काव्यफुले' मध्ये मनोरंजक उपदेश आहे, नीतीशिक्षण आहे, विविध भावदर्शन आहे. इ.स.१८९१ साली सावित्रीबाईंचा दुसरा काव्यसंग्रह प्रसिध्द झाला. परंतु यात विविध कविता नसून, बावन्न कडव्यांचे ते एक दीर्घकाव्य आहे. या पोथीच्या हस्तलिखित कॉप्या निरनिराळया संशोधकांनी लिहून ठेवल्याचे आढळते. या काव्याची एक हस्तलिखित पोथी डॉ.मा.गो.माळी यांच्याकडे आहे. सावित्रीबाईंनी आपल्या पतीचे चरित्र काव्यरूपात गुंफले आहे. ''सावित्री ज्योतिबा विरचित अथ बावन्नकशी सुबोध रत्नाकर'' असे या काव्यग्रंथाचे नाव आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांचे हे पहिलेच काव्यमय चरित्र होय. हे काव्यचरित्र लिहून घेण्याचे प्रयोजन सांगताना कृ.पं.देशपांडे म्हणतात, ''ही पोथी काही सत्यशोधकांनी लिहून ठेवण्याचे कारण ही पोथी ज्योतिरावांच्या मृत्यूनंतर सुमारे एक वर्षाच्या कालावधीत लिहिली गेली होती. त्या वेळी बहुजन समाजात त्यांची लोकप्रियता विशेष होती. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कार्याची धुरा सांभाळणाऱ्या त्यांच्या पत्नीने हे काव्य लिहिलेले होते. शिवाय इतिहासाच्या पार्श्वभूमीवर ज्योतिरावांचे कार्य आणि ज्योतिगौरव हा काव्याचा मुख्य भाग होता. हे सर्व लक्षात घेतल्यावर ही पोथी काही सत्यशोधकांना वंदनीय वाटणे, महत्त्वाची वाटणे यात नवल काहीही नव्हते. त्या भक्तीपोटी, श्रद्धेपोटी काही सत्यशोधकांनी तिच्या नकला करून घेतल्या असतील, यात शंका घेण्याचे काही कारण दिसत नाही.''[५] या काव्यसंग्रहात सावित्रीबाईंची पतीविषयी आदराची भावना, आर्यांचे आगमन, स्त्रियांची शूद्रांची स्थिती, पेशवाई,

आंग्लाई, शिक्षणाचे महत्त्व, त्यांना स्वतःला स्वधर्मीयांकडून झालेला त्रास, बालहत्या प्रतिबंधगृहाचे कार्य आणि ज्योतिरावांचा गौरव असे भावरम्य काव्य गुंफले आहे. एकंदरीत सावित्रीबाईंच्या काव्यनिर्मितीचा काल हा १८५० च्या आसपासचा आहे. त्यांच्या काव्यरचनेचा प्रारंभकाळ आणि पहिला काव्यसंग्रह प्रकाशित होण्याचा काळ हा केशवसुतांच्या पूर्वी तीस वर्षे येतो आणि या दृष्टीने त्यांच्या काव्याला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त होते. याबद्दल कृ.पं.देशपांडे म्हणतात, ''त्यांच्या काव्यरचनेचा काळ हा केशवसुतांच्यापेक्षा तीस वर्षे आधी आहे, म्हणूनच केवळ त्यांची कविता महत्त्वाची आहे, असे नाही तर केशवसुतांनी जे विषय आपल्या काव्यासाठी वापरले, ज्याप्रकारची आत्मपर कविता लिहिली, निसर्गवर्णनपर कविता लिहिली, सामाजिक जाण दाखविली, काव्यविषयक विचार मांडले आणि स्वातंत्र्याची प्रीती व्यक्त केली त्याच धर्तीवर सावित्रीबाईंच्याही काही कविता आहेत. त्यांची संख्या कमी असेल, परंतु ज्या काळात त्यांनी ही काव्यरचना केली त्याकडे पाहिले असता या कवितांचे महत्त्व अधिकच नजरेत भरते.''[६]

सावित्रीबाईंचा पहिला काव्यसंग्रह १८५४ मध्ये प्रकाशित झाला म्हणजे त्याअगोदर किमान पाच वर्षांपासून त्या कविता करीत असल्या पाहिजेत. त्याच वर्षी (१८५४) ज्योतीरावांचे ब्राह्मणी देव-धर्माचे दंभस्फोट करणारे 'तृतीय रत्न' हे नाटकही प्रसिद्ध झाले. फुले दांपत्याच्या साहित्याचा कालावधी व काव्याबद्दल राजाराम सुर्यवंशी म्हणतात, ''ज्यांना आधुनिक कवितेचे जनक म्हणतात ते केशवसुत यांचा जन्म १८६६ सालचा. याचा अर्थ ज्या काळी सावित्रीबाईंचा काव्यसंग्रह प्रकाशित होऊन आधुनिक मराठी भाषेला समृद्ध करून गेला, त्यावेळी या शब्दप्रभूचा जन्मही झाला नव्हता. ज्या काळात मराठी बाल्यावस्थेत होती, त्याच काळात सावित्रीबाईंच्या कविता, ज्योतिबांचे अखंड, सत्यशोधकांची शाहिरी गीते व पोवाडे हे सर्व साहित्य मराठी समृध्द करीत होते, तर केशवसुतांसारखे तथाकथित आधुनिक कवितांचे जनक इंग्रजी भाषा व कल्पनाविलास यात अडकलेले होते.''[७] भाषेद्वारा मानवी जाणिवा व भावना व्यक्त होत असतात. त्या शतकात ज्यांचे विचार आणि ज्यांचा आचार यात एकवाक्यता आहे किंवा सुसंगती आहे असे कवी फारच थोडे होते. त्यापैकीच एक सावित्रीबाई होत्या. सावित्रीबाईंची कविता प्रयोजनवती आहे. तिने वैचारिक प्रबोधन करण्याचे कार्य केले आहे. त्याचबरोबर ही कविता लोकहितार्थ जन्मलेली आहे. केशवसुतांनी इ.स. १८८५ पासून

पुढे काव्यनिर्मिती केली. हा काळ जनजागृतीचा काळ मानला जातो. या काळात हिंदुस्थानात जे विचारप्रवाह होते त्यांनी विसाव्या शतकावर कायम प्रभाव टाकलेला दिसतो. या कालखंडात समाजात स्त्री शिक्षण, बालविवाह, केशवपन, देशाचे स्वातंत्र्य असे विविध प्रश्न अस्तित्वात होते. समाज सुधारकांच्या बाबतचा विचारही ब्राह्मणी आणि अब्राह्मणी होता. सुधारक–परंपरानिष्ठ, राजकीय की सामाजिक सुधारणा अशा विचारसरणीचे परस्परविरोधी गट कार्य करीत होते. या वेळी वाङ्मयव्यवहारात जी घडामोड सुरू होती ती 'भाषांतरयुग' म्हणून ओळखली जाते. मराठीत संस्कृत किंवा इंग्रजी साहित्यातील भाषांतरे निर्माण होत होती. केशवसुतांच्या कवितेचे अभ्यासक भ.श्री.पंडित यांनी 'समग्र केशवसुत' या ग्रंथात याचा उल्लेख केला आहे. भ.श्री.पंडित म्हणतात, ''केशवसुतांच्या काव्यलेखनाचा प्रारंभही भाषांतराच्या पांगुळगाड्याने झाला आहे. त्या काळातील सर्व उच्चवर्णीय विद्वानांप्रमाणे केशवसुतही इंग्रजीतून विचार करीत आणि मराठीतून लिहीण्याचा प्रयत्न करीत, त्यामुळे त्यांची अभिव्यक्ती सरळ व सुलभ नाही.''[८] म्हणजेच निरीक्षणाअंती सावित्रीबाईंचे साहित्य मराठीपण जपणारे, मराठी संस्कृतीशी नाळ जोडणारे आणि तरीही त्या काळात बंडखोर, ठामपणे ध्येयनिष्ठ पायावर क्रांती करणारे होते. मराठी साहित्याला, समाजाला संस्कृताचा बोजडपणा आणि इंग्रजी भाषांतराची आधारकाठी मोडून पूर्णपणे स्वदेशी व स्वभाषेत विचार करून काव्यात मांडणे ही बाबच खूप नवलाईची, आधुनिक होती. आजपर्यंत निर्माण होणारे साहित्य बहुतांशी उच्चवर्णीयांकडून होणारे असल्याने त्यांचे अनुभवविश्व एका ठराविक चाकोरीत बांधल्यासारखे झाले होते.

आपल्या आसपास असणाऱ्या दोन हात, दोन पाय आणि मानवसदृश पशुवत जीवन जगणाऱ्या आपल्या बंधुभगिनींच्या अपार दुःखाची व कारणांची अनभिज्ञता किंवा उदासिनता यामुळे मानवतेलाच नव्हे तर पशु–पक्ष्यांना मिळणाऱ्या सहानुभूती आणि चिमुटभर माणुसकीलाही बहुजनसमाज पारखा झाला होता. अशा वेळी विश्वव्यापक मानवतेच्या दृष्टीने, आईच्या वात्सल्याने, आंतरिक तळमळीने सावित्रीबाईंनी काव्यरचना केली. त्यांच्या काव्यात नव्या पहाटप्रभेचे सूर आहेत. फुलांची कोमलता, नवथर ताजेपणा आणि विचाराला आचाराची जोड असल्याने आरपार पारदर्शकता, रोखठोकपणाही आहे. या साधेपणात, सच्चाईतच आणि नवनिर्मितीतच त्यांच्या काव्याचे सौंदर्य सामावले आहे.

त्यांच्या साहित्यनिर्मितीची वैशिष्टय सांगताना डॉ. सुभाष सावरकर म्हणतात, ''सावित्रीबाईंच्या साहित्यनिर्मितीचा अर्थात 'काव्यफुले' आणि 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या दोहोंचा एकत्रित विचार केल्यास त्यांच्या काव्यकळेसंबंधात काही ठळक वैशिष्ट्ये हाती लागतात. जनकल्याणाच्या तीव्र भावनेने थरारणारे आशयबीज, भारतीय सामूहिक नेणीवेच्या अनुरोघाने होत गेलेले त्या बीजाचे सहज विकसन आणि या विकसनाला उठाव देणारी जनजीवनव्यापी आत्मनिष्ठा ही ती वैशिष्टये होत. क्रांतिज्योती सावित्रीबाईंची साहित्यनिर्मिती म्हणजे मराठी सारस्वताचे एक सहजसुंदर लेणेच होय, हे यावरून स्पष्ट व्हावे.''[९]

मानवमुक्तीची, जनकल्याणाची आच त्यांच्या मनात महात्मा फुलेंइतकीच तीव्रतेने होती, हे त्यांच्या कवितेच्या अंतरंगाचा सूक्ष्म अभ्यास केल्यावर तर अधिकच स्पष्ट होते. सावित्रीबाई समाजक्रांतीच्या अग्रणी होत्या हे सांगताना नीळकंठ गोपाळ मेंढे म्हणतात, ''भारतीय स्त्री–शूद्रांना अज्ञानाच्या अंधार कोठडीतून बाहेर काढणारी सावित्रीबाई म्हणजे 'आधुनिक सरस्वतीच' होय.''[१०] सावित्रीबाईंच्या रचनांचा विचार करून श्रेष्ठ मानवी मूल्यांच्या स्थापनेसाठी जनसामान्यांना केलेल्या आवाहनाचा विचार करता त्यांच्या कवितेबद्दल नीलकंठ गोपाळ मेंढे म्हणतात, ''सावित्रीबाईंच्या कवितेतून अभिव्यक्त होणारी संपूर्ण भारतीयता श्रेष्ठ व व्यापक जीवनमुल्ये, आत्मप्रचिती, कालसापेक्ष व विषयाची विविधता या संदर्भाने विचार करता त्यांची कविताच खरी आधुनिक ठरते. म्हणून आधुनिक कविता निर्मितीचा मान केशवसूतांपूर्वी सुमारे ३० ते ३५ वर्षे काव्यलेखन करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्याकडे जायला हवा.''[११]

एकंदरीत सावित्रीबाईंची रचना संस्कृतप्रचुर नाही आणि भाषांतरीतही नाही. अगदी साधी–सुधी अंतःकरणाला भिडणारी, अलंकाराचाही जास्त सोस नसणारी आहे. सामाजिक जाणिवेचे भान असणारी आत्माविष्कार शैली यामध्ये आहे. सावित्रीबाईंनी काव्यरचनेसाठी ओवी, अभंग, पोवाडे, इत्यादी लोकपरंपरेतील छंद स्वीकारले आहेत. याउलट केशवसुतांची कविता पाश्चात्य स्वरूपाची, पंडिती परंपरेची आहे. आजमितीला त्यांचे उपलब्ध साहित्य केशवसुतांच्या मानाने कमी असले तरी त्यांची कविता महत्त्वाची ठरते आणि त्या काळाच्या पुढे असलेली आधुनिक कविताच ठरते.

## ३.४ काव्यफुले :

''काव्यफुले'' हा सावित्रीबाई फुले यांचा काव्यसंग्रह इ.स. १८५४ साली प्रसिद्ध झाला. यात वेगवेगळ्या प्रकारच्या एकूण एक्केचाळीस कविता आहेत. यात काव्याचे वेगवेगळे विषय आल्याने त्याचे आठ प्रकार पडतात.

१) प्रार्थनापर कविता आणि स्तोत्रे

२) काव्यविषयक कविता

३) निसर्गचिंतनपर कविता

४) बोधपर कविता

५) आत्मपर कविता

६) सामाजिक कविता

७) इतिहासविषयक कविता

८) स्फुट कविता

सावित्रीबाई फुले यांच्या काव्यफुले या काव्यसंग्रहातील कवितांचे वरीलप्रमाणे आठ प्रकारात वर्गीकरण करता येते. हे वर्गीकरणही अगदी काटेकोरपणे करता येत नाही. कारण त्यांच्या काही निसर्गवर्णनपर कवितांमध्ये सामाजिक विचार येऊन जातो.

### ३.४.१ प्रार्थनापर कविता आणि स्तोत्रे :

यामध्ये 'प्रास्ताविका', 'अर्पणपत्रिका', 'शिवप्रार्थना', 'शिवस्तोत्र', 'स्वागतपर पद्य', 'ईशस्तवन' या कविता आहेत. 'काव्यफुले' या काव्यसंग्रहाला प्रस्तावना काव्यातच लिहिली आहे.

सावित्रीबाई फुलेंनी आपल्या काव्याला फुलांची उपमा देऊन ही फुलमाळ म्हणजे काव्यसंग्रह 'काव्यफुले' कल्पून वाचकांपुढे एक नवीन नजराणा ठेवला आहे. 'प्रास्ताविका' च्या पहिल्या कडव्यात सावित्रीबाई म्हणतात,

''अर्पित फुले ही तुम्हा सुगंधी साची
काव्यात ओवते माळ करूनिया त्यांची

आहेत मजेची काव्यफुले ती सारी

वासाने तयाच्या शांती मिळे अंतरी''

('काव्यफुले' संग्रहातील 'प्रास्तविका' ही कविता पृ. ३)

याच प्रास्ताविकेत शेवटी आपली कविता छापणाऱ्या सहकाऱ्यांचे मदतनीसांचे आभार मानले आहे. 'काव्यफुले' या संग्रहात मनोरंजन करता करता सुबोध नीतीशिक्षण तर दिलेले आहेच, पण त्यात भावना प्रगटीकरणही केलेले असल्याचा निर्देश प्रास्ताविकेत केलेला आहे. अर्पणिकेत माझ्यावर सर्वांची भावभक्ती असल्याने माझ्या सुजन हितकारांना ही सुमाला किंवा काव्यमाला अर्पण करते. असा भाव व्यक्त केला आहे.

ईशस्तवन आणि शिवस्तोत्रात शंकराचा महिमा वर्णन केला आहे. शिवस्तोत्राची भाषा प्रगल्भ आहे. यांचे वैशिष्टय सांगताना कृ.पं.देशपांडे म्हणतात, ''परंपरेनुसार शंकराचे वर्णन त्यात आलेले असले तरी 'आदी निर्मिक स्वयंभू विभो' असे शंकराला म्हणत असताना 'निर्मिक', हा शब्द लक्ष वेधून घेतो. ज्योतिराव परमेश्वराला 'निर्मिक' म्हणत असत.''[१२] स्वागतपर पद्य याची रचना शाळेत स्वागतगीत म्हणून करण्यात आली असावे असे वाटते.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. येथील शेती करणाऱ्या लोकांचे राज्य हे बळीचे राज्य म्हणून परिचीत आहे. या बळीची महती सावित्रीबाईंनी 'बळीचे स्तोत्र' या कवितेत गायिली आहे. सावित्रीबाई म्हणतात,

''दानशूर बळी होता । सुखी त्यांचे प्रजानन

राज्यात सर्व संतोषी । त्याचे त्रिलोकी किर्तन

स्वयंभू धर्म राज्यात । होतसे शास्त्र मंथन

यज्ञ याग सुरू होते । दान मिळते कांचन''

('काव्यफुले' संग्रहातील 'बळीचे स्तोत्र' ही कविता पृ. २३)

अशाप्रकारे बळीराजाच्या आनंदी सुखी राज्याचे वर्णन करून बळीपत्नी विंध्यावली चा आवर्जून उल्लेख करतात. आपण त्यांचे वंशज असल्याचा त्यांना अभिमान वाटतो. हा अभिमान, आदर बळीराजाला कवितेतून वंदन करून त्या व्यक्त करतात. यात बळीच्या सुखी संपन्न राज्याचे त्यांनी रेखाटलेले चित्र रमणीय आहे.

सावित्रीबाईंच्या प्रार्थनापर कविता आणि स्तोत्रांमधून त्यांच्या सात्त्विक मनोवृत्तीचे दर्शन घडते. या कवितांमधून भक्तीभाव आणि आशादायी जीवनमूल्यांचे प्रगटीकरण होते. भूतकाळातील घटनांचा वर्तमानाशी संबंध जोडत आदरयुक्त अभिमानाच्या परंपरा सांगणारी त्यांची कविता आध्यात्मिक अंतःकरणाचेही दर्शन घडविते. आपल्या आराध्याची प्रार्थना करताना त्याचे शब्दचित्र मोठ्या मनोहरपणे वर्णन करून संसारातील ऐहिक संपत्तीचे दान न मागता विश्वव्यापी विश्वंभराला त्या ज्ञानाचे पसायदान मागतात. यातून त्यांचा व्यापक आशादायी जीवनदृष्टीचा प्रत्यय येतो.

## ३.४.२ काव्यविषयक कविता :

सावित्रीबाईंच्या दोन कविता ''द्रष्टा कवी'' आणि ''खुळे काव्य व खुळा कवी'' या अतिशय चांगल्या आणि विचारांनी समृद्ध असलेल्या कविता आहेत. काव्यप्रतिभा ही प्रत्येकाला लाभत नाही. शिक्षण असो, नसो तिची सृष्टीच वेगळी असते. कारण कवी हा ज्ञानाचा मोठा भक्त असतो. त्याच्याकडे नवरसांचा कोटा भरलेला असतो. त्यांच्या तोंडून काव्याचे ओघ वाहतात. त्याचे कारण, त्या कवीला 'नवचंडी' ने द्रष्टेपणाचा वर दिलेला असतो. त्याच्या जिव्हेवर साक्षात देवी विसावलेली असते आणि तीच काव्य गात असते. म्हणून ती गीते गोड होतात, धवळ गंगाधरा सारखी मधुर होतात. मधुर शब्दात सावित्रीबाई म्हणतात,

''देवी जिव्हेवर बसूनी काव्य गाई ।
धवल गंगाजल शंभु जटा धारा ।
काव्य वाचेतुन वाहती 'मधुरा' ।।''

('काव्यफुले' संग्रहातील 'द्रष्टा कवी' ही कविता पृ. १८)

त्यातून त्यांना हेच सुचवायचे आहे की, काव्यप्रतिभा ही दैवी देणगी आहे. त्या प्रतिभास्पर्शाने किंवा दैवी स्पर्शानेच काव्यनिर्मिती होऊ शकते. कवीजवळ नवरसांचा कोठा भरलेला असतो. म्हणजेच काव्य सरस असले पाहिजे, याचीही जाण कवयित्रीला आहे. अशी दैवी प्रतिभा लाभलेली कवयित्री म्हणते,

''सरोवर मानस सुवासिक फुलांचे

तिथे बांधितो महाल कमळांचे

चार विद्येची चौंसष्ट कलांची

सुबक नवरत्ने त्यावर रसांची''

('काव्यफुले' संग्रहातील 'द्रष्टा कवी' ही कविता पृ. १८)

असे काव्य लिहितो. सुवासिक फुलांच्या मानससरोवरात कमळाचे महाल बांधतो, ही कल्पना तर रम्य आहेच, पण त्याचबरोबर काव्याच्या सौंदर्याविषयी कमळाचे महाल हे शब्द बरेचसे सांगून जातात. या ओळीतून त्यांनी काव्याचे स्वरूपच स्पष्ट केलेले आहे. पुढे दिव्य काव्यकल्पनेबद्दल सावित्रीबाई म्हणतात,

''कधी कल्पी मी विश्वामित्र आहे.

काव्य माझे हे प्रतिसृष्टी आहे.''

('काव्यफुले' संग्रहातील 'द्रष्टा कवी' ही कविता पृ. १८)

प्रतिसृष्टी म्हणजे अर्थातच नवनिर्मिती स्वकल्पनेने प्रेरीत स्वतःचे असे आगळे विश्व, स्वर्ग–भूलोकांहून भिन्न तरीही स्वनिर्मितीमुळे स्वतंत्र सुंदर, काव्य माझ्या हातून निर्माण व्हावे असे त्यांना वाटते. सृजनशिल, सौदर्यखणी काव्यनिर्मितीकार सावित्रीबाई स्वतःला प्रतिसृष्टी रचनाकार ऋषी विश्वामित्र संबोधतात. अतिशय चपखल प्रतिमा अचूक संदर्भ यामुळे कमी शब्दात मोठा आशय अचूक व्यक्त झाल्याने ही सर्व चराचर सृष्टी हा काव्यविषय या कवितेत मोठ्या सामर्थ्याने पेलला आहे. एकंदरीत विचार करता आशयाच्या दृष्टीने आणि काव्यविचाराने ही एक प्रगल्भ कविता आहे.

लौकिकार्थाने एखादी व्यक्ती कवी असली तरी शेवटी तो माणूस असतो. सांसारिक जीवनात येणारी सुख–दुःखे त्याला भोगावी लागतात. सुख–दुःखांच्या हिंदोळ्यावर तो झुलत असतो. कवी हा स्वतः कल्पना शक्तीतुन आपले दुःख काव्यरूपाने व्यक्त करत असतो. तो स्वकल्पनेने स्वर्गाचाही अनुभव घेतो. परंतु त्याच्या सत्य जीवनात कधी तो नाचतो, कधी क्षणात रडतो तर कधी सजल नयनांनी क्षणात देवाची करूणा भाकतो. असा क्षणाक्षणाला बदलणारा मूड आणि क्षणभंगूर कल्पनात रमणारा कवी सावित्रीबाईंच्या कवितेतून दिसतो. कवी आणि कवीच्या भावसृष्टीबद्दल सावित्रीबाई म्हणतात,

''कल्पित रचतो कवी काव्य
सुख–दुःखे तो कधी भव्य
अनुभव घेतो स्वर्गाचा
भोग–भोगतो नरकाचा
क्षणात रडतो
रडत नाचतो
देव आळवितो''

('काव्यफुले' संग्रहातील 'खुळे काव्य खुळा कवी' ही कविता पृ. १९)

असे असले तरीही कवी आपल्या जीवनात मानहानी, अन्याय, अत्याचार, दैन्य, वेदना यांचे हलाहल पचवून कवितेच्या रूपाने जगाला गोड स्वप्नकल्पनांचे अमृत देतो आणि कवितेचा जन्म होतो, कसा ते सावित्रीबाई त्यांच्या कवितेच्या पुढील भागात लिहितात,

''अघटित रचतो खुळे काव्य
सुरात गातो कवी दिव्य
नजरेसमोर उभी परी
प्रेम कवीवर परि करी''

(काव्यफुले संग्रहातील 'खुळे काव्य खुळा कवी' ही कविता पृ. १९)

कवी अघटित असे काव्य रचतो. त्याच्या काव्याला त्या 'खुळे काव्य' म्हणतात. कवीच्या नजरेसमोर परी उभी राहते. ती त्याच्यावर प्रेम करते. स्मितहास्य करून त्याच्याशी गोड बोलते. त्याला विनवते, त्याचे चुंबन घेते आणि मग कवीच्या मनात चित्र उमटते. त्या प्रेमभावनेचे कवी काव्य लिहितो. या ठिकाणीही कवीच्या डोळ्यांसमोर प्रतिमा उभी राहते. त्याला दिव्य अनुभूती येते आणि कवी त्याला शब्दरूप देतो हेच सुचवायचे आहे.

अशा तऱ्हेने काव्याविषयी विचार मांडणाऱ्या त्यांच्या दोनच कविता असल्यातरी आशय, कल्पना, विचार या दृष्टीने त्या समृद्ध आहेत. त्या काळाच्या पार्श्वभूमीवर विशेष उठुन दिसणाऱ्या आहेत.

कवीच्या कल्पनांचा झुला कधी स्वर्गसुख घेतो तर कधी नरकयातना भोगून सृजन काव्यनिर्मिती घडवितो. ज्या काळात अशा कल्पनांचा काव्याला स्पर्शही झाला नव्हता अशा गूढरम्य कल्पना, कवीची मनःस्थिती आणि काव्यरचनेचा अलौकिक अनुभव सावित्रीबाईंनी आपल्या काव्यविषयक कवितांमध्ये व्यक्त केला आहे. कवीच्या भावसृष्टीबद्दल त्यांचे निरीक्षण कल्पना खरोखर लक्षणीय आहे. कवितेचा जन्मसोहळा आणि तिथल्या अनोख्या सृष्टीचे वर्णन मराठी काव्यसृष्टीत प्रथमच एवढ्या समर्थपणे व्यक्त झाले आहे.

### ३.४.३ निसर्गचिंतनपर कविता :

निसर्गात दिसणाऱ्या फुलपाखरांवर, फुलणाऱ्या फुलांवर कविता करण्याचा तो काळ नव्हताच. तरीही 'पिवळा चाफा', 'जाईचे फुल', 'जाईची कळी', गुलाबाचे फुल, 'फुलपाखरू' आणि 'फुलाची कळी', 'मानव व सृष्टी' आणि 'मातीची ओवी' या निसर्गविषयक कविता केल्या. निसर्गावर स्वतंत्र्य स्फुट, भावगीतात्मक रचना करण्याचा तो काळ नसतानाही त्यांनी या प्रकारच्या कविता केल्या हे त्यांचे वैशिष्टय आहे. त्याबद्दल कृ.पं. देशपांडे म्हणतात, ''निसर्गातील कळी, फुल, फुलपाखरू या साध्या-साध्या पण सौंदर्याने बहरलेल्या गोष्टी, हे काव्याचे विषय होऊ शकतात. ही त्यांची दृष्टीच काळाच्या दृष्टीने अभिनव वाटते.''[१३] हा अभिप्रायच या कवितेची आधुनिकता नवकल्पना यांची सुरूवात सावित्रीबाईंनी केली हे अधोरेखीत करतो.

'पिवळा चाफा' या कवितेत देखणा आणि सुगंधखणी असलेल्या चाफ्याच्या फुलाचे गुणगान कवयित्री करते. हळदुला रंग, सुवर्ण कांती, धुंद सुगंध नेत्रांना सुखवितो, श्वासातून ह्रदयात पोहचतो. हा सृष्टीचा सुंदर अलंकार कवियित्रीचे मन मोहून घेतो आणि कविता लिहिण्यास प्रेरीत करतो हे मोठया प्रीतलाघवेने सांगितले आहे. सावित्रीबाई म्हणतात,

जैसे रतीला । मदन खेळवी
तैसे कवीचे । मन चेतवितो
गुढपणे तो । मनात शिरून
काव्य कराया । उन्मुख करतो

('काव्यफुले' संग्रहातील 'पिवळा चाफा' ही कविता पृ. १२)

परंतु या कवितेच्या शेवटी मात्र चाफ्याचे फुल रसिक मनाला तृप्त करून स्वतः मरून पडते. मानवी सौख्यासाठी केलेल्या त्यागाचे चाफ्याचे फुल हे प्रतिक आहे. त्यांच्या पुढील दोन निसर्ग कविता 'जाईचे फुल' आणि 'जाईची कळी' यात सुंदर जाईच्या फुलाला आणि कळीला पाहिल्यावर कवियित्रीच्या मनात प्रथमदर्शनी कोणते विचार आले हे मोठ्या सुरेखपणे मांडले आहेत. मानवी भावभावनांचे रोपन कवितेतल्या फुलावर करून त्या फुलाला कधी मनात मुरका मारताना पाहतात, कधी लाजरी नजर टिपतात तर कधी त्याच्या अंतरंगात शिरून संवाद साधतात 'जाईचे फुल' या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

''फुल जाईचे पहात असता
ते मज पाही मुरका घेऊन''

('काव्यफुले' संग्रहातील 'जाईचे फुल' ही कविता पृ. १३)

मानवी भावभावनांचे निसर्गघटकांवर आरोपन येथे येते. जाईची कळी या कवितेतील तरल भावरम्य उत्कटता पुढील ओळीतून व्यक्त करताना सावित्रीबाई म्हणतात,

''रात्री बनते जणू रती ती
सुगंध खेळणी कळी जाईची''

('काव्यफुले' संग्रहातील 'जाईची कळी' ही कविता पृ. १४)

'गुलाबाचे फुल' या कवितेत गुलाब आणि कन्हेर यांची तुलना केली आहे. दोन फुले सारखी दिसत असली तरी किंवा दोन साम्य असणाऱ्या गोष्टी सकृतदर्शनी एक वाटल्या तरी त्यांची योग्यता, त्यांचे स्थान वेगळे आहे हे वेगवेगळया उदाहरणांनी पटवून देण्याचा प्रयत्न त्यांनी या कवितेतून केला आहे. पुढे त्या म्हणतात,

''डोंबकावळा तो नसे राजहंस
कृष्ण आणि कंस दुजे असे ।''

('काव्यफुले' संग्रहातील 'गुलाबाचे फुल' ही कविता पृ. १५)

अशाप्रकारे उपरोक्त उदाहरणांमध्ये जो मोठा फरक आहे तो जाणून घेऊन मानवाने आपले वर्तन कसे ठेवावे याबद्दल सावित्रीबाई म्हणतात,

''गुलाबासारखा मानव हा प्राणी ।

सावित्रीची वाणी ध्यानी आणा ।''

('काव्यफुले' संग्रहातील 'गुलाबाचे फुल' ही कविता पृ. १५)

फुलपाखरू ही रानावनात नित्य दिसणारी निसर्गाची कोमल कलाकृती आहे. त्याच्याकडे पाहिल्यावर मोहीत होणार नाही असा विरळाच. पण 'फुलपाखरू' व 'फुलाची कळी' या कवितेत त्यांनी प्रथम प्रीतीकाव्य आणि नंतर विफल प्रेमकहाणी वर्णन केली आहे. सुरूवातीला फुलपाखराचे त्यांनी केलेले वर्णन मनोरम आहे. देखण्या, आनंदाने भिरभिरणाऱ्या फुलपाखराचे वर्णन करताना सावित्रीबाई म्हणतात,

''सतेज डोळे पवळे रंगी

बोलके होते हसरे त्याचे''

('काव्यफुले' संग्रहातील 'फुलपाखरू' व 'फुलाची कळी' ही कविता पृ. १५)

डोळे असे होते आणि त्याच्या पंखाचे वर्णनही करताना पुढे त्या म्हणतात,

''पंख रेशमी त्यावर गोल

लहान मोठे पित रंगाचे''

('काव्यफुले' संग्रहातील 'फुलपाखरू व फुलाची कळी' ही कविता पृ. १५)

डोळे आणि त्याच्या पंखाचे अगदी हे वर्णन फुलपाखराला आपल्यासमोर, दृष्टीपुढे एक छान चित्र तयार करतात. निसर्गकाव्यात येणाऱ्या त्यांच्या कल्पना फुलांवर, कळीवर, फुलपाखरांवर मानवी भावनांचे आरोपन करतात. पण पुन्हा वास्तवतेचे भान मात्र विसरत नाहीत. हे सांगताना कृ.पं.देशपांडे म्हणतात, ''त्यात आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य नसेल. विद्युल्लत्तेची चमक नसेल किंवा समुद्राची अथांगताही नसेल. परंतु त्यात देवघरात शांत तेवत राहणाऱ्या नंददीपाची सौम्यता, शुचिता आणि निरंतर झुळझुळणाऱ्या निर्झरिणीचे सौंदर्य निश्चितच आहे.''[१४]

फुलपाखराच्या स्वच्छंदी बागडण्याचे आणि सुंदर रूपड्याचे यथार्थ वर्णन केल्यावर दुसऱ्या भागात मोहक फुलपाखरावर भुलून गेलेली कोवळी फुलकळी, भावविभोर होऊन आतुरतेने त्याची वाट कशी वाटते त्या प्रेमातुर मनाची भावना त्या मोठ्या तरलतेने रंगवितात. तरल भावना शब्दबद्ध करताना सावित्रीबाई म्हणतात,

''आतुर होई कळी फुलाची

मनाने झाली प्रमिली त्याची''

('काव्यफुले' संग्रहातील 'फुलपाखरू व फुलाची कळी' ही कविता पृ. १५)

मनाचा मनाशी असा संवाद घडल्यावर फुलकळी फुलपाखराला खुणावते आणि त्यानंतरचे वर्णन करताना सावित्रीबाई म्हणतात,

''भारावलेली मधूकलिका

ओढून घेई उत्कटतेने''

('काव्यफुले' संग्रहातील 'फुलपाखरू व फुलाची कळी' ही कविता पृ. १६)

त्या कळीची प्रीतीची उत्कटता वाचकाच्या मनाला स्पर्श करून जाते. यापुढील कविता मात्र प्रेमगीत राहत नाही. फुलपाखरू फुलकळीतला मधुरस पिऊन निर्विकारपणे दुसऱ्या मधुकळीकडे जाते हे पाहून कृतघ्न जनरीतीची कवयित्रीला हुरहूर वाटते.

कोण कोठली कळी फुलाची

''जुनी विसर नवीन पाही

रीत जगाची उच्छृंखल ही

पाहुनिया मी स्तिमित होई ।''

('काव्यफुले' संग्रहातील 'फुलपाखरू व फुलाची कळी' ही कविता पृ. १६)

सावित्रीबाईंचे कवीमन निसर्गात कितीही गुंतले, सौंदर्याने भारावून गेले तरी वास्तव जीवनापासून ते फारकत घेत नाही म्हणूनच 'पिवळा चाफा' या कवितेच्या शेवटी सावित्रीबाई म्हणतात,

''नेत्र नासिका रसिक मनाला

तृप्त करूनी मरून पडतो ।''

('काव्यफुले' संग्रहातील 'पिवळा चाफा' ही कविता पृ. १२)

मृत्यू या शाश्वत सत्याशी जाऊन भिडतो. तर 'जाईच्या फुला'मध्ये सावित्रीबाई म्हणतात,

''रीत जगाची कार्य झाल्यावर

फेकून देई मजला हुंगून।''

('काव्यफुले' संग्रहातील 'जाईचे फुल' ही कविता पृ. १४)

या उपेक्षित जीवनाचे म्हणजेच 'गरज सरो वैद्य मरो' या प्रवृत्तीचे वर्णन आढळते. फुलांचे, फुलपाखरांचे वर्णन करणारे कविमन मातीची महती विसरत नाही. माळी समाजात जन्म घेतल्याने, मातीशी निकटचे नाते जडले होतेच. तिची महती कळली होतीच, तोच महिमा, तेच नाते शब्दरूपाने प्रगटले. सावित्रीबाई म्हणतात,

''काळसर माती । पिकपाणी देती ।
फळे-फुले शोभती । शिवारात ।''

('काव्यफुले' संग्रहातील 'मातीची ओवी' ही कविता पृ. २४)

अन्न-धान्य, फळे-फुले देणारी अवघ्या प्राणिमात्रांचे पोषण ज्या पिक-पाण्यावर होते त्यांना धारण करणारी मातीमाय शिवारात असते, घराच्या कौला-भिंतीतही असते, म्हणूनच अन्न-निवाऱ्याचे उगमस्थान म्हणून तिची महती 'मातीची ओवी' या कवितेतून गायिली आहे. त्यांच्या कवितेबद्दल राजाराम सुर्यवंशी म्हणतात, 'बहिणाबाई चौधरींना पहिली ग्रामीण कवयित्री म्हणतात परंतु त्यांच्याही शंभर वर्षे अगोदर सावित्रीबाई या मातीशी इमान राखणाऱ्या ग्रामीण कवयित्री होत्या.''[१५] त्या मातीचे मोल जाणून होत्या. मातीतून उत्पन्न होणारा माणूस मातीतच मिसळतो. मध्यंतरी काळात हीच माती माणसाचे भरण-पोषण करते. त्याला सुखसमाधान,अन्नधान्य, फळफळावळ देऊन त्यांचे जीवन आल्हाददायी बनविते. या मातीची महती सावित्रीबाई गातात. या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

''काळसर माती । पीकपाणी देती ।
फळे फुले शोभती । शिवारात ।
पांढरीला मळून । कौले-विटा करून ।
राहती घरे बांधती । शिवारात ।
मातीचा महिमा । सांगावा किती हा ।
मातीचे नाते अहा । शिवारात ।''

('काव्यफुले' संग्रहातील 'मातीची ओवी' ही कविता पृ. २४)

जुने मंत्र, आधुनिकतेचे तंत्र आणि अत्याधुनिक यंत्र यांचा मानवाने आध्यात्मिक, भौतिक कारणाने कितीही उपयोग केला तरी प्रत्येक वेळी माणसाच्या मनुष्यत्वासाठी ते हरवू नये म्हणून प्रयत्न केला गेला. कारण पृथ्वी ही एकमेवाद्वितीय ग्रह आहे की विश्वात फक्त

पृथ्वीवरच बहुरंगी प्राणी, वनस्पती, ही सृष्टी आणि विविधता आहे आणि त्यावरचा 'माणूस' जातीचा प्राणी अफलातून बुद्धीमान आहे. इतर प्राणीजातीत वाघ–सिंहांनी किंवा हत्ती–हरणांना जगण्यासाठी ज्या उपजत बुद्धी जाणिवा आहेत. ह्या वगळता विशेष अशी बुद्धीमत्ता, सृजनशीलता, कल्पकता नाही त्यांनी आपल्या निवाऱ्यासाठी कधी पक्की घरे बांधली नाहीत की, उद्याची चिंता म्हणून अन्नधान्याची कोठारे उभारली नाही. वाघ मरेपर्यंत वाघच, हरीणही हरीणच राहते परंतु मनुष्य बुद्धीमत्तेच्या जोरावर निसर्गातील गमती–जमती, वादळवारे, पर्जन्य ह्यांना पाहतो तर्क करतो, अर्थ लावतो, सुसंगत विचार करतो, अडचणीवर मात करण्यासाठी कल्पकतेचा उपयोग करून अत्युच्च माणवतेचे शिखर गाठू शकतो. पण तरीही मानव कितीही मोठा झाला तरी तो निसर्गाचे लेकरू राहतो. म्हणजे कायमच त्याला अन्न–वस्त्र–निवारा यासाठी निसर्गावरच अवलंबून रहावे लागते. मानव आणि निसर्ग यांच्या अतुट नात्याचे वर्णन करताना सावित्रीबाई म्हणतात,

''मानवप्राणी निसर्ग सृष्टी द्वय–शिक्यांचे नाणे ।
एक असे ते म्हणूनी सृष्टीला शोभवू मानव लेणे ।।''

('काव्यफुले' संग्रहातील 'मानव व सृष्टी' ही कविता पृ.१७)

सावित्रीबाई फुले या आद्य पर्यारणवादी महिला असे म्हणायला हवे. निसर्ग व मानव हे एकमेकांना पूरक आहेत. निसर्गापासून मानवाला हवा, पाणी, अन्न, औषधी वनस्पती व आल्हाददायी जीवन प्राप्त होते म्हणून मानवाने निसर्गाचे संगोपन केले पाहिजे व निगा राखली पाहिजे. त्या म्हणतात की, निसर्गसृष्टी व मानव या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत म्हणून निसर्गशोभा वाढवण्यासाठी मानवाने झटले पाहिजे, असा संदेश त्या देतात. सावित्रीबाई पुढे म्हणतात,

''सुंदर सृष्टी, सुंदर मानव, सुंदर जीवन सारे ।''

('काव्यफुले' संग्रहातील 'मानव व सृष्टी' ही कविता पृ.१७)

सृष्टी सुंदर राहिली तर सारी मानवजात सुखी बनून सुंदर बनवणार म्हणून सृष्टी व मानवाचा एकात्मवाद व्यक्त करणाऱ्या सावित्रीबाई या आद्य पर्यावरणवादी महिला ठरतात. मानव समाजाच्या विकासासाठी आज सृष्टीचा नाश केला जात आहे. पर्यायाने जल, वायू यांचे प्रदूषण, रोगराई या नव्या समस्यांना मानवाला सामोरे जावे लागत आहे. अशा वेळी सृष्टी सुंदर

व जिवंत राहिली तर सारे मानव सुखी होतील. हा सावित्रीबाईंचा संदेश त्यांच्या दूरदृष्टीची जाण दर्शविणारा आहे. म्हणजेच मानव व सृष्टी या कवितेत वर्षाधारांनी सतेज ताजेतवाने झालेल्या, हिरवा शालू पांघरलेल्या बहारदार वनस्पती सृष्टीबरोबर पक्ष्यांचेही सुंदर वर्णन करतात.

''कोकीळ गाते कुहूकुहू, मोर डोलूनी नाचे ।
फुलाभोवती आनंदाने फिरती भुंगे चाचे ।''

('काव्यफुले' संग्रहातील 'मानव व सृष्टी' ही कविता पृ.१७)

पण या सुंदर सृष्टीच्या सौंदर्यातदेखील त्यांचे सामाजिक भान हरपत नाही. सृष्टीत पाऊस जसा नवचैतन्य निर्माण करतो. फक्त सुंदरता आणि आनंदी वृत्तीचा परिचय करून देतो तद्वत सद्भावनेच्या पर्जन्याची अपेक्षा करून जिवनाविषयक तत्त्वज्ञान सहज सांगताना सावित्रीबाई म्हणतात,

''सुंदर सृष्टी सुंदर मानव सुंदर जीवन सारे
सद्भावाच्या पर्जन्याने बहरूनी टाकू 'वा' रे
मानवी जीवन हे विकसूया
भय चिंता सारी सोडुनि या
इतरा जगवू स्वतः जगूया.''

('काव्यफुले' संग्रहातील 'मानव व सृष्टी' ही कविता पृ.१७)

डॉ. श्रीराम गुंदेकर म्हणतात, ''मानव व सृष्टी या कवितेत मानवी जग आणि सृष्टी यांच्या एकात्मतेचे सूत्र साध्या सुंदर पद्धतीने उघड होत असून त्यातून एक अर्थपूर्ण रचना आकारास आली आहे. मानवासकट चराचरात व्यापलेले निसर्गचैतन्य–एवढा प्रदिर्घ आवाका कवयित्रीच्या आत्मनिष्ठेने या काव्यानुभवात धारण केल्याचे प्रतित होते. एका पावसामुळे सृष्टीला जसा बहर येतो, तसाच शिवारालाही चैतन्याचा पूर येतो. तिकडे सृष्टीचा शृंगार भरास येतो. तर इकडे फळाफुलांच्या समृद्धिने मानवी जीवनाचे पोषण होते. याच तत्वानुरोधाने, सद्भावपर्जन्य बरसवीत 'जगा व जगवा' हा दिव्य संदेश एखाद्या साक्षात्कारासारखा झटकन पुढे येतो आणि कवयित्रीची जाणीव तर त्याहीपलीकडे जाऊन त्या शब्दांत भारतीय तत्वदर्शन प्रगट करते.''[१६] सद्भावनेचा पर्जन्य मानवी जीवनाचा बहर, भयमुक्त जीवन, विकसित सुंदर जीवन आणि सुंदर

सृष्टितील सुंदर मानव या सर्व कल्पना अत्युच्च आध्यात्मिक मानसिकता प्रगट करतात. म्हणूनच त्यातून सृष्टी व मानव 'सिम्बॉयसिस' सहजीवनाची अनुभूती घेता येते.

सृष्टी आणि सृष्टीतील जैविक-अजैविक घटक माती, पाने, फुले यांचे एकमेकांशी असलेले अद्वैत आणि त्या सृष्टीचा अविभाज्य घटक असणारा मानव यांचे ऋणानुबंध देखण्या शब्दांतून, साध्या घटनांतून मनमोहकपणे उत्कटतेने सांगणारी सावित्रीबाईंची कविता खरोखरच निसर्गाशी त्यांची तादात्मकता दर्शविते. निसर्गात जन्मणाऱ्या, फुलणाऱ्या आणि नाश पावणाऱ्या गोष्टींचा मानवी जीवनाशी अगदी सहज संबंध जोडून त्याची अभिव्यक्ती आपल्या काव्यातून प्रथमच करुन संवेदनशील कविमनाची त्या साक्ष देतात. तसेच त्या काळाच्या पार्श्वभूमीवर काव्यासाठी सर्वार्थाने नवीन असलेल्या 'निसर्ग' या विषयावर प्रतिभेच्या जोरावर नवकाव्याची निर्मिती करून जीवनाविषयक तत्त्वज्ञानाला स्पर्श केल्याने वेगळी उंची गाठतात असे म्हणता येईल.

## ३.४.४ बोधपर कविता :

बोधपर कवितांमध्ये 'ज्योतिबांचा बोध', 'तेच संत', 'श्रेष्ठ धन', 'बाळास उपदेश', 'नवस', 'इंग्रजी शिका' या कवितांचा समावेश होतो. या सर्व कवितांमधून स्वानुभवातून मिळालेले ज्ञान, त्या ज्ञानाचे किंवा शिक्षणाचे महत्त्व आणि ते का शिकावे याबद्दल लिहिले आहे. उपदेश दिला आहे. यात उल्लेखनीय अशी 'अंधश्रद्धा निर्मूलनावर आधारित म्हणजेच प्रश्न विचारून विचारवण करायला लावणारी तर्काधिष्ठित, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन दर्शविणारी 'नवस' ही कविता आहे. म्हणजेच यातील कविता बोध, उपदेश देणाऱ्या तसेच सत्याचा शोध घेणाऱ्या आहेत.

एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध आणि विसाव्या शतकाचा प्रारंभकाळ हा जरी विलक्षण खळबळीचा आणि मोठया परिवर्तनाचा कालखंड होता, तरी प्रबोधनाचे, नव्या विचारांचे वारे सनातनी समाजाच्या बंदिस्त घरांमधून, त्यांच्या माजघर-स्वयंपाकघर-परसदारापर्यंत पोचणे फार दुरापास्त होते. सुधारणांना संस्कृतिनिष्ठांचा असलेला विरोध फार तीव्र होता आणि लोकमान्य टिळक यांच्यासारखे पुष्कळ प्रभावी लोकनेतेही त्या निष्ठावंतांना दुखविण्यास तयार

नव्हते. शिवाय ज्या मर्यादित सुधारणांना हे लोकनेते अनुकूल होते, त्यामध्ये स्त्री सुधारणांचा समावेश नव्हता. स्त्रियांना नव्या तऱ्हेने शिक्षण देणे किंवा सहशिक्षण देणे त्यांना मान्यच नव्हते. येथील लोकांना शिक्षण देण्याचा ब्रिटीशांचा उद्देश खरोखर इथल्या अंधश्रद्धाळू, अज्ञानी, गरीब जनतेची कळवळ हा मुळीच नव्हता. धार्मिक भावना हा मोठा कळीचा मुद्दा होता. धर्मप्रसार तर करायचा पण तो उघडपणे शक्य नाही, म्हणून ''कुटूंब आणि कौटुंबिक संबंधाच्या माध्यमातून प्रेमाचा संदेश द्यायचा आणि प्रेम आणि येशू यांची सांगड घालायची व चतुराईने ख्रिस्ती प्रेमाची मात्रा वाचकांच्या गळी उतरवायची, हे त्यांचे चातुर्यही लक्षणीय रीतीने जाणवते.''[१७] धर्मप्रचारार्थ शाळा स्थापन करण्याची कल्पना लढविण्यात आली. १२ ऑक्टोबर १८३६ रोजी लॉर्ड मेकॉले याने आपल्या वडिलांना पत्र लिहिले होते, ''आपले शैक्षणिक धोरण जर अंमलात आणले गेले तर तीस वर्षानंतर बंगालमधील उच्च वर्गात एकही मूर्तिपूजक राहणार नाही याची मला पूर्ण खात्री आहे. स्वाभाविक ज्ञान आणि अंतर्मुखता यामुळेच ही गोष्ट होईल. त्यासाठी धार्मिक स्वातंत्र्यात बारीकशी ढवळाढवळ करण्याचीही गरज राहणार नाही.''[१८] मेकॉलेच्या पत्राचा संदर्भ देण्याचे कारण एवढेच की एतद्देशीयांना शिक्षण देण्यामागचा ब्रिटीशांचा धर्मांतराचा हेतूही इथे लख्ख दिसतो. म्हणूनच मिशनऱ्यांच्या शाळांना विरोध होता आणि धर्मांतराच्या भितीमुळे शिक्षणाला विरोध होणाऱ्या भितीपोटी विद्यार्थ्यांना शाळेतून काढून घेतले जात होते. तथाकथित उच्चवर्णीय आपल्या बांधवांना शिक्षण देणे दूरच, उलट शूद्र, अतिशूद्र यांनी शिक्षण घेणे पाप नव्हे महापाप, अधर्म असा डांगोरा धर्ममार्तंडानी पिटायला सुरूवात केली. एकीकडे अधर्म होतो म्हणून आणि दुसरीकडे धर्मांतराची भिती किंवा वाटण्याची भिती म्हणून शिकावे की न शिकावे असा लोकांना संभ्रम पडला. अशा वेळी ठामपणे, खंबीरतेने आपल्या कवितेतून सावित्रीबाई म्हणतात,

''शूद्र अतिशूद्र । दुःख निवाराया
इंग्रजी शिकाया । संधी आली
इंग्रजी शिकून । जातीभेद मोडा
भटजी भारूडा । फेकोनिया ।।''

('काव्यफुले' संग्रहातील 'इंग्रजी शिका' ही कविता पृ.२३)

संस्कृत म्हणजे देववाणी. पण ती फक्त उच्चवर्णियांसाठी होती. त्यामुळे शूद्रांना, अतिशूद्रांना भव्यदिव्य पौराणिक ग्रंथांचा लाभ घेता येत नव्हता आणि निरक्षरतेमुळे स्वभाषाच काय परंतु

परभाषेतील आधुनिकतेचा स्पर्शही होऊ शकत नव्हता. त्यांच्या दुःखाचे मुख्य कारण अशिक्षितपणा हेच होते. इंग्रजी शिकणे ही संधी असे मानण्याचे कारण की, त्यामुळे का होईना बहुजन समाजाला आधुनिकतेचा स्पर्श होईल, त्यांच्या जाणिवा विस्तारतील, आत्मभान जागृत होईल आणि त्यासाठी धर्म नव्हे जाती मोडाव्या लागतील.

आपल्या भव्यदिव्य परंपरांचा, इतिहासाचा, हिंदू धर्माचा आणि हिंदुस्थानविषयाचा जाज्वल्य अभिमान असणारे प्रभावी व्यक्तिमत्त्व ज्यांच्या विचारांनी अवघ्या विश्वाला भुरळ पाडली असे स्वामी विवेकानंदही आपल्या समाजातील या अनिष्ट जातीभेदाच्या कट्टर विरोधात होते. स्वामी विवेकानंद म्हणतात, ''पुरोहित लोक काहीही बडबडोत, पण जातिभेद म्हणजे केवळ एक दृढमूल झालेली सामाजिक संस्थाच होय. तिचे कार्य आता संपले आहे. आता ही जातीसंस्था भारताचे वातावरण जणू दुर्गंधाने भरून टाकीत आहे. लोकांची नष्ट झालेली सामाजिक स्वत्वबुद्धी पुनः जागृत करूनच हा जातिभेद दूर करता येईल.''[१९] म्हणूनच सावित्रीबाई, धर्म बदला असा उपदेश करीत नाहीत तर विद्येची कास धरा, इंग्रजी भाषेचा अभ्यास करा आणि संस्कृतचे प्रामाण्य असलेल्या भटजी संस्कृतीपासून मुक्त व्हा, असे सांगतात. त्यासाठी विद्या-धनाचा लाभ घ्यावा हे पटवून देताना 'श्रेष्ठ धन' या कवितेत विद्याप्राप्तीसाठी विद्यार्थ्यांना नुसतं शिका म्हणून न थांबता अंगी नम्रता ठेऊन, थोरामोठ्यांचा आदर राखावा हेही नमूद करतात. सावित्रीबाई म्हणतात,

''होऊनिया शुचिर्भूत । वंदू माता पिता जन ।
स्मरू शंभो गुरू देव । अभ्यासी रमवू मन ।''

('काव्यफुले' संग्रहातील 'श्रेष्ठ धन' ही कविता पृ.२०)

देवांचा देव महादेव, गुरूंचा गुरू शिवाचेही स्मरण करायला सांगायचे विसरत नाहीत. 'कण त्यागो कुतो धनम् । क्षण त्यागो कुतो विद्या ?' या सुभाषिताप्रमाणे अभ्यासाविना एकही दिवस वाया घालवू नका हा संदेश देऊन 'विद्येसच देव' म्हणजे जीवनातील सर्वस्व मानून आटोकाट प्रयत्नाने ह्या विद्येस संपादण्यास सांगतात. पुढे सावित्रीबाई म्हणतात,

''अभ्यास करी विद्येचा । विद्येस देव मानून
घे नेटाने तिचा लाभ । मनी एकाग्र होऊन

विद्या हे धन आहे रे। श्रेष्ठ साऱ्या धनाहून

तिचा साठा जयापाशी । ज्ञानी तो मानती जन''

('काव्यफुले' संग्रहातील 'श्रेष्ठ धन' ही कविता पृ.२०)

ज्या काळात सावित्रीबाईंनी या कविता लिहिल्या तो कालावधी लक्षात घेता नुकतीच विद्येची दालनं शिक्षणाच्या रूपानं हळू-हळू कुरकुरत का होईना सर्व स्तरातल्या जनसामान्यांसाठी किलकिली होऊ लागली होती तेव्हा शाळेत जाऊन काय करायचं? आणि त्याचा लाभ काय? हे सांगण्यासाठी त्यांनी विद्येला 'देव' मानने आणि तिचा 'श्रेष्ठ धन' म्हणून गौरव करणे लक्षणीय आहे. 'बाळास उपदेश' या कवितेत 'कल करे सो आज करे, आज करे सो अब करे' या उक्तीला अनुसरून जीवन क्षणभंगुर असल्याने ज्या क्षणाचे काम, त्याच क्षणी करून टाकण्याचा त्या उपदेश करतात.

मानवी जीवन म्हटले की सुख-दुःख, आशा-निराशा, अपेक्षाभंग-अपेक्षापूर्ती या विविध भावनांचा अविष्कार असतो. निराशा, दुःख, दारिद्र्य, कमालीचे पारतंत्र्य यांच्या अंधारात चाचपडत असताना, मनाला दिलास मिळतो तो देवावरच्या श्रद्धेचा! पण देवळात तरी कुठे शूद्रांना प्रवेश होता? मग म्हसोबा-खेसोबा या लोकदेवतांची उपासना करायची, त्यांना बळी द्यायचे, नवससायास करायचे. या विधीचे प्रस्थ त्या समाजात माजले होते. दगडाच्या देवाला शब्दरूपी हातोडीचा घाव घालीत सावित्रीबाई म्हणतात,

''गोट्याला शेंदूर फासुनि तेलात

बसवी देवात दगड तो''

('काव्यफुले' संग्रहातील 'नवस' ही कविता पृ.२२)

श्रध्दा आणि अंधश्रद्धा एकमेकांत एवढ्या घट्ट रूतल्या होत्या की, समाजाची सारासार विचारशक्तीच नष्ट झाली होती. त्यामुळे दगडांनाच देव मानून मुले होण्यासाठी हे लोक काहीही विचार न करता बाळजन्मासाठी कोणता नवस करतात हे सांगताना सावित्रीबाई म्हणतात,

''नवस करिती बकरू मारीन

नवस फेडीन बाळजन्मी''

('काव्यफुले' संग्रहातील 'नवस' ही कविता पृ.२२)

असा नवसही करीत. सामान्यांची दीनदलितांची ही अंधश्रद्धा सावित्रीबाईंना मूळीच मान्य नाही. त्या कठोर विवेकवादी, बुद्धीवादी महिला होत्या. त्या अंधश्रद्धेवर कडाडून टीका करतात आणि मर्मावर बोट ठेवणाऱ्या प्रश्नात त्या विचारतात,

''धोंडे मुले देती नवसा पावती
लग्न का करती नारीनर?''

('काव्यफुले' संग्रहातील 'नवस' ही कविता पृ.२२)

दगडधोंड्यांचे देव नवसाला पावून मुले द्यायला लागले, तर स्त्री पुरूषांना लग्न करण्याचे कारण काय? असा अज्ञानाला भेदणारा विज्ञाननिष्ठ प्रश्न विचारतात. समाजाला विचार प्रवण करतात. कारण धार्मिक भावनांत मन आणि मनातील धार्मिक भावनांची योग्या–योग्यता समजणे पुढे त्या भावना चुकीच्याच आहेत हे सप्रमाण सांगणे एवढे सोपे नाही. पण त्यांची ही विज्ञाननिष्ठ विचारसरणी अंतर्मुख करायला लावणारी आहे.

संत कोणाला म्हणावे आणि संतपण कशात आहे हे सांगताना 'तेच संत' या आपल्या कवितेतून 'बोले तैसा चाले' हे ब्रीद आचरणात आणणारे वंदनीय आहेत, असे सावित्रीबाई आपल्या अभंगातून सुचविताना त्या म्हणतात.

''वाचे उच्चारी । तैसी क्रिया करी
तीच नरनारी । पूजनीय ।।''

('काव्यफुले' संग्रहातील 'तेच संत' ही कविता पृ.८)

सेवा हाच परमार्थ आणि परहीत निःस्वार्थीपणे करणाऱ्यालाच संत म्हणून ओळखावे असे पुढील भागात वर्णिले आहे. हा अभंग मनोवेधक आहे. संतांची लक्षणे सांगणारी जी संतवाणी आहे किंवा अभंग आहेत, त्यांच्याशी नाते सांगणारा हा एक प्रसादपूर्ण, रसाळ अभंग आहे. याची रचनाही अत्यंत सफाईदार झाली आहे. आणखीही एक अभंग असाच रमणीय आहे. स्वार्थाविण ज्ञानदान करणारा, लाभाविण प्रीती, सेवा करणारा आणि दीनदुबळ्यांना संसारात मदत करण्याचीच ज्याची वृत्ती आहे. अशा व्यक्तीचे चारित्र्य सुंदर म्हणजेच फुललेल्या कमळाप्रमाणे निर्मळ असते व त्याची सर्वत्र पूजा होते, म्हणजेच आदर राखला जातो हे सांगताना सावित्रीबाई पुढे म्हणतात,

''करी दुबळ्यांना संसारी मदत ।
हीच रीतभात । ज्याची असे ।।
अज्ञानी लोकांना करी ज्ञानदान ।
मुढांना विज्ञान । करीतसे ।।
स्वार्थ नाही काही । सेवेत रमती ।
तयास वंदिती । सर्व लोक।।''

('अग्निफुले' काव्यसंपदा पृ. ६८)

मानव आणि अ-मानव या कवितेत जी सेवा आणि त्याग यांचीच महती आली आहे. 'जीवनसाफल्याचे तंत्र' त्या 'सेवामंत्र' हे आहे, असे सांगतात. मर्मज्ञ माणसाला जगणे हा यज्ञ आहे, हे कळते. हे ज्याला कळत नाही, तो अ-मानव आहे. मानव अमानवाची आणखीही काही लक्षणे त्यांनी सांगितली आहेत. अ-मानवाबद्दल सावित्रीबाई म्हणतात,

''ओळखे दुःखित जणू गणगोत ।
जाणे परहित तो मानव ।।
जिणे तो जगवी पशूंच्या स्वभावी ।
तो असे दुर्देवी अ-मानव ।।''

('अग्निफुले' काव्यसंपदा पृ. ६८)

म्हणूनच सावित्रीबाई म्हणतात मानवासाठी त्याग करणारा आणि 'सगुणचरित्रे' असणारा तोच खरा मानव आहे. दुसऱ्यांचे दुःख ते आपलेच दुःख असे मानणारा त्यांना आपल्यातील मानणारा आणि दुसऱ्यांच्या हिताची जपणूक करणारा त्याला मानव म्हणून जाणावे. येथे तुकारामांच्या विश्वऐक्याची भावना जागविणाऱ्या अभंगाची, 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले...' आठवण येते. परदुःखाने व्याकुळ होण्याची भावना दोन्हींमध्ये सारखीच असून वेगवेगळ्या पध्दतीने व्यक्त झालेली आहे.

बोधपर कविता लिहिताना काही सुभाषिते डोळ्यासमोर येऊन त्यांना काही रचना सुचल्या असाव्यात किंवा अशा काही सुभाषितांच्या स्पष्टीकरणासाठी त्यांनी काही रचना केल्या असाव्यात. असे वाटते, उदाहरणार्थ 'जीवो जीवश्च, जीवनम्' किंवा 'बळी तो कान पिळी' याचे स्पष्टीकरण व सृष्टिचा स्वभावधर्म या कवितेत आढळते. प्रत्येक प्राणीमात्राला मृत्यू आहे,

तरी तो जगण्याची धडपड करतो. ही धडपड करताना तो दुर्बलाच्या जीवावर जगतो. त्यासाठी त्यांनी मानव व प्राणिसृष्टितील काही दाखले दिले आहेत. त्या म्हणतात,

''दुर्बलांना मारूनिया  सारे प्राणी हे जगती
स्वतःचे जगणेसाठी  दुसऱ्याचे बळी होती
लांडग्याच्या दाती कान  जाय शेळी तयासंगे
छोटे मत्स्य भक्ष्य माझे  बळी मासा धर्म सांगे''

('अग्निफुले' काव्यसंपदा पृ. ६९)

असे सृष्टीचे जीवनचक्र, अन्नसाखळीतील ही उदाहरणे देऊन अनुमान काढतात– 'जीवो जीवस्य जीवनम' ही कविता त्यांच्या जीवनचिंतनावर प्रकाश टाकते.

'ज्योतिबाचा बोध' यात ज्योतिरावांनी केलेला उपदेश त्यांनी आपल्या काव्यात व्यक्त केला आहे. त्यांना शिक्षित करण्यास प्रोत्साहित करणारा, आजूबाजूच्या घटनांकडे संवेदनशीलतेने पाहणारा, माणसाला माणूसपण देण्यासाठी धडपडणारा अशी त्यांची अनेक असामान्य रूपे सावित्रीबाईंनी पाहिली आहेत. म्हणूनच ज्योतिरावांबद्दल आदर, नितांत प्रेम, भक्ती त्यांच्या काव्यातून प्रत्ययास येते. तो आमचा उद्धार करणारा देव आहे ही त्यांची दृढ भावना आहे. म्हणून ज्योतिबांना नमस्कार करताना त्या म्हणतात,

''ज्योतिबांना नमस्कार । मनोभावे करतसे ।।
ज्ञानामृत आम्हां देई । आशा जीवन देतसे ।।''

('काव्यफुले' संग्रहातील 'ज्योतिबांना नमस्कार' ही कविता पृ.५)

ज्योतिबा ज्ञानामृत देत असल्याने, जीवनाबद्दलची आशा निर्माण करीत असल्याने त्यांनी केलेला 'बोध' सावित्रीबाईंच्या मनावर अगदी पक्का कोरला गेलेला दिसतो. फक्त एवढ्याच कारणासाठी नव्हे तर शूद्र, अतिशूद्र त्यांना त्या काळी जी अमानवीय वागणूक मिळत होती, त्याविरूध्द आवाज उठवून त्यांना प्रेमाने हृदयाशी घेणारी, त्यांच्या दुःखाशी समरूप होणारी आणि बंधुभावाने हाक मारून ज्ञानलालसा निर्माण करणारी व्यक्ती म्हणूनही ज्योतिराव सावित्रीबाईंना वंदनीय वाटत होते.

''स्वामी ज्योतीबांच्या । लागे मी चरणी ।
त्यांची गोड वाणी । मनी घुमे ।।

('काव्यफुले' संग्रहातील 'ज्योतिबाचा बोध' ही कविता पृ.७)

काव्यातून त्यांच्या चरणकमलाचे दर्शन घेऊन त्यांच्या अमृतमय वाणीचा विसर पडत नाही हे नमूद करतात. अस्पृश्य म्हणविल्या जाणाऱ्या घोटभर पाणी आणि पोटभर अन्न मिळविण्यासाठी तळमळणाऱ्या जीवांचे हाल वर्णन करताना स्वामी विवेकानंद म्हणतात, ''आपल्या देशात जे अस्पृश्य समजले जातात त्यांना दोन घास अन्न देण्यासाठी आपण काय करीत आहोत? आपण त्यांना स्पर्श करीत नाही, आपण त्यांना 'दूर व्हा, दूर व्हा' असे म्हणतो आपण काय माणसे आहोत?''[२०] स्वामी विवेकानंद अमेरिकेहून श्री. हरिपद मित्र यांना पाठविलेल्या पत्रात हा प्रश्न विचारतात. यातच दीनदलितांच्या प्रश्नाने आपल्या देशात केवढे भयावह रूप धारण केले होते हे समजते. या लोकांसाठी जनक्षोभ पत्करून त्यांची दुःख दूर करण्यासाठी सेवाव्रत एका कर्मयोग्याने ज्योतिरावांनी अंगिकारीले म्हणूनच त्याचा वसा घेऊन सावित्रीबाईही हे कार्य मोठ्या तल्लीनतेने करतात आणि या अस्पृश्य किंवा महार-मांगांच्या सेवेचा आवर्जून उल्लेख करतात. अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजात असन्माननीय वागणूक मिळणाऱ्या वर्गाचा उल्लेख करून मोठ्या विश्वासाने सावित्रीबाई म्हणतात,

''महार मांगांची । करते मी सेवा ।
आवडीच्या देवा । स्मरूणीया ।।
सेवा सत्यधर्म । देई समाधान ।
ठेवी शांत मन । आपले रे ।।''

('काव्यफुले' संग्रहातील 'ज्योतिबाचा बोध' ही कविता पृ.७)

आवडीच्या देवा स्मरून त्या सेवा करतात. ज्योतिबा सांगतात सेवा, सत्यधर्मच समाधान देऊ शकतो. सेवेच्या भावाने जे मनःपूर्वक सेवा करतात. त्यांचे जीवन धन्य होय. त्यांनी केलेला उपदेश अर्थातच अनुभवावर आधारित आहे. म्हणूनच मोठ्या छान शब्दांत भक्तीभावाने सावित्रीबाई म्हणतात,

''ज्योतिबांचे बोल । मनात परसा
जीवाचा आरसा । पाहते मी
ऐसा बोध देती । अनुभवे ज्योती
मनात ठेविती । सावित्री मी''

(‘काव्यफुले’ संग्रहातील ‘ज्योतिबाचा बोध’ ही कविता पृ.७)

सावित्रीबाईंच्या समकालीनांनी पुष्कळ बोधपर कविता लिहिली आहे. तिचे स्वरूप सत्य आणि शिव आहे, परंतु तिचा आविष्कार सुंदर नाही. सावित्रीबाईंच्या बोधपर कवितेविषयी हेच म्हणता येईल. तरीही त्यांच्या अभंगांची रचना त्याला अपवाद म्हणावी लागेल. त्यात बोध असला, तरी त्यांची रचना शुष्क वाटत नाही. ती प्रसादपूर्ण आणि रसाळ आहे. तसेच त्यांची सामाजिक स्थिती ज्या समाजासाठी आणि ज्या समाजात त्या कार्य करीत होत्या, त्यांचे जे ध्येय होते, ते लक्षात घेता या बोधपर कवितेतही त्यांची अंतरीची तळमळ दिसून येते. यात शंकाच नाही. म्हणूनच कृ.पं. देशपांडे म्हणतात ‘‘उपदेश करणे हे आपले व्रत आहे, ते सांभाळण्याच्या दृष्टीने ही काव्यरचना झालेली असल्याने, त्यात काही अपवाद वगळता फारसे सौंदर्य दिसून येत नाही, हे मान्य करावे लागेल.’’[२१] पण या कवितेची निर्मितीच मुळी प्राधान्याने समाजप्रबोधनासाठी झाली आहे.

समाज प्रबोधन करताना ज्या गोष्टी मनाला रूचल्या, सुचल्या आणि खुपल्यादेखील त्या–त्या गोष्टींवर फारसा सौंदर्याचा नव्हे तर वास्तव सत्याचा विचार करूनच लिहिल्या आहेत. त्यामुळे त्यात सौंदर्य काहीअंशी कमी असले तरी सत्याचा परिमळ आणि आंतरिक तळमळ मात्र नक्कीच आहे. म्हणूनच कवितेच्या बाह्यांगापेक्षा गाभ्याचा मतितार्थ उच्च जीवनमुल्यांचा पुरस्कार करतो आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरतो असे म्हणावे लागेल.

## ३.४.५ आत्मपर कविता

सावित्रीबाईंच्या आत्मपर कवितांमध्ये ‘ज्योतिबांना नमस्कार’, ‘ज्योतिबांचा बोध’, ‘आमची आऊ’, ‘माझी जन्मभूमी’ आणि ‘संसाराची वाट’ या कवितांचा समावेश आहे. स्त्रीच्या भावबंधाशी कायमस्वरूपी जोडलेली बकुळस्मृती म्हणजे तिचे माहेर. या माहेरकडचे म्हणजेच जन्मभूमीचे वर्णन मोठ्या समृद्धतेने त्यांनी रंगविले आहे. नायगाव हे त्यांचे माहेर जरी खेडेगाव असले तरी त्या जन्मभूमीशी असलेल्या चित्रस्मृती शिवार, विहिरी, निसर्ग यांचे रेखाटन चित्रकाराने सुरेख चित्र काढावे तसे केले आहे. हे चित्र आपल्या कवितेतून रेखाटताना सावित्रीबाई म्हणतात,

''बारा बलुती बारा अलुती कितीक जाती जमाती
शिवारात या सुखे नांदती
पाऊसपाणी छान पडतसे येती पिके सारी
विहीरीवर फळे–फुले गोजीरी
गुलजार पक्षी गाती मनोहर फिरती फुलपाखरे
ऐसा निसर्ग तिथे वावरे''

('काव्यफुले' संग्रहातील 'माझी जन्मभूमी' ही कविता पृ.११)

सुखसमृद्ध आणि निसर्गाचे ऐश्वर्य मिळालेल्या भूमीत राहणारी माणसेही मनाने आनंदी आणि थोर आहेत. त्याचे वर्णन करताना सावित्रीबाई म्हणतात,

''बळी राजा थोर होई शेतकरी दानशूर
जणू माझी जन्मभूमी बळीचे कश्यपपूर ।''

('काव्यफुले' संग्रहातील 'माझी जन्मभूमी' ही कविता पृ.११)

अशी जन्मभूमी सावित्रीबाईंना 'फुले कराया' म्हणजेच जीवनात सफलता समृद्धी मिळवायला सांगते आहे आणि तिच फुले त्या जन्मभूमीवरच उधळत आहे.अशाप्रकारे प्रेम, अभिमान, कृतार्थता हे विविध भावदर्शन घडविणारी ही कविता आहे.

'संसाराची वाट' या कवितेत सावित्रीबाईंनी स्वतःला आनंदी, सुखी असण्याचे श्रेय मोठ्या काव्यमय शब्दात, आपल्या पतीला म्हणजेच महात्मा ज्योतिराव फुलेंना दिले आहे. आपले जीवनातील पतीचे स्थान सांगताना पतीला मोठी सुंदर उपमा देतात. 'मकरंद कळीतला' ही उपमा देऊन सावित्रीबाई म्हणतात,

''माझ्या जीवनात ज्योतिबा स्वानंद
जैसा मकरंद कळीतला''

('काव्यफुले' संग्रहातील 'संसाराची वाट' ही कविता पृ.७)

असा भाग्यवान पती मिळाला तर संसारात आनंद राहतो. परंतु या कवितेच्या उत्तरार्धात स्वगत बोलल्याप्रमाणे किंवा उपदेश केल्याप्रमाणे प्रश्नोत्तर मांडले आहे. त्या म्हणतात, संसार करताना थोडाफार त्रास होणारच. पण हा त्रास होते म्हटल्याने त्रास कमी होईल का? म्हणून सावित्रीबाई पुढे म्हणतात,

''करून प्रपंच । आहे तो कठीण

बोलून हा शीण । जाईल का?''

('काव्यफुले' संग्रहातील 'संसाराची वाट' ही कविता पृ.८)

अर्थातच या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी येणार. म्हणून संसार सुखी करायचा असेल तर 'शांतता आपली, ठेवावी प्रपंची' असे त्या सुचवितात.

'ज्योतीबांना नमस्कार' या कवितेत ज्योतिबांविषयी वाटणारा कमालीचा मनापासूनचा आदर, भक्ती प्रगट झाली आहे. शूद्र, अतिशूद्र यांना जागे करून ज्ञान घेण्याची इच्छा त्यांच्यात जागविणारे म्हणून 'ज्ञानामृत आम्हां देई' आणि आमचा उद्धार करणाऱ्याला वंदन असो, असा मनोदय त्या व्यक्त करतात.

महात्मा ज्योतिराव आणि सावित्रीबाई यांच्या घरात ज्योतिरावांच्या वडिलांप्रमाणे ज्येष्ठ 'सगुणाबाई' ऊर्फ 'आऊ' होत्या. सावित्री–ज्योतिबांच्या जीवनात तिचे स्थान अनन्यसाधारण होते. आऊंचा दोघांनाही घडविण्यात मोलाचा वाटा होता. किंबहुना ती त्यांची प्रभावी प्रेरणा होती, हितचिंतक होती. प्रेमळ, कष्टाळू, दयाळू आणि मनाने मोठी असलेल्या आऊचे वर्णन मोठ्या अचूक शब्दात केले आहे.सावित्रीबाई म्हणतात,

''आमची आऊ । फार कष्टाळू

प्रेमळ होती । होती दयाळू

सागर वाटे । उथळ क्षणी

आभाळ ठेंगणे । तिच्याहूनी''

('काव्यफुले' संग्रहातील 'आमची आऊ' ही कविता पृ.९)

आऊच्या अथांगतेपुढे सागर उथळ वाटला अन् तिच्या उंचीपुढे आकाशही ठेंगणे वाटावे असे तिचे स्थान आहे. तिचे घरातील स्थान एवढे की, देवाइतकीच महती वाढली, तिचे वर्णन करताना सावित्रीबाई म्हणतात,

''आऊ आमच्या घरी आली

टाक होऊन । पहा बैसली

मूर्तिमंत जणू विद्यादेवी

हृदयी आम्ही । तिला साठवी ।।

(‘काव्यफुले’ संग्रहातील ‘आमची आऊ’ ही कविता पृ.९)

तिला दिलेल्या उपमांवरून, वर्णनांवरून तिला घराण्यात किती मानाचे स्थान आहे याची कल्पना येते. कवितेतील सागर, आभाळ या कल्पना भव्य, विशाल आहेच परंतु ‘टाक होऊन बसली’ म्हणजे अगदी देवत्वास पावली या कल्पनेत अंतःकरणातील भक्तिभावना, पावित्र्य, मांगल्य आणि अतिव आदर प्रगट होतो. छोटीशी पण उल्लेखनीय स्मरणीय भावपूर्ण अशी ही कविता आहे.

स्वतःसंबंधी किंवा स्वतःच्या जीवनासंबंधी भावना कवितेतून व्यक्त करण्याची प्रथा नसताना सावित्रीबाईंनी आपल्या काव्यात अशा स्वरूपाच्या म्हणजे आत्मपर कविता लिहिल्या. त्या भावपूर्ण तर आहेतच पण त्यांच्या जीवनावर बालपणी झालेले संस्कार स्पष्टपणे दर्शवितात. अंतःकरणातील भावना कवितेत चित्रात्मक शैलीने व्यक्त झालेल्या दिसून येतात.

## ३.४.६ सामाजिक कविता :

सावित्रीबाईंच्या जीवनाला अनेकविध पैलू आहेत. कवयित्री म्हणून त्यांचे रूप पुढे येते ते कधी बळीराजा, शिवाला आणि पतीला मनोभावे पुजणारे, कधी निसर्गातील पानाफुलांशी मनाच्या गुजगोड गोष्टी करणारे, धुंद होऊन कल्पनेच्या कमळाच्या महालात राहणारे, प्रतिसृष्टी निर्माण करण्याची समर्थता तर कधी जमिनीवरच्या आपल्या दीनदलित बांधवांना उपदेश करणारे अशी कितीतरी रूपे त्यांच्या काव्यातून दिसतात. पण त्याहीपुढे जाऊन सामाजिक भान दाखवून आपल्या प्रतिभेने समाजासाठी नुसते बोलून नव्हे तर आपल्या आचरणातून जो आदर्श ठेवतात त्याला तोड नाही. दुसऱ्यांची वेदना जाणवणारी त्यांची संवेदना जागी आहे. ज्यामुळे कलात्मकता, सामाजिकता यांचा सुरेख मिलाफ त्यांच्या कवितेत आढळतो.

सावित्रीबाईंची समाजचिंतनपर कविता व्यापक अशी सामाजिक जीवनमूल्ये रूजविणारी आहे. स्त्री आणि शूद्रातिशूद्र समाजाला उद्देशून त्यांनी सामाजिक कविता लिहिल्या. सामाजिक कवितेतील आशय हा काळाच्या प्रामाणिक भावनेतून निर्माण झाला आहे. माणसाबद्दलचे प्रेम आणि सामाजिक जिव्हाळा त्यांनी लिहिलेल्या कवितेत जाणवतो. सामाजिक कवितांतून त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रगट झालेले दिसून येते. ‘शूद्रांचे दुखणे’, ‘मनू म्हणे’, ‘ब्रह्मवंती शेती’, ‘इंग्रजी माऊली’, ‘शूद्र शब्दाचा अर्थ’, ‘शिकणेसाठी जागे व्हा’, ‘शूद्रांचे परावलंबन’, ‘तयास मानव

म्हणावे का?' 'इंग्रजी माऊली', 'अज्ञान', 'सावित्री' व 'ज्योतिबा संवाद' या त्यांच्या कविता सामाजिक आशय दर्शविणाऱ्या आहेत.

अनिष्ट रूढींच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याचा मार्ग म्हणजे विद्याग्रहण म्हणजे शिक्षण हे सावित्रीबाईंच्या जिव्हाळ्याचे विषय होते. त्यांच्या काही कवितांमध्ये कलात्मकता कमी दिसली तरी त्यात खरा जिव्हाळा असल्याने भावोत्कटता आली आहे. हेच त्यांच्या काव्याचे यश नव्हे का? समाजात एकीकडे आळसात लोळत पडून कोणतेही शारीरिक कष्ट न करता देव धर्माविषयी दांभिकपणे बोलणारे आणि जाती-पातीच्या खुळ्या कल्पनात रमून दीनदलितांच्या शोषणासाठी धर्मग्रंथाचा आधार घेणाऱ्यांना त्यांनी आपल्या काव्यातून फटकारले आहे. तसेच शूद्रादीशूद्रांना मातेच्या ममतेने तळमळीने अज्ञान दूर करण्यास प्रवृत्त केले आहे. त्यासाठी त्यांनी अभिनव पद्धत अवलंबली ती म्हणजे काव्यातून भावप्रगटीकरण, काव्यातून संवाद आणि पारंपरिकतेला फाटा.

फुले दांपत्याच्या अगोदर कोणीही न वापरलेला समाजसुधारणांचा पायंडा त्यांनी नुसत्या उक्तीतून नव्हे तर कृतीतूनही अंमलात आणला. एका स्त्रीने त्या काळात केलेली उक्तीप्रमाणे कृती विशेष उल्लेखनीय, प्रशंसनीय आहे.

समाजसेवेचा वसा घेतलेल्या सावित्रीबाई व ज्योतिराव फुले दांपत्याने समाज उद्धारासाठीच जन्मभर कार्य केले. त्यासाठी त्यांनी कोणत्याही प्रकारच्या मानसन्मानाची अपेक्षा बाळगली नाही. त्यांचे कार्य सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक आणि वैचारिक दृष्टीने विशेष महत्वाचे आहे. कारण तत्कालीन समाजाची स्थिती सावित्रीबाईंनी सामाजिक जाणिवांच्या म्हणजे कवितेच्या रूपाने वाचकांसमोर ठेवली आहे. समाजासमोर जे विविध प्रश्न होते त्यापैकी स्त्री-शूद्रांना शिक्षण देण्याचे व्रत त्यांनी स्विकारले होते. एकूणच तळागाळातील उपेक्षित, वंचित समाजाला त्यांनी अगदी जवळून पाहिलेले होते. समाजव्यवस्थेतील अगदी तळगाळातील शोषित, शूद्र, अतिशूद्र यांची दुःखे प्रामुख्याने कोणती आहेत? दलितांना समाजजीवनात कोणकोणत्या अन्यायाला बळी पडावे लागते हे सावित्रीबाईंनी अगदी जवळून पाहिले होते. शोषितांना-वंचितांना उपेक्षित वर्गाला, दलित समाजाला या गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी आवश्यक गोष्टी-शिक्षण आणि शिक्षणामुळे येणारे आत्मभान लाभले तर हा वर्ग स्वतः आपले हक्क, अधिकार प्रस्थापितांकडून घेतील व त्यांचे जीवन शोषणमुक्त, अत्याचारमुक्त

बनवितील यासाठी त्यांना शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे त्यांना पटले होते. पण अज्ञानाचे मोठे पांघरूण घेऊन झोपलेल्या समाजाला जागे करण्यासाठी आपल्या काव्यातून संदेश त्या देतात. विद्या घेण्याची बंदी पूर्वी होती आता नाही, हे सांगतांना इंग्रज भारतात आले त्याला त्या सुसंधी म्हणतात. कारण सावित्रीबाईंच्या मते ज्ञान घेण्याची संधी केवळ इंग्रजांमुळे शूद्रातिशूद्रांना मिळालेली आहे. फक्त सावित्रीबाईंनाच नव्हे तर नवीन विचारांचा, सुधारणांचा स्वीकार करणाऱ्यांनाही असेच वाटत होते. त्यामुळेच स्वामी विवेकानंद म्हणतात, ''तुमची ही चैतन्यशून्य क्रियाशून्य सभ्यता भग्न करण्यासाठी ईश्वराने इंग्रज सरकारला भारतात पाठविले.''[२२] पूर्वजांच्या अत्याचारामूळे ज्यांची पशुवत दशा झाली आहे अशा आपल्या बांधवांना पुन्हा माणसात आणण्यासाठी निःस्वार्थपणे शिक्षण देण्यासाठी सावित्रीबाईंनी कंबर कसून सुरूवात केली. या निद्रिस्तबांधवांना आवाहन करताना सावित्रीबाई म्हणतात,

''उठा बंधुनो अतिशुद्रांनो । जागे होऊनी उठा
परंपरेची गुलामगिरी ही । तोडणेसाठी उठा
बंधुनो शिकणेसाठी उठा ।
ज्ञानदाते इंग्रज आले । विद्या शिकुनी घ्या रे
ऐसी संधी आली नव्हती । हजार वर्षे रे
मुलाबाळांना आपण शिकवू । आपण सुद्धा शिकू
विद्या होऊन ज्ञन वाढवून । नीतीधर्महि शिकू।।''

('काव्यफुले' या संग्रहातील 'शिकणेसाठी जागे व्हा' ही कविता पृ.२४)

केवळ ज्ञानसंपन्न होऊन थांबू नका तर सुसंस्कारीतही व्हा हे सांगतांना नीतीधर्मसुद्धा शिका हे सावित्रीबाई आवर्जून सांगतात. संस्कारविना शिक्षण, नीतीमत्तेविना ज्ञान उपयोगी नाही. पण वर्षानुवर्षे त्यांना शूद्रातिशूद्र म्हणून ज्ञान संपादनासाठी बंदी होती. त्याामुळे त्यांच्या पिढ्यानपिढ्या अज्ञानात दारिद्र्यात पिचलेल्या या परिस्थितीचे निरीक्षण करून स्वामी विवेकानंद म्हणतात, ''आपल्या देशात जर एखाद्याचा खालच्या जातीत जन्म झाला तर तो कायमचा वाया गेला असे समजावे, त्याच्या उन्नतीची मग काही आशा उरत नाही''[२३]. हे असे का?असा प्रश्न स्वामी विवेकानंदांनाही अस्वस्थ करतो. शिकागो येथून श्री. हरिपद मित्र यांना पाठविलेल्या पत्रात त्यांनी हे लिहिले आहे. अज्ञानी, गरिबीने गांजलेल्या या लोकांच्या मनात

रम्य आशा पल्लवीत करण्यासाठी, एक नव विचार, नवा जोश निर्माण करण्यासाठी आणि शूद्रत्व मिटवून टाकण्यासाठी निर्माण करण्यास सावित्रीबाई सांगतात. यशशिखराची स्वप्ने दाखवितात. आशावादी सावित्रीबाई म्हणतात,

''नसानसातून इर्षा खेळवू । विद्या मी घेईन
शुद्रत्वाचा डाग हा माझा । निपटून काढील
राज्यात बळीच्या । आम्हास विद्या घडो
यशाची आमच्या । दुंदुभी नगारे झडो ।।''

('काव्यफुले' संग्रहातील 'शिकणेसाठी जागे व्हा' ही कविता पृ.२५)

कधी समजावून, कधी परिस्थितीचे भान देऊन कधी नव्या आशेचे किरण दाखवून, ऊठा, जागे व्हा, विद्या घ्या, परंपरेच्या बेड्या तोडा हे पुन्हा-पुन्हा सांगताना सावित्रीबाई बहिणीच्या कळवळयाने त्यांना 'बंधुनो' अशी हाक मारतात. सर्व मानवांचे ऐक्य व्हावे, सर्वांना समान संधी मिळावी, सर्वांचे हित व्हावे या हेतूने प्रेम हीच शक्ती आणि त्यागमय जीवन हेच ज्यांचे वैभव त्या सावित्रीबाई 'बंधुनो' अशी हाक आपल्या दलित, गरीब बांधवांसाठी देऊन एका नवीन जगात सन्मानाने प्रवेश करायला प्रवृत्त करतात.

शूद्र लोकांची दयनीय अवस्था ज्यामुळे झाली याचे कारण अनिष्ट चालीरीती हे आहेच पण या रूढी परंपरा निर्माण होण्यास कारणीभूत घटकांचे वर्णन करताना पांडूरंग बाळाजी कवडे म्हणतात, ''पुराण ग्रंथातील साऱ्याच गोष्टी असंभाव्य व काल्पनिक आहे. त्यामुळे हिंदूंची मने दुर्बल बनली. पृथ्वी शेषाच्या डोक्यावर आहे. समुद्राचे पाणी खारे असण्याचे कारण अगस्ती ऋषींनी समुद्रप्राशन केले, नंतर लघवीवाटे सर्व पाणी बाहेर टाकले. त्यामुळे समुद्राचे पाणी खारट झाले. चंद्र-सूर्याचे ग्रहण म्हणजे राहू-केतू नावाचे राक्षस त्यांना मिळतात. दानधर्म केला म्हणजे ते त्यांना परत ओकतात व ग्रहण सुटते अशा अनेक गोष्टींनी आमची सारी पुराणे बरबटलेली आहेत. अशा पुराणांवर जे विश्वास ठेवणार नाहीत त्यांच्या संसाराची राखरांगोळी होऊन शेवटी नरकवास, अशी भीती प्रत्येक पुराणकाराने घातली. त्यामुळे समाज अंधश्रध्देने पुराणांवर विश्वास ठेवतो. कल्याण प्रांतात भूकंपाचा धक्का बसला, त्याचे कारण शेषास पृथ्वीचे ओझे सहन झाले नाही म्हणून पेशव्यांनी होमहवने करून लाखो रूपये खर्च केले. पंढरपूर

येथील विठ्ठलाच्या डोक्यावर पाल पडली, त्यावेळी पेशव्यांनी बराच खर्च केला, अशा तऱ्हेचे उल्लेख आढळतात''[२४].

दिवसेंदिवस धर्माच्या नावाखाली या गोष्टींचे अवडंबर माजविण्यात आले. याची परिणिती शूद्रातिशूद्रांची स्थिती अधिकाधिक दुर्बल होत गेली. दारिद्र्य व दुर्बलता सगळया गुणांवर पाणी फिरविते. स्वामी विवेकानंद म्हणतात, ''भारतवासियांची सभ्यता 'ममी' सारखी पेंढा भरलेली होऊन बसण्याचे एक कारण म्हणजे त्यांचे पराकाष्ठेचे दारिद्र्य हे होय. सर्वसामान्य हिंदू माणसाला त्याच्या रोजच्या गरजेच्या वस्तूंची चणचण इतक्या भयानकपणे जाणवते की त्यामुळे त्यांना रोजच्या इतर गोष्टींचा विचार करावयास अवसर मिळत नाही''[२५]. अशा दुःखी शूद्र आणि अतिशूद्र यांच्या पराकोटीच्या दैनावस्थेचे वर्णन 'शूद्रांचे परावलंबन या कवितेत देव–धर्माच्या असुर–अधर्माच्या कल्पना आणि अज्ञानामुळे त्यांची झालेली अवस्था अगदी अचूकपणे व्यक्त करताना सावित्रीबाई म्हणतात,

''शूद्र आणि अतिशुद्र । अज्ञानाचे पछाडले ।
देव धर्म रूढी अर्थी । दारिद्र्याने गळाले ।
सुखाची नसते हाव । दुःखास सुख मानती ।
विधाते निर्मिले जैसे । रहावे बोध सांगती ।''

('काव्यफुले' संग्रहातील 'शूद्रांचे परावलंबन' ही कविता पृ.२५)

अज्ञान आणि दारिद्र्य यामुळे शूद्र आणि अतिशूद्र यांची मने बधिर झाली आहेत. त्यामुळे ते दुःखालाच सुख म्हणून कवटाळित आहेत. मृत्यूनंतर कुणीही न पाहिलेला स्वर्ग मिळावा म्हणून ते उच्चवर्णियांची सेवा करतात. त्यांना ज्ञानाचे डोळेच प्राप्त झालेले नसतात. वर्षानुवर्ष ही चाकोरी चालू आहे. शूद्रांची वर्षानूवर्ष होत असलेली ससेहोलपट व्यक्त करताना 'शुद्रांचे दुखणे' या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

''दोन हजार वर्षाचे । शूद्रा दुखणे लागले
ब्रह्मविहित सेवेचे । भू–देवांनी पछाडले
अवस्था पाहूनी त्यांची । होय शब्दी मन उठे
सुलभ मार्ग कोणता काय । विचारे बुद्धी अटे
शूद्रांना सांगण्याजोगा । आहे शिक्षण मार्ग हा
शिक्षणाने मनुष्यत्व । पशुत्व हाटते पहा ।।''

('काव्यफुले' संग्रहातील 'शूद्रांचे दुखणे' ही कविता पृ.१७)

दोन हजार वर्षापासून ब्रह्मविहीत लोकांची, स्वतःला लोकांची, स्वतःला भूदेव समजणाऱ्या ब्राह्मणांची सेवा करण्याचे दुखणे शूद्रांना लागले आहे. वर्षानुवर्ष त्यांना गुलामगिरीत रहावे लागत आहे. त्यांची ही अवस्था पाहून मनातून काही शब्द सूचत नाहीत. अशी त्यांची स्थिती होते. सावित्रीबाई अस्वस्थ होतात. हाच विचार स्वामी विवेकानंदही करतात ते म्हणतात'', हे जे हजारो साधू, ब्राह्मण आहेत, ते आपल्या अवनत, दलित, गरीब बांधवांसाठी काय करीत आहेत? केवळ 'मला शिवू नका', 'मला शिवू नका' हाच घोष! एवढ्या चांगल्या सनातन धर्माची त्यांनी काय दशा करून टाकली आहे! आता धर्म कुठे? तो आता केवळ 'मला शिवू नका' या शब्दांतच साठला आहे! आपल्या देशात चोहोकडे जे अस्पृश्य समजले जातात त्यांच्या उन्नतीसाठी आपण काय करीत आहोत? आपण त्यांना स्पर्श करीत नाही, आपण त्यांना 'दूर व्हा' असे म्हणतो. आपण काय माणसे आहोत?''[२६] सावित्रीबाईंच्या संवेदनशील मनाला ही स्थिती दिसते. भावनाप्रधानतेबरोबर बुद्धीची जोड मिळाली त्यामुळे त्यांचे मन शूद्रांना यातून मुक्त करण्याचा मार्ग शोधते. या स्थितीतून उन्नत होण्यासाठी विकास करून घेण्यासाठी त्यांच्या मते एकच मार्ग तो म्हणजे शिक्षण होय. शिक्षणामुळे त्यांचे पशुत्व संपून त्यांना मनुष्यत्व प्राप्त होईल. त्यांना त्यांच्या अज्ञानातून मुक्ती मिळून स्वत्वाची जाणीव होऊन उन्नत होण्याची संधी लाभेल असे सावित्रीबाईंना वाटते, म्हणून शिक्षणाशिवाय माणूस म्हणजे पशू अशी त्यांची धारणा आहे. पण मग शूद्र कोण आहेत? त्यांचा इतिहास काय? पूर्व ज्यांचे दिव्य त्यांचा उज्ज्वल भविष्यकाळ असे म्हटले जाते म्हणून या शूद्रांचा स्वाभिमान जागविण्यासाठी त्यांना प्रेरणा देण्यासाठी सावित्रीबाई त्यांना पूर्वेतिहास सांगतात.

'शूद्र शब्दाचा अर्थ' या कवितेत शूद्र या शब्दाचा 'नेटिव्ह' हा अर्थ असल्याचे सांगितले आहे. भारताचे शूद्र हेच खरे धनी कसे होते, हा विचार व्यक्त केला आहे. सावित्रबाई म्हणतात,

''खरे शूद्र धनी । होते इंडियाचे
नाव असे त्यांचे । इंडियन ।।
होते पराक्रमी । आमचे पूर्वज
त्यांचेच वंशज । आपण रे ।।''

('काव्यफुले' संग्रहातील 'शूद्र शब्दाचा अर्थ' ही कविता पृ.२२)

भारताचे खरे धनी शूद्र हेच असून त्यांचे नाव इंडियन असे होते. हे आमचे पूर्वज अतिशय पराक्रमी होते. अशा या पराक्रमी पूर्वजांचे आपण वंशज आहोत, हेच सावित्रीबाईंना सूचवायचे आहे. ज्याप्रमाणे जिजाबाईंनी शिवाजी महाराजांना आपल्या पूर्वजांच्या गोष्टी सांगून स्वराज्यस्थापनेची प्रेरणा दिली, त्याप्रमाणे सावित्रीबाई आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाची माहिती देत, शूद्रातिशूद्रांना गुलामगिरीतून मुक्त होण्याची प्रेरणा देतात. आपला गौरवशाली इतिहास तत्कालीन समाजापुढे मांडून सावित्रीबाईंना शूद्रांना गुलामगिरीविरुद्ध, अन्यायाविरूद्ध उभे करायचे होते हेच दिसते.

'इंग्रजी माऊली' या कवितेतून त्यांनी शिक्षणाचे महत्व सांगितले आहे, इंग्रजी शिक्षणास सावित्रीबाईंनी मातेसमान मानले आहे. मोगलाई किंवा पेशवाईप्रमाणे शूद्रांवर अन्याय किंवा त्यांना शिक्षणापासून दूर ठेवले जाणार नाही म्हणूनच सावित्रीबाई म्हणतात,

''इंग्रजी माऊली । शुद्रांना पान्हा पाजी
संगोपन आजी । तोडते पशुत्व
इंग्रजी माऊली । तोडते पशुत्व
देई मनुष्यत्व । शुद्रलोका ।।

('काव्यफुले' संग्रहातील 'इंग्रजी माऊली' ही कविता पृ.२१)

जसे आई आपल्या बाळाला पान्हा पाजते, बाळाचे संगोपन करते, तसेच इंग्रजी माऊली आपले संगोपन करते. आपली पशूत्वातून म्हणजे गुलामगिरीतून सुटका करून शूद्र लोकांस मनुष्यत्व प्रदान करते. इंग्रजी ज्ञानाचे महत्त्व सावित्रीबाईंना समजले होते. म्हणूनच ज्ञानाचे दरवाजे खुले करणाऱ्या इंग्रजीच्या शिक्षण घेण्याचा आग्रह त्या करतात. येथे इंग्रजी शिक्षणाचा गौरव केला आहे.

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. त्यापैकी अन्न ग्रहण करण्याला आपल्या संस्कृतीत तर 'यज्ञकर्म' असे संबोधले आहे. असे जीवांना जीवन देणारे अन्न पूर्ण ब्रह्म असेल आणि 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' या भावनेने जर आपण अन्नग्रहण करीत असू तर अन्नधान्य पिकवितात त्या शेतीला ब्रह्मच म्हटले पाहिजे. हे सांगताना 'ब्रह्मवंती' शेती या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

'ब्रह्म असे शेती । अन्नधान्य देती
अन्नास म्हणती । परब्रह्म ।।
शूद्र करी शेती । म्हणोनिया खाती ।
पक्वान्न झोडती । अहं लोक ।।
दारूडे बोलती । तैसे हे वागती ।।
मतलब नीती । वाचाळांची ।
जे करिती शेती । विद्या संपादती ।।
तया ज्ञानवंती । सुखी करी ।।''

('काव्यफुले' संग्रहातील 'ब्रह्मवंती शेती' ही कविता पृ.२०)

शेती, श्रम आणि ज्ञानाचे एकत्रित महत्त्व 'ब्रह्मवंती शेती' या कवितेत सांगितले आहे. सावित्रीबाई म्हणतात, अन्नधान्य देणारी शेती म्हणजे ब्रह्म व अन्न हे परब्रह्म आहे. शूद्र लोक शेती करतात म्हणूनच अहंकारी उच्चवर्णीय पंचपक्वान्न खातात. तरीसुद्धा हे लोक दारूड्या लोकंसारखे काहीही बोलतात. स्वतःला श्रेष्ठ तर शूद्रांना पापी समजतात. तरीही ते शूद्रांनी पिकविलेले अन्न खातात. म्हणूनच अहंकारी लोकांची तुलना निरर्थक ताळतंत्र नसणाऱ्या दारूड्यांशी केली आहे. राजाराम सुर्यवंशी म्हणतात, ''पुराणे म्हणतात ब्रह्मा म्हणजे जगाचे पालनपोषण करणारा! तर मग शूद्र शेतकरी हा सुध्दा शेतात कष्ट करून धान्य पिकवितो व जगाचे पालनपोषण करतो. म्हणून तोही ब्रह्माच नव्हे काय? असा आशय आपल्या कवितेत ओतून सावित्रीबाई आपल्या 'ब्रह्मवंती शेती' या कवितेत म्हणतात की, शेतीचे कष्टमय काम व ज्ञानवृध्दी यांची सनातन्यांनी जाणूनबुजून फारकत करून शेतकरी दादाला, बळीराजाला ज्ञानवंचित करण्यात आले''[२७] म्हणूनच सावित्रीबाई कृषीपुत्रांच्या घरी ज्ञानगंगा आणून 'ब्रह्मवंती शेती' अर्थात सुखी, सुशिक्षित आधुनिक शेतकऱ्याची संकल्पना मांडतात. जे शेती करतात, श्रम करतात, त्याचबरोबर विद्यासंपादन करतात त्यांना ज्ञानदेवी सुखी करते. असेही सावित्रीबाईंनी सांगितले आहे. ब्रह्मवंती, ज्ञानवंती शब्दांचा सुरेख वापर केला आहे.

समाजात असे हजारो लोक आहेत की, ज्यांच्या ठिकाणी निरनिराळ्या क्षेत्रात सर्वोच्च स्थान प्राप्त करून घेण्याची क्षमता आहे. परंतु जाती धर्माच्या उतरंडीवर व्यक्तीने त्याच्या जातीबंधनात अडकून विशिष्ट धंदाच पूर्वापार करावा असे गृहीत धरले होते. इतकेच नव्हे तर

जातीनिहाय हा धंदा उच्च, तो धंदा नीच असे वर्गीकरणही केले गेले होते, ज्याला कोणताही ठोस आधार नव्हता, त्याबद्दल जनसमुदायाला जागृत करताना 'मनू म्हणे' या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

''शूद्र जन्म घेती । पूर्वीची पापे ।
जन्मी या फेडती । शूद्र सारे ।।
विषम रचती । समाजाची रीती ।
धूर्तांची ही निती । अमानव ।।

('काव्यफुले' संग्रहातील 'मनू म्हणे' ही कविता पृ.१९)

या कवितेत ब्राह्मणप्रधान संस्कृतीवर वैचारिक हल्ले केले आहेत. मनुकाळातील अमानवी धूर्त नीती कशी होती व समाजरचना कशी विषम होती, याचे वर्णन केले आहे. जे शेती करतात ते मठ्ठ असतात. त्यामुळे ब्राह्मणांनी शेती करू नये अशी धर्माज्ञा मनुस्मृतीत केली आहे. तसेच पूर्वी ज्यांनी पापे केली आहेत, असे लोक या जन्मी जन्मतात व पापे फेडतात. अशा तऱ्हेने समाजाची ही अमानवी, धूर्त व विषम नीती मनू सांगतो, त्याचा निषेध करताना धूर्तांनी आपल्या स्वार्थासाठीच अशी समाजरचना केली आहे असे सावित्रीबाई म्हणतात.

प्राणीसृष्टीत वेगवेगळया प्राण्यांना वेगवेगळया क्षमता दिल्या आहेत. काही प्राण्यांना संरक्षणासाठी लांब अणकुचीदार नखे, काहींना धारदार दात, वेगाने पळण्यासाठी मजबर्धी खूर, तीक्ष्ण दृष्टी, तर काहींची घाणेंद्रिये अतिशय संवेदनशिल आहेत. मानवाला या निसर्गदत्त क्षमता फार मोठ्या प्रमाणावर मिळाल्या नसल्या तरी त्याच्या शरीरावर असणारे मस्तक हे वेगवेगळ्या युक्त्या लढवून आपल्यापेक्षा ताकदवान प्राण्यांनाही कब्जात ठेवू शकते. माणूस विचार करून अडचणीतून सहज मार्ग काढू शकतो, कारण त्याच्याकडे असणारी तर्कशक्ती बुध्दी ही आहे. एखाद्या गोष्टीला जाणून घेणे म्हणजेच ज्ञान. ज्ञान ही एक मोठी शक्ती आहे. ज्यायोगे मानव सुख–समृध्दी ऐहिक गोष्टींचा लाभ घेऊ शकतो, पशू–पक्षी, प्राणी हे विद्येशिवाय जगतात आणि गुलामगिरीचे दुःख मुकाट्याने सोसतात. सावित्रीबाईंनी शिक्षकी पेशा स्वीकारल्यामुळे आपल्यासमोरील चिमुकल्या मुलांशी संवाद साधताना एक कोडे किंवा एक प्रश्न त्या टाकतात. 'अज्ञान' या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

''एकच शत्रू असे आपला
काढू पिट्टून मिळुनि तयाला
त्याच्याशिवाय शत्रू नाही
शोधून काढा मनात पाही''

('काव्यफुले' 'संग्रहातील 'अज्ञान' ही कविता पृ.३२)

या जगात आपला एकच शत्रू आहे आणि आपल्याला त्याला सर्वांनी मिळून आपल्यातून दूर पिटाळायचे आहे. त्यासाठी सावित्रीबाई मुलांना तो शत्रू शोधायला, पहायला सांगतात. लवकर विचार करून भरकन नाव सांगण्याचे मुलांना आवाहन करतात. मुलांशी सरळ-सरळ सोपा संवाद साधताना त्या शोधला का?पाहिला का? कबूल का? अशी लय, गेयता साधतात आणि कवितेच्या शेवटच्या कडव्यात त्याचे उत्तर 'अज्ञान' हे सांगतात. स्वामी विवेकानंद म्हणतात, ''गरीब लोक हे जे पशुवत जीवन कंठीत आहेत त्याचे कारण अज्ञान हेच होय.''[२८] विद्या हेच श्रेष्ठ धन आणि अज्ञान हा आपला शत्रू व शूद्रांचा परावलंबनाला कारणीभूत होणार आहे. या कवितेत पुढे म्हणतात,

''सांगते पहा दुष्ट शत्रूचे
नाव नीट रे एक तयाचे
'अज्ञान'
धरूनी त्याला पिटायाचे
आपल्यामधुनि हुसकायाचे''

('काव्यफुले' संग्रहातील 'अज्ञान' ही कविता पृ.३२)

सावित्रीबाई पुन्हा-पुन्हा 'अज्ञाना'ला आपल्यातून हद्दपार करावयास सांगतात. कारण त्यांनी ज्ञानाचे दिव्यामृत अनुभवले आहे.

सावित्रीबाईंची पुढची कविता, 'तयास मानव म्हणावे का?' ही बारा कडव्यांची दीर्घ कविता आहे, ज्याला ज्ञान नाही, विद्या नाही, जो काहीही काम न करता आयते खातो. पशूंनाही जे कळते ते ज्याला कळत नाही अशाला मानव म्हणावे का? स्वतःची बुध्दी असून न चालविणारा, आचार-विचार चांगले नसणारा आणि निरूद्योगी माणसाला मानव कसे म्हणावे असे अनेक प्रश्न त्यांनी कवितेत विचारले आहेत. 'दे रे हरी पलंगावरी' सारख्या म्हणी वापरून

आळशी माणसाला फटकारले आहे. जनावरेसुद्धा अशी वागत नाहीत त्याची खंत मनी बाळगण्यास सांगून निरोद्योगी माणूस, निर्धन बनतो. अर्थातच अशा गरीब माणसाला कोणाचीही मदत मिळत नाही, सहानुभूतीही मिळत नाही. पण अशा स्थितीला तोच जबाबदार आहे, असे सावित्रीबाईंचे मत आहे. कारण पशुपक्षी सुध्दा उदरनिर्वाहासाठी, कुटूंबासाठी कष्ट करतात. म्हणून घरातील इतर व्यक्ती कष्टत असताना हा नुसता आयते खातो त्याला 'ऐतोबा' असे सावित्रीबाई संबोधतात. याला मानव म्हणावे का? असा प्रश्न करून नुसत्या कल्पनेच्या भुलभुलैयात रमणाऱ्या व्यक्तीला सावित्रीबाई विचारतात,

''ज्योतिष रम सामुद्रिक हो
स्वर्ग नरकाच्या कल्पनाही
पशुत नाही त्या जो पाही
तयार मानव म्हणावे का?''

('काव्यफुले' संग्रहातील 'तयास मानव म्हणावे का?' ही कविता पृ.२७)

विचित्र भ्रामक कल्पना, अंधश्रद्धा यांचा जेव्हा सुळसुळाट झाला होता. उच्चवर्णियांपासून ते तथाकथित शूद्रादीशूद्रांपर्यंत या अंधश्रद्धा समाजावर एवढया पक्क्या रूजल्या होत्या की भल्याभल्यांनाही त्या तडाख्यातून कशीबशी आपली सुटका करून घ्यावी लागली. पांडुरंग बाळाजी कवडे म्हणतात, ''स्वर्ग नरक हे काल्पनिक असून स्वार्थी लोकांनी त्याचे नुसते बंड माजविले आहे''[२९]. ही गोष्ट धर्मबाह्य ती गोष्ट शास्त्रबाह्य, हे अवडंबर माजवून शास्त्राच्या विरूध्द वर्तन करणारे नरकात जातात. अशा कल्पनांनी लोकांना भयचकित करून सोडले होते.

स्वामी विवेकानंद म्हणतात, ''श्रुति या ग्रंथात 'नरक' या शब्दाचा उल्लेख कोठेही नाही. हा शब्द पौराणिक काळी उत्पन्न झाला''[३०]. हे सारे खरे असले तरी आपण ज्या समाजात राहतो त्याच्या सहजासहजी विरूद्ध जाता येत नाही हे एका घटनेवरून सांगता येईल 'पंचहौद मिशन' या ख्रिस्ती संस्थेच्या समारंभासाठी पुण्यातील प्रतिष्ठित असे ब्राह्मण गृहस्थ आले होते. या समारंभात अतिथींच्या स्वागतासाठी अगदी छोटी बाब करण्यात आली. जी गोष्ट कोणी पाहुणा घरी आला की अगदी न सांगताही घडते. या समारंभात ख्रिश्चन लोकांनी प्रतिष्ठित गृहस्थांना चहा दिला. पांडुरंग बाळाजी कवडे म्हणतात ''त्या समारंभात ख्रिश्चन लोकांच्या हातचा चहा ते प्याले म्हणून ब्राह्मणांनी त्या मंडळींवर बहिष्कार टाकला. त्यात न्या.रानडे,

लोकमान्य टिळक वगैरे सापडले. शंकराचार्यांनी या प्रकरणासाठी कमिशन पाठविले. टिळकांनी चहा घेतल्यानंतर श्री क्षेत्र काशीस जाऊन प्रायश्चित घेतल्याचा दाखला दिला''[३१]. टिळकांबरोबर सर्व उपस्थित गृहस्थांनी शंकराचार्यांच्या आज्ञेस मान तुकवून प्रायश्चित घेतले. समुद्रगमनदेखील त्या काळी धर्मबाह्य मानले जाई. परंतु जगाच्या इतिहासाची तोंडओळख असणाऱ्या न्यायमूर्ती रानडे आणि लोकमान्य टिळकांसारख्या व्यक्तींना देखील समुद्रगमनाचे अर्थात समूद्रातून प्रवास केल्याचेही प्रायश्चित घ्यावे लागले होते. ज्या बहिष्काराच्या अस्त्रापुढे त्याकाळी सर्वच पुढाऱ्यांनी मान वाकविली होती. त्याला विरोध करणे कितीतरी कठीण होते हे उपरोक्त प्रसंगावरून स्पष्ट होते. शिकलेल्या लोकांना जर एवढा त्रास तर न शिकलेल्या अज्ञानी बांधवांना, स्वर्ग–नरकाच्या कल्पना थोतांड आहे हे आत्मविश्वासाने सांगण्याचे केवढे मोठे धैर्य सावित्रीबाईंनी केले होते हे लक्षात येते. या कवितेत सावित्रीबाई पुढे म्हणतात,

''संसारी दारिद्र्य राही
पांघरून तयावर नाही
निंदिती सगळे लोकही
तयास मानव म्हणावे का?
लिहीणे वाचणेही नाही
उपदेश पटायचा नाही
पशूंना कळे ते न कळेही
तयास मानव म्हणावे का?''

('काव्यफुले' संग्रहातील 'तयास मानव म्हणावे का?' ही कविता पृ.२८)

संसारात वित्त आणि शरीरात पित्त यांचे संतुलन नसेल तर सर्व कामे बिघडतात. अतिसंपत्ती असेल तर तिचा योग्य विनियोग करण्यासाठी ज्ञान हवेच आणि संपत्ती नसेल तरीही दारिद्र्य हटविण्यासाठी ज्ञान हवे. पण खूप सांगूनही ज्याला ज्ञानसंपादनेचे महत्व कळत नाही. उपदेश पटत नाही. अर्थातच पशूंना जे स्वतःचे हित कळते ते देखील त्यांना कळत नाही. तो खरेच मानव म्हणण्यास पात्र नाही. कारण जनसामान्य सर्वसाधारणपणे धनवानांना नसलेले गुण चिकटवितात, त्यांच्याशी जवळचे नाते दाखवितात तर निष्कांचन माणसाचा मात्र वारंवार अपमान होतो.

विद्याहीन, भ्रामक कल्पनांत रमलेला, अंधश्रद्धेमुळे सारासार विवेक गमावलेला आणि संपत्ती नसलेला माणूस, माणूस राहातच नाही मुळी, तो सदासर्वदा परस्वाधीन राहतो. अर्थातच पशुवत जीवनामुळे गुलामगिरीत पडतो. पण आपण गुलामगिरीत आहोत हेही जर जाणवत नसेल तर त्याहून वाईट अवस्था नाही. सावित्रीबाई याविषयी म्हणतात,

''गुलामगिरीचे दुःख नाही
जराही त्यास जाणवत नाही
माणुसकीही समजत नाही
तयास मानव म्हणावे का?''

('काव्यफुले' संग्रहातील 'तयास मानव म्हणावे का?' ही कविता पृ.२८)

ब्रिटीश राजसत्तेने नुसते राजकीयदृष्टया गुलाम केले. परंतु हजारो वर्षे शूद्रादीशूद्र समाजास जातीसंस्थेने बौद्धिकदृष्टया गुलाम केले. पुढारलेल्या समजल्या जाणाऱ्या वर्गाने बहुजन समाजास अन्नास महाग, कपड्यास पारखे, मूलभूत सुविधांपासून आणि माणूसकीपासून दूरदूर नेले. महाकवी होमर म्हणतो, "The day that reduces a man to slavery takes from him the half of his virtue." [३२]

म्हणजे ज्या दिवशी मनुष्य गुलाम होतो तेव्हा त्याची नीती किंवा सद्‌गुण नाहीसे होऊ लागतात. म्हणूनच विश्वव्यापी मानवतेच्या मानवाच्या कल्पनेला जागविण्यासाठी गुलामगिरी ही नेहमीच निंदनीय आहे. कृ.पं.देशपांडे म्हणतात, ''सावित्रीबाई, गुलामगिरीचे दुःख ज्याला नाही त्याला मानव म्हणावे का? असा प्रश्न विचारतात. एखादे वेळी ही गुलामगिरी रूढींची, अंधश्रध्देचीही असू शकेल. कोणतीही गुलामगिरी असली, तरी ती ठोकरून दिली पाहिजे, नाहीशी केली पाहिजे, मानवाने स्वतंत्र झाले पाहिजे, ही कल्पना निश्चितच स्वागतार्ह आहे. या दृष्टिने ही कविता लक्षणीय आहे.''[३३]

चांगल्या मुल्यांचा पुरस्कार, दुर्गूणांचा तिरस्कार मानवाचे मानव म्हणून असलेले कर्तव्य, कधी मृदू शब्दांत तर कधी धिक्कारून गुन्ह्याचा जाब विचारावा तसे त्या विचारतात. समाजजागृतीसाठी रोजच्या समाज व्यवहारातील गोष्टींचे दाखलेही देतात.

या दीर्घकवितेच्या शेवटच्या कडव्यात जीवनाचे अंतिम सत्य सांगतात. सावित्रीबाई म्हणतात,

''पशुपक्षी माकड माणुसही
जन्ममृत्यू सर्वांनाही
याचे ज्ञान जराही नाही
तयास मानव म्हणावे का?''

('काव्यफुले' संग्रहातील 'तयास मानव म्हणावे का?' ही कविता पृ.२८)

महाभारतात पांडवांच्या वनवासातील एका प्रसंगी यक्षाने ज्येष्ठ पांडव युधिष्ठिराला एक प्रश्न विचारला आहे. यक्षाने विचारले, 'किम् आश्चर्यम्?' साऱ्या जगात सगळ्यात आश्चर्यकारक ते काय आहे? त्याचे उत्तर युधिष्ठिराने मोठे मार्मिक दिले आहे ते असे की, आपला एक दिवसदेखील असा जात नाही जेव्हा प्राणी मरताना दिसत नाही. तरीही मानव मात्र अमरपट्टा घेऊन आल्याप्रमाणे वागत असतो. म्हणजेच अहर्निश समोर मृत्यू थैमान घालीत असूनसुध्दा, आपणही मरणार आहोत, यावर माणसाचा विश्वासदेखील बसत नाही. क्षणभंगुर असे आयुष्य माणसाने सत्कारणी लावावे, माणूस म्हणून जगावे अशी अपेक्षा व्यक्त करताना सावित्रीबाई आपल्या आजुबाजूचा सहजसोपा दृष्टांत देतात. म्हणजे नानाविध लहानमोठे पशु-पक्षी, या सर्वांना जसा जन्म आहे तद्वत मृत्यूही आहे. याची जाणीव करून देतात आणि सृष्टिचक्रातील उत्पत्ती-स्थिती-लय या गोष्टींचे ज्ञान नसणाऱ्याला मानव कसे म्हणावे असा प्रश्न उपस्थित करतात.

प्रस्तुत कवितेत शिक्षणाचे, उद्योगशीलतेचे महत्त्व संसारातील गोष्टींना द्यायचा प्राधान्यक्रम, सेवा, दया, त्याग या सद्गुणांचे महत्व आणि स्वस्थितीचे भान यावर विस्तृत भाष्य सावित्रीबाईंनी केले आहे. याबाबत कृ.प.देशपांडे म्हणतात, ''सावित्रीबाईंनी या साऱ्या समाजस्थितीचे अवलोकन करून त्याला काव्यरूप दिले, ही त्या काळाच्या दृष्टीने निश्चितच महत्त्वाची गोष्ट आहे. समाजातले दुःख, वेदना या काव्यरूप घेऊ शकतात, त्या 'भावांचे' ही गीत होऊ शकते. हे त्यांनी इतर काही समकालीनांच्या बरोबर दाखवून दिले. एका तळागाळातल्या स्त्रीला समाजसेवा करता करता हे दुःख भावते आणि ती त्याला काव्यरूप देते. हे तिच्या काव्याचे वैशिष्टय आहे.''[३४]

सावित्रीबाईंच्या आणखी एका कवितेत गुलामगिरीचा नुसता उल्लेख नाही तर ती नष्ट करण्यासाठी काय करावे हे त्यांनी सांगितले आहे. गुलामगिरी आचारांची असो की, विचारांची

ती सारासार विवेकबुद्धी नष्ट करते. आजच्या विज्ञानयुगात शोधांची क्रांती, नवविचारांची दालने खुली होत आहेत. भौतिक सुखसुविधांची रेलचेल आहे आणि एखादी घटना घडल्यावर तिचे वास्तव समीक्षणही होते. निसर्गातील नित्य घटनांव्यतिरिक्त अतिवृष्टी किंवा अवृष्टी या घटनांवर काही वेळा मानवीय नियंत्रण नसते. पण म्हणून आजचा माणूस त्याचा संबंध पापांशी नक्कीच जोडणार नाही. पण ज्या काळात दुष्काळासारख्या आपत्ती येत होत्या त्याकाळी सावित्रीबाईंनी इ.स. १८७७ साली महाराष्ट्रात जो भीषण दुष्काळ पाहिला त्याहुन अधिक मानवतेचा दुष्काळ अनुभवला, त्या विरोधाभासातून काही ओव्या आपोआप जन्माला आल्या. त्या ओव्यांमध्ये दुष्काळाचे कारण प्रतिपादन करून हा देवाचा कोप नाही हे ठामपणे सांगताना सावित्रीबाई म्हणतात,

''नाही पाऊस पडला कोठेही । म्हणून पीकपाणी काही नाही ।।
यांनी होती दुष्काळ लाही । कोप नसे देवाचा ।।
दुष्काळ ही पापांची गती । शूद्रादी अतिशूद्र भोगती ।।
चमचमीत खाऊन वदती । पुण्यातले पुण्यवान ।।''

पाऊस नाही म्हणून पाणी नाही, पाणी नाही म्हणून वनस्पती किंवा अन्नधान्य असणारे पीक नाही आणि अर्थातच त्यामुळे पाणी व अन्नधान्याची तीव्र टंचाई म्हणजे दुष्काळ हे साधे समीकरण सावित्रीबाई फुले मांडतात. त्याचवेळी तत्कालीन समाजात रूढ असणारे किंवा उच्चवर्णियांकडून सांगितले जाणारे कारण 'पापाची गती' ह्याचा निषेध करतात. त्याचबरोबर अन्नाच्या कणाकणासाठी तळमळणारा जनसमुदाय आणि दुसरीकडे दुष्काळाची थोडीही झळ न लागलेला एक वर्ग भरल्या पोटावरून हात फिरवीत स्वतःला पुण्यवान आणि दुष्काळपीडितांना पापी म्हणून त्यांच्या दुःखावर डागण्या देतो हे उपरोधिकतेने 'पुण्यवान' शब्दाचा वापर करून सांगितले आहे. जो धर्म दुष्काळात तर नाहीच पण सुकाळातही सन्मानाने जगू देत नाही. अन्न–वस्त्र–निवारा एवढेच काय चांगल्या विद्येपासूनही वंचित ठेवतो, पशुहून नीच वागणूक देतो. अशा स्थितीत ज्या धर्मात वाढलो आहोत, सध्या जगत आहोत. त्यात जर माणुसकीचा ओलावा नसेल तर त्या धर्माचा उपयोग काय? असा विचार शूद्र लोकांच्या मनाला भंडावून सोडतो. त्यातूनच कुटुंब आणि कुटुंबाच्या माध्यमातून प्रेमाचा संदेश देणारे, स्वच्छतेचा उपदेश करणारे, आजारी लोकांसाठी उपचार करणारे, अज्ञानी लोकांना ज्ञानदान करणारे आणि विशेष म्हणजे

स्पर्शाअस्पर्शाच्या कल्पनेला फाटा देऊन सेवाभावी वृत्तीने ख्रिस्ती धर्मोपदेशक काम करीत होते. धर्माच्या नावाखाली नको ते कर्म, चित्र-विचित्र कथांचे भय दाखवून शूद्रांची पिळवणूक चालली होती. आज जो शूद्र आहे त्याने उद्या जर मुस्लिम धर्म स्वीकारला किंवा ख्रिस्ती धर्म स्विकारला तर तो उच्चवर्णियांबरोबर सहजपणे समाजात वावरे. त्यांनी नुसता धर्म बदलला तर त्यांचे जीवन बदलत असे. पण स्वधर्मात राहून मात्र उपेक्षेचे धनी व्हावे लागे. अशा स्थितीत ज्या धर्मात आपण वाढलो आहोत, सध्या जगत आहोत,त्यात जर माणुसकीचा ओलावा नसेल, तर त्या धर्माचा आपल्याला काय उपयोग हा प्रश्न साहजिकच उमटे. पण त्यातून धर्मांतराची वेगळीच समस्या उभी राहू लागली.

जगातील साऱ्या धर्मियांना सहिष्णुपणे सामावून घेणारा हिंदू धर्म जातीभेदांच्या भ्रामक कल्पनांनी आपल्याच बांधवांना हीन लेखून त्यांच्या दीन स्थितीला आणण्यास जबाबदार ठरू लागला याबद्दलचे वर्णन करताना फुलवंताबाई झोडगे म्हणतात, ''इंग्रजी सत्ता प्रस्थापित झाल्यावर तिच्या सुव्यवस्थित अंमलाने कित्येक विद्वान ब्राह्मणांचे डोळे दिपून गेले. त्यांनी इंग्रजांचे अनुकरण करण्यास प्रारंभ केला. कित्येक ब्राह्मण स्वधर्माच्या आचारा-विचाराला व रूढीला कंटाळून ख्रिस्ती धर्म राजरोज व खुशीने स्विकारू लागले. क्रित्येक अज्ञानी अति मागास लोक मिशनऱ्यांच्या प्रेमळ वागणुकीमुळे व संकटात मदत केल्यामुळे ख्रिस्ती बनू लागले. या मिशनऱ्यांना तत्कालीन लोक 'ख्रिस्ती भट' किंवा 'गोरा भट' म्हणत व खेडोपाडी 'पंचांग' घेऊन सणवार, तिथिनक्षत्रे सांगून दक्षिणा उपटणाऱ्यांना 'हिंदुभट' किंवा 'काळेभट' म्हणत. ख्रिस्ती भटांजवळ 'पंचांग' नसे, ते 'बायबल' घेऊन आपल्या धर्माचा उपदेश करीत. अज्ञानी लोकांना ज्ञानदान करणे. आजारी लोकांसाठी इस्पितळे स्थापने, अनाथ बालकांस सांभाळणे, स्वच्छतेने राहण्याचा उपदेश करणे. मुलींना इंग्रजी शिकविणे अशी एक ना अनेक लोककल्याणकारी कृत्ये गोरेभट करीत होते. ही परोपकाराची उठाठेव ते कशासाठी करीत होते? ती करण्यात त्यांचा लोकांना बाटविण्याचा कावा असेलही''[३५].

लोकांना बाटविण्याचा कावा म्हणजे ख्रिस्ती धर्म स्वीकारा हे आडवळणाने अज्ञानी लोकांना पटविणे, स्वधर्मात होणारा अवमान, धर्म-कर्माचा बागुलबूवा यांना कंटाळून जर लोक अन्यधर्मीयांच्या आसऱ्याला गेले, जिथे खायला मिळेल, माणुसकी मिळेल अशा ठिकाणी गेले

तर त्यात त्यांची चूक नाही. तो सारा दसोष कोणाचा, त्यांच्या अशा परिस्थितीला जबाबदार कोण? हे निर्भिडपणे आपल्या कवितेतून मांडताना सावित्रीबाई म्हणतात,

''नाना कथा चित्र विचित्र । दावती खोटी पुराणसुक्ते
धर्म कर्माची भयभिते । सर्वांपुढे करूनिया
याला कंटाळून जन जाती । वैतागून ख्रिस्ती होती
मुसलमान धर्म स्वीकारती । हे पाप कुणाचे ?''

('अग्निफुले' काव्यसंपदा पृ. ६५)

तत्कालीन समाजस्थितीचे सूक्ष्म अवलोकन करून समाजातील स्थितीवर सावित्रीबाईंनी विचारलेला प्रश्न बिनतोड आहे. पण मग नुसता प्रश्न विचारून त्या थांबत नाहीत तर जननिंदेची पर्वा न करता अज्ञ बांधवांना शिकविण्याचे शिवधनुष्य पेलतात.

उपरोक्त ओव्या 'काव्यफुले' मध्ये समाविष्ट नाहीत. या कृ.प.देशपांडे यांनी लिहिलेल्या 'सावित्रीबाई फुले यांच्या कविताः स्वरूप आणि समीक्षा' या पुस्तकात परिशिष्ट एक मध्ये म्हणतात, ''या ओव्यासंबंधी 'गावगाड्या'त एक टीप आली आहे. १८७६–७७ साली महाराष्ट्रात फार मोठा दुष्काळ पडला होता.त्यांनी (सावित्रीबाईंनी) या दुष्काळाचे वर्णन ओव्यांच्या काव्यात केले आहे. १८७८ साली २३ सप्टेंबर रोजी सत्यशोधक समाजाच्या वाढदिवशी सावित्रीबाईंनी आपल्या भाषणात त्या म्हणून दाखविल्या. त्या ओव्या मजूर २३ सप्टेंबर १९२५ संपादक– रामचंद्र नारायण लाड, यांनी आपल्या पत्रांत प्रसिध्द केल्या.''[३६]

फुले दांपत्याचे जीवन म्हणजे मूर्तिमंत संघर्ष कधी तो शिक्षणाच्या हक्कासाठी, कधी तो सामाजिक हक्कांसाठी तर कधी अ–मानवीय कर्मांसाठी असणारा संघर्ष होता. सावित्रीबाई ज्योतिराव यांच्या जोडीने चूलबोळक्याचा संसार आपल्या आयुष्यात कधी मांडलाच नाही. त्यांच्या खाजगी आणि सामाजिक जीवनात एवढी पारदर्शकता होती की, ते निर्व्याज, निर्लोभी दांपत्य जणू एकमेकांसाठी पूरक ठरले. त्यांनी समाजाचा, आप्तांचा रोष पत्करला. पण आपल्या मनाला जे योग्य, जे सत्य तेच स्वीकारले. निधडेपणाने आल्या प्रसंगाला तोंड दिले. या सर्वांमागे एक उच्च जीवनध्येय होते. मानवतेचे गौरीशिखर त्यांना गाठायचे होते.

'सावित्री व ज्योतिबा संवाद' या अभंगपर काव्यात एका प्रसन्न प्रभातीचे वर्णन आहे. हे वर्णन करताना अज्ञानरूपी रात्र सरून ज्ञानरूपी सूर्याचा उदय झाला आहे. अशी कल्पना

सावित्रीबाई करतात. प्रज्वलित अग्नीच्या भोवती लाल प्रकाश पसरलेला असतो. त्याचप्रमाणे पूर्व दिशा लाल रंगाने व्याप्त झाली होती. तिची अपूर्व शोभा अवलोकन करताना क्षितीजाकडे बोट दाखवून त्या काही सांगू इच्छितात. त्याचे वर्णन करताना सावित्रीबाई म्हणतात.

''सावित्री : चंद्र मावळला । उगवला सूर्य।
उजळे अपूर्व । पूर्व दिशा ।।१।।
ज्योतीबास दावी । क्षितीज बोटाने ।
बारीक दृष्टीने । दिशा पहा ।।२।।''

('काव्यफुले' संग्रहातील सावित्री व ज्योतीबा संवाद पृ.३३)

यापुढील कडव्यांमध्ये सृष्टीचे मनोहारी वर्णन करून सृष्टीचे अविभाज्य चक्र दिवस–रात्र, त्यापैकी रात्र किंवा रजनीवर मानवी भावनांचे आरोपन करून तिची इच्छा सर्व काळोखात राहो अशी असल्याचे सांगतात. निशाचर घुबडाला रजनीचा साथीदार बनवून ते दोघेही सूर्याच्या आगमनाने दुःखी होऊन त्याला शिव्या–शाप देतात तरीही सूर्य त्याच्या अंगीभूत तेजाने झळकळ प्रकाशतो. अशी कल्पना केलेली आहे. इथून पुढे कवितेचा नूर अलगद बदलतो. सावित्रीबाई या संवादात म्हणतात,

''सावित्री : विखारी रजनी । काळरात्र गेली ।।
सृष्टी प्रकाशली । सूर्य तेजे ।।९।।
ज्योतीबाः खरे तुज बोला । हटला अंधार ।
शूद्रादि महार । जागे झाले ।।१०।।
दीनदलितांनी । अज्ञान सहावे ।।
अमानुष व्हावे । घुबडेच्छा ।।११।।
कोंडला कोंबडा । तरी आरवतो ।।
पहाट संगतो । लोकांना तो ।।१२।।
सावित्री : काळरात्र गेली । अज्ञान पळाले ।।
सर्वा जागे केले । सुर्याने या ।।१३।।
शूद्र या क्षितीजी । ज्योतिबा हा सूर्य ।।
तेजस्वी अपूर्व । उगावला ।।१४।।

जाऊ चला गाठू । मानवता केंद्र ।।

मनुष्यत्व इंद्र । पदी जाऊ ।।१५।।''

('काव्यफुले' संग्रहातील 'सावित्री व ज्योतीबा' संवाद पृ.३४)

सुर्योदय झाला, पण कोठे? तर शूद्रांच्या अफाट क्षितीजावर. शूद्रांच्या क्षितीजावर नवचैतन्याची, नवजागृतीची, ज्ञानरूपी पहाट झाली आहे. आता कोणीही रोखले तरी काळरात्र गेली आहे आणि आयुष्याच्या मशाली ज्ञानरूपाने पेटणार आहेत. या सर्वांना निद्रेतून जागे करणारा सूर्य आहे. निसर्गात जीवनदायी प्रकाश देणारा जसा तळपता सूर्य तसाच शूद्रांच्या क्षितीजावर ज्योतिबारूपी सूर्य अपूर्व तेजाने झळकतो आहे. सामाजिक जीवनात अभूतपूर्व क्रांती करणाऱ्या आपल्या पतीची योग्यता अचूक ओळखून ज्योतिरावांना त्यांनी 'सूर्य' ही उपमा योजिली आहे व त्यांचा गौरव केला आहे. ही आदराची भावना व्यक्त करून 'मानवता केंद्र' गाठण्याची आणि 'मनुष्य इंद्रपदी' जाण्याची इच्छा व्यक्त केली आहे. महामानवाच्या ओढीने निर्माण झालेला काव्यझंकार त्यातील मानवतेच्या जागृतीच्या जाणिवेने मनात निनादत राहतो. अंधार संपून प्रकाशाची सुखद जाणीव म्हणजेच काळोख संपुष्टात येऊन प्रबोधनाची नवी पहाट झाल्याचे सूचित करतो.

सावित्रीबाईंच्या सामाजिक कवितांची काव्यवैशिष्टय सांगताना कृ.प.देशपांडे म्हणतात, ''सावित्रीबाई ज्योतिरावांच्या बरोबरीने समाजकार्य करीत होत्या. स्त्री–शूद्रांना शिक्षण देण्याचे व्रत त्यांनी अंगीकारले होते. त्यामुळे साहजिकच, तळागाळातल्या समाजाचे त्यांना जवळून दर्शन घडले होते. शूद्रांची दुःखे कोणती आहेत, ती त्यांना समजली होती, या दलितांवर अन्याय कसा होतो आहे, हे त्यांनी पाहिले होते. यातून या समाजाला बाहेर काढायचे असेल, त्यांचा विकास साधायचा असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा उपाय नाही, हे त्यांना पटले होते. तसेच दलित समाजातील अंधश्रध्दा, नवससायासांच्या पध्दती त्यांनी पाहिल्या होत्या. त्यामुळे ही सामाजिक जाण त्यांच्या काव्याचा विषय बनली असली, तर नवल नाही. किंबहुना, दीनदलितांचे ते आर्त क्रंदन सावित्रीबाईंच्या कविहृदयाला भिडले आणि शब्दरूप पावले, असे म्हणावे लागेल''[३७]. बहुजनसमाजाचे दुःख निवारण्यासाठी शिक्षणाविना तरणोपाय नाही. अंधश्रद्धांचे निर्मूलन करण्यासाठी जनजागृती करून विवेकावर आधारित समाजमन घडविणे यासाठीच त्यांच्या समाजचिंतनपर कवितांची निर्मिती झाली असे म्हणता येईल.

अशाप्रकारे सावित्रीबाईंच्या समाजचिंतनापर कविता शूद्रांच्या दयनीय स्थितीची कारणे शोधतात,अज्ञान दूर करायला सांगून गुलामगिरीचे जोखड टाकून द्यायला प्रवृत्त करतात. त्यासाठी वाईट–अनिष्ट रूढी परंपरांवर काव्यकाठी चालवितात, जागे व्हा, शिकण्यासाठी जागे व्हा, इंग्रज राज्यात ही संधी आली तिचा लाभ घ्यायला सांगतात. शूद्रांना शिक्षणमार्ग हाच मुक्तीचा मार्ग हे ठामपणे सांगतात. शिक्षणाविना माणूस म्हणजे पशू अशी निर्भत्सनाही करतात. त्याचवेळी आधुनिक शेतकऱ्याची 'ब्रह्मवंती शेती' ची कल्पना मांडतात आणि शेवटी मात्र हे सर्व मानवाच्या 'मानव्यासाठी' असल्याने माणूस, खरा–माणूस कोणाला म्हणायचे हेही विशद करतात. अंधश्रद्धेला विचारनिष्ठ पायावर उभे करून तिचा फोलपणा दाखवितात. 'बुडती हे जन पाहवेना डोळा' या तुकारामांच्या उक्तीप्रमाणे समाजात जेथे–जेथे त्रुटी आहेत तेथे–तेथे त्यांची लेखणी जाऊन धडकते आणि समाजाविषयीच्या तळमळीची साक्ष देते.

## ३.४.७ इतिहासविषयक कविता :

'छत्रपती शिवाजी' व 'राणी छत्रपती ताराबाई' या दोन इतिहासविषयक कविता आहेत. 'छत्रपती शिवाजी' ही शिवाजी महाराजांची थोरवी वर्णन करणारी कविता आहे. या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

''छत्रपती शिवाजीचे । प्रातः स्मरण करावे
शूद्रादि अतिशूद्रांचा । प्रभु वंदू मनोभावे
नळराजा युधिष्ठिर । द्रौपदी ही जनार्दन
पुण्य श्लोक पुराणात । इतिहासी शिवानन''

('काव्यफुले' संग्रहातील 'छत्रपती शिवाजी' हे कविता पृ.५)

छत्रपती शिवाजीराजांचा पराक्रम, लोकसंग्रह विलक्षण होता. इतिहासाला नावेही माहीत नसणाऱ्या अठरा पगड जातींची फौज आणि त्यांच्या बलिदानाने शौर्याचा इतिहास घडला आहे. याच कारणाने सावित्रीबाई शिवाजी महाराजांना 'प्रभू' असे संबोधून त्यांचा गौरव करतात. 'राणी छत्रपती ताराबाई' या कवितेत राणी ताराबाईंचा उल्लेख मोठया सन्मानाने 'जगदंबा' व 'अंबाई' असा देवीस्वरूप करतात. ताराबाई ही हंबीरराव मोहित्यांची कन्या. ताराबाईंचा विवाह शिवाजी महाराजांचा पुत्र राजाराम ह्यांच्याशी झाला. परंतु वयाच्या पंचविसाव्या वर्षी वैधव्याचे

दुःख पचवून महाराणी ताराबाई यांनी राज्यकारभाराचा भार उचलला. तिने रामचंद्र अमात्य, परशुराम त्र्यंबक, शंकराजी नारायण, धनाजी जाधव, शिंदे, घोरपडे आणि मोहिते या स्वामीनिष्ठांच्या साहाय्याने मोगलांच्या विरोधात जोरदार आघाडी उघडली. तिने लढाईत चढाईचे धोरण ठेऊन मोगलांना हैराण केले. लोकांना प्रोत्साहीत केले. इ.स.१७०० ते १७०७ या सात वर्षाच्या कालावधीमध्ये तिने अनेक लढ्यांमध्ये स्वतः उपस्थित राहून स्वतःच्या हिमतीवर, एकनिष्ठ मराठी सैन्याच्या मनगटांच्या जोरावर लढाया जिंकल्या होत्या. हा कालावधी म्हणजे औरंगजेब आणि महाराणी ताराबाई यांच्यातील तीव्र संघर्षाचा कालखंड होय. एका बाजूला सर्व हिंदूस्थानवर राज्य करणारा मुरब्बी व धोरणी मोगल बादशाह, त्याचे प्रचंड लष्करी सामर्थ्य तर दुसऱ्या बाजूला मराठ्यांच्या विस्कळीत शक्तीला सावरून मोगलांच्या प्रचंड शक्तीला शह देणारी महाराणी ताराबाई होती. या संघर्षात राणी ताराबाईंनी अनेक ठिकाणी चढाईचे धोरण ठेऊन स्वतःला या स्वातंत्र्यलढ्यात झोकून दिले. रात्री–अपरात्री आपल्या पथकासह ती शस्त्रसज्ज होऊन घोड्यावरून दौड करीत असे. हा सर्व इतिहास सावित्रीबाईंना ज्ञात होता म्हणूनच त्यांच्या लेखणीतूनही तेवढ्याच समर्थपणे तो प्रगटला. या रणधुरंधर, धाडसी, पराक्रमी राणीचे वर्णन करताना सावित्रीबाई म्हणतात,

''छत्रपती सिंहासनीची एक राणी ताराबाई
कोल्हापूरची जगदंबा, महाराष्ट्राची अंबाई
शत्रूवर घाली छापा काळ तयाची ती होई
जेरीस शत्रूला करून करी बेफाम चढाई
न्हाऊन टाकी रणभूमी
शत्रू रक्तानी सारी
चपलता विजेची जैसी
तशीच कडाडे संहारी.''

('काव्यफुले' संग्रहातील 'राणी छत्रपती ताराबाई' ही कविता पृ.९)

राणी ताराबाईंच्या तडफदार, धाडसी, शूर आणि मुत्सुद्दी नेतृत्वामुळे मराठा सैनिकांमध्ये वीरश्री संचारली. त्या वीरश्रीचे वर्णन, चपलतेचे आणि तेजस्वीतेचे वर्णन विजेच्या कडाडण्याशी करून सावित्रीबाईंनी वस्तुस्थितीचे यथार्थ चित्रण केले आहे.

राणी ताराबाईंनी अनेक लढाया जिंकल्या, पन्हाळा, अजिंक्यतारा, विशाळगड, राजगड, तोरणा हे किल्ले मोगली सैन्याला धूळ चारत गनिमी काव्याने तर कधी रणभूमीवर तळपत्या शस्त्राप्रमाणे तळपत विजयश्री खेचून आणत पुन्हा आपल्या ताब्यात घेतले. या रोमांचकारी लढाईत राणी ताराबाईंच्या तडफदार नेतृत्वाने एक नवीन जान–शान आली होती. औरंगजेबाच्या हाती लागू नये म्हणून ती कधीही एका ठिकाणी राहिली नाही. त्यामुळे औरंगजेबाने जंगजंग पछाडून ती त्याच्या हाती लागली नाही. तिच्या या असामान्य पराक्रमाचे वर्णन करताना सावित्रीबाई म्हणतात,

''ताराबाई माझी मर्दीनी
भासे चंडिका रणांगणी
रणदेवी ती श्रद्धास्थानी
नमन माझिये तिचिया चरणी ।।''

('काव्यफुले' संग्रहातील 'राणी छत्रपती ताराबाई' ही कविता पृ.१०)

सावित्रीबाई येथे शेवटच्या कडव्यात रणदेवी ताराबाईला वंदन करून तिच्याबद्दलचा आदर, श्रद्धा व्यक्त करतात आणि तिच्याविषयीची जवळीक आपुलकी 'माझी मर्दीनी' या शब्दातून दाखवितात. 'छत्रपती शिवाजी' आणि 'राणी छत्रपती ताराबाइ' या दोन्हीही कविता वैशिष्ट्यपूर्ण आहेतच पण त्याचबरोबर सावित्रीबाईंची इतिहासविषयक असणारी जाण दर्शविणाऱ्या आहेत.

इतिहासविषयक 'छत्रपती शिवाजी' सारख्या कवितांमधून आदर्श असणाऱ्या ऐतिहासिक व्यक्ती आणि त्यांच्या कार्याचा गुणगौरव करणारे वर्णन आढळते. 'राणी छत्रपती ताराबाई' या कवितेची रचना पोवाड्यासारखी केलेली दिसून येते. राणी ताराबाईंच्या असीम पराक्रमाची, धैर्याची आणि निष्ठेची प्रशंसा करताना सर्वांना वंदनीय असणाऱ्या देव–देवतांच्या उपमा देऊन त्यांना 'देवत्व' बहाल करतात. त्याचबरोबर वीररसाचीही निर्मिती करतात.

## ३.४.८ स्फुट कविता :

स्फुट काव्यात 'बोलकी बाहुली' आणि 'सामुदायिक संवाद पद्य' यांचा समावेश आहे. 'बोलकी बाहुली' ही नावाप्रमाणेच साध्या विषयावरची सुंदर कविता आहे. बालकविता वाटावी

अशा या कवितेत एका छोट्या बाहुलीला हळूच उचलून घेऊन कवयित्री नजरेसमोर धरते, त्यामुळे ती आनंदाने हसते आणि बोलू लागते. ती म्हणते की, तिला वर टाक आणि झेल. पण तिचे बोल ऐकताच कवयित्रीचा जीव घाबरतो. बाहुलीला वर कसे टाकावे ती चुकून खाली पडून मरून गेली तर...? कवयित्री मग पटकन तिला उराशी धरते, तिचे चुंबन घेते. कवयित्री सावित्रीबाई म्हणतात,

''खेळ घातकी नच व्हावा
काळ न साधी कडू दावा''

('काव्यफुले' संग्रहातील 'बोलकी बाहुली' ही कविता पृ.३६)

म्हणून बाहुलीला असा खेळ खेळायला सांगतात की ज्याच्यात काळ कडू दावा साधणार नाही, म्हणजेच त्या खेळातून काही नुकसान होणार नाही. कवितेच्या शेवटी हा हितकर बोध केला आहे. या कवितेविषयी कृ.पं.देशपांडे म्हणतात, ''सावित्रीबाईंना लहान मुलांची आवड होती. त्या त्यांना आपल्या घरी बोलवीत. त्यांच्याशी प्रेमळपणे, मोकळेपणाने बोलत, खेळत. त्यातीलच एखादी बाहुली नसेल ना?''[३८] हे सहज शक्य आहे कारण हा वात्सल्यभाव लहान मुलांच्या निर्व्याज प्रेमातूनच निर्माण होतो.

'सामुदायिक संवाद पद्य' ही पुढची कविता आहे. या पद्याची सुरूवात आकर्षक, उत्कंठावर्धक करताना शाळेला त्यांनी 'सरस्वतीचा दरबार' अशी समर्पक उपमा दिली आहे. पहिला मुलींचा गट म्हणतो, 'सरस्वतीचा दरबार आता खुला झाला आहे. आपण शाळेत जाऊ, शिकू आणि ज्ञान मिळवू या' दुसऱ्या आणि तिसऱ्या गटाला हे म्हणणं मुळीच पटत नाही, त्यामुळे दुसरा गट दरबाराच्या कटकटीपेक्षा फुगडी खेळण्याला प्राधान्य देतो. तिसरा गटही खेळण्यापेक्षा आईला घरकामात मदत करून आनंद द्यावा असे मत प्रगट करतो. चौथा गट समंजसपणे खेळ, घरकाम की शाळा यावरचा तोडगा आईला विचारतो असे सुचवितो.

आता सर्वजण आईकडे जातात. ही आई म्हणजे खुद्द सावित्रीबाईच. त्या आईच्या मुखाने सुभाषित-सुविचार प्रगट करतात. सावित्रीबाई मोठ्या प्रेमाने म्हणतात,

''अभिमानाने जगण्यासाठी शिकून घ्या, जा शाळेला ।
मनुष्याचा खरा दागिना शिक्षण आहे घ्या चला
जा शाळेला जा शाळेला ।

काम पाहिलं शिकायचं आहे. दुसरं काम खेळा खेळा
जमेल तेव्हा झाडणं–पुसणं हात लावा घरकामाला
जा आधी जा शाळेला ।''

('काव्यफुले' संग्रहातील 'सामुदायिक संवाद पद्य' ही कविता पृ.३०)

आईने मुलींना दिलेले उत्तर, शाळा कशासाठी? शिक्षणासाठी, शिक्षण कशासाठी? अभिमानाने जगण्यासाठी. हे त्या काळातच नव्हे तर आजही खरे नव्हे का? मनुष्यदेहाचा खरा दागिना शिक्षण त्याला दुसऱ्या कुठल्याच अलंकाराची सर येणार नाही हे सांगून सावित्रीबाई सर्व गटांच्या कामांचा प्राधान्यक्रम सांगतात. पहिले आणि महत्त्वाचे काम 'शिकायचं' आणि त्याचबरोबर म्हणजे बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक विकासासाठी 'खेळ खेळा' असं त्या म्हणतात. या सर्वांतून आपल्याला शिकवण्यासाठी वेळ देणाऱ्या आई–वडिलांची आठवण ठेऊन जमेल तशी घरकामात मदत करावी हे सांगायलाही सावित्रीबाई विसरत नाही. शिक्षणाबरोबर आरोग्य व सुसंस्कारालाही महत्त्व देतात, अशाप्रकारे आईचे म्हणणे त्यांना पटते. मग त्या साऱ्या मिळून आनंदाने गाऊ लागतात. सावित्रीबाई पुढील काव्यपंक्तीत म्हणतात,

''सरस्वतीच्या दरबारात शिक्षण घेणेस जाऊ चला
विद्यादेवीस प्रसन्न करूनि वर मागू तिजला चला
अज्ञानाची, दारिद्र्याची गुलामगिरीही तोडू चला
युगायुगाचे जीवन आपले फेकून देऊ चला चला
नकोच इच्छा आरामाची
इर्षा धरुनी शिक्षणाची
संधी घ्या तुम्ही छान आजचि
अनुकूलता बघ कालगतीची
न कुरकुरता न आलसता शाळेत जाऊ शिकू चला
गुलामगिरीची युगायुगाची बेडी तोडू चला चला''

('काव्यफुले' संग्रहातील 'सामुदायिक संवाद पद्य' ही कविता पृ.३१)

शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्याच्या हेतूने रचलेल्या ह्या पद्याला गेयता आहे. स्त्रीशिक्षणाचा आज खूप प्रचार झाला असल्याने विषय जुना वाटला तरी त्यातील विचार आजही टवटवीत अन् ताजे आहेत.

## समारोपः

सावित्रीबाईंनी स्त्री आणि शुद्रादीशूद्र यांच्या शिक्षणाचा ध्यास मनी घेऊन अज्ञानरूपी अंधःकार आणि दारिद्र्यरूपी दुःख दूर करण्यासाठी आपले अवघे जीवन वेचले. त्यामुळे शिक्षण आणि समाजप्रबोधन या विषयावर त्यांच्या कवितांमध्ये भर दिलेला दिसून येतो. त्यांच्या कवितांमधून साध्या, सुंदर शब्दांत दीनदुबळ्यांविषयीची तळमळ आणि प्रदीर्घ चिंतनाची पार्श्वभूमी दिसून येते. त्यामुळेच या बहुजन समाजाच्या भल्यासाठी, सद्मार्गाचा उपदेश आणि आत्मसन्मानाचे महत्त्व सांगणारी गेयतापूर्ण पद्य त्यांच्या लेखणीतून प्रगटले आहे.

अशाप्रकारे 'काव्यफुले' या काव्यसंग्रहातील कविता विविध विषयांवर आहेत. समाजचिंतनपर, निसर्गवर्णनपर, आत्मपर, काव्यचिंतनपर, प्रार्थनापर, बोधपर आणि इतिहासविषयक अशा वैविध्यपूर्ण रचनांचा त्यात समावेश आहे.

पर्जन्यवृष्टीनंतर सृष्टीला नवपल्लवांचे विविधरंगी धुमारे फुटावेत तद्वत काव्यफुले मधून विविध काव्यप्रकार आपल्यासमोर सादर होतात. जीवनातील अविस्मरणीय क्षण कॅमेऱ्यात शिताफीने बंदिस्त करावेत तसे निसर्गातील उत्कट नाजुक प्रसंग सावित्रीबाई शब्दांच्या कोंदणात बसवितात. सभोवतालच्या जगण्याच्या अनुभवांकडे पाहण्याची वेगळी नजर आणि साध्या घटनांना अलौकिक उंचीवर नेऊन ठेवणारी प्रतिमा यांमुळे त्यांच्या कविता स्वतःची अशी वेगळी ओळख निर्माण करतात. सृष्टीक्रमातील नित्यघटना कळी, कळीचे फूल, फुलाचे उमलणे, उमलून सुकणे हा साधा घटनाक्रमही त्यांच्या काव्याचे विषय बनले आहेत. निसर्गकवितांमधील निसर्ग आणि मानवी जीवनातील भावभावना यांची गुंफण अलगदपणे करण्यात आलेली दिसून येते. कवी आणि काव्य याविषयी त्यांच्या कल्पना त्यांनी आपल्या कवितेतून समर्थपणे व्यक्त केल्या आहेत. शिवशंकर, बळीराजा, छत्रपती शिवाजी आणि राणी ताराबाई हे श्रद्धाविषय काव्यविषयही बनले आहेत. त्याचबरोबर सावित्रीबाईंच्या संवेदनशील मनाला सामाजिक स्थितीचे भान असल्याने अंतरीच्या जिव्हाळ्याने, तळमळीने, समाजप्रबोधन

करणाऱ्या समाजचिंतनपर कवितांची निर्मितीही सहजभावाने घडली आहे. दीनदलितांची, स्त्रियांची दुःखे नाहीशी व्हावीत. गुलामगिरी नष्ट व्हावी, यातून त्यांची बोधपर कविता अवतरते. आजूबाजूला असणारा जनसमूह, त्यांची जगण्याची पद्धत आणि जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष, समस्या यांचे चित्रण सावित्रीबाईंच्या कवितांमधून येते. त्यामुळे ग्रामीण जीवनाला स्पर्श करणारे शब्द 'शेत', 'शिवार', 'माती', 'कौले', 'ऐतोबा', 'बलुते', 'आलुते' आणि 'नवस' यांसारखे शब्द सहजपणे कवितेत येताना दिसतात. शिक्षणाचे महत्त्व आपल्या कवितांमधून अधोरेखित करून समाजाला अंधश्रद्धा सोडून विचारशील बनून, ज्ञान घेऊन आपले जीवन कृतार्थ बनविण्याचा संदेश देतात.

स्वतःला आलेला उत्कट अनुभव शब्दबद्ध करताना आत्मपर कवितांमधील त्यांची चिंतनशील, अंतर्मुख मनोवृत्ती कवितेला आशयसंपन्न, समृद्ध बनविते. कारण त्यांचा आत्मप्रत्यय केवळ वैचारिकतेच्या पातळीवर न राहता, ती वैचारिकता लालित्याचे रूप धारण करून काव्यात्म बनून येते. त्यामुळे त्यातील जडता नाहीशी होते. त्यामधून सौंदर्याची प्रचिती येत राहते. सावित्रीबाईंच्या कविता जीवनासंबंधी मानवतावादी दृष्टिकोन मांडणाऱ्या असून त्यातून बुद्धीप्रामाण्यवाद, मानवतावाद, व्यक्तिस्वातंत्र्य ही मूल्ये उद्घोषित होतात. चिंतनातील नवता, रचनेतील आटोपशीरपणा आणि विचारातील संघर्षप्रवणता आणि आशयघनता यांचा आविष्कार त्यांच्या कवितांमधून दिसून येतो.

## ३.५ बावन्नकशी सुबोध रत्नाकर :

'सावित्री ज्योतिबा विरचित अथ बावन्नकशी सुबोध रत्नाकर' हा सावित्रीबाईंचा उपलब्ध झालेला दुसरा काव्यसंग्रह आहे. 'काव्यफुले' या काव्यसंग्रहाप्रमाणे यात विविध कविता असून नावाप्रमाणे बावन्न कडव्यांचे ते एक दीर्घकाव्य आहे. ही पोथी ज्योतिरावांच्या मृत्यूनंतर सुमारे एक वर्षाच्या कालावधीत लिहिली गेली होती. इ.स. १८९१ मध्ये रचून झाली आणि नोव्हेंबर १८९२ मध्ये प्रकाशित झाली. लेखन-प्रकाशनामधील कालावधी तसा मोठा असल्याने या काव्याची अनेक हस्तलिखिते सापडतात. तसेच १८९१ साली रचलेल्या या काव्याच्या दोन आवृत्या प्रकाशित झाल्या होत्या. पहिल्या आवृत्तीचे प्रकाशन महाघटशास्त्रींनी मुंबई येथील

ओरिएंटल छापखान्यात छापून करंजगांव, अमरावती येथे प्रसिद्ध केले होते. याची दुसरी आवृत्ती 'गावगाडा' विशेषांक १० मार्च १९७६ रोजी श्री.द.स.झोडगे यांनी प्रकाशित केली होती.

'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' लिहिण्यामागे 'छान गाणे रचावे' अशी मनामध्ये कल्पना आली म्हणून 'जनांना ग्राह्य होईल' असे गाणे त्यांनी 'स्वभावे' रचल्याचे सावित्रीबाई सांगतात. या काव्याच्या उपसंहारात सावित्रीबाई म्हणतात,

''मनी कल्पना छान गाणे रचावे ।
जना ग्राह्य होईल ऐसैचे गावे ।।''

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'उपसंहार' पृ. ८९)

काव्यरचनेसाठी मनात काव्य करावे असे आले तरी काव्यरचनेला विशिष्ट विषयाची आवश्यकता असते. आपला काव्यविषय सांगताना सवित्रीबाई म्हणतात,

''कुळाची कळा गीतग्रंथी लिही मी ।
गुलामी जनाचा इतिहास नामी ।।''

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्याचा 'उपोद्घात' पृ. ८१)

सावित्रीबाईंना 'कुळाची कथा' या गीतात लिहायची आहे. त्याचबरोबर 'गुलामी जनांचा' इतिहासही चित्रीत करायचा आहे. या काव्याची रचना दीर्घकाव्य या स्वरूपाची आहे. कृ.पं.देशपांडे यांच्या मते, ''खंडकाव्य किंवा आख्यानक काव्य या स्वरूपात बसणारे हे काव्य नाही, ज्योतिरावांच्या चरित्रातला एखादा खंड घेऊन किंवा त्यांच्या चरित्रातला एखादा प्रसंग घेऊन त्यावर ही काव्यरचना झालेली नाही''[३९]. म्हणूनच जरी हे काव्य बावन्न कडव्यांचे असले तरी त्याला दिर्घकाव्य म्हणणे योग्य होईल.

सावित्रीबाईंनी हे काव्य सहा भागात रचलेले आहे. ते भाग पुढीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| १. उपोद्घात | २. सिद्धता | ३. पेशवाई |
| ४. आंग्लाई | ५. ज्योतिबा | ६. उपसंहार |

## ३.५.१ उपोद्घात :

यात ज्योतिरावांच्याबद्दलचा आदर, प्रेम, निष्ठा आणि काव्यरचनेचा हेतू हा भाग आला आहे. प्रारंभीच उपोद्घाताच्या श्लोकात सावित्रीबाई म्हणतात की, ज्याच्या कृपेमुळे त्या कविता रचतात, ज्याच्या कृपेमुळे त्यांच्या चित्रात ब्रह्मानंद प्रगटतो, एवढेच नव्हे तर ज्याने सावित्रीला

बुद्धी दिली, त्या ‘यती’ किंवा ‘स्वामी’ ज्योतिबाला सावित्री प्रणाम करते. ज्योतिरावांनी सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाची जी जडणघडण केली त्याबद्दल त्यांच्या मनात असलेल्या कृतज्ञ भावाचे विलोभनीय दर्शन या काव्यात घडते. सावित्रीबाईंच्या हृदयात ज्योतिरावांना किती मोलाचे स्थान आहे, याची प्रचिती पहिल्या कडव्यात येते. त्यांनी हे काव्य पतीलाच अर्पण केले आहे. पण आंधळया भक्तीतून नव्हे. सावित्रीबाई म्हणतात.

‘‘भ्रतारास अर्पी बहु आदराने
नसे ते इही हो परी चिंतनाने’’

(‘बावन्नकशी सुबोध नमस्कार’ या काव्याचा ‘उपसंहार’ पृ. ८१)

डोळस जाणिवा, पूर्ण विचार आणि चिंतनाने हे काव्य त्यांनी ज्योतिरावांना आत्यंतिक आदराने अर्पिले आहे. हे काव्य ज्योतिरावांना अर्पण करताना सावित्रीबाईंच्या डोळ्यासमोर त्यांचा जीवनपट, त्यांनी केलेले कार्य उभे राहते. सावित्रीबाई म्हणतात,

‘‘करी शूद्रसेवा दिले धैर्य त्यांना ।
क्रियाशील नेता अशा ज्योतिबांना ।।
नसे जात ज्याला तसे पंथ काही ।
तया वंदुनी सावित्री काव्य वाही ।।’’

(‘बावन्नकशी सुबोध रत्नाकर’ या काव्यातील उपसंहार पृ. ८१)

ज्योतिरावांना हे काव्य वाहत असताना ‘क्रियाशील नेता’ असे संबोधतात. सर्व शूद्रास सांगतात, विनंती करतात की, ‘सदोदीत हे काव्य आन्हीक व्हावे’ म्हणजेच तुम्हाला हे काव्य ‘आन्हिका’ इतके महत्त्वाचे व्हावे. हे सर्व काव्य भुजंगप्रयात वृत्तात केल्याचे नमूद करून सावित्रीबाई मनात ‘वृत्त आखून’ त्याची काव्यरचना केल्याचे सांगतात. शेवटच्या दोन ओळींत ‘कुळाची कथा’ आणि ‘गुलामी जनांचा’ इतिहास या गीतग्रंथात लिहिण्याचे मनोगत व्यक्त केले आहे.

## ३.५.२ सिद्धता :

या विभागात आर्यांच्या आगमनापासून ते शिवाजी महाराजांपर्यंतच्या इतिहासाची रूपरेखा आली आहे. ही रूपरेखा शब्दबद्ध करताना त्यांना राजकीय इतिहासापेक्षा सामाजिक इतिहासच अधिक सांगायचा आहे. शूद्रातिशूद्र हे मूळचे येथील रहिवासी होते. इराणी, आर्य हे

लोक येथे आले. त्यांनी या लोकांना जिंकले. त्यांना 'शूद्र' ठरविले. त्यांच्यावर व स्त्रियांवर अनेक बंधने घातली. या स्थितीतून स्त्री–शूद्रांना तारण्याचा प्रयत्न शिवाजी महाराजांनी केला, परंतु शिवशाहीदेखील फार दिवस लाभली नाही. या सूत्रानुसार या विभागातील बारा श्लोकांची रचना केली आहे.

'सिद्धता' मधील पहिल्या कडव्यात सावित्रीबाई 'इंडिया' चा इतिहास शोधण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या म्हणण्यानुसार तो इतिहास 'अधर्मी इराणी जयी जंगली' चा आहे. हूण, तार्तरी हे लोक रानटी होते. आर्य येथे आले. त्यांनी जेते म्हणून 'टिळा' लावला आणि सांगायला सुरूवात केली की, 'म्हणे उच्च आम्ही कडू शूद्र योनी' असा प्रचार करून त्यांनी स्त्री–शूद्रांवर अनेक बंधने लादली. सावित्रीबाई म्हणतात,

''म्हणे उच्च आम्ही कडू शूद्र योनी
गुलामी रूढी लादूनी धर्म सांगे
पशुतल्या जीणे स्त्रिया शूद्र भोगे
मनुष्यत्व सारे हिरावून भक्षी''

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'सिध्दता' पृ. ८२)

उच्चनीचतेच्या भावनेतून पशूतुल्य असे जीवन स्त्री–शूद्रांच्या वाटयाला आले. त्यांनी सारे मनुष्यत्व हिरावून घेतले. माणुसकीच नष्ट झाली. याला 'वेदही–साक्षी' आहेत. जेव्हा हे भूदेव मग्रूर झाले, तेव्हा बुद्ध जन्मास आले. या भूदेवांत आणि बुद्धात अतिभांडणे झाली. त्याची 'ध्वजा ब्रह्मलोकाला मिळाली!' या भूदेवांनी समाजरचनाच त्यांच्या फायद्याची केली होती. त्यावेळी समाजाची स्थिती कशी झाली हे सांगताना सावित्रीबाई म्हणतात,

''समाजात कल्पीत चौवर्ण बांधी
अमर्याद जाती तसे पंथ साधी ।।
स्वधर्मी अती भिन्नता वर्ण जाती
तिथे स्थीरता ना वसे ऐक्य नीती ।।''

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'सिध्दता' पृ. ८२)

भिन्न वर्ण, जाती अशा समाजरचनेमुळे समाजात स्थैर्य, ऐक्य, निती नाहीसे झाले होते. यानंतर शंकरचार्यांचा उदय झाला. त्यांचे शिष्य धर्मप्रचारार्थ फिरू लागले आणि लोकांना रूढी

आचार पाळण्यास सांगून त्याचे प्रस्थ माजविण्यास सुरूवात केली. हे लोक 'तर्कट ज्ञानाने' लोकांची गांजणूक करू लागले. 'जुन्या' पोथ्यांच्या सहाय्याने सोंगे–ढोंगे रचून गांजणूक करू लागले. स्वतः नाना तऱ्हेचे सुखसौख्य उपभोगून दुसऱ्यांना त्रास देऊन पुण्य संपादले जाणार नाही. लोकांनी पिळवणूक स्वर्ग मोक्षाची इच्छा मनी धरली तरी ती फलद्रुप होणार नाही. पण 'मनी नाही भाव आणि देवा मला पाव' अशा ढोंगी, अविचारी 'आचार' आणि जेथे फक्त अज्ञानाचा, मूर्खपणाचा विचार तेथे 'धर्म' राहू शकत नाही. पण या बोचणाऱ्या अनाचारी रूढींची निर्मिती यातूनच झाली. विषारी, विकारी वर्णांची रचना झाली, मुखाने धर्माचा 'आक्रोश' मात्र चालू राहिला. या स्थितीबद्दल सावित्रीबाई म्हणतात,

''अविचार अज्ञान मुर्खत्व जेथे
कसे काय राहील धर्मत्व तेथे
गुलामी कवाडी स्वधर्मीस कोंडी
करी व्यर्थ धर्मांध आक्रोश तोंडी ।।''

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'सिध्दता' पृ. ८३)

या सर्व गोष्टींचा परिणाम मोठा वाईट झाला, स्त्रिया आणि शूद्र यांना त्याचा फटका बसला. माणूस म्हणून नव्हे तर पशुहून लाजिरवाणे जिणे आणि गुलामगिरी त्यांच्या वाटयाला आली. पुढे राज्य 'मुसलमानी आणि ख्रिस्ती' आले. त्यांनी अनेकांनी बाटविले. पण या राज्यात मात्र या लोकांनी 'हिंदू या मिषाने' भाटगिरी केली आणि परकियांची नम्रतेने सेवा करण्यास सुरूवात केली. या स्थितीचे वर्णन करताना सावित्रीबाई म्हणतात,

''पुढे मुसलमानी ख्रिस्ती रोज झाले
तयांना कितीनी स्वधर्मी बाटविले
तिथे भाटगिरी हिंदू या मिषाने
करीती स्वये चाकरी लीनतेने ।।

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'सिध्दता' पृ. ८३)

परकीयांची सत्ता असताना 'भाटगिरी' करणाऱ्यांनी त्यांच्या राज्यात मानाची पदे भूषविली परंतु परधर्माची सेवा करून परकीय सत्तेचा उपभोग घेऊन स्वधर्मीयांची शूद्रांची

अवस्था बिकट केली. शूद्रांच्या वाट्याला पशुसारखे हीन जीवन आले. स्वधर्मीयांकडूनच शूद्रांना नरकयातना भोगाव्या लागल्या. सावित्रीबाई म्हणतात,

''अधर्मी परी तिथे राज मंत्री
अती शूद्र झाले स्वधर्मी कुपात्री
स्वधर्मी अती यातना शूद्र भोगी
असे पशूतुल्य जीणे अभागी ।।''

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'सिध्दता' पृ. ८३)

अत्यंत हालात, पशुतुल्य, अभागी जीवन जगणाऱ्यांना शूद्रांना 'स्वधर्मात कुपात्री' ठरावे लागले. म्हणून त्यांना तारण्यासाठी शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. या स्वराज्यात शूद्र, अतिशूद्र यांचाही समावेश होता परंतु ही शिवशाही पुढे टिकली नाही.

अशाप्रकारे 'सिध्दता' या भागामध्ये आर्यांच्या आगमनापासून ते शिवाजी महाराजांच्या स्वराज्यापर्यंत रूपरेषा आली आहे.हा इतिहास सांगताना सावित्रीबाईंनी सामाजिक इतिहासावर भर दिला आहे, यातील विविध प्रसंग, घटना भावनिक आकलनातून निर्माण झाल्या असून त्याला एक स्वाभाविक लय प्राप्त झाली आहे. यातील आशय घटक एकापुढे एक साखळीप्रमाणे असून त्यातील भावार्थाच्या अनुबंधाने जोडले आहेत. भारतीय संस्कृती, संघर्ष, स्वधर्म, अधर्म, वर्ण, समाज यांचे वर्णन यात केले आहे. एकंदरीत रानटी, तार्तरांपासून शूद्रशोषकांपर्यंत क्रमाने घटकांची मांडणी 'जेते विरूद्ध शूद्र' या सूत्राने झाली आहे. मानवाचे अमानवीकरण करणाऱ्या उच्चवर्णियांच्या अमानुष संस्कृतीविरुद्धचा संघर्ष उभा करण्याची पार्श्वभूमी दर्शविणे ही या रचनेमागील भूमिका स्पष्टपणे जाणवते.

## ३.५.३ पेशवाई :

या भागात सावित्रीबाईंनी शूद्र आणि स्त्रिया अशा दोहोंची पेशवाईमध्ये झालेली भीषण स्थिती टिपली आहे. अतिशूद्रांच्या पाऊलखूणा पुसल्या जाव्यात म्हणून त्यांच्यामागे बांधले जाणारे 'झाप' आणि गळ्यातले 'गाडगे' या अमानवीय प्रथेचे मनाला चटका लावून जाते. स्त्रियांची स्थिती तर आणखीच बिकट होती. त्या अभद्र वास्तवतेचे वर्णन करताना सावित्रीबाई म्हणतात,

''स्वपत्नीस धाडी निलाजी पती ग
छळे ब्राह्मणाला अशी स्त्रैणशाही
मुखा बोलती ही जळो पेशवाई...
छळी स्त्रीस शूद्रा बहू पेशवाई''

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'पेशवाई' पृ. ८४)

हे अभद्र वास्तव पेशवाईचे सडक्या–किडक्या अंतरंगाचे दर्शन घडविते. म्हणूनच स्त्री–शूद्रांना आपल्या आवाहनातून जागृत करताना एक–एका घटनेचे वास्तव परंतु तटस्थ वृत्ती धारण करीत वर्णन करतात. जनसामान्यांच्या आशा–आकांक्षा आणि त्यांच्या कष्टमय जीवनावर प्रकाश टाकत नव्या न्यायमूल्यांच्या प्रकाशात सावित्रीबाई गुलामी वृत्तीचा निषेध व्यक्त करतात. सहा कडव्यांच्या छोट्याच भागातून मनमौजी सत्ताधारी, अगतिक प्रजानन, असहाय्य स्त्री–वर्ग आणि शेवटी जुलमी सत्तेचा नाश म्हणजेच सत्तापालट अर्थातच इंग्रजांचा सत्ताप्रवेश या सर्व बाबी सावित्रीबाई 'पेशवाई' मधून सादर करतात. रचनादृष्ट्या आकर्षक वाटत नसला तरी मूल्यदृष्ट्या हा भाग सकस आहे.

### ३.५.४ आंग्लाईः

पेशवाईच्या अस्तानंतर सुस्थिर झालेल्या इंग्रजी सत्तेतील आधुनिक जीवनमूल्यांचा गौरव या भागात करण्यात आला आहे. काळोख्या नभांगणात भयाण सामाजिक वास्तवात तेजःपुंज स्वयंप्रकाशी ताऱ्याचा उदय व्हावा आणि त्याची प्रभा सर्वत्र पसरावी तद्वत ज्योतिरावांच्या संभवाची पूर्वपिठीकासुद्धा यात आहे. या सकारात्मक बदलाबद्दल सावित्रीबाई म्हणतात,

''मनुष्ये शिकाया असे पात्र पाणी
वदे आंग्लशाही अभिजात वाणी...
अडाण्यास देती शिकाया सुसंधी
दरोडे, खुनी, चौर्य गुह्यास बंदी...
लळा लावुनी शिकविती शूद्र बाळा ।।''

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'आंग्लाई' पृ. ८५)

स्त्री–शुद्रांसह जनसामान्यांना या भागात आवाहन केले असून सावित्रीबाईंची आत्मनिष्ठा येथे स्त्री–शूद्रगौरवात प्रगट झालेली दिसते. शूद्रांची अमानवीय स्थिती सावित्रीबाईंच्या जिव्हारी लागते आणि काव्यातून करूणरसाने वाहते, शास्त्रासारखी तेजस्वी व शस्त्रासारखी धारदार बनते. या स्थितीबद्दल सावित्रीबाई म्हणतात,

''असे शूद्र 'युगानयुगे' अभागी
नसे सूख काही सदा दुःख भोगी
पशूसारखे मौन होऊन राही
अशा या दशेची कुणा लाज नाही ।।''

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'आंग्लाई' पृ. ८५)

धर्म–नीती–ज्ञान यांपासून वंचित राहिल्यामुळे त्यांच्यातील मनुष्यत्व कसे लयाला गेले याचे वर्णन करताना वापरलेली उपमा यथोचित वाटते. 'शूद्र हा शून्य माणूस झाला' ह्या शब्दातून मुर्तिमंत मूल्यऱ्हासच व्यक्त होतो. अशा प्रकारे समाजात एकीकडे ज्ञानवंचित प्रजानन आणि दुसरीकडे इंग्रजी सत्ता या दोन गडद पानांमधून सतेज रंगाच्या फुलाचा अलगद उदय व्हावा तसा ज्योतिरावांचा उदय, अशी मांडणी केलेली रचना अर्थघटकांमध्ये समतोल साधून ओघवती होते. आशयबीजाचा स्वाभाविक विकास घडविते. या भागातील अर्थघटकांची गुंफणवेल सहज, भावसघन असून त्यातील नाट्यात्मता दृष्टांताद्वारे उमलते. सावित्रीबाई म्हणतात,

''म्हणे बांध शेती पहा या विहीरी
पहा पीक माझे कशी छान ज्वारी
मला गौरकान्ता तशी गोड पुत्री
असा दंभ ज्याला नसे तो सुपात्री''

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'आंग्लाई' पृ. ८६)

ग्रामीण शेतकरी जीवनातील प्रतिमांचा उत्तम वापर करून सावित्रीबाईंनी जनसंस्कृतीच्या संवर्धनाच्या संदर्भात विधायक आणि आश्वासक असे चित्र चितारले आहे. या भागातील जनस्थितीचे आकलन प्रतिमांच्या बांधणीतून अवतरले असून चिंतनाचा ओघ सत्वहीन

माणसापासून सुरू होतो, स्वत्वसंपन्न महात्म्याच्या ओढीने गतिमान होतो. मानवसंस्थापनार्थ युगप्रवर्तक महामानवाच्य संभवाची, उदयाची चाहूल येथे प्रतित होते.

### ३.५.५ ज्योतिबाः

स्त्री–शुद्रदलितांच्या उत्थानाचे स्वप्न साकार करणाऱ्या, समाजपरिवर्तनातून युगप्रवर्तनाची स्वप्ने सत्यात साकारणाऱ्या ज्योतिरावांचे गोष्टीरूप चरित्र यात समाविष्ट आहे. यात चौदा कडव्यांचा समावेश असून अत्यंत विपरीत परिस्थितीला टक्कर देऊन त्यावर धैर्याने, संयमाने मात करणारी उत्तुंग व्यक्तिरेखा म्हणजे ज्योतिराव त्यांचा गौरव भावसंपन्न मांडणीमुळे मनोवेधक झाला आहे. ज्योतिरावांचा जन्म, बालपण, लग्न, सामाजिक संघर्ष अशा घटनांचा क्रम एवढ्या सहजसुलभ पुढे जातो की, हे चरित्रदर्शन एका बाजूने संकलनात्मक तर दुसरीकडे मूल्यदर्शनात्मक घडते. ज्योतिरावांविषयीचा समजून उमजून केलेला गौरव आणि त्यांच्याविषयी वाटणारा आदर स्वतःला 'ज्योतिकांता' म्हणवून त्या व्यक्त करतात. सावित्रीबाई म्हणतात,

''सती धन्य माता यती धन्य पिता
तया वंदिते आदरे ज्योतिकांता ।।''

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'ज्योतिबा' पृ. ८६)

या भागातील आशयबीजाचा विकास अत्यंत स्वाभाविकपणे परंतु मूल्यभावानुरोधाने होतो. व्यापक जनसेवेचा व ज्योतिरावांच्या उपक्रमांचा गौरव होतो. ज्योतिरावांची जीवनगाथा सांगताना त्यांच्या कार्यात आलेले व्यत्यय तसेच सहकार्य करणाऱ्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख आहे. बालपण, शिक्षण, शेती, लग्न यांचा एकापाठोपाठ एक घटनाक्रम चालू असताना पुढे घडणाऱ्या वेगळया भव्यदिव्य घटनेचा आपण साक्षीदार नव्हे तर एक अविभाज्य घटक आहोत, याची सावित्रीबाईंना पुरेपूर कल्पना होती. म्हणूनच सावित्रीबाई म्हणतात,

''करी जोती शेती घडे लग्न त्याचे
घेई इंग्रजीचे धडे छान वाचे
मला आऊला पाठ देई शिकाया
असामान्यतेचा भरी भव्य पाया ।।

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'ज्योतिबा' पृ. ८७)

सावित्रीबाई आणि आऊला ज्योतिरावांनी शिक्षणाचे धडे दिले. शिक्षणाचे धडे घेऊन–देऊन सावित्रीबाई तेथेच थांबत नाहीत तर पुढील जीवनात या दांपत्याने जे कार्य केले त्याचा हा भव्य पायाच ज्योतिरावांनी भरला असे नमूद करून 'असामान्य' कार्याचे श्रेय पूर्णपणे त्यांना देऊन टाकतात. स्त्री–शूद्रांच्या उध्दाराच्या ध्येयाने 'सावित्री–ज्योती' हे दांपत्य झपाटले होते. आपल्या कार्यारंभात किती विघ्ने येणार आणि किती सहकार्य मिळणार हे माहीत असूनही मुलींसाठी आणि शूद्रांसाठी शाळा काढून या समाजकार्याचा 'मुळारंभ' केल्याचे सावित्रीबाई काव्यातून सांगतात. त्याचबरोबर मोठ्या कठीण परिस्थितीत शैक्षणिक कार्याची मुहूर्तमेढ रोवल्यावर येणाऱ्या प्रतिक्रियांबद्दल सावित्रीबाई म्हणतात,

''करी फार कौतूक पाद्री विधर्मी
परी त्रास देती शहाणे स्वधर्मी
मला निंदती शेण–धोंडेही मारी
अशा संकटाला खुशीने निवारी ।।''

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'ज्योतिबा' पृ. ८७)

शैक्षणिक कार्याबद्दल 'विधर्मी पाद्री' लोक कौतुक करतात मात्र आपलेच 'स्वधर्मी' मात्र कट्टरपणे विरोध करीत होते. त्या त्रासाची, विरोधाची मजल कोठपर्यंत गेली हे त्या स्वतःच नमुद करतात. परंतु लगेचच त्या विरोधाला उत्तर म्हणून कार्य बंद न करता त्या त्रासाचे निवारण 'खुशीने' केल्याचे सांगतात.

या शैक्षणिक कार्याबरोबरच त्यांनी स्पृश्य–अस्पृश्यतेच्या तटबंदीवर धडका देऊन हीन समजल्या जाणाऱ्या वर्गाला जीवन अर्थात 'पाण्या'सारख्या आत्यंतिक मूलभूत गरजेसाठी स्वतःची विहीर खुली करून दिली. शिक्षणामृत दलितांच्या जीवनात झुळझुळवायला लावून हजारो वर्षांत जे घडले नाही ते ज्योतिरावांच्या मानवतावादी, सामाजिक समता यांच्या प्रेरणेतून अंतःस्फूर्तीने घडून आले. ही घटना साधीसुधी नक्कीच नव्हती. या घटना चलचित्राप्रमाणे शब्दचित्रातून मोठ्या समर्थपणे उभ्या केल्या आहेत. सावित्रीबाई म्हणतात,

''स्वतःच्या विहीरी महारास वाटा
मनुष्यत्व दावी तयाचा सुवाटा

दलीतास आदेश सद्बोध साचे
न भूतो चमत्कार ज्योती युगाचे ।।
पथा चुकल्या कामिनी पोटुशीना
प्रसुतीगृही सोय मोलाचि नाना
सुईणी, दवा, पाणी, खाणे, पिणेही
व्यवस्था अशी सर्व सावित्री पाही ।।
शिशु आश्रमी पाळणे हालवती
अशा दिव्य कार्यात तल्लीन ज्योती ।।''

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्याची 'ज्योतिबा' पृ. ८८)

त्या काळाचा विचार करता 'न भूतो चमत्कार ज्योती युगाचे' असे घटनांचे वर्णन आले त्यात अतिशयोक्ती वाटत नाही. कारण एकाच वेळी शूद्र, अतिशूद्र आणि उच्चवर्णीय सर्वांसाठी तेवढ्याच तन्मयतेने कार्य करणे म्हणजे अद्भुत, अघटित होते. त्यामुळेच सावित्रीबाईंनी त्यांच्या कार्याची भव्य–दिव्यता वरील वाक्यात व्यक्त केली असावी. त्यांच्या कार्याचे स्वरूप पाहून काही जीवाभावाचे मित्र झाले तर काही कट्टर शत्रूही निर्माण झाले. त्यांच्या विचारांशी विचारांनी लढा देण्याऐवजी विचारी व्यक्तीचा खून करण्याचा भ्याडपणाचा प्रयत्न केला गेला. परंतु अंतर्बाह्य निर्मळ, सोज्वळ, प्रभावी ज्योतिरावांना पाहून त्यांचा खून करायला मारेकरी धजावले नाहीत. ज्योतीरावांचे कार्य, धैर्य यांचे जवळून दर्शन झालेल्या सावित्रीबाई त्यांना संतशिरोमणी तुकारामांच्या मालिकेत बसवून त्यांचा गौरव करतात. हा गौरव त्यांच्या कार्याचे दिव्यत्व जाणतो आणि असामान्य भव्यत्वही पाहतो, म्हणूनच ज्योतिरावांना 'संत ज्योती' या प्रतिमेत त्या पाहतात. शब्दप्रतिमा आणि अर्थघटकांचा इथला परस्पर मेळ हा जिवंत चित्रदर्शी व मनोहारी झाला आहे.

परिवर्तनाचा वस्तुपाठ शोभणारे हे जीवनचरित्र दलित–निराधार, स्त्रिया, ज्ञानवंचित मुले व समस्त समाजाला शिक्षणाचे संस्कार देत, समतेच्या उद्घोषाचा जागर करीत सामान्य वाचकाच्या मनात परिवर्तनाची उर्मी जागविते. जनसंस्कृतीचा धीरोदत्त नायक अशी ज्योतिरावांची अंतःस्थ उर्जाच शब्दतेज लेऊन अवतरते म्हणूनच हार्दिक सहसंवेदन

लाभल्यामुळे हा भाग जनसाहित्य म्हणून सकस, कलात्मक व समृध्द बनला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

### ३.५.६ उपसंहारः

'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या दीर्घकाव्यातील 'उपसंहार' हा अखेरचा भाग असून सावित्रीबाईंनी ज्योतिरावांच्या जीवनकार्याचे मूल्यदर्शन यात साकार केले आहे. ज्योतिरावांच्या शैक्षणिक, सामाजिक कार्याचे दर्शन काव्यातून घडविल्यावर हे कार्य करताकरता ज्योतिरावांची प्राणज्योत मावळली. याचे वर्णन करताना सावित्रीबाई म्हणतात,

''अहा ज्योत ज्योती जळे शूद्र कार्या
तयांचा प्रणेता वदे ज्योति–भार्या ।।''

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'उपसंहार' पृ. ८९)

यानंतर सावित्रीबाई पुन्हा ज्योतिरावांच्या चारित्र्याचे, शैक्षणिक, सामाजिक कार्यांचे आणि विचारांचे सिंहावलोकन करून त्यांच्या जीवनाचे सार सांगतात. ज्योतिराव जरी शूद्र माळी म्हणून जन्मले असले तरी त्यांच्या अलौकिक कार्याने ते चिरंजीव झाले. त्यामुळे सावित्रीबाईंच्या दृष्टीने ते या युगाचे 'उच्च–मनू' झाले. मनूला जी प्रतिष्ठा मिळाली त्याहून अधिक प्रतिष्ठा त्यांना मिळाली.

सावित्रीबाई म्हणतात,

''चिरंजीव जोती मनु उच्च झाला
नमस्कार माझा अशा ज्योतिबाला ।''

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'उपसंहार' पृ. ८९)

ज्योतीरावांचे कार्य, व्यक्तिमत्त्व जवळून पाहिल्यामुळे त्यांच्या क्रांतिकारक विचार, आचारांचा मेळ, प्रत्यक्ष जीवनातील सत्यनिष्ठा, तत्वनिष्ठा यामुळे सावित्रीबाई भारावून गेल्या. त्यामुळे ज्योतिरावांबद्दल, त्यांच्या कार्याबद्दल गौरवाची भावना काव्यच्या शेवटी एवढी पराकोटीला पोहोचते की, त्या ज्योतिरावांना 'मनू' हून उच्च श्रेणीत नेऊन बसवितात. पतिप्रेमाची परमावधी नव्हे तर पतिकार्याची डोळस प्रतिमाच काव्यातून ठसठशीतपणे मनात रूजवितात. कारण हे काव्य म्हणजे फक्त कल्पनारम्य विश्वाचे नव्हे तर मानवतेच्या कल्पनेला

सत्यात आणणारे खरेखुरे सामाजिक वास्तवाचे भान देणारे अस्सल चरित्र साधन आहे. सावित्रीबाई स्वतःच हे काव्य स्वीकारा असा आग्रह धरत नाहीत, परंतु त्यांच्या मनात 'छान' गाणे रचावे ही जी कल्पना आली त्यानुसार लोकांना आवडेल, रूचेल किंवा 'ग्राह्य' होईल असे गावे, म्हणून सावित्रीबाई या काव्याची रचना केल्याचे सांगतात. शिवाय त्यातील वाचन करून केलेल्या काव्यातून समाजाला थोडे तरी ज्ञान प्राप्त व्हावे असे त्यांना वाटते. सावित्रीबाई म्हणतात,

''जरी यातले थोडके ज्ञान झाले
तरी या श्रमाचे खरे चीज झाले
मला काव्य माझे कसे सत्य सांगा
मनोहर का रम्य तुम्हीच सांगा ।।

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'उपसंहार' पृ. ९०)

आपण केलेल्या काव्यातून समाजाला थोडेफार जरी ज्ञान झाले तरी त्या श्रमाचे चीज झाले असे सावित्रीबाईंना वाटते. सर्वात शेवटी कव्यवाचकाला निर्व्याजपणे प्रश्न केला आहे की, हे काव्य रसिकांना कसे वाटले? अखेरच्या या भागात आपल्या लेखनाची प्रेरणा, काव्यरचनेचे प्रयोजन व रसिकांच्या सादाची अपेक्षा स्पष्ट उमटली आहे. ही रचना साधी व स्वाभाविक असून त्याच्या अर्थ घटकांमधील परस्पर गतिशील संबंध हे त्याला कलात्मक बनवून गेले आहेत. तसेच सावित्रीबाईंनी आपल्या दृष्टीतून ज्योतिरावांचे आणि त्यांच्या कार्याचे आत्मीयतेने, श्रध्देने प्रसादपूर्ण वर्णन या काव्यात केलेले असल्याने हे काव्य 'रम्य' झाले आहे. या काव्याला जीवीच्या जिव्हाळ्यामुळे एक भावरम्यता आली आहे.

एकंदरीत 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या दीर्घकाव्यात जनसंस्कृतीच्या एका प्रखर व खंद्या पुरस्कर्त्याचे ज्ञानमय किंवा क्रियाशील रूप या काव्याद्वारे रूप घेत असून, अशा आदर्शरूपाच्या बळावर जनसमूह स्वतःच्या जीवन उर्जेला क्रियारूप देत योग्य मार्गाने वाटचाल करू शकेल अशी श्रद्धा या रचनेच्या मुळाशी दिसते. म्हणूनच जनसाहित्य म्हणून हे लेखन मौल्यवान ठरते. संपूर्ण काव्याचा साकल्याने विचार करता सुरूवातीपासून म्हणजेच 'उपोद्घात' पासून ते अंतिम टप्प्यापर्यंत 'उपसंहार' पर्यंत सहा वेगवेगळ्या भागात वेगवेगळी आशयकेंद्रे असूनही सर्व एका सूत्राने परस्परांशी आत्मीयतेने जुळलेली आहेत. या सर्वांच्या केंद्रस्थानी

स्मृतिरूपात युगनायक विराजमान आहे. या युगनायकाच्या चरित्रसंकीर्तनातून कारंजाप्रमाणे परिघाकडे उर्जा वाहात जाताना दिसते. कवयित्रीची सहज स्वाभाविक आत्मीयता, स्त्री–शूद्रांबद्दलचे व त्यांच्या उध्दारकर्त्यांबद्दलचे सारे उत्कट–सुंदर आणि कोमल भाव यात मिसळून मानवी मूल्यभावात विसर्जित झाले आहेत, त्यामुळे ही रचना सुबक, सुंदर व मूल्यपूर्ण घडली आहे.

स्त्रिया आणि शूद्रातिशूद्र हे गुलामगिरीत अनेक वर्ष पिचत होते. त्यांना योग्य तो प्रकाशमार्ग दाखविण्याचे कार्य व त्यांना गुलामगिरीतून मुक्त करण्याचा पहिलावहिला धाडसी प्रयत्न ज्योतिरावांनी केला आहे. त्यांच्या महान कार्यावर सावित्रीबाईंची निष्ठा, श्रद्धा, आणि त्या कार्याचे भव्य–दिव्यत्व जाणण्याची क्षमता आहे. त्यामुळेच 'सुबोध रत्नाकर' मागील प्रेरणा ही बावन्नकशी युगोद्धाराची आहे यात शंका नाही. ज्योतिरावांच्या निधनानंतर गतायुष्याचे, थोडथोडके नव्हे पन्नास वर्षाच्या संसारातील सुखदु:खाचे सिंहावलोकन करताना सावित्रीबाईंना 'सावित्री–ज्योतिबा' या दांपत्य भावजीवनदर्शनाच्या किंवा ममताग्रस्त व्यक्तीगौरवाच्या प्रेरणेने झपाटलेले नाही, तर त्यांना झपाटले ते युगजाणीव आविष्कृत करण्याच्या प्रेरणेने.

या प्रेरणेतूनच सामाजिक, शैक्षणिक आणि समाजजागृतीच्या दिशेने वाटचाल करीत समाजप्रबोधन करणाऱ्या वाङ्मयाची निर्मिती सकस आणि उदात्त हेतू. 'मनुष्यत्वाचे जागरण' हाच ठेऊन झाली. 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' मधील बावन्न कडव्यांपैकी जवळ–जवळ चौदा कडवी जरी ज्योतिरावांच्या कार्याला, गुणगौरवाला दिली असली तरी आपण केलेल्या कार्याचे महत्त्व आणि त्यामागील युगप्रवर्तनाच्या कृतीशील ताकदीबद्दल सावित्रीबाई सजग होत्या. हजारो वर्षाची गुलामगिरीची स्थिती आणि समाजमनाला आलेले जडत्व झिडकारून चैतन्याची लहर दौडावी या हेतूनेच काव्यरचना केली गेली आहे. काव्य रचनेतील आशयाचा आवाका मानवजातीएवढा विशाल आहे. सावित्रीबाईंच्या चिंतनात समर्पणाची भावना असली तरी वास्तवाचे प्रगटन मात्र तटस्थपणे झाले असल्याचे स्पष्ट होते. विश्लेषकतेऐवजी दर्शनप्रधानतेला प्राधान्य दिले असून पुराणे–कथा–इतिहास यांच्याशी निगडित वेधक प्रतिमा दर्शनामुळे त्याला प्रगल्भता आणि सखोलता प्राप्त झाली आहे. बहुजन संस्कृतीच्या प्रखर पुरस्कर्त्याचे ज्ञान क्रियाशील बनून काव्याद्वारे आदर्शरूप प्रगटून या आदर्शाच्या बळावर सारा जनसमूह स्वतःला सुयोग्यपणे मार्गस्थ करेल अशी श्रद्धा या रचनेच्या मुळाशी दिसते. म्हणूनच हे काव्य भावरम्य

आणि मौल्यवानही आहे. ज्योतिरावांचे चरित्रसाधन स्त्री शूद्रांच्या गुलामगिरीचे प्रभावी चित्रण, माणूस आणि मनुष्यत्वाशी निखळ नाते सांगणारे साहित्य म्हणूनही त्याचे महत्व अधिक आहे.

सावित्रीबाईंच्या काव्याबद्दल सुभाष सावरकर म्हणतात, ''शब्दांना नटवून सजवून कातीव–कोरीव शब्दबंध घडविणे आणि त्याला कलात्मक करण्यासाठी तंत्राचे आडाखे उपयोजिणे अशा कुठल्याही खटाटोपात न पडता सावित्रीबाईंनी स्वतःच्या अस्सल, अर्थपूर्ण व मानवीय अनुभूतींचे प्रामाणिक आविष्करण केल्याचे या रचनांवरून दिसून येते. देव–दैव–धर्म शरण तसेच गतानुगतिक तंत्रशरण अशा त्या काळातील रूढ कवितेच्या तुलनेत, सावित्रीबाईंची साधीसुधी पद्यरचना ही मंत्रवती–ओघवती–बोधवती–प्रयोजनवती असून ती वास्तवाभिमुख असल्यामुळे उजवी ठरते. जनसामान्यांबद्दलच्या त्यांच्या उपजत कळवळ्यामुळे तसेच जनतत्त्वावरील त्यांच्या प्रगाढ निष्ठेमुळे सावित्रीबाईंची साधीसुधी जनभाषेतील कविता ही समकालीन तंत्रसिद्ध रचनांना बाजूस सारून ठसठशीतपणे नजरेत भरते आणि थेट मनात उतरते''[४०]. सुभाष सावरकर यांच्या म्हणण्यानुसार सावित्रीबाईंच्या काव्यात रंगरंगोटीची हौस नाही, अलंकाराचा व्यर्थ भार नाही, पंडिती भाषेचा सोस नाही. समाजपरिवर्तनाचा ध्यास घेतल्यामुळे त्या परिवर्तनासाठी त्यांना रूचेल, उमगेल अशी सहजसंवादी रचना करून साधन म्हणून साहित्याचा वापर घडला आहे. केवळ काव्य करणे हे सावित्रीबाईंचे साध्य नव्हे तर काव्यातून समाजप्रबोधन करणे हेच जीवनध्येय आहे. म्हणूनच काही अपवादात्मक कविता वगळता मनुष्यत्वाचे गौरीशिखर गाठणाऱ्या मूळ धाग्यापासून, वास्तव जीवनापासून त्या जराही विचलीत होत नाहीत. सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाची ज्योत संयमित आणि आश्वासकपणे सचेपणाने तेवत असल्याचे आढळते.

सावित्रीबाईंच्या काव्यसंपदेबद्दल राजाराम सूर्यवंशी म्हणतात, ''बहुजन जनसामान्यांना सरळ थेट आवाहन करणारी साध्या स्थळ शब्दांची ही मांडणी अंतरीच्या जननिष्ठेमुळेच जनसाहित्य ठरते. ज्ञानज्योती युगस्त्री सावित्रीबाईंची साहित्यनिर्मिती म्हणजे मराठी भाषेतील एक सहजसुंदर साहित्यलेणेच होय''[४१].

आचार, विचाराने पारदर्शक असलेल्या सावित्रीबाईंचे साहित्यही असेच पारदर्शक असून त्यातील अर्धमाधुर्य मनाला जाऊन भिडते. बहुजनसमाजाला जागृत करण्यासाठीच त्यांनी आपल्या लेखणीचा अधिकाधिक उपयोग केला. काव्याचे लौकिक विषय, भाववृत्ती, जाणिवेची

बहुविधता हे सर्व पूर्वसुरींपेक्षा वेगळे असून व्यक्तिवादी जाणिवेचे व्यापक मानवतेच्या जाणिवेत उन्नत होणारी प्रेरणा सावित्रीबाईंच्या काव्यात प्रत्ययाला येते.

## समारोप :

सावित्रीबाईंचा मूळ पिंड शिक्षकाचा, समाजसुधारकाचा असला तरी प्रतिभेची दैवी देणगी मिळाल्याने त्यांच्या हातून काव्यनिर्मिती झाली. त्यांच्या 'काव्यफुले' या कवितासंग्रहात विविध विषयांवरील कविता आहेत. त्यांच्या उपदेशपर, बोधपर, सामाजिक कवितांमधून दीनदलितांबद्दल सहानुभूती, प्रेम, आणि शिक्षणाविषयी तळमळ दिसून येते. अज्ञानात खितपत पडलेल्या स्त्री–शूद्रांना शिक्षणाविषयी जागृती निर्माण व्हावी या जागृतीतून आत्मभान यावे आत्मभानातून आत्मसन्मानाने एका चांगल्या माणसांची निर्मिती व्हावी या ध्येयाने प्रेरीत होऊन त्यांनी काव्यरचना केली. त्यावेळी जीवनासाठी कला की कलेसाठी कला यांसारख्या विषयांवर चर्चा झडत नव्हत्या. जगण्यासाठी दीनदुबळ्यांचा पावलोपावली संघर्ष चालू होता. म्हणूनच सर्वसामान्यांची दुःखे, त्याची कारणे आणि त्यावरचा बिनतोड उपाय शिक्षणप्राप्ती असे समीकरण मांडून सावित्रीबाई हे सर्व काव्यातून व्यक्त करत होत्या.

अन्यायाची चीड, गुलामगिरीचा तिरस्कार, स्वातंत्र्याचा पुरस्कार, निसर्गप्रेम आणि काव्यविषयक भावना अशा कितीतरी रंगछटांनी सावित्रीबाईंचे काव्य उत्स्फूर्तपणे बहरले आहे. त्यांचे काव्यविषय पूर्वसुरींपेक्षा आणि समकालीनांपेक्षा वेगळे आहेत. निसर्गचिंतनपर, काव्यविषय आत्मपर भावप्रगटीकरण करणाऱ्या कवितांची निर्मिती प्रथमच त्यांच्याकडून झाली. परंतु त्यांच्या काव्यनिर्मितीचा मूळ हेतू समाजप्रबोधन, समाजजागृती हाच असल्यामुळे अधिक कविता सामाजिक व बोधपर असल्याचे दिसून येते. त्यांचे काव्य वैचारिक प्रबोधन आणि लोकहितार्थ जन्मले होते.

म्हणूनच सावित्रीबाईंना आधुनिक काव्याची जननी म्हणणे अधिक योग्य वाटते. त्यांची कविता भाषांतरीत किंवा रूपांतरीत असण्याऐवजी उत्स्फूर्त आणि थोडी सौंदर्यवादी होती असे म्हणायला हरकत नाही. काही ठिकाणी त्यांच्या कल्पना भव्यतेला स्पर्श करतात पण प्रत्येक ठिकाणी अशी भव्यता जाणवत नाही. मात्र स्मरणीय कल्पना, साधी, सोपी, प्रसादपूर्ण रचना,

रसिकांना नक्कीच वेगळा अनुभव देऊन जाते. संतवचने किंवा म्हणी यांच्या काव्यात चपखल उपयोग करण्यात त्याची योजकता दिसून येते.

'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या त्यांच्या दुसऱ्या काव्यात वेगवेगळ्या कविता नसून ते सहा भागात विभागलेले एक दीर्घकाव्य म्हणता येईल. यात त्यांना राजकीय इतिहासापेक्षा सामाजिक इतिहासच अधिक सांगायचा आहे असे वाटते. स्त्रिया व शूद्रातिशूद्र हे अज्ञान, दारिद्र्य आणि गुलामगिरीत वर्षानुवर्ष पिचत होते. त्या गुलामगिरीचे प्रभावी चित्र सावित्रीबाईंनी काव्यात उभे केले आहे. सावित्री–ज्योती या दांपत्याने आपले अवघे जीवन लोककल्याणार्थ ध्येयवेडे होऊन समर्पित केले होते. आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक गुलामगिरीतून मुक्ततेच्या आरंभाचा नारा ज्योतिरावांकडून स्त्री–शूद्रातिशूद्रांना दिला गेला होता. सावित्रीबाईंना या सर्व कार्याची नुसती माहितीच होती असे नव्हे तर त्यामध्ये त्याचा सहभागही होता. म्हणूनच इतिहासाच्या पार्श्वभूमीवर ज्योतिरावांच्या भव्य जीवनाचा व दिव्य कार्यांचा सुंदर आलेख चित्रित करणे हादेखील या काव्याचा हेतू आहे हे प्रत्ययास येते.

सावित्रीबाईंच्या काव्याची प्रेरणा, त्यातील विषयाची विविधता, काव्यरचनेचा उद्देश, तत्कालीन परिस्थिती व त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन काव्यसंग्रहांतून घडते. लोकव्यवहारातून निर्माण झालेले त्यांचे काव्य वास्तव जीवनाच्या परिघातून पूर्ण झाले आहे.

## ३.६ सावित्रीबाईंची भाषणेः

सावित्रीबाईंच्या काव्याबरोबरच त्यांनी केलेली भाषणेही शास्त्री महाघट पाटील यांनी प्रकाशित केलेली आहेत. इ.स.१८९२ साली वत्सल प्रेस, बडोदा येथून शास्त्री महाघट पाटील यांनी प्रकाशित केलेली आहेत. 'मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे' या नावाने ही भाषणे प्रसिद्ध आहेत. पाच वेगवेगळया विषयावर असलेली भाषणे वक्तृत्वाचा उत्कृष्ट नमुना म्हणून महत्त्वाची आहेतच परंतु त्यातून प्रगट होणारा भावार्थ आजच्या युगातही प्रेरक ठरतो. सावित्रीबाईंच्या भाषणाचे विषय पुढीलप्रमाणे :

१) उद्योग २) विद्यादान ३) सदाचरण ४) व्यसने ५) कर्ज

उपरोक्त विषयांवरील भाषणात त्यांनी विविध म्हणींचा व लोकांच्या समजुतींच्या कल्पकतेने वापर केला आहे. एखादी गोष्ट पटवून देण्याची हातोटी विलक्षण आहे. लहान असो वा मोठा माणूस गोष्टी वेल्हाळ आहे याचा फायदा घेत त्यांनी गोष्टीरूप उदाहरणे दिली आहेत.

## ३.६.१ उद्योगः

या विषयावर केलेल्या भाषणात प्रथम सावित्रीबाईंनी उद्योग म्हणजे काय याची व्याख्याच सोप्या शब्दांत सांगितली आहे. सावित्रीबाई म्हणतात, ''उद्योग याचा अर्थ म्हटला म्हणजे यत्न असून सदासर्वकाळ मेहनत करणे. या सदराखाली विद्याभ्यास करणे, शेतीत राबणे, व्यापारधंदा करणे, की ज्या योगाने आपली उपजीविका होऊन इतरांच्या उपजीविकेला हातभार लावता येईल''. (मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे पृ. ९३) उद्योग याचा अर्थ सांगितल्यावर स्वार्थावर म्हणजेच स्वतःच्या सुखाबरोबर दुसऱ्यांच्या सुखालाही हातभार लावू शकेल अशी कृती म्हणजेच परमार्थही साधण्यासाठी सहज वापरुन सुभाषितांसारखी सुविचारी वाक्यरचनाही सार्थपणे करतात. सावित्रीबाई म्हणतात, ''उद्योग करणे हा मनुष्याचा उत्तमधर्म असून तो त्याचा खरा कल्याण करणारा मित्र होय.'' (मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे, पृ.९३)

पुढील विवेचनात प्रारब्ध या कल्पनेला खोडून काढताना हजारो वर्षे काही लोक हीन किंवा दरिद्री आणि पशुवत जीवन का जगतात आणि प्रचंड मेहनत करूनदेखील सुखी का होऊ शकत नाहीत याचे स्पष्टीकरण मुद्देसूद देतात.

त्यासाठी सावित्रीबाई उद्योगाचे दोन प्रकारात विभाजन करतात. त्यांच्या मते एक विचारी उद्योग आणि दुसरा विचार नसलेला उद्योग. विचारी उद्योगाला डोळे, कान या ज्ञानेंद्रियांची आवश्यकता असते. स्वतः कष्ट करावे लागतात. मात्र अविचारी किंवा विचार नसलेला उद्योग म्हणजे 'भीक मागणे' हे उदाहरण देतात. त्याचबरोबर ज्ञानेंद्रियांचा उपयोग करून बुध्दिसामर्थ्याच्या जोरावर अफाट आश्चर्यकारक शोधांची म्हणजे घड्याळ, आगबोटी, आगगाड्या यांची उपयोगिता प्रतिपादन करतात.

या शोधांनी मनुष्यत्व वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत असे सुचविताना युरोपियन लोकांच्या वेळेला महत्त्व देण्याच्या सवयीचा आवर्जून उल्लेख करतात. उद्योग आणि बुध्दिच्या सामर्थ्यावर सावित्रीबाईंचा विश्वास आहे. असा उद्योग व बुद्धीचा वापर करणाऱ्यांचा त्यांना

जेवढा आदर आहे तेवढाच दैव व प्रारब्ध यांवर विश्वास ठेवणाऱ्यांचा तिटकारा आहे. शूद्र, अतिशूद्र यांनी आळस परंपरागत गुलामगिरीची सवय सोडून विद्याग्रहण करण्यात रस घ्यावा असे सावित्रीबाईंना मनापासून वाटत होते. इंग्रज लोकांच्या आगमनाने येथे असणाऱ्या शूद्रादीशूद्रांना शिक्षण घेण्याची गोडी लागेल आणि पशुवत जीवन सोडून आत्मभान आल्याचे माणूस म्हणून जगू लागतील, सन्मानाने आपली उपजीविका करतील हा मोठा आशावाद सावित्रीबाई व्यक्त करतात. सावित्रीबाई म्हणतात, उद्योग हा ज्ञानस्वरूप असून ''आळस हा दैवाचा मित्र आहे, आळस दरिद्रीपणाचे लक्षण आहे,'' (मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे, पृ.९५) एकंदरीत जीवनात यशस्वी होण्यासाठी, सन्मानाने जगण्यासाठी उद्योग आवश्यक असल्याचे त्यांचे मत आहे. त्याचबरोबर समाजात अवतीभोवती असणाऱ्या अज्ञनिरक्षर–शोषित आणि सर्व भौतिक–बौद्धिक सुखापासून वंचित असणाऱ्या समाजाला उद्योगप्रवण होण्याची प्रेरणा मिळावी, जीवनोन्नती करावी अशी तळमळ यातून दिसून येते.

### ३.६.२ विद्यादानः

विद्यादान या भाषणात ज्ञानाचा पुरस्कार आणि अज्ञानाचा धिक्कार केला आहे. भाषणाच्या प्रारंभी द्रव्यदान, अन्नदान व दयादान ह्या विविध प्रकारच्या दानांविषयी माहिती देऊन अपात्री आणि सत्पात्री दानाविषयी उदाहरणे देऊन त्यांच्या उपयोगीतेबद्दल सोदाहरण सांगून सारासार विवेकबुद्धीचा वापर करून लोकांना विचार प्रवण केले आहे. आपण केलेले कृत्य सत्कृत्य कधी घडेल आणि आपण जे कृत्य केले त्याने फक्त आपल्या मनाचे समाधान होऊन समाजावर वाईट परिणाम घडत नाहीत ना, याचे अवलोकन करण्यास सावित्रीबाई सांगतात. त्या म्हणतात, ''दान देणे हे चांगले असले तरी ते आपण मोठे दानशूर आहोत हे दाखविण्याच्या भावनेने दिले असल्यास ते सत्पात्री गेले असे होत नसून केलेले दान घेणाऱ्यास ऐतखाऊची सवय लावण्याचे कृत्य करते''. ('मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे', पृ.९६)

मानवी जीवनात सुख–दुःखाचे प्रसंग कायम येतात पण वेळ आली तर मदत घेण्याची लाज वाटू नये पण सुस्थितीत असताना मात्र मदतीची याचना करू नये. या मताचे समर्थन करताना सावित्रीबाई म्हणतात, ''पैसा धर्म करण्यास दात्याला गोड लागवे पण ते घेत्याला रूचू

नये. अशी समजूत झाली म्हणजे दान, धर्म, दया, उपकार इत्यादी गुणांपासून समाजावर दुष्ट परिणाम उत्पन्न न होता कल्याणकारी फायदा होईल''.(मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे, पृ.९७)

लौकिकार्थाने ज्यामुळे पुण्य लाभते किंवा रूढार्थाने ज्या दानाचा समाजाला परिचय आहे अशा द्रव्यदान, द्रव्यदानाहून श्रेष्ठ अन्नदान आणि अन्नदानाहून श्रेष्ठ नवीन दानाची विद्यादानाची सावित्रीबाई ओळख करून देतात. त्या म्हणतात, ''आळस, परावलंबन वगैरे दुर्गुण न वाढण्यास व मनुष्याच्या अंगचे सद्गूण वाढण्यास उपयुक्त असा कोणता धर्म असेल तर विद्यादान होय''. ('मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे', पृ. ९७) कारण अन्नदानाने एक वेळची क्षुधा भागते पण विद्यादानाने जीवनभराच्या क्षुधेचे निवारण करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. याशिवाय उपजत बुध्दीने सर्व प्राणी अन्नपाणी मिळवीत असले तरी त्या इतर प्राण्यांत आणि आपल्यात असणारा फरक आणि सामर्थ्याची जाणीव निर्माण होते ती फक्त विद्येनेच. 'विद् या संस्कृत शब्दाचा अर्थ आहे' 'जाणणे'. आपल्या खऱ्या स्वरूपाची जाणीव झाल्यावर काय घडते हे सांगताना सावित्रीबाई पुढे म्हणतात, 'विद्या देणारा व विद्या घेणारा असे दोघेही या धर्माच्या योगाने खरीखुरी माणसे बनतात. या धर्माच्या शक्तीमुळे मनुष्यातील पशुत्वाचा लोप होतो. विद्या देणारा, धैर्यशाली निर्भय बनून विद्या घेणारा सामर्थ्यशाली शहाणा बनतो''. ('मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे', पृ. ९७)

विद्येमुळे होणारे फायदे सांगितल्यावर हिंदुस्थानावर सतत होणाऱ्या वेगवेगळ्या आक्रमणाचा आढावा घेऊन परकीयांनी या भूमीवर पाय रोवण्याचे कारण 'अज्ञान' असा निष्कर्ष काढतात. त्याचबरोबर दोन हजार वर्षे इथल्या लोकांनी अज्ञानात राहून पशुजीवन जगावे व त्याची त्यांना पुसटशी जाणीवही नसावी याचे मोठे आश्चर्य त्यांच्या मनाला वाटते. त्यासाठी ज्ञान घेण्याशिवाय पर्याय नाही हे सावित्रीबाई पटवून देतात. पण या विस्तीर्ण हिंदुस्थानात फक्त इंग्रजांनी काढलेल्या चिमूटभर शाळांनी फारसा फरक पडणार नाही, हे त्यापुरतेच जाणून आहेत. म्हणूनच त्या पुढे म्हणतात, ''इंग्रज सरकारने ज्ञानदानासाठी शाळा काढल्या. पण त्या थोड्या असून तेवढ्यावरच राहिल्या तर सारा हिंदुस्थान शिकलेला होण्यास आणखी दिडशे वर्षे लागतील अशी माझी ठाम समजूत आहे''. ('मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे', पृ. ९८)

लग्नानंतर मुळाक्षरे गिरविणाऱ्या सावित्रीबाई आपल्याच बांधवांना ज्ञानामृताचे महत्व सांगतात, त्याच अक्षरांना वगळून प्रगल्भ दूरदृष्टीचा नमुना आपल्यापुढे सादर करतात. केवळ वर्तमानच नव्हे तर भविष्याविषयीचे त्यांचे विचार त्यांचे द्रष्टेपण दर्शवितात. म्हणूनच वारंवार बहुजनसमाजाला विद्यासंपन्न होण्याचा मंत्र देतात. समाजातील वेगवेगळ्या वर्गांचे त्यांचे निरीक्षण एवढे सुक्ष्म आहे की केवळ अज्ञानाने त्यांच्यातील विविध गुणांचा, कलांचा विकास खुंटल्याचे अगर त्या कला–गुणांचा काहीच उपयोग नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे समाजजागृती, त्यांचा विकास, उन्नती यासाठी सावित्रीबाईंनी पुन्हा पुन्हा शिक्षणाचे महत्व सांगितले आहे. आपले विचार व्यक्त करताना वेगवेगळी उदाहरणे,सद्यःस्थिती आणि सरळ संवादाचे माध्यम प्रभावीपणे वापरले आहे.

### ३.६.३ सदाचरणः

ज्ञानाचा स्वीकार, विज्ञानाचा अंगिकार आणि मनासाठी सुसंस्कार यासाठी शिक्षण घेतले जाते. शिक्षणाने व्यक्ती सुसंस्कारी बनावी आणि तिचे आचरण चांगले म्हणजेच सदाचरणी व्हावे ही अपेक्षा असते. या सदाचरणाबद्दल सावित्रीबाई म्हणतात, ''सदाचरण हे मनुष्यास अधिक सुख प्राप्त करून घेण्याचे व्रत आहे. या व्रताने सर्व संसारदुःखाचा नाश होतो'' ('मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे', पृ. ९९)

सदाचरणाला व्रताची उपमा देताना त्याचे महत्त्व सांगतात. पण हे सांगताना व्रतकथा सांगावी तसे आपले निवेदन मुद्देसुदपणे प्रवाही करतात. आटपाट नगर होतं तिथं... या पारंपरिक कथेत जसजशी प्रसंगमालिका पुढे जाते, उत्सुकता वाढत राहते तशाच पद्धतीचा वापर करून सावित्रीबाई पुणे शहरातील बल्लाळपंतांची गोष्ट सांगतात. ही गोष्ट सांगताना आपल्या विषयावरील पकड कोठेही सैल पडू देत नाहीत. पाल्हाळ न लावताही गोष्टीला पूरक आणि समाजाला हितकारक उपदेश त्या करतात. सावित्रीबाई म्हणतात, आपल्या पुत्रास शिकविणे हे मातापित्याचे कर्तव्य आहे. ''आपल्या पुत्रास किंवा कन्येस शिकवित नाहीत ते आपल्या पुत्राचे व कन्येचे शत्रू असतात असे समजावे''. ('मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे', पृ. ९९) आपल्यासमोर असलेला श्रोतृवृंद वेगवेगळया स्तरातील आहे हे जाणून ज्ञानवंचितांना प्रथम ज्ञानसंपन्न होण्याचा आग्रह सावित्रीबाई धरतात. विद्येचा आणि सदाचरणाचा संबंध सांगतात.

आपल्या म्हणण्याला प्रमाण देण्यासाठी संस्कृत श्लोक अर्थासह नमूद करतात. बल्लाळपंतांच्या मुलाची सदाशिवची कथा पुढे चालू ठेवत शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरी मान–मरातब, पैसा मिळून तो स्थिरस्थावर झाल्याचे सांगतात. परंतु काम करीत असताना मोहाचे क्षण येतात. त्यावर विजय मिळविण्याचे सांगताना आजच्या काळालाही लागू पडेल असा उपदेश करतात. सावित्रीबाई म्हणतात, ''लाच कोणी देऊ नये व लाच कोणी घेऊ नये. सरकारी काम इमानाने व प्रामाणिकपणाने केले असता समाधानाचा अलभ्य लाभ प्राप्त होतो''. ('मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे', पृ. १००) आज स्वतंत्र भारतात देखील भेडसावणाऱ्या भ्रष्टाचार या समस्येविरूध्द हा जनजागर नाही का? अशा समस्यांना सदाचरण हेच उत्तर आहे आणि वैयक्तिक, सामाजिक, देशाचा विकास घडवायचा असेल तर फक्त शिकलेल्याच नव्हे तर सदाचारी पिढीचीही गरज आहे. सावित्रीबाई सहजसोप्या पध्दतीने आंतरिक तळमळीने आणि तेवढ्याच प्रगल्भतेने आपले विचार जनसमुहापर्यंत सहज पोहोचवितात.

## ३.६.४ व्यसनेः

माणसाला माणसातून उठविणारे, संसार उध्वस्त होण्याचे ठळक कारण व्यसन. हे व्यसन मग कोणत्याही प्रकारचे असो. त्यामुहे किंचीतही लाभ होत नाही. त्याचे वर्णन करताना सावित्रीबाई म्हणतात, ''व्यसन हे मनुष्यास अधिक दुःखे प्राप्त करून देण्याचे दृष्कृत्य आहे. कोणत्याही व्यसनाने संसारसुखाचा घात होतो. दारू, भांग, अफू, विडी, चिलीम वगैरे व्यसने बहुत असून त्यापासून शरीराची, पैक्याची व संसाराची मात्रा होते. व्यसनापासून मनुष्याची बुद्धी भ्रष्ट होते व माणुसकी नष्ट होती''. ('मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे', पृ. १०१) वेगवेगळ्या प्रकारच्या व्यसनांचा उल्लेख करून त्यामुळे मनुष्याचा किती तोटा होतो याविषयी सावित्रीबाई तळमळीने सांगतात. सावित्रीबाई शिक्षिका असल्याने समाजातील बहुसंख्य वर्गाची सुखदुःखाच्या त्यांना जाण होती. ज्या वर्गासाठी त्या कार्य करत होत्या त्या समाजातील असंख्य लोक व्यसनाधिनतेचे शिकार होते. व्यसनधिनतेच्या मगरमिठीतून सोडविल्याविना त्यांचा विकास होणे शक्यच नाही हे सत्य त्या जाणून होत्या. व्यसनामुळे शरीराची दुर्बलता, मृत्यूनजिक लवकर पोहोचणे या गोष्टींबरोबर समाजातील प्रतिष्ठा धुळीस मिळणे, मनुष्यत्व विसरणे ह्या बाबी कशा होतात याचे वर्णन त्यांनी केले आहे. या भाषणातही पाटलाचे उदाहरण

देऊन त्याच्या व्यसनीपणामुळे पाटलाची पाटीलकी, संपत्ती, मान–मरातब, सज्जन लोक सारे–सारे दूर होऊन अतिशय अपमानास्पद रितीने त्याचा मृत्यू झाला. ही दुर्देवी कहाणी सांगताना, 'मद्यपीच्या घरी अवदशा वास करी. या म्हणीचा उपयोग केला आहे. म्हणून कोणत्याही माणसाने व्यसनरूपी विषाची परिक्षा घेऊ नये असे नमूद करताना सावित्रीबाई म्हणतात', ''मनुष्यांनी सावध राहून व्यसनाला हुंगूनही पाहू नये, कैफी लोकांची संगत आपणास न लावण्याविषयी खबरदारी घ्यावी. आपण विद्या शिकावी व आपल्या मुलाबाळांना विद्या शिकविण्याची काळजी घ्यावी''. ('मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे', पृ. १०२) व्यसनांपासून दूर राहायला सांगताना कुसंगती पासूनही दूरच राहण्याचा सल्ला सावित्रीबाई देतात. तुकारामांच्या अभंगाचाही दाखला जाता–जाता देतात. या सर्व विचारांमागे जनसामान्यांच्या उत्थानाची तळमळ दिसते.

### ३.६.५ कर्जः

पूर्वी लग्नकार्य, सणवार साजरे करण्यासाठी कर्ज काढले जाई. अक्षरशून्य कर्जदारांना आपल्या कर्जावर व्याज–चक्रवाढव्याज यांची किती शून्ये चढली हे कळत नसे. अज्ञान आणि दारिद्र्याने मग हे कर्ज पिढ्यानपिढ्या फिटत नसे किंवा संसारातील चीजवस्तूंचा लिलाव होऊन त्याला कफल्लक बनवून जाई. अशा पार्श्वभूमीवर कर्ज घेणे म्हणजे आपत्ती ओढवून घेण्यासारखे होते. म्हणून कर्जबाजारी माणसाची कुचंबना कशी होते हे आपल्या विचारपुष्पात गुंफून सावित्रीबाई म्हणतात,

''शेटजीचे कर्ज जो घेई
तयाचे सुख दुर जाई
संकटाने हैराण होई
बेजार होई कर्जदार ।।
कर्जाने लागतसे चिंता
घालवी सर्व मालमत्ता
संसारात वाढवी गुंता
आली अहंता ऋणकोची ।।''

('मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे', पृ. १०३)

अशाप्रकारे सावित्रीबाईंच्या मते कर्ज काढणे म्हणजे अनर्थाला आमंत्रण देणे. तसेच कर्जबाजारी माणसाचे जे जे नुकसान होते ते थोडक्यात सांगून कर्ज का काढू नये ते साधार स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते कर्ज काढलेला माणूस आपल्या अंगी असलेले व्यवसायचातुर्य, धडाडी, बुध्दीवैभव, पराक्रम व उत्साह हे षटगुण हरवून बसतो.

कर्जबाजारी माणसांचा सर्व बाजूंनी ऱ्हास होतो. कर्ज अनर्थाला आमंत्रित करणारे असल्यामुळे ते सर्वस्वाचे दिवाळे काढते. म्हणून सूज्ञ, विचारी माणसांनी व्यसने, कर्ज यांपासून मुक्त होऊन सदाचारी बनावे. सदाचारी माणूस स्वतःबरोबर समाजाचेही भले करतो. म्हणून सदाचारी माणसाने उद्योगीही असले पाहिजे. आळशी माणूस भूईला भार असतो असा सावित्रीबाईंचा भाषणाचा रोख आहे.

जनसामान्यांना देण्यासाठी एक विशिष्ट विचारधारा सावित्रीबाईंच्या भाषणात दिसते. भाषणात सुसूत्रता, क्रम आणि योग्य मांडणी यामुळे भाषणविषय श्रोत्यापर्यंत अचूक पोहोचतो. सावित्रीबाईंच्या भाषणाला ओघ आणि मुद्देसुदपणा बरोबर अंतःकरणातील जनसामान्यांविषयी वाटणारी तळमळ एवढी आहे की त्यातील सहजसुलभ भावनांमुळे ही भाषणे वाचताना सावित्रीबाई जणू आपल्यासमोर उभे राहून बोलत असल्याचा भास होतो. शिक्षिका म्हणून मूलांशी संवाद साधतांना मोठ्यांशी संवाद साधण्याचे कौशल्य त्यांनी आत्मसात केले होते असे म्हणायला काहीच हरकत नाही. चित्रस्पर्शी वर्णनांचा अनोखा भावनाविष्कार म्हणजे ही भाषणे आहेत.

## ३.७ सावित्रीबाईंची पत्रे

अखिल मानवजातीच्या सेवेचे व्रत घेऊन तन–मन–धन या त्रयींनी रात्रंदिन मानव कल्याणाचीच चिंता वाहणाऱ्या 'सावित्री–ज्योती' दांपत्याला स्वतःचे खाजगी जीवन नव्हते, असे नाही. पण ज्यांच्या कृतीतून लेखणी–वाणीतून प्रेरणेचा अखंड स्तोत्र वाहत असतो अशा महामानवांना नातीगोती मित्र आदि काहीही खाजगी राहत नाही. जगाच्या पाठीवर ते कोठेही गेले तरी त्यांच्या शोधाची दिशा सत्याच्या ध्येयाशीच निगडित दिसते. सर्वसामान्यपणे भारतीय स्त्री माहेरी आली म्हणजे आई, वडील, भाऊ, बहीण या गोतावळयात एवढी गुंग होते की तिला

बाह्य जगाचा विसर पडतो. पण ही सर्वसामान्य स्त्रीची कथा झाली. सावित्रीबाई सतत क्रांतीकार्याने झपाटलेल्या, ध्यानी–मनी सतत समाजकार्य, माहेरी आलेल्या सावित्रीबाईंच्या पत्रावरून तर ही बाब सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट दिसते. सावित्रीबाईंनी ज्योतिरावांना लिहिलेली तीन पत्रे उपलब्ध आहेत. पहिले पत्र १० ऑक्टो. १८५६, दुसरे पत्र २९ ऑगस्ट १८६८ आणि तिसरे पत्र २० एप्रिल १८७७ सालचे आहे. पहिली दोन पत्रे मोडीत असून त्यांच्या माहेरातून नायगांव, ता.खंडाळा, जि. सातारा येथून लिहिलेली आहेत. पत्राला सुरुवात करताना सुरुवातीला दिनांक व त्याच्याखाली 'सत्यस्वरूप ज्योतिबास्वामी यांस सावित्रीचा शिरसाष्टांग नमस्कार' असे आदरार्थी संबोधन करून, पत्राचा शेवट त्या आपली सावित्री किंवा 'सावित्री–ज्योतिबा' असा केलेला आढळतो.

ज्या काळात ज्योतिराव आणि सावित्रीबाई यांच्या दहा ते बारा शाळा पुण्यात वेगवेगळया ठिकाणी जोमात सुरू होत्या. त्यावेळी सावित्रीबाईंच्या व्यतिरिक्त आणखीही मदतनीस शिक्षक–शिक्षिकाही त्यांच्या शाळेत शिकवायला होते. त्यापैकी फातिमाचा उल्लेख ऑक्टो १८५६ रोजी लिहिलेल्या पत्रात आहे. या काळात सततच्या कार्यव्यग्रतेमुळे सावित्रीबाई आजारी पडून औषधोपचार व विश्रांतीसाठी माहेरी आल्या होत्या, असे या पत्रावरून दिसते. या पत्राची भाषा सरळ, साधी व अकृत्रिम आहे. सावित्रीबाईंनी या पत्रातून ज्योतिरावांशी साधलेला संवाद सहृदय असून त्यात व्यक्तिगततेऐवजी सामाजिक आशय ओतप्रोत भरलेला जाणवतो. विनाकरण पाल्हाळ न लावता त्या अकृत्रिम पद्धतीने आपल्या भावना व मनाचे विवेकाशी आविष्करण करताना दिसतात. आपल्या भावाने आपल्या कार्याची निंदा केली तरी स्वतःच्या भावाविषयी सावित्रीबाई म्हणतात, ''भाऊ तसा दयाळू पण कोत्या बुद्धीचा असल्याने त्याने तुम्हांस व मला दुषणे देऊन निंदा करण्यास कमी केले नाही''. ('सावित्रीबाईंची पत्रे', पृ. ७३) एवढेच त्या लिहीतात. यातून त्याच्या अज्ञानाविषयी चीड असली तरी अज्ञानी लोकांविषयी ममत्व, करूणा यात दिसून येते. त्याचबरोबर ज्योतिरावांचा त्यांच्या कार्याबद्दल सत्कार झाल्यानंतरही समाजातील बहुतेक स्तरातून त्यांच्याबद्दल नापसंती तीव्रतेने होती हे दिसून येते. परंतु सावित्रीबाईंना आपल्या कार्याबद्दल विश्वास व नितांत आदर होता. कार्याला विरोध करणाऱ्यांबद्दल सावित्रीबाई म्हणतात, आपल्याविषयी दुष्टावा माजविणारे विदूषक पुष्कळ आहेत. त्यांना भिऊन आपण हाती घेतलेले कार्य का सोडून द्यावे, सदासर्वदा कामाला गुंतावे,

भविष्यातले यश आपले आहे. ('सावित्रीबाईंची पत्रे', पृ. ७४) कार्यप्रवण असण्याची प्रेरणा आणि दृढविश्वास या बळावरच सावित्रीबाईंनी विद्यादानाचे व्रत अंगिकारले होते.

आईविषयी लिहिताना त्या म्हणतात, 'त्याचे बेलगाम व असमंजस बोलणे ऐकून आई खर्रकन उतरून काळवंडली'. या मोजक्या शब्दांत आईची वेदनापूर्ण मानसिकता, तिला झालेले दुःख सावित्रीबाईंनी अचूक मांडले आहे. पुढे, 'सावित्री तुझ्या जिव्हेत सरस्वती नांदत असावी तुझे ज्ञान ऐकून मी कृतार्थ झाले. येथे सावित्रीबाईंनी ज्ञान व गुणांचे कौतुक करून मुलाने दिलेली वेदना विसरून आई कृतार्थ झाल्याचे विनम्रपणे नमूद केलेले आहे. सत्य सांगतानाही ते किती कलात्मकरितीने व भाषेच्या कौशल्याचा अचूक वापर आत्मीयतेने ओतप्रोत भरून सांगितले जाते हे आणखी एका वाक्यावरून दिसून येते. त्या म्हणतात, ''माझा नवरा तुझ्यासारखा वारकऱ्याप्रमाणे नुसते हरीनाम घेत वाऱ्या करीत नसून प्रत्यक्ष हरीचे काम करीत आहे. त्यास मी मदत करते, हे काम इतके आल्हाददायक होते की, त्यायोगे मला परमानंद होतोच आहे, या व्यतिरीक्त मनुष्याची सिमा दृग्गोचर होते'' ('सावित्रीबाईंची' पत्रे, पृ. ७४) या सहजसंवादसनेही एक प्रकारचा कलास्वाद वाचकांना प्राप्त होतो. हे या पत्रावरून लक्षात येते. पत्रात व्यक्त केलेले विचार परिपक्वतेचा प्रत्यय देतात.

दुसरे पत्र १८६८ सालचे आहे. याच वर्षीच्या उन्हाळयात सावित्री-ज्योतिराव या दांपत्याने आपली घरची विहीर अस्पृश्यांसाठी खुली करून दिली होती. त्या अगोदर आपल्या सर्व दहा-बारा शाळा विद्याखात्याकडे चालविण्यास सोपविल्या होत्या. सावित्रीबाई नायगावी त्यांच्या माहेरी असतानाच तेथे अशी काही घटना घडली की जनमत प्रशुब्ध झाले होते. भिन्न जातीय युवक-युवती तारूण्य-सुलभ भावनेने एकमेकांच्या प्रेमात पडले होते आणि हे समजताच समस्त गावकऱ्यांनी गणेश व सारजा नामक दोघांना जबर शिक्षा द्यायचे ठरविले होते. मृत्यूदंडाच्या शिक्षेपासून, संतप्त जमावापासून दोघांना वाचविण्याचे वर्णन या पत्रात आहे. येथे सावित्रीबाईंच्या धैर्य व नेतृत्वगुणांची ओळख पटते. प्रसंगोत्पात निर्माण होणारी समयसूचकता हा गुणदेखील आढळतो. त्या दोघांचे प्राण वाचवून त्यांना संरक्षण देणे, योग्य मार्गदर्शन देणे यावरून सावित्रीबाईंच्या व्यापक करूणेची कल्पना येते.

इ.स. १८७७ सालचे तिसरे पत्र आहे. यावर्षी महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला होता. या पत्रात दुष्काळामुळे ओतूर, जुन्नर भागात उत्पन्न झालेल्या शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीचे

मन विदीर्ण करणारे वर्णन आले आहे. निवडुंगाची बोंडे अन्न म्हणून खाणे आणि तहान–भुकेने तडफडून मृत्यू येणे यातून दुष्काळाची भयानकता सावित्रीबाईंनी अचूकपणे टिपली आहे. सावित्रीबाई म्हणतात, ''माणसांना अन्न नाही, जनावरांना अन्नपाणी नाही, यास्तव क्रित्येक देशांतर करून आपले गाव टाकून जात आहेत. नद्या, नाले, ओढे, शुष्क व कोरडे ठणठणीत होऊन मृदगळी व्याप्त झाले आहे''. ('सावित्रीबाईंची पत्रे', पृ. ७६)

अशा दुष्काळाच्या परिस्थितीचा सामना लोक कसे करत होते व त्यावेळी सत्यशोधक समाजाच्या मंडळींनी लोकांना केलेल्या साहाय्याचे वर्णन करून कलेक्टरने गैरसमजुतीने पकडून नेलेल्या काही सत्यशोधक कार्यकर्त्यांना सावित्रीबाईंनी कसे सोडविले, त्याचे वर्णन त्यांनी केले आहे. दुष्काळनिवारणाबाबत कलेक्टरला एक निवेदनही सावित्रीबाईंनी कसे सोडविले, त्याचे वर्णन त्यांनी केले आहे. दुष्काळनिवारणाबाबत कलेक्टरला एक निवेदनही सावित्रीबाईंनी दिले होते.

दुष्काळाच्या काळात फुले दांपत्याकडून चालविल्या जाणाऱ्या अन्नछत्रांची संख्या ५५ एवढी होती. अशाच एका ठिकाणाहून म्हणजे ओतूरवरून सावित्रीबाईंनी हे पत्र ज्योतिरावांना लिहिलेले आहे हे पत्र पूर्ण ज्योतिसमर्पण आणि कार्यनिष्ठ विचारातून लिहिले असून येथे सावित्रीबाईंनी आपल्या सर्व कार्याचे श्रेय ज्योतिरावांना बहाल केले आहे. सावित्रीबाई म्हणतात, ''तुम्ही जे कल्याणकारी कार्य करीत आहात, त्यास माझ्या हातून सदासर्वदा सहाय्य होत जावो व मी आपल्या दिव्य कर्तव्यकर्म सेवाकार्यास सहाय्यभूत होवो एवढी माझी इच्छा आहे. अधिकउणे काही वर्तावे, ही विज्ञापना''. (सावित्रीबाईंची पत्रे, पृ. ७७) अशाप्रकारे त्यांच्या पत्रात तत्कालीन वर्तमान जीवनाच्या समस्यांचे विश्लेषण व आकलन तसेच ज्योतिरावांविषयी निष्ठा नम्रतापूर्वक व्यक्त करण्यात आली आहे.

एका ध्येयनिष्ठ पत्नीने आपल्या कर्मयोगी ध्येयनिष्ठ पतीशी लेखनातून केलेला संवाद म्हणजे ही पत्रे आहेत. ही पत्रे लौकिकार्थाने पतीपत्नीची खाजगी गोष्ट न राहता व्यापक अर्थाने सामाजिक कार्याचे शिवधनुष्य पेलणाऱ्या मनाचे प्रतिबिंबच आहेत असे म्हणता येईल. कारण उपलब्ध प्रत्येक पत्रात त्यांचे समाजकार्य आणि कार्यासंबंधीचा उल्लेख अपरिहार्यपणे आलेला दिसून येतो.

पहिल्या पत्रात साधा सरळ संवाद आहे. त्यातून त्यांनी शूद्रातिशूद्रांसाठी सुरू केलेल्या शाळांविषयी आप्तस्वकीय म्हणजे फक्त सासरकडील नव्हे तर हक्काच्या माहेराकडूनही तीव्र नापसंती होती हे निदर्शनास येते. पण हे सत्य सांगताना आणि आपली बाजू मांडताना अतिशय कलात्मकता आणि आत्मीयता दिसून येते. त्यामुळे लेखनातील सहजसंवादातून वाचकांना कलास्वाद प्राप्त होतो. दुसऱ्या पत्रातील मजकुरावरून सावित्रीबाईंच्या अंगी असलेल्या धैर्य, नेतृत्वगूण व समयसुचकता यांची ओळख पटते. त्यांच्या उपलब्ध झालेल्या तिसऱ्या पत्रात महाराष्ट्रातील भीषण दुष्काळाचे वास्तव शब्दचित्र आहे. दुष्काळग्रस्त भागातील लोकांना मायेच्या शब्दांबरोबर आधाराचा हातही सावित्रीबाई आणि सत्यशोधक कार्यकर्त्यांनी दिल्याचे या पत्रातून समजते. दुष्काळनिवारणाबाबत कलेक्टरला निवेदन दिल्याचेही यात नमूद केले आहे. पत्रांतील विचार त्यांच्या परिपक्वतेचा प्रत्यय देतात.

सावित्रीबाईंची जनसामान्यांविषयी कणव व त्यांचे अतुलनीय धैर्य याचा प्रत्यय आपणास प्रत्येक पत्रात येतो. ही पत्रे एक ऐतिहासिक दस्ताऐवज म्हणूनही एक उत्तम नमुना आहेत.

## ३.८ ज्योतिबांची भाषणेः

ज्योतिरावांनी केलेली भाषणे मिसेस मिचेल व रेव्ह मिचेल यांच्या प्रोत्साहनामुळे सावित्रीबाईंनी तयार करून पुणे येथे शिळा प्रेसवर दि. २५ डिसेंबर १८५६ मध्ये प्रसिद्ध केली. सावित्रीबाई या प्रतिभासंपन्न कवयित्री, उत्तम लेखिका व उत्कृष्ट वक्त्या त्याचबरोबर त्या उत्कृष्ट संपादिकादेखील होत्या. त्यांनी ज्योतिरावांची भाषणे लिहून संपादित केली होती. अतिप्राचीन काळी 'इतिहास', 'सुधारणूक', गुलामगिरी अशा शिर्षकांची ही भाषणे आहेत. ज्योतिरावांची ही भाषणे ज्योतिरावांचे विचार समजून घेण्यासाठी उपयोगी आहेत. ह्या भाषणांचे स्वरूप म्हणजे विचार ज्योतिरावांचे, पण संकलन, संपादन सावित्रीबाईंचे आहे.

## ३.९ शिवमहिमास्तोत्र :

ही संस्कृत पोथी शंकराचे वर्णन समाविष्ट असलेली आहे. या मूळ संस्कृत पोथीचे सावित्रीबाईंनी रूपांतर केले आहे. या रूपांतराची दोन पाने मोडी लिपीत उपलब्ध झालेली

आहेत. ती 'सावित्रीबाई फुलेः समग्र वाङ्मय' या पुस्तकात परिशिष्ट १३ मध्ये प्रकाशित केली आहेत. हे नऊ अनुवादित श्लोक मोडीत आहेत.

## ३.१० सावित्रीबाईंच्या काव्यातील प्रतिमा, प्रतिके, अलंकार व भाषाशैलीः

### ३.१०.१ सावित्रीबाई फुलेंच्या काव्यातील प्रतिमासृष्टीः

सावित्रीबाई फुले यांच्या 'काव्यफुले' आणि 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यसंग्रहात विविध प्रकारच्या कविता आहेत. त्या कवितांच्या आविष्कारही भिन्न आहेत. कवितेला दृश्यचित्राची अनुभुती आणि संवेदना देणारा घटक म्हणजे प्रतिमा, सावित्रीबाईंनी आपल्या काव्यात वेगेवगळ्या प्रतिमांचा, प्रतिकांचा वापर केलेला आहे.

कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त आशय सांगण्याची क्षमता प्रतिमेत असते. व्यवहारात प्रतिमा हा शब्द 'प्रतिबिंब' या अर्थाने वापरला जातो. वाङ्मयीन समीक्षेत इंद्रियसंवेदनात्मक अनुभुतींची शब्दचित्रे म्हणजे प्रतिमा असा अर्थ रूढ आहे. कल्पनेच्या पातळीवर जाणीवेने भारलेला कवितेचा प्राथमिक घटक म्हणजे प्रतिमा. कवितेमधील प्रतिमेच्या वापरामुळे भावनेचा उत्कर्ष साधला जातो. कवीच्या अंतःकरणातील भावनांना मूर्त व ग्राह्य मानला जातो अशा प्रतिमांचे विशेष सांगताना सुधीर रसाळ म्हणतात, ''प्रतिमा एक संवेदनांग असते. प्रतिमा ही संवेदनांची रचना असते. उच्चारचिन्हांनी निर्देशित होणाऱ्या दोन किंवा अधिक मानसिक संदर्भामध्ये साधर्म्यवैधर्म्याधिष्ठित आंतरप्रक्रिया होऊन प्रतिमा घडते. प्रतिमा ही मूर्त, गतिशील, अनेकार्थी व सेंद्रिय संघटना असून ती कवितेचा एक अपरिहार्य प्राथमिक घटक असते''[४२].

कवीच्या अप्रगट मनातून प्रतिमांच्या उगम होत असतो. त्यामुळे अशा प्रतिमांचा संबंध केवळ कवितेच्या आशयाशी नसतो तर कवितेच्या घाटाशीही असतो. त्यामुळे कवितेचा घाट प्रतिमाच निश्चित करताना दिसतात. अनुभव कलात्मक रीतीने आणि सुयोग्यपणे व्यक्त करण्यासाठी प्रतिमेचे साहाय्य घ्यावे लागते. प्रतिमासृष्टी ही त्या अनुभवाचा भाग म्हणून येते. यातून अनुभवांचा एक अर्थपूर्ण असा आकार साकार होतो. मूर्ताकडून अमूर्ताकडे जाताना अमूर्तातही मूर्ताची जाणीव होत राहते. कविता म्हणजे शब्दांची केवळ जुळवणी नव्हे किंवा नुसता शब्दफुलोरा नाही, त्या शब्दांतून विशिष्ट अर्थ प्रतिध्वनीत होतो.

म्हणूनच वसंत आबाजी  डहाके म्हणतात, ''कवितेचे शब्दरूप दिसते तिचे अर्थरूप दिसत नाही, जाणवते. मूर्त शब्दरूपाकडून अमूर्त अर्थरूपाकडे वाचक जात असतो''[४३]. साखरेचे रंग, रूप शब्दात वर्णन करता येते. दृश्य स्वरूपात ती आपल्याला दिसतेही मात्र तिची गोडी साखरकण विरघळणे आणि जीभेच्या संवेदना या एकत्रितपणे आल्यावर जाणवतात. गोडी दृश्य स्वरूपात दिसत नाही. गोडी संवेदनाच्या पातळीवर अमूर्तपणे जाणवते. याचप्रकारे मूर्त आणि अमूर्ताच्या परस्परसंबंधातून वाचकाला कविता जाणवत असते. शूभ्र कागदावरील कविता मूर्त शब्दरूपातून अमूर्त सार्थ स्वरूपात वाचकांच्या मनात हळूच उतरते. रसिकांच्या मनात अर्थाची वलये निर्माण करण्याची ताकद प्रतिमांच्या ठिकाणी असते. प्रतिमेमध्ये इंद्रिय, भारलेपण आणि भावनेच्या अविष्कार जाणवत राहतो. प्रतिमा ही काव्यात एकटी किंवा स्वयंपूर्ण नसते. तिला अर्थ प्राप्त होतो तो संदर्भामुळे, संदर्भाशिवाय काव्यात प्रतिमा उभी राहू शकत नाही. वसंत आबाजी डहाके म्हणतात, ''संस्कृतीत रूपके, प्रतिमा, प्रतिके आढळतात. त्यांच्या मागचा अर्थ महत्त्वाचा. त्यानेच मानवी जीवन समृद्ध होत असते''[४४]. अशा प्रतिमेचा विकास आत्मनिष्ठेपासून होत असतो. आत्मनिष्ठ दृष्टी ही प्रतिमेच्या विकासास साहाय्यभूत ठरत असते.

सावित्रीबाईंच्या काव्यातही प्रतिमा आल्या आहेत. 'आमची आऊ' ('काव्यफुले', पृ. ९) या कवितेत 'सागर' आणि 'आभाळ' या प्रतिमा आऊची महती वर्णन करण्यासाठी आलेल्या आहेत. भव्य आणि विशाल प्रतिमांमधून सावित्रीबाई आणि ज्योतिराव यांना घडविण्यात आऊचा फार मोठा वाटा होता हे त्यांना सूचित करायचे आहे. आऊ कष्टाळू, प्रेमळ, दयाळू व मूर्तिमंत अशी विद्यादेवी आहे असे सावित्रीबाईंनी म्हटले आहे. त्यामुळे त्यांची थोरवी वर्णन करताना प्रतिकांचा सुंदर वापर केला आहे. 'हळद' ही 'प्रतिमा' 'पिवळा चाफा' ('काव्यफुले', पृ. ११) या कवितेत चाफ्याच्या पिवळ्या रंगाच्या संदर्भात आली आहे. तसेच 'रती' 'मदन' ('काव्यफुले', पृ. १२) या प्रतिमा काव्यकृतींसाठी वापरल्या आहेत. 'जाईचे फुल' ('काव्यफुले', पृ. १३) या कवितेत 'नजर लाजरी' ही दृश्यप्रतिमा जाईच्या फुलाच्या सौंदर्यवर्णनासंदर्भात वापरली आहे. 'फळाफुलांच्या वेलबुट्टींचा नेसते शालू भारी' ही प्रतिमा मानव व सृष्टी('काव्यफुले', पृ. १७) या कवितेत पावसाने सारी सृष्टी फळे, पाने व फुलांनी बहरून गेल्याचे दिसल्यावर वापरली आहे. 'शूद्रांचे दुखणे' ('काव्यफुले', पृ. १७) या कवितेत भूदेव ही प्रतिमा उच्चवर्णियांनी म्हणजे ब्राह्मणांनी दोन हजार वर्षांपासून सेवा करून घेतली त्या

संदर्भात वापरली आहे. 'पुण्य' ही संकल्पना चांगल्या कृत्यासंदर्भात, तर 'पाप' ही संकल्पना वाईट कृत्यासंदर्भात वापरली जाते. 'बळीचे स्तोत्र' ('काव्यफुले', पृ. २३) या कवितेत पुण्यात्मा बळीराजा ही प्रतिमा आली आहे. बळीराजाने त्याच्या राजवटीत प्रजेला सुखी ठेवण्यासाठी हितकारक असे चांगले कार्य केले, म्हणून बळीराजाला 'पुण्यात्मा बळीराजा' असे म्हटले आहे.

'शिकणेसाठी जागे व्हा' ('काव्यफुले', पृ. २५) या कवितेत 'शूद्रत्वाचा डाग', परंपरेच्या बेडया या प्रतिमा मोठ्या समर्थपणे आल्या आहेत. मनूने शूद्रांना शिक्षण घेण्यापासून वंचित ठेवले होते. तो मनूचा काळ आला आता राहिला नाही. पेशवाईची राजवटही संपली आणि इंग्रजी राजवट आलेली आहे. परिणामी हजारो वर्षापासून शिक्षणाला असलेली बंदी आता राहीलेली नाही. त्यामुळे सर्वांनी शिक्षण घेऊन अज्ञानाला दूर सारून आपली प्रगती केली पाहिजे. या ठिकाणी हे सांगताना सावित्रीबाईंनी अज्ञान दूर करण्यासाठी येथे 'शूद्रत्वाचा डाग' आणि 'परंपरेच्या बेड्या' या प्रतिमा वापरल्या आहेत.

शूद्रांना शिक्षण नसल्यामुळे त्यांना आपले हीत किंवा अहीत कळत नाही त्यामुळे ते सुखी होऊ शकत नाहीत याचे कारण शिक्षणाचा अभाव आणि पावलोपावली सतत दुसऱ्यावर अवलंबून राहणे होते. शूद्राचे परावलंबन ('काव्यफुले', पृ. २५) या कवितेत स्वर्गीय पुण्य ही प्रतिमा उपरोधिकपणे आली आहे. उच्चवर्णिय लोक काहीही कष्ट न करता स्वर्ग, नरक, पाप, पुण्य अशा गोष्टी सांगून धर्माच्या नावाखाली शूद्रांची लुबाडणूक करतात. शूद्रांना शिक्षण नसल्यामुळे ते या गोष्टींवर विश्वास ठेवतात. आणखीनच दारिद्र्य ओढवून घेतात. येथे स्वर्गीय पूण्य ही प्रतिमा उच्चवर्णियांच्या लुटारू वृत्तीसाठी वापरली आहे.

सावित्रीबाईंच्या कवितेत पुष्कळसे चित्रण शूद्र-अतिशूद्र यांच्या हलाखीच्या परिस्थितीबद्दलचे आहे 'उपोद्घात' या कवितेत ('बावन्नकशी सुबोध रत्नाकर', पृ. ८१) 'गुलामी जन' ही प्रतिमा शूद्रांना उद्देशून वापरली आहे. अपराधी लोकांना ज्याप्रमाणे गुलामगिरीचे, लाचारीचे जीवन जगावे लागते, तसेच शूद्रांनाही हजारो वर्षांपासून लाचारीचे, गुलामीचे जीवन जगावे लागत आहे. त्या संदर्भात ही प्रतिमा आली आहे. 'सिद्धता' ('बावन्नकशी सुबोध रत्नाकर', पृ. ८३) या कवितेत 'गुलामी गुहा' ही प्रतिमा अपराध्यांना ज्याप्रमाणे तुरूंगात पशूंप्रमाणे राहावे लागते, तसे स्त्री-शूद्रांना अत्यंत वाईट स्थितीत राहावे

लागते यासाठी वापरली आहे. तसेच चार्तुवर्ण पद्धतीवर टीका करताना 'वर्ण विषारी विकारी' ही प्रतिमा या चार वर्णांच्या योगे किती भयंकर परिणाम झाले या अर्थी वापरली आहे. इंग्रजी राजवटीत ख्रिस्ती मिशनऱ्यांनी शूद्रांना शिकविण्यासाठी शाळा सुरू केल्या होत्या, परंतु उच्चवर्णियांना त्यांच्याशिवाय कोणीही शिक्षण घेणे मान्यच नव्हते, त्यातच वर्षानुवर्ष शिक्षणापासून वंचित असल्याने शिक्षणाचे महत्त्वच मुळी शूद्रांना माहीत नव्हते. शिक्षणाच्या उपयोगितेबद्दल अतिशय अज्ञ असणाऱ्या शूद्रांना 'मेंढरे' ही प्रतिमा 'आंग्लाई' ('बावन्नकशी सुबोध रत्नाकर', पृ. ८५) या कवितेत शूद्रांना उद्देशून वापरली आहे. तसेच 'गौरकांता' ('बावन्नकशी सुबोध रत्नाकर', पृ. ८६) ही प्रतिमा गौरवर्ण शरीरसंदर्भात वापरली आहे. शूद्रांसाठी ज्योतिरावांनी केलेल्या अथक प्रयत्नांची, त्यागाची आणि समर्पन भावनेची सावित्रीबाईंना पुरेपूर जाण होती. त्या जाणिवेतून 'उपसंहार' ('बावन्नकशी सुबोध रत्नाकर', पृ. ८९) या कवितेत 'ज्योत', 'पुढारी', 'ज्ञानयोगी', 'चिरंजीव' या प्रतिमा ज्योतिरावांसाठी वापरलेल्या आहेत.

सावित्रीबाईंच्या काव्यातील एकूणनच प्रतिमा सहज आकलनीय, सुबोध तरीही समर्पक आहेत. प्रतिमांमध्ये नाविन्य आढळत नाही. परंतु त्या काळी असणाऱ्या कवितांचा प्रकार आणि विषयाकडे पाहता पारंपारिक प्रतिमा नाविन्याने वापरल्या आहेत असे म्हणता येईल. एक प्रकारची सांकेतिकता यामध्ये आढळून येते.

## ३.१०.२ सावित्रीबाईंच्या काव्यलेखनातील प्रतिकेः

प्रतिमेचे विकसित रूप म्हणजेच प्रतीक होय, आपल्या व्यक्तिनिष्ठ अनुभवाचे एक प्रातिनिधिक नाते दर्शविण्यासाठी वापरले जाणारे चिन्ह म्हणजे प्रतीक. प्रतिकाची रचना काही रूपकासारखी असते, मात्र रूपकासारखे प्रतीक विश्लेषिता येत नाही. सावित्रीबाईंच्या कवितांमध्ये प्रतिके आहेत. सावित्रीबाईंना काव्यप्रतिभेची देणगी लाभलेली होती. परंतु त्यांच्या अनुभवविश्वाचा आवाका, शिक्षण आणि काव्यरचनेमागील भूमिका पाहता त्यांच्या काव्यात आलेली प्रतिके मर्यादित प्रमाणात आलेली आहेत याचे विशेष वाटत नाही.

मानवाला गुलाबाचे प्रतिक मानताना गुलाबासारख्याच पण कडू कन्हेरीच्या फुलाबरोबर तुलना केली आहे. गुलाब हा जसा सुंदर, सुरेख असतो तसाच मानवप्राणी आहे. हा तात्त्विक विचार, 'गुलाबाचे फुल' ('काव्यफुले', पृ. १५) या कवितेत सांगितला आहे. जाईचे फुल

('काव्यफुले', पृ. १४) यातदेखील 'मानव' हे प्रतीक वापरले आहे. काही ठिकाणी भारतीय संस्कृतीचे दर्शन प्रतिकांमधून घडताना दिसते. 'बळीचे स्तोत्र' ('काव्यफुले', पृ. २३) या कवितेत 'बळी', 'यज्ञयाग', 'कांचन', 'रत्नमुकूट', 'विंध्यावली', ही अबोध मनातील प्रतिके वापरली आहेत. ही प्रतिके बळीराजाच्या राज्याची महती वर्णन करण्यासाठी वापरली आहेत. भारतीय संस्कृतीतील ही प्रतिके सावित्रीबाईंच्या चिंतन विश्लेषणाला सखोलता आणि समृद्धता आणून देतात. 'सावित्री व ज्योतिबा संवाद' ('काव्यफुले', पृ. ३३) या कवितेत 'अंधार' हे अज्ञानाचे प्रतीक म्हणून वापरले आहे आणि 'सूर्याला' ज्ञानाचे प्रतीक मानले आहे.

## ३.१०.३ काव्यलेखनातील अलंकारः

सावित्रीबाईंनी आपल्या कवितांमध्ये उपमा, उत्प्रेक्षा, रूपक स्वभावोक्ती हे अर्थालंकार आणि अनुप्रास, यमक हे शब्दालंकार वापरले आहेत. त्यांच्या सर्व रचना व्याकरणिक दृष्टीने अचूक आहेत असे नाही. सावित्रीबाईंचा लेखन उद्देश माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवणे, शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे हा होता. अर्थातच आपले विचार स्त्री–शूद्रातिशूद्रांपर्यंत पोचविण्याचे माध्यम म्हणून त्यांनी कविता लिहिल्या. त्यामुळे वृत्त, छंद यांचे व्याकरणिक नियम त्यांनी तंतोतंत पाळलेले दिसत नाहीत. एकूण समाजप्रबोधन आणि मानवतेचा दिव्य संदेश या ध्यासातून त्यांनी काव्यलेखन केले आहे.

मनाला मधुर सद्‌विचारांनी, तनाला तारूण्याने आणि भाषेला ज्यांच्यामुळे शोभा येते त्या गुणधर्मांना भाषेचे अलंकार असे म्हणतात. दोन वस्तूंमधील साम्य, विरोध, तर कधी नाद निर्माण करणारे शब्द वापरून भाषा अधिक सुंदर करण्याचा प्रयत्न अलंकाराने होतो. कधी शब्दातील अक्षररचनेमुळे नाद निर्माण होऊन भाषा साजिरी होते, तर कधी योजलेल्या शब्दांमुळे अर्थांचे सौंदर्य खुलून दिसते. त्यामुळे भाषेच्या अलंकाराने दोन प्रकार पडतात. १) शब्दालंकार २) अर्थालंकार या अलंकारांचा सावित्रीबाईंनी आपल्या कवितेत वापर केला आहे.

### (१) उपमा अलंकारः

एखाद्या गोष्टीतील सारखेपणा दर्शविताना उपमा अलंकार कसा होतो हे सांगताना मो.रा.वाळंबे म्हणतात, ''दोन वस्तूंतील साम्य चमत्कृतीपूर्ण रितीने जेथे वर्णन केलेले असते

तेथे उपमा अलंकार होतो''[४५]. सावित्रीबाईंच्या 'ज्योतिबा' या कवितेत उपमा अलंकार आलेला आहे, या कवितेतील सावित्रीबाई म्हणतात,

''तुकाराम जैसा तसा संत ज्योती
सुधा ज्ञान देई जना रितीभाती''

('बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यातील 'ज्योतिबा' पृ. ८८)
येथे सावित्रीबाईंनी ज्योतिरावांची तुलना संत तुकाराम यांच्याबरोबर करून दोघांच्या कार्यातील सारखेपणाचे वर्णन केले आहे. त्यामुळे येथे उपमा अलंकार झाला आहे.

**(२) उत्प्रेक्षा अलंकारः**

या अलंकाराचे वर्णन करताना मो.रा.वाळंबे म्हणतात, ''उपमेय हे जणू उपमानच आहे असे जेथे वर्णिलेले असते, तेथे उत्प्रेक्षा अलंकार होतो''[४६]. सावित्रीबाईंच्या जाईची कळी या कवितेत उत्प्रेक्षा अलंकार आहे. या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

''रात्री बनते जणू रती ती
सुगंध खेळवी कळी जाईची''

('काव्यफुले' संग्रहातील 'जाईचे कळी' ही कविता पृ. १४)
जाईची कळी ही सुरेख आहे, कोवळी आहे तसेच पंचदले व गुलाबी छटा असणारी आहे. तीच जाईची कळी रात्री सुगंध खेळविणारी रती बनते, असे वर्णन येथे आल्यामुळे उत्प्रेक्षा अलंकार झाला आहे.

**(३) स्वभावोक्ती अलंकारः**

एखाद्या गोष्टीचे हुबेहूब वर्णन करताना हा अलंकार कसा होतो हे सांगताना मो.रा.वाळंबे म्हणतात, ''एखाद्या व्यक्तीचे, प्राण्यांचे, वस्तूचे त्याच्या स्वाभाविक स्थितीचे किंवा हालचालीचे यथार्थ (हुबेहूब) पण वैशिष्ट्यपूर्ण वर्णन हाही एक भाषेचा अलंकार ठरतो. याला स्वभावोक्ती अलंकार म्हणतात''[४७] शंकराच्या जगावेगळया रूप–गुणांचे शिवप्रार्थना या कवितेत शंकराच्या स्वाभाविक स्थितीचे हुबेहूब असे वर्णन करताना सावित्रीबाई म्हणतात,

''सत्य सुंदर शिव थाट । शिरी शोभे जटाजपळट
वाहती गंगाधारा उत्कट । चतुर्दश विद्येच्या''

('काव्यफुले' संग्रहातील शिवप्रार्थना ही कविता पृ. ४)

शंकराच्या रूपसौंदर्याचे वैशिष्टयपूर्ण सुरेख वर्णन केल्यामुळे येथे स्वभावोक्ती अलंकार झाला आहे.

**(४) रूपक अलंकारः**

एखाद्या गोष्टीतील एकतानता, एकरूपता वर्णन करण्यासाठी हा अलंकार उपयोजिला जातो. मो.रा.वाळंबे म्हणतात, ''उपमेय व उपमान यात एकरूपता आहे. ती भिन्न नाहीत असे वर्णन जेथे असते तेथे रूपक हा अलंकार असतो''[४८]. सावित्रीबाईंच्या 'ब्रह्मवंती शेती' या कवितेत रूपक अलंकार आहे. या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

''ब्रह्म असे शेती । अन्नधान्य देती ।
अन्नास म्हणती । परब्रह्म''

('काव्यफुले' संग्रहातील 'ब्रह्मवंती शेती' ही कविता पृ. १४)

वरील रचनेत ब्रह्म आणि शेती अभिन्न आहेत. म्हणजेच ते एकरूप मानले म्हणून अभेद वर्णिलेला आहे, म्हणून येथे रूपक अलंकार झाला आहे.

**(५) अनुप्रास अलंकारः**

एकाच अक्षराची पुनःपुन्हा आवृत्ती होऊन हा अलंकार कसा होतो हे सांगताना मो.रा.वाळंबे म्हणतात, ''एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेव्हा सौंदर्य प्राप्त होते, तेव्हा अनुप्रास अलंकार होतो''[४९]. हा अलंकार शिवप्रार्थना या कवितेत साधलेला आहे. सावित्रीबाई म्हणतात,

''त्रितोचन त्रितिक्षु ललाट । त्रिपुरांतक त्रिभूवन त्रिपट
स्कंधी सर्पनृत्याचा थयथयाट । चाले कर्ता कर्म क्रियेचा''

येथील काव्यपंक्तीत 'त्रि' आणि 'क' या अक्षरांची पुनरावृत्ती झाली आहे. त्यामुळे नाद निर्माण होऊन काव्यपंक्तींना सौंदर्य प्राप्त झाले आहे.

**(६) यमक अलंकारः**

अक्षरे वेगळ्या अर्थाने आल्यास यमक अलंकार कसा होतो हे सांगताना मो. रा. वाळंबे म्हणतात, ''कवितेच्या चरणाच्या शेवटी, मध्ये किंवा ठराविक ठिकाणी एक किंवा अनेक अक्षरे वेगळ्या अर्थाने आल्यास यमक हा अलंकार होतो''[५०]. ज्योतिबांना नमस्कार या कवितेत यमक अलंकार झालेला आहे. या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

''थोर ज्योती दीन शुद्रा । अतिशुद्रा हाक मारी
ज्ञान ही ईर्षा देई । तो आम्हाला उद्धरी''

('काव्यफुले' काव्य संग्रहातील 'ज्योतिबांना नमस्कार' ही कविता पृ. ६)

वरील चरणांत शेवटी 'री' हे अक्षर वेगवेगळ्या अर्थाने आल्यामुळे यमक अलंकार झाला आहे. तसेच 'शिकणेसाठी जागे व्हा' या कवितेत त्या म्हणतात,

''राज्यात बळीच्या आम्हास विद्या घडो
यशाची आमच्या दुंदुभी नगारे झडो''

('काव्यफुले' काव्य संग्रहातील 'शिकणेसाठी जागे व्हा' ही कविता पृ. २५)

उपरोक्त चरणांत 'डो' हे अक्षर वेगवेगळ्या अर्थाने आल्यामुळे यमक अलंकार झाला आहे. सावित्रीबाईंच्या कवितांमध्ये बऱ्याच ठिकाणी यमक अलंकार सहजी साधला आहे.

### ३.१०.४ काव्यलेखनाची भाषाशैलीः

भाषा हे संवादाचे, भावनांचे, विचारांचे प्रगटीकरण करण्याचे प्रभावी माध्यम आहे. मानवी जीवनात विचार माहिती यांच्या आदानप्रदानाचे महत्त्वाचे कार्य भाषेमार्फत होत असते. सामाजिक परिस्थिती, भौतिक सुविधा, संस्कृती, संकेत अशा नानाविध घटकांचा भाषेवर परिणाम घडतो. भाषेचा विकास यातूनच नवनवीन अनुभवांनी वेगवेगळया अंगाने भाषा समृद्ध होत जाते. वेगवेगळया कालखंडात निर्माण झालेले साहित्य आणि त्यांची कारणेही भिन्न असतात. ही कारणे ऐतिहासिक, राजकीय, भौगोलिक किंवा सामाजिकही असतात. भाषेतून वेगवेगळे विचार प्रगट होतात, ते विचार विशिष्ट रीतीने व्यक्त व्हावेत असे वळणही दिले जाते. त्यामुळे ज्या समाजात हे घडते तिथल्या मतांचा, नियमांचा पुरस्कार किंवा निषेधही भाषेतूनच व्यक्त होतो. वसंत आबाजी डहाके म्हणतात, ''भाषेतच माणसाचे तत्त्वज्ञान आणि काव्य व्यक्त होत असते, म्हणजे भाषेद्वारा समाजाशी संवाद आणि संस्कृतीशी संबंध जोडला जातो''[५१].

आपले अनुभव शब्दबध्द करणे, पुढील पिढीला सांगणे, ज्ञान मिळविणे, शोध घेणे त्या ज्ञानाला, शोधाला भाषेत व्यक्त करणे किंवा संचय करणे या सर्वांसाठी भाषेची भूमिका मोलाची आहे. म्हणूनच एखादे साहित्य समाजातून घेताना नुसते शब्द व त्यांचे ढोबळ अर्थ समजून उपयोग नाही. म्हणूनच वसंत आबाजी डहाके म्हणतात, ''एखादी कविता समजून घ्यायची

असेल तर केवळ शब्दार्थ समजून उपयोगाचे नाही त्या शब्दांत प्रतिबिंबित झालेले अथवा अर्थच्छटांतून सूचित झालेले त्या समूहाचे संपूर्ण जीवनच समजले पाहिजे''[५२]. प्रत्येक कवीची आपल्या काव्यलेखनाची एक शैली असते. त्याचा स्वतःचा एक भाषाविषयक दृष्टिकोन असतो. सभोवतालच्या सामाजिक, सांस्कृतिक वातावरणातून भाषेच्या पातळीवर तो काहीएक अनुबंध जोडतो. त्यातूनच त्याची स्वतःची अशी एक शैली निर्माण होते भाषेच्या पातळीवर कवीच्या लेखनावर वेगवेगळे संस्कार होत असतात. त्या कवीचे सामाजिक, सांस्कृतिक वातावरणाशी असलेले नाते त्यातूनच उलगडत जाते.

शब्द हे साहित्याचे प्रभावी माध्यम असते. अर्थातच कविता ही सर्वार्थाने भाषारूप असल्याने भाषेचा आणि शब्दांच्या निवडीचा विचार कवितेच्या संदर्भात केला जातो. कारण काव्याच्या बाबतीत कमी शब्दात अधिक आशय व्यक्त करण्याची ताकद असावी लागते. काव्याच्या बाबतीत शब्दाला, शब्दाच्या समर्पक योजनेला अधिक महत्त्वाचे स्थान असते. कवितेत शब्द आणि अर्थ एकजीव होऊन यावा लागतो. अर्थाची अनेकविध वलये निर्माण करण्याचे सामर्थ्य कवीने उपयोजिलेल्या शब्दांमध्ये असते. एखाद्या साहित्यकृतीचा, त्यामध्ये आविष्कृत झालेल्या आविष्कारवैशिष्ट्यांचा शोध घेताना अर्थ, शब्द, नाद यांसारख्या घटकांमधून या कलाकृतीच्या एकसंधतेचा नेटका प्रत्यय वाचकाला आल्याशिवाय रहात नाही.

सगुणाकडून निर्गुणाकडे, मूर्ताकडून अमूर्ताकडे आणि दृष्टाकडून अदृष्टाकडे जाण्याचा रस्ता कवितेतून प्रगटतो. त्यासाठी कवी आपल्या काव्यात प्रतिमांची निर्मिती करतो. लय, ताल, प्रतिमा यांच्यातून कलाकृतीच्या आशयाकडे जाता येते. प्रतिमानिर्मितीमुळे शब्दांच्या सहाय्याने कवी आपला अनुभव अनेकार्थसूचक व प्रत्ययक्षम समृद्ध बनवितो. कवितेत प्रतिमारूप शब्दांखेरीज आणखीही काही शब्द असतात. थोडक्यात वाङ्मयकृती ही विशिष्ट अशा शब्दांच्या संघटनेमधून काही शब्द असतात. थोडक्यात वाड्मयकृती ही विशिष्ट अशा शब्दांच्या संघटनेमधून तयार एक रूपच असते. भाषेचे हे रूप मात्र दैनंदिन व्यवहारातील बोलीभाषेपेक्षा कितीतरी वेगळे असते. कवितेमध्ये ज्या ओळी असतात त्यात विशिष्ट असा क्रम, संगती, लय असते. कवितेतील शब्द त्यांच्या वेगवेगळ्या रचनेमुळे ताल, लय व नाद यांची निर्मिती करतात. म्हणजे जर काव्यातील मूळ शब्दाचा क्रम बदलला तर काव्याचा तोल बिघडून त्यातील भावना प्रभावहीन होऊन लुप्त होते. कवितेतील शब्दांची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी, मांडणीचा

क्रम, शब्दांचा नाद, नादासह अर्थसंदर्भ एकमेकांत अनेक रंग एकमेकांजवळ इंद्रधनुष्याप्रमाणे एकवटून मनोहारी काव्य बनून येतात.

सावित्रीबाईंच्या समग्र कवितांचा विचार करता काही कविता जरी पारंपरिक आशय व्यक्त करणाऱ्या असल्या तरी बहुसंख्य कविता जीवनासंबंधी नवीन, ताजा दृष्टिकोन देणाऱ्या आहेत. चार्तुवर्ण पद्धतीवर, अंधश्रद्धेवर कोरडे ओढणारी ही कविता आहे. स्त्री–पुरूष आणि सर्व जातिधर्माकडे पाहण्याची समत्ववृत्ती त्यांच्या कवितेतून दिसून येते. प्रसंगी आधुनिकतेची मूल्ये उद्घोषित करणारी आणि रोखठोक कोणाचा मुलाहिजा न ठेवणारी कविता त्यांनी लिहिली आहे. काव्यफुले या संग्रहातील काही कविता अल्पाक्षरी आहेत परंतु विषयांची विविधताही त्यात आहे, नावीण्य, ताजेपणा असून मनातील सद्भावनांचे तरंग त्यातून प्रतित होतात. कधी मानवी जीवनाची क्षणभंगुरता त्यांना अस्वस्थ करते तर कधी त्यांच्या काव्यातील भावना मानवतेचे गौरीशिखर गाठण्याचा ध्यास धरते.

एकूणच सावित्रीबाईंची कविता सूत्रमय भाषा, नेटका आविष्कार, स्वातंत्र्य, समता, बंधुता या त्रिसूत्रींचा ध्यास घेणारी आहे. सावित्रीबाईंनी कवितेत अलंकारिकतेपेक्षा मूळ आशयविषयाला महत्व दिले आहे. नाद, ताल, लय यांचा कवितालेखनात आविष्कार झाला आहे. कवितेतूनच नव्हे तर त्यांच्या भाषणांमधूनदेखील प्रवाहीपणा आणि आवेग हे अंगभूत गुण व्यक्त झाले आहेत.

सावित्रीबाईंच्या काही कवितांवर संत तुकाराम, संत नामदेव यांच्या अभंगरचनेचा प्रभाव असल्याचे स्पष्ट जाणवते. त्यांची भाषा निर्भिड, परखड आणि तर्कशुद्ध आहे. मनाला वाटले, बुद्धीला पटले, आचरणातून केले ते सावित्रीबाई सरळ बेधडकपणे सांगतात. कधी कोमल निसर्गकाव्याची निर्मिती करतात, कधी अंतरीच्या तळमळीने उपदेशपर कवितांची निर्मिती करतात तर कधी अंतर्मुख होऊन आपल्याच काव्यप्रतिभेकडे नव्या नजरेने पाहतात. लोकांना परिचीत असलेल्या, अंगवळणी पडलेल्या, ओठांवर सहज येणाऱ्या चाली पाठांतरासाठी आणि स्मरणासाठी सुलभ होतात म्हणून सावित्रीबाईंनी जाणिवपूर्वक काही कविता पद्यात लिहिल्या आहेत.

सावित्रीबाईंच्या शिक्षणाचा श्रीगणेशा आभाळाच्या छताखाली आणि मातीमायच्या पाठीवर वृक्षवल्लींच्या छायेत ज्योतिरावांच्या देखरेखीखाली झाला होता. प्राथमिक शिक्षणाचे धडे घरीच गिरविल्यावर 'नॉर्मल स्कूल' मध्ये त्यांनी अध्यापनाचे प्रशिक्षण घेतले होते. हे शिक्षण

घेत असताना ज्योतीरावांचे ब्राह्मण मित्र सखाराम यशवंत परांजपे आणि केशव शिवराम भवाळकर (जोशी) आणि मिचेल मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले होते. या सर्वांच्या भाषेचा परिणाम, वातावरणाचा परिणाम त्यांच्या भाषेवर होणे आवश्यक नाही. त्यामुळे त्यांचे लेखन बोलीभाषेतून व्यक्त न होता त्या काळातील ब्राह्मणी भाषेतून व्यक्त झाले. म्हणजेच हा त्यांच्या शिक्षणाचा आणि काळाचा परिणाम होता.

सावित्रीबाईंनी इंग्रजी आणि संस्कृत पुस्तकांचेही वाचन केल्यामुळे त्या विषयांचे ज्ञान त्यांना अवगत होते. काही ठिकाणी इंग्रजी, संस्कृत शब्दांचा वापरही केला गेला आहे. श्रेष्ठ धन या कवितेत त्यांनी संस्कृत शब्द वापरले आहेत. सावित्रीबाई म्हणतात,

''प्रातःकाळी करी बाळा । शौचादि मुखमार्जन
होऊनिया शुचिर्भूत । वंदू माता पिता जन ।

('काव्यफुले' संग्रहातील 'श्रेष्ठ धन' ही कविता पृ. २०)

या रचनेत मुखमार्जन, शुचिर्भूत हे संस्कृत शब्द उपयोजिले आहेत. तसेच 'शूद्र शब्दाचा अर्थ' या कवितेत इंग्रजी शब्द वापरले आहेत. त्या म्हणतात,

''खरे शूद्र धनी । होत इंडियाचे
नाव असे त्यांचे इंडियन।''

('काव्यफुले' संग्रहातील 'श्रेष्ठ धन' ही कविता पृ. २०)

इंडिया, इंडियन या इंग्रजी शब्दांचा वापर करूनही रचना केली आहे. याच कवितेत नेटिव्ह हा शब्दही आला आहे.

सावित्रीबाईंच्या कवितांमधील भाषा वाचकांच्या मनाला भिडणारी आहे, वास्तवतेचे भान देणारीही आहे. त्या भाषेत आर्तता आहे तशी सहजताही आहे. मानवतेबद्दलची विधायक भूमिका ठामपणे व्यक्त झाली आहे. सावित्रीबाईंची शब्दसंपदा, सूक्ष्म निरीक्षणशक्ती, क्रियाविशेषणांचा यथोचित वापर, उचित शब्दवापर, प्रतिमा, उपमा–उपमान हे शैलीविशेष त्यांच्या कवितांमध्ये दिसतात, त्याचबरोबर उत्स्फूर्तत, प्रवाहीपणा, प्रभावीपणा, जोरकसपणा आणि सहजसुलभता ही वैशिष्ट्ये त्यांच्या काव्यलेखनात विचारप्रवण करणे, मताचे तार्किक खंडन–मंडन करणे या गुणवैशिष्टयांमुळेच सावित्रीबाईंच्या कवितांचा आविष्कार सहजसुंदर झाला आहे. काव्यलेखन जिवंत व रसरशीत झाले आहे. आपले विचार बहुजनसमाजात कळावेत म्हणून त्यांनी

लोकजीवनातील, उपमांचा वापर केला आहे. लोकजीवन व लोकव्यवहारातील उपमा व प्रतिमांची योजना यामुळे सहजसुलभ शैली तयार झाली आहे. सावित्रीबाईंच्या कवितेत एखादी घटना, प्रसंग, त्यातील नाटय, विरोध विसंगती, भाव–भावना शब्दबध्द करण्याचे सामर्थ्य आहे. त्यांच्या कवितेमध्ये शब्दांची द्विरूक्ती आढळते. अशा द्विरूक्तीमुळे रचनेतील शब्दाला एक प्रकारचा नाद प्राप्त होतो. सामूदायिक संवाद पद्य या कवितेत अशीच शब्दांची द्विरूक्ती साधलेली आढळते. सावित्रीबाई म्हणतात,

''शाळेमधून शिकूनि घेऊ, ज्ञान मिळवू चला ग चला
शाळेत जा चला ग चला''

('काव्यफुले' संग्रहातील 'सामुदायिक' संवाद ही कविता पृ. ३०)

येथे 'चला ग चला' या शब्दांच्या द्विरूक्तीमुळे गेयता, नाद, लय प्राप्त झाली आहे, या कवितेत पुढे त्या म्हणतात,

''मनुष्याचा खरा दागिना शिक्षण आहे घ्या चला
जा शाळेला जा शाळेला''

('काव्यफुले' संग्रहातील 'सामुदायिक संवाद' ही पद्द कविता पृ. ३०)

येथे 'जा शाळेला जा' शब्दांच्या द्विरूक्तीमुळे गेयता, नाद, लय प्राप्त झाली आहे. सावित्रीबाईंच्या बाळास उपदेशसारख्या काही कविता सामान्य प्रतीच्या आहेत. 'श्रेष्ठ धन', 'बाळास उपदेश' या कवितांमधून सकाळी उठल्यापासून दिनचर्या कशी ठेवावी, याचे दिग्दर्शन केले आहे. बाळास उपदेश ही कवितारचना ओढूनताणून केल्यासारखी वाटते, त्या म्हणतात,

''करणे काम आजी ते । आताच कर खेचून
जे दुपारी करायचे । ते आताच कर जाऊन''

('काव्यफुले' संग्रहातील 'बाळास उपदेश' ही कविता पृ. २१)

ही कविता उपदेशपर असून कबिरांच्या दोह्याचा प्रभाव यावर दिसून येतो. 'अज्ञान' या कवितेत माणसाचा एकमेव शत्रू म्हणजे अज्ञान होय हे साध्या प्रश्नोत्तरे संवादातून सांगितले आहे. सावित्रीबाईंच्या काही कविता सामान्य प्रतीच्या असल्या तरी त्यातून जनसामान्यांविषयी असणारा अकृत्रिम जिव्हाळा, तळमळ दिसून येते. आणि त्यांची कृती तर असामान्यच होती.

सावित्रीबाईंच्या काही कवितांमधून समर्पक असा शब्दचित्रांचा वापर झालेला दिसून येतो. एखादे स्थळ किंवा व्यक्ती घेऊन ही शब्दचित्रे त्यांनी आपल्या कवितांमधून रेखाटली आहेत. 'माझी जन्मभूमी' ('काव्यफुले' संग्रहातील कविता पृ.११) याशिवाय सावित्रीबाईंनी 'शिवपार्थना' ही 'शिवस्तोत्र' या कवितांमधून शंकराचा महिमा वर्णन केलेला आहे. शिवशंकराच्या यथार्थ वर्णनाबरोबर 'छत्रपती शिवाजी' 'ज्योतिबांना' नमस्कार या नमनात्मण रचनेतून शिवाजी महाराजांची थोरवी आणि ज्योतिरावांविषयीची आत्मनिष्ठा प्रगट होते. 'राणी छत्रपती ताराबाई' या कवितेत ताराबाईंच्या कर्तृत्वाचे वर्णन केले आहे. 'बळीचे स्तोत्र' ही बळीराजाची महती वर्णन करणारी कविता आहे. 'ज्योतिबा' या कवितेत तर ज्योतिरावांचे पद्यात्मक कार्यचरित्र अथपासून इतिपर्यंत नेत्रचक्षुंसमोर उभे केले आहे. उपरोक्त उल्लेखलेल्या सर्वच कवितांमधून सावित्रीबाईंनी व्यक्तींची शब्दचित्रे सुंदर रेखाटली आहेत.

लेखकाच्या शैलीच्या अभ्यास करताना फक्त भाषाशास्त्रीय बाजूने अभ्यास करून चालत नाही तर त्या लेखकाचा कालखंड, लेखक, वाचक, लेखनहेतू आणि लेखकाचे चरित्र या सभोवतालच्या सांस्कृतिक वाङ्मयीन घटकांचा विचार करावा लागतो. सावित्रीबाईंच्या शैलीचा विचार करता तिच्या भाषाशास्त्रीय अभ्यासापेक्षा तिची सामाजिक बाजू महत्त्वाची आहे, त्यांच्या लेखनतंत्रापेक्षा त्यांची दृष्टी अधिक महत्त्वाची आहे. कारण त्यांना बहुजन समाजाच्या मनाला आलेली मरगळ घालवायची होती, नवविचारांची आशा फुलवायची होती, दारिद्र्यात पिचत पडलेल्या आपल्या बांधवांना दिशा दाखवायची होती, म्हणूनच त्यांनी व्याकरणशुद्धतेचे नियम पाळले नाहीत याचे आश्चर्य वाटत नाही. कारण आपल्या काव्यलेखनातून प्रबोधन करणे हाच त्यांच्या लेखनाचा मुख्य हेतू होता. त्यामुळे त्यांची भाषाशैली प्रवाही, अर्थवाही झाली आहे. निर्दोष वाक्यरचना, शाब्दिक काटेकोरपणा या सर्वांहून प्रभावी आविष्करण आणि उत्स्फूर्तता त्यांच्या कवितांत अधिक दिसते.

अशाप्रकारे सावित्रीबाईंच्या भाषाशैलीवरून त्यांच्या व्यक्तिमत्वाची जी प्रतिमा वाचकांसमोर उभी राहते, ती संवेदनशील, धैर्यवान, निर्भय, त्यागी, प्रामाणिक, बुद्धिप्रामाण्यवादी आणि पर्यावरणप्रेमी अशा स्वरूपाची आहे.

## ३.११ सावित्रीबाईंच्या काव्याविषयी घेतलेल्या भूमिका, आक्षेपः

### ३.११.१ सावित्रीबाईंच्या काव्याविषयी घेतलेल्या भूमिकाः

सावित्रीबाईंचे वाङ्मय एक–दोन दशकांच्या कालावधीत समाजासमोर आले असा काही जणांचा गैरसमज आहे. त्यामुळे सावित्रीबाईंचे चरित्र आणि वाङ्मय कसे प्रकाशित होत गेले याबद्दल शोध घेताना त्यांचे आद्य चरित्रकार आणि वाङ्मय यासंबंधी पुढील माहिती उपलब्ध झाली.

पुण्यातून प्रसिद्ध होणाऱ्या 'गावगाडा'च्या 'क्रांति विशेषांक' च्या नोंदीनुसार इ.स.१९५५ सालापासून सावित्रीबाईंची पुण्यतिथी साजरी केली जात होती. 'गावगाडा' हे सत्यशोधक समाजाच्या विचारप्रणालीनुसार चालविलेले आणि श्री.द.स.झोडगे यांनी संपादन केलेले साप्ताहिक होते. इ.स. १९६६ मध्ये, फुलवंताबाई झोडगे यांनी 'गावगाड्या' च्या महात्मा फुले विशेषांकात सावित्रीबाईंच्या चरित्राचा काही भाग प्रसिद्ध केला होता. या साधनांप्रमाणे त्यांनी सावित्रीबाई यांचे काव्यफुले 'सावित्रीबाई संपादित ज्योतिरावांची भाषणे' असे दुर्मिळ ग्रंथही मिळविले आणि ते आपल्याकडील काही अभ्यासकांना उपलब्ध करून दिले परंतु 'गावगाड्या' च्या मर्यादित खपामुळे हे साहित्य अनेक मान्यवरांच्या समोर आले नाही. म्हणजेच सावित्रीबाई फुलेंवरील लेखमाला इ.स. १९६६ सालच्या आसपास सुरू झाली होती. या लेखमालेत सावित्रीबाईंच्या कविता व इतर वाङ्मयही 'गावगाड्या' तून वेळोवेळी प्रकाशित झाले होते. हे सर्व साहित्य बऱ्याच उशिरा उपलब्ध झाले हे खरे असले तरी याविषयी आपली भूमिका मांडताना कृ.पं.देशपांडे म्हणतात, ''सावित्रीबाईंच्या रचना एक शतकानंतर आजच आकस्मिकपणे उपलब्ध झाल्या, हे काही त्यांच्या अस्सलपणाविषयी शंका घेण्याचे कारण ठरू शकणार नाही, आपल्याला हे निश्चितपणाने माहित आहे की, संशोधकाच्या दिर्घकालीन प्रयत्नांतूनही जी साधने हाती लागली नाहीत, अशी काही महत्वपूर्ण साधने मधूनमधून अगदी अकल्पितपणाने कुणाच्या तरी हाती पडत असतात. उदाहरणार्थ प्राचीन मराठी वाङ्मयसंशोधनाच्या प्रारंभकाळात राजवाड्यांच्या हाती चोंभाकवींचे 'उखाहरण' हे नितांतरम्य काव्य अत्यंत त्रूटीत अवस्थेत पडले होते आणि ते तेवढेच त्यांनी प्रकाशितही केले होते. त्यानंतर पन्नास–साठ वर्षे लोटल्यावर त्याची एक पूर्ण प्रत डॉ.यु.म.पठाण यांना मराठवाड्यात उपलब्ध झाली. आधुनिक काळातील मुद्रित ग्रंथाच्या बाबतीतही अनेकदा असेच घडत आले

आहे. दाते सूचित न नोंदविली गेलेली अनेक पुस्तके संशोधकांना अधूनमधून अचानक रितीने मिळत असतात, तर त्याच आश्चर्य वाटले, तरी शंका वाटण्याचे कारण नाही''[५३]. सावित्रीबाईंची 'काव्यफुले' 'मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे', 'सावित्रीबाईंची पत्रे' आणि 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' हे सर्व साहित्य डॉ.मा.गो.माळी यांनी सावित्रीबाई फुलेः समग्र वाङ्मय या पुस्तकात संपादित केले आहे. परंतु या साहित्याबरोबर आणखीही बरेच साहित्य असण्याची शक्यता आहे कारण सावित्रीबाईंचा 'पितरपुराण' हा काव्यग्रंथ असल्याचा नुसता उल्लेख आहे. मात्र हा काव्यग्रंथ अजूनही उपलब्ध होऊ शकला नाही.

नाना ढाकूलकर 'मराठी काव्याची जननी सावित्रीबाई' या लेखात म्हणतात, ''अर्वाचीन परिवर्तनवादी साहित्याचा क्रांतीप्रवाह १९२० च्या सुमारास सुरू झाला असे मानले जाते, परंतु त्यापूर्वी सुमारे साठ–सत्तर वर्षांपूर्वीपासून सार्वत्रिक जननिष्ठ साहित्य म. ज्योतिबा फुले आणि साध्वी सावित्रीबाई फुलेंनी रचले हे का विसरले जाते? 'आगरकरांना समाजसुधारकाचे आद्य प्रवर्तक' मानले जाते. आगरकरांचे सामाजिक ऋण कोणीही अमान्य करू शकत नाही, त्यांनी उच्चवर्णियांत विचारक्रांती घडवून आणली होती. परंतु आगरकरांच्या जन्माआधीपासूनच समाजाच्या शेंडीपासून तळपायापर्यंत समाजकार्य स्त्री शिक्षणाचे क्रांतीपर्व सुरू झाले होते हे अनुल्लेखाने का मारले जाते? वृत्तालंकाराचा सुंदर गोतावळा शोकेशमध्ये ठेवून अर्वाचीन मराठी काव्याचे क्रांतीकार्य केशवसुतांनी सुरू केले असे मानले जाते. यातही काही वाद नाही. परंतु केशवसुतांपूर्वीच १८५४ पासून अर्वाचीन मराठी काव्याची जननी उदयास आली होती हे का बुद्धीपरस्पर विसरले जाते. ज्योतिबा–सावित्री शुद्र होते म्हणून की काय? याचा अर्थ एवढाच समजावा लागेल की आम्हा बुध्दीवाद्यांची सद्सद्विवेकबुध्दी अजूनही अपवित्र आहे''[५४]. त्या काळच्या बहुजन समाजाला जो नुकताच नवशिक्षित होऊ लागला होता त्या प्रारंभकाळात हे वाड्मय दक्षतेने ठेवावे याबद्दल फारसे गांभीर्य बाळगले गेले नाही. कारण शिक्षण आणि त्या शैक्षणिक परंपरेतून प्राप्त होणाऱ्या सर्व गोष्टींबद्दल बहुजन समाज तितकासा जागृत नव्हता. परंतु आज जनमानसात निर्माण झालेल्या उत्कट प्रतिसादाने व्यापक जनसमूहाला हे वाङ्मय अभिमानास्पद व प्रेरक वाटते म्हणूनच त्याची नव्याने दखल घ्यायलाच हवी. म्हणूनच डॉ.कृ.पं.देशपांडे म्हणतात, ''सावित्रीबाई या अर्वाचिन मराठी काव्याच्या जननी होत्या, किंवा केशवसुतांचे काव्य अर्वाचीन मराठी काव्यातील एक प्रगत अवस्था होती, असे जर उद्या कोणी

सिध्द केले तर मला नवल वाटणार नाही?''[५५] डॉ.कृ.पं.देशपांडेच्या म्हणण्यानुसार खरोखरच सावित्रीबाईंच्या समकालीनांमध्ये कोणीही कवयित्री असल्याचे दिसत नाही. किंवा तसे सिद्ध करणारे कोणाचे वाङ्मयही उपलब्ध नाही. याचा सरळ निष्कर्ष अर्वाचीन मराठीतील आद्य कवयित्रीचा मान हा सावित्रीबाईंनाच द्यावा लागतो. उपरोक्त लेखकांच्या भूमिकेतून सावित्रीबाईंच्या कवितांचे मूल्यमापन केले आहे.

## ३.११.२ सावित्रीबाईंचे व्यक्तिमत्त्व आणि वाङ्मयावर घेतलेले आक्षेपः

कोणतेही वाङ्मय बऱ्याच कालावधीनंतर अनपेक्षितपणे जनसामान्यांच्या समोर आले की, ते वाङ्मय नक्की त्या लेखकाचेच ना? हा पहिला प्रश्न उपस्थित होतो. एकंदरीत तो लेखक, त्याची पार्श्वभूमी, वाङ्मय, व्यक्तिमत्त्व साऱ्यासाऱ्या गोष्टींवर चिकित्सक अभ्यासकाची दृष्टी पडते. अग्निदिव्यातून पार पडत त्या साहित्याला सिद्ध व्हावे लागते. सावित्रीबाईंच्या साहित्यालाही अशाच शंका–कुशंकांना सामोरे जावे लागले. स.गं.मालशे यांनी 'साहित्यातील तोतयेगिरी अर्थात डॉ. माळीकृत सावित्रीबाई फुले यांचे चरित्र' या लेखात सावित्रीबाईंच्या व्यक्तित्त्व आणि वाङ्मय यांवर आक्षेप घेतले आहेत. त्यांनी मा.गो.माळींनी लिहिलेले 'क्रांतिज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले' हे चरित्र बनावट, खोटे असल्याचा आरोप केला आहे. मालशे म्हणतात, ''माळी हे सावित्रीबाईंची जी प्रतिमा उभी करीत आहेत तीच मुळात बनावट आहे.''[५६]. मालशेंच्या मते, सावित्रीबाईंची खरी प्रतिमा ज्योतिरावांच्या कार्यात सहभागी झालेल्या शालीन गृहिणीची आहे. सावित्रीबाईंचे काव्यलेखन, पत्रलेखन, भाषणे ही सावित्रीबाईंची नसून त्यांच्या नावावर लिहून कुणीतरी उगीचच खपविण्याचा प्रयत्न केला आहे. पुढे ते म्हणतात, ''सावित्रीबाईंना 'देवी' बनविताना आपण त्यांच्या गळ्यात गाढ अज्ञानमालिका अडकवित आहोत, याची कल्पना खोटे पत्र रचणारास नसली, तरी ग्रंथकार डॉ. माळी यांना असायला हवी''[५७]. सावित्रीबाईंच्या नावावर खोटी पत्रे रचून त्यांना देवी बनविणाऱ्यास लोकव्यवहाराचे ज्ञान नव्हते, पण ते ज्ञान माळी यांना असायला हवे होते. असा मालशे यांनी डॉ. माळींचा तीव्र शब्दांत उपहास केला आहे. सावित्रीबाईंच्या काव्यफुले आणि बावन्नकशी सुबोध रत्नाकर या काव्यांविषयीही मालशे यांनी तिखट शब्दांत निषेध व्यक्त केला आहे. काव्यफुले या कवितासंग्रहाच्या मुखपृष्ठावर चित्र शंकर पार्वतीचे म्हणजे प्रतिगामी आहे व

त्यातील कवितांचा आशय मात्र समाजक्रांतिकारक आहे यावर शंका उपस्थित केली गेली. याला उत्तर म्हणून मा.गो.माळी यांनी 'गावगाडा' मासिकातील आठवणींचा हवाला दिला होता, या संदर्भात स.गं.मालशे म्हणतात, 'या चरित्राची सारी मदार गावगाडामध्ये प्रसिद्ध झालेल्या बनावट साधनांवरच आहे''[५८]. १८६८ मध्ये सावित्रीबाईंनी लिहिलेल्या पत्राचे मोडी हस्ताक्षर क्रमिक पुस्तकातील बालबोध मोडीलेखन मुद्रित केल्याप्रमाणे आहे. पंढरीनाथ सीताराम पाटील यांच्या चरित्रात महात्मा फुले यांचे हस्ताक्षर आहे, त्यापेक्षा हे सुंदर आहे. सावित्रीबाईंच्या ज्या अनेक आठवणी लिहून ठेवल्या आहेत त्यांमध्ये सावित्रीबाईंच्या सुंदर हस्ताक्षराचा उल्लेख नाही, म्हणून मालशे म्हणतात, ''मूळ साधनांची छायाचित्रे छापून चरित्रकार माळी यांनी अस्सल प्रत्यंतर पुरावा केल्याचा जो प्रपंच केला आहे, तो त्या साधनांच्या नीटपणामुळेच झूट ठरणारा आहे''[५९]. म्हणजेच चित्रे, साधने, हस्ताक्षर आणि चरित्रांतील तळटिपांवर त्यांनी आक्षेप घेतले होते, पुढे ते 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' विषयी म्हणतात, ''अस्सलपणाचा कस लावल्यस तो काव्यसंग्रह 'काव्यफुले' चेच 'बावन्नकशी' बनावट भावंड आहे''[६०]. सावित्रीबाईंच्या एकूण लेखनासंबंधी मालशे म्हणतात, ''एकूणच या पुस्तिका आणि त्यातून निर्माण झालेली पिलावळ म्हणजे मराठी साहित्यातील तोतयेगिरी आणि बनावटगिरी (फ्रॉड आणि फोर्जरी) यांचे इरसाल नमुनेच आहेत''[६१]. वरील आक्षेपांवरून असे म्हणता येते की, मा.गो.माळी यांनी संशोधन करून मिळविलेले सावित्रीबाईंचे साहित्य हे सावित्रीबाईंचे आहे हे मालशे यांना मान्य नव्हते.

उपरोक्त आक्षेपांना सुरेंद्र बारलिंगे यांनी 'सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत समर्पक उत्तरे दिली आहेत. ते म्हणतात ''सावित्रीबाईंच्याच वाङ्मयाचा विचार करू गेल्यास सावित्रीबाईंनीच हे वाङ्मय लिहिले आहे का? असा प्रश्न सहज विचारता येईल आणि त्याबद्दल निश्चित असा निर्णय कधीही देता येणार नाही.''[६२] कारण विश्वास न ठेवणाऱ्याला कितीही सांगितले किंवा पुरावे दिले तरी ते नाकारलेच जाणार, पण एवढे मात्र म्हणता येईल की, सावित्रीबाईंना शिक्षण घेतल्यामुळे लिहिता-वाचता येत होते. त्यामुळे त्यांनी वाङ्मयनिर्मिती करणे शक्य आहे. सावित्रीबाईंनी दलितांसाठी आणि स्त्रियांसाठी शाळा चालविल्या होत्या. हे त्यांना शिक्षणामुळे शक्य झाले होते. मग त्यांनी 'सावित्री ज्योतिबा' अशी सही करायला हरकत असण्याचे कारण नाही. सुरेंद्र बारलिंगे पुढे म्हणतात, ''१९ व्या शतकातील भाषा ही २० व्या शतकातील भाषा नव्हे आणि म्हणून सावित्रीबाईंच्या नावाने

खपविले जाणारे साहित्य हे सावित्रीबाईंचे नव्हते असे सांगणे, म्हणजे हे शुद्ध पंडिती थाटात हे लिहू शकतात तर केवळ माळी कुळात जन्मल्यामुळे सावित्रीबाईंना तसे लिहिता येऊ नये ही एक समजुतीला न पटणारी गोष्ट वाटते.''[६३] सावित्रीबाईंच्या लेखनातील भाषा ही त्या काळात त्यांच्यावर झालेल्या शिक्षण व काळ यांच्या परिणामातून समृद्ध झालेली दिसून येते. त्यामुळे सावित्रीबाईंची भाषा बहिणाबाई किंवा जनाबाईसारखी राहणार नाही, तर त्यांच्या भाषेवर ब्राह्मणी शैलीचा प्रभाव पडणार आणि त्याचे अनुकरणही होणार हे स्पष्ट होते.

सावित्रीबाईंच्या कार्य, कर्तृत्त्व आणि वाङ्मयावर जे आरोप झाले त्याबद्दल निरंजन माधव म्हणतात, ''सावित्रीबाईंचे मोठेपण सनातन्यांना तर कधी कळलेच नाही, पण सोयऱ्या–धायऱ्यांनाही कधी कळले नाही. केवळ महाराष्ट्रात नव्हे तर साऱ्या देशातील जनतेला अभिमान वाटावा असे असामान्यत्व या स्त्रीमध्ये होते. राष्ट्रात अशा तेजस्वी ललना जन्मतात, ते राष्ट्र धन्य होय, पण याच भूमीत या स्त्रीचे कर्तृत्व असत्य ठरविले गेले. डॉ. मा.गो.माळी यांनी लिहिलेले सावित्रीबाईंचे विस्तृत चरित्र १५/१६ वर्षापूर्वी प्रकाशात आले, तेव्हा टीकाकार बाईंच्या कर्तृत्त्वाने चक्रावले, संभ्रमित झाले, सैरभैर झाले. हे सर्व कर्तृत्त्व कल्पित आहे, असत्य आहे अशी टिका झाली. सावित्रीबाईंच्या कर्तृत्वाची विविध रूपे टीकाकारांना दिसली नाहीत, भावली नाहीत, प्रखर प्रकाशाचे झोतामागून झोत डोळ्यांवर आदळत यावेत. प्रखरतेने डोळे दिपून जावेत आणि काहीच दिसेनासे व्हावे असे या टीकाकारांचे झाले''[६४].

सुरेंद्र बारलिंगे हे माळी यांनी संशोधन करून मिळविलेल्या वाङ्मयाचे श्रेय सावित्रीबाईंना देतात. या साहित्याच्या अस्सलपणाविषयी घेतलेल्या गंभीर आक्षेपांबद्दल हरी नरके म्हणतात, ''मालशे यांचे आक्षेप अनुमानावर आधारित असल्याने व त्यांच्या मताला दुजोरा देणारे फारसे कोणी पुढे न आल्यामुळे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने ऑगस्ट १९८८ मध्ये प्रकाशित केलेले डॉ. माळी संपादित 'सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय' जनतेने स्वीकारले आहे. आजवर सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीतील अनेकांची प्रस्थापितांनी केलेली उपेक्षा लक्षात घेऊन जनसामान्यांनी हे वाङ्मय उचलून धरले आहे. त्याच्यामुळे समूहमनामध्ये एक विलक्षण चेतना निर्माण झालेली दिसते''[६५].

उपरोक्त अवतरणांवरून सावित्रीबाईंच्या साहित्याबद्दल आक्षेप घेणाऱ्यांपेक्षा समर्थकांनी मांडलेली मते तारतम्य ठेऊन लिहिली आहेत. असे म्हणणे योग्य होईल. सावित्रीबाईंच्या

साहित्यावर घेण्यात आलेल्या आक्षेपांवरून मा.गो.माळी यांनी सावित्रीबाईंचे मूळ स्वरूपात मिळालेले साहित्य 'काव्यफुले' या काव्यसंग्रहातील मोडी लिपीत लिहिलेल्या ४२ कविता, दोन पत्रे, 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यसंग्रहाचे हस्तलिखित यांची तपासणी श्री.एच.टी.गज्जर या दस्तऐवज तपासणी तज्ञांकडून करून घेतली. गज्जर यांनी अत्याधुनिक शास्त्रीय साधनांनी कागद व शाई यांचा कालखंड, वॉटर मार्कस आणि हस्ताक्षर याबाबत परीक्षण करून मोडीतील व इंग्रजीतील सह्या, हस्ताक्षरे ही एकाच व्यक्तीची आहेत असा अभिप्राय दिला आहे. माळींनी तो अभिप्राय 'सावित्रीबाई फुलेः समग्र वाङ्मय' मधील परिशिष्ट १३ मध्ये (पृ. १४१–१४२) दिला आहे.

सावित्रीबाईंचे व्यक्तित्व आणि वाङ्मय या संदर्भात वरील मतांवरून अनुमान काढायचे झाल्यास त्यांच्यावरील प्रभाव, कालावधी, वाचन यांचा विचार करावा लागेल. सावित्रीबाईंना त्या काळात ख्रिश्चन, ब्राह्मण यांचा सहवास लाभला होता. त्यामुळे त्या काळातील उपलब्ध साहित्य, इंग्रजी, संस्कृत पुस्तकेही त्यांनी वाचली असणार, या सर्वांचा प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर होणे सहज शक्य आहे. मालशे समजतात तशी फक्त गृहकृत्यदक्ष किंवा गावंढळ अशी सावित्रीबाईंच प्रतिमा नक्कीच नाही. एखाद्याचे व्यक्तिमत्त्व घडताना परिसराचा फार मोठा प्रभाव घडतो, त्या अर्थाने आणि भाषाशास्त्रीयदृष्टया मालशेंनी घेतलेला वाङ्मयीन आक्षेप पटत नाही. कारण स्थल, काल, व्यक्ती व परिसर यांच्यातील भाषा एकच स्वरूपाची असते असे म्हणणे असंयुक्तिक वाटते.

सावित्रीबाईंच्या काव्यलेखनावर रूढ ब्राह्मणी शैलीचा प्रभाव आहे. तरीही त्यांच्या काव्यनिर्मितीचा हेतू समाजप्रबोधन व समाजजागृती हाच होता. सावित्रीबाईंच्या काव्याविषयी कृ.पं.देशपांडे, नाना ढाकूलकर यांनी घेतलेल्या भूमिकांचा विचार केला आहे. तसेच सावित्रीबाईंच्या व्यक्तित्व व वाङ्मयावर घेतलेले आक्षेप व समर्थन या मतांचाही येथे परामर्ष घेतला आहे.

## समारोप :

'काव्यफुले' आणि 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यसंग्रहाचे मूल्यमापन करताना त्यांच्या काव्यलेखनातील प्रतिमा, प्रतीके, अलंकार आणि भाषाशैली यांचा आढावा घेतला

आहे. सावित्रीबाईंच्या कवितांमधील प्रतिमा गूढ, अनाकलनीय, दुर्बोध नाही. उलट त्या सरळ–साध्या सांकेतिक आहेत. काही ठिकाणी त्यांचा सुंदर, समर्पक वापरही झाला आहे. पण ही प्रतिमा आणि प्रतीके यांचा काव्यात वापर कमी झाला आहे. त्यांनी आपल्या काव्यात वेगवेगळया अलंकाराचाही वापर केला आहे. सावित्रीबाईंना काव्यप्रतिभा लाभली होती हे खरे असले तरी त्यांचा खरा पिंड शिक्षिकेचा होता. समाजप्रबोधन, समाजजागृती हे त्यांचे साध्य होते, या साध्यासाठी काव्य हे 'साधन' होय. त्यामुळे काव्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांची चौकट मोठी आहे. स्त्री–शूद्रातिशूद्रांच्या समाजजीवनातील सुखदुःखांशी समरस होऊन त्यांच्या व्यथा वेदनांचे चित्रण त्यांनी कवितांमधून मांडले आहे. त्यावरून त्यांच्या चिंतनशीलवृत्तीचा आवाका प्रदीर्घ असल्याचे लक्षात येते.

सावित्रीबाईंच्या भाषाशैलीचा विचार करताना तिच्या भाषाशास्त्रीय अभ्यासापेक्षा तिची सामाजिक बाजू आणि लेखनतंत्रापेक्षा त्यांची दृष्टी अधिक महत्त्वाची वाटते. त्यांनी काही कवितांमध्ये इंग्रजी, संस्कृत शब्दांचा वापरही केला आहे. सावित्रीबाईंच्या कवितांमधून समर्पक शब्दचित्रांचे प्रभावी रेखाटन झाले आहे. त्यांच्या कविता वाङ्मयीनदृष्टया समृद्ध आणि ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत.

## संदर्भ सूची


१) ''माळी. मा. गो. (संपादक), सावित्रीबाई फुले : समग्र वाङ्मय'', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, च.आ. ऑक्टो. २००६, पृ. ३९.

२) देशपांडे कृ.पं. ''अग्निफुले'', नूतन प्रकाशन, पुणे, प्र.आ.ऑक्टो. १९८२, पृ. ४८.

३) तत्रैव, पृ. १७.

४) बिडवे–ढगे सुनिता, ''सावित्रीबाई फुलेः विचार आणि कार्य'', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. २०१०, पृ. ५६.

५) उनि., देशपांडे कृ.पं., पृ.७७.

६) नरके हरी (संपादक), ''महात्मा फुले साहित्य आणि चळवळ'', महाराष्ट्र शासन, मुंबई, प्र.आ.२००६,पृ. ४३२.

७) सुर्यवंशी राजाराम, ''युगस्त्री सावित्रीबाई फुले'', मावळाई प्रकाशन, पुणे, ति.आ.२८ नोव्हें, २०१०, पृ.५६.

८) पंडित भ.श्री., ''समग्र केशवसुत'', व्हीनस प्रकाशन, पुणे पुनर्मुद्रण १९७८, पृ. ४१.

९) माळी. मा. गो., उपाध्ये लीला, फडकुले निर्मलकुमार व इतर (संपा), ''क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले : काल आणि कर्तृत्व'', महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ.१९९८, पृ.१०५.

१०) तत्रैव, पृ. ५०.

११) तत्रैव, पृ. ४९.

१२) उनि., देशपांडे कृ.पं., पृ.५४

१३) उनि., नरके हरी, पृ.४३६

१४) उनि., देशपांडे कृ.पं., पृ.५९.

१५) उनि., सुर्यवंशी राजाराम, पृ.९३.

१६) उनि., माळी मा.गो., उपाध्ये नीला, फडकुले, पृ.९३.

१७) खांडगे मंदा, गुंडी निलिमा व इतर (संपादक), ''भारतीय भाषांतील स्त्री साहित्याचा मागोवा–खंड–२'', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. डिसेंबर २००७, पृ. २३२.

१८) तत्रैव, पृ. २३३,२३४.

१९) शिवतत्वानंद स्वामी, व्योमरूपानंद, ''स्वामी विवेकानंद ग्रंथावली'', श्रीरामकृष्ण आश्रम, धंतोली, नागपूर, प्र.आ. १ मे १९७२, पृ. ४९०.

२०) तत्रैव, पृ. ४९५.

२१) उनि., देशपांडे कृ.पं., पृ.७०,७१.

२२) उनि., शिवतत्वानंद स्वामी, व्योमरूपानंद स्वामी, पृ.४८६.

२३) तत्रैव, पृ. ४९६.

२४) कवडे पांडुरंग बाळाजी, ''महात्मा ज्योतिराव फुले ह्यांचे चरित्र,'' रंगनाथ त्र्यंबक रत्नपारखी, नांदगांव, जि. नाशिक, प्र.आ. २४ फेब्रु. १९६८, पृ. ११३.

२५) उनि., स्वामी शिवतत्वानंद, स्वामी व्योमरूपानंद स्वामी, पृ. ४८१.

२६) तत्रैव, पृ. ४९६.

२७) उनि., सुर्यवंशी राजाराम, पृ.८५.

२८) उनि., शिवतत्वानंद स्वामी, व्योमरूपानंद स्वामी, पृ. ५०३.

२९) उनि., कवडे पांडुरंग बाळाजी, पृ. ५४.

३०) उनि., शिवतत्वानंद स्वामी, व्योमरूपानंद स्वामी, पृ. १०८.

३१) उनि., कवडे पांडुरंग बाळाजी, पृ. ८४.

३२) नरके हरी (संपादक), ''महात्मा ज्योतिराव फुले समस्त साहित्य१ः गुलामी'', महाराष्ट्र शासन, मुंबई, प्र.आ.१९९४,पृ. ७.

३३) उनि., देशपांडे कृ.पं., पृ. ६८.

३४) तत्रैव, पृ. ६५.

३५) झोडगे फुलवंताबाई, ''साध्वी सावित्रीबाई फुले'', चिनार पब्लिशर्स, पुणे, द्वि.आ. २०१३, पृ.२३.

३६) उनि., देशपांडे कृ.पं., पृ.१२६.

३७) तत्रैव, पृ. ६२.

३८) तत्रैव, पृ. ७२.

३९) तत्रैव, पृ. ८०.

४०) उनि., माळी मा.गो., उपाध्ये नीला, फडकुले, पृ.८८.

४१) उनि., सुर्यवंशी राजाराम, पृ.९०.

४२) रसाळ सुधीर, ''कविता आणि प्रतिमा'', मुंबई, १९८२, पृ. २८२–२८३.

४३) डहाके वसंत आबाजी, ''मराठी साहित्यः इतिहास आणि संस्कृती'' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण २००८, पृ. २५१.

४४) तत्रैव, पृ. २५१–२५२.

४५) वाळंबे मो.रा., ''सुगम मराठी व्याकरण लेखन,'' पुणे. सुधारित आवृत्ती २००७, पृ. १७३.

४६) तत्रैव, पृ. १७३.

४७) तत्रैव, पृ. १७९.

४८) तत्रैव, पृ. १७४.

४९) तत्रैव, पृ. १७१.

५०) तत्रैव, पृ. १७२.

५१) उनि., डहाके वसंत आबाजी, पृ. २५३.

५२) तत्रैव, पृ. २५४.

५३) उनि., देशपांडे कृ.पं., पृ.२३.

५४) ढाकूलकर नाना, ''महात्म्यांचा महात्मा'' नागपूर, प्र.आ. २०००, पृ. १०४.

५५) साळुंके पी.बी. व इतर (संपा.), ''महात्मा फुले गौरवग्रंथ'', मुंबई, १९८२, पृ. ८७६.

५६) मालशे स.गं., ''तारतम्य'', मुंबई, १९८७, पृ. ४८.

५७) तत्रैव, पृ. ५०.

५८) तत्रैव, पृ. ५३.

५९) तत्रैव, पृ. ६१.

६०) तत्रैव, पृ. ६१.

६१) तत्रैव, पृ. ६२.

६२) उनि., माळी मा.गो. (संपा),पृ.३.

६३) तत्रैव, पृ.५.

६४) उनि., माळी मा.गो., उपाध्ये नीला, फडकुले (संपा.), पृ.१६३.

६५) तत्रैव, पृ.१८३.

* * *

# प्रकरण चौथे

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि समकालीन लेखक लेखिका

प्रस्तावना

४.१ सावित्रीबाई फुलेंच्या समकालीन लेखिका

४.२ मुद्रणकला शोध व बदल

४.३ भाषांतरातून वाङ्मयाचे आदान–प्रदान

४.४. शिक्षण आणि वाङ्मयनिर्मिती परस्परसंबंध

४.५ मराठी वाङ्मयनिर्मितीत मिशनऱ्यांचे योगदान

४.६ आधुनिक कवितेच्या प्रारंभीची स्थिती

४.७ महाराष्ट्रात सत्तासंक्रमण व त्याचे शाहिरी व भक्तिपरंपरेवरील परिणाम

४.८ नवे पंडित कवि आणि त्याच्या कविता

४.९ नाटकी कविता

४.१० धर्मप्रसारार्थ भाषांतरीत काव्यनिर्मिती

४.११ सावित्रीबाई आणि समकालीन कवी

समारोप

# प्रकरण चौथे

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि समकालीन लेखक लेखिका

## प्रस्तावना :

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि समकालीन लेखक-लेखिका अभ्यासताना इ.स. १८०० ते इ.स. १९२० हा कालखंड विचारात घेतला आहे. वाङ्मयविचारामध्ये वेगवेगळे कालखंड आणि त्यांच्या पूर्वोत्तर सीमा ठरविताना वाङ्मयविषयक घटना किंवा इतर कारणे लक्षात घेणे उचित ठरते. काही वेळा आधुनिक कालखंड इ.स. १८१८ पासून प्रारंभ झाल्याचे मानले जाते. पेशवाईची व पर्यायाने मराठी राजवटीची अखेर आणि ब्रिटीश राजवटीचा प्रारंभ ही राजकीय घटना याच्यामागे होती. या राजकीय स्थित्यंतराचे मराठी वाङ्मयनिर्मितीवर महत्त्वाचे परिणाम झाले हे मान्य करुनही इ.स. १८१८ या वर्षाचे प्रस्तुत कालखंडाचा प्रारंभ म्हणून समर्थन वाङ्मय विचारात करणे शक्य होत नाही. एक राजवट संपली की लगेच त्या घटनेचे वाङ्मयीन परिणाम सुरु होत नाहीत. त्यासाठी काही कालावधी जावा लागतो. यामुळे इ.स. १८१८ ही सीमा सोडून द्यावी लागते. जरी आधुनिक कालखंडाचा प्रारंभ इसवी सनाच्या अठराव्या शतकाच्या अखेरीने धरण्यात आला तरी केवळ शतकांतर विचाराने हा गृहित धरलेला नाही. तर इ.स. १८०० पासून आरंभकाल मानण्यास काही ठोस मुद्रणाची जोड मिळणे, हे एक महत्त्वाचे कारण आहे. मराठी भाषेतील पुस्तकांचा पहिला मुद्रणसंस्कार इ.स. १८०५ मध्ये कलकत्याजवळ श्रीरामपूर येथे झाला. त्यावर्षी तेथील ख्रिस्ती मिशनच्या विद्यमाने 'सेंट मॅथ्यू' आणि 'मराठी भाषेचे व्याकरण' ही दोन पुस्तके मुद्रित होऊन प्रसिद्ध झाली. याआधी एक वर्ष म्हणजे इ.स. १८०४ मध्ये कलकत्याच्या 'कॉलेज ऑफ फोर्ट वुइल्यम्' मध्ये मराठीच्या अध्ययन-अध्यापनाला प्रारंभ झाला होता. थोडक्यात इ.स. १८०० च्या जवळपासच मराठी वाङ्मयाच्या जोपासनेला प्रारंभ झाला. रा.श्री. जोग म्हणतात, ''हा प्रारंभ महाराष्ट्रापासून दूर झाला किंवा परकियांच्या हस्ते झाला ही गोष्ट चमत्कारिक वाटली तरी तो प्रारंभ म्हणून मान्य व्हावयास हरकत नाही.''[१] अशाप्रकारे राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रात स्थितंतरे होत असतानाच नवनवीन प्रकारच्या साहित्याची निर्मिती मराठी भाषेला समृद्ध करत होती. नवीन काव्य, कथावाङ्मय किंवा नाट्यवाङ्मय प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कालानुरुप, परिस्थितीनुरुप

बदलण्यास सुरुवात झाली होती. नवीन कथावाङ्मयाचा प्रारंभ हरिभाऊ आपट्यांपासून झाला असे मानले जाते. त्याचप्रमाणे नवीन कवितेसह याच कालखंडात प्रारंभ झाला. परंतु पंडिती आणि शाहिरी काव्य व बखर गद्य यांची निर्मिती इ.स. १८०० नंतर बराच काळ म्हणजे चाळीस पन्नास वर्षे होत असली, तरी त्याचे स्वरुप व त्यामागची भूमिका ही मागील शतकाला अनुरुप अशीच होती.

## ४.१ सावित्रीबाई फुलेंच्या समकालीन लेखिका :

सावित्रीबाई फुलेंच्या समकालीन लेखिकांमध्ये साळुबाई तांबवेकर, ताराबाई शिंदे, लक्ष्मीबाई टिळक, काशीबाई कानिटकर, आनंदीबाई कर्वे, पार्वतीबाई आठवले तसेच पंडिता रमाबाई यांचा समावेश होतो.

पण याआधी मराठी भाषेला समृद्ध करण्याचा दृष्टीने काही युरोपियन लोकांचा सहभाग होता. हे मान्य करायला हवे. महाराष्ट्रातील लोकांमध्ये मिसळता यावे, त्यांचा विश्वास संपादन करणे या उद्देशासाठी जरी काही ब्रिटीशांनी मराठी भाषा शिकली तरी त्यामुळे मराठी भाषेच्या विकासाला नकळत मदतच झाली. विल्यम कॅरे या प्राध्यापकाने मराठी पंडितांच्या साहाय्याने अनेक पुस्तके तयार केली. मोल्सवर्थ, कॅंडी यांच्याकडून शब्दकोशाचीही निर्मिती झाली. त्याचबरोबर इंग्रजी शिक्षण देण्याचीही व्यवस्था करण्यात आली. भारतीय लोकांना इंग्रजांच्या धर्माची, संस्कृतीची, ज्ञान विज्ञानाची ओळख व्हावी हा एक उद्देश होता. पण त्याचबरोबर ब्रिटीश संस्कृतीची मुळे येथील भूमीत रुजावी, ख्रिश्चन धर्माच्या तत्त्वाचा प्रसार व्हावा ही येथे आलेल्या राज्यकर्त्यांची आणि धर्म प्रचारकांची इच्छा होती. अर्थात धर्मप्रसारासाठी त्यांच्या भाषेतील वाङ्मय, धर्माची ओळख एतद्देशीयांना त्यांच्या भाषेत करुन देणे भाग होते. त्याच बरोबर त्यांच्या भाव भावनांना आवाहन करण्यासाठी मराठी हीच उत्तम भाषा होती. अर्थातच त्यामुळे भाषांतरीत साहित्य निर्माण झाले. भाषांतरातून वाङ्मयाचे आदान प्रदान झाले. इंग्रजीतून मराठी किंवा मराठीतून इंग्रजी भाषांतरे घडली. तसेच संस्कृत भाषेचा दीर्घकाळ संबंध असतानादेखील संस्कृतातील वाङ्मयाचे भाषांतर याच कालावधीमध्ये घडले. यामध्ये कधी एखाद्या इंग्रज व्यक्तीला मराठी भाषा रूचली, संतवाङ्मय भावले तर काहींनी त्याला महत्त्वच दिले नाही. आधुनिक कवितेच्या प्रारंभी शाहिरी, भक्तिपरंपरेतील काव्याचे स्वरुप बदलत गेले.

परशुरामतात्या गोडबोले यांसारख्या पंडित कवींनी प्राचीन काव्यांचे मंथन करुन इ.स. १८५४ मध्ये रसिकांना 'नवनीत भेला' सादर केला. कृष्णशास्त्री राजवाडे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, गणेश लेले आणि पांडुरंग पारखी या पंडितकवींचा अनुवादीत किंवा भाषांतरीत साहित्यनिर्मितीत मोठा सहभाग होता. परंतु काही भाषांतरीत वाङ्मयाचा हेतू निव्वळ ख्रिस्तीधर्मप्रसार हा होता. अर्थातच यामुळे सनातन हिंदुधर्मीय आणि सुधारक हिंदू यांच्याकडून हा धर्मप्रसार किंवा धर्मांतर रोखण्यासाठी वेगवेगळ्या मार्गांनी पण एकाच हेतूने प्रयत्न होऊ लागले. यामुळे स्वधर्मातील योग्य अयोग्य गोष्टींचा ऊहापोह होऊन विचारमंथन घडून येऊ लागले. आणि यातूनही वाङ्मयाच्या क्षेत्रातील भरीव कामगिरी केली गेली. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा ज्योतिराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य टिळक यांचे योगदान महत्त्वाचे आहे. पण या सर्व घडामोडीत स्त्रियांना असणाऱ्या विद्याबंदीमुळे त्यांच्याकडून फार मोठ्या प्रमाणावर वाङ्मयनिर्मिती झाली नसली तरी त्याचे महत्त्व कमी होत नाही.

## ४.२ मुद्रणकला शोध व बदल :

ब्रिटीश राजवटीमुळे भारतातील राजकीय, सामाजिक, धार्मिक स्थित्यंतरे घडली. कल्पनांमधील आमूलाग्र बदलामुळे मराठी साम्राज्याचे पतन आणि इंग्रजी राजवटीचा उदय ही एक धार्मिक सामाजिक-राजकीय स्वरुपाची घटना होती. त्यामुळे याचा प्रभाव सांस्कृतिक जीवनावर पडणे अपरिहार्य होते. गो. म.कुलकर्णी म्हणतात, ''एकोणिसाव्या शतकापासून पुढच्या सत्तरऐंशी वर्षांचा मराठी वाङ्मयाचा इतिहास म्हणजे ब्रिटीश राजवटीमुळे निर्माण झालेल्या नवसंस्कारांच्या क्रिया प्रतिक्रियांच्या प्रारंभाचा व विस्तार इतिहास होय.''[२] या म्हणण्यात तथ्य आहे असे म्हणायला हरकत नाही. कारण त्यापूर्वी भारताबाहेरील जगाचे, युरोपातील प्रबोधनाचे, वैज्ञानिक क्रांती, नवनव्या शोधांचे कोणतेच भान एतद्देशीयांना नव्हते. युरोपात पंधराव्या शतकात मूलभूत असे परिवर्तन घडवून आणणारा शोध म्हणजे मुद्रणाचा शोध होय. योहान्न गुटेनबर्ग या जर्मन गृहस्थाला मुद्रणकलेचे श्रेय दिले जाते. खिळे पाडून छपाई करण्याच्या तंत्रामुळे अल्पावधीत साऱ्या युरोपात मुद्रणकलेचा प्रसार झाला. पण भारताला मुद्रणकलेची ओळख करुन देण्याचे श्रेय पोर्तुगीजांकडे जाते. भारतात पहिला छापखाना सुरु झाला गोव्यात पण तिथे मराठी भाषेतील पुस्तके छापली गेली नाहीत. याचे कारण सांगताना

वसंत डहाके म्हणतात, ''मुद्रण यंत्र, कागद आणि इतर साहित्यासह १६७४ मध्ये मुद्रणालय स्थापन झाले. परंतु देवनागरी मुद्राक्षरे तयार करणारा न मिळाल्याने देवनागरी छपाई ही एक कल्पनाच राहिली.''[3] अर्थातच यामुळे ज्ञान प्रसाराचे एक प्रभावी साधन हाती येऊनही त्याचा यथायोग्य वापर जवळ जवळ दोनशे वर्षे झालाच नाही. इंग्रजांच्या वखारीत छापखाने निघाले, वर्तमानपत्रे निघाली व चालली. पण हिंदुस्थानमधील कोणीही त्याची म्हणावी अशी दखल इंग्रजी राज्य स्थापन होईपर्यंत केली नाही. महाराष्ट्रातही यापेक्षा वेगळी स्थिती नव्हती. सवाई माधवरावाच्या शिक्षणात नाना फडणविसांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. पण स्नानसंध्या, पोथ्यापुराणे, परंपरेची नीती, दांडपट्टा आणि घोडदौड याव्यतिरिक्त पाश्चात्य विद्येची किंवा आपल्या देशाबाहेरील परिस्थितीची जाणीव अजिबात करुन दिली जात नव्हती.

मराठी भाषा आणि इंग्रजी शिक्षण, इंग्रजी राजवटीचा एक आविभाज्य आणि सांस्कृतिक जीवनावर परिणाम करणारा, धर्मविषयक, धर्मआचारविषयक बाबींवर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक म्हणजे इंग्रजी शिक्षण होय. बंगालमध्ये ब्रिटीशांची कारकीर्द सुरु झाली तेव्हा संस्कृत, अरेबिक आणि पर्शियन भाषांच्या अध्ययनासाठी पाठशाळा होत्या. मात्र प्रादेशिक भाषांच्या शिक्षणाविषयी अनास्थाच होती. गणित, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, भूगोल किंवा भौतिकशास्त्रांचे शिक्षण दिले जात नव्हते. व्याकरण, अभिजात साहित्य, तत्त्वज्ञान, स्मृती आणि धार्मिक ग्रंथ या उच्चशिक्षणात सामाविष्ट अशा गोष्टी होत्या. भारताबाहेरील जगाचे, युरोपातील प्रबोधनाचे कोणतेही भान देशवासीयांना नव्हते. अक्षर, साधे गणित, हिशेब व थोडेसे संस्कृत ज्ञान यातच उच्च प्रतीच्या गृहसंस्थांच्या शिक्षणाची परिसमाप्ती तेव्हा होत असे. यामुळेच लोकहितवादींनी 'शतपत्रा' मध्ये पेशवेकालीन शिक्षणव्यवस्थेचे वर्णन केले आहे, आणि त्यावर टीकाही केली आहे.

पेशवेकालाच्या आरंभी दरबारात फारसी भाषेला महत्त्व होते ते नाहीसे होऊन मराठी भाषा त्या जागी आली. महाराष्ट्रातील लोकांमध्ये मिसळता यावे यासाठी इंग्रज अधिकाऱ्यांनी मराठी भाषेचे शिक्षण घेतले. मराठी लोकांचा विश्वास संपादन करणे, त्यांच्या आदराला पात्र होणे हेही उद्देश त्यामागे होते. इ.स. १८०० मध्ये कलकत्याला कॉलेज ऑफ फोर्ट विल्यमची स्थापना करण्यात आली ती ब्रिटीश नागरी सेवकांना सर्वसाधारण शिक्षण देण्यासाठी. या कॉलेजमध्ये भारतीय भाषांच्या शिक्षणाचीही सोय केली होती. युरोपियन अधिकाऱ्यांच्या

भाषाभ्यासाठी या कॉलेजने देशी भाषांमध्ये पुस्तके तयार करवून घेतली. १८०४ मध्ये विल्यम कॅरे या प्राध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली मराठी भाषेचा वर्ग तेथे सुरु करण्यात आला. मराठी विषय सुरु झाल्यानंतर बरेच अधिकारी त्या विषयाची परीक्षा देऊन उत्तीर्ण झाले. विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके ठेवली होती. मराठी विषयासाठी साहाय्यक म्हणून विद्यानाथ, वैजनाथ पंडितांची नेमणूक केली होती. कॅरे यांनी मराठी पंडितांच्या साहाय्याने अनेक पुस्तके तयार केली. 'मराठी भाषेचे व्याकरण' (१८०५), 'मराठी शब्दकोश' (१८१८), 'सिंहासन बत्तिशी' (१८१४), 'हितोपदेश' (१८१५), 'राजा प्रतापादित्याचे चरित्र' (१८१६), 'रघूजी भोसल्याची वंशावळी' (१८१६), 'मराठी भाषेतील अस्सल पत्रसंग्रह' (१८१६) इत्यादी पुस्तके तयार केली गेली. ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकारी वर्गाला राज्यकारभार आणि भाषा यांचे शिक्षण देण्यासाठी इंग्लंडमध्ये टेलिबरी कॉलेज (१८०६ ते १८५८) निघाले होते. या कॉलेजात मराठी हा एक ऐच्छिक विषय होता.'

पेशव्यांचे राज्य इ.स. १८१८ मध्ये ब्रिटीशांकडे आल्यानंतर एल्फिन्स्टन गव्हर्नरपदावर आला. त्याला कलकत्याच्या फोर्ट विल्यमच्या धर्तीवर मुंबईस कॉलेज काढायचे होते. पण कॉलेज काढले न गेल्याने मुंबई इलाख्यात काम करणाऱ्या युरोपियन अधिकाऱ्यांनी देशी भाषा शिकल्या पाहिजेच, असे फर्मान त्याने काढले. कार्यालयीन बढतीच्या दृष्टीनेही या भाषाशिक्षणाची आवश्यकता होती. ज्याप्रमाणे युरोपियन लोकांच्या भाषाशिक्षणाविषयी एल्फिन्स्टन दक्ष होता तसाच तो एतद्देशीयांनी इंग्रजी शिक्षण घ्यावे या मताचा होता.

इंग्रजी शिक्षण देण्यामागे शासक व जनता यांच्यामधले अंतर नाहीसे करणे व पश्चिमात्य ज्ञानाची ओळख, विचारांचा परिचय घडविणे हा हेतू होता. एल्फिन्स्टन हा मुंबईचा गव्हर्नर झाल्यानंतर, युरोपियन अधिकाऱ्यांना मराठी भाषेचा अभ्यास करता यावा म्हणून शब्दकोश, व्याकरण वैगरे ग्रंथ तयार करण्याचे प्रयत्न झाले. मोल्सवर्थ आणि कँडी यांच्याकडून शब्दकोशाची निर्मिती झाली. सरकारी कामाची वहिवाट देशभाषेत व्हावी यासाठी देशभाषेशी परिचित होणे आवश्यक होते. त्यामुळे मराठीतून पुस्तके तयार करवून घेणे, कोश आणि व्याकरण रचणे या शासकांच्या गरजा होत्या. त्याचबरोबर इथल्या लोकांना इंग्रजांच्या धर्माची, संस्कृतीची, ज्ञानविज्ञानाची ओळख व्हावी हाही एक उद्देश होता. धर्मप्रसार सुलभ व्हावा आणि

हिंदू लोकांनी ख्रिस्ती धर्माची तत्त्वे स्पष्ट करता यावीत यासाठी ख्रिस्ती मिशनऱ्यांनी मराठी भाषेचा अभ्यास केला.

ब्रिटीश संस्कृतीची मुळे येथल्या भूमीत रुजावी, ख्रिश्चन धर्माच्या तत्त्वाचा प्रसार व्हावा ही येथे आलेल्या राज्यकर्त्यांची आणि धर्मप्रचारकांची इच्छा होती. येथील समाजाचा परिचय करुन घेण्याच्या हेतूने भाषा शिक्षण आणि त्या भाषेतीळ वाङ्मयाचा परिचय ह्या गोष्टी आवश्यक होत्या.

## ४.३ भाषांतरातून वाङ्मयाचे आदान–प्रदान :

अनेक युरोपियन अधिकाऱ्यांनी देशी भाषा शिकून घेतल्या, काहींनी त्या–त्या भाषेतील वाङ्मय परिचय इंग्रजीतून करुन दिला. सर अलेक्झांडर ग्रांट, मरे मिचेल, अ‍ॅक्वर्थ, जे. नेल्सन फ्रेझर, लिओनार्ड जॉन सेज्विक, निकोल मॅकनिकल, जस्टिन अ‍ॅबट, जे. एफ. एडवर्ड्स इत्यादिंनी संतवाङ्मयाचा परिचय करुन देणारे लेखन केले. यातल्या काहींनी संताच्या वाङ्मयाचे मोठेपण मान्य केले तर काहींनी ख्रिस्तीधर्माच्या वचनांच्या तुलनेत संतवाङ्मयाला कमी प्रतीचे ठरविलेले आढळून येते. भाषा शिक्षणाच्या संदर्भात ब्रिटीशांनी सुरुवातीच्या काळात घेतलेले कष्ट हे राज्यकारभार चालविण्यासाठी किंवा ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी असले तरी त्याच्या प्रादेशिक भाषांच्या विद्यालयीन शिक्षणाचा प्रारंभ त्यांनी केला असे दिसून येते. सुरुवातीच्या काळात येथल्या शिक्षणव्यवस्थेत किंवा समाजव्यवस्थेत फारशी ढवळाढवळ कराराची नाही असे ब्रिटीश राज्यकर्त्यांचे धोरण होते.

कलकत्ता येथील हिंदू कॉलेजच्या स्थापनेपासून म्हणजे इ.स. १८१७ इंग्रजी शिक्षणाचा आरंभ झाला. पण एतद्देशीयांच्या धर्मभावना दुखावू नये याच हेतूने इ.स. १८२३ मध्ये कलकत्ता येथे संस्कृत कॉलेज उघडण्यात आले. इ.स. १८५४ च्या चार्ल्स वुडच्या शिक्षणाविषयक खलित्याला 'मॅग्ना चार्ट' म्हणतात. कारण या खलित्यानुसार भारतातील शिक्षणव्यवस्था पाश्चिमात्य ज्ञान विज्ञानाचा प्रसार करण्यासाठी, शासन आणि जनता यांच्यातील दुव्याप्रमाणे काम करणारा आंग्लशिक्षित तयार करणारी असली पाहिजे. हे निश्चित झाले. नव्या शिक्षणव्यवस्थेत देशी भाषांना प्रोत्साहक वातावरण निर्माण झाले नाही.

## ४.४ शिक्षण आणि वाङ्मयनिर्मिती परस्परसंबंध :

शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठ अशी एक नवीन शिक्षणव्यवस्था निर्माण होत होती. देशी भाषेच्या शिक्षणाला महत्त्व दिलेले असले तरी प्रत्यक्षात इंग्रजीवर प्रभुत्व मिळविणे हे शैक्षणिक यशाचे आणि उज्ज्वल भवितव्याचे चिन्ह मानले जाऊ लागले. 'रक्ताने आणि वर्णाने भारतीय, पण अभिरुची, मते, नैतिकता आणि बौद्धिकता या दृष्टीने इंग्रजी अशा व्यक्तींचा वर्ग' निर्मांण करण्याचे मेकॉलेचे इंग्रजी शिक्षण देण्यामागचे उद्दीष्ट होते. इंग्रजी भाषेचे आणि विविध युरोपिय ज्ञानशाखांचे शिक्षण घेतलेला वर्ग आपले ज्ञान देशभाषांच्या माध्यमातून इतर भारतीयांपर्यंत पोचवील अशी ब्रिटीश शिक्षणतज्ञ आणि शासनाची अपेक्षा फोल ठरली.

१८५४ ते १८८२ या काळात उच्च शिक्षणाच्या दृष्टीने सोयी झाल्या तरी प्राथमिक शिक्षणाची प्रगती मंदच होती. १८८२ साली महात्मा फुले यांनी हंटर शिक्षण आयोगापुढे केलेल्या भाषणात उच्चवर्णीय शिक्षणपद्धतीवर टीका केली आणि प्राथमिक शिक्षणाची हेळसांड कशी होते हे प्रतिपादन केले. याच निवेदनात ज्योतिरावांनी स्त्रियांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होईल अशाप्रकारच्या उपाययोजनांना संमती मिळावी अशी विनंती केली होती.

मुलींच्या शिक्षणाच्या प्रश्नाला खरी कृतीशील चालना दिली ती ज्योतिराव फुले यांनी आणि १८४८ मध्ये त्यांनी काढलेल्या शूद्रातिशूद्र मुलींसाठीची शाळा खऱ्या अर्थाने चालवून सावित्रीबाई फुले यांनी अर्थपूर्ण केली. ज्यावेळी उच्चवर्गीय आणि उच्चवर्णीय इंग्रजी शिक्षणाकडे वळले होते त्यावेळी बहुसंख्य समाज प्राथमिक शिक्षणापासून वंचितच राहीला होता. त्यामुळे उच्चशिक्षीत आणि अशिक्षित यांच्यात दरी उत्पन्न झाली. नव्या शिक्षण व्यवस्थेचे परिणाम जसे धार्मिक, सामाजिक होते. त्याचप्रमाणे भाषिक आणि वाङ्मयीनदेखील होते.

येथे असलेल्या देशकालस्थितीचे भान पाश्चात्त्य विद्या ग्रहण करीत असताना नव शिक्षितांना येऊ लागले. त्यामुळे विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजविणारी एक पिढीच या काळात उदयाला आली. त्यामुळेच महाराष्ट्रातील समाजाच्या संस्कृतीवर परिणाम झाला. हा परिणाम धार्मिक, सामाजिक दृष्टिकोनाबरोबर वाङ्मयीन क्षेत्रातदेखील दिसून आला.

या नव्या शिक्षणाच्या प्रथमावस्थेचा वाङ्मयीनदृष्ट्या विचार करता असे दिसते की, या नव्या शिक्षणाने इंग्रजीसारख्या समृद्ध भाषेशी ओळख करुन दिली. आशय व अभिव्यक्ती यांचे काही प्रकार नव्यानेच आणले. कारण त्यापूर्वी संस्कृत परंपरेची कविता अनुवादरुपाने मराठीत आणली गेली होती. संस्कृत भाषेचे अध्ययन त्या काळी अधिक होई. त्यामुळे संस्कृतप्रचुर लेखन अधिक होत असे. सनातनी परंपरेच्या स्वाभिमानी लेखकांनी नव्या काळात राहूनही जुन्या पद्धतीचेच लेखन केले. गो.म. कुलकर्णी म्हणतात, ''संस्कृत नाटकांचा परिचय येथील शास्त्रीपंडितांना दिर्घकाळ असूनही त्यांच्या मराठी अनुवाद प्रथम केला गेला तो इंग्रजी राजवटीतच.''[४] अशा प्रकारे कळत-नकळत शिक्षण आणि वाङ्मयनिर्मितीचा जवळचा संबंध आला.

**४.५ मराठी वाङ्मयनिर्मितीत मिशनऱ्यांचे योगदान :**

इंग्रज राज्यकर्त्यांना राज्यकारभार चालविण्याच्या दृष्टीने मराठी प्रजेची भाषा अवगत असणे आवश्यक असावे असे वाटत होते. मराठी शिकण्याचे दुसरे कारण धर्म प्रसाराचे होत. नव्या धर्माचा कोणताही प्रसारक स्थानिक भाषेचाच आधार घेतो. या नियमाला धरुन मिशनऱ्यांनी निरनिराळ्या भारतीय भाषांमधून ग्रंथनिर्मितीस प्रारंभ केला. डॉ. कॅरी या मिशनऱ्याच्या, नेतृत्वाखाली मराठी भाषेतून ग्रंथनिर्मिती होण्यास सुरुवात झाली होती. इ.स. १८०० मध्ये श्रीरामपूर येथे कॅरीने एक छापखाना काढला. इंग्रजी भाषेत मराठीचे व्याकरण लिहून ते १८०५ मध्ये प्रसिद्ध केले. मराठी कोश मोडी लिपीत १८१० मध्ये छापला. अनेक पुस्तके देशी भाषा जाणकारांकडून लिहून घेऊन प्रसिद्ध केली. याबद्दल गो.म. कुलकर्णी म्हणतात, ''इंग्रजी राजवटीच्या प्रथमावस्थेत मराठी भाषेच्या पायाभरणीचे जे कार्य केले गेले, त्याची सुरुवात डॉ. कॅरेसारख्या मिशनऱ्यांनी सरकारच्या आधी कितीतरी वर्षे केली होती हे स्पष्ट होते. मराठीतील पहिले पुस्तक छापण्याचा मान मिशनऱ्यांकडे जातो. पहिले मराठी व्याकरण, पहिला कोश, पहिले मुद्रणालय इत्यादी बऱ्याच नव्या सांस्कृतिक घडामोडींच्या प्रवर्तनाचे पहिलेवहिले श्रेय मिशनरी मंडळींकडे जाते.''[५]

वाङ्मयीन दृष्ट्या विचार करता मिशनरी लेखनाचा दर्जा फारसा उच्च नव्हता. कारण ही पुस्तके अधिक प्रमाणात भाषांतरावर भर देणारी होती. त्यांची निर्मितीच मुळी संकुचित

दृष्टिकोनातून झाली होती. सामान्य जनतेत ख्रिस्ती धर्माचा प्रसार व्हावा या उद्देशाने मुख्यत: मराठीतून लेखन होत असे. मराठी भाषेत अर्थातच निनिराळ्या कालखंडात लिहिल्या जाणाऱ्या भाषेत कसे आणि कोणते बदल घडले हे दर्शविण्यासाठी फक्त वेगवेगळ्या कालखंडातील बायबलमधील एक वाक्य पुरेसे आहे. बायबलच्या एका वाक्याच्या निरनिराळ्या कालखंडात केल्या गेलेल्या भाषांतराचे उदाहरण 'मिशनरी मराठी' या लेखात गो. म. कुलकर्णींनी दिले आहे. ते भाषांतर पुढीलप्रमाणे,

''१) जस स्वर्गी तस पृथीवींत् तुमची इष्ट क्रीया केली जावो?

(श्रीरामपूर, आवृत्ती १८०७)

२) जसें स्वर्गात तसें पृथ्वीत तुझे इच्छेप्रमाणें केलें जावो ।।

(अमेरीकन मिशन, आवृत्ती १८२६)

३) जसे आकाशात तसे पृथ्वीवरही तुझ्या इच्छेप्रमाणें होवो.

(बायबल सोसायटी, आवृत्ती १८७८)

सुमारे सत्तर वर्षांच्या कालात बायबलच्या भाषांतरातील मराठी भाषेची बदलती मोडणी एकंदर भाषेच्या बदलाची प्रतीक मानावयास हरकत नाही.''[६]

म्हणजेच विशिष्ट धार्मिक उद्दीष्टाने का होईना, पण मराठी भाषेच्या व वाङ्‌मयाच्या अभिवृद्धीचा त्यांच्याकडून प्रयत्न केला गेला.

पण हे सारे मान्य करुनही ख्रिस्ती लोकांनी निर्माण केलेल्या वाङ्‌मयाचा फार मोठा ठसा मराठी वाङ्‌मयावर उमटला नाही असेच म्हणावे लागेल. कारण व्यापक भूमिकेवरुन लेखकांच्या भावभावनांना आवाहन करण्याचे सामर्थ्य त्यातून निर्माण होणे शक्य नव्हते. वाङ्‌मयनिर्मितीच्या प्रत्यक्ष कार्याला जरी मिशनरी चळवळीचे साह्य नसले तरी धार्मिक आणि सामाजिक आंदोलनांना त्यांनी प्रत्यक्षपणे फार मोठी चालना दिली. मिशनऱ्यांच्या धार्मिक चळवळीमुळे हिंदुधर्मीय विचारवंतांना स्वधर्माचा विचार, स्वधर्माचा पुरस्कार आणि स्वधर्मातील बलस्थाने किंवा त्रुटींचाही पुर्नविचार करणे भाग पडले. धार्मिक आक्रमणामुळे एकीकडे ख्रिस्ती धर्माचा पूर्णतया स्वीकार करणारे, दुसरीकडे हिंदुधर्माचा हिरीरीने पुरस्कार करणारे, हिंदुधर्मातील त्रुटींवर कडाडणारे तर काही शुद्धीकरणाची मोहिम राबविणारे वेगवेगळे गट निर्मान झाले. सुधारक विरुद्ध सनातनी यांसारख्या द्वंद्वाचा उगमही या नवविचारप्रवर्तनातच झाला. या

सांस्कृतिक जागृतीत वेगवेगळ्या व्यक्तींच्या वेगवेगळ्या भूमिका आहेत. ख्रिस्ती धर्माचा पूर्णतया अंगीकार करणारे बाबा पद्मनजी, हिंदू धर्माचा पुरस्कार करणारे विष्णु बुवा ब्रम्हचारी, शुद्धीकरणाच्या मोहिमेचे बाळशास्त्री जांभेकर तत्कालीन जनसमुदायाला आपल्या धर्मातील गुणदोष सांगून खऱ्या धर्माचे स्वरुप उलगडू पाहणारे पण स्वधर्माभिमानी ज्योतिराव फुले आणि कृष्णराव भालेकर अशा विविध व्यक्तींनी आपापली मते ठामपणे मांडली.

देहाच्या आणि मनाच्या नैसर्गिक प्रेरणांना योग्य स्थान देण्याची कल्पना, ऐहिक व पारमार्थिक मूल्यांची सांगड घालण्याची दिशा, ईश्वरसेवेला अग्रस्थान देण्याचा विचार या कल्पना संतांच्या शिकवणुकीत आढळतात. इंग्रजी विद्येच्या अध्ययनाने सुशिक्षितांना एक नवा बुद्धीवादी, ऐहिक, गतिशील दृष्टिकोन प्राप्त झाला होता. मिशनरी चळवळीमुळे भूतदया,समता, मानवसेवा, साधेपणा, कर्मठपणाचा तिटकारा इत्यादी प्रवृत्तींची भर पडली. संस्था स्थापून तिच्या द्वारे त्यागपूर्वक व संघटितपणे समाजकार्य करण्याची लाट जी पुढे आली तिची प्रेरणा मिशनरी कार्यपध्दतीतून मिळाली असे म्हणायला हरकत नाही. संतांनीही चातुर्वर्ण्यव्यवस्थेविरुद्ध किंवा स्त्री–पुरुष भेदाविरुद्ध त्यांचे विचार मांडले. भक्तिसंप्रदायात समतेचा पुरस्कार करण्याचा प्रयत्न केला पण चातुर्वर्ण्यव्यवस्थेविरुद्ध, स्त्री–पुरुष भेदाविरुद्ध व्यापक थेट प्रयत्न याच कालावधीत झाले. नव्या विचारात समतेला मोठे स्थान मिळाले, धार्मिक व सामाजिक रूढी, परंपरा यांचा डोळसपणे अभ्यास 'मानव' म्हणून माणसाचा विचार करण्यास सुरुवात झाली. या नव्या विचारांनी मराठी वाङ्मयाला दीर्घकाळापर्यंत मोठा आशय पुरविला. कारण समता, भूतदया, दलितांचा कळवळा, व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्री–स्वातंत्र्य, स्त्री–शिक्षण, प्रौढविवाह या विषयांना मराठी साहित्यात महत्व आले. या कालखंडात निर्माण झालेल्या कथा, काव्य नाटकांच्या विषयांवरुन देखील हे दिसून येते.

## ४.६ आधुनिक कवितेच्या प्रारंभीची स्थिती :

जुन्या मराठी सत्तेचा अस्त होऊन नवीन इंग्रजी राजवट महाराष्ट्रात इ.स. १८१८ साली सुरु झाली. परंतु महाराष्ट्राच्या भिन्न भिन्न भागावर इंग्रजांचा एकछत्री अंमल मात्र नव्हता. या राजकीय परिस्थितीचा मराठी वाङ्मयावरही परिणाम झाला. त्याची मीमांसा करताना भ.श्री.पंडित म्हणतात, ''इंग्रजांच्या आगमनापूर्वी गोमन्तक पोर्तुगीजांच्या ताब्यात होते.

मराठवाडा निजमाच्या अधिपत्याखाली होता, वऱ्हाडचे हस्तान्तर कधी मराठ्यांकडे, कधी निजामाकडे तर कधी इंग्रजांकडे होत होते; आणि माळवा, बुंदेलखंड, नागपूर, गुजरात व तंजावर येथील मराठी राज्ये नामोहरम झाली असली, तरी इंग्रजांच्या पंखाखाली त्यांची परतंत्र संस्थाने कायम होती. या परिस्थितीचा दुष्परिणाम असा झाला की, राज्यकारभाराच्या दृष्टीने महाराष्ट्र कायमचा खंडित राहिला. त्यामुळे नव्या इंग्रजी राजवटीत त्यांच्या भिन्न भिन्न विभागांचा विकास एकाच छत्राखाली एकाच वेळी एकसारखा झाला नाही. या प्रतिकूल परिस्थितीचा साहित्यावरही विपरीत परिणाम झाला. इंग्रजी राजवटीच्या आरंभाबरोबर पश्चिम महाराष्ट्रातील आधुनिक कवितेचा प्रारंभ झाला, तर विदर्भातील आधुनिक कवितेचा प्रारंभ अगदी अलीकडे म्हणजे गेल्या पाच–पन्नास वर्षात झाला.''[७] म्हणजेच राजकीय, धार्मिक गोष्टींचा कमी अधिक प्रभाव काव्यावर होत होता.

## ४.७ महाराष्ट्रात सत्तासंक्रमण व त्याचे शाहिरी व भक्तिपरंपरेवरील परिणाम :

महाराष्ट्रात सत्तासंक्रमण होऊन परकीय सत्ता आल्यामुळे समाजात विलक्षण स्थित्यंतर घडून येत होते. हा बदल अनेक बाजूंनी अनेक प्रकारे घडून येत होता. आणि नवे हळूहळू त्याची जागा घेत होते. शहिरी कवनाला आश्रय देणाऱ्या उदार राजेराजवाड्यांची व सरदारकरांची स्थिती अतिशय सोचनीय होती. शहिरी परंपरेचा यथेच्छ आस्वाद घेणाऱ्या शिपायांचा व सैनिकांचा श्रोतृसमुदायही बेकार झाला होता. राजे व सरदार आता आपल्या उरल्यासुरल्या जहागिऱ्या कशा टिकविता येतील या विवंचनेत होते. शिपाई व सैनिक पोटापाण्याची सोय व्हावी म्हणून एखादा नवा व्यवसाय शोधत होते. जुन्या अमदानीत ऐश्वर्याचा व नानाविध विलासांचा मनमुराद सुखोपयोग घेतलेली शाहिरी परंपरा हळूहळू अस्ताला लागली. या संक्रमणकाळात प्रभाकर व परशराम हे शाहिरी परंपरेतील शेवटचे शाहीर होऊन गेले. कारण नव्या युगात शाहिरांची बूज राहिली नाही. शाहीर कवनांना एक चांगला काळ होता. पण महाराष्ट्रातील संक्रमणाबरोबर येथील प्राचीन शाहिरी परंपरा खंडित झाली.

जुनी शाहिरी परंपरा नव्या युगाच्या प्रभावात नाहीशी झाली. परंतु जुनी भक्तिपरंपरा मात्र आपले शुद्ध अधिष्ठान ढळू न देता तशीच टिकून राहिली. भक्तिपरंपरा टिकून राहण्यासाठी अनेक कारणे दिली जातात. त्यापैकी लोकाश्रय हे एक महत्त्वाचे कारण आहे. शाहिरी

परंपरेप्रमारे तिला राजाश्रय किंवा नायकापायकांचा आधार नव्हता. तसेच राजकारणाशी या परंपरेचा प्रत्यक्षात फारच कमी संबंध होता. संबंध होता तो प्रत्यक्ष सर्वसामान्य जनतेशीच होता. भक्तिपरंपरा टिकून राहण्याची आणखी कारणे देताना भ.श्री. पंडित म्हणतात, ''भक्तिपरंपरा चिरंजिवी राहण्याचे आणखी एक कारण असे की, भक्तिरसाला स्वतंत्र अस्तित्व आहे. शहिरांच्या लावण्यांना व पोवाड्यांना अनुक्रमे शृंगार व वीर रसांची पाठबळे होती. इंग्रजी साहित्याच्या संपर्काने जुने शाहिरी कवितेचे प्रकार नव्या प्रकारात पूर्णतया एकरुप झाले. परंतु भक्तिकाव्य हे मात्र पूर्वीप्रमाणे स्वतंत्र राहिले. कारण जुने भक्तिकाव्य हे नव्या गुढवादी काव्यप्रकाराशी सदृश्य असले, तरी हा नवा काव्यप्रकार नसून मुळात आपलाच आहे हे सत्य आहे. भक्तिरसाच्या मुळाशी असणार 'निर्वेद' ही स्थायी भावना नसून ती मूलभूत अंत:प्रेरणा आहे.''[८] यामुळेच त्या काळी जी भक्तियुक्त पदे निर्माण झाली ती आजही समाजात प्रिय आहेत. उत्कृष्ट भक्तिगीतांच्या प्रणेत्यांत कऱ्हाडच्या विठोबा अण्णा दप्तरदार (१८१३–१८७३) ह्यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. त्यांनी जुन्या पठडीप्रमाणे शास्त्राध्ययन केले होते. ते संस्कृत भाषेत पारंगत होते. दप्तरदारांनी अनेक संस्कृत ग्रंथ रचले होते व त्यांचे वक्तृत्व अस्खलित व रसाळ होते. त्यांच्या 'पदसंग्रहा'च्या आजपर्यंत अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. विठोबा अण्णांची 'श्रीरंगा, दे मजला सत्संगा' व 'उत्तम जन्मा, येऊनि रामा' ही पदे एके काळी हरिदासांच्या मुखाने बृहन्महाराष्ट्रात कर्णोपकर्णी झाली होती.

वरील पदांप्रमाणेच एकेकाळी भास्कर दामोदर पाळंदे (१८३२–१८७४) यांच्या 'रत्नमाले' तील स्तोत्रे महाराष्ट्रात प्रसिद्ध होती. त्यातील काही स्तोत्रे क्रमिक पुस्तकांत समविष्ट असल्यामुळे त्यांचा प्रसार जास्त झाला होता. पाळंद्यांचे वृत्तरचनेवर असाधारण प्रभुत्व होते. 'रत्नमाले' तील वृत्ते कशी म्हणावी हे सर्वांना समजावे म्हणून त्यांवर 'भुजंयप्रयात' किंवा 'पृथ्वी' असा नामनिर्देश न करता 'सदा सर्वदा योग तुझा घडावा' किंवा 'सुसंगती सदा घडो, सुजनवाक्य कानीं पडो', अशा सर्वपरिचित चरणांच्या 'चाली' दिल्या आहेत.

'रत्नमाले'च्याच धर्तीवर कर्नल कान्होबा रणछोडदास कीर्तिकार (१८४९–१९१७) यांनी प्रार्थनासमाजासाठी 'भक्तिसुधा' रचली होती. तिच्यात स्तोत्रांपेक्षा पदांचा भरणा अधिक होता. 'मराठी भाषेचे पाणिनी' असे ज्यांना म्हटले जाते असे दादोबा पांडुरंग हेसुद्धा परमार्थपर कविता करीत. त्यांनी अभंगाच्या स्वरुपात काही कविता केल्या होत्या.

प्रसिद्ध गद्यलेखक व भाषांतररकार हरि केशवजी पाठारे यांनी इ.स. १८४१ मध्ये स्कॉटिश मिशन सोसायटीसाठी 'Bunyan's Pilgrim's Progress' या सुप्रसिद्ध इंग्रजी ग्रंथाचे 'यात्रिक क्रमण' हे मराठी भाषांतर केले आहे. या ग्रंथाचा विषय प्रपंच करुन परमार्थ साधने हा आहे, आणि तो एका स्वप्नकथेच्या रुपकाने विशद केला आहे. मूळ इंग्रजी ग्रंथाचे मराठीकरण प्रासादिक आहे.

पाळंदे, कीर्तिकार, तर्खडकर व पाठारे यांच्या भक्तिपर कवितेला नव्या सुधारलेल्या धर्मसंप्रदायाची प्रेरणा होती. गीते ही भावनेवर अधिष्ठित असत. भावनेची उत्कटता ही तात्पुरती असते. अर्थातच गीते ही सुटसुटीत असतात. तसेच गेय असल्यामुळे मनोहर व श्रवणीय असतात. त्यामुळे वैचारिक ग्रंथापेक्षा त्यांचा प्रसार अधिक होतो. संक्रमणकाळात विशिष्ट परिस्थितीमुळे प्राचीन शाहिरी परंपरा खंडित झाली, वैचारिक भक्तिग्रंथ काळाच्या ओघात दृष्टिआड झाले, परंतु भक्तिगीते मात्र कायम राहिली.

परंतु तरीदेखील इंग्रजी राजवटीमुळे जुन्या भक्तिपरंपरेवर परिणाम झालाच. कारण त्यांचा प्रभाव केवळ राजकारणापुरता मर्यादित नव्हता. इंग्रजी राजवटींचा परिणाम, घडून येणारे बदल आणि या सर्वांचा मराठी काव्यक्षेत्राशी असणारा संबंध सांगताना भ.श्री.पंडित म्हणतात, ''इंग्रजी राजवटीचा प्रभाव केवळ राजकारणापुरताच मर्यादित नव्हता. तो थोड्याच अवधीत धर्म, समाज व्यापार, व्यवहार यांच्यापर्यंत पसरला. त्याचा परिणाम असा झाला की, नव्याने निर्माण झालेली बौद्धिक जागृती जुन्या भोळ्या–भाबड्या भाविकतेला 'अंधश्रध्दा' हे नाव देऊन तुच्छ लेखू लागली. त्यामुळे साहजिक भक्तिपरंपरेचा जुना जोम कायम राहिला नाही. शिवाय इंग्रजी राज्याबरोबर या देशात अनेक राजकीय, सामाजिक, शैक्षिणिक व औद्योगिक फेरबदल घडून आले. या प्रचंड उलथापालथीत प्राचीन मराठी कवितेला पुढील पन्नास पाऊणशे वर्षात हळूहळू नवे इंग्रजी वळण मिळत गेले. ते इतके की, तिच्या अंतरंगाचा नीट बोध व्हावा म्हणून तिला प्राचीन व अर्वाचीन अशी भिन्नस्वभावदर्शक दोन विशेषणे मिळाली. ही दोन विशेषणे केवळ 'काव्य' या साहित्यप्रकराबाबतच निर्माण झाली. कारण मराठी साहित्यात प्राचीन काळापासून फक्त काव्य हाच एक साहित्यप्रकार रुढ होता.''[९]

प्राचीन मराठी कविता आणि अर्वाचीन मराठी कविता यांच्या बाह्यस्वरुपाबरोबर अंतःस्वरुपातही खूप मोठा फरक आहे. प्राचीन कवितेत संतांच्या साहित्यापासून ते शाहिरांच्या

साहित्यापर्यंत विषय, रस, भाषाभिव्यक्ती यांच्यात वारंवार बदल घडले असले तरी त्यांचा गाभा भारतीय संस्कृतीचा आहे. अर्वाचीन कविता देशी असली तरी तिच्यावर इंग्रजी संस्कृतीची मोठी छाप आहे.

## ४.८ नवे पंडित कवी :

इंग्रजी राजवटीच्या आरंभाबरोबर मराठी वाङ्मयाच्या वाढीच्या दृष्टीने प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष चांगलाच हातभार लागला. त्याही पुढची गोष्ट म्हणजे त्या काळात झालेली वाङ्मयनिर्मिती सरकारी प्रेरणेने आणि पारितोषिकांच्या प्रलोभनाने झाली होती. पंडितपरंपरेचे पुष्कळ वाङ्मय 'दक्षिणा प्रैज'च्या अमिषामुळे तयार झाले होते. कारण 'दक्षिणा प्रैज कमिटी' ने कवितेचा विषय जाहीर करायचा आणि इच्छूक उमेदवार कवींनी तो हाताळायचा असा चमत्कारिक प्रकार होता. त्यामुळे त्यात आंतरिक जिव्हाळ्याचा अभाव असे. आणि कमिटीने बक्षिसांना जे विषय दिले होते, ते बहुतेक ऐतिहासिक असल्यामुळे ऐतिहासिक कविता लिहिण्याची प्रवृत्ती वाढली. पुराणातील कथा निवडून तिच्यावर पौराणिक काव्य रचायचे किंवा संस्कृत साहित्याचे भाषांतर करण्याची प्रवृत्ती पुढे क्षीण होत गेली.

पंडित कवीनी भाषांतर करताना पद्यासाठी संस्कृत ग्रंथ व गद्यासाठी इंग्रजी ग्रंथ निवडले होते. हे पंडित संस्कृत आणि इंग्रजी या दोन्ही भाषांत निपुण होते. या कवींना 'शास्त्री' असे म्हणत. यापैकी बहुतेक शास्त्री सरकारी विद्याखात्यांत नोकरीला होते. तेव्हा त्यांनी त्या खात्यास आवश्यक असलेल्या ग्रंथमिर्मितीचे कार्य केले. मुद्रणकलेमुळे गद्याची घटनाच नव्याने घडत होती. मुंबईकर मंडळींचा कल गद्यरचनेकडे विशेष होता, तर पुणेरी पंडितांचा ओढा पद्यरचनेकडे अधिक होता.

पंडितकवींत परशुरामतात्या गोडबोले (१७९९–१८७४) हे वयाने ज्येष्ठ होते. त्यांनी प्राचीन कवींच्या काव्यांचे संपादन नीतिशिक्षणावर कवितांचे लेखन व संस्कृत साहित्यातील अभिजात नाटकांचे मराठीकरण केले. गोडबोले यांनी प्राचीन कवींच्या काव्यांचे मंथन करुन इ.स. १८५४ मध्ये महाराष्ट्रीयन रसिकांना 'नवनीत' मेला सादर केला. तसेच होतकरु कवींना शुद्ध पद्यलेखनाचे पाठ देण्यासाठी सर्वांना समजलं असे लहानसे 'वृत्तदर्शन' रचले. गोडबोले यांनी 'नामार्थदीपिका', 'कादंबरीसार' 'बालबोधामृत' आणि 'मराठ्यांच्या इतिहासावरील सोप्या

आर्या' ही काव्ये लिहिली. 'कादंबरीसारा'त बाणाच्या संस्कृत कांदंबरीचे मराठी सार आहे. 'बालबोधामृत' हा पद्यात्मक ग्रंथ विद्याभ्यास करणाऱ्या मुलांच्या हितासाठी रचला आहे. हा ग्रंथ नीतिपर आहे.

परशुरामतात्या गोडबोले यांचे अनुकरण करुन कृष्णशास्त्री केशव राजवाडे (१८२०-१८७४) यांनी 'मालतीमाधव', 'मुद्राराक्षस', अभिज्ञानशाकुंतल' या संस्कृत नाटकांना मराठी वेष चढविले आहेत. 'उत्सवप्रकाश' या स्वतंत्र्य काव्यात पाडव्यापासून ते रंगपंचमीपर्यंत अठरा सणांचे वर्णन प्राचीन पुराणे, इतिहास व दंतकथा यांच्या आधारे विस्ताराने केले आहे. उत्सवप्रकाशमधील पद्यरचना सामान्य असून काही पद्यांत बालिश विनोद आहे.

कृष्णशास्त्री राजवाडे आणि परशुरामतात्या गोडबोले यांच्या कवितांपेक्षा कृष्णशास्त्री चिपळूणकर (१८२४-१८७८) यांच्या कविता विशेष रेखीव, रसाळ व रमणीय आहेत. कविकुलगुरु कालिदासाने आपल्या 'मेघदूत' या काव्यात कल्पनाशक्तीच्या साहाय्याने मानसिक सृष्टी रचून तिचे तात्त्विक सृष्टीप्रमाणे हुबेहुब वर्णन केले आहे. कृष्णशास्त्री चिपळूकरांनीही त्याचप्रमाणे 'मेघदुता' चे मराठीत रुपांतर केले आहे. त्याचप्रमाणे जगन्नाथपंडितांच्या 'भामिनीविलास'च्या आधाराने 'विरहिविलाप' रचलेले असून मूळ काव्याहून ते सरस आहे. 'मेघदूत', 'विरहिविलाप' आणि 'अन्योक्तिकलाप' ही चिपळूणकरांची सुरस काव्ये मूळ संस्कृत काव्यांचे भावानुवाद आहेत.

गणेश सदाशिवशास्त्री लेले यांनी 'रघुवंश', शिवाजीचरित्र, 'हिंदू लोकांचे सण', गंगाचरित्र', 'कृष्णकुमारी', ही काव्ये रचली आहेत. याशिवाय 'शिवसृष्टी', 'सीमांतिनीचे आख्यान', 'तुकोजी होळकर' ही काव्ये लिहिली आहेत. परंतु लेले यांचे बहुतेक वाङमय 'दक्षिणा प्रैज कमिटी' साठी निर्माण केले असल्याने त्यात नवेपण नाही. कारण आधी कमिटीने कवितेसाठी विषय असल्यामुळे निरनिराळ्या आख्यानक कवितांत तेच ते श्लोक पुन्हा-पुन्हा आलेले आढळतात.

पंडितपरंपरेतील कवींत पांडुरंग गोविंदशास्त्री पारखी (१८४४-१९११) वयाने सर्वांहून कनिष्ठ होते. त्यांचे 'षङ्ऋतुवर्णन' हे काव्य प्रसिद्ध झाले. त्यात सहाही ऋतूंची व त्यांतील मुख्य सणांची मोठी रसाळ व चटकदार वर्णने केली आहेत. 'षङ्ऋतुवर्णन' या काव्यातील भाषा

संस्कृत प्रचुर असून विविध वृत्तांचा वापर केला आहे. हे काव्य आणि 'कृष्णाकुमारी' हे काव्य दक्षिणा प्रैज कमिटीच्या जाहिरातीवरुन पारखी यांनी तयार केली आहेत.

पांडित्य हा ज्यांचा व्यवसाय नव्हता, तरी ज्यांनी पांडित्यप्रचुर कवितालेखन केलेले दोन कवी म्हणजे गणपतराव पटवर्धन आणि सर.टी.माधवराव हे होते. त्यापैकी गणपतराव पटवर्धनांचा संस्कृतचा सखोल अभ्यास होता. मारोपंतांचे अनुसरण करुन गणपतरावांनी सर्व काव्यरचना आर्याबद्ध केली आहे. 'गणेशपुराण', 'भटट्वंशवर्णन' आणि 'गंगावर्णन' ही त्यांची काव्ये मोरोपंती वळणाची आहेत. सर.टी. माधवराव यांच्या विचारांवर इंग्रजी विचारांची पुसट छाप आहे. त्यांनी विविध विषयांवर अनेक लहान-लहान कविता लिहिल्या आहेत. तसेच अनेक संस्कृत सुभाषितांचा मराठी अनुवाद केला आहे.

उपरोक्त पंडितपरंपरेत लेखन करणाऱ्या कवींनी सर्वसाधारण मराठी वाचकवर्गास संस्कृत साहित्यातील काव्यनाटकांची ओळख करुन दिली. कारण प्राचीन मराठी कवींनी केवळ रामायण, महाभारत व भागवत या बृहत्कथांचेच अनुवाद केले होते. परंतु पंडितपरंपरेतील कवींनी कालिदास, भवभूती, शुद्रक, बाण, विशाखदत्त व जगन्नाथपंडित इत्यादी प्रतिभासंपन्न कवींच्या ललित वाङ्मयाची मराठी रसिकांना ओळख करुन दिली. पंडितपरंपरेतील सर्व कवी संस्कृतभाषाविशारद होते. पण पंडितकवींचे बहुतेक वाङ्मय हे आधारित, अनुवादित, भाषांतरित किंवा रुपांतरीत असल्यामुळे त्यात आत्मतेजाचा, स्वयंप्रत्ययाचा अभाव जाणवतो.

## ४.९ नाटकी कविता :

या कालखंडात आणखी एक काव्यप्रवृत्ती 'नाटकी कविते'ची होती. इ.स.१८४३ मध्ये पौराणिक आख्यानांच्या आणि हरिदासी कथाकीर्तनांच्या धर्तीवर सांगलीचे विष्णुदास अमृत भावे यांनी 'नाटकी कविता' लिहिण्यास सुरुवात केली. ही कविता त्यावेळी सूत्रधार वाद्याच्या साथीत तालासुरावर म्हणायचा आणि नट तिच्यातले भावार्थ लक्षात घेऊन हावभाव करायचा. मात्र काळाच्या ओघात ती गाण्याची पद्धती नष्ट झाली आहे.

## ४.१० धर्मप्रसारार्थ भाषांतरीत काव्यनिर्मिती :

पंडितपरंपरेतील कवींनी ज्याप्रमाणे संस्कृत काव्याचे मराठीत भाषांतर केले त्याचप्रमाणे काही देशी–परदेशी कवींनीही इंग्रजी साहित्य मराठीत आणण्याचा प्रयत्न केला. पण मुख्यत्वे हा प्रयोग झाला तो धर्मप्रसारार्थ कारणासाठी. फेअरबँक किंवा मिचेल यांनी ख्रिस्ती धर्मप्रसारासाठी त्यांच्या साहित्याचे भाषांतर मराठीत केले तर रेव्ह. जस्टिन एडवर्ड अॅबट यांनी मराठीतील काव्य व तत्त्वज्ञानाने प्रभावित होऊन मराठी संतकाव्यांचे इंग्रजीत भाषांतर केले.

मुळचे अमेरिकन असलेले रेव्ह. जस्टिन अॅबट यांनी त्यांचे सर्व आयुष्य ख्रिस्ती मिशनसाठी खर्च केले. जवळजवळ पंचवीस वर्षे ते 'ज्ञानोदय' या ख्रिस्तीधर्मप्रसारक इंग्रजी–मराठी साप्ताहिक पत्राचे इंग्रजी विभागाचे संपादक होते. मराठी संतवाङ्मयाचे ते अभ्यासक व प्रचारक होते. मराठी संतांची वाणी मराठी न समजणाऱ्यांसाठी इंग्रजी भाषेतून प्रसिद्ध केली. 'पोएट सेन्टस ऑफ महाराष्ट्र' या नावाने ही ग्रंथमाला होती. या मालेतून भानुदास, एकनाथांपासून तुकारामापर्यंत विविध संताच्या भक्तिवाङ्मयाचे शब्दश: इंग्रजी भाषांतर केले होते. त्यामुळेच रेव्ह. जस्टिन अॅबट यांना 'महीपतीचा अमेरिकन अवतार' असेही संबोधले जात असे. याशिवाय 'येशू ख्रिस्ताचे मरण व पुनरुत्थान' व 'पवित्र आत्माविषयक शुभवर्तमान भाग १ व २' ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध झाली होती.

याआधी सुरुवातीला इ.स. १८२६ मध्ये मोल्सवर्थच्या विनंतीवरुन कँडी बंधूनी मराठी–इंग्रजी कोश बनविण्यास सुरुवात केली. टॉमस कँडी यांना कोशकार, कायद्याच्या पुस्तकांचे मराठी अनुवादक व प्रमाण मराठी भाषा सिद्ध करणारे तज्ज्ञ व शालेय पुस्तकांचे लेखक म्हणून ओळखले जाते. मराठी वाक्यरचनेतील शैथिल्य व अनियमितपणा काढून टाकून भाषेला बंदिस्तपणा आणण्याचे श्रेय कँडीना दिले जाते. मराठी भाषेच्या लेखनात विरामचिन्हे वापरण्याची पद्धतीही कँडीनीच सुरु केली. ख्रिस्ती धर्मप्रसारार्थ उपयोगी पडतील अशी आणि शालेय विद्यार्थ्यांची क्रमिक पुस्तकेही (१८५०) ह्यांनी लिहीली.

सॅम्युअल बेकन फेअरबँक या अमेरिकेत जन्मलेल्या व्यक्तीने लेखक, भाषांतरकार, संपादक, वैज्ञानिक, गीतकार, कृषिशास्त्रज्ञ अशा विविध भूमिका भारतामध्ये बजावल्या. इ.स.१८४६ मध्ये महाराष्ट्रात आल्यावर फेअरबँकनी मराठीत ग्रंथरचना करण्यास प्रारंभ केला. गणित या विषयावरचे त्यांचे पहिले स्वतंत्र पुस्तक १८४८ मध्ये प्रसिद्ध झाले. तसेच बऱ्याच

इंग्रजी गीतांचे मूळ चालीवरच मराठीत भाषांतर केले. ही गीते 'ईश्वरभजनाची गीते' या नावाने गीतसंग्रहात प्रसिद्ध झाली होती. इ.स. १८९२ मध्ये शालेय धड्यांवर आधारित चित्रे, लघुकथा आणि कविता लिहून 'बाळशिक्षक' हे साप्ताहिक सुरु केले. 'ज्ञानोदय' या नियतकालिकात विविध विचारप्रवर्तक लेख आणि विविध पुस्तके लिहून मराठी ख्रिस्ती वाङ्मयात मोलाची भर टाकली.

स्कॉटिश मिशनतर्फे धर्मप्रसाराचे काम करण्यासाठी इ.स. १८३८ मध्ये रेव्ह. जे. मरे मिचेल मुंबईस दाखल झाले. येथे मराठी आणि संस्कृत भाषा शिकून बायबलचे मराठी भाषांतर सुधारण्यास सुरवात केली. मराठी भाषेत उत्तम ग्रंथ निर्माण व्हावेत व वाङ्मयविकास व्हावा यासाठी १८५१ साली निर्माण झालेल्या 'दक्षिणा प्रैज कमिटी'चे ते एक कार्यकर्ते होते. ख्रिस्ती धर्मोपदेशक असूनही मिचेल तुकारामांचा चाहता व अभ्यासक होता. तुकाराम महाराजांच्या अभंगाने प्रभावित होऊन मिचेल यांनी अभंगामय येशूख्रिस्त महात्म लिहावयास घेतले. त्यांचे सहा अध्याय, ज्ञानोदय एप्रिल ते ऑगस्ट १८५५ या अंकात प्रसिद्ध झाले. तसेच तुकारामांच्या पंचावन्न अभंगांचे इंग्रजीत भाषांतर केले. 'नारळी पौर्णिमा' (१८५१), 'आळंदीची यात्रा' (१८५५), 'पंढरपूरची यात्रा' (१८५५), 'तुकारामाची गोष्ट' (१८५६), 'खंडोबाची गोष्ट' (१८७७) ही आणखी काही मराठी पुस्तके लिहिली.

रे. मिचेल यांच्याप्रमाणेच त्यांची पत्नी मिस बोमंट यांनी अमेरिकेहून भारतात येताना प्रवासात मराठीचा अभ्यास केला. भारतात आल्यावर मिचेल पतीपत्नींनी नगरला मिशनरी कार्य सुरु केले. त्यांनी आंधळ्यापांगळ्यांसाठी आणि विश्रांतीसाठी असलेली धर्मशाळा अनेक वर्ष चालविली. त्यांच्या पदरी बायबल शिक्षण देणाऱ्या महिला कामावर ठेवलेल्या असत. मिसेस मिचेल यांनी काही स्वतंत्र्य व भाषांतरीत काव्यरचना केली आहे. 'The Mother's last word's 'चे 'एका आईचे शेवटचे भाषण' (१८५५) हे पद्यात्मक भाषांतर तसेच 'ख्रिस्ती स्त्रियांच्या कर्तव्याविषयी निबंध आणि 'शास्त्रात वर्णिलेल्या स्त्रिया, भाग-१ आणि २ ही पुस्तके आहेत. मिसेस मिचेल यांना 'मदर मिचेल' असे संबोधले जात असे. भारतात येऊन ज्या मिशनरी व्यक्तिंनी दीर्घकाळ समजासेवा व मराठी भाषेची सेवा केली. त्यात मिसेस मिचेल यांचे कार्य उल्लेखनीय आहे.

ज्यांची मातृभाषा मराठी नाही अशा नवागत मिशनरींना मराठी शिकविणाऱ्या व्यक्तींना 'पंडित' म्हटले जाई. हरी रामचंद्र ख्रिस्ती हे असेच एक पंडित होते. त्यामुळे ख्रिस्ती लोकांशी आणि त्यांच्या ग्रंथाशीही त्यांचा जवळचा संबंध येत असे. यातूनच पुढे धर्मांतर करुन त्यांनी इ.स. १८३९ मध्ये ख्रिस्ती धर्म स्वीकारला. त्यांना संस्कृत व इंग्रजी भाषांचे चांगले ज्ञान असल्यामुळे या दोन्ही भाषांमधून काही पुस्तकांची मराठीत भाषांतरे केली. हरी ख्रिस्ती यांनी 'महंमदाचा वृत्तान्त' (१८५३) हे इंग्रजीतून आणि 'मतपरीक्षा' हे भाग-१ (१८५६) हे संस्कृतातून मराठीत केलेले भाषांतर आहे. बायबलच्या ओवीबद्ध भाषांतराच्या १०६ ओव्या उपलब्ध आहेत.

मिशनऱ्यांच्या सेवाभावी वृत्तीतून, धर्मविषयक वेगळ्या कल्पनांमधून आणि साध्यासरळ वागणुकीने अनेक सनातनी भारतीयदेखील ख्रिस्ती धर्माकडे आकृष्ट होऊ लागले. हिंदू धर्मातील विविध रुढीपरंपरांचे गारुड, कालबाह्य समजुती आणि या साऱ्या पार्श्वभूमीवर दुसऱ्या धर्मात दिसणारा मोकळेपणा यामुळे ख्रिस्ती धर्म स्वीकारणाऱ्यांची किंवा आपल्या धर्मातील गुणदोष तारतम्याने पाहणाऱ्यांची संख्या वाढू लागली. सर्वसामान्यांपासून विचारवंतांपर्यंत सर्वांनाच ख्रिस्ती धर्मविचारांबद्दल उत्कुकता वाटू लागली. कारण कालपर्यंत हिंदूधर्मात बहिष्कृत किंवा अस्पृश्य असणारा शुद्रातिशुद्र असो की उच्चवर्णीय ब्राह्मण एकदा ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केल्यावर सर्वांनाच समानतेच्या वागणुकीचा प्रत्यय येई. अर्थातच समाजाकडून त्याची किंमत वेगळी मोजावी लागे पण ह्या नवीन विचार-आचारांची भुरळ भारतीयांना पडू लागली होती.

पहिले मराठी कादंबरीकार आणि आत्मचरित्रलेखक म्हणून बाबा पदमनजी यांना ओळखले जाते. इ.स. १८५४ मध्ये त्यांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करुन त्यांचे संपूर्ण आयुष्य ख्रिस्ती धर्मप्रचारार्थ वेचले. त्यांची 'यमुनापर्यटन' इ.स. १८५७ ही कादंबरी प्रसिद्ध आहे.

ख्रिस्ती धर्मप्रसार, त्यांचे कार्य मुक्त विचार यांनी त्याकाळी अनेकजण प्रभावीत झाले आणि स्वधर्मातून परधर्मात म्हणजेच हिंदू धर्मातून ख्रिस्ती धर्म स्वीकारु लागले. पण स्वभाषेची म्हणजे मराठीशी असलेली नाळ मात्र तुटली नाही. धर्मांतर करुनही मराठी वाङ्मयाची सेवा करणाऱ्या ज्या व्यक्ती होत्या त्यापैकी रे. नारायण वामन टिळक हे एक होते. घरच्या संस्कारातून ओवी, अभंग, साकी दिंडी इत्यादी छंदात रचना करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. तसेच त्यांनी संस्कृतचेही अध्ययन केलेले होते. इंग्रजी, मराठी साहित्याचाही व्यासंग होता. पण

खूप मानसिक संघर्ष करुन इ.स. १९०० मध्ये नारायण टिळकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. रे. टिळकांनी गद्य आणि पद्य अशी दोन्ही प्रकारची रचना केली असली तरी 'फुलामुलांचे कवी' म्हणूनचे ते विशेष प्रसिद्ध आहेत. त्यांचे काव्य प्रसन्न आणि प्रासादिक आहे. त्यांच्या मनाची ठेवण आरंभापासूनच धर्मोपदेशाची व नीतिशिक्षकाची होती. 'घड्याळ काय म्हणते?' आणि 'मुलांस योग्य बक्षीस' ही त्यांची आरंभीची रचना ह्याच भूमिकेतून निर्माण झाली आहे. 'जगन्मित्र' या टोपननावाने त्याच्या स्फुट कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. 'पाखरा येशिल का परतून', 'माझ्या जन्मभूमीचे नाव', 'पुरे जाणतो मीच माझे बळ' यांसारख्या उत्कृष्ट भावकविता त्यांनी लिहिल्या आहेत. काव्य आणि तत्त्वज्ञानाचा सुंदर मेळ त्यांच्या कवितेतून आढळतो. 'वनवासी फूल', 'बापाचे अश्रू', 'माझी भार्या' यांसरखी खंडकाव्ये व दीर्घकाव्येही त्यांनी लिहीली आहेत. याशिवाय 'ख्रिस्तायन' हे ख्रिस्त चरित्रासंबंधीचे महाकाव्याचा घाट असलेले ओवी छंदातील अकरा अध्यायांचे अपूर्ण काव्य (इ.स.१९२१), 'अभंगांजली' (इ.स. १९३०) आणि 'भजनसंग्रह' ही भक्तिपर रचनाही प्रसिद्ध आहे. सहजता व भावनेची उत्कटता ही या अभंगांची वैशिष्ट्ये आहेत. पण ख्रिस्ताचे तत्त्वज्ञान अंगी बाणवून घेऊन ख्रिस्तांशी एकरुप होण्याविषयीची तळमळ त्यांच्या अभंगातून प्रगट होते. तरीही मराठीभाषी ख्रिश्चनांची मते इंग्रजीकडून मराठीकडे वळविण्याचे आणि त्यांच्या मराठी भाषेला सुबोध व सरस वळण लावण्याचे महत्त्वाचे कार्य टिळकांच्या कवितेने केले आहे. ख्रिस्तीधर्म स्वीकारुनही त्यांचे मातृभाषेवरील व मराठी भाषेवरील प्रेम कमी झाले नाही. 'धर्मांतर म्हणजे देशांतर नव्हे' या त्यांच्या उत्कट श्रद्धेमुळे बऱ्याच महाराष्ट्रीय ख्रिस्ती मंडळींना स्वदेश व स्वभाषा यांच्याविषयी आस्था निर्माण झाली.

## ४.११ सावित्रीबाई आणि समकालीन कवी :

उपरोक्त स्त्री–लेखिकांपैकी कोणाहीकडून नवीन कल्पना मांडणारी किंवा आधुनिक काव्य रचना झाली नाही. कथा, कादंबऱ्या, प्रवासवर्णने, भाषांतरे, आत्मवृत्त इत्यादी लेखन घडले आहे. तथापि सावित्रीबाई फुले यांची समकालीन अशी कोणीही कवयित्री असल्याचे आढळत नाही. परंतु सावित्रीबाईंना समकालीन असे कवी कृष्णाजी केशव दामले यांच्याबरोबर तुलना केली असता त्यांच्या काव्यविषयात खूप साम्य आढळते. एवढेच नव्हे तर काव्यरचनेचा कालावधी

विचारात घेतला असता दोघांच्या काव्यरचनेच्या कालावधीत अवघे तीस वर्षांचे अंतर होते. सन १८५४ मध्ये सावित्रीबाईंचा 'काव्यफुले' हा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतर म्हणजे तीस वर्षांनी केशवसुतांनी अर्थातच कृष्णाजी केशव दामले यांनी कविता लिहिली. इ.स. १८८५ मध्ये त्यांनी काव्यलेखनास प्रारंभ केला. काव्यलेखनासाठी 'कुणीतरी', 'एक मित्र', अशा टोपण नावांनी त्यांनी कवितालेखन केले. 'काव्यरत्नावली'कारांनी त्यांना केशवसुत हे नाव बहाल करुन ते प्रचारात आणले.

केशवसुतांचे मराठी वाङ्मयातील स्थान महत्त्वाचे असले तरी आधुनिक कवितेच्या जनकत्वाचा मान मात्र सावित्रीबाईंनाच द्यायला हवा. कारण मराठी कवितेत खऱ्या अर्थाने नवीन काव्याची सुरुवात, नवीन विषय कवितेतून लिहिण्याची सुरुवात सावित्रीबाईंकडूनच झाली. कवीला आत्मकवित्वाची जाणीव असते व त्यातूनच भिन्न भिन्न काव्यकल्पनांचा उदय होतो. ज्ञानेश्वरांपासून मोरोपंतांपर्यंत कवींना मराठीतून काव्यरचना करण्याचे समर्थन करावे लागले. त्याचप्रमाणे ह्या काव्यनिर्मितीचा अद्‌भुत अनुभव शब्दांत पकडण्याचाही प्रयत्न झाला. हा प्रयत्न जसा केशवसुतांकडून झाला त्याचप्रमाणे सावित्रीबाईंकडूनही त्यापूर्वीच झाला होता. काव्याच्या प्रयोजनाविषयी केशवसुतांनी'कविता आणि कवि' या कवितेत म्हटले आहे,

''करुनिया काव्य जनात आणणे
न मुख्य हा हेतु तदीय मी म्हणे;
करुनि ते दंग मनात गुंगणे,
तदीय हा सुन्दर हेतु मी म्हणे.''[१०]

मनातील हा हेतू सांगून त्यांच्या पुढील 'काव्य कोणाचे' या कवितेत केशवसुत म्हणतात.

''काव्य लिहिले मी खरे, परी माते
शारदेने जो मंत्र दिला कानी,
तसे लिहिले मी, काव्य तिचे मानी.''[११]

अर्थातच जिच्या दिव्य शक्तीने फुलांमध्ये गंध, रंग आणि सृष्टितील रम्य सौंदर्य निर्माण झाले त्या सर्वांचे कारण शारदाशक्ति असे सांगून हे श्रेय पूर्णपणे शारदा देवीला अर्पण केले आहे.

‘पिवळा चाफा’ या कवितेत सावित्रीबाईंनी जीवनाच्या क्षणभंगुरतेचे, सौंदर्याचे वर्णन केले आहे. ‘चाफा’ या फुलाला उद्देशून सावित्रीबाई म्हणतात,

‘‘गुढपणे तो
मनात शिरुनी
काव्य कराया
उन्मुख करतो ।।
जैसे रतीला
मदन खेळवी
तैसे कवीचे
मन चेतवितो ।।’’[१२]

येथे सुंदर उपमा, निसर्गातील घटकांवर तरल कल्पना अलगदपणे त्यांच्या कवितेतून प्रगट होते. तर ‘द्रष्टा कवी’ या कवितेतून सृष्टीच्या दिव्यत्वाचा साक्षात्कार होऊन काव्याची प्रतिसृष्टी बनविण्याचे सामर्थ्य आपल्या शब्दांमधून व्यक्त झाल्याचा प्रत्यय त्यांना येतो. पण काव्यासाठी असणारी प्रेरणा, स्फूर्ती आणि या सर्वांचा वरदहस्त कोण आहे याचे वर्णन मोठ्या सुंदर शब्दात त्यांनी केले आहे. ‘द्रष्टा कवी’ या कवितेतून सावित्रीबाई म्हणतात,

‘‘काव्य ज्ञानाचा भक्त असे मोठा
नवरसाचा तो भरलेला कोठा
ओघ काव्याचे वाहतात तोंडी
तया ‘दृष्टा’ वर देई नव–चंडी ।।
देवी जिव्हेवर बसुनि काव्य गाई
धवल गंगाजल शंभु जटा धारा
काव्य वाचेतून वाहती ‘मधुरा’।।[१३]

ज्याप्रमाणे काव्याविषयी सावित्रीबाईंनी त्यांचे विचार व्यक्त केले, त्याचप्रमाणे आत्मकवित्वाची जाणिवही त्यांच्या काव्यातून प्रगट झाली आहे. काव्याचे प्रयोजन, काव्यनिर्मितीची प्रक्रिया, काव्याचे विषय, काव्यास कारणीभूत होणारी मुलभूत शक्तीप्रतिभा आणि प्रत्यक्ष काव्यनिर्मितीच्या वेळी कवीची होणारी भावविभोर अवस्था यांचे वर्णन

सावित्रीबाईंच्या काव्यातून घडते. या क्षणोक्षणी बदलत राहणाऱ्या मानसिक अवस्थेचे, कधी अस्वस्थ तर कधी अत्यानंदी कवीस्थितीबद्दल 'खुळे काव्य व खुळा कवी' या कवितेत सावित्रीबाई म्हणतात.

''कल्पित रचतो कवी काव्य
सुखदु:खे तो कधी भव्य
अनुभव घेतो स्वर्गाचा
भोग भोगतो नरकाचा ।।''[१४]

ज्याकाळी कवितेत असे वैयक्तिक आत्मानुभव, अबोध संवेदना, अतर्क्य  अनुभव व्यक्त करण्याची पद्धतच रुढ झाली नव्हती. त्यावेळी सावित्रीबाईंच्या कविमनाने जे टिपले ते शब्दबद्ध होऊन कवितारुपाने प्रगट झाले. हीच परंपरा पुढे केशवसुतांच्या कवितेतून प्रगट झाली असे म्हणावयास हरकत नाही. कित्येक वेळा जगापासून दूर निसर्गात कवीला सौंदर्याचे दर्शन होते व तो त्यांना शब्दरुप देऊ पाहतो. पण इतक्यात व्यावहारिक जीवनाची हाक त्याला स्पष्ट ऐकू येऊन त्यास परतावे लागते. मग भासमान झालेली सौंदर्ये लुप्त होतात. अशा वेळी पुन्हा केव्हातरी लुप्त सौंदर्याची स्मृती झाली तरी त्यांना अचूक शब्दात पकडता येणे शक्य नसते. काव्यरचनेच्या वेळची कविमनाची अवस्था समाधीची असते. त्यावेळी व्यावहारिक सुखदु:खाच्या पलीकडे कवी जातो. आणि अशा अवस्थेचे वर्णन नेहमीच्या शब्दांनी करता येत नसल्यानेच केशवसुतांनी तिला 'झपूर्झा' म्हटले असावे. वि.का. राजवाडे म्हणतात,  ''केशवसुतांनी काव्याबरोबर कवीविषयीही काही सांगितले आहे. कवी जरी बाह्यरुपाने अडाणी वाटले, अथवा त्यांस 'काव्यदेवतेची भ्रमिष्ट बालके' असे म्हणत असले, तरी त्यांचे कर्तृत्व फार मोठे असते असे त्यांना सांगायचे आहे. 'आम्ही कोण' या त्यांच्या सुप्रसिद्ध सुनीतात कवींचा मोठेपणा त्यांनी ओजस्वी शब्दांत सांगितला आहे.''[१५] अशाच प्रकारची आत्मनुभूती  सावित्रीबाईंनाही घडली होती. सृष्टीच्या दिव्यतेचे काव्य म्हणजे त्यांची कविता असे त्यांच्या कवितेतूनही प्रतिध्वनीत होते. म्हणूनच दिव्य सृष्टीचे काव्यही 'सुरात गातो कवी दिव्य' ही व्यक्तिगत अनुभूती त्यावेळी दुर्मिळपणे नव्हे कधी व्यक्तच होत नव्हती ती व्यक्त झाली आहे हा योगायोग नव्हे. काव्यनिर्मितीच्या वेळी कवीची मन:स्थितीत, कवितेचे प्रयोजन यामध्ये देशकालास्थितीप्रमाणे किंवा व्यक्तिच्या स्वभावाप्रमाणे बदल घडू शकतो. पण कवितानिर्मिती आत्मरंजन म्हणून झाली

तरी कालोचत घटनांचा प्रभाव तिच्यावर पडतोच. त्यामुळे सामाजिक व्यक्तिविषयक किंवा मानवतेविषयीच्या जिव्हाळा व्यक्त करणाऱ्या किंवा सद्यस्थितीवर भाष्य करणाऱ्या कविता आणि उपरोक्त विषय नविन असले तरी मराठी कविता स्थित्यंतराच्या वळणावर उभी असल्याने अशा कवितांची निर्मिती नुकतीच घडू लागली होती. कारण कवी आणि कविता यांवर स्वत: कविताकाराने काही लिहावे सांगावे ही प्रथाच कविजगतात नव्हती. मात्र आधुनिक काव्यात कविता, कवितेचे प्रयोजन, काव्यनिर्मितीच्या वेळी कविच्या मनाची स्थिती हे काव्याद्वारे सूचकतेने प्रगट होऊ लागले होते.

सूर्य, सूर्यमंडल, पृथ्वी, पृथ्वीवरील अगणित रंगगंधगुणांनी नटलेली सृष्टी, निसर्गसौंदर्य हे संवेदनशील कवींचे मन मोहून टाकतात. त्यातून निर्माण होणारी कल्पना, एखाद्या विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन याधूनच कवीची काव्यात्मकता प्रगट होते. साध्या विषयांतही कवीच्या वेगळ्या दृष्टिकोनामुळे भावनाविष्कार वेगळ्या पद्धतीने होऊन कविता वेगळी उंची गाठते. वामन पाठक म्हणतात, ''एकाच बाह्य विषयाकडे पाहण्याच्या कविंच्या दृष्टिकोनांत भेद निर्माण होतात. एक सूर्यास्ताचे दृश्य घेतले तर विशिष्ट परिस्थितीत केशवसुतांसारखा कवी स्वातंत्र्याचा सूर्य पश्चिमेला गेला म्हणून हळहळतो, तर तांबे यांना जीवनान्त जवळ आलेला पाहून ढळलेल्या दिनाची उपमा सुचते.''[१६] सावित्रीबाईंनीही आपल्या 'सावित्री व ज्योतिबा संवाद' या कवितेत चंद्र सूर्याला गुंफून प्रभातकाळचे रम्य वर्णन केलेले आहे. पूर्ण कवितेत रजनीचा काळोख व सूर्य तेजाने प्रकाशलेली सुंदर सृष्टी यांची तुलना करुन कवितेच्या शेवटी शूद्रातिशूद्रांच्या जीवनातील अंधार नष्ट होऊन प्रकाशरुपी जीवन मिळाल्याने गाढ निद्रेतून, वाईट अवस्थेतून आत्मसन्मानाची स्वस्वरुपांची ओळख मिळाल्याने वेगळ्या प्रकारची जाग आली आहे, असे वर्णन केले आहे. त्यामुळे साध्यासरळ पद्धतीने निसर्गाचे वर्णन करणारी कविता या प्रतिमांमुळे वेगळ्याच उंचीवर पोहोचली आहे.

अशाच वेगळ्या धाटणीच्या आणि सामाजिक प्रश्न पोटतिडकीने मांडणाऱ्या काही कविताही सावित्रीबाईंच्या काव्यसंग्रहात आहेत. पांडुरंग भोसले म्हणतात, ''अर्वाचीन मराठी काव्यात जे नवनवे विशेष आढळले. त्यात समाजविषयक जाणिवा व्यक्त करणे हा एक सांगता येईल. त्या कालखंडातील सामाजिक, राजकीय परिस्थिती आणि इंग्रजी वाङ्मयाची ओळख यामुळे सर्व जीवनच ढवळून निघाले होते. साहजिक १८४८ च्या दरम्यान लोकहितवादींच्या

नवविचाराच्या सुधारणावादी लेखनापासून सुरुवात झाली. महात्मा ज्योतिराव फुले यांचे समाजसुधारणाविषयक विचारही या काळात हळूहळू रुजू लागलेले होते.''[१७] अर्थातच महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सहचारिणी म्हणून तसेच समाजसुधारणेच्या कार्यात सक्रिय सहभाग असल्याने सावित्रीबाईंना सामाजिक प्रश्नांचे चांगलेच ज्ञान होते. समाजातील विषमता, अज्ञान अत्याचार, श्रद्धा, अंधश्रद्धा, रुढी, परंपरा, समाजात वावरल्यामुळे सावित्रीबाईंना अगदी जवळून पाहिल्या होत्या, अनुभवल्या होत्या.

त्यामुळे या विषमतेचे कारण शोधण्याचाही प्रयत्न त्यांनी केला. अज्ञानाने पछाडलेले, धर्म रुढीच्या चुकीच्या कल्पनांत रमलेले व दारिद्र्यामुळे हीनदीन झालेले लोक केवळ ज्ञानापासून वंचित राहिल्याने त्यांची ही दु:स्थिती झाल्याचा निष्कर्ष सावित्रीबाई काढतात. तो त्यांच्या कवितांमधून दिसतो. त्याचबरोबर या स्थितीतून मुक्त होण्यासाठीचा मार्ग त्या नुसत्या कृतीतून आचरणात आणत नाहीत तर कवितेतून कळवळीने सांगतात. 'शुद्रांचे परावलंबन' या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

''शुद्र आणि अतिशुद्र । अज्ञानाने पछाडले।
देव धर्म रुढी अर्ची । दारिद्र्याने गळाले।।''[१८]

पुढे 'शिकणेसाठी जागे व्हा' या कवितेत त्या म्हणतात,

''परंपरेची गुलामगिरी ही, तोडणेसाठी उठ।
बंधूनो शिकणेसाठी उठा ।।''[१९]

समाजजागृतीसाठी युगप्रवर्तक संदेश साध्या शब्दातून प्रगट करताना परंपरेच्या बेड्या तोडा असा बंड करणारा ठाम निश्चयही यातून प्रगट होतो. त्याकाळच्या विचारप्रवाहानुसार शेतकऱ्याला विद्येचा उपयोग नाही आणि विद्या प्राप्त करणे हे त्याचे काम नव्हे असे समज होते. त्याला उत्तर देताना शेतकऱ्याचा आत्मसन्मान जागृत करणारे व विद्या घेण्यास प्रवृत्त करणारे उत्तर सावित्रीबाई 'ब्रह्मवंती शेती' या कवितेत देतात. त्या म्हणतात,

''ब्रह्म असे शेती। अन्नधान्य देती।
अन्नास म्हणती । परब्रह्म।
जे करिती शेती। विद्या संपादती।
तया ज्ञानवंती। सुखी करी।''[२०]

'ब्रह्मवंती', 'ज्ञानवंती' या नाविन्यपूर्ण शब्दांचा सुरेख वापर, अन्न हे परब्रह्म ही पारंपरिक संकल्पना आणि तो धागा अचूक पकडून शेती म्हणजेच ब्रह्म हा युक्तिवाद कवितेला सुरेख लय व अर्थवाहीपणा प्राप्त करुन देतो.

अशाप्रकारे विविध प्रकारच्या निसर्गवर्णनपर, बोधपर ऐतिहासिक आणि सद्यस्थितीवर भाष्य करणाऱ्या कवितांची सुरुवात सावित्रीबाईंकडून झाली असे म्हणण्यास हरकत नाही. कारण त्यापूर्वी असा प्रयत्न कवितेतून कोणीच केला नव्हता. केशवसुतांनी 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' ही सामाजिक प्रश्नावर लिहिलेली पहिली कविता होती. ज्यामध्ये समकालीन अस्पृश्यताविषयक परिस्थितीचे चित्रण करणारा प्रसंग यात आहे. त्या काळातील 'स्पृश्य थोर, अस्पृश्य नीच' अशी समजूत एक आई आपल्या मुलाला सांगते. पण मुलाच्या अर्थातच नवीन पिढीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या मुलाच्या मनात त्याबद्दल प्रश्न निर्माण होतो. कविता साधी, लेखनही अगदी साधे पण कवितेचा विषय महत्त्वाचा आहे, जो वाचकाच्याही मनात प्रश्न निर्माण करतो. म्हणून काव्यदृष्ट्या जरी सरस नसली तरी ती अर्थवाही आहे. अशाप्रकारे सामाजिक व आर्थिक विषमेतवर आधारित कविता लिहिण्यास सुरुवात झाली होती. पण त्यापूर्वीच अशा प्रकारच्या कविता सावित्रीबाईंकडून लिहिल्या गेल्या होत्या. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच नवीन विषय, नविन प्रकार अर्थातच आधुनिक काव्यप्रकारची सुरुवात सावित्रीबाईंकडूनच झाली, असेच म्हणावे लागेल. फक्त सामाजिकच नव्हे तर वाङ्‌मयीन क्षेत्रातदेखील पहिले क्रांतिकारी पाऊल सावित्रीबाईंनीच उचलले असे म्हणण्यास हरकत नाही.

## समारोप :

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धापासून जरी मराठी वाङ्मयाचा आढावा घेतला आणि त्यातील स्थितंतरे अभ्यासली तरी एक गोष्ट गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते ती म्हणजे मराठी भाषेला मग ते गद्य असो की पद्य एक नवीन साज, नवीन ओळख निर्माण होऊ लागली. मग भाषेचे व्याकरण असो, भाषांतरीत साहित्य असो किंवा धर्मप्रचाराचे साहित्य या सर्वांमधूनच मराठी भाषा हळूहळू समृद्धीकडे वाटचाल करीत होती. संत साहित्य, पंडिती परंपरा, शाहिरी परंपरा यामधूनच आधुनिक कालखंडातील मराठी कविता बहरत होती. आधुनिक काळातील इंग्रजांच्या सान्निध्यामुळे काव्यपरंपरेलाही एक नवे परिमाण लाभू लागले होते. पण तरीही या कालखंडात

त्यापूर्वीच्या संत, पंत आणि तंत या परंपरेचे अवशेष दिसत होतेच. एकोणिसाव्या शतकातील पहिल्या दोन दशकांत महाराष्ट्रातील परिस्थिती सर्वार्थाने बदलली. नवे राज्य, नवी राज्यपद्धती, नवी भाषा, नवे रीतिरिवाज नवे शिक्षण, नवे वाङ्मय, नवी संस्कृती, नवा धर्म इंग्रजी राज्याच्या रुपाने येथील जनतेसमोर आला. अर्थातच हा बदल काहींनी स्वीकारला, काहींनी विचारमंथन करायला सुरुवात केली, तर काहींनी या बदलाला विरोध केला. या सर्वांचे प्रतिबिंब साहित्यात उमटू लागले.

पंडित कवींना जसे संस्कृतचे आकर्षण होते तसे इंग्रजी काव्याचेही आकर्षण होते. एकंदरीत संक्रमणास्थेतून जात असलेल्या काव्यात इंग्रजीचे भाषांतर आणि त्याचबरोबर नवनविन विषय काव्यात येऊ लागले. अध्यात्म, वेदान्त, पुराणकथा यांकडून काव्य राष्ट्र, समाज, वैयक्तिक जीवन, काव्यसृष्टी या विषयांकडे वळले. स्वभाषेचा अभिमान आणि परमभाषेची उत्सुकता यातून प्राचीन संस्कृती व विद्या, कला यांचे पुनर्जीवन व त्याचबरोबर नवीन आचार–विचार व ज्ञान यांचा सावध स्वीकार यामुळे सनातन, सुधारक असे प्रवाह निर्माण झाले. प्रौढ, पांडित्यप्रचुर, गंभीर रचनांऐवजी इंग्रजी काव्याच्या भाषांतराने खंड काव्य, स्फूट काव्य मराठीतही अवतीर्ण होऊ लागले होते. एकंदरीत तत्कालीन कवी आणि त्यांचे काव्य नविन विद्या व कला यांच्या आदानप्रदानाचे होते. विविध नियतकालिकांद्वारे समाजात ज्ञानदानाचे कार्य, समाजजागृतीचे कार्य हळूहळू सुरु होत होते. स्त्रीशिक्षण, शूद्रातिशूद्रांना शिक्षण, जातिभेदाचे उच्चाटन, विधवाविवाह, प्रौढविवाह, भ्रूणहत्यानिवारण अशा एक ना अनेक विषयांवर जनतेला नवीन विचारप्रवाहांची ओळख होऊ लगली होती याचेच प्रतिबिंब अर्थातच लेखनात उमटू लागले होते. निबंध, नाटक, ग्रंथ, कादंबरी, आत्मचरित्र आणि कवितांमधून मराठी साहित्यात कधी न येणारे विषय, सामाजिक प्रश्न विचारात घेण्यास सुरुवात झाली. प्राचीन मराठीत खूप कमी प्रमाणात आढळणारी वास्तवप्रधानता , सामाजिक प्रश्न, आत्मपर कविता, सृष्टिवर्णनात्मक कविता आकार घेऊ लागली. खंडकाव्य हा इंग्रजीत आढळणारा काव्यप्रकार, स्फुटकाव्य हा प्रकार मराठीत याच कालावधीत अस्तित्वात आला.

या कालावधीत स्त्री लेखिकांनी शिक्षणाचा प्रसार होऊ लागल्याने संवेदनांना, भावनांना लेखनातून व्यक्त करण्यास सुरुवात केली होती. साळुबाई तांबवेकर यांनी कांदबरी, ताराबाई शिंदे यांनी स्त्रियांची बाजू नेटाने मांडणारे पुस्तक, लक्ष्मीबाई टिळक यांनी आत्मचरित्र व

काव्यलेखन, मिसेस फेरार यांनी निबंधरुपात लिहिलेली पुस्तके (ख्रिश्चन धर्मप्रसारार्थ), पंडिता रमाबाईंची भाषांतरित पुस्तके आणि गीते, रमाबाई रानडे यांनी शब्दबद्ध केलेल्या आठवणी काशीबाई कानिटकर यांनी कादंबरी व चरित्र, आनंदीबाई कर्वे उर्फ 'बाया' यांचे आत्मचरित्र तसेच पार्वतीबाई आठवले यांनीही आत्मचरित्र असे लेखनाचे विविध प्रकार इ.स. १८७३ पासून इ.स.१९२८ पर्यंत हाताळले. या सर्व लेखिकांच्या लेखनातून कादंबरी, पुस्तके, आत्मचरित्र, चरित्र ह्या साहित्यप्रकाराचे लेखन केलेले आढळते. मात्र सावित्रीबाईंच्या समकालीन अशा या लेखिकांपैकी लक्ष्मीबाई टिळक वगळता कोणीही कवयित्री असल्याचे आढळत नाही. लक्ष्मीबाई टिळक या काळाच्या दृष्टीने सावित्रीबाईच्या बऱ्याच जवळ येत असल्या, तरी त्यांचा काळ इ.स. १८७३ ते १९६६ असा येतो. त्यातही त्यांना कविता करण्याचा छंद आधीपासून असला तरी त्यांची कवयित्री म्हणून ख्याती इ.स. १९०७ च्या जळगावच्या कविसंमेलनानंतर झाली. लक्ष्मीबाईनी इ.स. १८९४ मध्ये काव्यलेखनास प्रारंभ केला. याचा अर्थ अर्वाचीन मराठी काव्याचा विचार करता एकोणिसाव्या शतकात आद्य कवयित्रीचा मान सावित्रीबाईंनाच द्यावा लागतो.

कारण सावित्रीबाईंच्या समकालीनांपैकी नवकाव्याची निर्मिती करणारा कवी नव्हता आणि कवयित्रीही नव्हती. ख्रिस्ती धर्म, धर्मप्रसारक यांच्या प्रभावाने काही साहित्यनिर्मिती झाली तशीच परदेशी व्यक्तीही मराठी साहित्याने प्रभावित झाली. त्यांनी मराठी वाङ्मयाच्या विशेषत: संतवाङ्मयाच्या प्रसाराचे काम केले. यामध्ये रेव्हरंड जस्टिन ॲबट, रेव्हरंड जे. मरे मिचेल आणि मिसेस मिचेल यांची नावे प्रामुख्याने घ्यावी लागतील. तसेच एतद्देशीय मराठी असणारे परंतु ख्रिस्ती धर्म स्वीकारुन मराठीतच व साहित्यनिर्मिती करणारे लेखक–कवींचेही योगदान आहे. यामध्ये भाषांतरीत साहित्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असले तरी काही नवीन साहित्यप्रकारदेखील आहेत. बाबा पद्मजी आणि रेव्हरंड नारायण टिळक यांची नावे प्रामुख्याने कादंबरी, आत्मचरित्र, स्फुटकाव्ये, खंडकाव्ये, दीर्घकाव्ये यासाठी घ्यावी लागतील. तसेच हिंदुधर्माविषयी आस्था असणारे परंतु धर्माच्या नावाखाली चालणारी अवडंबरे रोखण्यासाठी, धर्मांतरे रोखण्यासाठी काही धर्मसुधारक, समाजसुधारक यांनी लेखण्या उचलल्या. लोकहितवादी महात्मा ज्योतिराव फुले, सुधारक आगरकर यांनी समाजजागृतीसाठी विविधप्रकारचे लेखन केले.

केशवसुतांनी आधुनिक कवितेचा पाया घातला असे मानले जात असले तरी इ.स. १८५४ मध्ये सावित्रीबाईंचा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झाला. म्हणजेच साधारणपणे त्यांच्या काव्यरचनेच्या कालावधीत तीस वर्षांचा फरक आढळतो. साहित्याच्या दृष्टीने हा कालखंड फार मोठा नाही. एका शतकाचा कालावधी विचारात घेतल्यास दोघांना समकालीनच म्हणावे लागेल. यामुळेच सावित्रीबाईंच्या कविता केवळ काळाच्या दृष्टिनेच केशवसुतांच्या पूर्वीच्या आहेत असे नाही, तर केशवसुतांनी हाताळलेले अनेक प्रकारचे काव्यविषय सावित्रीबाईनी यापूर्वीच हाताळले आहेत. अर्थात संख्येच्या दृष्टीने विचार करता फरक आढळेल पण कदाचित सावित्रीबाईंचे अजून साहित्य असेल, आज–उद्या आणखी अचानकपणे ते उपलब्ध होईलही पण एक गोष्ट मात्र लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे केशवसुतांची परंपरा सांगणारी केशवसुत संप्रदाय कविता जशी निर्माण झाली तशी सावित्रीबाईच्या काळची परिस्थिती पाहता त्यांना ज्या पद्धतीने आप्तस्वकीयांचा समाजबांधवाचा रोष पत्करावा लागला आणि शैक्षणिक, सामाजिक कार्यासाठी विषारी वाग्बाण सोसावे लागले, त्या आजूबाजूच्या समाजात त्यांची परंपरा सांगणारे निर्माण होणे अशक्य नसले तरी नक्कीच अवघड होते. एका मुक्ता या विद्यार्थिनीने शूद्रातिशूद्रांच्या स्थितीचे वर्णन करणारा निबंध सोडल्यास त्यांची विचारधारा पुढे नेणारा कोणताच दुवा आज तरी उपलब्ध नाही. काव्यक्षेत्रात केशवसुतांच्या काव्याचे महत्त्व अबाधित असले तरी त्यांचे काव्य मराठी काव्यातील फक्त एक प्रगत अवस्था होती असेच म्हणावे लागेल. काव्यक्षेत्रात सावित्रीबाईंनी त्यांच्या 'काव्यफुलां'नी क्रांतीचा आरंभ केला त्यामुळेच सावित्रीबाईंना आधुनिक मराठी काव्याच्या आद्यजननीचा मान द्यावा लागेल.

## संदर्भ सूची :


१. जोग रा. श्री. (संपा.), 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड चौथा महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्र.आ. १९६५, पृ. ४५.

२. कुलकर्णी गो. म., 'आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९४, पृ. २१.

३. डहाके वसंत आबाजी, 'मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती', पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि., मुंबई, पृ. ६३.

४. उनि., जोग रा. श्री. (संपा.), पृ. ६९.

५. तत्रैव, पृ. ४७.

६. तत्रैव, पृ. ४८.

७. तत्रैव, पृ. २२४.

८. तत्रैव, पृ. २२७.

९. तत्रैव, पृ. २३१.

१०. जोग रा. श्री. (संपा.), 'हरपले श्रेयः केशवसुतांच्या निवडक कवितांचा संग्रह', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण १९६४, पृ. २६.

११. तत्रैव, पृ. ३१.

१२. माळी मा. गो., 'सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय', आशा प्रकाशन, गारगोटी, प्र. आ. १९८१, पृ. १२.

१३. तत्रैव, पृ. १४.

१४. उनि., जोग रा. श्री. (संपा.), पृ. २४.

१५. उनि., माळी मा. गो. (संपा.), पृ. १८.

१६. पाठक वामन, 'आधुनिक मराठी काव्याचे अंतःप्रवाह', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९६४, पृ. ५.

१७. भोसले (डॉ.) पांडुरंग, 'रेव्हरंड नारायण वामन टिळक : शोध आणि बोध', चेतक बुक्स, पुणे, प्र.आ. २०१२, पृ. ३३.

१८. हनवते (डॉ.) शोभा, 'सावित्रीबाई फुले यांची समग्र कविता', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, द्वि.आ. २०११, पृ. ४९.

१९. तत्रैव, पृ. ३७.

२०. तत्रैव, पृ. ५०.

* * *

## प्रकरण पाचवे

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक आणि शैक्षणिक कार्य


५.१ सामाजिक कार्य

प्रस्तावना

५.१.१ समतावादी आचरण

५.१.२ खादीची आद्य पुरस्कर्ती

५.१.३ केशवपन पद्धती बंद करणे

५.१.४ अस्पृश्यांसाठी घरचा हौद खुला केला

५.१.५ बालहत्या प्रतिबंध गृह

५.१.६ बालहत्या प्रतिबंध गृह दुसरी बाजू

५.१.७ सत्यशोधक समाजाची पार्श्वभूमी

५.१.७.१ सत्यशोधक समाजाची स्थापना

५.१.७.२ सत्यशोधक समाजाच्या विवाहविधीचे स्वरुप

५.१.७.३ सत्यशोधक समाजाचे नेतृत्व

५.१.८ सावित्रीबाईंची धैर्याची कसोटी व रुढीपरंपरेविरुद्ध बंड

५.१.९ दुष्काळग्रस्तांसाठी सावित्रीबाईंचे कार्य

५.१.१० प्लेगच्या साथीमध्ये सावित्रीबाईंनी केलेले कार्य

५.२ शैक्षणिक कार्य

प्रस्तावना

५.२.१ भारतातील पहिली स्त्री शिक्षिका

५.२.२ शैक्षणिक कार्याला विरोध व गृहत्याग

समारोप

## प्रकरण पाचवे

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक आणि शैक्षणिक कार्य

## ५.१ सामाजिक कार्य

### प्रस्तावना

सावित्रीबाईंच्या कार्याचा विचार करताना ज्योतिरावांना वगळून चालणार नाही. तसेच ज्योतिरावांच्या कार्यारंभाची पूर्ती सावित्रीबाईंविना अशक्य होती हेही विसरता येणार नाही. म्हणूनच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात सावित्रीबाईंचा स्वतंत्र्य ठसा उमटलेला आहे. ज्योतिराव स्वत: समाजपरिवर्तनासाठी प्रयत्नशील होते. त्यामुळेच फुले दांपत्याने दु:ख, दारिद्र्याचे जोखड झुगारण्यासाठी शैक्षणिक क्रांती आणि शैक्षणिक क्रांतीला सामाजिक क्रांतीची जोड देऊन नवीन मार्ग चोखळला. सावित्रीबाईंच्या विचार आणि कृती यांच्यामागे ज्योतिरावांची प्रेरणा होती, वैचारिक पाया होता. असे असले तरी सामाजिक कार्याच्या पायाभरणीनंतर कृतीच्या भक्कम भितींनी सावित्रीबाईंनी कार्यसिद्धी केली होती. सामाजिक असो की शैक्षणिक ज्योतिरावांनी फक्त इतर लोकांना घेऊन सावित्रीबाईंसह स्वत:च्या घरापासून कार्यारंभ केला आणि महत्त्वाचे म्हणजे या सर्व कार्यात कधी खांद्याला खांदा लावून तर कधी काकणभर पुढे जाऊन त्या सामाजिक कार्यात समरस झाल्या. समाजाचा ढाचाच बदलायला निघणारे ज्योतिराव व सावित्रीबाई हे पहिलेच दांपत्य होते. यात सावित्रीबाईंचा सहभाग 'मम' म्हणणारा नाही किंवा शोभेचाही नव्हता. आजूबाजूच्या परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण, प्रश्नांचे आकलन, करुणामय दृष्टी आणि मानवाकडे पाहण्याची वैश्विक समताबुद्धी अशा कितीतरी पैलूंमुळे त्यांचे वेगळेपण सहज नजरेत भरते. जेथे सावित्रीबाईंचे निरक्षरत्व संपले तेथेच त्यांचे आत्मभान जागृत झाले. एकदा ज्योत प्रज्वलित केल्यावर पुन्हा-पुन्हा पेटवावी लागत नाही, आपोआप प्रकाश सर्वत्र दृगोचर होऊ लागतो. त्याचप्रमाणे शिक्षणाचा परिणाम स्वत: सावित्रीबाईंमध्ये दिसू लागला. त्यांच्यातील आंतरिक गुणांचा आविष्कार होऊन अष्टपैलू व्यक्तिमत्त्व उदयास आले. त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटले ते सर्वांना पटवून देण्यासाठी त्यांचे कार्य सुरु झाले, जननिंदा, उपहासाला त्या घाबरल्या नाहीत. वेगवेगळ्या प्रसंगातून त्यांच्या विलोभनीय व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. आजूबाजूच्या परिस्थितीच्या अवलोकनातून शूद्रातिशूद्रांची दयनीय स्थिती, स्त्रियांची असहाय्य स्थिती, परावलंबन आणि त्या स्थितीला जबाबदार घटक यांचे चिंतन

सावित्रीबाईंकडून झाले होते. स्त्रियांच्या जीवनातील जीवघेणेपणा त्यांना समजला म्हणून स्त्री–मुक्ती, स्त्री–पुरुष समानता या मूल्यांचा पडघम वाजण्यापूर्वीच स्त्री–मुक्तीची पहिली घंटा त्यांनी वाजविली. परिस्थिती प्रतिकूल असताना आपण परंपरेच्या बेड्या तोडत आहोत हे भान त्यांना नक्कीच होते तरी त्याचा दुराभिमान नव्हता. अखिल मानवजातीविषयी अपार करुणा, प्रेम आणि वात्सल्याच्या भावनेतूनच त्यांनी सामाजिक कार्य केले.

## ५.१.१ समतावादी आचरण :

सावित्रीबाई संवेदनक्षम समाजकार्यकर्त्या होत्या. आपल्या आजूबाजूची परिस्थिती, समाज आणि सण–समारंभ यांचा परस्परसंबंध, त्यानिमित्ताने एकत्र येणाऱ्या समाजाला प्रबोधनाची दिशा दाखविणे शक्य आहे असे त्यांना वाटत असावे, कारण संक्रातीनिमित्त होणाऱ्या तिळगुळ व स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाचा त्यांनी मोठ्या खुबीने उपयोग करुन घेतलेला दिसून येतो. एखादा सण किंवा समारंभ त्यामागचा सामाजिक संदर्भ लक्षात घेतल्यास अधिक सुबोध होतो. त्यातून सामाजिकच नव्हे तर इतरही गोष्टींचा बोध होऊ लागतो. म्हणून श्रीमती काशीबाई कानिटकर यांनी लिहिलेल्या आत्मचरित्रातील समारंभाचे स्वरुपवर्णन पाहणे अधिक उचित ठरेल. सखुबाई अभ्यंकर म्हणतात, ''पूर्वी श्रीमंतांच्या घरी हळदीकुंकवाचे खूप मोठे समारंभ व्हायचे, पण सगळा भेदभाव असायचा. हळदीकुंकवाला आलेल्या बायकांपैकी खूप श्रीमंतांच्या ज्या बायका असत त्यांच्या हाताला केशर लावीत. मधल्या–अधल्या असत, त्यांच्या हाताला अष्टगंध लावीत; आणि अगदी गरीबांच्या असत, त्यांना नुसंतच हळदीकुंकू देत!''[१] हळदीकुंकू कार्यक्रमाशी स्त्रियांचे एक भावनिक नाते जडलेले असते. त्यामुळे या कार्यक्रमाचे आमंत्रण आल्यावनंतर सहजासहजी ते नाकारले जात नसे. अर्थातच कार्यक्रमाला सर्व स्तरातील स्त्रिया आवर्जून एकत्र येत पण तेथेदेखील आर्थिक सामाजिक स्तराच्या जाणिवा मिटत नसत. परिणामी या मंगल प्रसंगीदेखील भेदभाव केला जाई. त्या कार्यक्रमाचे स्वरूप स्नेहाने एकत्र येणे हा नसून आर्थिक सुबत्तेचे दर्शन घडविणे इथपर्यंतच मर्यादित होता. अशा वेळी भिन्न धर्मीय, भिन्न जातीय आणि भिन्न आर्थिक स्तराच्या स्त्रियांना एकत्र आणण्याची आणि भेदभावविरहीत सन्मानपूर्वक समतेची वागणूक देण्याचा विचार सावित्रीबाईंच्या मनात चमकला. हा विचार अंमलात आणण्यासाठी हळदीकुंकू कार्यक्रमाचा

सावित्रीबाईंनी मोठ्या कल्पकतेने उपयोग करुन घेतला होता. १८५२ मध्ये त्यांनी महिला सेवा मंडळाची स्थापना केली होती. या मंडळाच्या सचिव सावित्रीबाई होत्या. पुण्याचे कलेक्टर जोन्स यांच्या पत्नी मिसेस जोन्स अध्यक्ष होत्या. या मंडळाने अनेक कार्यक्रम केले. या कार्यक्रमांचे प्रयोजन मनोरंजन हा नसून सामाजिक सुधारणा करणे, सामाजिक समस्यांचे निर्मूलन करणे हा होता. संक्रांतीनिमित्त हळदीकुंकू, कार्यक्रमाचे आयोजन सावित्रीबाईंनी केले होते. सर्व स्त्रियांना आपण वेगळ्या नव्हे तर एकच आहोत, आर्थिक, सामाजिक स्तर जरी वेगळा असला तरी त्यांच्यात आपल्यात स्त्री म्हणून जे साम्य आहे, शक्ती आहे त्याची जाणीव करुन द्यावी यासाठी ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. निमित्त संक्रांतीच्या हळदीकुंकू, कार्यक्रमाचे होते. त्यासाठी तीळ आणि गुळ देण्याची व्यवस्था केली होती. त्याहून वेगळपण या समारंभात असे होते की गरीब–श्रीमंत, उच्च–नीच या आर्थिक किंवा धार्मिक कारणाने कोणत्याही एखाद्या स्त्रीला सन्मानित किंवा अपमानास्पद अशी वागणूक न मिळता सर्वांना समान दर्जाचा मान मिळणार होता. त्यासाठी या कार्यक्रमाच्या निमंत्रणपत्रिकेचे वेगळेपण पाहणे इष्ट होईल. राजाराम सूर्यवंशी यांनी यातील मजकूर नमूद केला आहे. ''ता.१३–१–१८५२ रोजी पुणे कलेक्टरांच्या पत्नी मिसेस जोन्स यांचे अध्यक्षतेखाली सार्वजनिक तिळगूळ व स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व स्त्रियांनी आपल्या लेकी–सुनांना घेऊन यावे. समारंभ संध्याकाळी पाच वाजता आहे. कोणत्याही जातीच्या अगर धर्माच्या बायका आल्या तरी त्या एकाच जाजमावर बसतील. जातिभेद व पक्षपात न करता सर्वांना सारखेच धरुन हळदीकुंकू, लावण्यात येईल आणि तिळगूळ वाटण्यात येईल. महिला सेवा मंडळाच्या सेक्रेटरी या नात्याने समाजिक अभिसरणाला गती देणारे समतावादी आचरणाची हमी देणारे पत्रक सावित्रीबाई स्वतःच्या स्वाक्षरीने काढले होते. या समारंभाला शेकडो स्त्रियांनी उपस्थिती लावली होती. या कार्यक्रमाला वेगवेगळ्या स्तरातील वेगवेगळ्या जातीधर्माच्या स्त्रिया उपस्थित होत्या. या समारंभाला मिसेस जोन्स, सरस्वतीबाई सदाशिव गोवंडे, हणमंतीबाई अय्यावारु, राधाबाई नारायणराव लोखंडे, सावित्रीबाई अण्णासाहेब रोडे, अक्काबाई गणेश जोशी, उमाबाई सिद्धेश्वर शास्त्री इत्यादी अनेक महिला आल्या होत्या. या कार्यक्रमात एक पोते तीळ व दोन ढेपांचा गूळ एकत्र करुन वाटण्यात आला. उत्तम रीतीने पार पाडलेल्या या कार्यक्रमात आपले कार्य समजून समाजातील सर्व स्तरातील स्त्रियांनी सहभाग

घेतला.''[२] यावरुन सावित्रीबाईंची गुणग्राहकता, समाजसंग्रही वृत्ती दिसून येतेच पण त्याचबरोबर त्यांची प्रत्येक कृती व उक्ती सर्वसमावेशक समतावादाने प्रेरीत होती हे प्रकर्षाने दिसून येते. सारासार विचार करुन मनाला योग्य वाटते ती कृती करण्याचे धाडस व नेतृत्वगुणही यातून सहज प्रत्ययास येतात. कारण जाती–धर्माच्या भ्रामक कल्पनांत रमणारा आणि ज्ञानाचा वाराही अंगाला न लागलेल्या बहुसंख्य तसेच नवसुशिक्षित अल्पसंख्यकांचा तो काळ होता.

## ५.१.२ खादीची आद्य पुरस्कर्ती :

सावित्रीबाई आणि ज्योतिराव या दांपत्यांची विचारसरणी आधुनिक, उच्च होती मात्र राहणी अत्यंत साधीच होती. त्यांचा पोषाख खादीचा असे. साध्या राहणीचा आदर्श निर्माण करण्यासाठी सावित्रीबाई स्वतः चरख्यावर बसून सूत कातत असत. कोष्ट्याकडून हे कातलेले सूत त्या विणून घेत असत. त्याच्या खादीच्या साड्या त्या स्वतः वापरीत आणि याच साध्या वेषात त्या शाळेत जात व सार्वजनिक समारंभात सामील होत असत. ज्योतिरावही कातवलेल्या सुताचे कपडे वापरत असत. राजाराम सुर्यवंशी म्हणतात, '' महात्मा गांधीच्याही अगोदर खादीचा प्रत्यक्ष आचरणातून प्रचार–प्रसार क्रांतिज्योतीने केला आहे. महात्मा गांधीच्या पंच्याहत्तर वर्षे अगोदर या दांपत्याने खादीचा प्रयोग करुन प्रचार केलेला होता.''[३] अशाप्रकारे सावित्रीबाईंचे कार्य फक्त एका क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते. स्त्री–शिक्षणाबरोबर, गृहिणींसाठी त्यांनी सूतकताई योजना राबविली होती. आणि हे कार्य सर्वांपर्यंत जाण्यासाठी महिला सेवामंडळाची स्थापना केली होती, या मंडळाच्या वतीने त्या गरजू महिलांकडून सूतकताई करुन घेत. या महिलांकडून रजया शिवून विक्रिची व्यवस्था करत असत. अशाप्रकारे गरजू महिलांना दुपारच्या फावल्या वेळात सूतकताईचे काम करुन थोडेफार उत्पन्न मिळविता येत असे. म्हणजेच खादीच्या आद्य पुरस्कर्त्या म्हणून सावित्रीबाईंचे योगदान महत्त्वपूर्ण होते असे म्हणावयास हरकत नाही.

## ५.१.३ केशवपन पद्धती बंद करणे :

पतीचा मृत्यू कोणत्याही नैसर्गिक कारणाने किंवा अपघाताने झाला तरी पत्नीला पातिव्रत्य सिद्ध करण्यासाठी पतीच्या मागोमाग सदेह चितेवर चढावे लागे. या सती जाणाऱ्या पत्नीला 'देवी' प्रमाणे सजविले जाई, मान दिला जाई आणि ढोल ताशांच्या गजरात माणुसकीचा राजरोस खून करुन तिला स्वर्गप्राप्ती झाली असे मानत. ब्रिटीश राजवटीबरोबर 'सती' प्रथेतील क्रूरता लक्षात घेऊन ही पद्धत बंद करण्यात आली होती. पण मग सती न जाणाऱ्या विधवांना दुसऱ्या एका संकटाला सामोरे जावे लागे. तिला तीचा 'केशसंभार' जो तिच्या सौंदर्याचा, व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य घटक त्याचा त्याग करावा लागे. ब्राम्हण, शेणवी आणि प्रभू जातीत ही 'केशवपनाची' प्रथा होती. उच्चवर्णीय म्हणविल्या जाणाऱ्या समाजातच ही प्रथा होती. बालविवाह सर्रास प्रचलित असणे, वैद्यकीय सुविधांचा अभाव अशा एक ना अनेक कारणांनी अगदी नासमज कोवळ्या बालिकांना बालविधवापण वाट्याला येई. मग वय कोणतेही असो नवऱ्याच्या मृत्यूपाठोपाठ केशवपनाच्या अत्यंत लाजिरवाण्या प्रसंगाला विधवांना सामोरे जायला लागे. एवढेच नव्हे तर तिच्या खाण्यापिण्यापासून वस्त्रालंकारापर्यंत प्रत्येक बाबीवर कडक बंधने असत. केशवपनामुळे विद्रुप भासणाऱ्या चेहऱ्यामुळे मंगल कार्यात तिला निषीद्ध मानले जाईच. दरमहा वाढणारे केस कापण्यासाठी तिला अंधाऱ्या खोलीत न्हाव्यासमोर जावे लागे. हे पाहून सावित्रीबाई व ज्योतिरावांचे अंत:करण कळवळे. 'स्त्री–पुरुष तुलना' या पुस्तकात तर ताराबाई शिंदेंनी अख्ख्या पुरुषजातीला एवढे तर्कशुद्ध, रोखठोक प्रश्न विचारले आहेत की वर्षानुवर्षे हे प्रश्न स्त्री म्हणून होणाऱ्या अन्यायाविरुद्ध निरुत्तर करणारे, विचारप्रवण करणारे आहेत. सतीप्रथेविरुद्ध विचार मांडताना त्वेषाने ताराबाई शिंदे म्हणतात, ''स्त्रिया सती जाऊन तुम्ही त्यांच्या मागे गवऱ्या वळायला कां रहाता? तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्ही त्यांच्याबरोबर कां सती जाऊ नये बरें?''[४] स्त्रियांचे हाल पाहून संतापून त्या पुढे लिहीतात, ''...याकरिता बायकोच्या आधी तुम्हालाच त्या कुंडात टाकावे.''[५]

या प्रथेविरुद्ध ठोस कारवाई करायला हवी असे सावित्रीबाईंना वाटू लागले. स्वत:ला ज्ञानी समजणारे उच्चवर्णीयबौद्धिक हुशारी दाखवित असले तरी भावनिक पातळीवर असंवेदनशील होते असे म्हणायला हवे. कारण प्रत्येक घरात दूरच्या जवळच्या अशा विधवा अत्यंत भीषण जीवन जगत होत्या. वडील, सासरा, भाऊ, दीर या सर्वांच्या कर्मठपणामुळे

विधवांचे जीवन करपून जात होते. तथाकथित उच्चवर्णीय बांधवांना समजावून सांगणे तसे फारच अवघड होते. कारण त्यांच्या लेखी केशवपन प्रथा हा त्यांचा कैटुंबिक असा खाजगी, धार्मिक मामला होता. आणि कुणा उच्चवर्णियांकडून सल्ला मिळण्याऐवजी तथाकथित शूद्र जातीच्या व्यक्तीकडून दिला जाणारा उपदेश म्हणजे मोठा धार्मिक हस्तक्षेप होता. या समस्येवर उपाय तर शोधायलाच हवा होता. सावित्रीबाईंच्या प्रेरणेने उपाय करण्याचे ज्योतिरावांनी ठरविले.

न्हाव्यांची सभा घेऊन आपण आपल्या भगिनींवर वस्तरा चालविणे पाप आहे नव्हे अत्यंत अघोरी कृत्य आहे हे त्यांना पटवून दिले. एक विलक्षण हत्यार ज्योतिरावांनी वारपले ते म्हणजे संप. सावित्रीबाईंच्या प्रेरणेने ज्योतिरावांनी घडवून आणलेला न्हाव्यांचा संप हा अहिंसेच्या मार्गाने तीव्र निषेध व्यक्त करणारा पहिला संप होय. संप घडवून आणणे हीच मोठी वेगळी कल्पना होती. आजवरच्या विधवा इतिहासात कधी न घडलेली घटना समाजात संवेदनशीलता, परदु:खाशी सह-अनुभूती घेणारी होती. रुढी-परंपरांचा पुनर्विचार करण्यासाठी समाजाला नैतिक बळ प्राप्त होण्याच्या दृष्टीने क्रांतिकारी पाऊल होते. ज्यावेळी धर्मसंस्थेचा पगडा समाजमनावर घट्ट होता. धर्माविरुद्ध, चालीरीतीवर आवाज उठविणे म्हणजे धर्मद्रोह होता. त्या काळात आपल्या जातीपुरता संकुचित विचार न करता संपूर्ण स्त्रियांच्या दु:खमुक्तीचा विचार फुले दांपत्याने केला.

१४ एप्रिल १८९० रोजी कॅम्प मैदानात सभा भरवली गेली. या सभेत नाभिक प्रतिनिधी हजर राहिले होते. जी स्त्री त्यांच्या जाती-पातीची नव्हती. अशा भगिनींसाठी बंधुभावनेने नाभिकांमध्ये वेदना जाणवायला ज्योतिरावांनी सहसंवेदना जागृत केली होती. या सभेत नारायण मेघाजी लोखंडे, भालेकर, अय्यावारु या सत्यशोधक मंडळी होत्या. इतर आर्य समाजाची व प्रार्थना समाजाची मंडळी होती. केशवपनाच्या क्रूर प्रथेविरोधात भाषणे झाली. बाबाजी मोरे यांनी केशवपनाच्या विरोधात असलेला निबंध वाचला. सभा चांगल्याप्रकारे यशस्वी झाली. या संपाची वार्ता इंग्लंडला पोहोचली. तेथील महिलांनी भारतीय नाभिक बांधवांनी मानवतेचे कार्य हाती घेतल्याबद्दल भारतात अभिनंदनाची पत्रे पाठविली.

जातीपातीच्या लौकिक बंधनांपलिकडे जाऊन मानवतावादी समानतेची ओळख सावित्रीबाईंनी करुन दिली. फक्त विशिष्ट जातीपुरता नव्हे तर संपूर्ण स्त्रियांच्या दास्य मुक्तीचा विचार केला.

### ५.१.४ अस्पृश्यांसाठी घरचा हौद खुला केला :

सर्व मानवप्राण्यांना विश्वबंधुत्वाच्या पातळीवर पाहण्याची अलौकिक दृष्टी फुले दांपत्याला लाभली होती. गावकुसाबाहेर पशुवत जीवन जगणाऱ्या अस्पृश्यांना ज्योतिराव आणि सावित्रीबाईनी प्रथम माणूस म्हणून पाहिले. पेशवाईत अस्पृश्यांना अमानुष वागणूक मिळत होती. फुले यांच्या काळातही हा छळ चालू होता. अस्पृश्यांना सार्वजनिक विहिरीवर पाणी भरू दिले जात नसे. सावित्रीबाई व ज्योतिराव यांनी १८६८ साली स्वत:च्या राहत्या घरातील विहीर अस्पृश्यांसाठी पाणी भरण्यास खुली केली. सावित्रीबाई आणि ज्योतिराव पुन्हा एकदा समाजाच्या विरोधात गेले. हा विरोध क्रांतिशील होता, विधायक बदल घड्वून आणणारा होता. आपल्याच धर्मातील आपल्यासारख्याच माणसाला दुसरा माणूस अस्पृश्य करतो आणि पाण्यावाचून तडफडायला लावतो ही माणुसकी तर नाहीच पण खरा धर्मही नव्हे. पण यालाच धर्म मानून समाज जगत होता. धर्माधिष्ठित जातीयतेच्या नावाखाली समाज त्या काळी माणसाचे माणुसपण ओरबडत होता, जगणे हिरावून घेत होता. अस्पृश्यांना गावकुसाबाहेर अत्यंत दरिद्री आणि अपमानास्पद जीवन जगावे लागत असे. पेशवाईचा कालखंड अभ्यासला तर मिळणारी माहिती अंगावर शहारे आणणारी आहे, संवेदनशील व्यक्तीला भयचकीत करणारी आहे. अस्पृश्यांवर एवढा अन्याय, अत्याचार आणि लाचारीची परिस्थिती होती की अन्न–पाणी यापैकी 'पाणी' या आंत्यतिक मूलभूत गरजेसाठीही त्यांना दारोदार हिंडावे लागे. विहिरीतून स्वत: पाणी घ्यावे तर अस्पृश्याने तिथे जाणे, स्पर्श करणे याला सक्त मनाई होती. बाटाबाटीच्या, शुद्धशुचितेच्या भ्रामक कल्पनांचे गारुड समाजनावर एवढे घट्ट होते की, चुकून एखाद्याला अस्पृश्यांच्या ह्या परिस्थितीविषयी कणव वाटली तर तशी कृती केल्यास जातीबाहेर टाकण्याची भीती असे. धर्मद्रोही म्हणून तो जननिंदेस पात्र होई. जातीसंस्था एवढी प्रबळ होती की अनेक सुधारक म्हणविणाऱ्यांना जरी काही गोष्टी अजिबात पटल्या नाहीत तरी त्यांचे रोटी–बेटी व्यवहार बंद करुन जातीबाहेर टाकणे या प्रकारची विलक्षण धास्ती त्यांच्या मनात

असे. पेशवाईत तर उच्चनीचपणाच्या कल्पनांनी एवढा कळस गाठला की, सत्य काय नि असत्य काय याचा ते विचारदेखील करु शकत नव्हते. आणि 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायाने उच्चवर्णीय स्वत:चे वर्चस्व गाजविण्यासाठी शूद्रातिशूद्रांच्या मूलभूत गरजांचाही विचार करायला तयार नव्हते. पेशव्यानंतर इंग्रजांच्या आगमनाने फुलेकालीन परिस्थितीत शूद्रातिशूद्रांच्या स्थितीत विशेष फरक पडला नव्हताच. पंढरीनाथ पाटील म्हणतात, ''त्यावेळी परिस्थिती किती नाजूक होती याची कल्पना आहेच. अस्पृश्यांच्या नुसत्या सावलीचा विटाळही कोणास चालत नसे. तर मग अस्पृश्योद्धार झाला पाहिजे असे तोंडाने कबूल करणार तरी कोण? ज्योतिराव बोलत त्याप्रमाणे कृतीही करीत, आणि म्हणूनच आधुनिक सुधारकात आज त्यांची मुख्यस्थानी गणना होते. ज्योतिरावांनी आपल्या विहिरीवर व हौदावर पाणी भरण्याकरिता इ.स. १८६८ साली अस्पृश्य लोकांना परवानगी दिली.''[६] अस्पृश्य वर्गाकरिता पहिली शाळा स्थापन केल्यापासून ज्योतिराव स्पर्शास्पर्श पाळीत नव्हते. अस्पृश्यांच्या वस्तीत फिरुन लोकांनी अस्पृश्यांचा विटाळ पाळू नये. त्या विषयावर सावित्रीबाई व ज्योतिराव लोकांबरोबर वादविवाद करीत त्यामुळे शेजारीपाजारी, भाऊबंद, सोयरेधोयरे व इतर मंडळी फुले दांपत्याचे म्हणणे पटवून घेण्यास तयार होईना, हे काम न सोडल्यास आम्ही तुमच्यावर बहिष्कार घालू असा धाकही घालून पाहिला. पण सावित्रीबाई व ज्योतिराव आपल्या मतावर ठाम होते. त्यामुळे याचा त्रास एकट्या ज्योतिरावांनाच नव्हे तर सावित्रीबाईंनाही होत होता. बाहेरच्या समाजाची नाराजी तर होतीच पण स्वत:च्या हक्काच्या माहेरच्या माणसांबरोबरही सावित्रीबाईंना शीतयुद्धाला तोंड द्यावे लागले. त्यांच्या इ.स. १८५६ मध्ये लिहिलेल्या पत्रात तर त्यांच्या सख्ख्या भावालाही या कार्याचे मोल न समजल्याने तो नाराज झाल्याचे स्पष्ट होते. सावित्रीबाई म्हणतात, ''भाऊ म्हणाला, तू व तुझा नवरा वाळीत असून उभयता महारमांगादी अंत्यजाकरता जी कार्ये करता ती पतित असून आपल्या कुलास बट्टा लावणाऱ्या आहेत. यास्तव सांगतो की, तुम्ही नवरा–बायकोने जाती रुढीस अनुसरुन त्याप्रमाणे आचरण करावे.''[७] भावाच्या आपल्या कार्यावरील प्रतिक्रियेबद्दल सावित्रीबाईंनी त्याच्या मताचे खंडन करताना मोठी अचूक आणि मार्मिक उदाहरणे देऊन त्याला निरुत्तर केले. त्या पुढे म्हणतात, ''तू शेळी, गाय यांना जवळ घेऊन कुरवाळतोस, नागपंचमीस विषारी नाग पकडून त्यास दूध पाजतोस. महार मांग हे तुझ्या सम मानव असतात. त्यास अस्पृश्य समजतोस त्याचे कारण

सांग?''[८] म्हणजेच फक्त ज्योतिराव एखादी कृती करतात म्हणून त्याही त्याचे अनुकरण करत नव्हत्या तर सारासार विवेकबुद्धी आणि व्यापक मानवतावाद मनात ठेवूनच सावित्रीबाईंचे कार्य अखंड चालू होते हे स्पष्ट होते. न ऐकवणारे वाग्बाण आणि अपमानकारक वागणे या कटू परिस्थितीत रुढीपरंपरेविरुद्ध, अशा समाजव्यवस्थेविरुद्ध सावित्रीबाईंनी सामाजिक क्रांतीची बीजे रोवली.

सावित्रीबाई व ज्योतिराव यांच्या ज्ञानदानातूनच 'मुक्ता साळवे' सारख्या विद्यार्थिनी समाजात निर्माण झाल्या. १८५५ साली चौदा वर्षाच्या मुक्ता साळवे या विद्यार्थिनीने निबंध लिहिला हा मराठी अक्षरवाङ्मयातला श्रेष्ठ निबंध म्हणून गणला जातो. अस्पृश्यांच्या स्थितीवर बोलके भाष्य करणारी आधुनिक दलित साहित्याची ती सुरुवात होती.

## ५.१.५ बालहत्या प्रतिबंध गृह

भारताला एक सुंदर सांस्कृतिक वैभव मिळालेले आहे. माता, पिता आणि गुरु यांचा आदर करणारी अतिथीचा सन्मान करणारी भारतीय संस्कृती आहे. मातृत्वाचे गोडवे गाणारी अनेक सुभाषिते, म्हणी आजही प्रचलित आहेत. पण याला एका कटुसत्याची किनार आहे. ते कटुसत्य म्हणजे ज्या मातृत्वाचे गोडवे गायले जातात. ज्या मातृत्वाअभावी स्त्री जीवनाची सार्थकता सिद्ध होत नसे ते मातृत्व कोणत्या परिस्थितीत प्राप्त होते त्यावर त्याचे मांगल्य किंवा अमांगल्य ठरत होते.

स्त्री–जीवनात अपत्याच्या आगमनाने येणारी आनंदवर्षा फक्त एका वेगळ्या परिस्थितीत अंगारवर्षा बनून जात असे. कारण त्याकाळी बालविवाहाची प्रथा रुढ होती. योग्य उपचाराअभावी, औषधोपचाराअभावी किंवा अंधश्रद्धेमुळे बालमृत्यूचे प्रमाण अधिक होते. अर्थातच यामुळे बालविवाहाचे प्रमाणही समाजात वाढत होते. बालविधवांची करुण, दारुण अवस्था उच्चवर्णीय समजणाऱ्या समाजात घरोघरी पाहायला मिळत असे. पण त्या चिमुरड्यांविषयी सहानुभूतीच नव्हे तर माणुसकी म्हणून गोड शब्दांनाही त्या मुकल्या होत्या, त्यांचे बालपण अकाली खुडले जात होते. त्याकाळी उच्च समजल्या जाणाऱ्या ब्राह्मण समाजात विधवांचे पुनर्विवाह करण्याची परवानगी नव्हती. बालविधवांनाही ही परवानगी नव्हतीच. धर्माने पुनर्विवाहाची मुभा फक्त पुरुषवर्गालाच दिलेली होती. अगदी एका पाठोपाठ कितीही पत्नींचे

निधन झाले तरी विधुर पतीला कोणतीही बंधने नव्हती. पुनर्विवाहाला बंदी नव्हती. धर्माच्या नावाखाली ही अघोरी प्रथा चालू होती. त्यामुळे बालवयात भातुकली खेळण्याच्या काळात बाहुलीऐवजी बाशिंग आणि वयात यायच्या आत वैध्यव्य पदरी पडे. समाज, कुटुंब, सासरकडचे, माहेरचे सारे लोक अवतीभवती असून या विधवा एकाकी जीवन जगत असत. सण समारंभात मोलकरणीसारखे राबायचे मात्र सहभाग घ्यायचा नाही कारण फक्त एकच की तिच्या पतीचा मृत्यू तिच्या आधी झाला. आणि त्या मृत्यूला त्याच्या पत्नीला मग अजाण असो की जाणती जबाबदार, धरली जाई. तिचे दर्शन अशुभ मानले जाई. सौंदर्याचे प्रतिक असलेला केशसंभार न्हाव्याकरवी दरमहा खरडून काढला जाई. चांगले दिसणे, चांगले खाणे, चांगले राहणे या सवर्य गोष्टींपासून विधवेला दूर–दूर ठेवले जाई. जिवंतपणी मरणयातना भोगत विधवांना मृत्यूची वाट पाहत नीरस जीवन कंठावे लागत असे. अशा परिस्थितीत कधी तारुण्यसुलभ भावनांमुळे तर कधी त्यांच्याच घरातील पुरुषांकडून बालवयात वैधव्य प्राप्त झालेल्या अनेक मुलींवर अत्याचार होत असत. यामुळे अत्याचाराने लादलेले मातृत्व त्या विधवांच्या नशिबी येत असे. निसर्गाने स्त्रीला बहाल केलेले. सृजनाचे – नवनिर्मितीचे अर्थातच मातृत्वाचे वरदान विधवा स्त्रियांसाठी शाप बनून येई. ज्या परिस्थितीत तिला हे मातृत्व लाभे त्यामुळे ती विधवा दोनपैकी फक्त कोणताही एक पर्याय निवडत असे, तो म्हणजे एक भ्रूणहत्या आणि दुसरा आत्महत्या. हा घोर अपराध केवळ समाजातील निष्ठुर परिस्थिती आणि संवेदनशील अशा डोळ्यांवर कातडे ओढून बसलेल्या माणसांमुळे होई. संस्कृतीचा व धर्माचा टेंभा मिरविणाऱ्या कोणत्याही धर्मरक्षकास त्याची कीव येत नव्हती. काही पापभीरु विधवा गरोदर स्त्रिया सामाजिक परिस्थितीला घाबरुन व आपल्या घराण्याची अब्रू जाऊ नये म्हणून आत्महत्या करुन आपल्या जीवनाचा शेवट करीत मानवजातीला काळिमा फासणाऱ्या घटना समाजात सर्रास घडत होत्या. हजारो नवजात शिशू आपल्याच जन्मदात्यांकडून मारले जात होते किंवा या नवजात शिशूच्या जन्माअगोदर ती माता कोवळ्या गर्भासह आत्महत्येचा मार्ग जवळ करीत होती. परंतु त्यांची दखल स्वत:ला सुसंस्कृत व धर्मरक्षक म्हणवून घेणाऱ्या समाजाकडून घेतली जात नव्हती.

ज्योतिरावांसारख्या मानवतेच्या पुजाऱ्याचे अंत:करण ही स्थिती पाहून हेलावे. या परिस्थितीची, अडल्यानडल्या विधवा गरोदर स्त्रियांची केविलवाणी परिस्थितीची चर्चा त्यांनी

त्यांच्या पत्नी सावित्रीबाई यांच्याशी केली. कारण ज्योतिरावांना विधवांच्या या नाजुक प्रश्नावर आपल्या सहचारिणीविना, सावित्रीबाईंविना मार्ग काढता येणे अशक्य होते. आपल्या कुटुंबाशी संबंध नसणाऱ्या अगदी भिन्न जातीतील असताना त्यांची दु:खे सहवेदना जाणवणारी संवेदना सावित्री आणि ज्योतिबा या दांपत्याच्या अंगी होती. म्हणूनच स्वकियांचा रोष ओढवून, स्वत:चा कोणत्याही स्वार्थ न पाहता केवळ मानवतेच्या उच्चतम ध्येयाकडे वाटचाल करुन विश्वबंधुत्वाचा आदर्श अगदी स्वत: तोटा सहन करुन समाजापुढे ठेवला. पाप–पुण्याचा हिशोब, धर्म–अधर्माची चर्चा या सगळ्या गोष्टी धडाधड नाकारुन एक माणूस म्हणून सावित्री व ज्योतिराव यांनी स्वत:च्या घरात विधवांना आसरा दिला आणि हा आश्रय गुपचुप नव्हे तर चांगली जाहिरात करुन दिला. या जाहिरातीने अनेकांची झोप उडविली तर अनेक नवजात शिशूंना हक्काचा झोपाळा दिला. हजारो विधवा तरुण स्त्रिया व हजारो नवजात शिशू या वाचविण्याचा व नवजीवन देण्याचा संकल्प फुले दांपत्याने केला. राम कांडगे म्हणतात, ''समाजाने पतित व पापी व्यभिचारी म्हणून तिरस्कृत ठरविलेल्या, अत्याचाराने मातृत्व लादलेल्या व अनवधानाने मोहाला बळी पडून वाकडे पाऊल पडलेल्या, समाजाच्या दृष्टीने नीतिभ्रष्ट व पतित स्त्रियांचा वाली होण्याचे साहस या देशात ज्योतिरावांनी आपल्या विचाराने व सावित्रीबाईंनी प्रत्यक्ष आपल्या कृतीने पहिल्याप्रथम केले. जगातील कोणत्याही संत महात्म्याने मानवतेसाठी केलेल्या महान कार्याएवढेच महान कार्य ज्योतिराव व सावित्रीबाई यांनी केले.''[९] खरोखरच हे काम भावनिक, सामाजिक व आर्थिक सर्व स्तरांवर एकाचवेळी करावे लागत असल्याने साहसाचे तर होतेच पण त्यातून कोणत्याही प्रकारचा लाभ फुले दांपत्यांना होणार नव्हताच. तरीही त्यांच्या सेवाभावाने, निर्लोभी वृत्तीने एक सामाजिक परिवर्तन, एक सामाजिक क्रांती घडून आली. कारण विधवांच्या भ्रूणहत्याला किंवा आत्महत्या टाळण्यासाठी ज्योतिरावांच्या विचारातून आणि सावित्रीबाईंच्या अथक प्रयत्नातून, कृतीतून पुणे येथे इ.स. १८६३ मध्ये ''बालहत्या प्रतिबंध गृह'' स्वत:च्या राहत्या घरात स्थापन केले. यापूर्वी असा उमाळा, असे निर्लोभी प्रेम एखाद्या वाट चुकलेल्या विधवेच्या वाट्याला आले नव्हते कारण सामाजिक नीतिमत्तेच्या संदर्भात स्त्रीला सर्वस्वी एकटीला जबाबदार धरले जाते, याची पूर्ण जाणीव सावित्रीबाई व ज्योतिराव या दांपत्याला होती. म्हणूनच ब्राह्मण विधवांना अपकीर्ती, भ्रूणहत्या यांपासून परावृत्त करण्यासाठी व पोलिसी कारवाईपासून वाचवण्यासाठी

सावित्रीबाईंच्या प्रत्यक्ष सहभागाने ‘बालहत्या प्रतिबंध गृह’ ची स्थापना करण्यात आली. याची माहिती समाजाला मिळण्यासाठी पुणे शहरात घराघरांवर जाहिरात लावण्यात आली. त्या जाहिरातीतील मजकूर मोठा धाडसी व लक्षवेधी होता. जगावेगळ्या जाहिरातीतील मजकूर नमूद करताना राम कांडगे म्हणतात, ‘‘तो मजकूर होता, काळे पाणी टाळण्याचा उपाय – विधवा भगिनींनो अज्ञानपणाने वा मोहाने वाकडे पाऊल पडून अथवा अत्याचाराने गर्भ राहिला असेल, तर ज्योतिराव फुले यांच्या राहत्या घरी येऊन सुरक्षितपणे बाळंत व्हा. बाळंतिणीचे नाव गुप्त ठेवण्यात येईल. हवे असल्यास मूल घेऊन जा, नको असल्यास ठेवून जा, हे तुमच्या खुशीवर अवलंबून राहील. त्यांचा सांभाळ आम्ही करु.’’[१०] या जाहिरातीत होता एक आश्वासक आधार, बेधडकपणा आणि तितकाच धाडसीपणा.माणूस म्हणून कदाचित तुम्ही चुकला असाल पण मी तुमच्या पाठीशी आहे नव्हे सर्व चिंता सोडा, नव्याने आयुष्य सुरु करा, आत्महत्या करु नका भ्रूणहत्या करु नका. त्याची सर्व जबाबदारी ज्योतिराव आणि सावित्रीबाई घेतील. विधवा भगिनींनो निश्चिंत राहा असे तर फुले दांपत्याला यातून सांगायचे असेल असे वाटते. पण या नि:स्वार्थ, परोपकारी कृतीची देखील सनातन्यांकडून निंदा घडली, विरोध झाला. ‘नामस्मरणाचा रोग’ या मार्मिक लेखात पु.ल. देशपांडे म्हणतात. ‘‘भाकडकथांना धर्मग्रंथ आणि चातुर्वर्ण्यावर आधारलेल्या रुढींनाच ‘धर्म’ मानणाऱ्या प्रवृत्तीविरुद्ध ज्योतिबा नुसते प्रखर लेख लिहून थांबले नाहीत. ज्या दुदैवी ब्राह्मण विधवांना कधी फूस लावून तर कधी जबरदस्तीने त्यांच्या शरीरांचा उपभोग घेऊन केरपोतेऱ्यासारखे फेकून दिलेले होते. त्यांच्यावर नुसत्या विलापिका लिहीत बसले नाहीत. त्या अभागी स्त्रियांची त्यांच्या पत्नीकडून बाळंतपणे केली. एवढेच नव्हे तर अशी बाळंतपणे केली जातील असा बोर्ड स्वत:च्या घराबाहेर लावला. त्या माऊलींची सुटका करणाऱ्या सावित्रीबाई फुले ह्यांचे कार्य हे अधिक जोखमीचे होते. कारण त्यांच्या ह्या कार्याला विरोध करुन त्यांचे जीवन असह्य करणारे कुणी परकीय राज्यकर्ते नव्हते. धर्मांध स्वकीय होते. अशा प्रकारची मानवतेची साक्ष पटवणारी एक कृती मानवतेवरच्या शंभर व्याख्यानांहून अधिक श्रेष्ठ असते.’’[११] कारण ज्या भूतदयेने, वात्सल्याने ज्योतिराव व सावित्रीबाई यांनी त्या विधवांना त्यांच्या लहानग्यांसह स्वीकारले ते पाहता बालहत्येपासून व आत्महत्येपासून कितीतरी भगिनींची त्यांनी सुटका केली. पुढे या बालहत्या प्रतिबंध गृहापासून प्रेरणा घेऊन लालशंकर, उमिया शंकर व मामा परमानंद ह्यांनी व

प्रार्थना समाजाने पंढरपूर येथे असेच गृह चालविले. ज्योतिराव व सावित्री यांनी चालविलेल्या बालहत्या प्रतिबंध गृहात प्रथम जन्माला आलेल्या मुलाने ज्योतिरावांना व सावित्रीबाईंना लळा लावला. अवांच्छित मातृत्व लादलेल्या विधवा स्त्रियांना ज्योतिरावांनी आपल्या स्वतःच्या राहत्या घरात एखाद्या माहेरवाशिणीला मातापित्यांनी बाळंतपणाच्या वेळी द्यावा तसा प्रेमाने आश्रय दिला. सावित्रीबाई मोठ्या प्रेमाने व आईच्या ममतेने त्यांच्या बाळंतपणाची सर्व व्यवस्था मोठ्या अगत्याने स्वत: करीत. रा.ना. चव्हाण म्हणतात. ''बालविधवा काशी ही ब्राह्मणकन्या होती. ही यशवंताची आई. हिचे पूर्ववृत्त व उत्तरवृत्त अल्पसल्पच उपलब्ध आहे. श्री. आचार्य श्रीपाद केळकर (पुणे) हे फुल्यांवर कादंबरी लिहित होते. त्यांच्या मते काशीबाई ही पुण्याच्या नातू घराण्यातील होती. काशीबाई ज्यातिरावांच्या आश्रयास येऊन राहिली होती. सावित्रीबाई यांच्या उदार व सहिष्णू स्वभावामुळेही काशीबाईस वैधव्य व निराश्रितपणा सह्य झाला व दुर्दैवी आयुष्य कंठणे सोपे गेले. सावित्रीबाईंना मूलबाळ नव्हते, बालकाश्रमातील मुले म्हणजे त्यांची लेकरेच होती हे काम फार अवघड असते. फारच थोडे हे कार्य अंगावर घेतात.''[१२] या बालहत्या प्रतिबंध गृहाचे काम सोपे नव्हते. सावित्रीबाईंना यासाठी अथक परिश्रम घ्यावे लागले. मातेच्या ममतेने आश्रमातील विधवांचे बाळंतपण त्या करीत, त्यांना धीराच्या गोष्टी सांगत, सुखदु:खाशी हितगुज करीत नवी दृष्टी देत होत्या. त्यामुळे सावित्रीबाईंचे घर अशा विधवांना हक्काचे माहेर झालेले होते. त्या घराचा वेगळाच ऋणानुबंध त्या अनुभवत होत्या. जपत होत्या. कधी कधी अनाथ मुले गुपचूपपणे गृहाच्या दारात आणून सोडली जात. त्यांचे संगोपनही सावित्रीबाई मोठ्या प्रेमाने करीत. आश्रमातील हताश निराश झालेल्या बालविधवांचे अनुभव अंगावर शहारे आणत. त्यांच्यावरील अत्याचाराच्या क्रूर दु:खदायक कथा ऐकताना सावित्रीबाई कष्टी होत. पण पुढच्याच क्षणी त्या दु:खी विधवामातांचे अश्रू पुसायला सावित्रीबाईंचे प्रेमळ हात पुढे सरसावत. त्यांना आधार देताना त्या सावित्रीबाईंच्या लेकी बनल्या, जीवाभावाच्या मैत्रिणी बनल्या आणि रक्ताच्या नात्यापेक्षा घट्ट नाती त्यांच्यात विणली गेली.

हे बालहत्या प्रतिबंध गृह चालविताना सावित्रीबाईंना कमालीचे कष्ट उपसावे लागत. पहाटेपासून रात्रीपर्यंत दिवस वेगवेगळ्या कामाच्या धांदलीत भरकन निघून जाई. गृहातील त्या नवजात शिशूंचं संगोपन करताना त्या देहभान विसरत. रावसाहेब चोले म्हणतात,

''सावित्रीबाईंनी दायींच्या नव्हे तर आईच्या ममतेने काशीबाईचे बाळंतपण केले. जातीपातीचे तथाकथित निर्बंध झुगारुन देऊन काशीबाईच्या पुत्राला यशवंतला दत्तक घेतले. त्यांच्यावर मायेची पाखरन करुन लाडात त्याचे संगोपन केले.''[१३] म्हणूनच सावित्रीबाईंच्या रुपाने सामान्य वाटणाऱ्या पण अतिशय असामान्य स्त्रीरत्नाचा परिचय घडतो तो वेगवेगळ्या प्रसंगी त्यांनी दाखविलेल्या जगावेगळ्या कार्यातून. एक क्रांतिकारी विचारांची पहिली समाजसेविका विविध प्रसंगी एकाच वेळी मृदु ममतेचे आणि खंबीरतेचेही दर्शन घडविते, ती त्यांच्या जीवनातील घटनांमुळेच नियतीने जरी लौकिकार्थाने माता बनल्या नाही तरी शेकडो विधवा स्त्रियांची बाळंतपणे विनातक्रार तन–मन–धन खर्चून नि:स्वार्थी प्रेम देणारे माहेर त्यानी आपल्या राहत्या घरातच निर्माण केले. या विधवांच्या पोटी जन्मलेल्या शेकडो निष्पाप लेकरांची माता बनून सावित्रीबाईंनी मातृत्वाचे गौरीशिखर काबीज केले असे म्हणायला हरकत नाही. कारण अखिल भारतवर्षात असे कार्य कोणी केले नाही म्हणून मानवजातीच्या इतिहासात या महान कार्याला तोड नाही.

फुले दांपत्याने काळाच्या पुढे जाऊन जातीपातींची पर्वा न करत अमांगल्याचे मांगल्यात रुपांतर करुन 'यशवंत' या दत्तकपुत्राला आपल्या अंगाखांद्यावर मुक्तपणे बागडू दिले. स्वपुत्राचे अधिकार देऊन उच्चशिक्षित केले. एवढेच नव्हे तर सुस्वरुप वधू 'राधा' हिच्याबरोबर विवाह करुन देऊन आई–बाबांची सर्व कर्तव्ये दक्षतेने पार पाडली. सावित्रीबाई आणि ज्योतिराव यांच्या सहजीवनातील हा एक अतिशय विलोभनीय पैलू होता.

## ५.१.६ बालहत्या प्रतिबंध गृह, दुसरी बाजू :

त्याकाळी ख्रिस्ती मिशनरी सर्व जातीधर्मांच्या लोकांमध्ये मिसळत, सेवाभावी वृत्तीने काम करत. पण यात एक छुपा स्वार्थ लपलेला असे. किंवा मानवतेच्या भावनेतून जरी हे मिशनरी काम करीत असले तरी या मिशनऱ्यांचे अंतिम ध्येय ख्रिस्ती धर्माचा प्रचार व प्रसार हेच होते. या ख्रिस्ती मिशनऱ्यांनीही काही ठिकाणी आश्रम सुरु केलेले होते. या आश्रमात दाखल होणाऱ्या त्याची मदत घेणाऱ्या व्यक्तींवर ख्रिश्चन धर्माच्या विचारांचा पगडा बसून भावी काळात त्या ख्रिश्चन धर्माकडे आकर्षित होत आणि ख्रिश्चन धर्म स्वीकारत असत.

ज्योतिरावांनी जरी ही संस्था विधवा गरोदर स्त्रियांसाठी काढली होती तरी त्याचा एक परिणाम कळतनकळत घडला. राम कांडगे म्हणतात, ''ख्रिस्ती मिशनऱ्यांनी काढलेल्या अनाथ आश्रमामध्ये बालके दाखल होण्याचे बंद झाले. अशाप्रकारे ज्योतिरावांनी कळतनकळत ख्रिस्तीधर्मप्रसाराला पायबंद घालून हिंदू धर्मावर एक प्रकारे उपकारच केलेले आहेत. अशा प्रकारचे उपकार कोणत्याही सनातन्यांकडून हिंदू धर्मावर झालेले नाहीत.''[१४] ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कार्याने भारावून जाऊन, हिंदुधर्मातील खुळचट रुढी परंपरेच्या स्तोमाला वैतागून कित्येक हिंदूधर्मीयांनी धर्मांतर करण्यास सुरुवात केली होती. अगदी गोरगरीब जनतेपासून ते सुशिक्षित उच्चभ्रूपर्यंत ख्रिस्ती धर्म वेगवेगळ्या कारणांनी येथील लोकांनी स्वीकारल्याची अनेक उदाहरणे आहेत. या पार्श्वभूमीवर ज्योतिराव व सावित्रीबाईंचे स्वधर्माविषयी आस्था राखण्याचे कार्य मोलाचे ठरते. कारण आपल्या धर्मात किती चांगल्या वाईट गोष्टी आहेत याची कल्पना या दांपत्याला होती तरी ज्योतिरावांनी जनतेला धर्मांतराचा सल्ला कधीही दिला नव्हता की सावित्रीबाईंनी बालविधवा आपल्या जातीच्या नव्हेत म्हणून त्यांची जबाबदारी टाळली नव्हती तर स्वेच्छेने, आनंदाने स्वीकारली होती. यातच सावित्रीबाईंचे मोठेपण सामावले आहे.

### ५.१.७ सत्यशोधक समाजाची पार्श्वभूमी :

समाजसुधारणेच्या कार्यात महाराष्ट्रात अनेक थोर समाजसुधारकांनी मोलाचे कार्य केले आहे. जनकल्याणार्थ, समाजप्रबोधनार्थ बद्धिप्रमाण्याचा पुरस्कार करणे व प्रभावीपणे समाजप्रगती करणे या प्रक्रियेत सनातनी आणि सुधारक हा संघर्ष नेहमीच घडलेला दिसून येतो. हजारो वर्षांच्या रुढी परंपरांचे भारतीय समाजमनावर गारुड होते. पेशवाईच्या पाडावानंतर आधुनिक विचारांचे वारे घेऊन आलेले नवे राज्य आणि नवे इंग्रज राज्यकर्ते आर्थिक, राजकीयच नव्हे तर धार्मिक बाबींवरही प्रभाव पाडू लागले होते. ख्रिस्ती धर्माचा प्रसार करताना रे.डॉ. विल्सन, रे. डॉ. मरे मिचेल यासारख्या मिशनरींनी हिंदू धर्मातील दोष दाखवून सर्वसामान्य जनतेला प्रभावित करण्यास सुरुवात केली होती. मिशनरी जेव्हा समाजातील अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य या समस्या त्यांच्यापरीने सोडवत होते, तेव्हा हिंदूधर्मातील कर्मठ धर्मपंडित जुन्या प्रथा–परंपरांना कवटाळून बसले होते. त्यामुळे त्यांचा झाला तर सर्वसामान्य जनतेला त्रासच होत असे. परिणामी मिशनरींच्या सहवासात आलेली

व्यक्ती ख्रिस्ती धर्म स्वीकारत असे. नारायण शेषाद्रि, रामकृष्ण मोडक, विष्णू करमरकर व बाबा पद्मजी अशी काही उदाहरणे सांगता येतील.

हिंदूधर्मातील जुनाट चालीरीती, रुढ आचार वर्तमान काळाशी किती विसंगत आणि दोषग्रस्त आहे, याची नवशिक्षितांना जाणीव झाली. एका वर्गाकडून जुन्या–नव्याचा पुनर्विचार आणि फेरमांडणी होऊ लागली. पारंपरिक भारतीय मूल्यांशी नव्या पाश्चात्य मूल्यांची सांगड घातली जाऊ लागली. त्यातून विविध समाजसुधारक आणि समाजसुधारणाविषयक संस्थांची निर्मिती झाली. तरुण पिढीला परधर्मात जाण्यापासून किंवा नास्तिक मतापासून रोखायचे असेल तर हिंदू धर्माचे शुद्ध स्वरुप त्यांच्यापुढे ठेवणे आवश्यक होते. त्यासाठी दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी 'परमहंस सभेची' स्थापना केली, एकेश्वरवाद, जातिभेद, मूर्तिपूजेला विरोध, पुनर्विवाहाला मान्यता इ. विचारांची बैठक या सभेला होती. पण समाजाविरुद्ध बंड करण्याचे धाडस नसल्यामुळे ही सभा दहा–बारा वर्षातच बंद पडली. पण परमहंस सभेच्या निष्ठावान सभासदांनी प्रार्थना समाजाची स्थापना केली. न्या. महादेव गोविंद रानडे यांनी प्रार्थना समाजाच्या माध्यमातून काम करण्यास सुरुवात केली. त्यांच्या विचारात नव्या–जुन्याचा मेळ होता. राज्यसत्ता परकीय असली तरी सुधारणेला मदत होते हे ते जाणून होते. न्या. रानडेंचा पिंड मवाळ पुढाऱ्याचा असल्याने कृती करायची वेळ येताच ते माघार घ्यायचे. त्यामुळे त्यांच्या कार्याला मर्यादा येऊन शिक्षित समाजाला सुधारणेचा संस्कार देण्यापुरते मर्यादित राहिले. याशिवाय ख्रिस्ती मिशनरींच्या धार्मिक आक्रमनाला तोंड देण्यासाठी काही हिंदू धर्माभिमानी पुढे आले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'निबंधमाले'तून कडव्या धार्मिक मतांचे समर्थन केले. विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी पारंपरिक वैदिक धर्मांचे समर्थन केले. त्यासाठी मिशनरींच्या अपप्रचाराला उत्तर देण्यासाठी सार्वजनिक सभा भरवून व्याख्यान व वादविवाद करण्यास सुरुवात केली. लोकहितवादी गोपाळ हरि देशमुखांनी 'शतपत्रे' लिहिली. जुन्या धर्मकल्पना सामाजिक संस्था यांवर कठोरपणे टीका करुन इंग्रजी विद्या, धर्मसुधारणा पुनर्विवाह, बालविवाह, वर्गविचार, स्वदेशप्रिति अशा अनेकविध विषयांना स्पर्श करुन सामाजिक प्रश्नांना आपल्या लेखनातून वाचा फोडली. परंतु नंतरच्या काळात ते स्वत: बोलल्याप्रमाणे न वागल्याने त्यांच्या विचारांची धार बोथट झाली.

अशाप्रकारे महाराष्ट्रातील विविध सामाजिक, राजकीय, सुधारणावादी प्रवाहांना इंग्रजी संस्कृतीच्या संपर्कातून प्रेरणा मिळाली. विद्येचा प्रसार होताना 'धर्मा' चा खरा अर्थ लोकांना समजू लागला. त्यातून धर्मसुधारणेची चळवळ निर्माण झाली. समाजसुधारकांना सामाजिक, धार्मिक क्षेत्रात सुधारणा व्हावी असे जरी वाटत असले तरी कृती करण्यासाठी लागणारे धैर्य त्यांच्यापाशी नव्हते. पुष्कळदा त्यांच्या प्रतिपादनात व आचरणात फरक पडत असे. कारण या सुधारक म्हणवणाऱ्यांना सामाजिक बहिष्कारासारख्या शिक्षेला सामोरे जाण्याची भीती वाटत होती. म्हणून त्यांचे कार्य मूठभर उच्चवर्णीयांच्या सुधारणेच्या भोवतीच घुटमळत राहिले. बहुसंख्येने असलेला शूद्रातिशूद्र समाज या सुधारकांच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर राहिला. ख्रिस्ती मिशनरी व ब्रिटीश सरकार यांनी शूद्रातिशूद्र लोकांच्या प्रगतीसाठी जे प्रयत्न केले, त्यालाही मर्यादा पडल्या आणि हा समाज उपेक्षित राहिला. वरील सुधारकांपेक्षा कार्यक्षम समाजसुधारक म्हणून शूद्रातिशूद्र लोकांसाठी ज्योतिराव फुले यांनी कार्य केले. आणि त्यांच्याबरोबर अविश्रांतपणे त्यांची सजग सहचारिणी सावित्रीबाई फुलेंनेही मोलाची कामगिरी बजावली, हे फारच थोड्या प्रमाणात माहित आहे.

### ५.१.७.१ सत्यशोधक समाजाची स्थापना :

महात्मा ज्योतिराव फुले यांचे समकालीन सुधारक व त्यांच्या संस्थाकडून समाजपरिवर्तनाचे अपेक्षित कार्य होत नव्हते. त्यामुळे त्यांना ध्येयसिद्धीसाठी वेगळ्या चळवळीची गरज वाटू लागली. शूद्रातिशूद्र लोकांना अविद्येपासून मुक्त करुन त्यांना सदुपदेश करण्यासाठी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली गेली. वेगवेगळ्या क्षेत्रातील नामवंत मंडळी ज्योतिरावांकडे येत असत.त्यातून चर्चा, विचारमंथन घडत असे. तसेच त्यांनी अनेकविध प्रकारची पुस्तके, ग्रंथ यांचेही वाचन केले होते. त्यातूनच 'सत्' म्हणजे खरे, 'शोधक' म्हणजे शोधून काढणारे आणि 'समाज' म्हणजे मंडळ अशा अर्थाचे नाव देण्याचे ठरुन सत्यशोधक समाज स्थापन झाला. या सर्व घडामोडी ज्योतिरावांच्या राहत्या घरातच घडल्या. खरा धर्म सत्य, धर्मविषयक विविध कल्पना, श्रद्धा यांविषयी झालेल्या चर्चा सावित्रीबाईंच्या कानी पडत होत्या. एवढेच नव्हे तर या चर्चेत स्वत: सावित्रीबाई आपले मत निर्भीडपणे मांडत होत्या. शूद्रातिशूद्रांना दिली जाणारी वागणूक, सामाजिक स्थिती, आर्थिक

दुरावस्था आणि मानसिक गुलामगिरी एक ना अनेक विषयांवर विचारमंथन घडत होते. आणि या सर्व घडामोडी ज्योतिरावांच्या राहत्या घरात घडल्यामुळेच या घटनांचा साक्षीदार ज्योतिरावांची हितचिंतक मित्रमंडळी तसेच खुद्द सावित्रीबाईही होत्या. तुकाराम पिंजण याबद्दलची आठवण सांगताना म्हणतात, ''सत्यशोधक समाज ता. २४ सप्टेंबर सन १८७३ रोजी जुनागंज, घर नंबर ५२७ पुणे येथे महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाला.''[१५] सत्यशोधक समाजाच्या तत्त्वांमध्ये समानता, बंधुता, विद्याग्रहण, विद्यादान प्रसार आणि ईश्वराची भक्ती करण्यासाठी कोणत्याही मध्यस्थ किंवा दलाल किंवा धर्मगुरु यांची आवश्यकता नाही, अशाप्रकारच्या विश्वव्यापी बंधुत्वाचा संदेश यांचा समावेश होता. अर्थातच याचीही सुरुवात ज्योतिरावांनी स्वत:च्या घरातूनच केली होती.

### ५.१.७.२ सत्यशोधक समाजाच्या विवाहविधीचे स्वरूप :

विवाह हा मानवी जीवनातील महत्त्वाचा संस्कार, एक आनंददायी घटना मानली जाते. पण या विवाहप्रसंगी पुरोहित शूद्रांच्या लग्नामध्ये उपस्थित राहून वेगवेगळ्या प्रसंगी दक्षिणा घेत व शेवटी मांडवखंडणी घेत असत. त्यामुळे शूद्रांची खूप अडवणूक होत असे. हे शोषण थांबविण्यासाठी शूद्रांच्या लग्नात ब्राह्मण पुरोहितांची गरज नाही, शूद्रांची लग्ने शूद्रच लावतील अशी भूमिका ज्योतिरावांनी घेतली होती. पण मग त्या लग्नविधीसाठी शूद्रांना बंदी असलेल्या संस्कृत भाषेतील मंत्र स्वीकारण्याऐवजी स्त्री–पुरुष समानता दर्शविणाऱ्या मंगलाष्टका मातृभाषेत असायला हव्यात या विचारातून ज्योतिरावांनी स्वत: अर्थपूर्ण मंगलाष्टके रचली. सत्यशोधक समाजाचा साधा पण अर्थपूर्ण पूजाविधी इ.स. १८८७ मध्ये छापून प्रसिद्ध करण्यात आला.

या विवाहविधीत वेगळेपण होते. यातील मंगलाष्टके धर्ममार्तंडानी म्हणावयाची नसून स्वत: वधू–वरांनी अनुक्रमे एक–एक अशी दोनदा म्हणायची असतात. शेवटी लग्नाला उपस्थित असलेल्या सर्व स्त्री–पुरुषांनी एक मंगलाष्टका म्हणून शेवटच्या मंगलाष्टकाप्रमाणे उपस्थित सर्वच स्त्री–पुरुषांनी वधु–वरांना आशीर्वाद द्यावयाचा असतो. या लग्नामध्ये अक्षता म्हणून होणारी अन्नधान्याची नासाडी टाळून त्याऐवजी फुले उधळली जात असत. एकंदरीत स्त्री–पुरुष समानतेचा पुरस्कार करणारी, व्यापक जनहिताचा विचार करुन आर्थिक भार कमी करणारी सत्यशोधक विवाह पद्धती असली तरी एक मोठी अडचण या पद्धतीत होती.

पहिली अडचण म्हणजे ही पद्धत नेहमीच्या विवाहविधीला फाटा देणारी म्हणजेच पारंपरिक रीतीरीवाजांनुसार न होता नव्या आधुनिक पद्धतीचा स्वीकार करणारी होती व दुसरे म्हणजे उच्चवर्णियांच्या पारंपरिक मानसिकतेला धक्का देणारी होती. त्यांचे हक्काचे उत्पन्न बुडविणारी होती. शूद्रांचे आत्मसन्मान जागविणारी साधीच घटना दूरगामी परिणाम साधणारी होती. अर्थातच प्रवाहाविरुद्ध पोहणाऱ्याला पाण्याचा विरोध सहन करायची तयारी असावीच लागते. म्हणूनच समाजपरंपरेच्या प्रवाहाविरुद्ध जाऊन नुसत्या नवीन कल्पना मनात ठरवून हे घडणारे नव्हते. म्हणूनच नवकल्पनेला कृतीची साथ देण्यासाठी समर्थ साथीदाराची साथ ज्योतिरावांना हवी होती. ही समर्थ साथ सावित्रीबाईंच्या रुपाने ज्योतिरावांना लाभली होती.

सत्यशोधक समाजाचा अभिनव पद्धतीने पहिला विवाहविधी ज्योतिरावांनी सावित्रीबाईंच्या सहकार्याने पार पाडला. त्यांच्याकडे असणारा गरीब कामगार सीताराम जबाजी माळी आल्हाट याचा विवाह स्वत: ज्योतिरावांनी मंगलाष्टके म्हणवून घेऊन लावला. हा विवाह २५ डिसेंबर १८७३ रोजी साध्या पद्धतीने, कमी खर्चात मंगलमय वातावरणात संपन्न झाला. यामध्ये स्वत: सावित्रीबाईंनी पुढाकार घेतला होता. अर्थातच अक्षतांऐवजी फुलांची उधळण करण्यात आली आणि ब्राह्मण पुरोहिताला आमंत्रित न करता विनादक्षिणा व पुरोहिताविना हा विवाह झाला. ज्योतिरावांची मानवतावादी दृष्टी एवढी करुणामय व व्यापक होती की उपस्थित स्त्री–पुरुषांनी सामुदायिकपणे म्हणायच्या मंगलाष्टकात ते लिहितात.

''वृद्धा पंगु सहाय या मुलिमुला,
विद्या तया शिकवा।।
हर्षे वृष्टि करा फुलांची,
अवघे टाळी अतां वाजवा।।
शुभमंगल सावधान।।''[१६]

जीवनाच्या अत्यंत उत्कट आनंदाच्या क्षणी परदु:खाची जाण ठेवणारी ही मंगलाष्टका सत्य आणि सुंदर आहे. अशाप्रकारे विद्या, सामाजिक जाणीव, स्त्री–पुरुष समानता, स्त्री–पुरुष मर्यादा यांचे सार असलेली पती–पत्नीला समतेने वागविण्याची हमी देणारी मंगलाष्टके रचून सावित्रीबाई व ज्योतिरावांनी विवाहसंबंधाला व विधीला कालानुरुप पुरोगामी वळण दिले होते. असे अनेक विधी फुले दांपत्याने सत्यशोधक समाजातर्फे तयार केलेले होते. सार्वजनिक

सत्यधर्म हा खऱ्या अर्थाने शूद्र–अतिशूद्र बहुजनांचा व्हावा म्हणून या पुजाविधी तयार केल्या होत्या उदा. घरभरणीचा विधी करताना दक्षिणा देण्याऐवजी घर बांधण्यासाठी जे कामगार राबले त्यांना कपडे वगैरे देऊन पोटभर जेवण द्यावे व त्यांचा सत्कार करावा असे प्रतिपादन केले आहे. पण त्या काळी हा विवाह मोठा खळबळ माजविणारा ठरला. विनायक दुर्गे म्हणतात, ''ब्राह्मण पुरोहिताशिवाय विवाह ही त्या काळात एक मोठी धर्मबाह्य घटना समजण्यात येत असे. त्यामुळे पुण्यातील ब्राह्मण खवळून उठले.''[१७] सत्यशोधक समाजाच्या पद्धतीने विवाह करण्याच्या विधीला पुरोहितांचा विरोध ह्यांचा पिढीजात हक्क आणि कमाई किंवा दक्षिणा बुडविणारा म्हणून होता.

कोणत्याही जातीने कोणताही धंदा स्वीकारावा हा विचारच धर्मद्रोही मानला जात होता. म्हणूनच स्वत:च्या जातीचा किंवा ब्राह्मणेतर जातीतील विवाह विधी ब्राह्मणांनी न करता दुसऱ्या ब्राह्मणेतरांनी केल्यास त्यांना तीव्र विरोधाला सामारे जावे लागणार हे अगदी स्पष्ट होते. एवढेच नव्हे तर अशा तऱ्हेचे विवाह, ज्यामध्ये सत्यशोधक विवाहविधींचा वापर केला जाई असे लग्न, अमंगल, धर्मद्रोही असा प्रचार करण्यास सुरुवात केली होती. अशा वेळी सावित्रीबाईंनी आपल्या आजूबाजूला असणाऱ्या समाजात जागृतीचे कार्य सुरु केले होते. समाजात जागृतीबरोबर योग्य दिशा देण्याचेही कार्य त्यांनी केले. या विवाहप्रसंगीची साधी पद्धत, विवेकनिष्ठ भान, सामाजिक जाण आणि हुंडा–मानपान यांना हद्दपार केल्याने गरीब कुटुंबाचा बराच फायदा होत असे हे सावित्रीबाईंनी पटवून दिले होते. आपल्या संपर्कातील स्त्रियांना हे नवविचार पटवून, समजावून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचे मोठे काम त्यांनी केले. सत्यशोधक विवाह पद्धतीने विधी करुन पहिल्या विवाहप्रसंगी जिच्याबरोबर नवरा मुलगा म्हणजे सीताराम आल्हाटाचे लग्न होणार होते ती वधू ग्यानबा निंबणकर यांची मुलगी होती. पंढरीनाथ पाटील म्हणतात, ''श्री निंबणकर यांची बायको बजूबाई ही सावित्रीबाईची मैत्रिण होती. सावित्रीबाईंच्या सहवासाने बजूबाईसही समाज सुधारणेविषयी बरीच आस्था उत्पन्न झाली होती व त्यामुळे तिने आपल्या मुलामूलींना शाळेत शिक्षण देऊन त्यांची पौढपणी लग्ने करण्याचे ठरविले होते.''[१८] म्हणजेच सावित्रीबाईंच्या कार्याने, उपदेशाने प्रभावित होऊन अनेक स्त्रियांचे मतपरिवर्तन होऊन त्याही त्याप्रमाणे कृती करण्यास सिद्ध झाल्या होत्या आणि त्या काळात तर ही गोष्ट एवढी सहजसोपी नक्कीच नव्हती. कारण अशा पुरोहिताविना

विवाहापासून परावृत्त करण्यासाठी प्रसंगी बळाचा उपयोग केला जात असे. जातीपासून बहिष्कृत करण्याचाही धाक दाखविला जाई. म्हणूनच ह्या पार्श्वभूमीवर आज सहज वाटणारी घटना धाडसी होती. उघडपणे अशा विवाहाला पाठिंबा देणे म्हणजे स्वजातीय तसेच परजातीय दोहोंचा रोष ओढविण्यासारखे होते. म्हणूनच नुसते बोलून नव्हे तर कृतीयुक्त आश्वासन यातून मिळायला हवे या हेतूने समाजपद्धतीने लावलेल्या प्रथम विवाहाला सावित्रीबाईंनी स्वत: आर्थिक मदत दिली होती. पंढरीनाथ पाटील म्हणतात, ''या लग्नात रुसवारुसवी अगर कोणतेही निरर्थक व फाजील धर्मविधी करण्यात आले नाही. लग्नप्रीत्यर्थ सर्व मंडळीस पानसुपारी देण्यात आली. लग्न गरीबाचे असून वधूवरास प्रथम संसार करण्यास काही मदत द्यावी या हेतूने सौ. बजूबाई निंबणकर यांनी आपल्या जावईबुवास रु.२०/- मदत दिली व त्याचवेळी सौ. सावित्रीबाई फुले रु. १५/-, माधवराव रानडे रु.७/-, दावबा शिंदे रु. ३/- या प्रमाणे देणग्या दिल्यावर लग्न समारंभ आटोपला.''[१९] पण या लग्नानंतर निंबणकर यांना खूप त्रास दिला गेला होता.

समाजामार्फत दुसरे लग्न हडपसर येथील ग्यानोबा कृष्णराव ससाणे यांचे झाले. हे लग्न सत्यशोधकी पद्धतीने घडू नये याविषयी उच्चवर्णियांनी कसे प्रयत्न केले याविषयी खुद्द ज्योतिरावांनी या लग्नाची हकिकत श्री रामय्या व्यंकप्पा अय्यावारु यांना खाजगी पत्राने लिहून कळविली. ते पत्र पुढे 'सत्यदीपिका' नावाच्या वर्तमानकाराने १ जुलै १८७४ च्या अंकात 'ब्राह्मण उपाध्याविरहीत हिंदू लग्न' या मथळ्याखाली प्रसिद्ध केले होते. पहिल्या लग्नाच्या वेळी सावित्रीबाईंनी आर्थिक मदत करुन मानसिक आधार दिला होता. आता दुसऱ्या लग्नाची सर्व व्यवस्था सावित्रीबाईंनी पाहिली. याचे कारण या लग्नाला सनातन्यांचा तीव्र विरोध होता. त्यामुळे ज्योतिरावांनी हे दुसरे विवाहकार्य आपल्या स्वत:च्या घरी करण्याचे योजले. अर्थातच एखादा समारंभ यशस्वी, चांगला होण्यासाठी घरातील सर्वांचेच सहकार्य आवश्यक ठरते. म्हणूनच या समारंभातील सावित्रीबाईंचा सहभाग मोठा मोलाचा होता. कारण त्या वेळी लग्नात इतकी विघ्ने उपस्थित झाली की हे लग्न होईल अशी कोणास खात्रीच वाटत नव्हती. पण ज्योतिरावांचा निश्चय दृढ होता आणि सावित्रीबाईंनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या साहाय्याने हे काम तडीस नेण्याचा संकल्प केला होता. या लग्नसभारंभातील 'वर' ग्यानोबा ससाणे या समारंभाविषयी म्हणतात, ''माझे लग्न सत्यशोधक समाजामार्फत खुद्द महात्मा फुले यांचे घरी,

त्यांनी स्वत: मंगलाष्टके म्हणून लावले. त्यांस पुष्कळ अडचणीही आल्या. माझे लग्नात अतिशय त्रास झाला. माझ्या लग्नात जो त्रास झाला, तो लिहू गेल्यास त्याचे एक पुस्तकच होईल.''[२०] अशाप्रकारे ठराविक चाकोरीतून बाहेर पडू पाहणाऱ्या स्वहस्ते स्वकीयांची कर्मे करणाऱ्या व जातीभेदाच्या भिंती मोडू पाहणाऱ्या बंडखोरपणाविरुद्ध उच्चवर्णीयच काय पण स्वजातीयही विलक्षण संतापले होते, धमक्या, मानहानी, उपेक्षा या वेगवेगळ्या हत्यारांचा वापर विरोधासाठी केला जाऊ लागला होता. सत्यशोधक समाजामार्फत लग्न केल्यास विहिरीचे पाणी बंद करणे, दारात हाडूक रोवणे म्हणजेच जात बहिष्काराची धमकी ससाणेंना देण्यात आली होती. त्यामुळे ज्योतिरावांनी इन्स्पेक्टरांकडे काही पोलीस शिपायांची मदत घेऊन मोठा बंदोबस्त ठेवला. त्यामुळे हे कार्य पार पाडले. याशिवाय हा लग्नसमारंभ ज्योतिरावांनी आपल्या घरी घडवून आणल्यामुळे सावित्रीबाईंचेही मोठे सहकार्य लाभले होते. एवढेच नव्हे तर सावित्रीबाईंच्या मदतीविना हा विवाह संपन्न होऊच शकला नसता. कारण घरच्या आघाडीवर वधू–वर, पै–पाहुणे यांची बडदास्त सावित्रीबाईंनी उत्तमप्रकारे केली.

आणखी एक गोष्ट म्हणजे सत्यशोधक समाजमते लग्न कसे लावतात हे पाहण्यासाठी पुण्यातील सुशिक्षित ब्राह्मण–ब्राह्मणेतर तरुण असे बरेच लोक आले होते. ज्योतिराव आणि सावित्रीबाई या दोघांनाही हे लग्न पार पाडण्यासाठी फारच मेहनत घ्यावी लागली होती. लग्नप्रसंगी जुनागंज पेठेतील महार–मांगांनी व मोमीण लोकांनी प्रसंगी ज्योतिरावांसाठी संकटसमयी प्राण देण्यास तयार असणाऱ्या या लोकांनी साहाय्य केले.

ज्योतिरावांनंतर सावित्रीबाईंकडे सत्यशोधक समाजाचे नेतृत्व सहजासहजी आले नाही. हे नेतृत्व आले कारण समाजाच्या प्रत्येक कार्यात कृतीशील सहभागाने त्या कार्य करीत होत्या. घरची परिस्थिती फारशी चांगली नसतानाही सार्वजनिक कार्यासाठी किंवा एखादा फंड उभारायचा असेल तर अशा कामात देणगी देण्याची वेळ आली तर फक्त ज्योतिरावच नव्हे तर सावित्रीबाईही पुढाकार घेत असत. १८७६ साली अहमदाबादेस जलप्रलय होऊन हजारो लोक हवालदिल झाले, त्यावेळी सत्यशोधक समाजातर्फे पाठविण्यात आलेल्या मदतीत सावित्रीबाईंचाही सहभाग होता. त्या वर्षीच्या सत्यशोधक समाजाच्या रिपोर्टमध्येही देणगीदारांच्या यादीत सावित्रीबाईंचे नाव होते. म्हणजेच सत्यशोधक समाजसुधारणा चळवळीमध्ये त्यांचे योगदान होते असे म्हणण्यास हरकत नाही.

या कार्याची धुरा हाती घेणे किंवा सत्यशोधक समाजाचे सभासद होणे तेवढेसे सुखप्रद नव्हते. कारण धर्म–अधर्म, पाप–पुण्य, धर्मपुष्टता, भ्रष्टता याबद्दलच्या कल्पना आणि मुख्य म्हणजे जातीबाहेर बहिष्कृत करुन रोटी–बेटी व्यवहार बंद करण्याच्या धमक्यांमुळे उच्चवर्णीय सर्वसामान्यांना सत्यशोधक समाजाचे सभासद होण्यापासून रोखत होते. त्यासाठी ब्राह्मण पुरोहितांविना केलेली लग्ने अग्राह्य किंवा धर्मबाह्य ठरविण्यापर्यंत त्यांची मजल गेली. गावोगावी अशा समाजामार्फत झालेल्या विवाहाविरुद्ध पुरोहितांनी चक्क न्यायायलयात धाव घेतली आणि आपल्या पारंपारिक धंद्यावर गदा आणल्याबद्दल दावे दाखल केले. अर्थातच या सर्व परिस्थितीला कोणी एक जबाबदार नव्हता. तर एकंदरीत सामाजिक परिस्थितीच नाजूक बनली होती. धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या कृत्यांकडे डोळसपणे पाहण्याचे आणि पाहिले तरी त्याविरुद्ध बोलण्याचे धाडस करणारे फार थोडे होते. तसेच जे मनाला योग्य वाटेल ते रुढीपरंपरेविरुद्ध करणारे ज्योतिराव आणि सावित्रीबाई हे पहिलेच दांपत्य असल्याने त्यांना मोठ्या संघर्षाला तोंड द्यावे लागले. भारतात पूर्वी मातृसत्ताक पद्धत रुढ होती. कालांतराने हळूहळू पितृसत्ताक पद्धतीचा स्वीकार केला जाऊ लागला. मनुस्मृतीत विवाहांच्या बाबतीत मातृसत्ताक पद्धतीला गौण स्थान देऊन पितृसत्ताक पद्धतीचा पुरस्कार केला आहे. मनुस्मृतीत विवाहाचे आठ प्रकार सांगितले आहेत. ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस आणि पैशाच हे विवाहाचे आठ प्रकार होते. या विवाहाच्या प्रकारांचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

वधुपित्याने वेदांचा अभ्यास केलेल्या शीलवान वराला स्वत: बोलावून घ्यावे, त्याला उत्तम वस्त्रांनी सजवावे, अलंकार वगैरेंनी त्याची पूजा करावी आणि कन्यादान करावे, हा ‘ब्राह्मविवाह’ मानण्यात आला आहे. यज्ञ सुरु झाल्यावर योग्य रीतीने यज्ञकर्म करणाऱ्या ऋत्विजला अलंकृत कन्येचे दान करणे, हा ‘दैव विवाह’ होय. वराकडून एक गोमिथुन (एक गाय व एक बैल) किंवा दोन गोमिथुने धर्मपूर्वक घेऊन विधिपूर्वक कन्यादान करणे, हा ‘आर्ष विवाह’ म्हटला जातो. ‘प्राजापत्य’’ विवाहामध्ये वधू–वरांनी दोघांनी मिळून धर्माचरण करा, असे वचन उच्चारुन आणि वस्त्रालंकारांनी पूजन करुन कन्यादान करणे अपेक्षित असते. फक्त वधू–वरांनी एकमेकांच्या संमतीने केलेला विवाह म्हणजे ‘गांधर्व विवाह’. तर वराने वधूला पळवून आणून केलेला विवाह म्हणजे ‘राक्षस विवाह’ याहून वेगळा असणारा ‘आसुर विवाह’ म्हणजे मुलीच्या नातेवाईकांना व स्वत: मुलीला आपल्या शक्तीनुसार द्रव्य देऊन स्वेच्छेने

तिचा स्वीकार करणे. म्हणजेच वरपक्षाने वधु–पक्षाला द्रव्य किंवा वधू–शुल्क देण्याची पद्धत मातृसत्ताक संस्कृतीमधील आहे. आ. ह. साळुंखे म्हणतात, ''आसुर विवाहात वधूला हुंडा दिला जात होता तर ब्राह्म वगैरे विवाहात त्याच्या उलटी स्थिती निर्माण झाली आहे. वधूपक्षाने वरपक्षाला हुंडा देण्याच्या आजच्या प्रथेचा उगम या सालंकृत कन्यादानातच आहे.''[२१] काळाच्या ओघात भारतात चातुर्वर्ण्यव्यवस्था स्थिरावली. ब्राह्मणांच्या दृष्टीने 'ब्राह्म,''दैव,'आर्ष' व 'प्राजापत्य' हे चार विवाहप्रकार प्रशस्त, क्षत्रियांच्या दृष्टीने 'राक्षस विवाह' प्रशस्त, वैश्य आणि शूद्र यांच्या दृष्टीने आसुर विवाह हा प्रकार प्रशस्त मानला गेला. पाणिग्रहणाचे नियमदेखील वेगवेगळ्या वर्गांना वेगवेगळे होते. धर्माशास्त्रकारांच्या मते आपल्या वर्णाच्या मुलीशी विवाह करताना पाणिग्रहण संस्कार म्हणजे वराने वधूचा हात हातात घेणे. परंतु ज्या स्त्रिया आपल्या वर्णाच्या नाहीत. त्यांच्याशी विवाह करताना क्षत्रिय मुलीने बाण, वैश्य मुलीने चाबूक आणि शुद्र मुलीने वस्त्राची दशा पकडावी. अर्थातच पाणिग्रहण हा महत्त्वाचा विधीच इतर वर्णांसाठी नव्हता. लग्नकार्य, पूजाअर्चा किंवा अन्य शुभाशुभ धर्मकार्य करण्यासाठी ग्रामजोश्याला दक्षिणा देण्याची शतकानुशतके प्रथा होती. काळात ओघात ती एवढी दृढ झाली की, दक्षिणा वसूल करणे हा त्यांचा वंशपरंपरागत हक्क बनला होता. ही धर्मकृत्ये पुरोहितांना करण्यास मिळाली नाही किंवा त्यांच्याशिवाय इतरांकडून किंवा स्वत: केली तरी दक्षिणा मिळणे हा पुरोहितांचा हक्क आहे असे त्यांचे म्हणणे होते. हा दक्षिणेचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी मुंबई तसेच कऱ्हाड मध्य प्रांतातील सत्यशोधकांवर चक्क दिवाणी दावे दाखल केले होते.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे यजमानाची इच्छा नसली तरी त्याने आपल्याकडूनच धर्मकार्य करवून घेतले पाहिजे आणि समजा ते धर्मकार्य यजमानाने स्वत: केले तरी त्याचा मोबदला म्हणजे पूर्ण दक्षिणा प्रथेनुसार ग्रामजोश्यांना मिळावी अशी त्यांची इच्छा होती. ग्रामजोश्यांना हक्काबद्दलचा मोकदमा नंबर ८३१ सन १८८४ यातील भागात नमूद केले गेले, ''फिर्यादीचे स्वरूपाकडे पाहून ता. २९ मार्च १८८६ इसवी रोजी असा ठराव केला की, प्रत्येक लग्नाबद्दल प्रतिवादी बालाजी पाटील डुमरे यांनी ४ आणे म्हणजे दोनी लग्नाबद्दल ८ आणे द्यावेत, असा ठराव केला. ह्या ठरावाबद्दल वरिष्ठ कोर्टात प्रतिवादी यांजकडून अपील होणे आहे व अपीलाचा निकाल लागेपर्यंत ज्यांचे येथे लग्नकार्य होतील व जेथे भटजी किंवा ग्रामजोशी लग्न

लाविण्याबद्दल हक्काने पैसा मागतील, तेथे प्रत्येक लग्नाबद्दल मशारनिल्हे रा. सा. सबजज्ञ यांच्या ठरावन्वयें तूर्त चारच आणे लग्न वगैरे विधि करुन घेतल्यानंतर द्यावे लागतील.''[२२] या विरुद्ध प्रतिवादींनी अपील केल्यावर जिल्हा न्यायालयाने ग्रामजोश्यांचा दक्षिणा मागण्याचा हक्क मान्य केला. पण यजमानाची इच्छा नसताना त्याने आपल्याकडून धर्मकार्य करवून घेतले पाहिजे हे मागणे गैरवाजवी ठरविले. या निकालाविरूद्ध पुरोहीतांनी मुंबई उच्च न्यायालयाकडे दाद मागितली तेव्हा उच्च न्यायालयाने जिल्हा न्यायालयाने आधी दिलेल्या निर्णयानुसार शिक्कामोर्तब केले. परंतू या फिर्यादी ग्रामजोश्यांचा दक्षिणा वसूल करण्याचा हक्क मान्य केला होता तर कलकत्ता, मद्रास, आग्रा येथील उच्च न्यायालयांनी धर्मकार्ये केलेली नसल्यास त्यांना दक्षिणा वसूल करणाच्या हक्क नाही असे निर्णय दिले होते. थोडक्यात अशा परिस्थितीत सत्यशोधक समाजाचे नेतृत्व करणे हे सोपे नव्हते. कारण ज्योतिरावांच्या मृत्यूनंतरही तीसपस्तीस वर्षे जोशीवतनाचा हा गुंता सुटला नव्हता.

ही नुकसान भरपाई किंवा मोबदला मागण्यामागे जातीधर्माचा उच्चनीचपणा एवढेच कारण नसून उदरनिर्वाहाचा वर्षानुवर्षांचा धंदा आणि उत्पन्नाला पारखे होण्याची भिती आणि नव्या आधुनिक काळाची हाक न ऐकता पारंपरिकतेला कवटाळणे ही मानसिकता होती. त्यामुळे हे खटले एका न्यायालयातून दुसऱ्या न्यायालयात जात होते. कधी हार तर कधी जित दोन्ही पक्षांकडे जात होती. काही निकाल सत्यशोधकांच्या बाजूने लागत होते. त्यामुळे लोकांची मानसिकता बदलू लागली होती आणि याचवेळी आणखी एक विवाह खुद्द सावित्रीबाईंच्या घरातच घडला.

विधवेच्या अनौरस संततीला स्वत:चे घर, आईची माया व पित्याचे छत्र देऊन जगात सन्मानाने जगण्यासाठी जीवनदानाबरोबर स्वपुत्राचे सर्व अधिकार सावित्री ज्योतिराव या दांपत्याने दिले होते.

शूद्रातिशूद्रांच्या कल्याणसाठी त्यांनी आपले आयुष्य वेचलेच होते पण पारदर्शक स्वच्छ आचरणातून, निर्मळ प्रेमातून अनेक बालकांना मृत्यूच्या खाईतून बाहेर काढले होते. अशाच समाजाने नाकारलेल्या एका चिमुकल्या जींवाला 'यशवंत' याला सावित्री–ज्योतिराव या दांपत्याने आपला पुत्रच मानले होते. हा पुत्र आता उपवर झाला होता, विवाहासाठी वधूसंशोधन चालू होते. जातीपातीच्या कल्पनांनी समाजमन निबर बनले होते अशा काळात

समाजाच्या साऱ्या संकेतांना, विरोधांना न जुमानता एका कोवळ्या बालकाला आपल्याकडे ठेऊन लहानाचा मोठा करण्याचे धाडसी कृत्य त्यांनी केले होते. या कृत्याला धाडसी म्हणण्याचे कारण म्हणजे कर्मविपाक सिध्दांतामुळे जातीभेद एवढे पक्के झाले होते की, त्या त्या जाती किंवा उपजातीतील वधू वरांची एकमेकांशी लग्न होत असे. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र इत्यादी जातीतील विवाह त्यांच्याच जातीत होत.

अगदी पूर्वी म्हणजे उपनिषद काळापर्यंत जातीला पाठिंबा मिळला नव्हता. म्हणजेच वर्णव्यवस्थाच स्थिरावलेली नव्हती, जाती व्यवस्था अस्तित्वातच आली नव्हती. 'शूद्र' हा शब्द तर जाती व्यवस्था अंमलात आल्यावर रूढ झाला असे म्हटले जाते. श्रीराम गुंदेकर म्हणतात, ''वेदकाळी जाती अगर वर्णव्यवस्था नव्हत्या,याचे मुख्य कारण असे आहे की, त्यावेळी प्रत्येक मनुष्यास अनेक प्रकारचे व्यवसाय करणे भाग पडत होते. एकच मनुष्य शेतकीचे काम करुन स्वत:चा व स्वत:च्या लोकांचा बचाव करण्याचेही काम करीत असे. इतकेच नव्हे तर, स्वत:च्या गृहदेवतांचे म्हणजे पंचमहाभूतांपैकी एखाद्या किंवा अधिक निसर्गशक्तींचे पूजन करुन होमहवन करणे अथवा त्यांची स्त्रोत्रे गाणे ही सर्व कामे तोच करीत असे. सारांश, एकच मनुष्य क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य व शूद्र या चारी वर्णांचे निरनिराळे धंदे सवडीप्रमाणे व गरजे प्रमाणे करीत असे.''[२३] याचाच अर्थ त्या काळी वर्णव्यवस्था अस्तित्वात नव्हती असे म्हणायला हरकत नाही. किंबहुना लोक स्वेच्छेने कोणत्याही धंद्याच्या क्षेत्रात सहज जाऊ शकत होते. त्यासाठी श्रीराम गुंदेकर आणखी कारण देतात ते म्हणतात, ''वेदकाळात ईश्वरस्तुती करण्याचे काम सोपे होते. त्यामुळे त्या कामाची जबाबदारी कोणा एका वर्णावर सोपविली नव्हती. ज्या ऋषिंच्या नावाने हल्ली आपले गोत्र सांगून वर्ण–अहंकाराचे समर्थन करतात त्यापैकी कोणीही ऋषी मुळात ब्राह्मण नव्हता. विश्वामित्र हा क्षत्रिय, वशिष्ठ हा उर्वशीचा पुत्र, पाराशराची पत्नी सत्यवती ही मच्छीमार कोळ्याची कन्या होती; जमदग्नीची पत्नी रेणुका आणि अगस्तीची पत्नी लोपामुद्रा या क्षत्रियकन्या आहेत. ययातीची प्रथम पत्नी देवयानी ही ब्राम्हणकन्या होती. याचा अर्थ त्या काळात वर्णभेद कठोर नव्हते.''[२४] पण काही ठराविक जातीची, कर्माची उच्च आणि नीच या श्रेणीत वर्गवारी झाल्याने किंवा पूर्वजन्मीच्या पाप किंवा कर्मामुळे मानवजन्म उच्च अथवा नीच जातीत झाल्याच्या कर्मविपाक सिध्दांताने सर्व सामान्यांना निष्क्रिय आणि जातीविषयी कट्टर दुराभिमानी बनविले. लोकमनाची

विचारशक्ती कुंठित केली गेली होती. त्यामुळेच उद्योग, परिश्रम यांना महत्त्व द्यायचे सोडून लोक आहे त्या स्थितीतच समाधान मानून ह्या दयनीय स्थितीला पूर्वजन्मीचे पापाचे फळ मानीत होती.

त्याउलट परदेशात मात्र विविध पदावर असणारे विद्वान, तत्त्वज्ञानी, भिन्न भिन्न व्यावसायिक भिन्न आर्थिक स्तर असणारे होते. थोर साहित्यिक विल्यम शेक्सपियर हा खाटीक वंशात, इतिहासकार व तत्वज्ञानी जेन्स मिल्ल चांभार, त्यांचा मुलगा जॉन स्टुअर्ट मिल्ल हा तर्कशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रज्ञ होता, कोलंबस पिंजारी, सॉक्रेटीस हा शिल्पी होता. म्हणजेच परदेशात कर्मविपाक सिद्धांत प्रचालित नव्हता त्यामुळे कोणत्याही कुळात जन्मले तरी हुशारी व कर्तृत्वाच्या जोरावर कोणलाही श्रेष्ठ स्थानावर जाता येत असे. एतद्देशीयांमध्ये कर्मविपाक लोकमनावर दृढ झाल्यामुळे विचारशक्ती, मन बंदिस्त झाले आणि जातीभेदांचे गारुड समाजावर अधिकाधिक वाढत गेले. त्यामुळे धार्मिक, आर्थिक, सामाजिक. सांस्कृतिक सर्व स्तरांवर एका गटाचे अधिक्य वाढले तर दुसरा गट अगदी दुबळा बनत गेला. ही वाढणारी दरी कमी करण्यासाठी प्रयत्न केले गेले. त्यातूनच जातीभेदाला विरोध करणारी आणि सामाजिक समतेचा पुरस्कार करणारी सत्यशोधक चळवळ उभी राहिली.

सुधारक चळवळीतील एक प्रभावी चळवळ म्हणून सत्यशोधक चळवळीशी सावित्रीबाईंचा जवळून संबंध होताच पण त्यांच्या व्यापक जातीभेदाविरुद्ध तत्त्वांचा नुसता प्रचार नव्हे तर आचरणातून स्वीकार करण्याचा विचारी–विवेकी संयमही सावित्रीबाईंकडे होता. त्यामुळे अनाथांचे पालकत्व स्वीकारताना असणारी मृदूता पुढे येणाऱ्या संघर्षासाठी खंबीरतेत रुपांतरीत होत होती. म्हणूनच त्याकाळी अशक्य वाटणारी पहिली गोष्ट म्हणजे समाजाने मानलेल्या अधर्मी बहिष्कृत केलेल्या विधवा बाईचे आईपण मान्य करुन त्यांची नावे गुप्त ठेऊन स्वत:च्या घरात बालहत्या प्रतिबंधगृह सुरु करणे. आणि दुसरी म्हणजे या अनाथ बालकांपैकीच एका चिमुकल्याला स्वत:चा पुत्र मानने. हा पुत्र म्हणजे 'यशवंत' याला त्याच्या आईने फक्त जन्म देऊन बालगृहात टाकून दिल्यापासून सावित्रीबाईंनी त्याचे लालनपालन करुन पोटच्या पुत्राप्रमाणे लहानाचा मोठा केले. यशवंताने चांगले शिक्षण घ्यावे अशी फुले दांपत्याची इच्छा होती. त्याप्रमाणे यशवंताने उच्च शिक्षण घेण्यास डॉक्टरीचे शिक्षण घेण्यास

सुरुवात केली होती. सावित्रीबाईंनाही सुनमुख पाहऱ्याची इच्छा निर्माण झाली. अर्थातच त्यासाठी वधूसंशोधन सुरु झाले होते.

फुले दांपत्याच्या कार्याला विरोध करणारी मंडळी होती त्याचप्रमाणे त्यांच्या कार्याबद्दल आदर असणारीही मंडळी होती. त्यामुळे त्यांस आपली मुलगी द्यावी असे बऱ्याच गृहस्थांना वाटू लागले होते. यापैकी ग्यानोबा कृष्णराव ससाणे यांची मुलगी राधाबाई यशवंतासाठी पसंत केली गेली. विधवेच्या अनौरस संततीला स्वतःच घर, आईची माया आणि पित्याचे प्रेम, चांगले जीवन जगण्यासाठी शिक्षणाची शिदोरी तसेच सहजीवनासाठी सुकुमार जोडीदारही निवडून दिला. ग्यानोबा ससाणेंची द्रितीय कन्या 'राधा' हीच्याशी यशवंताचा वाङ्निश्चय झाला. सावित्रीबाईंच्या जीवनातील आनंदाच्या क्षणांपैकी हा एक अविस्मरणीय क्षण होता. हा विवाह सत्यशोधक समाज पद्धतीने ४ फेब्रु. १८८९ रोजी संपन्न झाला.

विवाहानंतरची लक्षवेधक गोष्ट म्हणजे लग्नानंतरही सावित्रीबाईंनी घरकामाचा सर्व भार स्वत: उचलून सूनबाईंच्या शिक्षणाला प्रोत्साहनाबरोबर वेळही दिला. आपल्या आचरणातून कौटुंबिक जीवनात त्यांनी आदर्श घालून दिला. थोडक्यात आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनातही सत्यशोधक समाजाची विचारधारा सावित्रीबाईंनी अंगीकारली होती असे म्हणण्यास हरकत नाही.

## ५.१.७.३ सत्यशोधक समाजाचे नेतृत्व

सावित्रीबाईचें अवघे जीवन छोट्या–मोठ्या संघर्ष सुख:दुखांनी भरलेले होते. पण या सगळ्यांत अखंड त्यांना प्रेरणा देणारी, प्रोत्साहीत करणारी, कौतुकाने पाहणारी जीवाभावाची एक व्यक्ती होती. ज्योतिराव या पतीची समर्थ साथ त्यांना लाभली होती. पण २८ नोव्हेंबर १८९० रोजी सावित्रीबाईंनी ज्यांच्याबरोबर आपल्या सहजीवनातील थोडीथोडकी नव्हे जवळ–जवळ पन्नास वर्षे काढली. तो सहयात्री अनंताच्या प्रवासाला निघून गेली. मृत्यूची चाहूल ज्योतिरावांना आधीच लागली होती. त्यामुळेच त्यांनी ओतूर, बडोदा, मद्रास, मुंबई, नागपूर, धुळे, जळगाव, नगर व कोल्हापूर वगैरे ठिकाणच्या सत्यशोधक समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्यांना आठ दिवस आधी बोलावून घेतले त्यांच्या आठवणी सांगताना शास्त्री नारो बाबाजी महाघट पाटील म्हणतात, ''महात्माजींनी आम्हास भाषणातून ज्ञानामृत पाजले ते म्हणाले, ''बंधूनो,

आपण खूप कार्य केले दोन हजार वर्षात आपणाला जे मिळाले नाही ते येत्या ५० वर्षात आपल्याला खात्रीने मिळेल. आंग्लाई आज आहे उद्या नाही. पण साऱ्या शूद्रादिशूद्रास विद्या देऊन शहाणे करा. विद्या ही माणसास 'मनुष्यत्व' प्राप्त करुन देते.''[२५] पुढे सावित्रीबाईंचा त्यांच्या जीवनातील अनमोल सहकार्य व साथीबद्दल ज्योतिरावांनी केलेले वर्णन त्यांच्या कार्याचा सार्थ गौरव ठरावे असे आहेत. महाघट पाटील ज्योतिरावांनी केलेले वर्णन सांगताना म्हणतात, ''सावित्रीने माझ्या चरित्राबरोबर ५० वर्षे प्रवास केला. तिच्यामुळे मी लोकांचे भले करु शकलो.''[२६] परंतु सावित्रीबाईंच्या कर्तृत्वाची, ध्येयनिष्ठेची, दीनदुबळ्याविषयी त्यांच्या हृदयात असलेल्या करुणेची कल्पना फार कमी लोकांना होती. ज्यांना सावित्री–ज्योतिरावांच्या स्वयंप्रकाशाची, स्वयंप्रज्ञेची ओळख नव्हती त्यांना वाटले, ज्योतिरावांच्या नंतर सत्यशोधक समाज संपला. परंतु ज्योतिरावांच्या संगतीत मध्ययुगीन परंपरेला अव्हेरण्यासाठी स्त्रीला ठरविलेल्या बंदिस्त चौकटीतून बाहेर पडण्याचे आत्मभान आणि सामाजिक जाण सावित्रीबाईंच्या अंगी आली होती. म्हणूनच मध्य युगातील पुरुषप्रधान सांस्कृतिक मुल्य व्यवस्थेचा त्यांच्यापर्यंत आलेला प्रवाह त्या अव्हेरतात. त्याला ओलांडून त्या शिक्षिका म्हणून, एक समाजपरिवर्तक कार्यकर्ती म्हणून उभ्या राहतात. म्हणूनच त्या सत्यशोधक समाजाचे नेतृत्व समर्थपणे स्वीकारतात. सत्यशोधक समाजाचे नेतृत्व त्या नुसते स्वीकारत नाहीत तर खंबीरपणे प्रभावी भाषणांतून आपली भूमिका मांडतात. कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देतात. महात्मा ज्योतिरावांची पहिली पुण्यतिथी भाऊ कोंडाजी पाटील यांनी आपल्या ओतूर या गावी दिनांक १५ नोव्हेंबर १८९१ रोजी साजरी केली. त्यावेळी सत्यशोधक समाजाच्या तत्त्वविचाराचे उधाण संबंध जुन्नर तालुक्यात आले होते. या कार्यक्षेत्रातील त्यांच्या कार्याच्या आठवणी ताज्या होत्या. म्हणूनच महात्मा ज्योतिरावांची पहिली पुण्यतिथी ओतूर येथे साजरी होणे स्वाभाविक होते. सावित्रीबाई स्वतः या समारंभास उपस्थित होत्या. या वेळी शास्त्री नारो बाबाजी महाघट पाटील यांनी, 'महात्मा फुले यांचे अमर जीवन' हे चरित्र प्रकाशित केले. हे महात्मा ज्योतिरावांचे पहिले चरित्र असून ते ओतूरच्या सत्यशोधक समाजाच्या सत्यशोधक सेवा संघाने प्रसिद्ध केले होते. सदर पुस्तक सावित्रीबाईंना अर्पण करण्यात आले होते.

या अर्पणपत्रिकेतील वाक्ये सावित्रीबाईंविषयी त्यांचा स्वभाव गुणांविषयी बरेच काही सांगून जातात. या अर्पणपत्रिकेत शास्त्री नारो बाबाजी महाघट पाटील लिहितात, ''हे पुस्तक

आदर्श पूजनीय सत्यस्वरूप साध्वी सावित्रीदेवी ज्योतिबा फुले (म. ज्यातिबांच्या पत्नी) त्यांची पतिवरील प्रीती, भक्ती आणि निष्ठा त्याचप्रमाणे त्यांच्या अंगी असलेले सत्‌शीलता, सत्यपराजयता आणि सत्यशोधक समाजप्रियता वगैरे सद्‌गुणांचा गौरवार्थ हे पुस्तक ग्रंथकर्त्याने आदर भावाने व काळजीपूर्वक नजर केले असे.''[२७] या अर्पणपत्रिकेतील सावित्रीबाईंच्या गुणांचे वर्णन फक्त पतिपरायण किंवा आज्ञाधारक, निष्ठाभक्ती भावाचे नसून सत्याविषयी असलेल्या त्यांच्या स्वतंत्र मताचे आहे. सत्यशोधक समाजात त्यांच्याविषयी असलेला आदरभाव दर्शविणारे आहे. सत्यशोधक समाजाचे कार्य ज्योतिरावांबरोबर तसेच ज्योतिरावांनंतरही सावित्रीबाईंनी केल्यामुळेच त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा नामोल्लेख गौरवाने केला गेला असे म्हणण्यास हरकत नाही. ज्योतिरावांच्या मृत्यूनंतर, सहानुभूतीने नव्हे तर त्यांच्या स्वयंसिद्ध कर्तुत्वामुळेच पुढे इ.स. १८९३ साली सत्यशोधक समाजाच्या परिषदेचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान सावित्रीबाईंना मिळाला. ज्या काळात सार्वजनिक क्षेत्रात स्त्रीने पाऊल ठेवणे निषिद्ध मानले जात होते त्या काळात बंडखोर विचारांना प्रोत्साहन देणाऱ्या परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारणे सोपे नव्हतेच तर अवघड आणि जबाबदारीचे देखील होते. अवघड अशा अर्थाने की 'पती हाच परमेश्वर' असे मानणाऱ्या आणि स्त्रीला तुच्छ लेखणाऱ्या काळात महात्मा ज्योतिरावांच्या मृत्यूनंतर जीवनात येणाऱ्या एकाकीपणाला सोबत घेऊन दु:खी अंत:करणाने पुढची वाटचाल, सावित्रीबाईंसाठी सुकर नव्हती. सासरकडच्यांचा आधार नाही. मायेचे माहेरही दुरावलेले अशा परिस्थितीशी लढत त्यांना पुढचा निर्णय घ्यायचा होता. अर्थातच अगदी सत्यशोधक समाजाच्या स्थापनेपासून सावित्रीबाईंचा सहभाग होताच पण आता झुंज एकाकीपणे द्यायची होती. पु.ल. देशपांडे म्हणतात, ''शंभर वर्षांपूर्वी ज्यावेळी थोर विचारवंत म्हणवणारी मंडळी आपल्या बायकांना घरात चूल फुंकवीत बसवायची, ज्यांच्या अस्तित्वाची दखलही घेतली जात नसे अशा काळात ज्योतिबांनी आपल्या बायकोला आपल्या सार्वजनिक कार्यात जोडीदारीण म्हणून ते कार्य करायला उत्तेजन दिले होते. काही तुरळक अपवाद वगळले तर समाजसुधारकांनी आपल्या जोडीला कुटुंबातल्या स्त्रियांना घेतल्याचे उदाहरण नाही.''[२८] अशा परिस्थितीत स्वकर्तृत्वाने स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा सावित्रीबाईंनी सार्वजनिक कार्यात प्रभावीपणे उमटवला होता.

इ.स. १८९३ साली सासवड येथे सत्यशोधक सामाजाची परिषद झाली. त्या परिषदेच्या अध्यक्ष सावित्रीबाई फुले होत्या. आपल्या भाषणातून सावित्रीबाईंनी सत्यशोधक चळवळीचे महत्त्व, शिक्षण आणि आर्थिक स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करण्यासाठी मार्गदर्शन केले. त्याकाळच्या सामाजिक, धार्मिक स्थितीचा विचार करता आर्थिकदृष्ट्या पराकोटीचा परावलंबी व स्वत:च्या शैक्षणिक बाबीविरोधी पूर्णपणे अनभिज्ञ बसणाऱ्या, पापपुण्याच्या अजागळ कल्पना बाळगणाऱ्या समाजाला जागृत करणे कठीण होते. त्या बहुजन समाजाला चांगले, वाईट, योग्य, अयोग्य मोठ्या मेहनतीने पटवून द्यावे लागे. सावित्रीबाई आपल्या भाषणातून, उत्तम संवादकौशल्याने या बहुजनसमाजात मिसळल्या, त्यांच्या भाषणाला लोकांचा चांगला प्रतिसाद मिळू लागला. शहरी पांढरपेशा वर्गाबरोबर ग्रामीण भागातील कष्टकऱ्यांमध्येही सत्यशोधक समाजाची लाट आली होती. त्याचे कारण होते सावित्रीबाई फुले. ज्योतिरावांच्या मृत्यूनंतर सावित्रीबाईंना फार त्रास सहन करावा लागला. फुले दांपत्याने आयुष्यभर समाजकार्यासाठी वाहून घेतल्याने ज्योतिरावांच्या मृत्यूनंतर सावित्रीबाईंना आर्थिक दु:स्थितीचा सामना करावा लागला. त्यांच्याशी मतभेद असणारा भाऊबंदकीतील भांडणामुळे मानसिक त्रास सोसावा लागला. त्यांच्या कार्याचे महत्त्व आणि उंची न जाणणाऱ्या  विरोधी गटाच्या द्वेष व मत्सर यांच्याशी सामना सावित्रीबाईंना करावा लागला. उपरोक्त बाबी लक्षात घेतल्या तर आर्थिक, मानसिक आणि सामाजिक अशा अनेक आघाड्यांवर सावित्रीबाईंना लढावे लागले होते. १८९० ते १८९३ पर्यंतच्या काळात त्यांना फार त्रास सहन करावा लागला.

भाऊबंदकीतील त्रास ओसरला नव्हता, भाऊबंदकीतील भांडणे, हेवेदावे, आपापसातील द्वेष, दारिद्र्य आणि दारिद्र्यात सहन कराव्या लागलेल्या हाल–अपेष्टा, यातना यात सावित्रीबाई मोडून पडल्या नाहीत. त्यांनी सारे सहन केले. आपल्या ध्येयापासून त्या विचलित झाल्या नाहीत. म्हणूनच ज्योतिरावांच्या निर्वाणानंतर सत्यशोधक समाज संपला अशी कुजबुज सुरु असतानाच ओतूर व सासवड येथे अधिवेशने भरली. सासवडच्या परिषदेने पुरंदर तालुक्यात सत्यशोधक समाजाच्या शाखा प्रभावीपणे विचार मांडत होत्या. की त्यामुळे सावित्रीबाई फुले यांच्या रुपाने महात्मा फुले बोलत आहेत अशा वार्ता पसरल्या होत्या.

### ५.१.८ सावित्रीबाईंची धैर्याची कसोटी व रुढीपरंपरेविरुद्ध बंड :

सावित्रीबाई आणि ज्योतिराव यांचे अवघे जीवन म्हणजे संघर्षयात्रा होती. दीनदुबळ्यांची सेवा, शूद्रातिशूद्रांना शिक्षणाचा वसा, सत्यधर्माचे पालन, मानवतेवरील निष्ठा आणि सतत कार्यमग्नता यामउळे ज्योतिरावांचे प्रकृतीकडे दुर्लक्ष झाले त्यातच अर्धांगवायूने त्यांची उजवी बाजू निकामी झाली होती. ज्योतिरावांचे आजारपण, औषधपाणी, त्यांना भेटायला येणाऱ्यांची ऊठ–बस हे सर्व सावित्रीबाईंना करावे लागत असे, आज नाही तर उद्या ज्योतिरावांना बरे वाटेल ही अपेक्षा मनात ठेऊन सावित्रीबाईंनी त्यांची अखंड सेवा चालू ठेवली होती. पण शरीराला व्याधींनी घेरले तरी ज्योतिरावांचे मन मात्र खंबीर होते. त्यामुळे दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर शरीराची उजवी बाजू निकामी झाली तरी डावी बाजू शाबूत आहे म्हणून त्यांनी आपले काम डाव्या हाताने करण्यास सुरुवात केली. 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ या जीवघेण्या आजारपणात ज्योतिरावांनी डाव्या हाताने लिहिण्याचे सुरुच ठेवले. पण पुढे आजारपणाचे स्वरुप गंभीर झाले आणि २८ नोव्हेंबर १८९० रोजी ज्योतिरावांची प्राणज्योत अनंतात विलीन झाली. आयुष्यभर साथ देईन असे आश्वासन देणारा सवंगडी अर्ध्या शतकाचा सोबती राहून संसाराचा डाव अर्ध्यावर टाकून निघून गेला होता. सावित्रीचा मित्र, मार्गदर्शक, सोबती, प्रेरक अशा कितीतरी भूमिका पति म्हणून ज्योतिरावांनी पार पाडल्या होत्या. ज्योतिरावांच्या सहवासात राहून अनेक सुख–दु:खाचे क्षण त्यांनी अनुभवले होते, जगाकडे आणि जीवनाकडे निर्मोही वृत्तीने त्रयस्थाच्या भूमिकेतून बघायला त्या शिकल्या होत्या. म्हणूनच त्या मनाने खंबीरपणे उभ्या होत्या पण हे सारे – सारे खरे असले तरी शेवटी त्याही एक माणूस होत्या. ज्योतिरावांच्या कलेवराशेजारी सावित्रीबाई मोठ्या दु:खाने बसल्या होत्या. ज्योतिरावांबरोबर सुरु केलेला संसार, शिक्षणाचे कार्य, गृहत्याग, संघर्ष, सामाजिक कार्य, विविध सभा, भाषणे ग्रंथलेखन कधी निंदा तर कधी स्तुती पण तरीही आपल्या कार्यावरील अढळ निष्ठेचे प्रतिक आज अनंताच्या प्रवासाला निघाला हा सारा जीवनपट सावित्रीबाईंपुढे फेर धरु लागला. प्रत्येक हुंदक्यागणिक एक नवी आठवण जागवू लागला. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या महानिर्वाणाची बातमी वाऱ्यासारखी शहरभर पसरली. भल्या पहाटे जनसामान्यांचे थवेच्या–थवे त्यांच्या घराकडे येऊ लागले. शोकसमुद्रात बुडलेला विराट जनसमुदाय सकाळी तिथे जमा झाला होता. ज्योतिरावांना समर्थन देणारी मंडळी, त्यांच्यावर प्रेम करणारी तसेच त्यांची समविचारी

आणि अनुयायी मंडळी जशी तिथे जमा झाली तशीच त्यांच्या मानवतेच्या कार्याला विरोध करणारी मंडळीही तिथे आली. भाऊबंदही तिथे जमा झाले.

ज्योतिरावांनी आपल्या मृत्यूपत्रात आपले दहन न करता आपल्याला राहत्या घराच्या पाठीमागे बखळ जागेत मिठात घालून पुरावे अशी इच्छा व्यक्त केली होती. त्यासाठी त्यांनी त्यांच्या हयातीत घरामागच्या बखळ जागेत एक खड्डाही खोदवून घेतला होता. परंतु त्यावेळच्या कलेक्टरने ज्योतिरावांचे शव पुरण्यास परवानगी नाकारली. ज्योतिरावांनी त्यांच्या अंत्यविधीच्या वेळी कोणतेही धर्मसंस्कार व कर्मकांड करु नये अशीही इच्छा व्यक्त केली होती. तसेच ज्या भाऊबंदांनी त्यांच्या कार्याला विरोध केला. त्या भाऊबंदांनी स्पर्श करु नये अशी इच्छा व्यक्त केली होती.

ज्योतिरावांवर अग्निसंस्कार करण्याचा निर्णय झाला. अंत्ययात्रेची तयारी सुरु झाली. ज्योतिरावांच्या अंगाखांद्यावर खेळलेला पण दत्तक पुत्र यशवंत टिटवं धरण्यास तयार झाला. आणि सत्यशोधक खांदा घ्यायला पुढे सरसावले. तेवढ्यात भाऊबंदांनी यशवंताने टिटवं धरण्यास हरकत घेऊन गोंधळ घालण्यास सुरुवात केली. अनेकांनी हस्तक्षेप करुन या प्रसंगी त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. गोंधळ थांबेना. हजारो लोक दु:खित अंत:करणाने अंत्ययात्रेसाठी तिष्ठत उभे होते. नको त्यावेळी भाऊबंदांनी बखेडा सुरु केला होता. अंत:करणात डोंगराएवढं दु:ख गिळून सावित्रीबाईंनी या प्रसंगी मोठ्या धैर्याने मनाशी निर्धार केला आणि ज्योतिरावांनंतर त्यांच्या विचारांची अवहेलना होऊ नये म्हणून एक आगळावेगळा पण त्यांची सहचारिणी शोभेल असा निर्णय घेतला. या जगात जन्म घेतल्याबरोबर वात्सल्याने मातेचे प्रेम बाबांचा आधार ज्या सावित्री–ज्योतिने यशवंताला दिला त्या यशवंताला काही भाऊबंद लौकिकार्थाने पुत्र मानायला तयार नव्हते. तर जन्मभर ज्योतिरावांच्या आचारविचारांना, कार्याला साथ न देणारे आता मात्र विनाकारण हक्क दाखवू लागले होते. प्रसंग मोठा कठीण होता. हजारो लोक हा भावनिक गुंता अगतिक होऊन पाहात होते. त्याचवेळी सावित्रीबाईंनी तिष्ठत उभ्या असलेल्या अवघ्या जनसमुदायाला शांत, मृदु पण ठाम निश्चयाने ज्योतिरावांच्या महानिर्वानाच्या महायात्रेतील टिटवं त्या स्वत: धरणार असल्याचे करारीपणे सांगितले. सावित्रीबाईंच्या या निर्णयामागे सामाजिक परंपरा मोडण्याचे धाडस होते. प्रसंगावधान होते आणि भावनिक मानसिक पातळीवर दाखविलेले अतुलनीय धैर्य होते. कारण

भारताच्या हजारो वर्षांच्या इतिहासात एका स्त्रीने टिटवं कधी धरले नव्हते. सावित्रीबाईंनी त्यांच्या कृतीतून या देशात एक क्रांतिकारी इतिहास निर्माण केला. हातात टिटवं घेऊन पुढे चालणाऱ्या सावित्रीबाई स्वयंतेजाने नवविचारांची ज्योत तेवत ठेवण्याचा धाडसी प्रयत्न करत होत्या. जडशीळ झालेली पाऊले विषण्णतेने पुढे टाकत होत्या. हजारो पाऊले त्यांच्यासोबत असताना मन मात्र एकटे पडले होते. ज्योतिरावांचे अनुयायी, हितचिंतक फुलेंनी रचलेल्या अखंडाचे गायन करुन मार्गक्रमण करत होते. ज्योतिरावांच्या अलौकिक विचारांचा ठेवा चिरंतन ठेवून नश्वर शरीर लौकिकार्थाने जगातून अनंताच्या प्रवासाला निघाले होते. प्रसंग मोठा चमत्कारिक भावनिक कोंडी करणारा होता. टिटवं धरू न देणारे भाऊबंद आता अग्निमुख देताना दत्तकपुत्र यशवंताला हात लावू देणार नाहीत. यावर कोणता उपाय योजावा या प्रश्नाचे बिनतोड उत्तर सावित्रीबाईंनी शोधले आणि मोठ्या धैर्याने त्याप्रमाणे कृतीही केली. सावित्रीबाईंनी स्वत:च्या हाताने सारे धैर्य एकवटून ज्योतिरावांच्या शवाला अग्नी दिला. हजारो वर्षाच्या भारताच्या इतिहासात एका स्त्रीने अग्नी देण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. त्याहीपुढे जाऊन ज्योतिरावांची इच्छा आणि स्वत:ची विवेकबुद्धी वापरुन अंत्यविधीच्या वेळी होणारे धार्मिक विधी व कर्मकांड करण्यात आले नाहीत. तिसऱ्या दिवशी ज्योतिरावांच्या अस्थी मोठ्या समारंभाने वाजतगाजत पालखीत घालून दांडपट्टा लेझीम खेळवित मिरवणुक काढून त्यांच्या घरी आणल्या. सावित्रीबाईंनी त्या अस्थी मनोभावे महात्मा ज्योतिराव यांनी तयार केलेल्या घराच्या पाठीमागील जागेत पुरल्या. त्या जागेवर सावित्रीबाईंनी तुळशीवृंदावन उभारले आणि हे स्मारक चिरंतन केले.

फुले दांपत्याने हिंदुधर्मात राहून आपल्याच धर्मातील खुळ्या रुढी परंपरेला फाटा दिला. हे सर्व करताना धर्ममार्तंडांचा भयानक रोष ओढवून घ्यावा लागला, निंदा नालस्तीला तोंड द्यावे लागले तरीही आपल्या विचारांचा जागर आणि पापपुण्याच्या घट्ट रुजलेल्या कल्पनेतून समाजाला बाहेर काढण्यासाठी स्वत:च्या आचरणातून घालून दिला. सामाजिक क्रांतीच्या कार्यात आपल्या पतिइतक्याच सावित्रीबाई समरस झालेल्या होत्या. याबद्दल धर्माधिकारी दादा म्हणतात, ''सावित्री व ज्योतिबा मिळून ''ज्योतिबा'' झाला. सावित्रीबाई भारतातील पहिली व थोर क्रांतिकारक स्त्री होती. दोघेही आपापल्यापरीने क्रांतीचे अग्रदूत होते. पतिनिधनानंतर ज्योतिबा जणू सावित्रीबाईंत विलीन झाले. एकशेष द्वंद्व उरला. जोतीबांचे कर्तृत्व व उर्जा

सावित्रीबाईच्या अंगी बाणली.''[२९] समाजमनाच्या विरुद्ध जाणे किंवा जुन्या परंपरा मोडणे सोपी गोष्ट नव्हती. पण आधी स्वत: केले मग सर्वांना सांगितले या न्यायाने ज्योतिरावांच्या निर्वाणानंतरही त्यांच्या विचारांचा जागर सावित्रीबाईंनी चालू ठेवला. खुळ्या रुढी परंपरेला फाटा देण्यासाठी कोणीही केस काढले नाहीत. भाताचा पिंड करुन तो कावळ्यापुढे ठेवला नाही. परंतु सार्वजनिक सत्यधर्माच्या शिकवणुकीप्रमाणे सर्व समाजातील गरीब लोकांना अन्नदान केले. गरीब विद्यार्थ्यांना मदत केली. अशाप्रकारे सावित्रीबाईंनी मोठ्या धैर्याने ज्योतिरावांचे अंत्यसंस्कार व त्यानंतरचे विधी सत्यशोधक समाजाच्या मताप्रमाणे करुन त्याकाळी अतुलनीय धैर्य दाखविले.

## ५.१.९ दुष्काळग्रस्तांसाठी सावित्रीबाईंचे कार्य :

दीनदलितांची सेवा करणे हे कार्य ज्योतिराव सावित्रीबाईनी स्वीकारले होते. त्याचप्रमाणे संकटात विपत्तीत सापडलेल्या माणसांना मदत करणे हा त्यांचा सहजधर्म होता. याचा प्रत्यय दुष्काळाच्या प्रसंगी आला. फक्त ज्योतिराव बरोबर असताना नव्हे तर त्यांच्या मृत्यूनंतरही सावित्रीबाईंनी स्वयंस्फूर्तीने हे कार्य सुरु ठेवले. इ.स. १८७७ मध्ये महाराष्ट्रात पडलेल्या भीषण दुष्काळात ज्योतिरावांबरोबर सावित्रीबाईंनीही दुष्काळाच्या खाईत सापडलेल्या दीनदुबळ्या माणसांचे अश्रू पुसण्याचे कार्य केले. या दुष्काळाच्या दिवसांत ज्योतिरावांनी सत्यशोधक समाजाचे चिटणीस म्हणून सभासदांना एक निवेदन पाठविले हे निवेदन २४ मे १८७७ रोजी 'ज्ञानप्रकाश' मध्ये प्रसिद्ध झाले. या निवेदनाद्वारे दुष्काळपीडितांना मदत करण्याचे कळकळीचे अवाहन करण्यात आले होते. इंदापूर, पंढरपूर, मिरज व तासगांव इ. ठिकाणी लोकांचे अन्नावाचून होणारे हाल वर्णन केले होते. तसेच समाजामार्फत 'व्हिक्टोरिया बालाश्रम' स्थापन केल्याची घोषणा केली होती. जाहिरात पाहताच यथाशक्ती मदत करण्याचे भावपूर्ण आवाहन केले गेले होते.

या दुष्काळाची तीव्रता एवढी होती की दुष्काळग्रस्त गरीब लोक आपली पोटची मुले नाईलाजास्तव रस्त्यावर सोडू लागली. दुष्काळाच्या भीषण बातम्या ऐकून ज्योतिराव व सावित्रीबाईंचे काळीज हेलावले. त्यांच्यासाठी ताबडतोप मदत करावी या हेतूने ज्योतिरावांनी 'व्हिक्टोरिया बालाश्रम' सावित्रीबाईंच्या सहकार्याने सुरु करुन एक अन्नछत्र उभारले. दररोज

सुमारे दोन हजार भाकरी दुष्काळग्रस्त लहान मुले, अंध–अपंगांना फुकट वाटल्या जात. त्यांना आश्रमात आश्रय दिला जाई. ज्योतिरावांची जनतेला मदत करण्याची तीव्र इच्छा, सावित्रीबाईंचे सक्रिय सहकार्य, मित्रमंडळींकडून होणारी मदत यामुळे हजारो लोकांना जीवनदान मिळाले.

धनकवडी येथे उभारलेल्या 'व्हिक्टोरिया बालाश्रम' या अन्नछत्राचे काम कसे चालत असे यासंबंधी गणपत काळे यांनी आपल्या आठवणी सांगितल्या आहेत. अन्नछत्रात वाटल्या जाणाऱ्या भाकरीसाठी नियम होते. हा नियम अर्थातच लहान मुलांच्या हितासाठी होता. अन्नछत्रात दिल्या जाणाऱ्या भाकरी तेथेच बसून खाव्यात असा नियम घातला होता. लहान मुलांनी भाकरी बाहेर नेल्यास त्यांची भाकरी कोणी नेईल किंवा मुलांचे आईबाप स्वतःच खातील या भीतीमुळे भाकरी बाहेर नेऊ दिली जात नसे. हे अन्नछत्र उभाण्यासाठी ज्योतिरावांच्या बरोबरीने सावित्रीबाईंचा सहभाग होता. कारण या अन्नछत्रांची जबाबदारी पूर्णपणे सावित्रीबाईच पाहात होत्या. सत्यशोधक कार्यकर्त्यांच्या मदतीने गावोगाव फिरुन मदतनिधी, धान्य, कपडे जमा केले जाई. ह्याचे सर्व व्यवस्थापन सावित्रीबाई व त्यांच्या सहकारी मैत्रिणी पाहात असत. सत्यशोधक समाजातर्फे विविध ठिकाणी ५२ अन्नछत्रे उघडली गेली. हजारो लोकांच्या जेवणाची व्यवस्था केली गेली. सावित्रीबाई आणि त्यांच्या सहकारी महिलांनी सौ. सरस्वतीबाई गोवंडे, सौ. जोशी, फातीमा शेख, सखुबाई आल्हाट, सौ. बजाबाई निंबाळकर यांनी दुष्काळात महत्त्वाची भूमिका बजावली. कितीतरी जीवांना जीवदान दिले. अन्नछत्र व छात्रालये चालविण्यासाठी आर्थिक व इतर मदत मिळविली. ज्योतिराव व सावित्रीबाई यांनी पदयात्रा काढल्या. शेतकऱ्यांकडून धान्य मिळविले. इतर आर्थिक मदत उभी केली. हे सर्व करीत असताना सावित्रीबाईंनी जे दुःख जवळून पाहिले, शूद्रातिशूद्रांची अवहेलना पाहिली त्यामुळे त्यांच्या मनाची उलघाल झाली. या दुष्काळाचे जे भयावह चित्र त्यांनी पाहिले ते कारुण्य त्यांच्या काव्यातून उमटले. दुष्काळाचे करुण दृश्य शब्दबद्ध करताना सावित्रीबाई म्हणतात,

''झाडे झुडपे वाळून जाती । उजाड झाला सर्व देश ।
गुरे मरती रानावनात । माणसे मरुन पडती घरात ।।
त्यांची प्रेते कुजून जाती । जिकडे तिकडे दुर्गंधी ।।

दुष्काळ ही पापाची गती । शूद्रादि अतिशूद्र भोगती ।
चमचमीत खाऊन वदती । पुण्यातील पुण्यवान ।।
नाना कथा चित्र–विचित्र । दावती खोटीपुराण सूक्ते ।
धर्म कर्माची भयचित्रे । सर्वांपुढे करुनिया ।।''[३०]

या काव्यात झाडे, प्राणी व माणसे यांची दुष्काळामुळे होणारी करुण स्थिती आणि त्याचबरोबर दुष्काळात सापडलेल्या शूद्रातिशूद्रांची सधन उच्चवर्णीयांकडून होणारी अवहेलना यांचेही उपरोधिक वर्णन केले आहे. सावित्रीबाई दुष्काळाचे नुसते वर्णन करुन थांबत नाहीत तर दुष्काळनिवारणासाठी स्वतःला झोकून देऊन दुष्काळग्रस्तांच्या मदतीचे कार्य करतात. या दुष्काळातील ज्योतिराव व सावित्रीबाई यांच्या मनातील मानवतेच्या कळवळल्या बद्दलची आठवण सांगताना, ज्योतिरावांचे सहकारी ग्यानोबा कृष्णाजी ससाणे यांनी १८७७ साली घडलेला प्रसंग सांगितला आहे. त्यावेळी ज्योतिरावांनी गोऱ्हे येथील दगडाच्या खाणीतून दगड बाहेर काढण्याचे काम स्वीकारले होते. त्या कामावर मजुरांवर देखरेख करण्याचे काम ग्यानोबा ससाणे करीत होते. त्या कामावरील एक मुलगा काही कामानिमित्त ग्यानोबांनी पुण्याला आणला होता. त्याला ग्यानोबांनी बाहेर बसायला सांगून त्यांच्या घोंगडी व वहाणांवर लक्ष ठेवण्यास सांगितले. आतमध्ये सावित्रीबाईंनी ज्योतिरावांबरोबर ग्यानोबांनाही जेवणासाठी ताट केले. मात्र तो मुलगा बाहेर उभा असल्याचे ज्योतिराव किंवा सावित्रीबाईंना माहित नव्हते. जेवायला बसण्यापूर्वी पुन्हा एकदा ग्यानोबांनी त्या मुलास वहाणा आणि घोंगडीवर लक्ष ठेवण्यास ओरडून सांगितले. त्यामुळे तो मुलगा घराबाहेर उभा असल्याचे दोघांना समजले. भरल्या ताटावरुन ज्योतिराव बाहेर आले. त्यांनी त्या मुलाला जेवणाबद्दल विचारले. तो मुलगा उपाशी आहे कळल्यावर त्याचे मन कळवळले. आणि मग ज्योतिराव व सावित्रीबाई दोघेही ग्यानोबाच्या अशा वागण्यावर रागावले. यावर ग्यानोबांनी दिवस दुष्काळाचे असल्यामुळे त्याला जेवायला बोलावले नसल्याचे सांगितले पण ज्योतिरावांना ते खपले नाही. त्यांनी त्या मुलास आपल्याबरोबर जेवायला बसविले, आपल्या ताटातील भाकरी त्याच्या ताटात वाढली. त्या मुलाने जेवणास सुरुवात केल्यावर मग ज्योतिराव जेवायला बसले. सावित्रीबाईनी ग्यानोबांना दुष्काळ असला तरी तुम्हांला मिळालेल्या भाकरीतील थोडी भाकरी देऊन स्वतः खायची

होती, पण या पोराला उपाशी ठेवून तुम्ही जेवायला बसलाच कसे? असे प्रश्न विचारुन कानउघाडणी केली.

भुकेलेल्यांना अन्न व तहानलेल्यांना पाणी देऊन प्रसंगी स्वत: उपाशी राहून मानवतेने कसे वागावे याचा वस्तुपाठ देणारे सावित्री–ज्योतिबा हे जोडपे एकमेकांना अनुरुप होते. ज्योतिरावांनी एखादे कार्य सुरु करावे आणि सावित्रीबाईंनी ते यशस्वी करावे, ज्योतिरावांनी एखादी कल्पना मांडावी आणि सावित्रीबाईंनी ती प्रत्यक्षात आणण्यासाठी अबोलपणे पण मन:पूर्वक सहकार्य करावे. अशी एकवाक्यता, अनुरुपता असणारी दांपत्य इतिहासात फार दुर्मिळ आहेत. परस्परसहकार्य, परदु:खाची जाणीव आणि त्यासाठी स्वत: त्रास सहन करण्याची तयारी या गुणांचा मनोहर संगम सावित्रीबाईंमध्ये आढळतो. दुष्काळपीडितांना साहाय्य करण्यासाठी ज्योतिराव यांनी सावित्रीबाईंच्या सहकार्याने सुरु केलेला हा आश्रम इ.स. १८७९ अखेरपर्यंत चाललेला होता. यासाठी सर्व आर्थिक सहाय्य ज्योतिरावांनी स्वत: केले. दुष्काळ संपेपर्यंत रोज भाकरी वाटण्याची चोख व्यवस्था व उत्तम कार्य सावित्रीबाईंनी करुन मानवतेची महान सेवा केली.

२८ नोव्हेंबर १८९० रोजी सावित्रीबाईंना पतिवियोगाचे दु:ख भोगावे लागले, ज्योतिरावांचे महानिर्वाण झाले. त्यांच्या निधनानंतर सावित्रीबाईंना एकामागून एक संकटांना तोंड द्यावे लागले. सोन्याने अग्निपरीक्षा देऊन आणखी तेजवान व्हावे तद्वत संकटांच्या अग्निपरीक्षेतून सावित्रीबाईंचे तेजपु:ज निर्व्याज, निर्मळ व्यक्तिमत्त्व झळाळून निघाले. भाऊबंदकी, द्वेष, मत्सर आणि आर्थिक ओढाताण याला त्यांना तोंड द्यावे लागले. ६ मार्च १८९५ रोजी स्वत:च्या मुलीप्रमाणे कौतुकात वाढविलेली लाडकी सून 'राधाबाई' हिचे दु:खद निधन झाले. यामुळे सावित्रीबाई खरेच एकाकी झाल्या. कारण या काळात मुलगा 'यशवंत' डॉक्टर झाल्याने नोकरीनिमित्त पुण्यापासून दूर राहत असे. त्यामुळे त्यांनी स्वत:ला सत्यशोधक समाजाच्या कार्यात सर्वस्वी वाहून घेतले. सर्वसामान्य माणसे संकटाने खचतात परंतु असामान्य माणसे संकटांशी मुकाबला करुन जिद्दीने कार्यपूर्ती करतात. पुन्हा एकदा महाराष्ट्राला इ.स. १८९६ खाली दुष्काळाने ग्रासले. यावेळी सावित्रीबाईंबरोबर त्यांचा प्रेरक सहकारी ज्योतिराव नव्हते. तरी मानवतेच्या असीम प्रेरणेने स्वत:च्या वैयक्तिक सुख–दु:खाला बाजूला सारुन सावित्रीबाई दुष्काळपीडितांच्या सहकार्याला धावल्या. दुष्काळाच्या खाईत

उपाशी मरणाऱ्या असहाय्य जनतेला पाहून त्यांचा जीव कासावीस झाला. सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांना त्यांनी एकत्रित केले. त्यांच्या नेतृत्वाखाली दुष्काळाचा सामना करण्यासाठी समाजाच्या शिष्टमंडळांनी सरकार दरबारी निवेदन दिले. दुष्काळी कामे व इतर सहाय्य देण्याची मागणी सरकारकडे केली. शेतसारा सूट, कर्ज तहकुबी मिळविण्यासाठी सावित्रीबाईंनी जीवाचे रान केले. अविश्रांतपणे दूष्काळग्रस्तांना मदतीचा हात दिला.

सावित्रीबाईंचे दुष्काळातील कार्य पाहून बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी आर्थिक मदत केली. सावित्रीबाईंनी दुष्काळातील लोकांचे हाल पाहून सर्वांकडची मदत स्वीकारली मात्र ख्रिस्ती मिशनऱ्यांची मदत स्वीकारली म्हणून सनातनी लोकांनी त्यांची धर्मद्रोही म्हणून हेटाळणी करण्यास सुरुवात केली. त्यावर हेटाळणी करणाऱ्यांना सडेतोड उत्तर देऊन सावित्रीबाईंनी निरुत्तर केले. या संकटात अभागी लोकांना मदत करण्याऐवजी व्यर्थ वाचाळपणा करणाऱ्यांना माणुसकीचा धर्म लोपला आहे का? स्त्रियांचे, शूद्रातिशूद्रांचे, शेतकऱ्यांचे हाल पाहून त्यांना लाज का वाटू नये? असा प्रश्न केला. आणि दुष्काळग्रस्तांना मदत करण्याचे चालू ठेवून धाडसी व जीवनदायी कार्य नेटाने केले. गौतमबुद्धाची करुणा. कर्णाचे दातृत्व आणि धाडसी नेतृत्व या गुणांमुळे सावित्रीबाईंच्या कार्याला वेगळे परिणाम प्राप्त होते.

## ५.१.१०. प्लेगच्या साथीमध्ये सावित्रीबाईंनी केलेले कार्य :

महात्मा ज्योतिरावांच्या निधनानंतर, तरुण सुनेच्या मृत्यूचा धक्का, त्यांनतर दुष्काळात केलेले अथक परिश्रम आणि सतत संघर्षाचे वातावरण. आर्थिक ओढाताण एक ना अनेक कारणांनी सावित्रीबाईंच्या मनावरील ताण वाढत होता. पण मनापेक्षा शरीरावरही मोठा ताण येत होता. महाराष्ट्रातील दुष्काळ संपण्यापूर्वीच आणखी एक संकटाला सामोरे जावे लागले. इ.स. १८९७ मध्ये प्लेगची साध सुरु झाली. प्लेगच्या साथीने असे थैमान घातले की कुटुंबाच्या–कुटुंब, वाड्या, वस्त्या या साथीला बळी पडू लागल्या. सगळीकडे हाहाकार उडाला. लोक घरेदारे सोडून रानावनात राहायला गेली. गावेच्या गावे ओस पडली.

त्यावेळी सावित्रीबाईंचा दत्तक पुत्र यशवंत सैन्यात सिव्हिल सर्जन म्हणून अहमदनगर येथे सरकारी नोकरीस होता. प्लेगने हजारो लोकांना मृत्यूच्या खाईत लोटले होते. ही साथ

एवढी पसरली की वैद्यकीय मनुष्यबळ, जीवरक्षक औषधांच्या तुटवडा निर्माण झाला. प्लेगच्या साथीत इंग्रज अधिकारी प्लेगबाधित लोकांना मदत करण्याऐवजी इंग्रज सैनिक टोळ्या करुन फिरु लागले. रोगी आढळल्यास असेल त्या स्थितीत उचलून नेऊ लागले. मात्र हा नेलेला रोगी त्यांच्याबरोबर जात असे तो कधीही त्याच्या जीवलग नातलगांना न भेटण्यासाठीच. त्यामुळे या जुलुमजबरदस्तीला लोक घाबरु लागले. प्लेग या रोगाएवढीच भीती इंग्रज अधिकाऱ्यांची वाटू लागली. रोग परवडला पण उपचार नको असे जनतेला वाटू लागले. पण पुणे परिसरात जीवघेण्या प्लेगची अशी साथ पसरली की शेकडो लोक मृत्यूमुखी पडू लागले.

या आपत्तीत सापडलेल्या जनतेला कोणीच वाली राहिला नाही. असे जनतेला वाटू लागले. त्याचवेळी सावित्रीबाईंच्या नेतृत्वाखाली सत्यशोधक समाजाची मंडळी या दीनदुबळ्या जनतेला. मदत करण्यासाठी पुढे सरसावली. प्लेगच्या आटोक्याबाहेर गेलेल्या साथीला रोखण्यासाठी सावित्रीबाईंनी प्लेग निवारण केंद्रे सुरु केली. सावित्रीबाईंनी स्वतः पुढाकार घेऊन, कष्ट उपसून लोकांना धीर देऊन ही केंद्रे चालवली. रात्रंदिवस त्यांनी स्वतःला या सेवाकार्यात झोकून दिले. प्लेग बाधित झालेल्या लोकांना धीर देणे, औषधोपचार देणे, प्लेग, निवारण केंद्रात आणणे अशी एक ना अनेक कामे सावित्रीबाई करीत होत्या. पण प्लेगची साथ दिवसेंदिवस वाढत होती. प्लेगच्या साथीचा मुकाबला करण्यास सरकार अयशस्वी झाले होते. आणि सावित्रीबाईंनी सुरु केलेली प्लेग निवारण केंद्रेही अपुरी पडत होती.

प्लेग हा संसर्गजन्य आजार असल्याने प्लेगबाधित रोग्याची सेवा किंवा औषधोपचार करण्यास कोणीही धजावत. नव्हते. कारण या आजाराचा विकोप म्हणजे मृत्यूशी गाठ असे. म्हणूनच या आजाराला 'Black Death ' असेही नाव आहे. 'येरसिनीआ पेस्टिज (Yersinia pestis) या बॅक्टेरियामुळे आणि रोगग्रस्त प्राण्यांच्या अंगावरील पिसवांमुळे प्रसार होणाऱ्या या रोगामुळे सर्वसामान्य जनता पुरती धास्तावली होती. या रोगाची संसर्गजन्यता व गंभीरता एवढी होती की काही वेळा प्लेगची लक्षणे दिसू लागताच रुग्णाची स्थिती गंभीर होई व पाहता–पाहता उपचाराआधीच त्याची प्राणज्योत मावळून जाई. 'ब्युबॅनिक प्लेग' (Bubonic Plague)या प्लेगच्या प्रकारात या आजाराची लक्षणे दोन ते सात दिवस दिसत असत. ताप, डोकेदुखी या लक्षणांबरोबर अतिशय वेदनादायी गाठीचा सामना रुग्णांना करावा लागत असे.

मानेवर, जांघेत किंवा काखेत असणाऱ्या लसिका ग्रंथी सुजल्यामुळे अत्यंत दुखरी गाठ येत असे. त्यामुळे या आजारास लोक 'गोळ्यांचा आजार' असे म्हणत.

सरकारने प्लेग निवारणासाठी रॅण्ड या अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. रॅण्ड हा स्वभावाने उन्मत्त व माणुसकीहीन अधिकारी असल्याने त्याच्या काळात प्लेग साथीला आळा बसण्याऐवजी सामान्य जनतेवर इंग्रज अधिकाऱ्याकडून अत्याचार होऊ लागले. गोऱ्या सरकारी अधिकाऱ्यांनी जनतेचा अनन्वित छळ केला. सर्व शहरावर स्मशानकळा पसरली. लोक देशोधडीला लागले. गोऱ्या अधिकाऱ्यांनी केलेल्या छळाविरुध्दचे निवेदन सरकारला दिले गेले, पण त्याची दाद कोणी घेईना. रॅण्ड साहेब दिवसेंदिवस अधिकाधिक उन्मत्त होऊ लागला. जनतेवर होणारा अन्याय सहन न झाल्याने त्यांच्याविरुद्ध रोष वाढू लागला. हा रोष एवढा विकोपाला गेला की चाफेकर बंधूंनी रॅण्ड या उन्मत्त अधिकाऱ्याचा वध केला. अशा भीषण व आणीबाणीच्या काळात सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते सावित्रीबाईंच्या नेतृत्वाखाली प्लेगच्या रोग्यांना प्लेग निवारण केंद्रात आणत होत्या. स्वत: सावित्रीबाईं दिवसरात्र अखंड सेवाकार्यात मग्न होत्या.

दिवसेंदिवस प्लेगच्या साथीने जास्तच थैमान घालायला सुरुवात केली. त्यामुळे लोकांना आणखी मदत करावी या हेतूने सावित्रीबाईंनी आपला मुलगा डॉ. यशवंत यास रजा काढुन पुण्यास बोलाविले. वानवडी व घोरपडी यांच्या दरम्यान असणाऱ्या ससाणे यांच्या माळरानावर सावित्रीबाईंनी स्वखर्चाने प्लेगरूग्णांच्या सेवेसाठी मोफत खाजगी हॉस्पिटल उभारले. आर्थिक स्थिती चांगली नसतानाही केवळ मानवतेच्या उच्चतम भावनेतून त्यांनी या कार्याला आर्थिक मदत केली. सावित्रीबाई स्वत:च्या वयाची, प्रकृतीची आणि संसर्गजन्य आजाराची पर्वा न करता तन–मन–धनाने प्लेगपीडितांसाठी मदतकार्य करीत होत्या. औषधोपचारासाठी यशवंतच्या हॉस्पिटलमध्ये नेत होत्या. सावित्रीबाईंच्या प्रयत्नाने सेवेने कष्टाने अनेकांचे प्राण वाचवले. अनेक लोक बरे होऊन आनंदाने आपल्या मुलाबाळांत आपल्या घरी सुखरुप गेले.

रोग्याची माहिती कळताच सावित्रीबाईंनी तेथे जावे, नातेवाईंकांना धीर द्यावा, रुग्णाला हॉस्पिटलमध्ये आणावे, आस्थेने विचारपूस करावी हा नित्यनेम झाला होता. रोग्याची माहिती कळताच रुग्णाला औषधोपचार लवकरात लवकर मिळावे म्हणून स्वत: जातीने सावित्रीबाई

वाऱ्यासारख्या फिरत होत्या. अतिश्रमाने थकत होत्या पण मनातून मात्र आजारातून बरे झालेल्या लोकांना पाहून सुखावत होत्या.

एक दिवस मुंढवा गावच्या गावकुसाबाहेर असणाऱ्या, महारवाड्यात राहणाऱ्या पांडुरंग बाबाजी गायकवाड या महार जातीतील अनाथ मुलास प्लेगची बाधा झाल्याची बातमी सावित्रीबाईंना समजली. या अनाथ मुलाला जवळचे असे कोणी नातेवाईक नव्हते. मृत्यूच्या जबड्यात पडलेल्या मुलास मदत करण्यास कोणीही धजेना. तापाने फणफणलेल्या व काखेत गोळा येऊन असहाय्य अशा वेदना भोगणाऱ्या त्या मुलास मदतीचा हात कोणीचा देईना. त्याच्या जवळही कोणीच जायला तयार नव्हते. सावित्रीबाई  या ममतेचे वात्सल्याचे व मानवतेचे मूर्तीमंत महान प्रतीक होत्या. कशाचीही पर्वा न करता सावित्रीबाई पुढे झाल्या. त्या मुलाची मरणासन्न अवस्था पाहून त्यांच्या ह्रदयातील मातृत्व जागृत झाले. त्याक्षणी त्यांच्या ह्रदयात कालवाकालव झाली. सेवाभाव जागृत झाला. प्रत्यक्ष मृत्यूला कवटाळण्याचा धाडसी निर्णय त्यांनी क्षणात घेतला. त्या अगतिक जीवाला त्यांनी कष्टाने आपल्या पाठीवर घेतले. औषधोपचार लवकरात लवकर व्हावेत म्हणून सावित्रीबाईंची थकली पाऊले तरीही वानवडीची, डॉ. यशवंताच्या हॉस्पिटलची वाट चालू लागली. वाट चालताना जणूकाही त्या मृत्यूचीच वाट चालत होत्या. परंतु त्याची त्यांना पर्वा नव्हती.

मानवतेच्या कल्याणार्थ सावित्रीबाईंनी अवघे जीवन व्यतित केले आणि आता प्लेग हा संसर्गजन्य रोग आहे हे माहीत असतानादेखील एका अनाथ बालकाला वाचविण्यासाठी स्वत:च्या जीवाची बाजी लावली. कारण त्या मुलाला पाठीवरून नेत असतानाच सावित्रीबाईंनाही प्लेगने गाठले. त्यांचे अंग तापाने फणफणले, काखेत गोळा आला. असह्य वेदना सुरु झाल्या. त्याही परिस्थितीत सावित्रीबाईंनी हॉस्पिटल गाठले. मुलाला उपचारासाठी डॉ. यशवंताच्या स्वाधीन केले. त्या अनाथ मुलाचे प्राण वाचले मात्र अनाथांच्या माऊलीने जगाचा कायमचा निरोप घेतला.

१० मार्च १८९७ रोजी सावित्रीबाईंनी इहलोकाची यात्रा संपविली. पण सावित्रीबाईंसारख्या व्यक्ती मरणोत्तरही अखंड जगत असतात. आपल्या कार्याने, अलौकिक सेवा, करुणेने सावित्रीबाईंनी अखिल  मानवजातीला अनोखा आदर्श घालून दिला आहे.

सावित्रीबाई खऱ्या अर्थाने देवघरातील समईच्या ज्योतिप्रमाणे समाजासाठी, माणुससेवेसाठी कणाकणाने जळतच राहिल्या.

एक वैदिक प्रार्थना म्हणते,

'ना, त्वहं कामये राज्यं,
न स्वर्ग, न पुनर्भवम्।
कामये दु:खतप्तानां प्राणीनां आर्तनाशनम्।।'

म्हणजे हे मानवा, तू राज्य, स्वर्गादी भोग पुन्हा – पुन्हा मिळण्याची आस धरु नकोस. तर जगातील दु:खितांच्या यातना नाहीशा होण्यासाठी प्रयत्न कर. सावित्रीबाईंनी त्यांच्या वैयक्तिक जीवनात लौकिकार्थाने सुखाची मागणी, एखाद्या पुरस्काराची अपेक्षा किंवा अधिकारपदाची लालसा कधीच धरली नाही. तर शूद्रादिशूद्रांना 'बंधुनो' अशी हाक देत अज्ञानातून मुक्त होण्यासाठी ज्ञानवंत व्हा, शिक्षण घ्या, खुळ्या रुढी परंपरांना बाजूला सारा, वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारा, अंधश्रद्धांना मूठमाती द्या, भूकेलेल्याला भाकरी, तहानलेल्या पाणी द्या हे नुसते सांगितले नाही तर कृतीतून हे भगीरथ कार्य केले आहे, आणि जीवनातल्या शेवटच्या क्षणीही जगातील दु:ख यातना दूर करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. उपरोक्त प्रार्थनेचे अगदी तंतोतंत पालनच सावित्रीबाईंनी केले आहे असे म्हणायला हरकत नाही.

## ५.२. शैक्षणिक कार्य :

### प्रस्तावना :

ज्योतिरावांनी स्त्री शिक्षणाचा पाया घालून फक्त स्त्रियांसाठीच नाही तर शूद्रातिशूद्रांसाठी ज्ञानगंगा खुली करुन दिली. याच ज्ञानगंगेचा लाभ सर्व स्त्री जातीस होण्यासाठी सावित्रीबाईंनी केलेले शैक्षणिक योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. ज्ञान ही फार मोठी शक्ती असून स्त्रिया आणि दलित–बहुजन वर्गाची उन्नती ज्ञानाशिवाय होऊ शकणार नाही, हे ओळखून प्रत्यक्ष शिक्षणप्रसाराच्या कार्याला त्यांनी स्वत:ला आयुष्यभर वाहून घेतले. संपूर्ण देशात मुलींची शाळा आणि 'नेटीव्ह लायब्ररी' सर्वप्रथम सुरु करण्याचे श्रेय ज्योतिरांव व सावित्रीबाई यांच्याकडे जाते. देशातील स्त्री – शूद्रातिशूद्र वर्गाची समग्र सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक

चळवळ उभारण्याचे क्रांतिकारक असे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले. स्त्रियांची गुलामगिरीतून मुक्तता व्हावी यासाठी दोन हजार वर्षात अनेक अयशस्वी प्रयत्न झाले. पण स्त्रियांना खऱ्या अर्थाने बंधमुक्त करुन त्यांच्या जीवनाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम १९व्या शतकात महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी केले. शैक्षणिक गुलामगिरी विरुद्ध पहिले 'बंड' केले ते सावित्रीबाई फुले यांनीच. त्यांच्यामुळेच भारतीय महिलांना शिक्षणाची संधी मिळाली. सावित्रीबाईंमुळेच शैक्षणिक क्रांतीचा श्रीगणेशा झाला.

भारतवर्षाला धर्मशास्त्रातील जात, वर्ण, लिंग विषमतेचा कलंक आहे. त्यामुळेच भारतीय स्त्रीला हजारो वर्षे शिक्षणाची दारे बंद होती. धर्मग्रंथांचा त्याला आधार होता. या धर्मशास्त्रांच्या अभेद्य भिंती फोडून ज्ञानाचा प्रकाश भारतीय स्त्रीच्या अंगणात आणण्याचे ऐतिहासिक कार्य क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी केले. शिक्षिका, लेखिका, कवयित्री, माता, समाजसेविका अशा विविध भूमिकेतून सावित्रीबाईंनी समाजातील गोरगरीब, दुर्बल घटकांची सेवा करण्यात आपले सारे आयुष्य पणाला लावले. समाजातले स्त्रीदास्यत्व मिटविण्यासाठी स्त्रियांनी शिकून सवरून स्वावलंबी बनावे, म्हणजे त्यांना आपल्या खऱ्या शक्तीची ओळख होऊन पुरुषप्रधान समाजाची गुलामगिरी पत्करण्याची वेळ येणार नाही, असे ठाम मत त्यांनी स्त्रियांपुढे मांडले.

### ५.२.१ भारतातील पहिली स्त्रीशिक्षिका :

अज्ञान जातिभेद, स्त्री–पुरुष भेदाभेद मिटविण्यासाठी फुले दांपत्यांनी १८४८ रोजी पुणे येथे मुलींची पहिली शाळा सुरु केली. ही शाळा पुढे भारतातील पहिली मुलींची शाळा म्हणून गणली गेली. सावित्रीबाईंनी याच शाळेत पहिली भारतीय शिक्षिका म्हणून पाऊल ठेवले त्यांचे शैक्षणिक क्षेत्रात ठामपणे पडलेले पहिले पाऊल म्हणजे स्त्रीमुक्तीची पहिली मोठी झेप होती.

पण हे शैक्षणिक कार्य करताना भारतातील पारंपारिक समजूती आणि रुढींमुळे त्यांना भरपूर मानसिक आणि शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागले. डॉ. रामचंद्र देखणे म्हणतात, ''शाळेत शिकविण्याबद्दल गावातील टारगट गुंडांकडून त्यांना खूप त्रास झाला. टिंगळटवाळी झाली. एकदा तर सावित्रीबाईंनी एका गुंडाच्या थोबाडीत ठेवून दिली आणि मग हा विरोध थोडाफार मावळला.''[३१] शिव्याशाप शांतपणे ऐकत सावित्रीबाई काम करीत होत्या. त्या शाळेत जाताना–येताना टोळभैरव मुद्दाम रस्त्यावर थांबत. अचकट–विचकट बोलत. अंगावर चिखल,

शेण, दगड टाकीत. शाळेत जाताना खराब झालेली साडी शाळेत गेल्यावर बदलावी लागे. दुसरी परतताना खराब होई. तरीही सावित्रीबाई आपल्या कामात खंड पडू देत नव्हत्या.

हा छळ असाच चालू राहिल्याने त्यांच्या व लहान मुलींच्या संरक्षणासाठी संस्थेने एका शिपायाची नियुक्ती केली. बळवंतराव सखारामजी कोल्हे यांनी लिहून ठेवलेल्या आठवणीनुसार आपल्या अंगावर दगड किंवा चिखल फेकणाऱ्यांना अगदी शांतपणे सावित्रीबाई म्हणत, ''माझ्या लहानथोर बंधूंनो, तुम्ही मला उत्तेजन देण्यासाठी आपण माझ्यावर हे शेण अगर खडे फेकीत नसून ही फुले उधळीत आहात, मी माझ्या भगिनींना शिकविण्याचे पवित्र कार्य करित आहे. ईश्वर तुम्हाला सुखी ठेवो.''[३२] सावित्रीबाईंचा पोशाख अगदी साधा असे. त्यांच्या अंगावर अलंकार नसत. त्यांच्या गळ्यात एक पोत व मंगळसूत्र आणि कपाळावर भले मोठे कुंकू लावलेले असे.

## ५.२.२ शैक्षणिक कार्याला विरोध व गृहत्याग :

१८७४ मध्ये सावित्रीबाईंनी नॉर्मल स्कूलमधून शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले. महात्मा फुले यांनी सुरु केलेल्या पुण्याच्या बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यातील शाळेत त्यांनी शिक्षिका म्हणून काम केले. याचबरोबर उस्मान शेख यांच्या वाड्यात प्रौढांसाठी शाळेची स्थापना करुन तेथे अध्यापनाचे कार्य केले. शूद्रातिशूद्र व स्त्रीवर्गाला शिक्षण मिळावे म्हणून घरच्यांचा विरोध पत्करुन ज्योतिराव फुले यांच्यासमवेत गृहत्याग केला.

पुण्यासारख्या सनातनी शहरात तत्कालीन कर्मठ उच्चवर्णियांच्या विरोधाला धैर्याने तोंड देत सावित्रीबाई व ज्योतिबा यांनी अस्पृश्य आणि स्त्री यांच्या शिक्षणाचा प्रपंच उभा केला. ज्योतिबांच्या खांद्याला खांदा लावून सावित्रीबाईंनी या कार्यात आपले योगदान दिले. रावसाहेब चोले म्हणतात, ''अस्पृश्य मुलामुलींना शाळेत आणणे, त्यांना टिकवून ठेवणे, कसलेही मानधन न घेता पदराला खार लावून हा शिक्षणाचा महायज्ञ चालू ठेवणे एवढे दुरापास्त कार्य सावित्रीबाईंसारखी धैर्याचा महामेरु असलेली 'सबला' स्त्रीच करु शकते.''[३३]

विद्येमुळे माणसाला मनुष्यत्व प्राप्त होते. शूद्रांना विद्या देणे हे मानव धर्माचे काम आहे, ते प्रत्यक्ष देवाचेच काम आहे. असे शूद्रादिशूद्रांच्या शिक्षणाविषयी सावित्रीबाईंना वाटत असे. त्यांनी आपले विचार स्पष्टपणे मांडले आहेत.

महात्मा फुले यांनी सावित्रीबाईंना स्वत: शिक्षण देणे आणि त्यांचे शाळेत नियमित येणे ही स्थिती सनातनी बालेकिल्ल्यात आव्हान  निर्माण करणारी होती. चूल आणि मूल यांत अडकून न पडता उंबरठा ओलांडण्याचे धाडस दाखवून सामाजिक कार्यात सहभाग नोंदवणारी महाराष्ट्रातील पहिली स्त्रीशक्ती म्हणून सावित्रीबाईंची ओळख आहे. रुढीप्रिय समाजव्यवस्थेत शूद्र गणल्या जाणाऱ्या स्त्रीने कृतीशील होऊन परिवर्तनाचा लढा लढणे उच्चवर्णीय व्यवस्थेला पचणारे नव्हते. त्यांनी प्रचंड विरोध केला. ज्योतिरावांच्या वडिलांवरील दबाव सातत्याने वाढत गेला. परिणामत: ज्योतिरावांच्या वडिलांनी त्यांना सूनबाई सावित्रीसह घराबाहेर पडण्यास भाग पाडले. हाती असलेले कार्य मध्येच सोडून देणे ही भावना ज्योतिराव आणि सावित्रीबाईंना मुळीच मानवणारी नव्हती. सनातन्यांचे भरपूर अडथळे असूनही सावित्रीबाईंचे धाडस हे त्यांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाचे लक्षण होते. सावित्रीबाईंचे व्यक्तिमत्त्व नैतिक धैर्य आणि कार्यनिष्ठा या भूमिकेशी निगडित होते. शोषणावर आधारलेला जुलमी प्रथा परंपरांना त्यांनी प्राणपणाने विरोध केला.

अतिशूद्र म्हणून गणलेला वर्ग आणि स्त्रिया यांच्या शिक्षणाचे मोलाचे कार्य या दांपत्याकडून प्रभावीपणे अथक अशा स्वभावातून घडते ही बाब विलक्षण लक्षणीय होती. तत्पूर्वी महाराष्ट्रात वीस –पंचवीस वर्षे अगोदर ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे शिक्षणप्रसाराचे कार्य लक्षात घ्यावे लागते. त्यांची योजनाबद्ध स्वरूपातील कार्यपद्धती आणि व्यवस्थेचे पद्धतशीर निरीक्षण महात्मा फुले आणि सावित्रीबाईंनी केले. स्त्रिया आणि वंचित, उपेक्षित वर्गासाठी प्रत्यक्ष कार्याला सुरुवात करताना अहमदनगर येथील फेरार मॅडम यांची कन्याशाळा आणि एकूणच मिशन यांच्या शैक्षणिक व्यवस्थेचा अभ्यास सावित्रीबाईंनी केला. तेथील गोषवारा त्या घेतात, हे ध्यानी घ्यावे लागेल. मुलींच्या शिक्षणाकरिता धर्माची अनुज्ञा नाही अशी समजूत असणाऱ्या पोथिपढिक पंडित वर्गाच्या काळात पुण्यास परतल्यावर अस्पृश्य वर्गातील मुलींकरिता एक शाळा ज्योतिराव आणि सावित्रीबाई सुरु करतात ही बाब विलक्षण धाडसाची होती.

सावित्रीबाई ह्या भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका आहेत. त्यांनी विनावेतन शिकविले. विनावेतन प्रमाणिकपणे कार्य करणाऱ्या सावित्रीबाईंना कोणताही पुरस्कार मिळाला नाही. उलट

त्याकाळी त्यांचा तिरस्कारच केला गेला. तरीही शिक्षणाने आत्मसन्मानाची जाणीव, दु:ख निवारण्याची संधी प्राप्त होते हे त्या जाणून होत्या.

सावित्रीबाईंच्या शैक्षणिक योगदानाबद्दल उत्तम कांबळे म्हणतात, ''शाळेत पहिल्यांदा पाऊल ठेवलं, तेंव्हा तुला शाळेत कोण घेऊन गेलं होतं... ? असं मला कोणी विचारलं तर मी उत्तर देतो की, माझ्या आजीनं मला शाळेत नेलं, पण आजीतही सावित्रीबाईच लपलेली होती, हे कळायला तसा उशीरच झाला. सावित्रीबाई नसत्या तर महाराष्ट्र साक्षर व्हायला अजून शे-दोनशे वर्षांचा काळ लागला असता आणि महिलांना आत्मसन्मान काय असतो, हे कळायला शे-पाचशे वर्ष लागली असती.''[३४]

अभिरुचीसंवर्धन व चारित्र्याची जडणघडण या गोष्टीमुळे फुल्यांच्या शाळांमध्ये कटाक्षाने लक्ष दिले जात असे. त्यामुळे फुले दांपत्याच्या शाळांमधील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने वाढली. इतकेच नव्हे तर, फुल्यांच्या शाळेतील मुली परीक्षेतही सरकारी शाळेतल्या मुलांपेक्षा गुणवत्तेस सरस ठरल्या. परिणामी फुले दांपत्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरीची सर्वदूर प्रशंसा झाली. शैक्षणिक क्षेत्रातल्या मौलिक कार्याबद्दल १८५२ मध्ये इंग्रज प्रशासनाने फुले दांपत्याचा समारंभपूर्वक सत्कार केला. याप्रसंगी मेजर कॅंडी यांनी इंग्रज सरकारचे निवेदन वाचून दाखवून या दांपत्याचा शालजोडी देऊन गौरव केला. ज्योतिरावांच्या समता, सत्यपरायणता, मानवतावाद या तत्त्वांचा अंगीकार करुन त्यासाठी सावित्रीबाईंनी आपले सारे जीवन व्यतीत केले. शिक्षणाची महती गाताना सावित्रीबाई म्हणतात,

''शिक्षणाने मनुष्यत्व
पशुत्व हरते पहा ।
विद्या हे धन आहे ।
श्रेष्ठ साऱ्या धनाहून
तिचा साठा जयापाशी ।
ज्ञानी तो मानती जन।''[३५]

शिक्षणामुळे आत्मभान येते, आत्मसन्मानाची जाणीव होते, हे सांगताना सावित्रीबाई माणसातील मनुष्यत्वाचा विकास आणि पशुत्वाचा अंत होतो हे मोठ्या खुबीने वर्णन करतात.

शिक्षण हे परिवर्तनाचे मोठे साधन आहे याची सावित्रीबाईंना जाणीव होती. कारण शिक्षणामृताची चव चाखलेल्या प्रत्येकाला याच्या फायद्याची जाणीव निश्चित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासाठीच 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र स्त्री–शूद्रातिशूद्रांना देतात. ही परंपरा आपल्याला नेल्सन मंडेलापर्यंत पुढे नेता येते. कारण त्यांचा संघर्ष वर्णद्वेषाविरुद्धचाच होता ते म्हणतात, "Education is the most powerful weapon which you can use to change the world." म्हणजेच शिक्षण या शक्तीशाली शस्त्राचा उपयोग जग परिवर्तनासाठी करु शकतो.

हीच गोष्ट आलंकारिक भाषेत सांगताना सावित्रीबाईंनी 'विद्येला' अमूल्य अशा श्रेष्ठ धनाची उपमा देऊन गौरविले आहे. धनवानाचा आणि असे अमोलिक ठेवा असणारे धन ज्याच्यापाशी त्याला कशाची कमतरता पडणार नाही तर तो मानाचाही धनी होईल,

## समारोप :

प्रौढ शिक्षण, रात्रशाळा इत्यादी योजनांच्या जन्मदात्री सावित्रीबाई होत. म्हणूनच त्या एक शिक्षणतज्ञ होत्या, असे म्हणावे लागेल. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर त्यांच्या कौटुंबिक परिस्थितीचा व सामाजिक वातावरणाचा परिणाम होतो, हा विचार सावित्रीबाईंनी स्वानुभवातून मांडला.

त्यामुळे सावित्रीबाई ह्याच आद्य भारतीय स्त्रीशिक्षिका आणि मुख्याध्यापिका होत. पहिली समाजसेविका, दीनांची सावली, स्त्रीमुक्तीच्या आद्यप्रणेत्या, ज्ञानज्योती, क्रांतिज्योती, क्रांतिदेवता, भारतीयांची ज्ञानाई, कृतिशूर समाजक्रांतिकारक, विवेकी विचारवंत, स्त्रीरत्न, क्रांतिकारी व्यक्तिमत्त्व म्हणजे सावित्रीबाई हे त्यांच्या एकूणच कार्यावरुन अधोरेखित होते.

## संदर्भ सूची :

१. वैद्य सरोजिनी, ''श्रीमती काशीबाई कानिटकर : आत्मचरित्र आणि चरित्र'', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दु.आ. १९८०, पृ. १७.

२. सूर्यवंशी राजाराम, ''युगस्त्री : सावित्रीबाई फुले'', मावळाई प्रकाशन, पुणे, ति.आ.२०१०, पृ.६५.

३. तत्रैव, पृ.७२.

४. खोले विलास (संपा), ''ताराबाई शिंदे लिखित स्त्री–पुरुष तुलना'' (यथा मूल संबोधित आकृती) प्रतिमा प्रकाशन, पुणे, दु.आ. १९९९, पृ,२७.

५. तत्रैव, पृ.२७.

६. पाटील पंढरीनाथ, ''महात्मा ज्योतिराव फुले चरित्र'', महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, द्वि. आ. १९८४, पृ.३९.

७. माळी मा. गो. (संपा.), ''सावित्रीबाई फुले: समग्र वाङ्मय'', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, च.आ. ऑक्टो २००६, पृ. ७३.

८. तत्रैव, पृ.७३.

९. कांडगे राम, ''क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले'', राजश्री प्रकाशन, चाकण, पुणे, प्र.आ. जाने. २०१४, पृ. ६०.

१०. तत्रैव, पृ.६०.

११. साळुंखे पी.बी. व इतर (संपा), ''महात्मा फुले गौरव ग्रंथ'', महाराष्ट्र शासन, मुंबई, प्र.आ. जुलै १९८२, पृ. ७१.

१२. तत्रैव, पृ. ४४९.

१३. चोले रावसाहेब, ''स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले'', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ. मे २०००, पृ. ५५.

१४. उनि., कांडगे राम, पृ. ६३.

१५. हरी नरके (संपा), ''आम्ही पाहिलेले फुले'', महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, प्र.आ. ६ जून १९९३, पृ.५२.

१६. मालकर कृष्णा, ''क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले:जीवन व कार्य'' चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. २०११, पृ. ४८.

१७. दुर्गे विनायक, ''महात्मा ज्योतिराव फुले'', मिलींद प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १ जाने.२००७, पृ.२२.

१८. उनि., पाटील पंढरीनाथ, पृ. ६५.

१९. उनि., पाटील पंढरीनाथ, पृ. ६६.

२०. ''ग्यानोबा कृष्णाजी ससाणे'', राजमुद्रा प्रकाशन, औरंगाबाद. प्र.आ. जुलै २०००, पृ.१३५.

२१. साळुंखे आ.ह., ''मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती'', लोकवाङ्मय गृह, मुंबई, तृ.आ. ९ जुलै २०००, पृ. १३५.

२२. कीर धनंजय, मालशे स.गं. व इतर (संपा.), ''महात्मा फुले समग्र वाङ्मय'', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, आ. सहावी, नोव्हेंबर २००६, पृ ४१९.

२३. गुंदेकर श्रीराम, ''सत्यशोधकी साहित्याचा इतिहास'', खंड पहिला, सत्यशोधकी साहित्य प्रकाशन, लातूर, प्र.आ. १ मे २०१०, पृ. ३२७.

२४. तत्रैव, पृ. ३२८.

२५. उनि., नरके हरी, पृ. १८६.

२६. तत्रैव, पृ. १८६.

२७. उनि., पृ. १३६.

२८. उनि., नरके हरी, पृ. २६१.

२९. उनि., साळुंखे पी.बी., पृ. ४६०, ४६१.

३०. माळी मा. गो., ''क्रांतिज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले'', आशा प्रकाशन, गारगोटी, कोल्हापूर, प्र. आ. नोव्हें. १९८९, पृ. ३८, ३९.

३१. देखणे रामचंद्र, ''सुधारकांचा महाराष्ट्र'', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र.आ. जून २०१३, पृ.८३.

३२. उनि., नरके हरी, पृ . २४.

३३. उनि., चोले रावसाहेब, पृ. ३५.

३४. कांबळे उत्तम, 'सकाळ' विशेष लेख, ९ ऑगस्ट २०१४, पृ. ७.

३५ लोणकर नूतन, ''युगप्रवर्तक सावित्रीबाई फुले'', प्रतिमा पब्लिकेशन्स, पुणे, प्र.आ. २०१४, पृ. २६.

* * *

## प्रकरण सहावे

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे इतर लेखकांनी केलेले चरित्र लेखन

प्रस्तावना :

६.१ चरित्र व चरित्रात्मक कादंबरी : संकल्पना व व्याख्या

६.२ चरित्रात्मक कादंबरीचे स्वरुप

६.३ चरित्रात्मक कादंबरीची वाटचाल

६.४ सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित चरित्रे आणि चरित्रात्मक कादंबरी

६.५ सावित्रीबाईंच्या जीवनावर आधारित प्रयोग आणि नाटक

समारोप

## प्रकरण सहावे

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे इतर लेखकांनी केलेले चरित्र लेखन

### प्रस्तावना:

सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचा अनेक लेखकांनी परामर्श घेतला आहे. त्यांचे जीवन कार्य समाजास उपयुक्त असेच आहे. सावित्रीबाईंच्या चरित्रातून लेखकांनी त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे सत्यदर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. कारण चरित्रात प्रत्यक्षात होऊन गेलेल्या व्यक्तीची जीवनकथा असल्यामुळे सत्यकथनाची अपेक्षा केली जाते. त्यामुळे चरित्रविषय झालेल्या व्यक्तीच्या जीवनाचा कालखंड आणि विशिष्ट कार्यकर्तृत्व यांचे आकलन करून घेता येते. म्हणजेच चरित्र हा एका व्यक्तीच्या जीवनाचा इतिहास असतो. अ.म.जोशी म्हणतात ''सत्यपूर्ण व कलात्मक व्यक्तिदर्शन म्हणजे देखील चरित्र होय.''[१] चरित्र लेखनाची पहिली अट वस्तुनिष्ठेची असते चरित्र ही एका व्यक्तीच्या संपूर्ण जीवनाची किंवा त्यातील विशिष्ट कालखंडाची कहाणी असते. चरित्र प्रत्यक्ष घडलेल्या घटनाप्रसंगांशी प्रमाणिक राहून लिहिणे आवश्यक असते. परंतु चरित्रकार इतिहासकाराप्रमाणे साधने गोळा करीत असला, तरी चरित्र म्हणजे इतिहास नसतो. चरित्रात व्यक्तीचे दर्शन हे ध्येय असल्याने ते ध्येयसाध्य होण्यासाठी चरित्रकाराजवळ कल्पनाशक्ती असणे आवश्यक ठरते. जन्म आणि मृत्यू या दोन बिंदूमध्ये चरित्रनायकाचे किंवा चरित्रनायिकेचे व्यक्तिमत्त्व कसे घडत गेले हे चरित्रकाराला सांगायचे असते. त्यासाठी चरित्रलेखकाजवळ इतिहासकाप्रमाणे संशोधन दृष्टी व वृत्ती असणे अपरिहार्य ठरते. ऑक्सफर्डच्या कोशात चरित्राची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. "The history of the life in indivisual as a from literature. "[२] चरित्र लेखनाकडे एक कला या दृष्टीने प्रथम:ता पाश्यात्य अभ्यासकांनी पाहिले.

## ६.१ चरित्र व चरित्रात्मक कांदबरी : संकल्पना व व्याख्या :

''चरित्र लेखनाची सुरूवात प्लूटार्क याने लिहिलेल्या 'लाइव्हज् ऑफ द नोबेल ग्रीशन्स ॲण्ड रोमन्स' या अभिजात चरित्रग्रंथापासून झाली.''[३] चरित्र लेखनाची मराठी साहित्याला दीर्घ परंपरा आहे. महानुभव पंथियांच्या चरित्रात्माक लेखनाने या परंपरेचा प्रारंभ झाला. लीळाचरित्र हे मराठीतील आद्यचरित्र आहे. यानंतर संत नामदेव, महिपती ताहराबादकर आदींनींही संत चरित्रे लिहिली आहेत. ''प्रत्यक्षात होऊन गेलेल्या थोर व्यक्तींची जीवनगाथा म्हणजे चरित्र असते.''[४] थोर व्यक्तींच्या व्यक्तित्वातून आणि जीवनशैलीतून सामान्य माणसांना काही मार्गदर्शन व्हावे, त्यांचा आत्मविश्वास वाढावा, जीवनसंघर्षाला आणि प्रतिकूल परिस्थितीला तोंड देण्याचे सामर्थ्य अंगी यावे हा चरित्रलेखनामागील उद्देश असतो. चरित्राप्रमाणे चरित्रात्मक कांदबरी या साहित्यप्रकारातूनही व्यक्तिचित्रण घडविले जाते. चरित्र हा एक व्यक्तिजीवनाचा इतिहास असतो. तशी कादंबरी ही पण व्यक्तिजीवनाचीच एक कहाणी असते.

पुराणकथा, कहाण्या प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत. परंतु कांदबरी ही विशिष्ट संज्ञा त्या साहित्यप्रकाराला लावली जाते, तो मात्र पाश्चात्य वाङ्‌मयाच्या इतिहासात अठराव्या ते एकोणिसाव्या शतकात निर्माण झाला असे मानले जाते. कादंबरी हे कथनात्म गद्य असते. पुराणकथा, जातक कथा, विज्ञानकथा, साहसकथा, रहस्यकथा, प्रदीर्घ साखळीत गुंफलेल्या कहाण्या हे गद्यप्रकार कथनात्मच आहेत. तथापि कांदबरीचे स्वरूप या सर्वांहून वेगळे ठरते.

कादंबरी हे मराठीमध्ये रूढ असलेले नाव संस्कृतमधील बाणभट्टांच्या ''कादंबरी'' नावाच्या गद्य कल्पित आणि कथात्मक ग्रंथातील पात्रावरुन मराठीत आलेले दिसून येते. कादंबरीला इंग्रजीत Novel आणि Fiction असे प्रतिशब्द वापरले जातात. या शब्दांचा अर्थदेखील कल्पित गोष्ट असा आहे. हिंदीत कादंबरीला उपन्यास असे म्हणतात. 'उपन्यास' म्हणजे समोर मांडणे. कादंबरीत मानवी जीवन समोर मांडलेले असते. कादंबरी हे नाव संस्कृत साहित्यातून आलेले असले तरी हा आधुनिक साहित्यप्रकार इंग्रजी साहित्याच्या परिचयाने मराठीत आलेला आहे. ''कादंबरी म्हणजे प्रसंगवशात व दैववशात एकमेकांजवळ आलेल्या व्यक्तीच्या भावसंबंधातून आणि हितसंबंधातून जीवन जी विविध अर्थपूर्ण रूपे घेत असते त्याचे कलात्मक दर्शन.''[५] व्यक्तीचे सामाजिक वास्तव,

तिचे भावविश्व आणि जीवनाचे अंतिम स्वरूप ही तिन्ही अंगे या दर्शनात असतात. म्हणून व्यक्तिचित्रणाला कादंबरीच्या घटकांमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरणनिर्मित, निवेदन, संवाद व भाषाशैली हे कादंबरीचे मुख्य घटक आहेत.

कादंबरी हा कथनात्म साहित्याचा गद्यप्रकार असून तिचा व्याप आणि कालपट इतर साहित्यप्रकारापेक्षा मोठा असतो. मानवी जीवनाचे समग्र दर्शन कादंबरीतून घडते. निवेदन हा कादंबरीच्या आविष्काराचा मुख्य पर्याय आहे. कादंबरीचे विषय आणि प्रांत अमर्याद असतात. मात्र असे असूनदेखील त्यातील निवेदन लेखक कधी स्वतःच्या मुखाने, तर कधी पत्राद्वारे किंवा दैनंदिनीच्या स्वरूपात करताना दिसतो. कादंबरीचे कथानक व्यक्तिभोवती गुंफलेले असते.

कांदबरीचे पौराणिक, ऐतिहासिक, चरित्रात्मक, मनोवैज्ञानिक ग्रामीण, दलित, प्रादेशिक असे अनेकविध प्रकार दिसून येतात. यापैकी चरित्रात्मक कादंबरीचे नाते चरित्र व कादंबरी या दोन साहित्यप्रकारांशी असते.

जीवनाचे रहस्य उलगडून दाखविणे हे दोहोंचे उद्दिष्ट असले तरी या दोन्ही वाङ्मययप्रकाराची प्रकृतीच मूलतः भिन्न आहे. कादंबरीचे ध्येय केवळ मनोरंजन असू शकते. चरित्राचे ध्येय उद्‌बोधन हे आहे.

चरित्रात्मक कादंबरीचे उगमस्थान हे चरित्र ह्या साहित्यप्रकारातून झाले आहे. चरित्रात्मक कादंबरीत चरित्र आणि कादंबरी या दोन साहित्यप्रकारातील निवडक घटकांचा समन्वय असतो. म.वा.धोंड म्हणतात ‘‘चरित्रात्मक कादंबरी म्हणजे प्रत्यक्षात होऊन गेलेल्या एका व्यक्तिचे जिवनचित्रण करणारी कादंबरी.’’[६] कादंबरीतील आशय कल्पित वास्तव असतो, पण चरित्रात्मक कादंबरीचा आशय प्रत्यक्षातील व्यक्तीच्या जीवनाशी निगडीत असतो, अर्थात वास्तव असतो. त्यामुळे इतर कादंबरीपेक्षा चरित्रात्मक कादंबरीचा आशय वेगळा ठरतो. मराठी साहित्य चरित्रलेखन आणि ऐतिहासिक कादंबरी लेखन इतिहास गौरवाच्या एकाच प्रेरणेतून लिहिले गेले आहे. तरीही चरित्र आणि कादंबरी आपापले वेगळेपण राखून होते असे दिसून येते. प्रसिध्द व्यक्तिंची चरित्र किंवा आत्मचरित्र उपलब्ध असतानाही तेच जीवन कादंबरीच्या रूपाने पाहणे याला वाचकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळालेला दिसून येतो. काही ऐतिहासिक कादंबऱ्यांकडे उदाहरणादाखल पाहिल्यास याचा

प्रत्यय येईल. वि.स.खांडेकर यांची 'ययाती' (१९५१), रणजित देसाई यांची 'स्वामी' (१९६२), ना.स.इनामदारांची 'झेप', 'झुंज', 'मंत्रावेगळा' (१८६२, १९६५, १९६८), भा.द. खेर यांची 'यज्ञ' (१९६७), शिवाजी सावंत यांची 'मृत्युंजय' व 'छावा' (१९६७, १८६२) अशा अनेक ऐतिहासिक चरित्रात्मक कादंबऱ्यांनी अगदी शाळकरी विद्यार्थ्यांपासून ते वृद्ध आजी-आजोबांपर्यंत सर्वांना भुरळ घातली आहे.

## ६.२ चरित्रात्मक कादंबरीचे स्वरूप :

कादंबरी हा वाङ्मयप्रकार मुळात व्यक्तिप्रधान आहे. रवींद्र ठाकूर म्हणतात, ''विशिष्ट समाजवास्तव जगणारी व्यक्ती आणि तिचे चरित्र हाच कादंबरीचा कणा असतो.परंतु येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, हरिभाऊ आपटे यांची 'यमू' ज्या अर्थाने कल्पित व्यक्तिरेखा असते त्या अर्थाने श्री.ज.जोशी यांच्या ''रघुनाथाची बखर मधील रघुनाथराव कल्पित असू शकत नाही. कारण रघूनाथराव ही व्यक्तिरेखा पूर्वपरिचित आहे.''[७] त्यामुळे चरित्रात्मक कादंबरी लिहिताना लेखकाला एकाच वेळी संशोधन आणि सृजन ह्या दोन पातळ्यांवर काम करावे लागते.

चरित्रात्मक कादंबरीत आपल्या कर्तबगारीचा ठसा उमटविणाऱ्या व्यक्तीच्या जीवन चरित्रावर भर देऊन भावसत्याचा कलात्मक आविष्कार चरित्रात्मक कादंबरीत प्रगट होतो. विशिष्ट कालखंडात स्वत:च्या कार्यक्षेत्रात विशेष कर्तबगारी दाखविणाऱ्या आणि आपल्या कर्तबगारीने कालखंडाच्या गतिविधीला वळण लावणाऱ्या व्यक्तिविषयी, त्याच्या खाजगी जीवनाविषयी सर्वांना उत्सुकता असते. चरित्रलेखनातील 'माणूस' पाहण्याच्या, जाणून घेण्याच्या हेतूने चरित्रलेखनातील अद्ययावत संशोधनाच्या माहितीच्या आधाराने विशिष्ट दृष्टिकोनातून चरित्रनायकाच्या अंतरंगाचा शोध घेऊन चरित्रापेक्षा काही वेगळे कलात्मक भावदर्शन घडविण्याच्या उद्देशाने चरित्रात्मक कादंबरी हा स्वतंत्र वाङ्:मयप्रकार रूढ झाला आहे.

विविध क्षेत्रांत मान्यता पावलेल्या प्रसिद्ध, अप्रसिद्ध कर्तबगार अशा पौराणिक, ऐतिहासिक आणि अर्वाचीन स्त्री-पुरूषांच्या चरित्राचा कलात्म आविष्कार कादंबरी रूपाने मराठी साहित्यात इ.स १९६० ते १९८० या कालखंडात प्रारंभ झालेला दिसून येतो. ''चरित्रात्मक कादंबरीचा नायक

हा आधुनिक म्हणजे साधारणपणे गेल्या चार ते पाच पिढ्यातील (उदा. रघुनाथजी बखर:श्री.ज.जोशी), ऐतिहासिक (उदा. श्रीमान योगी: रणजित देसाई), वा पौराणिक (उदा. मृत्युंजय: शिवाजी सावंत) असू शकतो.''[८] कालमानानुसार अशा कादंबरीला ऐतिहासिक किंवा पौराणिक अशीही संज्ञा लावण्यात येते.

चरित्रात्मक कादंबरीत चरित्रनायकाचे गुणविशेष डोळ्यांसमोर ठेऊन पात्रप्रसंगाची निर्मिती केली जाते. यामध्ये कोणत्याहीप्रकारे पूर्णचित्र किंवा प्रतीकचित्र निर्माण केले जात नाही. तर माणूस शोधण्याच्या, जीवन चरित्र स्पष्ट आणि प्रत्ययकारी करण्याच्या उर्मीने चरित्राच्या उपलब्ध साधनसामग्रीमध्ये चरित्रात्मक कादंबरीची निर्मिती केली जाते. चरित्र नायकामधील माणसाचे प्रत्ययकारी दर्शन घडविणे, मूळच्याच सौंदर्यरूप असलेल्या चरित्र सत्याचा कलात्मक आविष्कार घडवून त्यातून कलात्मक आनंद निर्माण करणे असा उद्देश यामागे असतो.

चरित्रनायकाचे प्रगट व अप्रगट भावजीवन हेच चरित्रात्मक कादंबरीचे कथानक होय. कादंबरीचा नायक हेच चरित्रात्मक कादंबरीचे कथानक असते. चरित्रनायकाचे लालित्याच्या अंगाने प्रगटलेले भावजीवन कादंबरीत भास सत्याच्या रूपाने ठसठशीतपणे स्पष्ट होते. इतिहासातिल अप्रगट बाजू प्रगट करताना तो चरित्रनायक विशिष्ट दिशेने कलात्मक रूप धारण करतो. तो वाचकांना अधिक आनंद देणारा असतो. उदा. शिवाजी सावंतांच्या 'छावा' मधील आत्मसमर्पण करणारा संभाजी, 'मृत्युंजय' मधील उपेक्षित कर्ण इत्यादी. वास्तव चरित्रातील साधनसामग्रीच्या मर्यादिमुळे चरित्रातील गूढ, अप्रगट राहिलेला भाग इतिहासानिष्ठ चरित्रकार तसाच राहू देतो.

चरित्रात्मक कादंबरीतील भावजीवन बोलते हालते करण्याचे सामर्थ्य कादंबरीकाराचे असते. एकाच वेळी कादंबरीकाराला चरित्र, इतिहास आणि कादंबरीचे कलात्मक तंत्र यांचा एकात्म आविष्कार निर्मिण्यासाठी तीनही भूमिकांमधून अभ्यास करावा लागतो. एकंदरीत चरित्रात्मक कादंबरीत चरित्र, कादंबरी आणि इतिहास यांच्या संमिश्र आविष्काराने चरित्रनायकाची भावरूप जीवनकथा घेतलेली असते. चरित्रविषयात चरित्रात्मक कादंबरीला भावलेल्या चरित्रविषयात फुलवण्याचे सामर्थ्य असलेली अनेक स्थाने सापडतात आणि त्या चारित्रातील साधनसामग्रीच्या अपुरेपणामुळे अप्रगट राहिलेल्या भागास आपल्या प्रतिभाशक्तिच्या सहाय्याने तो पूर्ण करतो.

चरित्रात्मक कादंबरीत कादंबरीचे स्वातंत्र्य हे चरित्रातील ठळक वास्तव घटितांनी मर्यादीत केलेले असते.

## ६.३ चरित्रात्मक कादंबरीची वाटचाल :

इ.स.१९६० नंतरच्या साहित्यात वेगळेपण प्रकर्षाने जाणवते. म्हणून इ.स.१९६० नंतर निर्माण झालेल्या साहित्याला साठोत्तरी साहित्य असे म्हटले जाते.

कालानुक्रमे पहिली चरित्रात्मक कादंबरी १९६४ मध्ये लिहिली गेली. भिमराव कुलकर्णी यांनी 'हरिनारायण' ही हरीभाऊ आपटे यांच्या जीवनावर आधारीत हि चरित्रात्मक कादंबरी लिहीली. यानंतर १९६७ मध्ये थोर स्वातंत्र्यसेनानी आणि साहित्यिक वि.दा.सावरकर यांच्या जीवनावरील 'यज्ञ' ही कादंबरी प्रकाशित झाली. ही कादंबरी भा.द.खेर आणि शैलजा राजे यांनी संयुक्तपणे लिहिली. पण खऱ्या अर्थाने चरित्रात्मक कादंबरीला लोकप्रियता आणि प्रतिष्ठा मिळवून दिली ती 'आनंदी गोपाळ' या कादंबरीने इ.स.१९६८ मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीतून श्री.ज.र.जोशींनी भारतातील पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी आणि त्यांचे विक्षिप्त पती गोपाळराव जोशी यांच्या दांपत्य जीवनाचा शोकात्म प्रत्यय दिला.

सावरकरांच्या जीवनावरील 'वृंदावना' ही शांताबाई गोखले यांनी लिहिलेली कादंबरी इ.स.१९६९ मध्ये प्रकाशित झाली. याच वर्षी म.गांधीजींच्या जीवनावरील 'पुत्र मानवाचा' ही मृणालिनी देसाईंची कादंबरी प्रकाशित झाली. गांधीजींच्या व्यक्तीमत्त्वाचा प्रत्यय या कादंबरीत येतो. हरिभाऊ पगारे यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर आधारित युगप्रवर्तक ही कादंबरी इ.स.१९७० मध्ये प्रकाशित झाली. डॉ.आंबेडकरांच्या असामान्य कर्तृत्वाचा प्रत्यय यात दिसून येतो.

इ.स.१९७२ मध्ये 'इंद्रायणीकाठी' ही रवींद्र भटांनी लिहिलेली कादंबरी (१८११) ज्ञानेश्वरांच्या जीवनावरील आहे. इ.स.१९७३ मध्ये जोत्स्ना देवधर यांची श्री अरविंदांच्या जीवनावरील 'उत्तरयोगी' ही कादंबरी प्रकाशित झाली. इ.स १९७५ मध्ये आचार्य अत्रे यांच्या जीवनावर शेळके यांनी 'साहेब' ही कादंबरी लिहिली. संत मीराबाई यांच्या जीवनावर आधारीत डॉ.प्र.न.जोशी यांची इ.स. १९७६ मध्ये 'मीरा बावरी' ही कादंबरी प्रकाशित झाली. इ.स. १९८० मध्ये इंदुमती शेवडे यांची 'मिर्झा गालिब यांच्या जीवनावरील मिर्झा गालिब' ही कादंबरी प्रकाशित

झाली. गो. नी. दांडेकर यांची तुकारामांच्या जीवनावरील 'तुका आकाशाएवढा' ही कादंबरी इ.स.१९८१ मध्ये प्रकाशित झाली. याच वर्षी हिं.गो.बनसोडे यांची 'आभाळाएवढी' ही कादंबरी प्रकाशित झाली. सावित्रीबाईं फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी ही कादंबरी आहे.

## ६.४ सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित चरित्रे आणि चरित्रात्मक कादंबरी :

'ज्योतिकांता सावित्री' ही डॉ. दा. स. गजघाटे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित चरित्रात्मक कादंबरी लिहिली आहे. सावित्रीबाई फुलेंचे नाव घेताच त्यांच्या अनेक प्रतिमा उभ्या राहतात. सार्वजनिक कामासाठी घराबाहेर पडणारी पहिली भारतीय स्त्री आद्य शिक्षिका, स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या प्रणेत्या, स्त्री–पुरूष समानता प्रतिपादन करणाऱ्या प्रथम महिला अशी अनेक बिरूदे त्यांच्या कार्यामुळे त्यांना लाभलेली आहेत. स्त्री ही परप्रकाशी नसून स्वयंसिद्ध आहे हे नवे तेजस्वी मूल्य सावित्रीने भारतीय स्त्री जीवनाला दिले. हेच या कादंबरीतून स्पष्ट केले आहे. एकूणच सर्व भारतीय समाजाला आदर्शात्मक जीवन जगता यावे म्हणून सावित्रीबाईंसारख्या आदर्श व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व या कादंबरीतून रेखाटले आहे.

'मी सावित्री' ही डॉ. यशवंत मनोहर यांनी लिहिलेली कादंबरी लोकप्रिय झाली. कवी, विचारवंत आणि बुद्धिवादी वाङ्मयात असलेल्या सिद्धहस्त लेखकाने सावित्रीबाईंच्या जीवनातील संघर्ष आणि करूणा या कादंबरीत चित्रीत केलेली आहे. सावित्रीबाईंच्या स्वगताने सुरू होणारी कादंबरी flash-back पद्धतीने आठवणींमागून आठवणींची माळ, कडू गोड आठवणी, युद्धसदृश प्रसंगाला तोंड देणाऱ्या आठवणी, दुष्काळातील आणि ब्राह्मण विधवांच्या करूणामय आठवणी, शाळेचे असो अथवा सत्यशोधक समाजाचे काम ज्योतिरावांबरोबर किती तन्मयतेने केले या सर्व खऱ्याखुऱ्या घडलेल्या प्रसंगांचे ओघवत्या भाषेत वर्णन केले आहे. सावित्रीबाई फुलेंचे शैक्षणिक कार्य विधवांना दिलेला भावनिक, मानसिक आधार, अनाथ मुलांचे पालकत्व, क्रांतिकारक पतिबरोबरचा संसार आणि तरीही स्वयंप्रज्ञेने त्यांनी घेतलेले निर्णय यातून सावित्रीबाईंची करारी तरीही कोमलहृदयी आणि समाजक्रांतिकारी प्रतिमा उभी केली आहे. त्यामुळेच लेखकाला सावित्रीबाईं ह्या 'सांस्कृतिक महामाता' आणि ' महानायिका' आहेत असे वाटते.

'सावित्रीबाई फुले: चरित्र व विचारधन' या चरित्रात वैशाली अघोर यांनी सावित्रीबाई फुले यांचे चरित्र आजही अंधारात चाचपडणाऱ्यांना प्रकाशमय दिशा दाखविणारे, अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणारे प्रेरणादायी कसे आहे, हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. सावित्रीबाईंच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांचा, कार्याचा मागोवा यांच्या जन्मापासून ते महानिर्वाणापर्यंतचा प्रवास यात चित्रीत केला आहे. त्याचबरोबर 'साहित्यिक सावित्री' ह्या प्रकरणात सावित्रीबाईंच्या लेखनाचे, काव्याची उदाहरणे देऊन त्या एक प्रतिभासंपन्न कवयित्री आहेत, याचा मागोवा घेतला आहे. सावित्रीबाईंचा जन्मदिवस ३ जानेवारी हा 'बालिका दिन' म्हणून साजरा करण्यामागचे प्रयोजनही त्यांनी मांडले आहे.

'ज्ञानगंगोत्री सावित्रीबाई फुले' हे एस.एस.होळीकर यांनी लिहिलेल्या चरित्रात सावित्रीबाई यांच्या जिद्द, धाडस, मानवी मूल्यांवर श्रद्धा, अपेक्षितांसाठी सामाजिक लढा, करारी स्वभाव आणि तत्त्वचिंतनता गोष्टींचे वर्णन चरित्रात केलेले आहे. अपृश्योद्धारासाठी आणि स्त्रियांच्या मुक्तीसाठी सावित्रीबाईंनी आपले संबंध आयुष्य वाहिले. त्यांचे जीवन नित्य वाहत राहणाऱ्या जीवंत झऱ्यासारखे होते. त्यांनी विचारांमध्ये बौद्धिक तर्कसंगती आणि शुद्ध चारित्र्य व आचरणाने समाजपरिवर्तनाचे कार्य मोठ्या हिमतीने गंगाप्रवाहासारखे चालू ठेवले. त्याचेच वर्णन ज्ञानगंगोत्री ही उपमा देऊन चरित्रात सावित्रीबाईंचा जीवनसंघर्ष चित्रीत केला आहे.

उषा पोळ–खंदारे यांनी 'ज्ञानज्योती: सावित्रीबाई फुले' हे चरित्र साकारताना सावित्रीबाईंना पहिली शिक्षिका, पहिली मुख्याध्यापिका होताना जो संघर्ष करावा लागला त्याचे यथोचित चित्रण केले आहे.

सावित्रीबाईंनी केवळ स्त्री–शूद्रातिशूद्रांना शिक्षण देण्यासाठीच संघर्ष केला नाही तर आपल्या कृतीने समाजातील अंधश्रद्धांना सुरूंग लावला. हे सर्व करीत असताना त्यांच्या वाट्याला पावलोपावली अपमान सहन करावा लागला. त्यांना त्यांच्या कृतीचे समर्थन द्यावे लागले. उषा पोळ यांच्या मते सावित्रीबाईंनी प्रखर बुद्धिमत्ता आणि कार्यावरील अढळ निष्ठा, विलक्षण चिकाटी, तत्त्वनिष्ठा या सद्गुणांच्या जोरावर अंधश्रद्धा व अज्ञानाने निश्चेष्ट समाजाला ज्ञानसूर्याचा प्रकाश दाखविला. केशवपन, बालहत्या या अत्यंत अवघड आणि वर्षानुवर्षे स्त्रियांची उपेक्षा, अहवेलना,

मानसिक कोंडमारा करणाऱ्या अनिष्ट प्रथांविरूद्ध नुसता आवाज उठविला नाही तर प्रत्यक्ष कृतीने मोठा आदर्श घालून दिला. फक्त मानवता धर्मावर विश्वास ठेऊन केलेली कृती त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची ओळख करूण देण्यास समर्थ आहे. त्याकाळी असलेल्या स्त्रियांच्या समस्या, शेतकऱ्यांच्या समस्या वेगवेगळ्या स्वरूपात समाजात नित्यनवे प्रश्न निर्माण करीत होत्या. या पार्श्वभूमीवर सावित्रीबाईंच्या कार्याचे महत्त्व अधिकच आहे. म्हणूनच लेखिका उषा पोळ त्यांना 'ज्ञानज्योती' आणि 'क्रांतिदेवी' असेदेखील म्हणतात. आज समाजामध्ये महिलांसंदर्भात, मुलींसंदर्भातील असुरक्षित वातावरण, आधुनिक म्हणवल्या जाणाऱ्या कुटुंबात, समाजात महिलांवर होणारे अत्याचार, मूलभूत सुविधांसाठी घरातील दुर्लक्षित व्यक्ती म्हणून महिलांना करावे लागणारे कष्ट, आरोग्याची अक्षम्य हेळसांड, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी किंवा परावलंबी असलेली महिला व तिच्या वाट्याला वर्षानुवर्षाच्या मानसिकतेतून आलेला छळ, स्त्री–भ्रूणहत्या अशा अनेक पैलूंकडे लेखिकेने लक्ष वेधले आहे. सावित्रीबाईंच्या काळातील आणि आताच्या आधुनिक म्हटल्या जाणाऱ्या समाजाची मानसिकता याचा तौलानिक आढाव घेऊन आजही सावित्रीबाईंचे चरित्र खेड्या–पाड्याच्या सीमा ओलांडून जगभरातील स्त्रियांसाठी कसे स्फूर्तिदायक आहे हे विशद केले आहे.

'कर्मयोगी सावित्रीबाई फुले' या चरित्रग्रंथात किरण नागतोडे यांनी एकोणिसाव्या शतकात एकविसाव्या शतकाची कार्ये करणाऱ्या आणि स्त्रीला सर्व क्षेत्रांत आत्मविश्वासाने पदार्पण करण्यासाठी प्रेरित करणाऱ्या तसेच प्रसंगी काव्यप्रतिभेच्या शक्तीचा उपयोग समाजजागृतीसाठी एखाद्या योगिनीसारख्या करणाऱ्या, सावित्रीबाईंच्या बालपणापासून, सावित्री–ज्योतिराव दांपत्य जीवन, शैक्षणिक कार्य, सामाजिक कार्य आणि हे सर्व करित असताना नि:स्वार्थीपणे, निर्लोभीपणे सतत कार्यमग्न राहून उत्साही राहण्याची वृत्ती या गुणविशेषांचे वर्णन सुरूवातीच्या भागात येते. नंतरच्या भागात सावित्रीबाईंच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यासोबत काव्यज्योतही कशी प्रगट झाली व त्या काव्यातूनही समाजाला बोधपर संदेश कसा दिला गेला याचे सोदाहरण स्पष्टीकरण दिले आहे. किरण नागतोडेंच्या मते महात्मा फुले यांनी जसे क्रांतीचे दाहक गीत लिहिले त्याप्रमाणे सावित्रीबाईंनी लिहिले नसले तरी त्यांना क्रांतीच्या गीताची प्रेरणा मात्र मिळाली त्यामुळे सावित्रीबाईंचे क्रांतिगीत वेगळ्या शैलीत आहे. अर्थातच स्त्री, बहुजन शूद्रातिशूद्र समाज यांच्या

जीवनाचा स्तर उंचावणे, माणूस म्हणून समाजात प्रतिष्ठा मिळवून देणे, हक्क व कर्तव्याविषयी जागृती निर्माण करणे प्रसंगी आपल्या उज्वल पूर्वेतिहासाची आठवण करून देणे या सर्व गोष्टी आपल्या काव्यातून सावित्रीबाई मांडतात. काव्याला सावित्रीबाई समाजसुधारणेचे, आत्मसन्मान जागृतीचे साधन मानतात असे लेखिकेला वाटते. पण त्याचबरोबर निसर्गाविषयक कविता किंवा आत्मपर कविता लेखनाचा प्रारंभ त्या काळी सावित्रीबाईंकडून झाला, त्याआधी निसर्गाला कुणीही काव्यात आणले नाही म्हणून निसर्गकाव्य रचण्याचा पहिला मान सावित्रीबाईंनाच आहे असे किरण नागतोडे यांना वाटते. वेगवेगळ्या प्रकारच्या सावित्रीबाईंच्या कवितांची उदाहरणे देऊन त्यांनी त्याचे रसग्रहणही या भागात केले आहे.

सावित्रीबाईंनी सर्वाधिक काळ पुण्यामध्ये समाजसेवा, शैक्षणिक कार्य यामध्ये व्यतित केला अर्थातच त्यांची कर्मभूमी, कार्यक्षेत्र पुणे असले तरी त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा मान मात्र अमरावतीला मिळाला ही गोष्ट लेखिकेने आवर्जून नमूद केली आहे. तसेच पुढील भागात सावित्रीबाईंचे वाङ्मय जे खऱ्या अर्थाने जनजागरणाचे वाङ्मय म्हणता येईल अशी उत्कृष्ट भाषणे, पत्रे यांचा आढावा घेऊन मानवी इतिहासातील संघर्षाला तोंड देऊन सतत समाजहित चिंतणारी दुर्मिळ व्यक्ती असा सावित्रीबाईंचा गौरवोल्लेख केला आहे. कोणत्याही फलाची, पुरस्काराची अगदी सहानुभूतीच्या शब्दांचीही अपेक्षा न ठेवता आपल्या समाजात आपल्यासारख्याच व्यक्तींना आत्मसन्मान, शिक्षण, समान संधी, आर्थिक स्थैर्य मिळावे यासाठी कर्ममग्न असणारी सावित्रीबाईंची कर्मयोगिनी ही प्रतिमा लेखिकेने चरित्रातून साक्षात उभी केली आहे. जिच्यामुळे आज गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत डॉक्टरापासून पंतप्रधानापर्यंत सामान्यांपासून उच्चपदापर्यंत सर्व पदे व कार्य स्त्री सक्षमपणे सांभाळते आहे त्या सावित्रीबाई जन्माला आल्या नसत्या तर... असा प्रश्न वाचकांना टाकून लेखिकेने वाचकांना विचारप्रवण केले आहे.

हिं.गो.बनसोडे यांची सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित लिहिलेली 'आभाळाएवढी' ही पहिलीच चरित्रात्मक कादंबरी आहे. सावित्रीबाई फुले यांची शिक्षिका, बालहत्या प्रतिबंध गृहात जबाबदार प्रेमळ माता, यशवंत या दत्तकपुत्राची माता, सत्यशोधक समाजाचे काम, दुष्काळ निवारणार्थ अन्नछत्रे चालविणे आणि जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत सेवाभावी वृत्ती,

त्यामधून प्लेगच्या साथीत केलेले अतुलनीय कार्य आणि नंतर चिरविश्रांती, प्रत्यक्षात कल्पनेपेक्षाही अत्यंत संघर्षाचे जीवन जगणाऱ्या चरित्रनायिकेला एकोणिसाव्या शतकात विविध कठीण प्रसंगातून जावे लागले. त्यातूनच सावित्रीबाईंचे अलौकिक दिव्य जीवन घडले. अशावेळी हे व्यक्तिमत्त्व चरित्रात्मक कादंबरीचा विषय न झाले तरच नवल होते.

सावित्रीबाईंच्या कार्याची तुलना करता येणार नाही ते अतुलनीय असेच आहे. सार्थ शब्दांत पटवून देण्यासाठीच लेखकाने 'आभाळाएवढी' हे नाव दिले आहे. ज्या उंचीपर्यंत दृष्टीदेखील अपुरी पडते किंवा जिच्या कार्याची उंची लौकिकार्थाच्या फुटपट्टीने मोजता येणर नाही अशी 'आभाळाएवढी' हे शीर्षक देऊन सावित्रीबाईंचा आगळा वेगळा शब्दरूपी सत्कार केला आहे.

## ६.५ सावित्रीबाईंच्या जीवनावर आधारित प्रयोग आणि नाटक :

संवेदनशील पत्रकार म्हणून जनमानसात ओळखल्या जाणाऱ्या सुषमा देशपांडे यांनी ३ जानेवारी १९८९ मध्ये ''व्हय, मी सावित्रीबाई'' हा एकपात्री प्रयोग रंगमंचावर आणला. आजतागायत दीड हजाराहून अधिक प्रयोग करीत त्यांना उमगलेल्या, भावलेल्या सावित्रीबाईंच्या पैलूंचे दर्शन सुषमा देशपांडे यांनी महाराष्ट्रातल्या गावात, खेड्यात, देशात, विदेशात घडविले. सावित्रीबाई व ज्योतिराव यांना 'महात्मा' या दृष्टीकोनातून न पाहता त्यांच्यातील उच्च मानवी मूल्यांचा जाणीवपूर्वक परिचय करून देण्यासाठी या एकपात्री प्रयोगाची संहिता त्यांनी लिहिली. या प्रयोगाच्या सादरीकरणासाठी परवानगी घेण्याची गरज नसते कारण या एकपात्री प्रयोगाचे संहितेचे हक्क सुषमा यांनी सार्वजनिक केले आहेत. अर्थातच प्रचंड प्रतिसादामुळे गावोगावी अनेकजणी त्याचे असंख्य प्रयोग करतात. मुंबईच्या 'स्पॅरो' या संस्थेने ही संहिता विविध 'आठ' भाषांमध्ये भाषांतरित केली आहे. सावित्रीबाईंच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा आलेख जनमानसांपर्यंत पोहोचविणे व आजच्या काळातही त्यांचे जीवन प्रेरणादायी आहे हे समाजापर्यंत या माध्यमातून पोहोचविणे हा या प्रयोगाचा हेतू आहे.

सावित्रीबाई आणि ज्योतिराव यांच्या कार्यावर आधारित 'सत्यशोधक' ना नाटकाचा पहिला प्रयोग ८ जानेवारी २०१२ रोजी भरत नाट्य मंदिर, पुणे येथे झाला. या नाटकाचे लेखक

गो.पु.देशपांडे आणि दिग्दर्शक अतुल पेठे हे होते. ज्योतिरावांच्या भूमिकेत ओंकार गोवर्धन तर सावित्रीबाईंची भूमिका पर्ण पेठे यांनी साकारली होती. शिक्षण, आरोग्य, श्रद्धा, अंधश्रद्धा, व्यसनं अशा एक ना अनेक बाबी कामगारांच्या समस्या यातून सांस्कृतिक जाणीव विकसित करणे आणि सावित्री–ज्योतिबांचा त्यांच्या आचारविचारांचा आजच्या काळातून आणि वेगळ्या दृष्टिकोनातून अर्थ लावून जाणिवा समृद्ध करणे हा या नाटकाचा उद्देश आहे. म्हणूनच अतुल पेठे म्हणतात, ''या नाटकाद्वारे गो.पुंनी जोतिबांचं 'रीइंटरप्रिटेशन' केलेलं आहे. म्हणजे जोतिबांच्या आचारविचारांचा आजच्या काळातून आणि स्वत:च्या दृष्किानातून अर्थ लावला आहे. हे एका अर्थाने ऐतिहासिकच नाटक आहे, पण मराठी रंगभूमीच्या पूर्वसूरींपेक्षा एकदम वेगळं आहे. 'रायगडला जेव्हा जाग येते' वगैरेपेक्षा फार दूरचं. 'सत्यशोधक' खऱ्या अर्थाने राजकीय आहे, आजच्या समकालीन वर्तमानाचा वेध घेणारं आहे. इथला जोतिबा आज लोकांना सोयीसाठी अभिप्रेत असलेला नाही. तो व्यापक आहे आणि जातिधर्माला वेगळ्या स्तरावर समजावून घेणारा आहे.''[९] एकाच वेळी जुन्या–नव्याची मोट बांधणारा हा प्रयोग अर्थातच लक्षवेधी झाला आहे त्यात 'जलशा 'चा फॉर्म असल्यामुळे नाटकाच्या सुरूवातीला असणारा पोवाडा पुढे नाटकात आपल्याला काय पाहायला मिळणार याची उत्कंठा देऊन जातो. नाटकाची सुरूवात पोवाड्याने होते,

'जय भवानी जय जगदंबे नमन तुज अंबे' या ऐवजी

'जय स्वातंत्र्य, जय समते, नमन तुज विद्ये करून प्रारंभे'

अशा ओळींनी सावित्री–ज्योतिबांना ओभप्रेत असलेला स्वातंत्र व समतेचा उद्‌घोष केला आहे. शिक्षणाला अग्रस्थान देऊन संपूर्ण समाजमनाला जागृत करून त्यांना आत्मसन्मानाने जगण्यास प्रवृत्त करणे साधी–सोपी गोष्ट नव्हती. या निद्रिस्त समाजाला अज्ञान, दारिद्र्य आणि त्याबरोबर येणारी रोगराई, रोजचे जीवन जगताना मुलभूत हक्कांसाठी अगदी पाण्यासाठी करावी लागणारी करूणामय याचना ह्दय पिळवटून टाकणारी होती. हे सर्व या नाटकात मोठ्या खुबीने व थेट प्रेक्षकांपर्यंत धडकेल या पध्दतीने मांडले आहे. अगदी आपण नेहमी ऐकत असलेले अभंग जेव्हा नवीन साज लेऊन येतात आणि साधेपणाने अचानक आशयघन बनतात तेव्हा त्या नाटकाचा

बाज बदलतो. उदाहरणादाखल पुढील सावता माळ्याचा बदल केलेला अभंग गो.पुं.देशपांडे लिहितात,

''कांदा मुळा भाजी अवघी विद्याबाई माझी ।
लसून मिर्ची कोथंबीरी शूद्र रंगला अक्षरी ।''[१०]

पारंपरिक काव्यपंक्तीतून अचानक आधुनिक वर्तमानाचा वेध घेण्याचे कौशल्य, जगण्याचा आशय पारंपरिक चालीत घेतल्यामुळे हे लक्षवेधी घडलं आहे. माणूस म्हणून एकमेकांकडे बघण्याची विचारधारा ह्या नाटकातून प्रगट होते. म्हणूनच हे नाटक ऐतिहासिक न राहता वर्तमानाशी त्याची नाळ जोडली जाते. म्हणून सामाजिक विचार मांडणारे सावित्री–ज्योतिबांचा जीवनसंघर्ष मांडणाऱ्या 'सत्यशोधक' चे दोन वर्षात एकशे एक प्रयोग झाले. अनेक मान्यवरांनी, अभ्यासकांनी, लेखकांनी त्याचे कौतुक केले. ह्या नाटकाचे आणखी महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे यात अभिनय करणारे कलाकर, ज्या कष्टकरी व वंचित समाजासाठी सावित्री–ज्योतिराव या दांपत्याने लढा दिला त्यांच्याच हक्कासाठी काम करणाऱ्या 'पुणे कामगार युनियन' ची ही निर्मिती आहे. या नाटकातील ७० टक्के कलाकार पुणे महानगरपालिकेचे स्वच्छता कर्मचारी आहेत. मात्र नाटक पाहताना त्यांचे नवखेपण जाणवत नाहीच पण नाटकाचा परिणाम नाटक संपल्यावरही विचारप्रवण करायला लावतो. म्हणूनच मुक्ता मनोहर म्हणतात, ''हे नाटक महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाईंच्या जीवनावरचं. पण ते काही साध्या घटनांनी भरलेलं असं नाटक नव्हतं, तर एक वेगळी गतिमानता घेऊन ते लिहिल्याचं जाणवतं होतं. त्या काळातल्या समाजाच्या बदलत्या वास्तवात घडत जाणारे किंवा स्वत:ला आणि इतरांनाही घडवत जाणारे महात्मा जोतिबा आणि सावित्रीबाई त्या संहितेमुळे मनाला संवेदनाक्षम करून गेले.''[११] नव्या युगाची उकल होण्यासाठी जात–धर्मवादाच्या राजकारणाला आव्हान देण्याची शक्ती महात्मा फुले यांच्या विचारात होती. या प्रयोगात ज्योतिराव आणि सावित्रीबाईंवरील साधे प्रसंग त्यांच्या प्रभावी व युगप्रवर्तक विचारांची ओळख करून देतात.

## समारोप :

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील बुद्धिवान, प्रतिभावान व कर्त्या लोकांची मोजदात या वि.का. राजवाडे या निबंधात १५० लोकांची यादी प्रसिद्ध केली होती पण त्यात महात्मा ज्योतिराव फुले यांचे नाव नव्हते. याचा अर्थ इतिहासाचार्यांचा पूर्वग्रह हा नसून तत्कालीन समाजाला खरोखरच ज्योतिराव फुले यांचे महात्म्यपणा, विचार व कार्य पुरेसे कळलेले नव्हते हेच होते. काळाच्या पुढे जाणारे विचार आणि विचारांना कृतीची जोड दिली गेल्याने त्यांच्या अजाड कार्याचे महत्त्व कळल्यामुळे आता ज्योतिरावांना एकोणिसाव्या शतकातील अव्वल समाजसुधारक म्हणून ओळखले जाते. जेथे ज्योतिरावांच्या कार्याचे मोठेपण कळायला भारतीय पुरुषप्रधान संस्कृतीला एवढा वेळ लागला तेथे सावित्रीबाईंचे क्रांतिकारक कार्य स्वीकारणे अवघडच जाणार होते. पण अभ्यासक संशोधक यांनी वास्तव इतिहास पुढे आणून कल्पनेपेक्षाही प्रत्यक्षात सावित्रीबाईंना करावा लागलेला संघर्ष, मानहानी, उपेक्षा कधी मूठभर लोकांचे सहकार्य तर कधी आप्तेष्टांचेही असहकार्य ह्या सर्व बाबी उजेडात आणल्या. त्यामुळे आता हळूहळू का होईना सावित्रीबाईंच्या कार्याची महती सर्वसामान्यांपर्यंत पोहचू लागली आहे.

सावित्रीबाई फुले यांचे कार्य सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, भावनिक, शैक्षणिक अशा विविध स्तरांवर चालू होते. एका महापुरुषाची, महात्म्याची पत्नी म्हणून वावरताना स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची स्वतंत्र ओळखही त्यांनी निर्माण केली. एवढेच नव्हे तर प्रतिभेच्या जोरावर मराठी साहित्यात आधुनिक काव्याची आद्यप्रणेती होण्याचा मान मिळविला. निष्कलंक चारित्र्य, दीनदुबळ्यांविषयी कळवळा, परिस्थितीचे आकलन करण्याची व परिस्थितीवर मात करण्याची क्षमता, अचूक निर्णयक्षमता, तर्कनिष्ठता, सचोटी, वात्सल्य, कार्याविषयी निष्ठा अशा एक ना अनेक गुणांनी त्यांना अष्टपैलू व्यक्तिमत्त्व प्राप्त झाले होते. त्याचबरोबर त्यांनी केलेल्या अतुलनीय कार्यामुळे त्या युगातील एकमेव आणि पहिली क्रांतिकारक महिला ठरल्या होत्या. एवढेच नव्हे तर आजही त्यांचे विचार स्त्रियांसाठी मार्गदर्शक ठरतात. स्त्रीमुक्ती हा शब्दही जेव्हा अस्तित्वात नव्हता तेव्हा वाईट–भयावह चालीरितींविरुद्ध पहिला आवाज सावित्रीबाईंनीच उठविला होता. स्त्रियांना संघटीत करुन शिक्षणाचा वसाही दिला होता. काळाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या कार्याचे महत्त्व अधिकच उठून

दिसत आहे. त्यामुळेच वेगवेगळ्या लेखकांना सावित्रीबाई वेगवेगळ्या रुपात दिसतात. त्यांच्या युगप्रवर्तनाच्या कार्याला स्मरून त्यांना 'युगस्त्री' ही यथार्थ उपमा देण्यात आली आहे. तर काहींच्या मते सावित्रीबाईंनी जे क्रांतिकार्य केले त्यामुळे त्यांना 'क्रांतिज्योती' ही उपाधी अधिक योग्य वाटते. याचबरोबर निद्रिस्त समाजाला जागविण्यासाठी ज्ञानरुपी ज्योत स्त्री व शूद्रातिशूद्रांना त्यांच्याकडून मिळाली. त्यामुळे त्यांना 'ज्ञानज्योती' असेही म्हटले जाते.

वेगवेगळ्या लेखकांना वेगवेगळ्या रुपात सावित्रीबाई व त्यांचे जीवनकार्य भावले आहे, कळले आहे. त्यामुळेच नामवंत लेखक–लेखिकांपासून ते कवी–कवयित्रींपर्यंत सावित्रीबाईंच्या जीवनाची विचारांची भुरळ त्यांना पडली आहे. यामधूनच समाजापुढे वास्तव आदर्श असा की, ज्या गोष्टी कल्पनेहूनही खूप वेगळ्या पण जीवनस्पर्शी आणि मानवतेचे उत्तुंग शिखर गाठणाऱ्या आहेत. त्या सर्व सावित्रीबाईंच्या जीवनात घडल्या आहेत. ज्योतिरांवाची शैली आक्रमक, सणसणीत चपराक लगावणारी तर सावित्रबाईंची शैली आपले वेगळेपण राखून त्यांच्या कार्याला पूरक होणारी तरीही शांत व ठामपणे, रंजकपणे व्यक्त होणारी आहे. हे वेगळेपण कवयित्री म्हणून सावित्रीबाईंचे पहिलेपण, नवेपण काही लेखकांनी महत्त्वाचे मानले आहे. त्यामुळेच त्यांच्या 'कवितांचे' समीक्षणही घडले आहे. मात्र ही संख्या कमी आहे. परंतु त्यांच्या जीवनकार्याने प्रेरीत होऊन आजच्याच नव्हे तर उद्याच्या पिढीनेही आदर्श घ्यावेत. त्यांच्या संघर्षमय जीवनाकर्त्याचा परिचय सर्वांना व्हावा ते स्फूर्तीदायी घडावे यासाठी शेकडो लेखकांनी आपापल्या परीने सावित्रीबाईंचा तेजस्वी जीवनालेख आपल्या शब्दांत व्यक्त केला आहे.

## संदर्भ सूची :

१. जोशी अ.म., ''चरित्र, आत्मचरित्र: तंत्र आणि इतिहास'', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, च. आ. जानेवारी. २00७, पृ. २७.

२. तत्रैव, पृ. २२.

३. गणोरकर प्रभा, डहाके वसंत (संपा.) व इतर, ''वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश'', जी.आर. भटकळ फाऊण्डेशन, मुंबई,. प्र.आ. २00१, पृ. २0९.

४. राजाध्यक्ष विजया (संपा.), ''मराठी वाङ्मयकोश'' (खंड ४: समीक्षा), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ. २0१२, पृ. ८२.

५. तत्रैव, पृ. ११८.

६. उनि., राजाध्यक्ष विजया (संपा.), पृ. ११९.

७. ठाकूर रवींद्र, ''मराठी कादंबरी समाजशास्त्रीय समीक्षा'', दिलीपराज प्रकाशन, पुणे, १५ मे २00७, पृ. ३३४.

८. उनि., राजाध्यक्ष विजया (संपा.), पृ. ११९.

९. दाभोळकर नरेंद्र (संपा.), साप्ताहिक 'साधना', सदाशिव पेठ, पुणे, ५ जानेवारी २0१३, अंक: २१, पृ. ९.

१0.तत्रैव, पृ. ९.

११.तत्रैव, पृ. ३0.

* * *

# प्रकरण सातवे

## उपसंहार

एखाद्या व्यक्तीच्या साहित्याचा अभ्यास केवळ विशिष्ट गोष्टीचाच अभ्यास नसतो. तर ती व्यक्ती ज्या समाजात वाढली, जेथे तिची जडणघडण झाली त्या सामाजिक व धार्मिक धारणांचा हा अभ्यास असतो. कारण याचे प्रतिबिंब अपरिहार्यपणे साहित्यात उतरते. मग तो साहित्यप्रकार कथा, कादंबरी अथवा कविता असो. भावनांच्या प्रगटीकरणासाठी लेखकाला जे माध्यम सुलभ वाटेल त्याची तो निवड करतो. एखादी व्यक्ती व तिचे कर्तृत्व यांचे यथार्थदर्शन घडविण्यासाठी घटना व प्रसंग विचारात घेणे भाग पडते. राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक अशा अनेकविध गोष्टींचा परिणाम व्यक्तीच्या जीवनावर घडतो. अनुभवविश्व समृद्ध बनते आणि लेखनातून त्याचा आविष्कार होतो. कधी हे अनुभव वास्तवतेचे दाहक चटके देणारे असतात, तर कधी हे अनुभव फुलपंख घेऊन स्वच्छंद विहरणारे असतात.

एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश राजवटीने हळूहळू आपला जम बसवायला सुरुवात केलेली होती. पुष्कळ नव्या–नवलाईच्या गोष्टी, भाषा, शिष्टाचार इंग्रजी लोकांच्या रुपाने भारतीयांसमोर येत हेत्या. पारंपरिक शिक्षण आणि जीवन यामध्ये नवीन शोध आणि संकल्पना अजून तितक्याशा समाजापर्यंत पोहोचल्या नव्हत्या. स्त्रियांवर अनेक बंधने आणि विद्याबंदी होती. ज्या काळात स्त्रियांसाठी शिक्षण ही गोष्टच वर्ज्य होती अशा काळात एक स्त्री स्वतःचे अनुभव, स्वतःची कवित्वाची स्फूर्ती, अंतःप्रेरणा, समाज, समाजातील समस्या, आजूबाजूचा मोहक निसर्ग याविषयी कवितेतून बोलत होती. कवितेतून हे लिहीत असताना समाजाशी सहसंवाद साधत होती, संवाद साधताना सामाजिक कार्यही तन्मयतेने करीत होती. अर्थातच ही कवयित्री म्हणजे सावित्रीबाई फुले होय. शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात संघर्षमय वातावरणात सावित्रीबाईंनी आपले कार्य जीवनध्येय म्हणून अंगीकारले. समाजातील तळागाळापर्यंत, शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांपर्यंत ज्ञानगंगा पोहोचावी म्हणून सामाजिक विरोधाला न जुमानता शैक्षणिक कार्याचा आरंभ केला. सामाजिक विषमता दूर करायची असेल तर वैचारिक पातळीवरील समानता आणि हक्क यांची सांगड घालण्यासाठी अज्ञान निर्मूलन म्हणजेच शिक्षणाचा प्रसार केला. समाजातील भयावह रुढी, परंपरा यांवर नुसते लेखन न करता

बालविधवांच्या समस्येसाठी बालहत्या प्रतिबंधगृह आणि बालसंगोपन स्वखर्चाने स्वगृही सुरु केले. सत्यशोधक समाजाच्या कार्यात सुरुवातीपासून हिरीरीने सहभाग घेऊन ज्योतिरावांच्या पश्चातही हे कार्य सुरु ठेवले. दुष्काळपीडितांना अन्नदान केले, त्यासाठी अन्नछत्रालयात स्वत: जातीने लक्ष घालून समाजसेवा केली. साथीच्या रोगांच्या काळात म्हणजेच प्लेगच्या साथीत स्वत:च्या जीवाची पर्वा न करता आईच्या मायेने प्लेगच्या रुग्णांची सेवाशुश्रुषा केली. एकाच नव्हे तर अशाप्रकारे विविध क्षेत्रात क्रांतिकारक कार्य करुन सावित्रीबाईंनी त्यांच्या काव्याची ज्योतही तेवत ठेवली.

सावित्रीबाईंच्या कवितांमधील विविधता, त्यांचे इतर लेखन या सर्व वाङ्मयाच्या प्रेरणा आणि प्रभाव, समकालीन लेखक–लेखिका याचा परामर्श 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे वाङ्मयीन कार्य' या प्रबंधात घेण्यात आला आहे. तसेच सावित्रीबाईंच्या प्रभावी जीवनकार्याने, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्यामुळे त्यांच्या जीवनावर अनेक लेखकांनी चरित्ररुपाने जीवनपट सादर केला आहे. या सर्व गोष्टींची उपरोक्त सहा प्रकरणांमध्ये शोधप्रबंधात मांडणी केली आहे.

'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले : व्यक्ती आणि वाङ्मय ' या पहिल्या प्रकरणात सावित्रीबाई फुले यांची व्यक्तिगत जडणघडण कशी झाली, त्यांचे बालपण, त्यांच्यावरील संस्कार, शिक्षण याचा आढावा घेतला आहे. तसेच सामाजिक कार्यातील सहभाग आणि वाङ्मयनिर्मितीच्या प्रेरणा याचा परामर्श या प्रकरणात घेण्यात आला आहे.

सावित्रीबाई फुले यांनी लेखनातून सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक प्रबोधन केले. माणसाला माणूस म्हणून जगावयास शिकविणे, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मानवतावादी दृष्टिकोनातून त्यांनी आत्मप्रेरणेने लेखन केले.

सावित्रीबाई फुले यांच्या लेखनाला सुरूवात त्यांचे अध्यापन प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर, लग्नानंतर म्हणजे इ.स. १८४७ नंतर झाली आहे. परंतु त्यापूर्वीचे माहेरकडचे वातावरणही सुसंस्कारी होते. सावित्रीबाईंचे आई–वडील दोघे कष्टाळू, उदार अंतःकरणाचे असल्याने गोरगरिबांना ते मदत करायचे. गरिबांचे ते आशास्थान होते. कुटुंबातील संस्कारी वातावरणाचा त्यांच्या जडणघडणीत मोठा वाटा आहे. लग्नानंतर सुसंस्काराला शिक्षणाची जोड मिळून

सावित्रीबाईंवर मोठा प्रभाव पडला तो त्यांच्या विचारशील, सामाजिक क्रांतीची सुरूवात करणाऱ्या ज्योतिरावांचा. सावित्रीबाईंच्या वाङ्मयनिर्मितीमागे 'महात्मा ज्योतिराव फुले' आणि 'सगुणाबाई क्षीरसागर' ऊर्फ 'आऊ' यांची प्रेरणा होती.

प्रत्येक लेखकाचा स्वतःचा जीवनाविषयक विशिष्ट असा दृष्टिकोन असतो. त्याचे सूक्ष्म अतिसूक्ष्म प्रतिबिंब त्याच्या साहित्यात पडलेले असते. परंतु काही प्रसंगी लेखकाचा जीवनविषयक दृष्टिकोन आणि वाङ्मयीन दृष्टिकोन भिन्न असतो. मात्र सावित्रीबाईंचे लेखन, व्यक्तिमत्त्व आणि जीवनविषयक दृष्टिकोन एकच असल्याचे दिसते. आपल्या आजूबाजूला असणाऱ्या अज्ञानी, दुःखी जनसामान्यांना डोळ्यासमोर ठेवून त्यांनी आपल्या कविता केल्या आहेत. आपण अंगिकारलेल्या समाजसुधारणेच्या कार्यात पारंपरिक मानसिकतेमुळे अडथळे येणारच हे सावित्रीबाई जाणून होत्या. पण त्यामुळे घाबरून हाती घेतलेले कार्य सोडून न देता ते अधिक खंबीरपणे तडीस नेण्याचा त्यांचा निश्चय जीवनातील अनेकविध प्रसंगातून दिसतो. परोपकारासाठी त्यांनी आपले सारे आयुष्य वेचले. त्यांच्या स्वीकृत कार्यात अनेक विघ्ने अडचणी येऊनसुद्धा त्यांच्या स्वभावातील मृदुता कायम राहिली. मानवतेच्या मूल्यांवरील निष्ठांमुळे लहान–थोरांशी सावित्रीबाईंचे नाते जिव्हाळ्याचे राहिले. त्यांच्या स्वभावात मृदुता, धाडसीपणा, नम्रता, करारीपण यांचे अपूर्व मिश्रण आढळते. शिक्षणामुळे आधीच असलेल्या गुणांचा विकास होऊन आचारा–विचारात पारदर्शकता, निर्भिडता आली होती. बुद्धीप्रामाण्यवाद, मानवतावाद या मूल्यांवर त्यांची निष्ठा होती. या निष्ठांचा प्रभाव त्यांच्या सामाजिक आणि वाङ्मयीन जडणघडणीवर पडलेला दिसतो. सावित्रीबाई फुले यांचा मूळ पिंड शिक्षकाचा, समाजसुधारकाचा असून त्या प्रतिभासंपन्न कवयित्री, उत्तम लेखिका आणि उत्कृष्ट संपादिकादेखील असल्याचे प्रत्ययास येते. याचबरोबर स्त्री, शूद्रातिशूद्र यांच्यावर कोणत्याही भेदाशिवाय मनःपूर्वक प्रेम करणे, दीन–दुःखितांची सेवा करणे हा वात्सल्यभाव, सेवाभाव ही सावित्रीबाईंना मिळालेली निसर्गदत्त देणगीच म्हणावी लागेल. समाजप्रबोधनाची कार्यनिष्ठा, निखळ नीतिमत्ता यामुळे त्यांचे व्यक्तिगत जीवन आजही आदर्श आहे. अशाप्रकारे सावित्रीबाई फुले यांची वाङ्मयीन व एकूणच जडणघडण महात्मा ज्योतिराव फुले यांच्या मुशीत झाली आहे.

'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या लेखनामागील प्रेरणा आणि प्रभाव' या दुसऱ्या प्रकरणात त्यांच्या लेखनामागील प्रेरणांचा परामर्श घेण्यात आला आहे.

सावित्रीबाई यांच्या लेखनाची मुख्य आणि आद्यप्रेरणा महात्मा ज्योतिराव फुले ही होती. शूद्रातिशूद्र समाज आणि स्त्रिया यांची दांभिक धर्मशोषणातून मुक्तता करण्यासाठी सावित्रीबाईंनी लेखनातून सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक प्रबोधन केले. त्यामुळे त्यांचे लेखन रोखठोक आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे बनले. अनुभवातील आत्माविष्कार ही त्यांची महत्त्वाची लेखनप्रेरणा होती.

त्यांच्या लेखनात विषयांचे वैविध्य दिसून येते. त्यांच्या लेखनाच्या शैलीवर त्यांचे व्यक्तिमत्त्व जीवनमूल्ये, तत्कालीन परिस्थिती, प्रदेश, वाचक, श्रोते यांच्या वाङ्‌मयीन जाणिवा या घटकांचा प्रभाव पडलेला दिसतो. प्रत्येक लेखक किंवा कवी यांच्या वाङ्मयनिर्मितीवर जसा पूर्वसूरींचा प्रभाव दिसून येतो तसाच त्यांच्या वाङ्मयावर संत वाङ्मय, पौराणिक ग्रंथ व ऐतिहासिक व्यक्ती यांचा प्रभाव दिसून येतो. शोषित घटकांची सर्वार्थाने मुक्तता करण्यासाठी म्हणजेच समता प्रस्थापित करण्याच्या जाणिवेपोटी सत्यशोधक विचारांच्या प्रभावाने त्यांचे लेखन घडले. त्यांचे लेखन प्रसिद्धी, पैसा, अशुभनिवारण यांतून झाले नाही. तर अनुभवाच्या आत्माविष्कारातून झाले माणसाला माणूस म्हणून जगावयाला शिकविणे, स्वातंत्र्य, समता, बंधुता या उच्च मानवतावादी प्रेरणेतून सावित्रीबाईचे लेखन झाले.

'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे वाङ्मयीन कार्य' या प्रकरणात सावित्रबाईंचे काव्य, काव्याविषयातील विविधता, नवता, सामाजिक बांधिलकीची जाणीव, जीवनदृष्टी काव्यात कशी प्रतिबिंबित झालेली आहे त्याचा सविस्तरपणे परामर्श घेतला आहे. त्यांच्या 'काव्यफुले' या काव्यसंग्रहातील कविता विविध विषयांवर आहेत. प्रार्थनावर, आत्मपर, समाजचिंतनपर, निसर्गचिंतनपर, काव्यचिंतनपर, बोधपर आणि इतिहासविषयक अशा वैविध्यपूर्ण रचनांचा त्यात समावेश आहे.

सावित्रीबाईंच्या प्रार्थनापर कविता आणि स्तोत्रांमधून त्यांच्या सात्त्विक मनोवृत्तीचे दर्शन घडते. या कवितांमधून भक्तीभाव आणि आशादायी जीवनमूल्यांचे प्रगटीकरण होते. भूतकाळातील घटनांचा वर्तमानाशी संबंध जोडत आदरयुक्त अभिमानाच्या परंपरा सांगणारी त्यांची कविता आध्यात्मिक जीवनाचे दर्शन घडविते. आपल्या आराध्याची प्रार्थना करताना त्याचे शब्दचित्र मोठ्या मनोहारीपणे वर्णन करून संसारातील ऐहिक संपत्तीचे दान न मागता

विश्वव्यापी विश्वंभराला त्या ज्ञानाचे पसायदान मागतात. यातून त्यांच्या व्यापक आशादायी जीवनदृष्टीचा प्रत्यय येतो.

सावित्रीबाईंच्या काव्याद्वारे मराठी साहित्यात प्रथमच काव्यनिर्मितीबद्दल कवयित्री कवितेतून बोलताना आढळते. निसर्गात दिसणाऱ्या फुलपाखरांवर, फुलणाऱ्या फुलांवर कविता करण्याचा तो काळ नव्हताच. तरीही 'पिवळा चाफा', 'जाईचे फुल', 'जाईची कळी', गुलाबाचे फुल, 'फुलपाखरू' आणि 'फुलाची कळी', 'मानव व सृष्टी' आणि 'मातीची ओवी' या निसर्गविषयक कविता केल्या. निसर्गावर स्वतंत्र्य स्फुट, भावगीतात्मक रचना करण्याचा तो काळ नसतानाही त्यांनी या प्रकारच्या कविता त्यांनी केल्या हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

सृष्टी आणि सृष्टीतील जैविक–अजैविक घटक माती, पाने, फुले यांचे एकमेकांशी असलेले अद्वैत आणि त्या सृष्टीचा अविभाज्य घटक असणारा मानव यांचे ऋणानुबंध देखण्या शब्दांतून, साध्या घटनांतून मनमोहकपणे उत्कटतेने सांगणारी सावित्रीबाईंची कविता खरोखरच निसर्गाशी त्यांची तादात्म्य दर्शविते. निसर्गात जन्मणाऱ्या, फुलणाऱ्या आणि नाश पावणाऱ्या गोष्टींचा मानवी जीवनाशी अगदी सहज संबंध जोडून त्याची अभिव्यक्ती आपल्या काव्यातून प्रथमच करुन संवेदनशील कविमनाची त्या साक्ष देतात. तसेच त्या काळाच्या पार्श्वभूमीवर काव्यासाठी सर्वार्थाने नवीन असलेल्या 'निसर्ग' या विषयावर प्रतिभेच्या जोरावर नवकाव्याची निर्मिती करून जीवनाविषयक तत्त्वज्ञानाला स्पर्श केल्याने वेगळी उंची गाठतात असे म्हणता येईल. सावित्रीबाईंच्या बोधपर कवितांचा विचार करताना त्यांना समाजप्रबोधन करताना ज्या गोष्टी मनाला रूचल्या, सुचल्या आणि खुपल्यादेखील त्या–त्या गोष्टींवर फारसा सौंदर्याचा नव्हे तर वास्तव सत्याचा विचार करूनच लिहिल्या आहेत. त्यामुळे त्यात सौंदर्य काही अंशी कमी असले तरी सत्याचा परिमळ आणि आंतरिक तळमळ मात्र नक्कीच आहे. म्हणूनच कवितेच्या बाह्यांगापेक्षा गाभ्याचा मतितार्थ उच्च जीवनमूल्यांचा पुरस्कार करतो आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरतो असे म्हणावे लागेल.

स्वतःसंबंधी किंवा स्वतःच्या जीवनासंबंधी भावना कवितेतून व्यक्त करण्याची प्रथा नसताना सावित्रीबाईंनी आपल्या काव्यात अशा स्वरूपाच्या म्हणजे आत्मपर कविता लिहिल्या. त्या भावपूर्ण तर आहेतच पण त्यांच्या जीवनावर बालपणी झालेले संस्कार स्पष्टपणे दर्शवितात. अंतःकरणातील भावना कवितेत चित्रात्मक शैलीने व्यक्त झालेली दिसून येते.

सावित्रीबाईंनी स्त्री आणि शूद्रादीशूद्र यांच्या शिक्षणाचा ध्यास मनी घेऊन अज्ञानरूपी अंधःकार आणि दारिद्र्यरूपी दुःख दूर करण्यासाठी आपले अवघे जीवन वेचले. त्यामुळे शिक्षण आणि समाजप्रबोधन या विषयावर त्यांनी कवितांमध्ये भर दिलेला दिसून येतो. त्यांच्या कवितांमधून साध्या–सुंदर शब्दांत दीनदुबळ्यांविषयीची तळमळ आणि प्रदीर्घ चिंतनाची पार्श्वभूमी दिसून येते. त्यामुळेच या बहुजन समाजाच्या भल्यासाठी, सद्मार्गाचा उपदेश आणि आत्मसन्मानाचे महत्त्व सांगणारी गेयतापूर्ण पद्ये त्यांच्या लेखणीतून प्रगटली आहेत.

अशाप्रकारे 'काव्यफुले' या काव्यसंग्रहातील कविता विविध विषयांवर आहेत. समाजचिंतनपर, निसर्गचिंतनपर, आत्मपर, काव्यचिंतनपर, प्रार्थनापर, बोधपर आणि इतिहासविषयक अशा वैविध्यपूर्ण रचनांचा त्यात समावेश आहे.

पर्जन्यवृष्टीनंतर सृष्टीला नवपल्लवांचे विविधरंगी धुमारे फुटावेत तद्वत 'काव्यफुले'मधून विविध काव्यप्रकार आपल्यासमोर सादर होतात. जीवनातील अविस्मरणीय क्षण कॅमेऱ्यात शिताफीने बंदिस्त करावेत तसे निसर्गातील उत्कट नाजुक प्रसंग सावित्रीबाई शब्दांच्या कोंदणात बसवितात. सभोवतालच्या जगण्याच्या अनुभवांकडे पाहण्याची वेगळी दृष्टी आणि साध्या घटनांना अलौकिक उंचीवर नेऊन ठेवणारी प्रतिमा यांमुळे त्यांच्या कविता स्वतःची अशी वेगळी ओळख निर्माण करतात. सृष्टीक्रमातील नित्यघटना, कळी, कळीचे फूल, फुलाचे उमलणे, उमलून सुकणे हा साधा घटनाक्रमही त्यांच्या काव्याचे विषय बनले आहेत. निसर्गकवितांमधील निसर्ग आणि मानवी जीवनातील भावभावना यांची गुंफण अलगदपणे करण्यात आलेली दिसून येते. कवी आणि काव्य याविषयी त्यांच्या कल्पना त्यांनी आपल्या कवितेतून समर्थपणे व्यक्त केल्या आहेत. शिवशंकर, बळीराजा, छत्रपती शिवाजी आणि राणी ताराबाई हे श्रद्धाविषय काव्यविषयही बनले आहेत. त्याचबरोबर सावित्रीबाईंच्या संवेदनशील मनाला सामाजिक स्थितीचे भान असल्याने अंतरीच्या जिव्हाळ्याने, तळमळीने, समाजप्रबोधन करणाऱ्या समाजचिंतनपर कवितांची निर्मितीही सहजभावाने केली आहे. दीनदलितांची, स्त्रियांची दुःखे नाहीशी व्हावीत, गुलामगिरी नष्ट व्हावी, यातून त्यांची बोधपर कविता अवतरते आजूबाजूला असणारा जनसमूह, त्यांची जगण्याची पद्धत आणि जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष, समस्या यांचे चित्रण सावित्रीबाईंच्या कवितांमधून येते. त्यामुळे ग्रामीण जीवनाला स्पर्श करणारे शब्द 'शेत', 'शिवार', 'माती', 'कौले', 'ऐतोबा', 'बलुते', 'आलुते' आणि 'नवस'

यांसारखे शब्द सहजपणे कवितेत येताना दिसतात. शिक्षणाचे महत्त्व आपल्या कवितांमधून अधोरेखित करून समाजाला अंधश्रद्धा सोडून विचारशील बनून, ज्ञान घेऊन आपले जीवन कृतार्थ बनविण्याचा संदेश देतात.

स्वतःला आलेला उत्कट अनुभव शब्दबद्ध करताना आत्मपर कवितांमधील त्यांची चिंतनशील, अंतर्मुख मनोवृत्ती कवितेला आशयसंपन्न, समृद्ध बनविते. कारण त्यांचा आत्मप्रत्यय केवळ वैचारिकतेच्या पातळीवर न राहता, ती वैचारिकता लालित्याचे रूप धारण करून काव्यात्म बनून येते. त्यामुळे त्यातील जडता नाहीशी होते. त्यामधून सौंदर्याची प्रचिती येत राहते. सावित्रीबाईंच्या कविता जीवनासंबंधी मानवतावादी दृष्टिकोन मांडणाऱ्या असून त्यातून बुद्धीप्रामाण्यवाद, मानवतावाद, व्यक्तिस्वातंत्र्य ही मूल्ये उद्‌घोषित होतात. चिंतनातील नवता, रचनेतील आटोपशीरपणा आणि विचारातील संघर्षप्रवणता आणि आशयघनता यांचा आविष्कार त्यांच्या कवितांमधून दिसून येतो.

'सावित्री ज्योतिबा विरचित अथ बावन्नकशी सुबोध रत्नाकर' हा सावित्रीबाईंचा उपलब्ध झालेला दुसरा काव्यसंग्रह आहे. 'काव्यफुले' या काव्यसंग्रहाप्रमाणे यात विविध कविता असून नावाप्रमाणे बावन्न कडव्यांचे ते एक दीर्घकाव्य आहे. यामध्ये आर्यांच्या आगमनापासून ते शिवाजी महाराजांच्या स्वराज्यापर्यंत रूपरेषा आली आहे.हा इतिहास सांगताना सावित्रीबाईंनी सामाजिक इतिहासावर भर दिला आहे. यातील विविध प्रसंग, घटना भावनिक आकलनातून निर्माण झाल्या असून त्याला एक स्वाभाविक लय प्राप्त झाली आहे. यातील आशय घटक एकापुढे एक साखळीप्रमाणे असून त्यातील भावार्थाच्या अनुबंधाने जोडले आहेत. भारतीय संस्कृती, संघर्ष, स्वधर्म, अधर्म, वर्ण, समाज यांचे वर्णन यात केले आहे. एकंदरीत रानटी, तार्तारांपासून शूद्रशोषकांपर्यंत क्रमाने घटकांची मांडणी 'जेते विरूद्ध शूद्र' या सूत्राने झाली आहे. मानवाचे अमानवीकरण करणाऱ्या उच्चवर्णियांच्या अमानुष संस्कृतीविरूद्धचा संघर्ष उभा करण्याची पार्श्वभूमी दर्शविणे ही या रचनेमागील भूमिका स्पष्टपणे जाणवते. जनसामान्यांच्या आशा–आकांक्षा आणि त्यांच्या कष्टमय जीवनावर प्रकाश टाकत नव्या न्यायमूल्यांच्या प्रकाशात सावित्रीबाई गुलामी वृत्तीचा निषेध व्यक्त करतात. सहा कडव्यांच्या छोट्याच भागातून मनमौजी सत्ताधारी, अगतिक प्रजानन, असहाय्य स्त्री–वर्ग आणि शेवटी जुलमी सत्तेचा नाश म्हणजेच सत्तापालट अर्थातच इंग्रजांचा सत्ताप्रवेश या सर्व बाबी सावित्रीबाई 'पेशवाई' मधून सादर

करतात. रचनादृष्ट्या आकर्षक वाटत नसला तरी मूल्यदृष्टया हा भाग सकस आहे. पेशवाईच्या अस्तानंतर सुस्थिर झालेल्या इंग्रजी सत्तेतील आधुनिक जीवनमूल्यांचा गौरव या भागात करण्यात आला आहे. काळोख्या नभांगणात भयाण सामाजिक वास्तवात तेजःपुंज स्वयंप्रकाशी ताऱ्याचा उदय व्हावा आणि त्याची प्रभा सर्वत्र पसरावी तद्वत ज्योतिरावांच्या संभवाची पूर्वपिठीकासुद्धा यात आहे. शूद्रांची अमानवीय स्थिती सावित्रीबाईंच्या जिव्हारी लागते आणि काव्यातून करूणरसाने वाहते.

सावित्रीबाईंचा मूळ पिंड शिक्षकाचा, समाजसुधारकाचा असला तरी प्रतिभेची दैवी देणगी मिळाल्याने त्यांच्या हातून काव्यनिर्मिती झालेली दिसते. त्यांच्या 'काव्यफुले' या कवितासंग्रहात विविध विषयांवरील कविता आहेत. त्यांच्या उपदेशपर, बोधपर, सामाजिक कवितांमधून दीनदलितांबद्दल सहानुभूती, प्रेम, आणि शिक्षणाविषयी तळमळ दिसून येते. अज्ञानात खितपत पडलेल्या स्त्री–शूद्रांना शिक्षणाविषयी जागृती निर्माण व्हावी, या जागृतीतून आत्मभान यावे, आत्मभानातून आत्मसन्मानाने एका चांगल्या माणसांची निर्मिती व्हावी या ध्येयाने प्रेरीत होऊन त्यांनी काव्यरचना केली. त्यावेळी जीवनासाठी कला की कलेसाठी जीवन यांसारख्या विषयांवर चर्चा झडत नव्हत्या. जगण्यासाठी दीनदुबळ्यांचा पावलोपावली संघर्ष चालू होता. म्हणूनच सर्वसामान्यांची दुःखे, त्याची कारणे आणि त्यावरचा बिनतोड उपाय 'शिक्षणप्राप्ती' असे समीकरण मांडून सावित्रीबाई हे सर्व काव्यातून व्यक्त करताना दिसतात.

अन्यायाची चीड, गुलामगिरीचा तिरस्कार, स्वातंत्र्याचा पुरस्कार, निसर्गप्रेम आणि काव्यविषयक भावना अशा कितीतरी रंगछटांनी सावित्रीबाईंचे काव्य उत्स्फूर्तपणे बहरले आहे. त्यांचे काव्यविषय पूर्वसुरींपेक्षा आणि समकालीनांपेक्षा वेगळे आहेत. निसर्गवर्णनपर, काव्यविषय, आत्मपर भावप्रगटीकरण करणाऱ्या कवितांची निर्मिती प्रथमच त्यांच्याकडून झाली परंतु त्यांच्या काव्यनिर्मितीचा मूळ हेतू समाजप्रबोधन, समाजजागृती हाच असल्यामुळे अधिक कविता सामाजिक व बोधपर असल्याचे दिसून येते. त्यांचे काव्य वैचारिक प्रबोधन आणि लोकहितार्थ जन्मले याचा प्रत्यक्ष कविता वाचताना पदोपदी येतो.

म्हणूनच सावित्रीबाईंना आधुनिक काव्याची जननी म्हणणे अधिक योग्य वाटते. त्यांची कविता भाषांतरीत किंवा रूपांतरीत असण्याऐवजी उत्स्फूर्त आणि थोडी सौंदर्यवादी होती असे म्हणायला हरकत नाही. काही ठिकाणी त्यांच्या कल्पना भव्यतेला स्पर्श करतात पण प्रत्येक

ठिकाणी अशी भव्यता जाणवत नाही. मात्र स्मरणीय कल्पना, साधी, सोपी, प्रसादपूर्ण रचना, रसिकांना नक्कीच वेगळा अनुभव देऊन जाते.

'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या त्यांच्या दुसऱ्या काव्यात वेगवेगळ्या कविता नसून ते सहा भागात विभागलेले एक दीर्घकाव्य म्हणता येईल. यात त्यांना राजकीय इतिहासापेक्षा सामाजिक इतिहासच अधिक सांगायचा आहे असे वाटते. स्त्रिया व शूद्रातिशूद्र हे अज्ञान, दारिद्र्य आणि गुलामगिरीत वर्षानुवर्ष पिचत होते. त्या गुलामगिरीचे प्रभावी चित्र सावित्रीबाईंनी काव्यात उभे केले आहे. सावित्री–ज्योती या दांपत्याने आपले अवघे जीवन लोककल्याणार्थ ध्येयवेडे होऊन समर्पित केले होते. आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक गुलामगिरीतून मुक्ततेच्या आरंभाचा नारा ज्योतिरावांकडून स्त्री–शूद्रातिशूद्रांना दिला गेला होता. सावित्रीबाईंना या सर्व कार्याची नुसती माहितीच होती असे नव्हे तर त्यामध्ये त्याचा सहभागही होता. म्हणूनच इतिहासाच्या पार्श्वभूमीवर ज्योतिरावांच्या भव्य जीवनाचा व दिव्य कार्यांचा सुंदर आलेख चित्रित करणे हादेखील या काव्याचा हेतू आहे हे प्रत्ययास येते. सावित्रीबाईंच्या काव्याची प्रेरणा, त्यातील विषयाची विविधता, काव्यरचनेचा उद्देश, तत्कालीन परिस्थिती व त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन त्यांच्या दोन काव्यसंग्रहांतून घडते. लोकव्यवहारातून निर्माण झालेले त्यांचे काव्य वास्तव जीवनाच्या परिघात पूर्ण झाले आहे.

सावित्रीबाईंची काही भाषणे उपलब्ध आहेत. त्या भाषणांतून जनसामान्यांना देण्यासाठी एक विशिष्ट विचारधारा दिसते. भाषणात सुसूत्रता, क्रम आणि योग्य मांडणी यामुळे भाषणविषय श्रोत्यांपर्यंत अचूक पोहोचतो. सावित्रीबाईंच्या भाषणाला ओघ आणि मुद्देसुदपणाबरोबर अंतःकरणातील जनसामान्यांविषयी वाटणारी तळमळ एवढी आहे की त्यातील सहजसुलभ भावनांमुळे ही भाषणे जिवंत वाटतात. चित्रस्पर्शी वर्णनांचा अनोखा भावनाविष्कार म्हणजे ही भाषणे आहेत.

सावित्रीबाईंनी त्यांच्या कर्मयोगी पतीला म्हणजेच ज्योतिरावांना लिहिलेली पत्रेही उपलब्ध आहेत. एका ध्येयनिष्ठ पत्नीने आपल्या कर्मयोगी ध्येयनिष्ठ पतीशी लेखनातून केलेला संवाद म्हणजे ही पत्रे आहेत. ही पत्रे लौकिकार्थाने पतीपत्नीची खाजगी गोष्ट न राहता व्यापक अर्थाने सामाजिक कार्याचे शिवधनुष्य पेलणाऱ्या मनाचे प्रतिबिंबच आहेत असे म्हणता येईल.

कारण उपलब्ध प्रत्येक पत्रात त्यांचे समाजकार्य आणि कार्यासंबंधीचा उल्लेख अपरिहार्यपणे आलेला दिसून येतो.

पहिल्या पत्रात साधा सरळ संवाद आहे. त्यातून त्यांनी शूद्रातिशूद्रांसाठी सुरू केलेल्या शाळांविषयी आप्तस्वकीय म्हणजे फक्त सासरकडील नव्हे तर हक्काच्या माहेराकडूनही तीव्र नापसंती होती हे निदर्शनास येते. पण हे सत्य सांगताना आणि आपली बाजू मांडताना अतिशय कलात्मकता आणि आत्मीयता त्यांच्या लेखनात दिसून येते. त्यामुळे लेखनातील सहजसंवादातून वाचकांना कलास्वाद प्राप्त होतो. दुसऱ्या पत्रातील मजकूरावरून सावित्रीबाईंच्या अंगी असलेल्या धैर्य, नेतृत्वगुण व समयसुचकता यांची ओळख पटते. त्यांच्या उपलब्ध झालेल्या तिसऱ्या पत्रात महाराष्ट्रातील भीषण दुष्काळाचे वास्तव शब्दचित्र आहे. दुष्काळग्रस्त भागातील लोकांना मायेच्या शब्दांबरोबर आधाराचा हातही सावित्रीबाई आणि सत्यशोधक कार्यकर्त्यांनी दिल्याचे या पत्रातून समजते. दुष्काळनिवारणाबाबत कलेक्टरला निवेदन दिल्याचेही यात नमूद केले आहे. पत्रातील विचार त्यांच्या परिपक्वतेचा प्रत्यय देतात. सावित्रीबाईंची जनसामान्यांविषयी कणव व त्यांचे अतुलनीय धैर्य याचा प्रत्यय आपणास प्रत्येक पत्रात येतो. ही पत्रे एक ऐतिहासिक दस्ताऐवज म्हणूनही अधिक लक्षात राहतात.

प्रत्येक कवीची आपल्या काव्यलेखनाची एक शैली असते. त्याचा स्वतःचा एक भाषाविषयक दृष्टिकोन असतो. सभोवतालच्या सामाजिक, सांस्कृतिक वातावरणातून भाषेच्या पातळीवर तो काहीएक अनुबंध जोडतो. त्यातूनच त्याची स्वतःची अशी एक शैली निर्माण होते भाषेच्या पातळीवर कवीच्या लेखनावर वेगवेगळे संस्कार होत असतात. त्या कवीचे सामाजिक, सांस्कृतिक वातावरणाशी असलेले नाते त्यातूनच उलगडत जाते.

सगुणाकडून निर्गुणाकडे, मूर्ताकडून अमूर्ताकडे आणि दृष्टाकडून अदृष्टाकडे जाण्याचा रस्ता कवितेतून प्रगटतो. त्यासाठी कवी आपल्या काव्यात प्रतिमांची निर्मिती करतो. लय, ताल, प्रतिमा यांच्यातून कलाकृतीच्या आशयाकडे जाता येते. प्रतिमानिर्मितीमुळे शब्दांच्या सहाय्याने कवी आपला अनुभव अनेकार्थसूचक व प्रत्ययक्षम बनवितो. कवितेत प्रतिमारूप शब्दांखेरीज आणखीही काही शब्द असतात. थोडक्यात वाङ्‌मयकृती ही विशिष्ट अशा शब्दांच्या संघटनेमधून निर्माण होते. भाषेचे हे रूप मात्र दैनंदिन व्यवहारातील बोलीभाषेपेक्षा कितीतरी वेगळे असते. सावित्रीबाईंच्या समग्र कवितांचा विचार करता काही कविता जरी पारंपरिक

आशय व्यक्त करणाऱ्या असल्या तरी बहुसंख्य कविता जीवनासंबंधी नवीन, ताजा दृष्टिकोन देणाऱ्या आहेत. चार्तुवर्ण्यपद्धतीवर, अंधश्रद्धेवर कोरडे ओढणारी ही कविता आहे. स्त्री–पुरूष आणि सर्व जातिधर्माकडे पाहण्याची समत्ववृत्ती त्यांच्या कवितेतून दिसून येते. प्रसंगी आधुनिकतेची मूल्ये उद्‌घोषित करणारी आणि रोखठोक कोणाचा मुलाहिजा न ठेवणारी कविता त्यांनी लिहिली आहे. काव्यफुले या संग्रहातील काही कविता अल्पाक्षरी आहेत परंतु विषयांची विविधताही त्यात आहे, नाविण्य, ताजेपणा असून मनातील सद्‌भावनांचे तरंग त्यातून प्रतित होतात. कधी मानवी जीवनाची क्षणभंगुरता त्यांना अस्वस्थ करते तर कधी त्यांच्या काव्यातील भावना मानवतेचे गौरीशिखर गाठण्याचा ध्यास धरते.

एकूणच सावित्रीबाईंची कविता सूत्रमय भाषा, नेटका आविष्कार, स्वातंत्र्य, समता, बंधुता या त्रिसूत्रींचा ध्यास घेणारी आहे. सावित्रीबाईंनी कवितेत आलंकारिकतेपेक्षा मूळ आशयविषयाला महत्त्व दिले आहे. नाद, ताल, लय यांचा कवितालेखनात आविष्कार झाला आहे. कवितेतूनच नव्हे तर त्यांच्या भाषणांमधूनदेखील प्रवाहीपणा आणि आवेग हे अंगभूत गुण व्यक्त झाले आहेत.

'काव्यफुले' आणि 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यसंग्रहाचे मूल्यमापन करताना त्यांच्या काव्यलेखनातील प्रतिमा, प्रतीके, अलंकार आणि भाषाशैली यांचा आढावा घेतला आहे. सावित्रीबाईंच्या कवितांमधील प्रतिमा गूढ, अनाकलनीय, दुर्बोध नाहीत. उलट त्या सरळ–साध्या सांकेतिक आहेत. काही ठिकाणी त्यांचा सुंदर, समर्पक वापरही झाला आहे. पण ही प्रतिमा आणि प्रतीके यांचा काव्यात वापर कमी झाला आहे. त्यांनी आपल्या काव्यात वेगवेगळया अलंकाराचाही वापर केला आहे. सावित्रीबाईंना काव्यप्रतिभा लाभली होती हे खरे असले तरी त्यांचा खरा पिंड शिक्षिकेचा होता. समाजप्रबोधन, समाजजागृती हे त्यांचे साध्य होते, या साध्यापुढे काव्य हे 'साधन' होय. त्यामुळे काव्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांची चौकट मोठी आहे. स्त्री–शूद्रातिशूद्रांच्या समाजजीवनातील सुखदुःखांशी समरस होऊन त्यांच्या व्यथा वेदनांचे चित्रण त्यांनी कवितांमधून मांडले आहे. त्यावरून त्यांच्या चिंतनशील वृत्तीचा आवाका मोठा प्रदीर्घ असल्याचे लक्षात येते.

'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि समकालीन लेखिका' या प्रकरणात या कालावधीतील लेखक–लेखिका, कवी–कवयित्री यांच्या तुलनेत सावित्रीबाईंचे वाङ्मयीन कार्य

आणि वेगळेपणा शोधण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रीशिक्षण, शूद्रातिशूद्रांना शिक्षण, जातिभेदाचे उच्चाटन, विधवाविवाह, प्रौढविवाह, भ्रूणहत्यानिवारण अशा एक ना अनेक विषयांवर जनतेला नवीन विचारप्रवाहांची ओळख होऊ लागली होती याचेच प्रतिबिंब अर्थातच लेखनात उमटू लागले होते. निबंध, नाटक, ग्रंथ, कादंबरी, आत्मचरित्र आणि कवितांमधून मराठी साहित्यात कधी न येणारे विषय, सामाजिक प्रश्न विचारात घेण्यास सुरुवात झाली. प्राचीन मराठीत खूप कमी प्रमाणात आढळणारी वास्तवप्रधानता , सामाजिक प्रश्न, आत्मपर कविता, सृष्टिवर्णनात्मक कविता आकार घेऊ लागली. खंडकाव्य हा इंग्रजीत आढळणारा काव्यप्रकार मराठीत याच कालावधीत अस्तित्वात आला.

या कालावधीत स्त्री लेखिकांनी शिक्षणाचा प्रसार होऊ लागल्याने संवेदनांना, भावनांना लेखनातून व्यक्त करण्यास सुरुवात केली होती. साळुबाई तांबवेकर यांनी कांदबरी, ताराबाई शिंदे यांनी स्त्रियांची बाजू नेटाने मांडणारे पुस्तक, लक्ष्मीबाई टिळक यांचे आत्मचरित्र लेखन मिसेस फेरार यांनी निबंधरुपात लिहिलेली पुस्तके (ख्रिश्चन धर्मप्रसारार्थ), पंडिता रमाबाईंची भाषांतरित पुस्तके आणि गीते, रमाबाई रानडे यांनी शब्दबद्ध केलेल्या आठवणी काशीबाई कानिटकर यांची कादंबरी व चरित्र, आनंदीबाई कर्वे ऊर्फ 'बाया' यांचे आत्मचरित्र तसेच पार्वतीबाई आठवले यांचे आत्मचरित्र असे लेखनाचे विविध प्रकार इ.स. १८७३ पासून इ.स.१९२८ पर्यंत हाताळले. या सर्व लेखिकांच्या लेखनातून कादंबरी, आत्मचरित्र, चरित्र ह्या साहित्यप्रकाराचे लेखन केलेले आढळते. मात्र सावित्रीबाईंच्या समकालीन अशा या लेखिकांपैकी लक्ष्मीबाई टिळक वगळता कोणीही कवयित्री असल्याचे आढळत नाही. लक्ष्मीबाई टिळक या काळाच्या दृष्टीने सावित्रीबाईंच्या बऱ्याच जवळ येत असल्या, तरी त्यांचा काळ इ.स. १८७३ ते १९६६ असा येतो. त्यातही त्यांना कविता करण्याचा छंद आधीपासून असला तरी त्यांची कवयित्री म्हणून ख्याती इ.स. १९०७ च्या जळगावच्या कविसंमेलनानंतर झाली. लक्ष्मीबाईंनी इ.स. १८९४ मध्ये काव्यलेखनास प्रारंभ केला. याचा अर्थ अर्वाचीन मराठी काव्याचा विचार करता एकोणिसाव्या शतकात आद्य कवयित्रीचा मान सावित्रीबाईंनाच द्यावा लागतो.

ख्रिस्ती धर्म, धर्मप्रसारक यांच्या प्रभावाने काही साहित्यनिर्मिती झाली तशीच परदेशी व्यक्तीही मराठी साहित्याने प्रभावित झाल्या. त्यांनी मराठी वाङ्मयाच्या विशेषतः संतवाङ्मयाच्या प्रसाराचे काम केले. यामध्ये रेव्हरंड जस्टिन ॲबट, रेव्हरंड जे. मरे मिचेल

आणि मिसेस मिचेल यांची नावे प्रामुख्याने घ्यावी लागतील. तसेच एतद्देशीय मराठी असणारे परंतु ख्रिस्ती धर्म स्वीकारुन मराठीतच साहित्यनिर्मिती करणारे लेखक–कवींचेही योगदान आहे. यामध्ये भाषांतरीत साहित्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असले तरी काही नवीन साहित्यप्रकारदेखील आहेत. बाबा पद्मनजी आणि रेव्हरंड नारायण टिळक यांची नावे प्रामुख्याने कादंबरी, आत्मचरित्र आणि स्फुटकाव्ये, खंडकाव्ये, दीर्घकाव्ये यांसाठी घ्यावी लागतील. तसेच हिंदुधर्माविषयी आस्था असणारे परंतु धर्माच्या नावाखाली चालणारी अवडंबरे रोखण्यासाठी, धर्मांतरे रोखण्यासाठी काही धर्म सुधारक, समाजसुधारक यांनी लेखण्या उचलल्या. लोकहितवादी देशमुख, महात्मा ज्योतिराव फुले, सुधारक आगरकर यांनी समाजजागृतीसाठी विविध प्रकारचे लेखन केले.

इ.स. १८८५ केशवसुतांनी आधुनिक कवितेचा पाया घेतला असे मानले जात असले तरी इ.स. १८५४ मध्ये सावित्रीबाईंचा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झाला. म्हणजेच साधारणपणे त्यांच्या काव्यरचनेच्या कालावधीत तीस वर्षाचा फरक आढळतो. साहित्याच्या दृष्टीने हा कालखंड फार मोठा नाही. एका शतकाचा कालावधी विचारात घेतल्यास दोघांना समकालीनच म्हणावे लागेल. यामुळेच सावित्रीबाईंच्या कविता केवळ काळाच्या दृष्टीनेच केशवसुतांच्या पूर्वीच्या आहेत असे नाही, तर केशवसुतांनी हाताळलेले अनेक काव्यविषय सावित्रीबाईंनी यापूर्वीच हाताळले आहेत. अर्थात संख्येच्या दृष्टीने विचार करता फरक आढळेल इतकेच. एका मुक्ता या विद्यार्थिनीने शुद्रातिशूद्रांच्या स्थितीचे वर्णन करणारा निबंध सोडल्यास त्यांची विचारधारा पुढे नेणारा कोणताच दुवा आज तरी उपलब्ध नाही. काव्यक्षेत्रात केशवसुतांच्या काव्याचे महत्त्व अबाधित असले तरी त्यांचे काव्य मराठी काव्यातील फक्त एक प्रगत अवस्था होती असेच म्हणावे लागेल. काव्यक्षेत्रात सावित्रीबाईंनी त्यांच्या 'काव्यफुलां'नी क्रांतीचा आरंभ केला त्यामुळेच सावित्रीबाईंना आधुनिक मराठी काव्याच्या आद्यजननीचा मान द्यावा लागेल.

'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य' यामध्ये सावित्रीबाईंनी केलेल्या विविध सामाजिक कार्यातील सहभाग, सत्यशोधक समाजाचे कार्य आणि सहृदयतेने केलेल्या कार्याचा परामर्श घेतला आहे. सावित्रीबाई फुलेंचे भारतातील पहिली स्त्री शिक्षिका, पहिली मुख्याध्यापिका म्हणून असलेले कार्य निर्विवादपणे अतिशय मोलाचे आहे.

यासाठी करावा लागणारा संघर्ष त्या काळातील परिस्थिती आणि परिस्थितीवर मात करत जिद्दीने समाजाच्या हिताची तळमळ असल्याने केलेल्या कार्याचा आढावा उपरोक्त प्रकरणात घेतला आहे.

सावित्रीबाईंनी हळदीकूंकू समारंभातून समतावादी आचरणाचे दर्शन घडविले. खादीचा सर्वप्रथम पुरस्कार केला. केशवपनाची किंवा 'संन्यास दीक्षे'ची पद्धत बंद करण्यासाठी देशातील पहिला अहिंसक मार्ग स्वीकारला मानवी भावनांना साद घालणारा संप घडवून आणला अवघ्या प्राणिमात्रांसाठी असणारे 'जीवन' म्हणजे 'पाणी' जे अस्पृश्य म्हणून आपल्याच काही बांधवांना भीक म्हणून मागावे लागत होते त्यांच्याकरिता स्वत:च्या घरचा हौद खुला करुन निखळ मानवतेचे दर्शन घडविले.

या सर्व कार्याहून अवघड आणि नाजूक कार्य म्हणजे बालविधवांना मानसिक आधार देऊन स्वगृही त्यांचा आणि निरपराध बालकांचा जीव वाचावा म्हणून जननिंदेची तमा न बाळगता स्वत: शारीरिक, मानसिक, आर्थिक झळ सोसून 'बालहत्याप्रतिबंधगृह' सुरु केले. यशस्वीपणे चालविले. जाती–पातींच्या बंधनांना तोडून अत्यंत सहृदयतेने एका विधवेच्या अनाथ मुलाला 'यशवंताला' दत्तकपुत्र म्हणून स्वीकारले. एवढ्यावरच न थांबता स्वपुत्राचे सर्व अधिकार आणि प्रेम, वात्सल्य त्याला दिले. सत्यशोधक समाजाच्या कार्यात अगदी सुरुवातीपासून सक्रीय सहभाग घेऊन अगदी ज्योतिरावांनंतरही सत्यशोधक समाजाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. दुष्काळग्रस्तांसाठी मदत मिळवून देणे, अन्नछत्र उघडणे, अन्नछत्रात जातीने लक्ष घालून स्वत: कार्य करणे. लोकांना धीर देणे. माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी जागृत करणे, आत्मसन्मानाची जाणीव करुन देणे, अशा एक ना अनेक सामाजिक कार्यात सावित्रीबाईंचा सहभाग विशेष उल्लेखनीय होता. अगदी जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत समाजहिताचा विचार करुन आपल्या जीवाची पर्वा न करता त्यांनी प्लेगच्या साथीत अतुलनीय कार्य करुन रणांगणावर रणमर्दिनीप्रमाणे कार्य करता–करता देहत्याग केला.

अशाप्रकारे उपरोक्त सहा प्रकरणांमध्ये सावित्रीबाईंची जडणघडण, वाङ्मयीन कार्य, सामाजिक व शैक्षणिक कार्य, समकालीन लेखक–लेखिकांचे साहित्य यांचा अभ्यास करुन अखेरच्या शेवटच्या सातव्या प्रकरणात वरील सहा प्रकरणांमध्ये हाती आलेले निष्कर्ष व निरीक्षणे नोंदविण्यात आली आहेत.

ज्योतिरावांनी स्त्री शिक्षणाचा पाया घालून फक्त स्त्रियांसाठीच नाही तर शूद्रातिशूद्रांसाठी ज्ञानगंगा खुली करुन दिली. याच ज्ञानगंगेचा लाभ सर्व स्त्री जातीस होण्यासाठी सावित्रीबाईंनी केलेले शैक्षणिक योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. ज्ञान ही फार मोठी शक्ती असून स्त्रिया आणि दलित–बहुजन वर्गाची उन्नती ज्ञानाशिवाय होऊ शकणार नाही, हे ओळखून प्रत्यक्ष शिक्षणप्रसाराच्या कार्याला त्यांनी आयुष्यभर वाहून घेतले. संपूर्ण देशात मुलींची शाळा आणि 'नेटीव्ह लायब्ररी' सर्वप्रथम सुरु करण्याचे श्रेय ज्योतिराव व सावित्रीबाई यांच्याकडे जाते. देशातील स्त्री – शूद्रातिशूद्र वर्गाची समग्र सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक चळवळ उभारण्याचे क्रांतिकारक असे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले. स्त्रियांची गुलामगिरीतून मुक्तता व्हावी यासाठी दोन हजार वर्षात अनेक अयशस्वी प्रयत्न झाले. पण स्त्रियांना खऱ्या अर्थाने बंधमुक्त करुन त्यांच्या जीवनाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम १९व्या शतकात महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी केले. शैक्षणिक गुलामगिरीविरुद्ध पहिले 'बंड' केले ते सावित्रीबाई फुले यांनीच. त्यांच्यामुळेच भारतीय महिलांना शिक्षणाची संधी मिळाली. सावित्रीबाईंमुळेच शैक्षणिक क्रांतीचा श्रीगणेशा झाला.

आधुनिक काळातील उपयुक्तता :

भारतवर्षाला धर्मशास्त्रातील जात, वर्ण, लिंग विषमतेचा कलंक आहे. त्यामुळेच भारतीय स्त्रीला हजारो वर्षे शिक्षणाची दारे बंद होती. धर्मग्रंथांचा त्याला आधार होता. या धर्मशास्त्रांच्या अभेद्य भिंती फोडून ज्ञानाचा प्रकाश भारतीय स्त्रीच्या अंगणात आणण्याचे ऐतिहासिक कार्य क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी केले. शिक्षिका, लेखिका, कवयित्री, माता, समाजसेविका अशा विविध भूमिकेतून सावित्रीबाईंनी समाजातील गोरगरीब, दुर्बल घटकांची सेवा करण्यात आपले सारे आयुष्य पणाला लावले. समाजातले स्त्रीदास्यत्व मिटविण्यासाठी स्त्रियांनी शिकून सवरून स्वावलंबी बनावे म्हणजे त्यांना आपल्या खऱ्या शक्तीची ओळख होऊन पुरुषप्रधान समाजाची गुलामगिरी पत्करण्याची वेळ येणार नाही, असे ठाम मत त्यांनी स्त्रियांपुढे मांडले.

प्रौढ शिक्षण, रात्रशाळा इत्यादी योजनांच्या जन्मदात्री सावित्रीबाई होत. म्हणूनच त्या एक शिक्षणतज्ज्ञ होत्या, असे म्हणावे लागेल. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर त्यांच्या कौटुंबिक

परिस्थितीचा व सामाजिक वातावरणाचा परिणाम होतो, हा विचार सावित्रीबाईंनी स्वानुभवातून मांडला.

त्यामुळे सावित्रीबाई ह्याच आद्य भारतीय स्त्रीशिक्षिका, मुख्याध्यापिका, समाजसेविका, दीनांची सावली, स्त्रीमुक्तीच्या आद्यप्रणेत्या, ज्ञानज्योती, क्रांतिज्योती, क्रांतिदेवता, भारतीयांची ज्ञानाई, कृतिशूर समाजक्रांतिकारक, विवेकी विचारवंत, स्त्रीरत्न, क्रांतिकारी व्यक्तीमत्त्व आणि आधुनिक काव्याची आद्यजननी म्हणजे सावित्रीबाई हे वास्तव अधोरेखित होण्यास मदत होते.

वरील सर्व मांडणी लक्षात घेता  हजारो वर्षे चार्तुवर्ण्य व्यवस्थेच्या उतरंडीत विभागल्या गेलेल्या माणसाला स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वत्रयींचे जाण आणि भान देण्याचे कार्य या संशोधनातून घडेल असा मनोमन विश्वास वाटतो.

पुढील संशोधनाची दिशा :

सावित्रीबाई फुले यांच्या एकूणच वाङ्मयीन आणि इतर कार्याचा विचार करता त्यांचे कार्य भारतवर्षाच्या प्रबोधन चळवळीतील एक अत्यंत महत्त्वाचा आणि वैशिष्टपूर्ण असा टप्पा ठरतो. त्यांनी केलेले प्रत्येक कार्य हा त्या कार्याचा प्रारंभबिंदू ठरतो.

सहाजिकच ही सर्व कार्ये केवळ वेगळेपणा सिद्ध करत नाहीत तर मानवी मूल्यांच्या जोपासनेचे अधिष्ठान ठरते विषमाधिष्ठित समाजव्यवस्थेला समतेच्या मार्गावर आणण्याचा एक महत्त्वपूर्ण ठेवा ठरतो. त्यांचे हे कार्य विविध कप्प्यांमध्ये विभागून त्यांचा वेध घेता येईल. या ठिकाणी त्यांच्या संदर्भात केलेली मांडणी ही अंतिम नाही. त्यांचे अनेक पैलू वेगवेगळ्या अंगांनी तपासता येतील. संशोधनाच्या अंगाने हेच पैलू तपासता येतीलच पण त्याबरोबरच त्यांनी केलेले भ्रूणहत्येसंदर्भात बालहत्याप्रतिबंधगृहा संदर्भात, जरठ कुमारी विवाहासंदर्भात, केशवपना संदर्भात, प्लेगच्या साथीमध्ये केलेल्या कार्याच्या संदर्भात, दुष्काळसदृश्य परिस्थितीसंदर्भात केलेल्या कार्यावर विविध लघुपट तयार करता येतील. आणि त्यांच्या एकूणच कार्याचा विविधांगी शोध समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण होण्यास निश्चितच फलदायी ठरेल.

****

**साधनग्रंथ :**


१) झोडगे फुलवंता, ''साध्वी सावित्रीबाई फुले'', चिनार पब्लिशर्स, धनकवडी, पुणे, दु. आ. २०१३.

२) देशपांडे कृ.पं., ''अग्निफुले'', नूतन प्रकाशन, पुणे, प्र.आ. ऑक्टोबर १९८२.

३) माळी (डॉ.) मा. गो. (संपा.) ''सावित्रीबाई फुले : समग्र वाङ्मय'', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, च.आ. ऑक्टो., २००६.

४) हनवते (डॉ.) शोभा, ''सावित्रीबाई फुले यांची समग्र कविता, ''चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, द्वि. आ. २०११.


**क्रांतिज्योती सावित्रीबाईंवर आधारित चरित्रे, कादंबऱ्या :**


१) उगले जी.ए.,''सावित्रीबाई फुले चरित्र'', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दु. आ. २००९.

२) कांडगे (ॲड.) राम, ''क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले'', राजश्री प्रकाशन, चाकण, जि. पुणे, प्र.आ. जाने. २०१४.

३) खुर्द के.डी., ''सावित्रीबाईंचा संघर्ष'', श्रमिक प्रतिष्ठान व भारतीय महिला फेडरेशन, कोल्हापूर, प्र.आ. १९९९.

४) चोले (डॉ.) रावसाहेब, ''स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले'', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ. मे. २०००.

५) झोडगे फुलवंता, ''साध्वी सावित्रीबाई फुले'', चिनार पब्लिशर्स, धनकवडी, पुणे, द्वि.आ. मे २०१३.

६) नागतोडे (डॉ.) किरण, ''कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले'', दिलीपराज प्रकाशन प्रा.लि., पुणे, प्र.आ. २६ जाने. २०१३.

७) पवार ना.ग., ''सावित्रीबाई फुले : अष्टपैलू व्यक्तिमत्त्व'', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, द्वि.आ. २६ जाने. २०१०.

८) पोळ (डॉ.) उषा, ''ज्ञानज्योती सावित्रीबाई पुले'', कोमल प्रकाशन, नालासोपारा (प.), जि. ठाणे, द्वि.आ. १ मे. २०१४.

९) बनसोडे हिं.गो., ''आभाळाएवढी,'' शलाका प्रकाशन, दादर, मुंबई, प्र.आ. १९८१.

१०) बिडवे सुनिता, ''सावित्रीबाई फुले, विचार आणि कार्य'', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. जाने. २०१०.

११) माळी मा.गो., ''क्रांतिज्योती, सावित्रीबाई जोतीराव फुले'', मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे (प.), चौथी आवृत्ती – २०१२.

१२) मुरुमकर कविता, ''मी सावित्री जोतीराव'', शौर्य प्रकाशन, सोलापूर, प्र.आ. ऑगस्ट २०१०.

१३) सुर्यवंशी राजाराम, ''युगस्त्री सावित्रीबाई फुले'', मावळाई प्रकाशन, शिरुर, तृ. आ. २०१०.

१४) सोनवणे विश्वास, ''क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले'', श्री आदर्श पुस्तकालय प्रकाशन, आग्रा रोड, धुळे, द्वि. आ. २००४.

१५) होळीकर एस.एस., ''ज्ञानगंगोत्री सावित्रीबाई फुले'', लक्ष्मण प्रकाशन, पुणे, प्र.आ. ४ ऑगस्ट २०१३.

## संदर्भग्रंथ सूची :


१. आगलावे सरोज : **''ज्योतिराव फुले यांचे सामाजिक तत्त्वज्ञान''**, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००३.

२. ऑम्व्हेट गेल : **''महात्मा फुले आणि स्त्रीमुक्ती विचार'',** लोकवाङ्मय गृह, मुंबई, सहावी आवृत्ती २००५.

३. उगले जी.ए. : **''महात्मा फुले एक मुक्त चिंतन'',** कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर २०००.

४. उजगरे अनुपमा : **''परकीय ख्रिस्ती मिशनरींचे मराठी भाषाविषयक कार्य'',** परममित्र प्रकाशन, ठाणे, प्रथमावृत्ती फेब्रु. २००९.

५. उत्पात वसंत : **''मराठी भाषासौष्ठव–म्हणी–अलंकार वाक्प्रचार'',** स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती २००३.

६. कऱ्हाडे वीणा : **''महात्मा ज्योतिबा फुले'',** लोकवाङ्मय गृह, पुणे, द्वितीयावृत्ती २००४.

७. कवडे, पांडुरंग बाळाजी : **''महात्मा ज्योतिराव फुले ह्यांचे चरित्र'',** प्रकाशक – रंगनाथ त्र्यंबक रत्पारखी, नांदगाव, जि. नासिक, प्रथमावृत्ती– २४ फेब्रु.१९६८.

८. कीर धनंजय : **''महात्मा ज्योतिराव फुले'',** पॉप्युलर, प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती १९९२. पुनर्मुद्रण २००२.

९. कीर धनंजय : **''आमच्या समाजक्रांतीचे जनक'',** पॉप्युलर प्रकाशन, मुबंई, १९९४

१०. कुलकर्णी अ.अ. : **''प्रदक्षिणा''** खंड –१, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, सुधारित चौथी आवृत्ती १९६८.

११. कुलकर्णी अ.रा. : **''महात्मा ज्योतिराव फुले सामजिक आणि शैक्षणिक कार्य'',** डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती २००८.

१२. कोत्तापल्ले नागनाथ : **''मराठी कविता आकलन आणि आस्वाद''**, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, २०११

१३. कोत्तापल्ले नागनाथ (संपा.) : **''शेतकऱ्यांचा असूड''**, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती ऑगस्ट २००१, पुनर्मुद्रण मे २००४.

१४. कोसंबी दामोदर : **''पुराणकथा आणि वास्तवता'',** (अनु. वसंत तुळपुळे), लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, जून २००४.

१५ .खरात संभाजी : **''सत्यशोधक चळवळ : वाटचाल आणि चिकित्सा''**, सम्यक प्रकाशन, दिल्ली, प्रथमावृत्ती २००५.

१६. गाडगीळ स.रा. : **''मराठी काव्याचा मानदंड''**, खंड १ व २, पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती २००२.

१७. गुंदेकर श्रीराम : **''सत्यशोधकी साहित्य परंपरा आणि मराठी लेखिका''**, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, २०१२.

१८. गुंदेकर श्रीराम : **''महात्मा फुले साहित्य आणि साहित्यमूल्ये''**, प्रतिमा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, ऑगस्ट २००२.

१९. गायकवाड पं.भा. (संपा.) : **''महात्मा ज्योतिबा फुले''**, प्रकाशन– पंडितराव माधवराव गायकवाड, मुद्रण प्रणव, नारगाव, जि. नाशिक, १९८६.

२०. गोसावी सुनंदा : **''प्रबोधनाचे प्रवक्ते''** गं.बा. सरदार, डॉ.भ.स.गोसावी, प्रकाशन – नाशिक, प्रथमावृत्ती १९८६.

२१. चिपळूणकर विष्णुशास्त्री : **''निबंधमाला''**– खंड १व२, वरदा प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती, जानेवारी १९९३.

२२. जगताप मुरलीधर (संपा.) : **''युगपुरुष–महात्मा फुले''**, महात्मा फुले, चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, प्रथमावृत्ती मे १९९३.

२३. जोग रा. श्री. (संपा. ) : **''प्रदक्षिणा''**–खंड १, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती १९७२, पुनर्मुद्रण २००२.

२४. जोग रा. श्री. (संपा.) : **''हरपले श्रेय : केशवसुतांच्या निवडक कवितांचा संग्रह''**, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुर्नमुद्रण १९६४.

२५. जोग विष्णुबुवा (संपा. ) : **''सार्थ तुकाराम गाथा''**, ज्योती ढवळे प्रकाशन, मुंबई, पंधरावी आवृत्ती, जुलै २००३.

२६. जोशी लक्ष्मणशास्त्री : **''जोतीचरित्र''**, नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली, चौथी आवृत्ती २००४.

२७. डुम्बरे सदा (संपा.) : **''कर के देखो''**, समकालीन प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती २००९.

२८. दिवाकर वैशाली, चव्हाण प्रवीण : **''भारतातील राष्ट्रवाद : सिद्धांत आणि व्यवहार''**, पुणे, प्रथम आवृत्ती १५ डिसेंबर, २०००.

२९. देशपांडे (डॉ.) कृ.पं. : **''दिनांची साउली''**, नुतन प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९८१.

३०. देशपांडे (डॉ.) सु.र. : **''मराठेशाहीतील मनस्विनी''**, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००४.

३१. नरके हरी (संपा.) : **''आम्ही पाहिलेले फुले''**, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, १९९३

.

३२. नरके हरी, फडके, य.दि. (संपा.) : **''महात्मा फुले गौरव ग्रंथ''**–खंड पहिला, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समितीकरिता महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, सुधारित द्वितीयावृत्ती १९९१.

३३. नलगे चंद्रकुमार, (डॉ.) पानतावणे गंगाधर (संपा.) : **''स्त्री आत्मकथन''**, सुरेश एजन्सी, पुणे, प्रथमावृत्ती जुलै १९९०.

३४. पाटील पं.सि. : **''महात्मा ज्योतीराव फुले यांचा अल्प–परिचय''**, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मंत्रालय, मुंबई. द्वितीयावृत्ती – १९८४.

३५. पाठक वामन : **''आधुनिक मराठी काव्याचे अंत:प्रवाह''**, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६४

३६. पवार ना.ग. : **''सावित्रीबाई फुले : अष्टपैलू व्यक्तिमत्त्व''**, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, दु.आ. २०१०.

३७. पवार ना.ग. व वरोकर अविनाश : **''भारतीय समाजक्रांतीचे जनक महात्मा ज्योतीराव फुले''**, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०००.

३८. बनसोड श्रीकृष्ण (संपा.) : **''महात्मा फुले दर्शन''**, साप्ताहिक वऱ्हाड विकास, किशोरनगर, अमरावती, १९७२.

३९. भवाळकर तारा : **''स्त्री मुक्तीचा आत्मस्तर''**, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २०१०.

४०. भारदे बाळासाहेब, भाई वैद्य आणि इतर (संपा.) : **''विसाव्या शतकातील विचारप्रवाह''**, राष्ट्र सेवा दल, पुणे जिल्हा, फेब्रु २०००.

४१. भोसले (डॉ.) पांडुरंग : **''रेव्हरंड नारायण वामन टिळक शोध आणि बोध''**, चेतक बुक्स, पुणे, प्रथम आवृत्ती २०१२.

४२. भोसले शिवाजीराव : **''दीपस्तंभ''**, अक्षरब्रह्म प्रकाशन, पुणे, २००८

४३. माळी गजमल : **''वैदिक धर्मपरंपरा आणि फुले''**, राजमुद्रा प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. जाने. १९४५.

४४. माळी (डॉ.) मा.गो. (संपा.) : **''क्रांतिज्योती सावित्रीबाई ज्योतीराव फुले''**, आशा प्रकाशन, गारगोटी, जिल्हा कोल्हापूर, १९८०

४५. माळी (डॉ.) मा.गो. (संपा.) : **''सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय''**, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, दु.आ. १९९८.

४६. माळी (डॉ.) मा. गो., श्रीमती उपाध्ये नीला आणि इतर (संपा.) : **''सावित्रीबाई फुले (काल आणि कर्तृत्व)''**, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पहिली आवृत्ती – मार्च १९९८.

४७. रानडे शांता : **''सावित्रीबाई ज्योतिबा फुले जीवनकार्य''**, लोकवाङ्मय गृह, मुंबई, आठवी आवृत्ती मार्च २००९.

४८. सरदार गंगाधर बाळकृष्ण : **''महात्मा फुले–व्यक्तित्व आणि विचार''**, 'ग्रंथाली' अभिनव वाचक चळवळ, कुर्ला, मुंबई, प्रथमावृत्ती, जून १९८१.

४९. स्वामी व्ही.एन. : **''महाराष्ट्रातील समाजसुधारक, संत, साहित्यिक आणि थोर भारतीय विचारवंत''**, विद्याभारती प्रकाशन, लातूर, २००५.

५०. साळवे (डॉ.)शशिकांत : **''आधुनिक कादंबरी आणि मराठी लेखिका''**, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, २०१२.

## परिशिष्ट क्र. १

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट

| | | |
|---|---|---|
| ३ जाने. १८३१ | : | सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव या गावी जन्म. |
| १८४० | : | ज्योतिराव फुले यांच्याबरोबर सावित्रीबाई नेवसे यांचा विवाह. |
| १८४१ | : | सावित्रीबाईंची शिक्षण घेण्यास सुरुवात. |
| १८४७ | : | नार्मल स्कूलमधून पहिल्या प्रशिक्षित शिक्षिका म्हणून तयार झाल्या. |
| १ जाने. १८४८ | : | पुणे येथील बुधवार पेठेत भिडेंच्या वाड्यात मुलींच्या देशातील पहिल्या शाळेचा प्रारंभ आणि सावित्रीबाई शाळेतील पहिल्या शिक्षिका म्हणून कार्यरत. |
| १८४९ | : | पुण्यातील उस्मान शेख यांच्या वाड्यात प्रौढांसाठी शाळा उघडली. |
| १८४९ | : | शूद्रातिशूद्रांच्या शिक्षणासाठी, सामाजिक कार्यासाठी ज्योतिरावांबरोबर सावित्रीबाईंचा गृहत्याग. |
| १४ जाने.१८५२ | : | महिला सेवा मंडळातर्फे पहिला सार्वजनिक तिळगुळ समारंभ. |
| १६ नोव्हें.१८५२ | : | शैक्षणिक कार्याबद्दल फुले दांपत्याचा इंग्रज सरकारकडून गौरव. |
| २८ जाने.१८५३ | : | बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना. |
| १८५४ | : | ''काव्यफुले'' हा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध. |
| १८५५ | : | शेतकरी व मजूर स्त्री–पुरूषांसाठी रात्रशाळेचा प्रारंभ आणि जनजागृतीबरोबर अध्यापनकार्य. |
| १० ऑक्टो.१८५६ | : | पहिले पत्रलेखन. |
| २५ ऑक्टो.१८५६ | : | ''ज्योतिबांची भाषणे'' या पुस्तकाचे संपादन केले. |
| १८६४ | : | अनाथ बालकाश्रम उघडला. |
| १८६५ | : | काशीबाई ह्या ब्राह्मण बालविधवेच्या मुलास दत्तक घेतले. |
| १८६८ | : | स्वत:च्या घरचा हौद पाण्यासाठी अस्पृश्यांकरिता खुला केला. |
| २९ ऑगस्ट १८६८ | : | दुसरे पत्रलेखन. |
| २४ सप्टेंबर १८७३ | : | सत्यशोधक समाजाची स्थापना. |

| | | |
|---|---|---|
| २५ डिसेंबर १८७३ | : | सत्यशोधक समाजाच्या पद्धतीने पहिला विवाह संपन्न आणि या विवाहात सावित्रीबाईंचा सक्रिय सहभाग. |
| २६ एप्रिल १८७७ | : | तिसरे पत्रलेखन. |
| १८७६ ते १८७७ | : | भीषण दुष्काळात मदतकार्य, शासनाला रोजगारकार्य सुरू करण्यासाठी आवाहन केले व ५२ अन्न छात्रालये चालविली. |
| ११ मे १८८८ | : | ज्योतिराव फुले यांना '' महात्मा'' ही पदवी प्रदान. |
| ४ फेब्रुवारी १८८९ | : | फुले दांपत्याचा दत्तकपुत्र डॉ.यशवंत याचा ससाण्यांच्या मुलीशी सत्यशोधक पद्धतीने विवाह. |
| २८ नोव्हेंबर १८९० | : | महात्मा ज्योतिराव फुले यांचे महानिर्वाण. |
| १८९२ | : | दुसरा काव्यसंग्रह ''बावन्नकशी सुबोध रत्नाकर'' प्रकाशित झाला. |
| १८९३ | : | सासवड येथील सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविले. |
| १८९६ | : | महाराष्ट्रात पुन्हा दुष्काळ. |
| फेब्रुवारी १८९७ | : | पुण्यात प्लेगची साथ. |
| १० मार्च १८९७ | : | प्लेगच्या साथीत रोग्यांची सेवा करताना प्लेगने क्रांतिज्योतीची प्राणज्योत मालवली. |
| १० मार्च १९९७ ते १९९८ | : | महाराष्ट्रात सावित्रीबाई फुले स्मृतिशताब्दी वर्ष. |
| १० मार्च १९९८ | : | भारत सरकारच्या डाक–टपाल खात्याने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंच्या सन्मानार्थ पोस्टाचे तिकीट प्रसिद्ध केले. |

## परिशिष्ट क्र. २

पितृकुलाची वंशावळ

सावित्रीबाईंचे पिता खंडोजी नेवसे पाटील यांची वंशावळ

- मल्हारी तथा आबाजी
  - सिदूजी
    - खंडोजी (१८११)
      - सिदूजी (१८३३)
        - तुकाराम (१८५८)
          - भागाजी (१८८३)
            - रघुनाथ
            - नारायण
            - मारूती
          - सिताराम
            - मुलगी–गुणाबाई
        - सावळा (१८६०)
          - मुलगी–गोजाबाई (१८८५)
          - बहिरू (१८९०)
            - मुलगी तानुबाई
            - रघुनाथ
            - मुरलीधर
            - गणपत
            - एकनाथ
      - सावित्री (मुलगी) (३ जाने १८३१)
      - सखाराम –
      - श्रीपती –

(यांचा वंशवेल वाढला नाही)

# परिशिष्ट क्र. ३

## क्रांतिज्योती सावित्रीबाईंच्या सन्मानार्थ शासनाच्या योजना :

### १) महात्मा फुले शिक्षण हमी योजना :

वय वर्षे ६ ते १४ वयोगटातील शालाबाह्य मुलामुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही योजना इ.स.२००१ पासून केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्या परस्परसहकार्यातून ही योजना राबविली जाते.

### २) सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना :

इयत्ता ७ वी ते १० वी या वर्गातील एस.सी, एस.टी. या गटातील प्रत्येक विद्यार्थिनींना दरमहा ही शिष्यवृत्ती दिली जाते.

### ३) सावित्रीबाई पुरस्कार :

शिक्षण विभागातर्फे 'सावित्रीबाई फुले पुरस्कार' प्रत्येक वर्षी स्त्री–शिक्षिकांना उत्कृष्ट सेवेबद्दल देऊन शिक्षिकांचा गौरव केला जातो.

### ४) सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना :

ही योजना राज्यात १९९५ पासून राबविण्यात येत आहे. राज्याच्या नवीन लोकसंख्याविषयक धोरणानुसार या योजनेत १ एप्रिल २००० पासून बदल करण्यात आला.

# परिशिष्ट क्र.४

## क्रांतिज्योती सावित्रीबाईंविषयी मान्यवरांचे गौरवोद्‌गार.

❖ ''सावित्रीबाई फुले ही या देशातील सर्वच वंचितांची मोठी माय आहे.''

यशवंत मनोहर (कवी व लेखक)

❖ ''सावित्रीबाई फुले यांचे चरित्र अंधारात चाचपडणाऱ्यांना हातात पणती घेऊन दिशा दाखविणारे आहे. ज्ञानाच्या प्रकाशातून अज्ञानाचा अंध:कार दूर करण्यासाठी प्रेरणादायी आहे. आज प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटविलेला दिसतो याची मूळ प्रेरणा सावित्रीबाईंच्या कार्यात आहे.''

वैशाली अघोर (कवयित्री)

❖ ''स्त्रियांच्या परिवर्तनाशिवाय समाजक्रांती अर्थशून्य आहे, तर स्त्रियांकडे दुर्लक्ष करणारी समाजव्यवस्था अनर्थकारी आहे अशी मोलाची शिकवण सावित्रीबाईंनी जगाला दिली. सनातन्यांच्या विचारांची ओळ स्वज्ञानाने पुसट करीत चालणाऱ्या सावित्रीबाईंची बरोबरी करणारी एकही स्त्री त्याकाळी झाली नाही.''

भा.ल.ठाणगे (इतिहास संशोधक)

❖ ''उभ्या आयुष्यात या महात्म्याला जगाने अनेक वेळा दूर लोटले. एका जिवाने प्रथमपासून अखेरपर्यंत साथ दिली. त्यांना वेळोवेळी सुखाचा, आनंदाचा, प्रेमाचा, औदार्याचा हात दिला तो जीव म्हणजे त्यांची अर्धांगिनी, सोबतीण, वीरपत्नी, सावित्रीने एका शब्दाने कधी दुखावले नाही.''

पंढरीनाथ पाटील (चरित्रकार)

❖ ''सावित्रीबाई भारतातील पहिली थोर क्रांतिकारक स्त्री होती. सावित्रीबाई व जोतिबा दोघेही आपआपल्या परीने क्रांतीचे अग्रणी होते. जोतिबांचे कर्तृत्व व ऊर्जा सावित्रीबाईंच्या अंगी बाणलेली होती. पुराणातल्या सावित्रीने यमापासून पतीचे प्राण

परत मिळविले. या सावित्रीने पतीचा प्राण आपल्या प्राणात समाविष्ट करून घेतला आणि संयुक्त विभूतीत्व शिल्लक राहिले.''

आचार्य दादा धर्माधिकारी

❖ ''शाळेत जाणाऱ्या मुलींना सांगावे लागते बाई गं, आज तू जी मोकळेपणाने सायकलवरून आणि स्कूटरवरुन जाते आहेस ना त्यासाठी फुल्यांच्या बायकोने सनातनी समाजाकडून शेणमारा सहन केला होता.''

पु.ल.देशपांडे

❖ ''अज्ञात आईबापाचे निराधार मूल आपल्या पदरात घेऊन त्याला स्त:च्या मुलाप्रमाणे लहानाचे मोठे करणारी उदार ह्दयी स्त्री पहावयास मिळते, पण एखाद्या विधवेला अनैतिक संबंधातून झालेले मूल आपलेच समजून त्याचे संगोपन करणारी दुर्मिळच. सावित्रीबाईंच्या बालगृहात बाळंतपणास आलेल्या काशिबाईच्या मुलाला दत्तक म्हणून ओटीत घेतले हे केवळ भावनेच्या आहारी जाऊन हे साहस कार्य केले असे कोणी म्हणू शकेल पण मानसातील माणुसकी अन्य भयाच्या कल्पनेने मरण पावते हे आपण नेहमीच अनुभवतो. जाती, वंश, धर्म व परंपरा यांच्या कक्षा ओलांडून गेलेली, विचारनिष्ठा असलेली स्त्रीच ही बंडखोरी करू शकते.''

इंदुमती केळकर

❖ ''राष्ट्राच्या, धर्माच्या, वर्गाच्या कोणत्याही तटबंदींना व निषेधाला न जुमानता ज्यांचे विचार व कृती अक्षांश–रेखांशाची अटक ओलांडून सर्वकाली व सर्व स्थळी जाऊन पोहचतात व प्रभाव पाडतात अशा मानवतेच्या मंत्रदात्यांमध्ये सावित्रीबाई फुले यांचे स्थान वरचे आहे.''

भा.ल.ठाणगे (इतिहास संशोधक)

## **परिशिष्ट क्र. ५**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या ‘काव्यफुले’ या काव्यसंग्रहातील कविता

(इ.स.१८५४)

१. प्रास्ताविक

२. अर्पणिका

३. शिवप्रार्थना

४. शिवस्तोत्र.

५. छत्रपती शिवाजी

६. स्वागतपर पद्य

७. ईशस्तवन

८. जोतीबांना नमस्कार

९. ज्योतिबाचा बोध

१०. संसाराची वाट

११. तेच संत

१२. आमची आऊ

१३. राणी छत्रपती ताराबाई

१४. माझी जन्मभूमी

१५. पिवळा चाफा

१६. जाईचे फूल

१७. जाईची कळी

१८. गुलाबाचे फूल

१९. फुलपाखरु व फुलाची कळी

२०. मानव व सृष्टी

२१. शूद्रांचे दुखणे

२२. द्रष्टा कवी

२३. खुळे काव्य व खुळा कवी

२४. मनू म्हणे

२५. ब्रह्मवंती शेती

२६. श्रेष्ठ धन

२७. बाळास उपदेश

२८. इंग्रजी माऊली

२९. नवस

३०. शुद्र शब्दाचा अर्थ

३१. बळीचे स्तोत्र

३२. इंग्रजी शिका

३३. मातीची ओवी

३४. शिकणेसाठी जागे व्हा

३५. शूद्रांचे परालंबन

३६. बोलकी बाहुली

३७. तयास मानव म्हणावे का?

३८. इंग्रजी माऊली

३९. सामुदायिक संवाद पद्य

४०. अज्ञान

४१. सावित्री व जोतिबा संवाद

* * *

**परिशिष्ट क्र. ६**

पोस्टाचे तिकीट : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले




**परिशिष्ट क्र. ७**




सावित्रीबाई फुले यांच्या ' काव्यफुले '
या काव्यसंग्रहावरील मुखपृष्ठ

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या "काव्यफुले" या काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ.(इ.स.१८५४)

## परिशिष्ट क्र. ८


काव्यफुले
कवयित्री - सावित्री जोतिबा


सत्य सुंदर शिव थोर । शिरी शोभे जटाभार । गळी
रुंडमाळा दुर्धर । चतुर्दश विद्येच्या ॥१॥ त्रिलोचन त्रि
शिखि धर । त्रिपुरांतक । त्रिगुण त्रिपुंड । [illegible]
चा [illegible] । चाले कर्ता कर्म क्रियेचा ॥२॥ नीलकंठ
[illegible] सुंदर । मिळवले नाम दिव्य थोर । चतुःखण्ड
[illegible] संभार । [illegible] शोभे [illegible] फुलांची ॥३॥ अज्ञानीस
ज्ञान देई पूर्ण । [illegible] । [illegible] आधार
[illegible] ऐसे आशीर्वाद मिळावे ॥४॥ नमःस्कार तुज
शिवरूपा । [illegible] । अज्ञान नष्ट [illegible]
सर्वांचा आता । प्रार्थना ही सावित्रीची ॥५॥

शिव तुझे जप स्तोत्र
प्रेमभावे गातसे मी
विश्वंभरा तू महेशा
भक्तीभावे [illegible] ॥

सावित्री


क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे "काव्यफुले" या काव्यसंग्रहातील मुळ हस्ताक्षर

**परिशिष्ट क्र. ९**





क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे "सावित्री जोतिबा विरचित अथ: बावन्नकशी सुबोध रत्नाकर" या काव्यसंग्रहातील मुळ हस्ताक्षर

## परिशिष्ट क्र. १०




क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे शिवमहिमा स्तोत्राचे भाषांतर (मोडी लिपी) हस्ताक्षर

## परिशिष्ट क्र. ११



क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची दुर्मिळ इंग्रजी स्वाक्षरी

## परिशिष्ट क्र. १२



शिवप्रार्थना

(ओवी)

श्लोक अनुष्टुभ

शीव तुझे जपे स्तोत्र प्रेम भावे गाऊनि मी

श्लोक वसंत तिलका


ज्याने गुणे जगत मौलिक निर्मियेले

त्या शंभुला पुजुनिया वर मागते मी

जिव्हेवरी वसुनि तू रचि काव्य नामी


क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची स्वरचित व स्वहस्ताक्षरातील शिवप्रार्थना

**परिशिष्ट क्र. १३**




क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्वाक्षरीचे छायाचित्र

## परिशिष्ट क्र. १४


१०

सावित्री व जोतिबा संवाद.

॥ अभंग ॥

सावित्री :- [illegible] ॥

[illegible] अपूर्व । [illegible] ॥१॥

[illegible]

जोतिबा :- [illegible]

[illegible]

फुलपाखरे ती । [illegible] ॥

[illegible]

वारा वाहे गोड । [illegible] ॥


रजनी [illegible] । [illegible] ॥५॥

टीप :- प्रज्वलित अग्नीच्या ज्वाला भोवती लाल प्रकाश पसरलेला असतो तस्मात पूर्व दिशा लालरंगाने व्याप्त झाली होती तिची अपूर्व शोभा अवलोकन करता करता अतिशय आनंद होऊन मन तृप्त होत होते.

टीप :- स्वतः भोवती प्रचंड वेगाने, भोवऱ्यासारखे.

. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या काव्यसंग्रहातील '' सावित्री व जोतिबा संवाद '' या अभंगाचे हस्तलिखीत.

परिशिष्ट क्र. १५



तात्यासाहेब भिडे यांचा बुधवार पेठेतील वाडा.
फुले दांपत्याने भारतातील पहिली मुलींची शाळा याच वाड्यात सुरु केली.

## परिशिष्ट क्र. १६ (अ) नायगाव येथील शिल्पसृष्टी




नायगाव येथील शिल्प : महात्मा ज्योतिराव फुले क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना अनौपचारिक शिक्षण देताना.



नायगाव येथील शिल्प : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले अज्ञानरुपी बंधनातून मुक्त करण्यासाठी मुलींना ज्ञानदान करताना

## परिशिष्ट क्र. १६ (ब)



नायगाव येथील शिल्प : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले अस्पृश्यांना जलदान करीत असताना.



नायगाव येथील शिल्प : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पहिल्या प्रौढसाक्षरता वर्गात ज्ञानशिदोरी देत असताना.

परिशिष्ट क्र. १६ (क)



नायगाव येथील शिल्प : अनाथालयातील मुलांबरोबर सावित्री–ज्योतिराव दांपत्य




नायगाव येथील शिल्प : सासवड येथील सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनात अध्यक्षपदावरुन जनसमुदायाला संबोधित करताना क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले.

**परिशिष्ट क्र. १६ (ड)**




महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले दांपत्य शिल्प : नायगाव

## परिशिष्ट क्र. १७





क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या अमूल्य कार्याचा मूक साक्षीदार : गंजपेठ, पुणे येथील महात्मा फुले वाडा.




कर्मभूमी पुणे, धर्म मानवता असणाऱ्या क्रांतिज्योतीचा आगळा–वेगळा सत्कार पुणे विद्यापीठाने 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' हे नामकरण करुन केला.

## परिशिष्ट क्र. १८




क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या मानवधर्माचा साक्षात्कार घडविणारा चित्रपट 'सावित्रीबाई फुले' चे बॅनर.

**परिशिष्ट क्र. १९**




क्रांतिज्योति सावित्रीबाई आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारधारेची नव्याने ओळख करुन देणारे नाटक : 'सत्यशोधक'चे बॅनर.



'सत्यशोधक' या नाटकातील एक दृश्य

## निर्देशसूची :

## अ. ग्रंथकार सूची :


| | | |
|---|---|---|
| अ.म. जोशी | : | २४०. |
| आ.ह. साळुंखे | : | २११ |
| उत्तम कांबळे | : | २३४. |
| उषा पोळ–खंदारे | : | २४७ |
| एस.एस्. होळीकर | : | २४७. |
| किरण नागतोडे | : | २४८. |
| कृ.पं. देशपांडे | : | ५२, ५४, ५५, ६५, ९३, १०३, १०७, १४८, १४९, १५३. |
| कृष्णा मालकर | : | ५, ६, १५. |
| गो.नी. दांडेकर | : | २४५. |
| गो. पु. देशपांडे | : | २५०, २५१. |
| गो.म. कुलकर्णी | : | १६०, १६५, १६६. |
| दादा धर्माधिकारी | : | २२२. |
| धनंजय कीर | : | १३. |
| नलिनी पंडित | : | ११. |
| नाना ढाकूलकर | : | १४८, १५३. |
| ना. ग. पवार | : | १६. |
| निरंजन माधव | : | १५१. |
| नीळकंठ मेंढे | : | ५७. |

पु.ल. देशपांडे : २००, २१८.

पंढरीनाथ कवडे : ८४, ९१.

पांडुरंग भोसले : १८१.

फुलवंताबाई झोडगे : ३, ९६, १४७.

भ.श्री. पंडित : ५६, १६८, १७०.

म.वा. धोंड : २४२.

मा.गो. माळी : २०. २३, ४८, १५२.

मो. रा. वाळंबे : १३९, १४०, १४१.

यशवंत मनोहर : २४६.

रणजित देसाई : २४३, २४४.

रवींद्र भट : २४५.

राजाराम सुर्यवंशी : ५५, ६७, ८८, १२१, १९१, १९२.

रा.ना. चव्हाण : २०१.

राम कांडगे : १९९, २००, २०२.

रामचंद्र देखणे : २३२.

रावसाहेब चोले : २०१, २३३.

रा. श्री. जोग : ५१, १५८.

वामन पाठक : १८०.

वि.का. राजवाडे : १८०, २५२.

विनायक दुर्गे : २०७.

वि.स. खांडेकर : २४३.

वैशाली अघोर : २४७.

वसंत आबाजी डहाके : १३५, १४२, १६०.

स.गं. मालशे : १५०, १५२.

सुनिता बिडवे : ५३.

सुभाष सावरकर : ५७, १२०.

सुरेंद्र बारलिंगे : १५१, १५२.

स्वामी विवेकानंद : ७२, ७७, ८३, ८५, ८६, ९०.

हरी नरके : १५२.

हरीभाऊ आपटे : २४५.

श्रीराम गुंदेकर : ६९, २१४.

* * *

## ब. स्थलनाम सूची :


अमरावती : १०७.

अमेरिका : ७, १७४, १७५.

अहमदाबाद : २१०.

आग्रा : २१३.

आळंदी : १७५.

ओतूर : २२, ५०, १३२, २१६, २१७, २१९.

इंग्लंड : १९४.

इंदापूर : २२३.

करंजगांव : १०७.

कऱ्हाड : १६९.

कलकत्ता : १५८, १६१, १६२, १६३, २१३.

काशी : ९२.

कोल्हापूर : ४१, १०१, २१६.

गुजरात : ४३, १६७.

गोवा : १६०.

घोरपडी : २२९.

जर्मन : १६०.

जळगांव : २१६.

जुन्नर : १३२, २१७.

तासगांव : २२३.

तंजावर : १६७.

धनकवडी : ५, २२३.

धुळे : २१६.

नगर : १७५, २१६, २२७.

नागपूर : १६७, २१६.

नायगांव : २, ५, ६, २२, ७८, १३०, १३१, १३३.

पळशी : २.

पुणे : ५, १०, १८, ९५, १३३, १७१, १९९, २३२, २३३.

पैठण : २.

पंढरपूर : ३४, १७५, २२३.

बडोदा : २३, ५०, १२२, २१६.

बंगाल : ४२, १६१.

बुंदेलखंड : १६७.

भारत : ११, १२, १४, ४०, ५९, ८५, ८६, १६०, १६१, १६३, १७४, १७५, १७६, १९४, १९७, २११, २३२.

मद्रास : २१३, २१६.

मराठवाडा : १४८, १६७.

महाराष्ट्र : २८, ४१, ९५, १०१, १३१, १५८, १६१, १६७, १६८, २२३, २२६.

मुंबई : ४२, १०७, १६२, १७१, १७४, २१६.

युरोप : ७, १६०.

वऱ्हाड : १६७.

वानवडी : २२९.

विदर्भ : १६८.

शिरवळ : २.

सातारा : २, १२९.

सासवड : ४४, २१८, २१९.

सांगली : १७३.

हडपसर : ७, ३२.

हिंदुस्थान : ५६, १६१.

श्रीरामपूर : १५८.


* * *

## क. व्यक्तिनाम सूची :


| | | |
|---|---|---|
| अगस्ती | : | २१४. |
| अतुल पेठे | : | २५०, २५१. |
| अलेक्झांडर ग्राँट | : | १६३. |
| आऊ | : | २२, २४, ३२, ८०, ११५, १३५. |
| आगरकर | : | १४८, १६०. |
| आनंदीबाई कर्वे | : | १५९, १८४. |
| इंडिया | : | १४४, १४५. |
| उमिया शंकर | : | २००. |
| उस्मान शेख | : | ५३, २३३. |
| एकनाथ | : | १७४. |
| एच.टी. गज्जर | : | १५२. |
| एल्फिन्स्टन | : | १०, १६२. |
| ओंकार गोवर्धन | : | २५०. |
| औरंगजेब | : | १३. |
| कालिदास | : | ७३. |
| काशीबाई कानिटकर | : | १५९, १८४, १९०. |
| काशिबाई नातू | : | २०१. |
| कृष्णाजी केशव दामले | : | १७७. |
| कृष्णशास्त्री चिपळूणकर | : | १७२. |
| कृष्णशास्त्री राजवाडे | : | १७२. |
| केशव भवाळकर | : | १४४. |
| केशवसुत | : | २३, ५५, ५६, ५७, १४८, १७८, १७९, १८०, १८१, १८२, १८५, १८६. |
| कोलंबस | : | २१५. |
| कँडी | : | १७४. |
| खंडोजी | : | २, ३. |
| खंडोबा | : | १७५. |
| गणपत काळे | : | २२३. |

| | | |
|---|---|---|
| गणपतराव पटवर्धन | : | १७२. |
| गणेश लेले | : | १७२. |
| गांधी | : | १९२, २४५. |
| गोविंदराव | : | ५, ६, १६, २०५. |
| गोविंद काळे | : | २१. |
| गोपाळराव देशमुख | : | १३, २०४. |
| गोपाळराव पटवर्धन | : | ८. |
| ग्यानोबा ससाणे | : | २०९, २१५, २१६, २२५. |
| चिमणाबाई | : | ५, ७. |
| चार्ल्स वुड | : | १६३. |
| छबिलदास | : | १५. |
| जगन्नाथपंडित | : | १७३. |
| जमदग्नी | : | २१४. |
| जस्टिन ॲबट | : | १६३, १७३, १७४, १८५. |
| जॉन | : | ७. |
| जिजाबाई | : | ८७. |
| जे. एफ. एडवर्डस | : | १६३. |
| जे. नेल्सन फ्रेझर | : | १६३. |
| जोन्स | : | १९१. |
| ज्योतिराव | : | ५, ६, १४, १५, १६, २०, २४, ३०, ३१, ४४, ५३, ५५, ५९, ७६, ७९, ९९, १०८, ११२, ११५, ११६, ११७, ११८, १२२, १६०, १६४, १६७, १८१, १९८, २००, २०२, २०५, २१३, २२०, २२२, २३३, २५३. |
| टिळक | : | १६, ७१, ९२, १६०. |
| ताराबाई राणी | : | ४१, १००, १०१, १०२, १०६. |
| ताराबाई शिंदे | : | १५९, १८४, १९३. |
| तुकाराम पिंजण | : | २०५. |
| दादोबा तर्खडकर | : | ४२, १६९, १७०, २०४. |
| दयांनद सरस्वती | : | ४३. |
| दुष्यंत | : | ७. |

देवयानी : २१४.
धनाजी जाधव : १०१,
धोंडाबाई : ७.
नळराजा : १००.
नाना फडणवीस : १६१.
नानासाहेब पेशवे : ८.
नामदेव : ३४, १४३, २४१.
नारायण टिळक : १७६, १८५.
निकोल मॅकनिकल : १६३.
नेल्सन मंडेला : २३५.
पर्ण पेठे : २५१.
परशुरामतात्या गोडबोले : १७१, १७२.
पाठारे : ५१, १७०.
पार्वतीबाई आठवले : १५९, १८४.
पाराशर : २१४.
पाळंदे : ५१, १६९, १७०.
पंडिता रमाबाई : १६०, १८४.
पांडुरंग गायकवाड : २२९.
पांडुरंग पारखी : १७२.
फातिमा : २२४.
फेअरबँक : १७३, १७४.
फेरार : १६, १८४, २३४.
बजाबा प्रधान : ५२.
बजूबाई निंबणकर : २०८, २०९.
बहिणाबाई : ३४, ६७, १५१.
बळवंतराव कोल्हे : २३२.
बळीराजा : ४०, ४१, ५९, ७९, ८८, १०६, १३६, १९८.
बाजीराव : १०.
बाबा पद्मनजी : १७६, १८५, २०३.

| | | |
|---|---|---|
| बाया | : | १८४. |
| महाघट पाटील | : | २३, ५०, १०७, १२२, २१६, २१७. |
| महादजी शिंदे | : | ८. |
| महादेव रानडे | : | ४३, ९२, २०४. |
| मनू | : | ८९, ११७, ११८. |
| मामा परमानंद | : | २००. |
| मिचेल | : | ४१, ४२, १३३, १७३, १७४, १७५, १८५, २०३. |
| मिसेस मिचेल | : | १५, १९, ४२, १३३, १४४, १७५, १८५. |
| मीराबाई | : | २४५. |
| मुक्ता साळवे | : | १८५, १९७. |
| मेकॉले | : | ७१, १६४. |
| मोल्सवर्थ | : | १५९, १६२, १७४. |
| भवभूती | : | १७३. |
| भाऊ कोंडाजी पाटील | : | २१७. |
| भानुदास | : | १७४. |
| भालेराव | : | १९४. |
| ययाती | : | २१४, २४३. |
| यशवंत | : | २१३, २१५, २१६, २२१, २२२, २२६. २२७. |
| युधिष्ठिर | : | ९४, १००. |
| येशूख्रिस्त | : | १७५. |
| योहान्न गुटेनबर्ग | : | १६०. |
| राजवाडे | : | १४८. |
| राजा राममोहन रॉय | : | ४२. |
| राधा | : | २०२, २१६, २२६. |
| रामकृष्ण मोडक | : | २०३. |
| रामचंद्र अमात्य | : | १०१. |
| रामय्या अय्यावारु | : | २०९. |
| रेणुका | : | २१४. |
| लक्ष्मीबाई टिळक | : | १५९, १८४. |

| | | |
|---|---|---|
| लक्ष्मीबाई नेवसे | : | २, ५. |
| लोपामुद्रा | : | २१४. |
| वशिष्ठ | : | २१४. |
| वाल्मिकी | : | ३३. |
| वाळवेकर | : | १५, १९. |
| विठोबा अण्णा | : | १६९. |
| विल्यम कॅरे | : | १५९, १६२. |
| विशाखादत्त | : | १७३. |
| विश्वामित्र | : | ६१, २१४. |
| विष्णुदास भावे | : | १७३. |
| विष्णुशास्त्री चिपळूणकर | : | २०४. |
| विष्णु करमरकर | : | २०३. |
| शकुंतला | : | ७. |
| शारदा | : | १७८. |
| शिवाजी | : | ४१, ८७, १००, १०६, १०९, १११, १४६, १७२. |
| शुद्रक | : | १७३. |
| शंकर | : | ४०, ५४, ५९, १०६, १४०, १४६. |
| शंकाराचार्य | : | ९२, ११०. |
| सखुबाई अभ्यंकर | : | १९१. |
| सखाराम नेवसे | : | २, ४. |
| सखाराम परांजपे | : | १४४. |
| सगुणाबाई | : | ५, ६, ७, १५, १६, २४, ३२, ३५, ८०, |
| सत्यवती | : | २१४. |
| सयाजीराव गायकवाड | : | २२६. |
| सरस्वतीबाई गोवंडे | : | २२४. |
| साळुबाई तांबवेकर | : | १५९, १८४. |
| सिदुजी | : | २, ४. |
| सीताराम आल्हाट | : | २०७. |
| सुषमा देशपांडे | : | २५०. |

| | | |
|---|---|---|
| संत तुकाराम | : | ३४, ३९, १३९, १४३, १७४, १७५, २४५. |
| हरी ख्रिस्ती | : | १७५. |
| हरी पाठारे | : | १४३. |
| होमर | : | ९३. |
| हंटर | : | १६४. |
| हंबीरराव मोहिते | : | १०१. |
| ज्ञानेश्वर | : | २४५. |
| श्रीपती | : | २, ४. |
| श्रीपाद केळकर | : | २०१. |


* * *